म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९४८

REFBK-0018162



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 SEP 1979
25 NOV 1981

(क्र. मा. प.)

संग्रह शाखा

हार आणि प्रहार

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७६८१२ वि: निबंध
क्रमांक २१४८ नों दि: २७।६।७१

मुख्यत्वेकरून साप्ताहिक 'सोबत'मधील लेखांचा संग्रह

ग. वा. बेहेरे

REFBK-0018162

मूल्य पंधरा रुपये

अस्मिता प्रकाशन ४५८।२ सदाशिव पेठ, टिळक रोड, चित्रकुटी, पुणे ३० (फोन ५५५९७)

प्रकाशक
ग. वा. बेहेरे
अस्मिता प्रकाशन, ४५८।२ सदाशिव, टिळक रोड, पुणे ३०.

आवृत्ती पहिली
३०००.

प्रसिद्धी दिनांक
७ मे १९७१

© ग. वा. बेहेरे

मूल्य रु. १५

मुखपृष्ठ–सत्यवान टण्णू

मुद्रक
ग. वा. बेहेरे
विराज मुद्रणालय
६३४ बुधवार पेठ, पुणे २

अर्पणपत्रिका

एका दैदिप्यमान ध्रुवताऱ्याकडे पहात वाट चालत आम्ही खूप कुठेतरी दूरवर आलो आहोत.

ऐहिक उत्कर्ष, मानसन्मान, सुखस्वास्थ्य याची या वाटेवर मुळीच सोवत नव्हती.

पण आम्हाला खंत वाटली नाही.

कारण आम्हाला ठाऊक आहे की हा रस्ता कष्टाचा अन् खाचखळग्याचा असला तरी सत्याचा आहे.

या रस्त्यावर तो प्रखर बुद्धिवादाचा ध्रुवतारा वावरतो—आम्हाला विश्वास देतो—श्रद्धा देतो—शक्ती देतो.

सिंधुकुलातल्या अखेरच्या ह्या महापुरुषाला—विनायक दामोदर सावरकर यांच्या स्मृतीला अत्यंत नम्रतेने हा ग्रंथ अर्पण.

ग. वा. बेहेरे

प्रास्ताविक

मुख्यत्वेकरून 'सोबत' साप्ताहिकातील हे लेखन आहे. आणि सोबत साप्ताहिक ज्यासाठी लोकमान्य होत आहे, ते सर्व गुणदोष त्यात आहेत.

साप्ताहिकाचा जमाना संपलेला आहे अशी हाकाटी चालू असताना मी सोबत साप्ताहिक काढण्याचा निर्णय घेतला.

कल्पना होती की या निर्णयाची किंमत पाच-पंचवीस हजार रुपये ठरेल.

पहिली दोन वर्षे खरोखरीच ती कल्पना खरी ठरली. सुमारे वीस हजार रुपयांचे कर्ज झाले आणि ते वाढणारे आहे याविषयी खातरजमा पटली.

पुष्कळ शत्रू निर्माण करीत–स्वतःचे रक्त जाळीत मी हे व्रत ज्या तळमळीने आचरीत होतो ते का हेच मला उमगत नव्हते.

मी करत होतो ते लोकांना आवडत नव्हते का? का माझे यत्न लोकांपर्यंत पोचत नव्हते?

काहीही असो, पण माझा यत्न म्हणजे पाण्यावरील अक्षरे ठरत होती–

म्हणजे मला तसे वाटत होते.

पण माझे ते वाटणे चुकीचे होते.

असे काहीसे सत्यशोधक, निर्भय आणि रक्तबंबाळ करणारे वृत्तपत्रीय लेखन जवळपास अदृश्य झालेला तो काळ. त्यामुळे माझा यत्न लोकांपर्यंत पोचून त्याची पावती मिळण्यास वेळ लागला.

पण एकदा लोकमान्यतेचा अचूक रस्ता दिसू लागल्यावर मग निरुत्साहाचे सर्व विचार जळून गेले. आपण करतो आहोत त्याचे परिणाम कुठेतरी घडत आहेत या विचाराने अंगावर रोमांच उठू लागले.

आपली ही लढत एकाकी नाही – त्यात पुष्कळच वाटेकरी आहेत. आणि तेही केवळ शाब्दिक सहानुभूतीने नव्हेत तर वित्ताने–श्रमानेही, ही जाणीव कोठे तरी उगवू लागली. आपण कुठेतरी कोणाच्यातरी हृदयाला हात घालीत आहोत ह्यापरता अन्य आनंद नाही.

सोबत साप्ताहिकाने मला हा आनंद दिला आहे. आणि म्हणूनच मलाही सोबतच्या वाचकांना इमान दिले पाहिजे.

ऐहिक आमिषे सदोदित वावरत असतात. स्वतःच्या प्रतिष्ठेचा बडेजाव उगाचच फूत्कारत असतो. दुसऱ्याच्या व्रणावर प्रहार करण्याची आसुरी लालसा नेहमी जिव्हा काढून लावसटासारखी आसुसलेली असते. अशा वेळेला धारदार

खरे, पण नेमके शस्त्र निवडणे फार कठीण जाते. न्यायान्यायविवेक सांभाळणे अवघड जाते. कधी नाविन्यात मौज वाटते तर कधी श्रेष्ठींना नग्न करण्यात भूषण वाटते. कधी थोड्याशा आधारावर मोठमोठे गगनचुंबी उंच इमले उभे करण्याचा मोह होतो. तर कधी जाणीवपूर्वक जोपासलेल्या श्रद्धांचा उमाळा अनावर होतो. मित्रांचे मित्र भीड घालतात तर शत्रूंचे मित्र मर्मभेदासाठी जाग आणतात. अशा वेळेला आपली नेमकी क्षुद्रता सदैव लक्षात ठेवावी लागते. मी ती ठेवतो आहे.

पण त्यातूनही मार्ग काढायचा असतो. अंतिम सत्य कोणालाच सापडले नाही तरी सत्याचा रस्ता निश्चित ठाऊक असतो. आणि त्या रस्त्याला सोडचिठ्ठी देता येत नाही. अखेरी सर्व अभिनिवेश, सर्व आग्रह, सर्व हव्यास याच सत्याच्या आश्रयाने चालायचे असतात. शिवाय कोणत्याच सत्याची किंमत त्वरित मिळणारी नसते. तो एक पोस्टडेटेड चेक असतो. म्हणजे मानवी सद्भावना, कृतज्ञता आणि स्मरण-शक्ती यावर विश्वासावेच लागते. सत्यासारखे सन्मित्र या भूतळी कोणी नसतात. पण अखेर सत्य-हीही स्वतःच्या ज्ञानाने, स्वतःच्या अनुभवाने, स्वतःभोवती निर्माण केलेली एक वस्तू असते. सत्य–सत्य हेही अखेरी व्यक्तिसापेक्षच असते. पु. भा. भावे यांना जे सत्य वाटते ते आचार्य भागवत किंवा ना. ग. गोरे यांना वाटतेच असे नाही. मनाच्या गाभाऱ्यात अत्यंत पवित्र, सात्विक आणि उदार अशी जी तत्त्वे असतात त्यातूनच सत्याची निर्मिती होते. आणि पुष्कळ वेळा सत्याला समानरूप लाभू शकते ते त्या औदार्यातूनच.

सोवतमध्ये वादग्रस्त विषय पुष्कळ वेळा आले. त्या त्या वेळेला ते संतापजनक वाटले. ते टीकाविषय झाले. जेवढा समाजघात मोठा, तेवढा कडवटपणा अधिक. हे हल्ले त्या त्या विषयापुरते मर्यादित असतात. त्या एका मुद्याव्यतिरिक्त त्या कोणाही माणसाने समाजाचे नुकसान केलेले नसते आणि म्हणून अन्यथा तो टीकेस पात्रही नसतो. कित्येक वेळा एखाद्या संदर्भामुळे त्याचा गुन्हा मोठा ठरतो. पण सारासारविवेक ठेवूनच, त्या त्या व्यक्तीवर लिहून झाले की माझे मन मी साफ स्वच्छ करतो. वृत्तपत्रकाराच्या भूमिकेतून त्याच्या वृद्धीच्या मर्यादेपर्यंत त्याने झाल्या अपराधाबद्दल शिक्षा केलेली असते. म्हणजे त्याच्या लेखी तो विषय संपूर्णतया संपलेला असतो. कसलेच किल्मिष मानसी न ठेवता संपादक त्या व्यक्तीचे उर्वरित चरित्र अनुभवीत असतो. त्याने अनुभवायला हवे. त्याच्या कौतुकासाठी सिद्ध असावयास हवे. मी ते करण्याचा यत्न करतो. हळुहळु काही रागलोभ दूर होतात. पण काही तसेच मागे उरतात. वर्षे उलटत गेली की हे उरलेले राग साचत साचत त्यांची एक प्रचंड भिंत बनते. माझ्या भोवती अनेक जणांच्या रागाची अशी एक प्रचंड भिंत आहे. घाबरावयास होईल अशी ही भिंत आहे. पण घाबरून चालणार नाही. तीही मला मोडली पाहिजे. त्या भितीमुळे सामाजिक जीवन अशक्य होते. कुणाला तरी आपण

दुखवले होते ही जाणीव आपण विसरलो तरी ज्याला जखम झाली तो ती जाणीव विसरणार कशी ? तो ती जखम वरी होऊच देत नाही. सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्यांनी असे हळवे होऊन चालणार नाही. मनुष्याचे चारित्र्य हे बव्हंशी स्वतःच्या आत्मविश्वासावर व कार्यपद्धतीवर अवलंबून असते. कोणाच्या टीकेवर नव्हे. चुकीच्या रस्त्याने निघालेल्याला थोपवून योग्य रस्त्याकडे फिरवता येते पण ज्याचा ठिकाणाच जेथे वाममार्गी आहे त्याला ठेचावे लागते–रक्तबंबाळ करावे लागते–प्रसंगी नष्ट करावे लागते. वृत्तपत्रकाराने स्वतःची कातडी वचावण्यासाठी अशा वाममार्गी लोकनेत्यांना चुकूनही क्षमा दाखवता नये. प्रसंगी लढून हार पत्करावी लागते किंवा समबळ नसेल तर पत्रकाराला घायाळ व्हावे लागते. ऐश्वर्याचे महाल बांधून पुष्ट देहाने मिरवणाऱ्या लाचार पत्रकारापेक्षा प्रसंगी घायाळ, पराभूत आणि परिस्थितीशी झगडणारा पत्रकार या दरिद्री, भरडल्या जाणाऱ्या देशाला हवा आहे. ऐश्वर्य सर्वांनाच हवे असते–पण त्या ऐश्वर्याची किंमत मात्र वृत्तपत्रस्वातंत्र्य ही खास नव्हे.

एकाद्या लेखासाठी जुन्या अंकाची मागणी करणाऱ्याच्या सोईसाठी हा सोबत-मधील लेखांचा पहिला खंड छापीत आहे. त्यात पुष्कळ लेख येऊ शकलेले नाहीत. त्याला खूप कारणे आहेत. वाचकांनी या संग्रहाला पसंतीची पावती दिली तर पुढे असाच दुसरा खंड काढण्याची मनीषा आहे. वृत्तपत्रातील लेखन नेहमीच अल्पायुषी असते. आणि जे फार चटपटीत, मर्मभेदक किंवा परखड वाटते ते कालाच्या इतिहासात फारच मामुली वाटू लागते. या ग्रंथाच्या संपादनात तसे काही होऊ नये याविषयी दक्षता घेतलेली आहे.

या पहिल्या खंडात व्यक्तिविषयक (पृष्ठ ७), आत्मचरित्रात्मक (७३), वैचारिक (१३७), पत्रात्मक (१९७), उपहासात्मक (२२५), हिंदु–मुस्लिम प्रश्न (२६३), आणि राजकीय (२९५) अशी लेखांची विभागणी केली आहे.

या पुस्तकाचे प्राथमिक संपादन श्री. शंकर सारडा यांनी केले. त्यांची धडपड, साहित्यावरची अपार निष्ठा शब्दांकित करण्यापलिकडची आहे. त्यांनी नेट धरला म्हणून जो काही थोडा आकार ग्रंथाला आला तो आला आहे. त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या सततच्या सहकार्यासाठी त्यांचे ऋण बाकी ठेवणे शहाणपणाचे ठरावे.

पुण्यातील साहित्यिक क्षेत्रात श्री. बाळ गाडगीळ, श्री. पारगावकर, श्री. वि. ग. कानिटकर, श्री. श्री. ज. जोशी, श्री. मिरासदार व श्री. विद्याधर पुंडलिक यांनी मजभोवती सदैव पहारा केला आहे. त्यांचा तीव्र विरोध आणि मनसोक्त प्रशंसा मी दोन्हीही अनुभवली आहेत. माझे मुंबईतले मित्र श्री. माधव मनोहर आणि धों. वि. देशपांडे हेही जागरूकतेने माझ्यावर लक्ष ठेवतात–पुष्कळवेळा कठोर टीका करतात. या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

ग. ता. बेहेरे

- एक घुमट, एक कळस, एक घाट . . .
- दाराशी थबकू नका महाराज !
- ' दादा ! ते आले ना !'
- ' प्रिय लता '
- वैनायकाचे चिंतन
- फासावरील निःश्वास
- महात्माजींचा हिंदूद्रोही नातू
- एक मुलुखमैदान तोफ निःस्तब्ध झाली . .
- नाते तेंडुलकरांशीः तीस वर्षांचा जमाखर्च
- ना. ग. नारळकर
- एक हरवलेली कविता



एक घुमट, एक कळस, एक घाट...

ते राजहंसाचे चालणे
अन् कोकिळकंठी गाणे
नाजुक पारिजातक हासणे
आता कैचे

बालगंधर्व वारले. खरे म्हणजे त्यांची कला मृत्यू पावून बरीच वर्षे झाली होती. उरला होता तो चैतन्यशून्य सांगाडा! तरीही त्या कुडीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात केवढे तरी चलनवलन जिवंत ठेवले होते. नामवंत धन्वंतरी-राजकारणी-कलावंत हे सारे, बालगंधर्व कसे आहेत हे कळण्यासाठी वाटेल ते करावयास सिद्ध होते. गेली पन्नास वर्षे रसिकांच्या प्रीतीचा झालेला हा विषय आता केवळ इतिहास झाला. आता त्या चौकस पृच्छा संपल्या. गंधर्व खरोखरीच वारले.

तरुणपणी माणसाच्या कोवळ्या मनावर जे परिणाम होतात ते त्यांची संगत अखेरपर्यंत सोडत नाहीत. एकोणीसशेदहा ते एकोणीसशेतीस–बत्तीसपर्यंतच्या कालखंडात ज्यांनी गंधर्व पाहिले–त्यांच्या लाडकाव्याने ज्यांच्या अंगावर रोमांच उठले, ज्यांनी आपल्या सर्व आशाआकांक्षा गंधर्व शृंगारावर बेतल्या–आपला जीवनविषयक दृष्टिकोण ज्यांनी गंधर्वांवर अवलंबून ठेवला, ती सर्व पिढी गंधर्वांनी सर्वथा भारून टाकलीच होती. आजही टाकलेली आहे. आज साठीपुढे जे वृद्ध हजर आहेत त्यांना गंधर्व या नावानेच गदगदून येते. त्यांच्या पत्नीचे, मित्राचे, पुत्राचे, पित्याचे ऋण त्यांना क्वचित् कमी मोलाचेही वाटते. बालगंधर्वांनी प्रत्येक रसिकासाठी निरनिराळी रूपे घेऊन त्या सर्व पिढीला कृतार्थ केले होते. त्या पिढीच्या भावना मी समजू शकतो. अलौकिक स्पर्शाने माणूस संपूर्णतया वश होतो. गंधर्वांच्या सर्व अवगुणांसकट त्या सुसंस्कृत रसिक पिढीने गंधर्वांवर सदैव प्रेमच केले.

मी गंधर्वांना पाहिले ते उतरत्या काळात. म्हणजे १९३५ नंतर. माझ्या वरोवरच्या व काही लहान वयाच्या मित्रांनी धाय मोकलून गंधर्वाविषयी लिहिलंय, ते मात्र ढोंगीपणाचे असले पाहिजे. (उदाहरणार्थ : वसंत वापट, साधना) नव्याने गंधर्वांना पाहणाऱ्यांना गंधर्वांचा अलौकिक स्पर्श जाणवावा असे त्यांच्याजवळ काही उरले नव्हते. त्यांचे रूप ओसरले होते. स्त्रीभूमिका करताना हवे असणारे नाजूकपण उरले नसल्यामुळे त्यांचा लाडिकपणा विचित्र, थोडा भयानक सुद्धा वाटत होता. त्यांच्या गाण्याला एकसुरी रूप आले होते. घोळून घोळून म्हणण्याच्या गाण्याचा अतिरेक झाला होता व म्हणूनच सारे काही खोटे वाटत होते. वार्धक्याच्या खुणा स्वरात अन् पदाघातात जाणवत होत्या. आणि गंधर्व रंगभूमी लुप्त झाली होती. भोवतालचे वैभवही गेल्यामुळे ती नाटके ओकीबोकी झाली होती. प्रेक्षकातही तरुण पिढी तुरळकपणे दिसत होती.

त्यामुळे गंधर्वांचे जे स्वप्न मी माझ्या डोळ्यांपुढे आणले होते ते भंग पावले होते. अन् त्या स्वप्नभंगामुळे मी दुःखी झालो होतो. वडीलधाऱ्या माणसाचे ओलावणारे डोळे, अंगावर उठणारे रोमांच, भारावलेल्या मुद्रा यामधून गंधर्वांचे रूप मी हळूहळू समजावून घेऊ लागलो. त्यांच्यावरचे साहित्य वाचू लागलो. त्यांच्या रेकॉर्डस् ऐकू लागलो. आणि गंधर्व ही काय चीज आहे, हे हळूहळू माझ्या ध्यानात आले.

आणि एक दिवस मला त्यांच्या अलौकिकत्वाचा धागा सापडला

तो काळ असा होता की, सुसंस्कृत तरुण स्त्रीसंबंधी तरुण पुरुषांच्या काही अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. इंग्रजी वाङ्मय–इंग्रजी रिवाज यामुळे आपल्या जोडीदाराविषयीच्या काही उदार कल्पना तरुण मनाने उभ्या केल्या होत्या. प्रत्यक्षात मात्र अशी स्त्री कुठेही दिसण्यासारखी नव्हती. वरोवरीने वागणारी, संभाषणचतुर, तरीही शालीन, कलाकौशल्याची हौस असणारी, कोटिबाज, गोरी, मांसल... गंधर्वांच्या रूपाने प्रत्येकाला आपली जीवनसाथी सापडली...लग्न त्यांनी एका अशिक्षित स्त्रीशी केले, पण संसार मात्र त्यांनी बालगंधर्वांच्या सुरेल रूपाशी केला. सौभद्रातल्या 'प्रिये पहा रात्रीचा...' या गाण्यापूर्वीचा 'नचसुंदरी करू कोपा' हा शृंगार त्यांनी रुक्मिणीशी केला नाही तर तो त्यांनी गंधर्वांच्या छबीशी केला. 'सुजन कसा मन चोरी' या गंधर्वपंक्तींनी त्यांना वाटे, तो सुजन आपणच. आपल्यापाशी 'मम सुखाची ठेव ठेवणारी' ही सखी आपलीच जन्माजन्मीची सखी. आजच्या तरुण मुली, कारकून–तिकीट कलेक्टर–लेजरकीपर...अशा पुरुषांशी विवाहित होतात, पण मनोमय संसार करतात तो देवआनंद, राजकपूरशी...तोच प्रकार गंधर्वकाली झाला होता. म्हणूनच एका संपूर्ण तरुण पिढीला गंधर्वांनी गारद केले, भारून टाकले. गंधर्वांच्या स्वराशी माझा परिचय हळूहळू झाला. तसे मला अजूनही गाण्यातले काही कळत नाही. पण अद्भुताला अचानक स्पर्श करणारा स्वर कळायला

हृदय हवे असते, डोके नव्हे ! त्यामुळे गंधर्व संगीतातला तो अद्‌भुताला अचानक स्पर्श करणारा मधुगंधित स्वर अजूनही कानी गुणगुणतो आहे. दीनानाथांप्रमाणे इथे चमत्काराचा हट्ट नव्हता, तर चमत्कार नकळत घडतच होते. दीनानाथांच्या स्वरांनी मी अजून झपाटलो आहे, पण गंधर्वांच्या स्वरांनी मला माणूस केलंय–पुरुष केलंय, तरुण केलंय.

गंधर्व गेले आणि जुनी वैभवशाली राजशाही रंगभूमी संपली. आता काही पोरेटोरे कधी गंधर्वांची, कधी दीनानाथांची नक्कल करतात. त्यांना वाटते, ती नाटके म्हणजे जलसे होते. (गंधर्वांसाठी ती जलसे असू शकली असती–आणि ती खरे पाहता गंधर्वांसाठीही केवळ जलसे नव्हतीच.) पण त्या तरुण नटांना हे कळत नाही की, नाटकाची रंगत जलशाच्या रंगतीपेक्षा अधिक समृद्ध असते. नाटकातले संवाद धडाधड म्हणून ते एकदम पुढे येऊन पेटीवाल्याला काळी चार–पांढरी दोन अशा खुणा देतात. जुन्या नाटकातील समृद्ध जीवनाचा निदान आभास तरी या नटांनी द्यावा. राजपुरुषाची चाल, बोलण्यातली शान, मानापमानाच्या प्रसंगांचा डौल–या नाईटच्या पाकिटाची प्रतीक्षा करणाऱ्या नटांनी का देऊ नये ? एकदा फूटलाईटच्या परिसरात पाऊल टाकले की, तो नट स्वत:चे आयुष्य विसरतो. उरते ती भामिनी–सुभद्रा–रुक्मिणी... मग घरी आजार आहे, नाइट मिळणार आहे, पाऊस फार पडतोय, नवरा बदफैली आहे किंवा नाटकानंतर कुणी प्रियकर भेटणार आहे, या साऱ्या गोष्टी विसरल्या पाहिजेत.

पण ही तल्लीनता आता लोपली. आता ती जुनी नाटके लागतात तेव्हा लोक गर्दी करतात. काही जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी येतात, काही नव्या जमान्यातल्या गायक नटांच्या गाण्यासाठी येतात, काही नाटकाला जाणे ह्या फॅशन-साठी येतात.

'अनृतचि गोपाळा' मधील गो वरचा डौलदार घुमट, 'दया छाया' मधील तो उंचच उंच कळस, 'मम सुखाची' मधील नदीचा उतरता घाट ही आता डोळे मिटून मी समोर आणतो, कानावर येणारे सूर त्या समोरच्या किनऱ्या आवाजाच्या नटीचे नसतात. ते चालणे पाणकोंबडीचे नसते–तर ती चाल राजहंसाची असते. तो स्वर मधाच्या पोळ्यातून ठिबकत येतो. मी समोरचा रंगमंच सहज विसरतो आणि त्या यक्ष–किन्नर–गंधर्वांच्या दुनियेत जातो. वैभवशाली राजकन्या, सुवर्णकांतीचे ते वीर पुरुष, पराक्रमावर प्रसन्न होणारी युवराज्ञी, दासदासी...

आणि तो विदर्भ देशचा राजमहाल समोर उभा राहतो...

आता उरल्या पडक्या भिंती...

दि. ६ ऑगस्ट १९६७

पुण्याच्या परिसरात कै. बालगंधर्वांच्या नावाचे एक चाळीस लाख रुपये खर्च करून अलिशान असे नाट्यगृह पुणे महानगरपालिकेने उभे केले आहे.

गंधर्वांचे याहून अधिक चांगले स्मारक करणे अशक्य होते.

धूपाचा वास जिथे सदैव असेल, फूटलाईटचा झोत जिथे प्रत्येक रात्री रंगभूमी उजळील, नानाविध मुखवटे धारण करून अनंत कलावंत, राजा–रंक, सेनापती–छत्रपती, कुलवती–गणिका अशी विविध रूपे घेऊन एकेक निराळी दुनिया निर्माण करतील, त्या वस्तूत बालगंधर्व एरवीही सदैव वावरलेच असते. एका सबंध पिढीलाच नव्हे तर एका शतकाला ललामभूत असा हा कलावंत आता पुण्यातील कलावंतांची सदैव साथ करणार आहे.

बालगंधर्व हे मानवी नाव नव्हे. ते गंधर्वकुलातलेच नाव आहे. चुकूनमाकून पृथ्वीवर अवतरलेल्या एका परमेश्वरी कृपाकटाक्षाची ती सजीव मूर्ती आहे.

आमच्या दुर्दैवाने मी फार उशीरा जन्माला आलो आणि म्हणून गंधर्वकाल मला नीटसा दिसला नाही. पण जो दिसला त्यानेही मी भारावून गेलो. अस्ताला जाणारा सूर्यही तारका चंद्रापेक्षा प्रकाशदायीच असतो... वाळवंटावर उमटलेल्या पावलावरूनही यापूर्वी येथून कोण गेले हे ओळखता येते. उरल्यासुरल्या कलेच्या त्या प्रदर्शनानेही मी हरवला गेलो होतो. विशेषतः गंधर्वांच्या रंगमंचावरील तादात्म्याने. 'गंधर्व' या नामोच्चारातही पुष्कळांची अंगे रोमांचित होत. आपले तारुण्य, आपली अपूर्ण स्वप्ने केवळ त्या नावाने सार्थ झाली असे अनेकांच्या सुस्कारांनी मी जाणले होते. मी काय, वसंत वापट काय किंवा पु. ल. देशपांडे काय यांनी गंधर्वकाल खरा पाहिलेलाच नाही. पण पु. ल. आपल्या कल्पनावारूवरच वसून अगदी गंधर्वांच्या मांडीवर दत्तक गेल्यासारखे बोलतात. ते बोलतात ते फार चांगले असते, अंगावर रोमांच उठवणारे असते. त्यामुळे ऐकलेल्या कथाकल्पनांवर जर येवढे नादब्रह्म निर्माण करता येते तर मग प्रत्यक्ष पु. ल. नी. तो काल भोगला असता तर काय केले, असते कोण जाणे ?

काही कर्मदरिद्री लोकांना दैवी तेजाची किंमत कळत नाही. त्यांच्या हिशेवाने हे नाट्यमंदिर ही उधळपट्टी होती. गंधर्वांचे स्मारक काय दीडदमडीच्या वास्तूचे

व्हावे ? उपयुक्ततेच्या दरिद्री हिशेवातून ताजमहाल–गोलघुमट उभे राहात नाहीत आणि ही अशी वास्तूशिल्पे इतिहास मागे ठेवतो. ऐरवी सगळ्याच दगडात इतिहास असतो. पण त्या दगडांना अर्थ या वास्तूंनी येतो. पुढची शेदीडशे वर्षे 'बालगंधर्व' हे नाव या वास्तूच्या रूपाने सजीव राहील. बालगंधर्वांच्या आठवणी चघळताना रात्री रंगतील आणि एक दैदीप्यमान काळाची स्मृती पुढच्या पिढीतील कलावंत करतील. भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी यांच्या आता शब्दस्मृती राहिल्या पण त्यावेळेस एखाददुसरा रसिक मनुष्य असता तर त्यापेक्षाही एखादी कालाला खिजवील अशी वास्तू निर्माण केली असती. या नाटचगृहासारख्या गोड उधळपट्टीची ज्याला चिंता वाटते ते दुर्दैवी होत. पुण्यातल्या एका वृत्तपत्राने या स्मृतिवास्तूवर व पु. ल. च्या भाषणावर जी कोल्हेकुई चालवली आहे ती केवळ वाकड्या मत्सरातून उमटली आहे. दुंदुभी वाजत असताना तुणतुण्याचा ध्वनी ऐकू येत नाही तसेच या टीकेचे झाले आहे.

बालगंधर्वांची आठवण पुणेकरांना व्हायला काही निमित्त लागत नाही. साठी ओलांडलेल्या रसिकांना तर सारे आयुष्य गोड वाटते ते केवळ बालगंधर्वांच्या नाटकातील आणि फडक्यांच्या कादंबरीतील शृंगारानेच. संगीतात व नाटचात बालगंधर्व, साहित्यात फडके, राजकरणात बळवंतराव आणि क्रिकेटमध्ये तात्या देवधर ही पुण्याची आदरस्थाने होती. पुण्यातील सारी रसिकता गेल्या पाचपन्नास ति या गोष्टीत सामावलेली होती.

बालगंधर्वांच्या रूपाचे स्तोमही मी फार वेळा ऐकले आहे. मी गंधर्वकालाचा त्यासू विद्यार्थी आहे. उपलब्ध असे गंधर्वाचे बहुतेक फोटो मी पाहिले आहेत. आणि त्यांना त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात पाहिलेले लोक मला माहीत आहेत. 'गंधर्वसौंदर्य' हे कालसापेक्ष होते. किंबहुना गंधर्व–कालानंतर सुंदर स्त्रीचे वर्णनच मुळी गंधर्वाच्या रूपाकडे पाहून होऊ लागले. त्यामुळे ते जसे आहेत तेच सौंदर्य असा संकेत पडला. गंधर्वाच्या अन्य गुणावर लुब्ध झालेल्यांना गंधर्वांत निराळेपण आढळले तेच सौंदर्यरूप झाले.

गंधर्वावर लोकांनी भक्ती केली. त्याला हिशेव नव्हता. गंधर्वाचे माना वेळावणे पाय उंच करणे, वाक्याची पुनरुक्ती करणे, मधेच उच्चारात किंचित् कठोर शब्द उच्चारून नंतर वाक्यात लाडकावा आणणे या साऱ्या गोष्टी सौंदर्यरूप झाल्या. गंधर्वाचा प्रमाणशून्य कटिभाग, जाड पोटऱ्या, पसरट चेहरा हे सुद्धा रूपविशेष व्हावेत हा खरोखरच चमत्कार मानला पाहिजे. पण तो मला चमत्कार वाटत नाही. भक्तीने सारे काही सुंदर होते. गंधर्वाचे सारे काही सुंदर झाले.

गंधर्वाचा अभिनय हा अंगभूत होता. त्यांना विनासायास रुक्मिणी, भामिनी, देवयानी होता येत होते. ती देवाची देणगी होती. स्त्रीपण त्यांच्या उच्चारात–हाव-

भावात विभ्रमात मुरलेले होते. त्यांचे गाणे–त्याला शास्त्राधार नव्हता तर देवताधार होता. जे काही ते गात त्याने माणूस मोहिनीविद्येप्रमाणे भारून जाई. त्याची चिकित्साशक्ती लोपून जाई. काहीतरी अनामिक सामर्थ्याने तो भारला जाई. किंवहुना बालगंधर्वाच्या अजोड स्वरसौंदर्याने त्यांच्या सर्व उणीवा झाकून जात असल्या पाहिजेत. त्यांच्या स्वरातील अवीट गोडीत माणसे कडू किंवा आंबट सुद्धा गोड करून घेत असली पाहिजेत. एकदा त्या स्वरांची ओळख पटली की माणसे मांत्रिकाप्रमाणे गंधर्वांना वश होत असावीत...

अशा त्या श्रेष्ठतम गायक नटाने आपल्यामागे कोणतीही परंपरा मात्र उरू दिली नाही. कारण जाणीवपूर्वक काही करण्याचे ज्ञान त्यांच्याजवळ नव्हते. गंधर्वपरंपरा या शब्दातच काही अर्थ नाही. कारण जे दैवी त्याची नक्कल माणसाकडून निर्माण होत नाही. पुन्हा एकदा गायक निर्माण होईल पण तो बालगंधर्व असणार नाही. तसे सवाई गंधर्व, छोटा गंधर्व, डिट्टो गंधर्व, गुणी गंधर्व, कुमार गंधर्व असे पुष्कळ गंधर्व आपआपल्या परीने मोठे गायक आहेत. पण बालगंधर्वांच्या गायकीचा भास सुद्धा ते निर्माण करू शकले नाहीत. गंधर्वांना शिष्यपरंपरा नव्हती. कारण ते सुजाणपणे काही करत नसत आणि म्हणून जे आपण करतो ते त्यांना दुसऱ्याला देणे शक्यही नव्हते. गंधर्व मागे गेले, आता उरल्या त्यांच्या तबकड्या आणि फोटो.

या थोर पुण्यातच मोठेपण लाभलेल्या श्रेष्ठ नटाचे स्मारक नगरपालिकेने केले–थोडे अधिक द्रव्य खर्च करून केले यावद्दल वास्तविक मतभेद असण्याचे कारण नाही. बोलून चालून ही प्रेमाची आणि आदराची बाब. हिशेबाने आदर दाखविणाऱ्यांना रसिक म्हणत नाहीत. तीसचाळीस लाख म्हणजे फार मोठी रक्कमही नाही. तसेच पाहिले तर विश्रामबागेत म्युनिसिपालिटी होती ती नव्या इमारतीत नेल्यामुळे तसा कारभार काही सुधारला आहे का ? नवीन इमारतीची तशी गरज कुठे होती ? पण सारेच प्रश्न गरजेच्या पाटी सुटत नाहीत. सुटूच नयेत. जंगली संस्कृतीतून आपण आजवरचा प्रवास केला त्यात आपण जर काही शिकलो असेल तर ते हेच की क्षुधा व काम याहून आपले काही निराळे जगणे असते. या जगण्यातून पशू आणि माणूस अलग होतात. वागाभूषणे, कला, वस्त्रप्रावरणे, रंगभूषा...या साऱ्या खर्चिक अनुपयुक्त गोष्टी आपण का करतो ? दहा लाख लोकांच्या आनंदासाठी एवढी रक्कम फार मोठी नाही. त्यात थोडी बचत करताही आली असती पण तेच तुणतुणे वाजवून आता मंदिराच्या बाहेर खोळंबू नका. आत धूपाचा वास दरवळत आहे. पेटी–तबल्याचे तालसूर तुम्हाला बोलावताहेत. जमलेल्या रसिकांतून उत्कंठा जाणवते आहे. सुंदर सुगंध–सुंदर वस्त्रे–सुंदर रूपे. असा सोत्कंठ समुदाय जमा झाला आहे. प्रकाशाने रंगमंदिर उजळले आहे आणि कलावंत आत राजाराणीच्या भूमिका रंगून वसले आहेत. सूत्रधार नमन नटवराचे सूर मनात जागे करतो आहे.

आणि मनात या वास्तूचा हिशेब करीत सर्वस्व गमावल्यासारखा विचित्र चेहरा करून तुम्ही वाहेर उभे आहात. तुम्हाला हे शोभत नाही. आत चला. तो पहा तो मखमाली पडदा वर जाऊ लागला. रंगभूमी उजळली, पेटीचे सूर येऊ लागले. तवलजी ठेक्याची वाट पहात तयार आहे...

आता उगाच थवकू नका महाराज !

दिनांक ४ ऑगस्ट १९६८ ● ● ●

'दादा ते आले ना !'

स्वरं म्हणजे आठवणीत राहू नयेत इतक्या त्या गोष्टी जुन्या आहेत. समज न आलेल्या काळच्या त्या स्मृती म्हणजे आपण अनुभवलेल्या सुगंधाची जात सुद्धा समजलेली नाही अशा अवस्थेतल्या. काही आठवणी अशा असतात की, आपल्या मनाच्या कोपऱ्यात त्या जाम जाऊन घट्ट वसतात आणि यत्न करून हाकलल्या तरी त्या हलत नाहीत.

चौदा-पंधरा वर्षाचे वय असेल माझं. समज येण्याचा तो उंवरठा. पलिकडे काय चालले आहे याविषयी अमाप कुतूहल. साहित्य, संगीत, नृत्य यातला भावुक आनंद नुकता उलगडू लागलेला. नाटके पाह्यची ती भडक, रंगीत कपडचांसाठी, मध्यंतरात मिळणाऱ्या 'रॉसवेरी' साठी. नाटकातील आनंद, अदभुत आनंद, रम्य-भीषण प्रसंग, अपूर्व संगीत, कसदार अभिनय, सूचक शृंगार यांपैकी काहीही कळायचं ते वय नव्हतं असं नाही. कुठेतरी काहीतरी मनाच्या कोवळ्या जागेत स्पर्श करून जाई. त्यातलं कळायला हवं ते कळलेलं नाही अशी मनाला हुरहूर लागे. आपण थोडं उशीरा जन्माला आलो यावद्दल खंत उत्पन्न होई ती काही केल्या जात नसे.

वहुशः अडतीस–एकोणचाळीस साल असेल. नाट्यव्यवसायाचा मेकप् उतरू लागला होता. नाटकाचा जमाना संपला तरी नाटकवेडे मागे होते. भावडचा कोल्हट-करांच्या ओल्या आठवणी सांगणारे जसे तिठ्या–तिठ्यावर भेटत, तसेच ऐन भरात असलेल्या वालगंधर्वाच्या, शारदेच्या–सुभद्रेच्या लाडिक हावभावांची साभिनय आठवण काढणारे नाट्यवेडे भेटत असत. गंधर्व नाटक कंपनी ही तर प्रत्येकाला

आपल्या घरचीच मालमत्ता वाटत होती. गंधर्व नाटक मंडळीतल्या कोणाशी तरी वादरायण संबंध जोडून आपलं नातं सांगणारी मंडळी काही कमी नव्हती. जुन्या आठवणींचे सुस्कारे जागोजाग जाणवत होते. गंधर्व हे नाव उच्चारताना त्यांच्या डोळ्यात विलक्षण अस्वस्थता दिसे. यापूर्वी भोगलेल्या सुखास्वादांची कृतज्ञता त्यांच्या डोळ्यातून डोकावे आणि पाणी नसतानाही डोळे ओलेचिंब होत.

गंधर्वावर जसे मराठी जनतेने प्रेम केले तसे अन्य कोणा नटाच्या वाटचास आले असेल असे वाटत नाही. तसे चहाते सर्वांनाच असतात. बापू पेंढारकरांच्या प्रयोगशीलतेवर आणि नाविन्याच्या वेडावर खूप असणारे चहाते मला माहीत होते. दिनानाथांचा नाटक–गृह भेदून जाणारा अस्मानी स्वर आणि पौरुषयुक्त अभिनय हा तर मी स्वतःच अनुभवला होता. (त्या तोकड्या समजाच्या वयात.) दिनानाथांच्या स्वरांचा बुलंद स्पर्श मला सहगत्या झाला, तसाच तो सर्वांना झाला असेल. परंतु गंधर्वाच्या स्वरांचं सामर्थ्य आणि सौंदर्य त्यावेळेला मला समजायला हवं होतं तेवढं समजलं नव्हतं. बालगंधर्वांनी मराठी स्त्रीला सुसंस्कृत केले आणि समज दिली. स्त्री-भूमिका करणाऱ्या पुरुष-नटाचे अनुकरण साऱ्या स्त्री समाजाने करावे हा एक चमत्कारच आहे. आणि हा चमत्कार ह्याच देशात घडू शकला याचे मला आश्चर्य वाटते. स्त्रियांच्या मागासलेपणावर आगरकर–कर्व्यांनी पहिला प्रहार केला. परंतु माजघरातून ओटीवर आलेल्या स्त्रीने वागावे कसे, बोलावे कसे, शृंगार करावा कसा याचे धडे फडक्यांनी कादंबऱ्यातून आणि गंधर्वांनी रंगमंचावरून दिले. गंधर्व हे काय प्रकरण होते हे आजच्या पिढीला कळावयाचे नाही. गंधर्वांचे गायन, तद्रूपता, लाडकावा हे सारं आता शब्दानं सांगणं अशक्य आहे. आपल्या पत्नीच्या गालावर उठलेली पहिल्या चुंबनाची गुलाबी छटा समोर दिसत असली तरी ती शब्दात पकडता येत नाही. तसंच गंधर्वांचं सौंदर्य, रूप, शब्दफेक, स्वर लावण्याचा तो अद्‌भुत प्रकार हे सारं शब्दातून सांगणं अशक्य आहे. ज्यांनी गंधर्वांना पाहिलं आहे ती पिढी नष्ट झाली की, गंधर्व ही एक दंतकथाच राहील.

गंधर्वांना मी तसं पुष्कळ वेळा पाहिलं होतं; परंतु त्यांचं एक रूप मला स्वच्छ आठवतंय्. त्या वेळेला गंधर्वांच्या कर्तृत्वाची अखेरची वर्षे उलगडत होती. तसं आता गंधर्वांचं काहीच उरलेलं नव्हतं. सुडौल शरीर, दैवी गायन, मधुर अभिनय हे आता सावलीसारखं होत होतं, पण समोरच्या प्रेक्षकांपैकी बहुतेकांना ते मान्य नव्हतं. पडदा उघडला, रंगमंच प्रकाशला, पात्रे बोलू लागली; परंतु अजून नाटक सुरू झालंय् असं कुणाला वाटलंच नव्हतं. तेवढ्यात एकाएकी समोरचं दृश्य पालटलं. प्रेक्षकांच्या सर्वेंद्रियांच्या शक्ती डोळ्यात जमा झाल्या. समोरचा रंगमंच रंगमंच उरला नाही. विदर्भाच्या महासुलक्षणी चारुगात्री राजकन्येचा तो महाल झाला. त्या सुवर्णकालात एकदम सारेजण पोहोचले आणि त्यांना दिसली प्रियकराच्या

वेडानं नादावलेली राजकन्या. सावळ्या श्रीहरीची डोळ्यात प्राण आणून वाट पाहणारी ती प्रणयिनी तेथे उभी होती. पिता, बंधु, दासी, परिवार या सर्वांचा संकोच सोडून ती त्यांचं सर्वांगानी स्वागत करणार होती. वाट चांदण्यांची करीत कृष्ण, भूलोकीचे लावण्य धुंडाळीत कुंडनपूरच्या सीमा ओलांडून, रुक्मिणीकडे येत होता. मध्यंतरीच्या दगडमातीच्या भिंती, राजपथ, रथ, पालख्या, हत्ती, घोडे यातून आरपार नजर फेकीत त्या चारुगात्रीची नजर त्याच्यापर्यंत पोहोचली आणि मग कानाचे सार्थक करणारे नादमय शब्द एकदम झंकारले...

'दादा ! तुम्ही असे नुसते उभे...ते आले ना ? सामोरे नको का जायला ? ते आले ना ! अग बाई–'

आणि मग शांत-रसात चिंब झालेला यमन साऱ्या रंगमंचावर, प्रेक्षकांच्यावर मोहिनीअस्त्र टाकू लागला. गंधर्वांच्या तोंडून 'नाथ हा माझा' या पदाचा पहिला चरण पडला. आणि एक विलक्षण आनंद अनेक हृदयातून एकाच वेळी निर्माण होऊन माझ्यापर्यंत पोहोचला. गंधर्व म्हणजे काय याचा थोडासा अर्थ मला त्याक्षणी समजला.

मी उशीरा जन्माला आलो या खेदाने माझं मन व्यापून गेले.

आता ती वासरी पिचली आहे. देवाच्या दरबारात परतण्याची ती वाट पहात आहे. ज्याच्या केवळ आठवणीनं हजारो अंतःकरणं अजूनही सैरभैर होतात त्या जिवाचा हा क्षीण प्रकाश आता पाहवत नाही. आपण रोगी बरा होण्यासाठी देवाची प्रार्थना करतो, पण माझी वेडी प्रार्थना अशी आहे की, दिव्यत्वाचा स्पर्श झालेल्या वासरीतला स्वर गेल्यावर लाकडाला मागे ठेवून काय उपयोग ? त्या सुंदर शरीराचे हे हाल आता पाहवत नाहीत. ज्या स्वरासाठी हजारो अतृप्त कान उत्कंठेने वाट पहात तो स्वर साधी सुखदुःखंसुद्धा आता व्यक्त करू शकत नाही. उंच केलेल्या उजव्या टाचेच्या ऐटबाज हालचालींनी, नयनांच्या विभ्रमांनी आणि एखाद्या नाजूक मुरक्याने जिथे हजारो अंतःकरणे घायाळ होत असत, त्या देहाला साध्या देहधर्मासाठी दुसऱ्याकडून हालचाल करून घ्यावी लागावी यात नियतीच्या क्रौर्याशिवाय मला दुसरा अर्थ दिसत नाही.

बालगंधर्व हा रंगभूमीचा निखळता तारा आहे.

दिनांक २१ मे १९६७

• • •

'प्रिय लता'

वास्तविक प्रिय अशा संबोधनाने अभिप्रेत व्हावे असे तुझे आणि माझे नाते नाही, कारण तुझे आणि माझे रक्ताचे वा जोडलेले संबंध नाहीत. तुझ्या माझ्यात मैत्रीची ऊब कधी स्फुरलेली नाही. तसं जर खरं पाहिलं तर तुला मी कधी पाहिलेलं नाही, तुझ्याशी कधी बोललेलो नाही. तरीसुद्धा तुला प्रिय लता असे संबोधताना माझ्या मनाला कसलाही संकोच वाटत नाही, केव्हातरी, फार फार पूर्वी, कोल्हापूरच्या रस्त्यावरून जात असताना सिनेमा व्यवसायातला माझा मित्र एका परकऱ्या मुलीकडे बोट दाखवून म्हणाला होता, ही दिनानाथाची मुलगी. दिनानाथाची मुलगी म्हणूनच मी तुझ्याकडे रोखून पाहिले. परंतु तुझ्या व्यक्तित्वात असे मला काहीच जाणवले नाही की, ज्यामळे तुझा ठसा माझ्या मनाच्या पिंपळपानावर उमटावा. तुझा तो दैवी स्वर त्या वेळेस मला मनात हसला असेल.

आता तुझं सारं जगच बदललं आहे. जिथे देवाचे हात पोहोचणार नाहीत, अशा अंतर्यामाच्या खोल खोल कानाकोपऱ्यात तुझे दर्दभरे स्वर शिरतात; आणि मी मी म्हणणारी माणसं पहाता पहाता घायाळ होतात. असे असताना सुद्धा, मी तुला प्रिय लता असे म्हणतो यात मला काही विपरीत दिसत नाही. किंबहुना तुझ्या नावातच अनेक गोष्टी प्रिय होऊन, स्नेहात चिंब होऊन बाहेर पडतात. तुझे आणि माझे असले विचित्र नाते आहे तरी कसले, हे शोधण्यासाठी माझी ही पिचकी लेखणी शब्द धुंडाळू लागली आहे.

एकाद्या रात्री यशापयशाचे गणित कुठेतरी चुकते आणि मनाजोगते उत्तर येत नाही. अस्वस्थ मनाने मी घराची वाट शोधीत असतो. खचलेल्या मनाला चांदणे फटफटीत वाटते, चंद्र पांढुरका वाटतो, रात्र उदास गमते, आणि वाऱ्याचाही उपद्रव होतो. त्या लांबच-लांब रस्त्यावरून एकाकी जात असता कोठूनतरी एक अनामिक मायेचा स्पर्श जाणवतो. त्या स्पर्शाची ओळख पटत नाही असेही नाही. तो स्पर्श कितीतरी वर्षे माझ्यावरोबर माझी सोबत करतो आहे. अगदी लहानपणी भुकेल्या ओठांना आईने दिलेल्या स्तनांचा स्पर्श, कसल्यातरी अवघड प्रसंगाचे वेळी किंवा यशापयशाच्या वेळी माझ्या जिवलग मित्राने मारलेली स्नेहल मिठी, माझ्या अत्युच्च गौरवाचे वेळीं माझ्या पित्याने, गुरूने किंवा पितृसमान वडीलधाऱ्याने

आशीर्वादासाठी केलेल. मस्तकस्पर्श आणि माझ्या पुरुषार्थाचा, वेळी–अवेळी सत्कार करणाऱ्या माझ्या सखीचा सर्वांगस्पर्श, या व अशा अनेक स्पर्शांचा एकवटलेला तो एक समृद्ध स्पर्श असतो. त्या स्पर्शाबरोबर चांदणे, चंद्र, रात्र व वायु यांना आपापले सौंदर्य परत लाभते. मनातल्या दु:खाचा परिहार होतो. पावलांना त्राण येते व उद्यावर विश्वास वसतो. तो स्पर्श तुझा असतो. भावनेने ओथंबलेल्या स्वरांच्या मोरपिसांचा तो स्पर्श. 'नींदीया आजारे आजा...' माझ्या डोळ्यात निद्राराणीने हलक्या पावलांनी यावे म्हणून करुण स्वरात तू माझ्यासाठी तिची आळवणी चालविली होतीस. हलके हलके माझ्या पापण्या जड झाल्या, हृदयातली शल्ये विसरून गेली. मऊ मऊ परांच्या गादीवर मला घेऊन तू थोपटत होतीस...आई-सुद्धा कधी कधी, या वयातही मला कुशीत घेऊन झोपायची, तशीच.

प्रिय लता, तुझं माझं नातं गुंतागुंतीचं आहे असं जे मी म्हणतो त्याचं कारण हेच आहे. तुझ्या इवल्याशा गळ्यात नाना रूपे आहेत. आईचं, बहिणीचं, सखीचं... ही सारी रूपे पालटताना तुला कसलाही प्रयास पडत नाही. कधी कधी एकाद्या उन्मत्त प्रणयिनीचंही तुझे रूप पाहिले की वाटते, जगातले करुणामय तत्त्वज्ञान सांगणारी मघाची लता ही कशी बरे असेल ? पण तू तीच असतेस.

प्रिय लते, प्रेमिकेच्या भूमिकेत तर तू इतक्या वेळा मला भेटली आहेस, की त्याची गणतीच करता येणार नाही. कालमानानं कळकट होत जाणाऱ्या संसाराचं मालिन्य तू जसं फुंकरून टाकतेस तसेच अनामिक आसक्तीने बेभान झालेल्या यौवनाला आलिंगन देऊन तू कृतार्थही करतेस. मला हेही माहीत आहे की, असे अनेक पुरुष तुझ्या स्वरस्पर्शाने तृप्त झाले असतील. एरवी आपल्या प्रेयसीवर लुब्ध होणाऱ्या पुरुषांच्या विचारानेच त्यांच्या मनात मत्सराचे अंगार पेटून उठतील, पण तुझी गोष्टच निराळी आहे. मी तो भाग्यवंत एकटाच नाही याची जाणीव असूनही मला कधी मत्सर स्पर्श करीत नाही. मला वाटतं, कलावंताचा हा व्यभिचार हाच खरा त्याचा गौरव. रुक्मिणी होऊन एकाच वेळी अनेक कृष्णांना भोग देणाऱ्या स्वयंवरातील रुक्मिणीचं...बालगंधर्वाचं भाग्य जसं थोर तसंच असामान्य भाग्य–त्याहीपेक्षा अधिक पटीने तुझ्या वाट्याला आले आहे. लते, आपल्या स्वरावर लुब्ध होणाऱ्या कोट्यवधि रसिकांची आठवण होताच कृतार्थता आणि कृतज्ञता या दोन्हीचा आनंद तुला एकाच वेळी भोगता येत असेल. हे भाग्य दिसते एवढे स्वस्त नाही. कस्तुरीमृगाला कस्तुरीच्या शोधासाठी हकनाक सैरावैरा हिंडावं लागतं, कारण कस्तुरीचा वास त्याला बेभान करीत असतो. कलावंताच्या अद्भुत निर्मिति-सामर्थ्यातही एक असाच बेभान करणारा आक्रमक सुगंध असतो. पण तो जाणवतो दुसऱ्यांना. एकामागोमाग एक अविरतपणे गेली पंचवीस वर्षे तू स्वरांचे झुपके अस्मानात भिरकावून देत आहेत. आपण काय फेकतो आहोत याचीही तुला जाणीव नसेल.

पण ते सारे अस्सल हिरे होते. त्या तेजाने आम्ही सारे दिपून जातो आहोत. वर्षानुवर्षे. पंचवीस वर्षांचा दुस्तर प्रवास तू करीत आली आहेस. अनेक अपेक्षा, अपेक्षाभंग, रास्त हक्कांना न मिळालेला न्याय, या साऱ्यांना पार करून ज्याची तुलना होणार नाही अशी अजोड साधना तू केलीस. वास्तविक या घटकेला या भारतात सर्वांत अधिक लोकप्रिय व्यक्ती कोण, या प्रश्नाच्या उत्तराच्या वेळी मनात कसलीही शंका न येता नाव उमटेल, ते प्रिय लता, तुझेच. आणि हे सारं परमेश्वराने तुझ्या गळ्याच्या चिमूटभर जागेत केलेल्या निवासामुळे. मत्सर कुणाला वाटतो, तर स्पर्धा असते त्याला, आपली जागा कोणी हिरावून घेईल ही भीती असते त्याला, पण तुला हे भय आजवर कधीच उत्पन्न झालं नाही–होईल असे वाटत नाही.

कलावंताचं चारित्र्य हा अनेकांच्या कुचाळयाचा विषय असतो, परंतु कलावंतांच्या खाजगी चारित्र्यात डोकावणे म्हणजे आनंदाच्या पेल्यात मिठाचा खडा टाकणंच असते. कोणाची मदिराभक्ति, कोणाची कामतृष्णा, कोणाच्या विकृत सवयी यांची तपशीलवार माहिती गोळा करणाऱ्या वेडया रसिकांना सौंदर्याचं खरं मर्म कधीच कळलेलं नाही असं म्हटलं पाहिजे. चंद्रबिंब शीतल आणि सुंदर असते याचे कारण आपण फार दुरून ते पहातो, म्हणूनच. कलावंताचंही तसंच असतं. लेखकाचं साहित्य, नटाचा अभिनय, चित्रकाराचं चित्र, गायकाचा स्वर या पलिकडे खोल पाण्यात आपण जाऊ नये. कलावंत हाही माणूस असतो, क्वचित क्षुद्र माणूसही असतो. परमेश्वराने जे दान त्याच्या झोळीत टाकलेलं आहे, तेच त्यानं मिरवावं. परंतु कलावंताला तो संयम राहात नाही. आणि मग कलावंताचे आणि त्याच्या कलेचंही हसू होतं. आजपावेतो प्रसिद्धीच्या झोतापासून तू दूर राहिलीस याबद्दल मी तुझा फार आभारी आहे. पण आता मात्र मला अशी भीती वाटते की, तो संयम सुटत चालला असावा. तुझा तो सत्कारसमारंभ झाला आणि त्याची जी वर्णने मी ऐकली त्यामुळे सुखवायच्या ऐवजी मी कष्टी झालो. कारण त्यात मला तुझीच योजकता जाणवत होती. सत्कार–समितीत सारी मराठी माणसं होती. खरं पाहता या पूर्वी कितीतरी आधी, फार भव्य प्रमाणात जागोजागी उत्स्फूर्तपणे तुझे सत्कार व्हायला हवे होते–धर्म, प्रांत या पलिकडे जाऊन. पण ते होत नाहीत म्हणून वेडे, आपले सत्कार आपणच का कुणी करून घेते. तुझ्यासारख्या कलावंताची कदर समाजाला नसेल तर त्या समाजाची कीव करावयास हवी. राष्ट्रपतिभवनात तुझा खास सत्कार व्हावा अशी तुझी योग्यता, पण तुझ्या राजकीय मतांमुळे निधर्मी सरकारने जर काही कृपणता दाखवली तर त्यावर तुच्छपणाने हसण्याचा तुझा अधिकार. परंतु तुला तो अपमान वाटला. आणि इथेच तू उणी पडलीस. या क्षुद्र पदव्या आणि सत्कार, वेडे मुली, आम्हा मानवांसाठी असतात. स्वर्गात हिंडता हिंडता रस्ता चुकून तू जी या पृथ्वीवर आली आहेस, त्या तुला भारतरत्न काय किंवा

पद्मभूषण काय या पदव्यांचे काय महत्त्व ! तुझ्यापेक्षा कितीतरी पटीने कनिष्ट अशा तुझ्या व्यावसायिकांच्या स्पर्धेत तू उतरलीस हे तुला शोभले नाही. कुणास ठाऊक 'लता' हीच उद्या एखादी सन्मानदर्शक पदवी मानली जाईल.

प्रिय लते, तुझं माझं नातं काय याचा तुला थोडासा बोध असेल काय ? मी तुला प्रिय म्हटलं यातलं रहस्य एक तुला माहिती आणि एक मला माहिती. तुझ्या माझ्यातलं हे गुपित कुणाला माहीत नाही म्हणून बरे हं. जेव्हा मला तुझी आठवण येते तेव्हा तुला उचकी लागते, मला जेव्हा अस्वस्थ वाटतं तेव्हा हळूवार पावलांनीं येऊन तू माझे डोळे झाकतेस. जेव्हा मला माझं बालपण आठवतं तेव्हा एक चिमुरडी परकरी वहीण माझ्याशी सागरगोटे खेळण्याचा हट्ट धरते...आता या घटकेला सुद्धा आपल्या चिमुकल्या घट्ट मिठीत गाभुळलेली चिंच घेऊन तू मला वेडावते आहेस.

मग मला असं सांग, मी जे तुला प्रिय लता म्हणतो यावद्दल तुला राग तर नाहीना येत ?

तुझा,

ग. वा. बेहेरे

दिनांक ११ मे १९६७

• • •

वैनायकाचे चिंतन

या काळच्या टोपीखाली ज्या सुरकुत्या आणि जराजर्जर काया दिसते आहे ती काया वीरवर सावरकरांची. ज्या नव्या पिढीला सावरकरद्वेषाची शिकवण मिळाली त्या पिढीला या सुरकुत्यांमधले भीषण कारुण्य समजणार नाही. ज्या चष्म्याने अग्नीहून तेजस्वी कटाक्ष अडवले आहेत त्यांचीही धन्य होय. या चुटचुटीत जगात ही टोपी, हा चष्मा, हा सोलापुरी चेकचा कोट...सारे काही प्रतिगामी आहे. इथे लालभडक गुलाबाचे पुष्प छातीवर विराजमान झालेले नाही. कारण सारा लाल रंग विटून गेला आहे–देशासाठी खर्ची पडला आहे. आणि रंगायला हवे असणारे स्वास्थ्य रंग उडाल्यावर मिळाले आहे, तेही खरे नव्हेच.

सावरकर हे नेहमी प्रवाहाविरुद्ध पोहले. यशाबरोबर त्यांना चालता आले नाही. चालण्याची त्यांची इच्छा नव्हती. हिंदुत्वावर त्यांनी अपार श्रद्धा ठेवली.

हिंदुराष्ट्रवादाचा त्यांनी उद्घोष केला पण त्यांनी हिंदुधर्मवाद मात्र पत्करला नाही. गोरक्षणाची भावडी चळवळ त्यांनी मूर्खपणाची ठरविली, मांसाहाराचे समर्थन केले' चातुर्वर्ण्यावर प्रखर हल्ला चढविला, जीर्णमतवाद्यांची अक्षरशः ससेहोलपट केली. आणि बाह्यात्कारी तरी कर्मवादाने चालणाऱ्या हिंदुसमाजाचे वैर पत्करले. हिंदुत्वाची गीता सांगणाऱ्याने, लब्धप्रतिष्ठित हिंदूंच्या म्होरक्यांना आपले वैरी केले. हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार करण्यासाठी शहाण्या राजकारणी पुरुषाने, धार्मिकतेचे ढोंग केले असते. आपल्याजवळ परमेश्वरी शक्ती आहे असा वकवासुद्धा केला असता. हिंदुस्थानात यशस्वी झालेल्या पुढाऱ्यांना धर्माविरुद्ध वर्तन करता आले नाही. टिळकांनाही सामाजिक सुधारणांकडे पाठ फिरवावी लागली. त्यांची वैयक्तिक मते काहीही असली तरी समाजपुरुषाला प्रसन्न करण्यासाठी प्रचलित धर्माचाच अवलंब करणे त्यांनाही भाग पडले. गांधीजी निर्धार्मिक समाजाचे पुरस्कर्ते पण ते अंतर्बाह्य हिंदु होते. रामनामाशिवाय त्यांचे पान हलत नव्हते. कर्मकांडावर ते हल्ले करीत पण धर्माचे आधार शोधून. हिंदुधर्मीयांची मने दुखवून आपले पुढारीपण टिकणार नाही याची त्यांनी खात्री वाळगली होती. नेहरू एवढे पुरोगामी म्हणवत असत पण त्यांच्या नेतृत्वावर धर्ममतांची विलक्षण पक्कड होती. मुसलमानांचा अनुनय करताना सुद्धा त्यांनी देवदेवतांची व पापपुण्याची अवहेलना केली नाही. एवढेच नव्हे तर आपली रक्षा गंगेतच पडावी अशी अखेरी विनवणी केली.

सावरकरांना हे जमले नाही. आपण समाजपुरुषाची वर्मे सांगत आहोत. त्यामुळे राजकीयदृष्ट्या आपण मागे पडू हे त्यांना कळले नसेल असे म्हणणे भावडेपणाचे आहे. पण द्रष्टा विचारवंत हा तडजोडीस तयार नसतो. व्यावहारिक यशासाठी मुद्यावरची तडजोड त्याला मंजूर नसते.

सावरकरांचा पराभव त्यांच्या पाखंडवादामुळे झाला असे मला अनेकदा विचार केल्यावर वाटू लागते. ते अंतर्बाह्य सुधारक होते. जनमतावर रूढ झालेल्या अनेक गोष्टींविरुद्ध त्यांनी प्रखर मते व्यक्त केली आणि त्यामुळे बहुजन त्यांच्यापासून दूर झाले. लिपीसुधारणेपासून तो त्यांच्या गोरक्षणाच्या कल्पनेपावेतो त्यांनी तर्कवादाने रूढ कल्पनांवर येवढे हल्ले चढविले की त्यामुळे त्यांचे तर्कपूर्ण राजकीय तत्त्वज्ञान धोक्यात आले. लोकांना हिंदुराष्ट्रवाद समजला नाही हे म्हणणे मूर्खपणाचे आहे. राष्ट्रवादाची जोपासना करणाऱ्या समाजाला सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद समजला नसेल हे म्हणणे अज्ञपणाचे आहे. अत्यंत आकर्षक वाटणारे सावरकरांचे तत्त्वज्ञानही फार खोलपर्यंत पाळेमुळे धरू शकले नाही, याचे कारण धर्म हा ज्यांच्या भाकरीचा प्रश्न होता त्या लब्धप्रतिष्ठित वर्गातून सावरकरांना अनुयायी गवसले नाहीत. छोट्यामोठ्या अनुयायातूनच नेतृत्व पैदा होते, ते सावरकर निर्माण करू शकले नाहीत.

सावरकर शिकवून तयार होत नाहीत. ते जन्मावे लागतात. ते स्वयंभू असतात. यश त्यांच्या हाती येणे हे काही राजकीय चमत्कृतीलाच शक्य आहे, पण इथे रत्नियाची खाण आहे हे नियती सुचवते आणि दुर्दैवी राष्ट्राला मात्र तिथे कोळसेच दिसतात. करंटचा समाजाला जेव्हा त्या रत्नाची याद येते तेव्हा प्रकाश तेवढा उरलेला असतो, रत्ने मातीमोल झालेली असतात. जे गळ्यावर मिरवायचे, छातीवर लटकावयाचे, ते पायदळी मिळालेले असते आणि जे अडगळीत ढेवायचे ते इतमामाने आपण आपल्या छातीवर चमकत ठेवतो. मग केवळ जागेवरून योग्यता ठरते.

सावरकर आणि नेहरू यांची तुलना करण्यात फारसा अर्थ नाही. सावरकरांचे तत्त्वज्ञान आक्रमक आहे इतिहासातील सत्यावर आधारलेला शुद्ध व्यवहारवाद त्यांनी पत्करला आहे आणि जे इतिहासावरील अमोघ भाष्य त्यांनी केले, ते नवे, स्वतंत्र, विचारपूर्ण आणि सावरकरनिर्मित होते. या उलट नेहरूंनी सारेच तत्त्वज्ञान गांधीजींपासून उसने घेतले. मूळच्या कठोर वास्तववादाचा त्यांचा परकीय संस्कार त्यांनी गंगेला अर्पण केला. नव्या अर्थवादाकडे त्यांनी पाठ फिरविली. एक भावडा, खेडवळ, पोरकट, धार्मिक असा संपत्तीच्या वाटपाचा युक्तिवाद गांधीजीकडून त्यांनी स्वीकारला व तो तद्दन चुकीचा आहे हे कळूनही ते त्याला चिकटून राहिले.

नेहरू हे व्यक्तिशः मोठे व्यापंगी गृहस्थ होते. त्यांनी समाजवादाचा एकदा पद्धतशीर अभ्यास केला होता. कम्युनिझमनेही त्यांना आरंभी मोहित केले होते. काँग्रेसमधल्या ताज्या तरुण पिढीचे ते उद्गाते होते. तरुणवर्गाचे ते पुढारी होते. असे असतानाही गेल्या पंधरा वीस वर्षात त्यांची अधिकाधिक अवनती होत ते सर्वांशाने जीर्णमतवादी होत चालले होते. सत्याला सामने जाण्याचे बळ त्यांच्यात उरले नव्हते. भारतावरील परचक्र ही नव्या भारतनिर्मितीची संधि त्यांनी भ्याडपणाने घालविली. भारतातील क्षुद्र हेवेदावे व वैरे विसरविण्यासाठी त्यांना या संधीचा उपयोग करता आला नाही. याचे कारण समाजवादाचा त्यांनी लावलेला खेडवळ अर्थ आणि प्रतिगाम्यांना सामावून घेणारी त्यांची तडजोड वृत्ती. त्या त्यांच्या प्रतिगामी अन् पोरकट राजकारणाचे पर्यवसान म्हणजेच भारताचे क्षणाक्षणाला होत असलेले विघटन, परचक्र, यावनीसत्तांचे पुनरुज्जीवन आणि दयेवर आधारलेली संपत्तीच्या वाटपाची बालिश कल्पना.

सावरकरांनी आपल्याला काय दिले हा मोठा विचार करण्याजोगा प्रश्न आहे. सावरकरांनी काळाचे आव्हान स्वीकारण्याचा मंत्र दिला—राष्ट्रवादाचा. हिंदुस्थानची राष्ट्र म्हणून उभारणी कधी झालीच नव्हती. एका अवाढव्य ढिगाऱ्याला सावरकरांनी एका वास्तूचे रूप दिले. एका मृत होत जाणाऱ्या धर्ममतांना, शंकराचार्यांच्या अभिनिवेशाने त्यांनी चैतन्य दिले. पुन्हा एकदा अहिंसा, नेभळेपण, कम-

कुवतपणा या बौद्ध मतांच्या जळमटांनी बुजबुजलेल्या भारतावर हिंदूंचे अधिराज्य निर्माण करण्याची प्रेरणा दिली. अशोक चक्राऐवजी सुदर्शन चक्राला फिरविण्याचा घाट घातला. पुन्हा एकदा शंकराचार्यांप्रमाणे सारा भारत त्यांनी हिंदुत्वाने भारून टाकला.

तर्कापेक्षा भावना ही भ्याडांना आणि मूर्खांना जिंकू शकते हे गांधीजींनी ओळखले व म्हणून आतल्या आवाजाच्या परमेश्वरी प्रेरणेने गांधीजींनी ते हयात असेतो आपली पकड जनमतावरून ढिली होऊ दिली नाही. आपले नाव सदैव वृत्तपत्रात आघाडीवरील वातम्यात असण्याचा त्यांचा हट्ट असे. यश हेच सत्य यावर त्यांची मदार होती. मुसलमान, ख्रिश्चन, पारशी या अल्प जमातींना अवाजवी हक्क देण्यातच आपले स्थान मजबूत राहिल, हे त्यांनी ओळखले. वस्त्र, आहार, मते, वर्तन यातही विक्षिप्तपणा हे त्यांचे भांडवल होते. गर्दी जमविणे व त्या उंचीवर स्वार होणे यावरच त्यांच्या यशाची कमान होती आणि म्हणून राष्ट्रघातक असे अनेक निर्णय त्यांनी त्या मोठेपणासाठी घेतले. धकाधकीच्या मामल्यात स्वतंत्र राष्ट्राला जगण्यासाठी तलवार लागते, आरोळी लागते, द्वेष लागतो, भावना चेतवणारी संघटना लागते आणि समाजपुरुष सारखा क्षुब्ध ठेवावा लागतो. एकदा तो दुबळा झाला, स्वास्थ्यप्रिय झाला, की त्या राष्ट्राचे स्वातंत्र्य धोक्यात आलेच म्हणून समजा. भारताची उत्तर सीमा आपल्या भ्याडपणाने, अदूरदृष्टीने आणि मूर्ख हट्टाने गांधीजींनी व मग नेहरूंनी संकुचित करून घेतली आहे. आपले मानस्थान सिंधूनदी आपल्याला न जाणवता आपण घालविली. गीर्वाण भाषेची मायभूमी जे झेलमच खोरे ते सारे यावनी झाले आहे आणि कोणत्याही क्षणी ते आपल्या हातून जाण्याचे भय निर्माण झाले आहे. हिमालयाचे आम्ही अखेरी काटेरी कुंपण केले. आमचे डोके आम्ही बुद्धाच्या ताब्यात दिले.

सावरकरांचे नेतृत्व हे या घडीला संजीवनी झाले असते. गांधीजींचे या देशात स्थान आहे ते त्यांनी राजकारण सर्वगामी केले आणि सामान्यांनाही करता यावे एवढे सोपे केले म्हणून. परंतु जे त्यांनी मिळविले असा भास झाला ते सर्व त्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या बारा-पंधरा वर्षात वाहून गेले. भारताला या विश्वात खरा मित्र कोण आहे ? पाकिस्तान तर अखेरपर्यंत वैरीच राहणार. चीनने विश्वासघाताने पाठीत सुरा फिरविला आणि तिबेटचे दान देऊन आपण त्याच्या सुऱ्याच्या माऱ्यात येऊन पोहोचलो. ब्रह्मदेश हा वास्तविक आपल्याच देशाचा भाग वाटावा एवढ्या आत्मीयतेने आपण वागलो. परिणाम—साऱ्या हिंदूची तेथून हकालपट्टी. तीच गोष्ट सिलोनची. आफ्रिकन राष्ट्रांच्या बाबतीत तरी निदान हिंदु नागरिकांना सन्मानाची वागणूक मिळायचा आपला हक्क होता, पण कसले काय ? राजकरणात सत्यापेक्षा स्वजनहित श्रेष्ठ मानतात. परदेशातील लोकांच्या स्वास्थ्यापेक्षा स्वजन, मग ते

असंस्कृत असोत, दुष्ट असोत, कसेही असोत, तेच आपले सगेसोयरे मानण्याने राष्ट्रांना आकार येतो. भल्या शेजाऱ्यापेक्षा कमी प्रतीचा भाऊ आपला वाटणे हेच नैसर्गिक आहे.

आपले वर्तन मात्र याविरुद्ध घडले. स्वकीयांचा गांधीजींनी सर्व प्रकारे घात केला आणि परकीयांचा–परधर्मीयांचा उदोउदो केला. मनुष्यजात सर्व एक आहे, वगैरे तत्त्वज्ञान समजावून घेण्याची गरज रशियाला आहे, जर्मनीला आहे, इंग्लंडला आहे, अमेरिकेला आहे, पाकिस्तानला तर आहेच आहे. गरज आम्हालाच नव्हती–नाही. कारण, आम्ही सर्व धर्मीयांना फाजील आश्रय देऊन आपल्याच देशात परके होऊन वसलो आहोत. काबूल–कंदाहारहून मूठभर मोगल येतात अन् दिल्ली येथे राज्य स्थापतात–आम्ही स्थापू देतो–त्यांच्यापुढे नतमस्तक होतो–त्यांच्या सलतनतीचे रक्षण करण्यासाठी आमची कुर्बान करतो–त्यांच्याकडून अन्याय सहन करतो –त्यांना आपल्या पोरीवाळी आपणहून देतो–आमच्या पवित्र देवळांचा विध्वंस उघड्या डोळ्यांनी वघतो–तेथेच मशिदी उभ्या राहू देतो, आणि एवढ्या अन्यायानंतर पुन्हा संधी मिळूनही त्यांचा सूड घेत नाही. अरे, आम्ही आजवर उदार मूर्खपणा केला त्याचीच प्रायश्चित्ते आज भोगत आहोत. पृथ्वीराज चव्हाणाने घोरी हातात सापडल्यावर त्याचा वध केला नाही म्हणून तर दिल्लीवर मुसलमान तक्तनशीन झाले. या औदार्याने, भलाईने आमचे फार वाटोळे केले. आता थोडे स्वार्थी व्हावयाची वेळ आली आहे, शेजाऱ्याच्या मुलापेक्षा स्वतःच्या नागव्या मुलास कपडे घालण्याची वेळ आली तेव्हासुद्धा आम्ही चांडाळ औदार्याच्या गप्पा मारतो आहोत.

भारतात इंग्रज, पोर्तुगीज या किरिस्ताव जमाती जेव्हा प्रथमच आल्या तेव्हाच त्यांचे शिरकाण होते तर आज माजलेल्या ख्रिश्चन समाजाला खूष करण्याची पाळी येती काय? त्यांना येथे व्यापार करू दिला, बाटवू दिले, त्यांच्या अन्यायाकडे कानाडोळा केला त्याची आम्ही आजवर फळे भोगली, जुलूम सोसले. पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच मिशनऱ्यांनी, मोगल अधिकाऱ्यानी आमचे वित्त, इमान, वायका सारे आजवर लुटले. आजचे अगणित परधर्मीय मूळचे हिंदु–आमच्या धर्माचे, तेच आमचे वैरी बनून आज जिहादचा पुकारा करतात, सवता सुभा स्थापतात–पुन्हा मोगल साम्राज्याची, गोव्याच्या विजयाची आठवण देतात, आजही आमचे सुखी संसार उध्वस्त करतात. आम्ही मूर्ख तरीही उदार आहोत. परमेश्वराने आमच्या हृदयात थोडे तरी काठिण्य द्यावे. पण नाही. अजूनही आमचा काळाकुट्ट भविष्यकाल वदलणार नाही. गांधी–नेहरू आजही दैवते बनू पाहतात. आपल्या देशाची, धर्माची, आपल्या रक्तियांची त्यांना आठवण नाही. त्यांच्या प्रेतावर उभे राहून का होईना पण त्यांना मोठं व्हायचंय. पाकिस्तानातल्या शेकडो हिंदूंच्या प्रेतावर उभे राहून गांधी–नेहरू उंच झाले आणि आम्ही त्यांचा गौरव केला.

राजा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

औदार्याचा तमाशा आपण एकदम बंद केला पाहिजे, भले त्यासाठी कुणी आपली निंदा करोत वा स्तुती करोत. साऱ्या जगाचे रक्षण करण्यासाठी आमची सैन्य जातात, पण आमच्या सीमा ती रक्षण करू शकत नाहीत. न्याय्य अशा आमच्या कित्येक मागण्या आमचे शेजारी धुडकावून लावतात, तरीही आम्ही त्यांना सर्व सुविधा प्राप्त करून देतो. दुर्योधन ह आपला चुलत भाऊ होता तरी त्याचा नाश करण्यासाठी प्रत्यक्ष धर्म तयार झाला आणि त्याला श्रीकृष्णाने साहाय्य केले. हिरण्यकश्यपू हा तर प्रत्यक्ष पिता होता, त्याचा वध करण्यासाठी प्रल्हादाने मागे-पुढे पाहिले नाही. म्हणजे न्यायाच्या आड नाते येत नाही तिथे शेजारधर्म कशा-साठी ? प्रत्येक हिंदु नागरिकाच्या मृत्यूचा, बलात्काराचा प्रतिशोध घडेल, अशी जर खात्री असेल आणि सामर्थ्याची प्रचीति येईल तर हिंदूंचे रक्त, वित्त आणि मान ह्यांचे रक्षण होईल. लक्षावधी हिंदूंचे शिरकाण घडूनही आम्ही षंढ परिवर्तनाचे यत्न जारी ठेवतो. समर्थांची स्तब्धता आणि संयम हा सद्‌गुण आहे आणि त्याला नेहमीच न्याय्य प्रतिजवाब मिळतो. पण नामर्दाचा संयम हा चेष्टेचा विषय होतो. हिंदुस्थानची सर्व अप्रतिष्ठा याच नामर्दपणातून झाली आहे.

गेल्या पंधरा वर्षांच्या वाटचालीत आम्ही काही कारखाने काढले, काही उद्योग उभारले, काही नवी तत्त्वे अवलंबिली, देशाच्या संरक्षणासाठी काही भीक मागून, काही भीड घालून साधने आणली. पण हे करण्यापूर्वी आपण मूलभूत गोष्ट विस-रलो. राष्ट्राचे संरक्षण करण्यास्तव रडार साधने, सुपरसॉनिक विमाने, रणगाडे, मशिनगन हे सर्वच हवेच हवे पण भाडोत्री सैनिकाकडून राष्ट्राचे पुनरुत्थान होत नाही. राष्ट्रावर परचक्र येताच रक्त तापणारा नागरिक, हाच देशाचे रक्षण करू शकतो. एवढ्या मोठ्या देशभक्तांच्या सागरातून सेनादलात किती काँग्रेसवाले– किती समाजवादी–किती कम्युनिस्ट सामील झाले ? म्हणजे रक्षण अखेरी पोटावारी रावणाऱ्या सैनिकांनीच करावयाचे आणि आम्ही फक्त बडबड करायची. गावोगावी किती राजकीय संघटकांनी सैनिकांची, अधिकाऱ्यांची, दैनंदिन कर्मचाऱ्यांची जागा घेऊ शकणाऱ्या नागरिकांची दले स्थापन केली, किती रायफल क्लब्स निघाले, किती युद्धभूमीच्या राजकारणाचे अभ्यासू निघाले ? चिनी आक्रमणाचे भय होते, तेव्हाही भारतावर संकट आल्याचे चिन्ह राजधानीत वा देशभर नव्हते. राष्ट्रप्रीति ही फक्त राष्ट्रगीताचे वेळी उभे राहण्यात, स्वातंत्र्योत्सव साजरे करण्यात, मोर्चे नेण्यात आणि प्रतिपक्षीयांची कुचेष्टा करण्यात मानली जात आहे.

आम्हा भारतीयांच्या पुढे एक राष्ट्र, एक भाषा, एक संस्कृति आणि एक तत्वज्ञान याचे आमीप हवे आहे. उद्याच्या भारताचे स्वप्न हवे आहे. पुन्हा एकदा भारताचे वैभव प्राप्त करून देणारा विक्रम आम्हाला हवा आहे. आम्हाला राम-राज्य नको, कंसवध करणारा आक्रमक मुरारी हवा आहे. आम्हाला अशोक चक्र

नको तर भारतावर एकमुखी अधिसत्ता उत्पन्न करून सुराज्य उत्पन्न करणारा समर्थ शासक सम्राट चंद्रगुप्त हवा आहे. आम्हाला दक्षिणपथ जिंकणारा अगस्ती हवा, नवी सृष्टी निर्माण करणारा विश्वामित्र हवा, दुष्टाचा संहार करणारा नरसिंह हवा, आपल्या देवगणांच्या हितासाठी परकीय राक्षसांचा सदैव वध करणारा शिवशंकर हवा, स्वराज्याच्या हितासाठी यावनी सुरत लुटणारा छत्रपती शिवाजीसुद्धा हवा, मृत्तिकेसमान असणाऱ्या या भारतीय नागरिकातून पुन्हा प्रतापी योद्धे निर्माण करणारा शालिवाहन हवा. आम्हाला चैतन्य देणारे सारे महाभाग आम्हाला हवेत. आमचा हिरमोड करणारे, दास्यात दैन्यात आम्हाला गुंतवणारे अहिंसक महात्मा आता आम्हाला नकोत. आपल्या देशापेक्षा मानवतेची उपासना करणारे जवाहर निदान आज आम्हाला नकोत–तर आम्हाला शक्तीची पूजा करणारे, शास्त्राला वश होणारे विनायक हवेत. तरच नव्या जगात पुन्हा भारतीय अस्मितेच्या नौबती झडतील. विज्ञानात, सामर्थ्यात, कलानिर्मितीत, क्रीडाज्ञानात आणि सैनिकी सामर्थ्यात पुनश्च हर्ष निर्माण होईल, पुनश्च विक्रम होतील, पुन्हा शालिवाहन निर्माण होईल.

होईल. हेही होईल. मळभ फार काळ राहात नाही. खोट्याची चलती दीर्घकाळ होत नाही. दांभिकांचा सदाच जय होत नाही. केव्हा तरी सत्य यशस्वी होईल तेव्हा सावरकर असतीलच असे मात्र नाही. फार अन्याय होतो, धर्माचा नाश होतो, श्रेष्ठींचा अवमान होतो, तेव्हाच ना भगवान श्रीकृष्ण पुन्हा जन्म घेतात ? भगवंताच्या या आश्वासनानंतर मग थांबायला काय हरकत आहे ?

ऑक्टोबर १९६६

● ● ●

फासावरील नि:श्वास

प्रत्येक प्रश्नाला दोन बाजू असतात
कधीकधी त्यांपैकी एकही सत्य नसते
किंवा दोनही अर्धसत्येच असतात.
सत्यासत्याचा हिशेब करावयासाठी-
सुद्धा दोनही बाजू समोर याव्यास
हव्यात.
आज एक बाजू, तीही थोडक्यात,
तुमच्यापुढे येते आहे.

कोणतीही हत्या–कितीही अपरिहार्य
वाटली तरीही आताच्या युगात
निंदनीयच.
पण तरीही हत्या होत रहाणारच–
त्याच्या मागे त्या माणसाचे हट्ट,
आग्रह उभे असतात.
त्या हट्टांची ही तरफदारी नव्हे.
समर्थन नव्हेच नव्हे.
हा आहे एक काळ्याकुट्ट कालखंडाचा
आलेख–त्यातला एक तुकडा.
कल्पनेने चितारलेला.
त्यामुळे इतिहासाच्या जिज्ञासूला
दुसरी बाजू थोडी माहिती होईल.
आणि साधेल तो समतोल.

माझ्या समोर लोंबता फास आहे. आणखी काही क्षणांनी मी या सृष्टीत जड स्वरूपात नसेन. माझा पुनर्जन्मावर विश्वास आहे. आणि माझी मनोदेवता सांगते, याच भूमीत मी जन्म घेईन. या भूमीवर माझे जिवापाड प्रेम आहे. या भूमीच्या इतिहासाशी माझे अतूट नाते आहे. या मातीचा सुगंध आसमंतात दरवळतो आहे. आणि या सुगंधी लहरीवरूनच मी परलोकात निघालो आहे. या जगावर माझा राग नाही. ज्यांनी मला अकाली फासावर ढकलले, त्यांच्यावर तर माझा मुळीच राग नाही. मी ह्या भूमीत राहिलो. तिथली व्यवस्था, कायदा, दंडविधान मला मानले पाहिजे. आणि माझ्या मायभूमीच्या न्यायदानानुसारच मी फासावर चढतो आहे.

हा फास तसा माझ्या ओळखीचा आहे. अनेक देशभक्तांच्या मानांनी स्पर्श केलेला हा दोरखंड या अवनीतलावरच्या सर्वात पवित्र गोष्टीशी निगडीत आहे. कोणी लुटारू, डाकू वा खुनी या फासाच्या दोरीत सापडले असतील. पण अनेकविध डाकू व खुनी माणसांची पापे पचविण्याचे सामर्थ्य एका देशभक्ताच्या हुंकारात आहे. स्वातंत्र्यार्थ बलिदान करणाऱ्या कोणाही देशभक्ताच्या रक्ताची कारंजी

शतकोटी गंगानदीच्या जलापेक्षा पवित्र असतात आणि म्हणून फासाचे पावित्र्य अबाधित राहिले आहे.

याच फासावर, तात्या टोपेने अखेरची मान टेकली. कान्हेरे, राजगुरु, सुखदेव, उधमसिंग, धिंग्रा, भगतसिंग, चाफेकर बंधू, खुदी बोस...खरे तर कोणाकोणाला आठवू ? कोणाला स्मरू ? ती सारी मंडळी आता मला अधिक ओळखीची वाटत आहेत. अधिक स्पष्ट दिसत आहेत. पूर्वी फार मोठी वाटणारी, फार दूर वाटणारी ही महापवित्र माणसे आज माझी नातलग झाली आहेत—माझे जेष्ठ भ्राते झाले आहेत. त्या साऱ्यांनी मजभवती फेर केला आहे. मी ह्या फासावर चढेन. माझी मान निष्प्राण होऊन लोंबकळेल तेव्हा ते सारेजण मला झेलून घेतील. आणि त्यांच्या डोळ्यात दिसणाऱ्या स्वागताने माझा हा अखेरचा प्रवासही सुखाचा, सुंदर होईल.

मी आता हे जग सोडून निघालो आहे. एका थोर पुरुषाचा मी जाणूनबुजून वध केला यावद्दल चार लोकांच्या साक्षीने माझा वध केला जात आहे. मी जेव्हा त्या महात्म्याचा वध केला तेव्हा मी अस्वस्थ होतो—संचित होतो—पण माझ्यासमोर उभी असणारी ही सर्व माणसे माझ्या वधासाठी किती आतुर आहेत पहा बरे. या घटकेला या देशातला मी सर्वांत तिरस्करणीय माणूस आहे. या देशातल्या बहुसंख्य लोकांच्या आदरातला एक माणूस मी माझ्या हाताने अचेतन केला आहे. या सर्व क्षुब्ध समाजाची मजवद्दल प्रतिक्रिया एवढीच की मी एक हत्यारी आहे—खुनी आहे.

पण खरेच का मी एक हत्यारी आहे ? खरेच का मी एक खुनी आहे ? खरेच का दुष्ट आहे ? आजवर खुनांची काही साखळी का मी निर्माण केली ? या पूर्वीचा माझा सारा काळ खरोखरच काळा आहे का ? गम्मत हीच आहे की खून तर राहोच पण प्रत्यक्ष दंडेली, टरेंबाजी, मारामारी आदि तामसी गुणावगुणांपासून मी फार फार दूर राहिलो आहे. मला ओळखणाऱ्यांना माहीत आहे की मुंगीला दुखवणं मला जमले नाही. रक्तावद्दल मला असलीच तर भीती होती, प्रेम खचित नव्हते. मी एक सरळ साधासीधा नागरिक होतं. मला जमले तर अत्यंत साध्या पद्धतीने नागरिक म्हणून जगायचं होतं. पण असे असून नियतीच्या खेळातला मी एक बाण होतो. हा बाण वास्तविक केला होता पुरुषोत्तम अर्जुनासाठी पण सोडावा लागला घटोत्कचासाठी. जेव्हा घटोत्कच आटोपेनासा झाला तेव्हा तो एकमेव बाण त्याच्यावर सोडण्याची आज्ञा नियतीने कर्णाला केली आणि मग निःशस्त्र कर्णाला अखेरी जमिनीने गिळून टाकले.

होय, मलाही जमिनीने गिळून टाकावे. माझे श्वास, रक्त, आरोळी आणि चैतन्य आता याच भूमीत जावयास हवीत. हेच अपरिहार्य आहे. कुणास ठाऊक तेथे उद्या फुले फुलतील. लालबुंद जास्वंदी फुले किंवा उग्रपवित्र झेंडू. बाकी कुणी फुले होतात तर कुणी खत होते. पण सारी मातीच. मातीत मिळणारी. हे जर खरे तर मग मी माझ्या या अखेरच्या क्षणी मृत्यूपुढे का भिऊ ? का मान लववू ?

मी तर हे जग सोडून जाणारच. आणि हे जग सोडून जाण्याची मला घाईही लागली आहे. माझे काम संपले आहे. मी निघालोही आहे. पण या माझ्या क्षणाभोवती कित्येकांचे हुंदके, सुस्कारे, अश्रू गुंतलेले आहेत. त्यामुळे पाय अडखळत आहेत.

मी ज्या महात्म्याचा वध केला त्याचे मोठेपण मला ज्ञात आहे. या देशात राजकीय विचाराचे लोण खालच्या थरापर्यंत नेणारा हा नेता वंदनीयच आहे. त्याचे स्वतःचे व्यक्तिगत चारित्र्य, देशभक्ती, सर्वस्पर्शी असा मनुष्यसंग्रह... या त्याच्या प्रत्येक गुणासाठी त्याच्यापुढे मान लववली पाहिजे. त्याच्या कर्तृत्वाचे मोजमाप करायला उपलब्ध पट्टी आहेच कुठे? त्यांनी वीस-पंचवीस वर्षात अशा प्रकारे स्वतःचे नाव आणि कर्तृत्व निर्माण केले की त्यांच्यावर प्रचंड प्रमाणात लोक विसंबू लागले. निवृत्तीमार्गी अशा हिंदू समाजाला हे सारे तत्त्वज्ञान नवीन नव्हते. पण पुन्हा एकदा विसाव्या शतकात हे तत्त्वज्ञान सांगणारा महापुरुष लोकांनी देवत्वाच्या कोटीवर नेला.

पण म्हणूनच मोहनदास करमचंद गांधी ही केवळ व्यक्ती वनली नाही, ती एक आरोळी वनली. ती व्यक्ती देवतारूप वनली. आणि मग त्या शक्तीतले एक अहंकाराचे पान उलगडले. महात्मा गांधी ही एकच व्यक्ती ३५ कोटी लोकांच्या प्राणांशी खेळू लागली. अनेक पतिव्रतांचे कुंकू केवळ त्यांच्या लहरीवर अवलंबून राहू लागले. अनेक कोवळी कुसुमे उमलण्याची वाट पहात होती, ती केवळ त्या महात्म्याच्या सुस्काऱ्याने कोमेजून गेली.

मोठ्या माणसांच्या चुका मोठ्या असतात आणि मोठ्या माणसांच्या त्या चुका म्हणजेच इतिहासाची काळी पाने असतात. पराक्रमाच्या सोनेरी पानावर या चुका ओरखडे ठरतात. भारताच्या स्वातंत्र्याच्या रुपेरी पानावर तर केवळ अनेक अर्भके, अनेक कुमारिका आणि अश्राप हिंदूंचे रक्त याचे न पुसता येणारे डाग आहेत. आणि त्या सर्वांचे उत्तरदायित्व त्याच मोठ्या माणसाला स्वीकारावे लागणार आहे.

गांधींचे समर्थन करणाऱ्यांनी अनेक पळवाटा काढून फाळणीच्या दुःखाची जवाबदारी अन्य कशावर तरी ढकलण्याचा यत्न केला. कुणी असहिष्णू मुसलमानांवर, कुणी निवृत्तीमार्गी हिंदूंवर, कोणी इंग्रज कपटनीतीवर तर कोणी नेहरूंच्या उतावळेपणावर... पण ही सारी कारणे खोटी आहेत.

कारण एकच आहे. आणि ते दडले आहे एकाच गोष्टीत. हा महात्मा अखेर विसरला स्वतःचा इतिहास–देशाचा इतिहास–मनुष्यजातीचा इतिहास. महात्माजीपेक्षा थोर, संत–महंत, नीतितत्त्ववेत्ते, विचारवंत सदैव मनुष्याचा देव करण्यासाठी घडपडले माणसाने अहंकार विसरावा, स्वार्थ विसरावा, परस्परांशी मित्रत्वाने वागावे–आणि नैसर्गिक शक्तीचा, सौंदर्याचा, कर्तृत्वाचा विकास साधावा, ही सारी

शिकवण देणारे महात्माजी काही एकटेच नव्हते. हे कार्य अविरत चालू आहे. त्यात चूकही नाही. माणसातला पशू नष्ट करून त्या ठिकाणी देव निर्माण करावा असा यत्न करणे ही एक सत्प्रवृत्ती आहे. माणसाचे पशुत्व क्षणोक्षणी वाढत असताना त्याला देवत्वाची दीक्षा देणारे महात्मा समाजाला सदैव हवेही असतात.

महात्माजी तसेच होते. तेवढ्याच गोष्टीचा ते प्रचार करीत रहाते तर मग माझ्यासारख्या गरीब, साध्यासुध्या नागरिकाने त्यांचा उदोउदो केला असता. त्यांना देवही मानले असते.

पण महात्माजी केवळ संत राहिले नाहीत. ते पुढारी झाले. ते केवळ मोक्षाचे प्रवासी नव्हते, तर ते या जगातील सुखाची वाटणी करू लागले. ते विचारवंत उरले नाहीत तर राजकारणी होऊ लागले. समाजधारणेची दोन अंगे आहेत. एक जड देहाची वूज राखणे आणि दुसरे अंतिम सत्याची वूज राखणे. दोन्ही गोष्टी त्यांना एकत्र व्हावयास हव्या होत्या. ह्या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. अंतिम सत्याच्या दृष्टीने धर्माधर्मात वाकडेपणा असू शकत नाही. पण जड देहाचा विचार करता त्या देहांचे अस्तित्व धर्माने बांधलेले आहे. संस्कार, वातावरण, शिक्षण धर्माज्ञा, आर्थिक परिस्थिती आणि जगातील तात्कालिक औदार्य यावर जडदेहाचे चलनवलन चालू असते. अंतिम सत्य कालबाह्य आहे–व्यक्तिसापेक्ष नाही म्हणून राजकारण आणि तत्त्वज्ञान यांचे फारसे जमत नाही. तात्कालिक प्रश्नांची उकल पुष्कळदा, नव्हे बहुशः अंतिम सत्याच्या प्रेतावरच उभी राहते–तशीच ती असते.

आणि संत महात्मा आणि भारताच्या नेतेपदावर आरूढ झालेले महात्मा यांनी सहिष्णुता वाणवण्याचा यत्न केला, पण त्यासाठी सहिष्णु किंवा दुबळ्या समाजाला अधिक सहिष्णु बनविले आणि कडवा, धर्मांध, बळजोर असा जो समाज त्यांच्या सर्व पापाची कड घेतली. महात्माजींजवळ न्याय नव्हता. हिंदू–अहिंदू असा विचार न करता ते सर्वत्र समान सहिष्णु राहते तर भारताचे सारेच राजकारण नीट राहते. पण आपण धर्मापलीकडे आहोत असा बहाणा करीत ते मुसलमानांच्या बाजूलाच उभे होते. कदाचित हट्टी मुलासाठी त्यांचे न्याय व ममता निराळी असेल. काहीही असले तरी त्यांच्या अंतःकरणात मुसलमानांबाबत व ख्रिश्चनांबाबत अधिक माया होती. कदाचित हिंदूच्या औदार्यावर त्यांचा विश्वास असेल. कदाचित त्यांना इंग्रजांशी लढण्यासाठी भेकड हिंदूंपेक्षा बलदंड मुसलमान हवे असतील–त्यांचे मन काही सांगता येत नाही. सत्य सांगतासांगता ते असत्याची पूजा करीत होते एवढे खरे

हे असत्य अर्थात अंतिम सत्यासत्यापैकी नव्हे. हे असत्य ते सेक्युलर होते हे होय. हिंदूंच्यावर होणारा अन्याय त्यांना तेवढा टोचत नसे. ते वास्तविक अन्याया-विरुद्ध लढाई करीत होते. पण जेव्हा हिंदू-मुसलमानांचा प्रश्न उभा राही तेव्हा-तेव्हा त्यांनी मुसलमानांची कड घेतली. त्यांच्याच निधर्मीपणाविरुद्ध त्यांनी वर्तन केले.

आणि म्हणूनच अशा माणसाच्या हातून समाजघात, धर्मघात, राष्ट्रघात होणे अपरिहार्य आहे. मोठ्या माणसाच्या हातून होणाऱ्या चुका मोठ्या असतात असे जे मी म्हणालो ते अशाच अर्थाने. हिटलर भला देशभक्त असेल, पण त्याच्या करणीने जर्मन जनतेचा–जर्मन देशाचा चिरकालीन तोटा झाला. मानवता, अंतिम सत्य जरी वाजूला ठेवले तरीही एकवटलेल्या शक्तीचा वापर चांगल्या प्रकारे केल्याची उदाहरणे दुर्मिळ असतात.

गांधीजींनी प्रत्यक्ष कोणाचा वध केला नसेल, त्यांच्या हाताला प्रत्यक्ष रक्त लागलेले नसेल, त्यांनी सैन्य ठेवले नसेल, तोफा डागल्या नसतील पण अखेरी त्यांचा शब्द हाच एक लक्षावधी प्राणावर रोखलेला तोफगोळा होता. एवढी प्रचंड शक्ती क्वचितच एकवटलेली असेल. हिंदूंच्या जिवावर उठलेली अगर हिंदू संस्कृतीचा विनाश करू शकणारी अशी शक्ती खुद्द हिंदुस्थानच्या आक्रमकाजवळही नव्हती.

आणि म्हणूनच मला वाटते, हा पवित्र देश, इथली पवित्र संस्कृती, इथली देवभाषा आणि अत्यंत उत्कट, उदार आणि पुराणा असा हिंदुधर्म यांच्या रक्षणा-साठी काहीतरी केले पाहिजे.

ज्या दिवशी मी गांधीजींना राजकीय क्षेत्रातून नाहीसे करण्याचे ठरविले त्याचवेळी या जगात माझे म्हणून म्हणण्यासारखे जे काही राहिले असेल ते मी सर्वस्वी गमावून बसेन याची मला खात्री होती. मी काही श्रीमंत गृहस्थ नाही, पण तरीसुद्धा ज्याला मध्यमवर्ग म्हणतात त्यात मी मानाचे आणि आदराचे स्थान निश्चितपणे कमावले होते. मी माझ्या प्रांताच्या सार्वजनिक जीवनात भाग घेतला होता आणि त्याची आजपर्यंत जी सेवा मी बजावू शकलो तीमुळे मला आमच्या छोट्याशा जगात मानाचे नि आदराचे स्थान निश्चितपणे मिळालेले होते. संस्कृती, समाज आणि मानवी सुधारणा याविषयीच्या उच्च कल्पना मला काही नवीन नाहीत. यशस्वी रीतीने रचनात्मक कार्याच्या काही कल्पना माझ्या दृष्टीसमोर होत्या आणि त्या हाती घेण्यास आणि पूर्णत्वास पोचविण्यासाठी लागणारी हिंमत आणि उत्साह मजजवळ भरपूर असल्याची मला खात्री होती. माझी प्रकृती दणकट होती, माझ्यात कोणतेही व्यंग नव्हते आणि मला कसलेही व्यसन लागलेले नव्हते. जरी मी स्वतः विद्वान नसलो तरी विद्वान लोकांविषयी माझ्या मनात नेहमी आदर-बुद्धी आणि कौतुक आहेच.

ज्यावेळी राष्ट्रीय सभेने सविनय कायदेभंगाची मोहीम सुरू केली तेव्हा मी भारताच्या सार्वजनिक क्षेत्रात एक कार्यकर्ता या नात्याने प्रवेश केला. त्यावेळी मी फक्त एक विद्यार्थी होतो. परंतु या चळवळीविषयीची व्याख्याने ऐकून आणि तिची वर्णने वृत्तपत्रातून येत ती वाचून माझ्या मनावर बराच परिणाम झाला आणि मी त्या चळवळीत भाग घेऊन सार्वजनिक कार्याला आपले आयुष्य वाहून घेण्याचा

निश्चय केला. दुर्दैवाने ही चळवळ संपल्यावरोवरच मुसलमानांच्या प्रश्नाने फारच उग्र स्वरूप धारण केले आणि हिंदूंच्या एकीकरणाची चळवळ, डॉ. मुंजे, भाई परमानंदजी, पंडित मदनमोहन मालवीय यांनी व त्याचप्रमाणे आर्य समाजाच्या काही पुढाऱ्यांनी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही कार्यकर्त्यांनी हाती घेतली. मी अशा चळवळीत भाग घेतला, सजा भोगली, फटके खाल्ले आणि माझ्या निष्ठांची किंमत मोजली.

विहार सरकारने भागलपूर येथे हिंदुमहासभेचे अधिवेशन भरविण्यास बंदी घातली. सरकारचे हे कृत्य अन्याय्य आणि वेकायदेशीर असल्यामुळे महासभेने ही बंदी मोडण्याचे ठरविले. विहार सरकारने हे अधिवेशन भरविले जाऊ नये म्हणून सर्व तऱ्हेची सावधगिरी घेऊनसुद्धा हे अधिवेशन व्यवस्थित रीतीने पार पडले. सुमारे एक महिना भूमिगत राहून या अधिवेशनाच्या पूर्वतयारीत मी भाग घेतला. या काळातील वर्तमानपत्रे चाळीत असताना माझ्या कार्याच्या प्रशंसेची वर्णनेही माझ्या वाचनात आलेली आहेत. माझ्या सार्वजनिक सेवेविषयी जनतेने काढलेले पसंतीचे उद्‌गारही मी ऐकले आहेत.

ज्यांच्याशी माझे वैयक्तिक संबंध आहेत ते मला एक शांत स्वभावाचा इसम म्हणूनच ओळखतात. परंतु इतके असूनसुद्धा ज्यावेळी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनी गांधीजींच्या संमतीने या देशाचे तुकडे तुकडे केले आणि आम्ही वंदनीय समजतो त्या देशाला ज्यावेळी त्यांनी छिन्नविच्छिन्न केले त्यावेळी मात्र मन अगदी क्षोभकारक विचारांनी भरून गेले.

मी राष्ट्रीय सभेचा शत्रू नाही. आपल्या देशाच्या राजकीय उत्थानासाठी प्रयत्न करणारी सर्वप्रथम संस्था म्हणून मी राष्ट्रीय सभेला मानीत आलो आहे. तिच्या पुढाऱ्यांशी माझे मतभेद होते आणि आजही आहेत.

गांधीजींच्यात आणि माझ्यात वैयक्तिक कारणावरून कधीच वैर नव्हते. पाकिस्तानच्या मागणीची प्रशंसा करण्यामागील गांधीजींच्या प्रामाणिक हेतूंची जे प्रशंसा करतात, त्यांना मी एवढेच सांगू इच्छितो की गांधीजींच्या प्राणावर हात टाकताना–परिस्थितीचा काडीचाही विचार न करता जनता आपले माझ्याबद्दलचे मत बदलील हे मला स्पष्टपणे दिसत होते. समाजातील माझा दर्जा आणि मला मिळणारा मान आणि मजविषयी समाज दाखवीत असलेली आपुलकी या सर्व गोष्टींना मी वंचित होईन हे मी जाणत होतो. भारतीय जनता यापुढे मला एक अत्यंत तिरस्करणीय गृहस्थ म्हणून मानू लागेल याची मला स्पष्ट जाणीव होती.

वृत्तपत्रातून माझ्याविरुद्ध काहूर उठविण्यात येईल हे मी चांगलेच जाणून होतो. परंतु वृत्तपत्रातून होणाऱ्या टीकेच्या काहूराला दबून मी माझे कार्य सोडून देण्याइतका भेकड नाही एवढा मला आत्मविश्वास होता. जर भारतीय वृत्तपत्रांनी

निःपक्षपातीपणाने गांधीजींच्या अराष्ट्रीय धोरणावर प्रथमपासूनच टीका केली असती आणि जर त्यांनी केवढ्याही मोठ्या व्यक्तीच्या लहरीपेक्षा राष्ट्रीय हित हे अधिक महत्त्वाचे आहे असे जनतेच्या मनावर ठसविले असते तर गांधीजी आणि त्यांचे अनुयायी हे आज जितक्या सुलभ रीतीने पाकिस्तान देण्यास धजले तितक्या सुलभ रीतीने ते देण्यास कधीच धजले नसते. भारतीय वृत्तपत्रे राष्ट्रीय सभेच्या वरिष्ठ पुढाऱ्यांशी इतकी नमून आणि भेकडपणाने वागली की त्यांनी राष्ट्रीय सभा वरील असलेल्या चुका अगदी उघडउघड होऊ दिल्या आणि भारताचे विभाजन आपल्या एकंदर धोरणाने होऊ दिले.

काही ठिकाणी असे म्हटले जाते की पाकिस्तानची मागणी मंजूर केल्याशिवाय भारताचे स्वातंत्र्य कधीच प्राप्त झाले नसते. परंतु हा सर्वस्वी चुकीचा आणि फसवा दृष्टिकोण आहे, असे मला वाटत असे. पुढाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयाची योग्यता आमच्या मनावर ठसविण्यासाठीच हा केवळ युक्तिवाद आहे. गांधीवादी पुजारी आपण स्वराज्य जिंकून आणले असा दावा नेहमी करीत असतात. जर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी स्वराज्य 'जिंकून' आणले असेल तर जे ब्रिटिश त्यांना शरण आले त्यांनी स्वातंत्र्य देण्यापूर्वी पाकिस्तान मान्य करण्याची अट घातली होती असे समजणे अगदीच उपहासास्पद होईल.

पाकिस्ताननिर्मिती झाली जनतेला फसवून आणि सिंध, पंजाब, बंगाल नी सरहद्द प्रांत यातील जनतेच्या भावनांची कदर न करून ते देण्यात आले. अखंड भारताचे दोन तुकडे करण्यात आले आणि एका भागात एक धर्माधिष्ठित राज्य निर्माण करण्यात आले. मुसलमानांना त्यांच्या अराष्ट्रीय चळवळीचे आणि कृत्यांचे फळ पाकिस्तानच्या रूपाने मिळाले. गांधीवादी पुढाऱ्यांनी पाकिस्तानच्या विरोधकांना एकीकडे देशद्रोही आणि जातीय वृत्तीचे असे म्हणून त्यांची हेटाळणी केली आणि जिनांच्या मागण्या मान्य करून भारताच्या एका भूभागावर मुसलमान राज्य स्थापले. केवळ या पाकिस्तानच्या देणगीमुळेच गांधीजीवद्दलचा माझ्या मनाचा तोल सुटला असे नव्हे. परंतु पाकिस्तान दिल्यानंतर सुद्धा जर या गांधीवादी सरकारचे पाकिस्तानातील हिंदूंचे न्याय्य हितसंबंध रक्षण्याची खबरदारी घेतली असती आणि त्या दिशेने पावले टाकली असती तरी मला माझे मन आवरणे शक्य झाले असते. परंतु कोटचवधि हिंदूना मुसलमानांच्या दयेवर फेकून देऊन परत गांधीजी आणि त्यांचे अनुयायी त्यांना पाकिस्तान न सोडता तेथेच राहण्याचा सल्ला देत राहिले. अशा रीतीने हिंदूच तेवढे मुसलमान सत्ताधिशांच्या हातात बेसावधपणे पकडले गेले आहेत आणि अशा रीतीने त्यांच्यावर संकटामागोमाग संकटे कोसळली आहेत. यावेळी घडलेल्या सर्व भयंकर प्रसंगांची मला जेव्हाजेव्हा आठवण होते तेव्हातेव्हा माझ्या शरीरात जळता अंगार धगधगू लागतो.

उगवणारा प्रत्येक दिवस हजारो हिंदूंची कत्तल झाल्याच्या वातम्या आणीत होता. जवळजवळ १५००० शीख ठार मारले गेले होते. शेकडो हिंदू स्त्रियांच्या अंगावरील कपडे फाडले जाऊन त्यांच्या नागव्या मिरवणुकी काढण्यात आल्या होत्या आणि हजारो हिंदू स्त्रिया भर वाजारात गुराढोगांप्रमाणे विकल्या गेल्या होत्या. हिंदूंना आपला जीव वचावण्यासाठी हजारोंच्या संख्येने पळून जावे लागले होते. आणि अशा रीतीने पळून जाताना आपले सर्वस्व गमवावे लागत होते. ४० मैल लांव पसरलेला निर्वासितांचा काफला भारताकडे सरकत सरकत येत होता. या सर्व भयंकर घटनांची दाद भारत सरकारने कोणत्या तऱ्हेने घेतली तर निर्वासितांकडे हवेतून भाकऱ्या फेकून !

या कत्तली आणि हे रक्तस्नान–जर भारत सरकारने पाकिस्तानमधील अल्पसंख्य लोकांना देण्यात आलेल्या वाईट वागणुकीदिरुद्ध निषेध नोंदवला असता अथवा तोडीस तोड म्हणून भारतातील मुसलमानांना पाकिस्तानातील हिंदूंप्रमाणेच वागविण्याची धमकी दिली असती तर–आपोआप थांबले असते. परंतु गांधीजींच्या वोटाच्या तालावर नाचणाऱ्या सरकारने वेगळाच मार्ग पत्करला. पाकिस्तानातील अल्पसंख्याकांची दुःखे आम्हा वृत्तपत्रकारांनी वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला तर जातीजातीतील वैमनस्य माजविण्याचा हा प्रयत्न आहे असे तिरस्कारिले जाई आणि असे करणे हा एक गुन्हा आहे असे उद्घोषित केले जाई. या गुन्ह्यासाठी निरनिराळ्या प्रांतातील सरकारांनी वृत्तपत्रांकडून प्रेस इमर्जन्सी पॉवर्स ॲक्टखाली एकामागून एक जामिनक्या मागण्याचे सत्र सुरू केले. माझ्या एकटचावर १६००० रु. च्या जामिनकी भरण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या. मंत्र्यापुढे वृत्तपत्रांनी आपली शिष्टमंडळे नेली. तरीसुद्धा त्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाहीत. अशा तऱ्हेने गांधीजींच्या धोरणाने वागत असलेल्या राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळावर शांततामय मार्गांनी दडपण आणण्यात माझी सर्वस्वी निराशा झाली. आणि म्हणून मी अवैध असा भलताच मार्ग पत्करला.

अगदी याच वेळी गांधीजींनी आपल्या आमरण उपोषणास सुरवात केली. हा उपवास मुसलमानांच्या वाजूनेच हिंदूच्याविरुद्ध होता.

आपला उपवास सोडण्यासाठी गांधीजींनी घातलेल्या सात अटींपैकी एका अटीचा संबंध दिल्लीतील निर्वासितांनी भरलेल्या मशिदीविषयी होता. ती अट अशी होती की निर्वासितांनी भरलेल्या सर्व मशिदी त्यांनी ताबडतोब खाली करविण्यात याव्या आणि त्यांचा तावा मुसलमानांना देण्यात यावा. गांधीजींनी सरकारला आणि इतर कित्येक पुढाऱ्यांना केवळ उपवासाचेच दडपण आणून ही अट मान्य करण्यास लावली. त्या दिवशी मी सहज दिल्लीत होतो आणि ही अट अगदी पूर्णपणे अंमलात आणताना जे काय प्रत्यक्षात घडले ते मी आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे. ते दिवस

अगदी कडक थंडीचे होते आणि गांधीजींनी ज्या दिवशी उपवास सोडला त्या दिवशी तर प्रत्यक्ष पाऊसच पडत होता. अशा अस्वाभाविक हवामानाच्या वेळी व्यवस्थित कपडे घातलेला श्रीमंत मनुष्यसुद्धा काकडून जात होता. दिल्लीला आसऱ्यासाठी आलेली निर्वासितांची कुटुंबेच्या कुटुंबे रस्त्यावर फेकली जात होती आणि असे करताना त्यांच्या निवाऱ्याची आणि वसतिस्थानाची दुसरी काहीही व्यवस्था करण्यात आली नव्हती. एक दोन निर्वासित कुटुंबे त्यातील मुले व स्त्रिया हातात मावेल एवढे सामान घेऊन 'गांधीजी, आम्हाला आसरा द्या' असे म्हणत बिर्ला भवनापाशी पोचली. प्रासादतुल्य बिर्ला हाऊसमध्ये राहणाऱ्या गांधीजींच्या कानावर या गरीब हिंदूंच्या करुणास्पद आरोळ्या पोचणे शक्य तरी होते काय ? मी माझ्या डोळ्यांनी हा प्रसंग पाहिला. अत्यंत निष्ठुर अशा माणसाचे हृदयसुद्धा द्रवले असते, पण या हृदय द्रवण्यापेक्षा अधिक खोलवरचे विचार माझ्या मनात शिरकाव करू लागले. ज्या स्वतःच्या घरातून हे निर्वासित उखडले गेले त्यांना या मशिदी आपल्या घरादारांपेक्षा चांगल्या वाटू लागाव्या ही खरोखर आनंदाची गोष्ट होती काय ? या निर्वासितांना ज्या परिस्थितीने आणि घटनांनी मशिदीत राहण्यास भाग पाडले ती कारणे व ती परिस्थिती गांधीजींना अवगत नव्हती काय ? देशाचा जो भाग आज पाकिस्तान म्हणून ओळखला जात आहे त्याच्यात एकही देऊळ वा गुरुद्वार शिल्लक राहिलेले नाही ना ? आपण मागे टाकून आलेल्या आपल्या देवळांचा नि गुरुद्वारांचा घाणेरडा उपयोग, शीख आणि हिंदू यांच्या भावनांचा अपमान करण्यासाठी केलेला या निर्वासितांनी आपल्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिलेला आहे. ज्यावेळी हे निर्वासित रस्त्याच्या कडेला अथवा एखाद्या झाडाखाली कसातरी आसरा घेत असत त्यावेळी पंजाब व सरहद्दप्रांत येथील आपल्या घरादारांचा विचार त्यांच्या मनात आला असता तर त्यात नवल ते काय ?

जर निर्वासितांनी ताब्यात घेतलेल्या या मशिदी सोडण्यापूर्वी त्यांच्यासाठी काहीतरी दुसऱ्या बदली आसऱ्याची व्यवस्था करावी असा आदेश दिला असता तर त्यांच्या मागणीस काही माणुसकीचा आधार आहे असे तरी वाटले असते. निर्वासितांनी मशिदी खाली कराव्या अशी मागणी करण्यापूर्वी त्यांनी पाकिस्तानातील मुसलमानांनी हिंदूंची देवळे त्यांच्या ताब्यात द्यावी अशी किंवा याच्यासारखी एखादी मागणी पाकिस्तानातील मुसलमानांकडून मंजूर करून घेतली होती काय ? तसे झाले असते तर गांधीजींची अहिंसेची शिकवणूक, हिंदु-मुसलमान ऐक्याविषयीची त्यांची आतुरता किंवा त्यांचा आपल्या इच्छाशक्तीवरील विश्वास ही अजातीय, हिंमतीची आणि भेदभाव न करणारी आहेत अशी जनतेची खात्री पटली असती. गांधीजींनी आपला उपवास सोडण्यासाठी पाकिस्तानातील मुसलमानांनी कबूल करावी म्हणून जर एखादी अट घातली असती तर या उपवासाचा शेवट जरी

गांधीजींच्या मृत्यूत झाला असता तरीसुद्धा, एकाही मुसलमानाला आपल्या मृत्यू-विषयी बिलकूल दुःख वाटले नसते हे समजण्याइतके गांधीजी खास हुशार होते. आणि याच कारणामुळे मुसलमानांसाठी एखादी अट घालण्याचे त्यांनी जाणूनबुजून टाळले. त्यांच्या मागील अनुभवावरून जिना हे जरासुद्धा त्यांच्या उपवासाला घाबरलेले नव्हते. आणि त्यांच्या आतल्या आवाजाला मुस्लीम लीगने कवडीचीही किंमत दिलेली नव्हती.

गांधीजींच्या अस्थी भारतातील बहुतेक नद्यांतून टाकल्या गेल्या. परंतु पाकिस्तानमधून जाणाऱ्या सिंधू नदीमध्ये त्यावेळचे तेथील हिंदी हायकमिशनर श्रीप्रकाश ह्यांनी खूप प्रयत्न करूनसुद्धा त्या टाकता आल्या नाहीत.

आता पंचावन्न कोटींचा प्रश्न विचारात घ्या. हे पंचावन्न कोटी रुपये देण्याबद्दल, कोणत्याही सरकारला आपला निर्णय बदलण्यास लावणे हे अत्यंत कठीण आहे, असे स्वतः गांधीजी म्हणाले होते. परंतु तरीसुद्धा पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचे थांबविण्याचा भारत सरकारचा पहिला निर्णय भारत सरकारने बदलला आणि त्याचे कारण गांधीजींची आमरण उपवासाची धमकी हे आहे. हे गांधीजी व भारत सरकारनेही स्वतः कबूल केलेले आहे.

जे आपणास जनतेचे सरकार म्हणवते अशा सरकारने पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचे थांबविण्याचा निर्णय घेतलेला होता. परंतु जनतेच्या सरकारने घेतलेला निर्णय गांधीजींच्या उपवासाच्या हुकूमाबरोबरच बदलण्यात आला. माझ्या मनाला, गांधीजींच्या पाकिस्तानधार्जिण्या वृत्तीपुढे जनतेच्या मनाची शक्ती कस्पटासमान मानली जाते ही गोष्ट अगदी स्पष्ट दिसत होती.

गांधीजींचा उल्लेख हल्ली राष्ट्रपिता हे विशेषण लावून केला जातो. असे जर असेल तर ज्याअर्थी देशाचे विभाजन करण्यास मान्यता देऊन त्यांनी अत्यंत विश्वासघातकीपणाचे वर्तन केलेले आहे त्याअर्थी ते आपले वडील या नात्याचे कर्तव्य करण्यास खास चुकले आहेत. जर गांधीजींनी त्यांनी सुरवातीस दाखविलेला पाकिस्तानचा विरोध खरोखरच कायम ठेवला असता तर पाकिस्तानची मागणी करण्याची मुस्लीम लीगला हिंमत झाली नसती आणि त्यांच्या निर्मितीसाठी ब्रिटिशांनी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरून ते पाकिस्ताननिर्मितीही करू शकले नसते. पाकिस्तान देण्यामुळे राष्ट्रपिता या नात्याने आपले आवश्यक कर्तव्य पार पाडण्यास गांधीजी खास चुकले आहेत.

हैद्राबादच्या प्रकरणाचीही तीच गत आहे. निजामाचे मंत्री आणि रझाकार यांनी हिंदूवर केलेल्या पाशवी अत्याचारांचे वर्णन करण्याची मुळीच जरूरी नाही. हैद्राबाद संस्थानचा पंतप्रधान लायकअल्ली याने जानेवारी १९४८ च्या शेवटच्या आठवड्यात गांधीजींची मुलाखत घेतली. गांधीजींनी हैद्राबादच्या प्रश्नाकडे ज्या

रीतीने लक्ष घातले तीवरून गांधीजी आपला अहिंसेचा प्रयोग हैद्रावादवर करणार आणि रझाकार प्रमुख कासीम रझवी याला नराधम सुन्हावर्दीप्रमाणेच आपला दत्तक-पुत्र बनविणार ही गोष्ट अगदी उघड होऊन चुकली. जोपर्यंत गांधीजी जिवंत आहेत तोपर्यंत हैद्रावादसारख्या मुसलमानी संस्थानाविरुद्ध आपल्या हातातील सर्व शक्तीचा वापर करणे आणि त्याविरुद्ध कडक उपाय योजणे हे आपल्या सरकारला कधीच शक्य झाले नसते. जर सरकारने हैद्रावाद संस्थानाविरुद्ध सैनिकी कारवाई करण्याचे योजले असते तर गांधीजींनी आणखी एक उपास सुरू केला असता आणि गांधीजीचा जीव वचावण्यासाठी पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचा आपला निर्णय जसा भारत सरकारला बदलावा लागला तसाच हैद्राबादमध्ये सैनिकी कारवाई करण्याचाही निर्णय बदलावा लागला असता.

गांधीजींच्या मते आक्रमकाने दिलेले तडाखे सहन करणे आणि शस्त्राने वा शारीरिक वळाने त्याचा प्रतिकार न करणे आणि ते सर्व तडाखे निमूटपणे कुरकुर न करता सहन करणे म्हणजे अहिंसा पाळणे होय असे आहे. एखाद्या वाघाने इतक्या गाई मारून खाव्यात की त्याचा त्याला वीट यावा आणि तो वीट येईपर्यंत गाईनी त्याला आपणास खाण्यास मोकळीक द्यावी असे एक उदाहरण गांधीजीनी आपल्या अहिंसापालनाच्या व्याख्येचे वर्णन करताना दिले आहे.

मी स्वतःशीच विचार केला की मी गांधीजीचा वध करण्याचे ठरविले तर माझा सर्वनाश होईल. माझ्या वाट्यास जनतेकडून होणारा तिरस्कार तेवढा येईल आणि मी ज्याला जीवितापेक्षाही मौल्यवान समजतो तो माझ्याविषयीचा जनतेतील आदर मी एका क्षणात गमावून बसेन. हे पुढचे भविष्य मला त्याचवेळी दिसले होते. परंतु त्याचवेळी मला माझ्या हत्या कृत्यामुळे यापुढील भारताचे राजकारण जास्त व्यवहारी बनेल, भारत आक्रमकाविरुद्ध प्रतिहल्ला चढविण्यास समर्थ होईल आणि सैनिक शक्तीच्या वळावर तो सामर्थ्यशाली होईल हेही दिसत होते. गांधीजींच्या वधामुळे माझे भविष्य खलास होणार यात काडीचाही संशय नव्हता. परंतु पाकिस्तानी आक्रमणापासून भारत मात्र निश्चितपणे वचावणार होता. जनता मला नावे ठेवील. माथेफिरू अथवा मूर्ख म्हणून माझी संभावना करील. मी कोणाशीही याविषयी चर्चा केली नाही. मी आपले वळ दोन्ही हातात एकवटले आणि ३० जानेवारी १९४८ रोजी बिर्ला प्रासादातील प्रार्थनास्थळी एक अलौकिक कृत्य केले.

जर आपल्या राष्ट्राविषयी निष्ठा वाळगणे हे पाप असेल तर ते पाप मी केलेले आहे. हे पाप करण्यातच मला अभिमान वाटतो. त्या पापाचा धनी मी आहे हे मी नम्रपणे सांगू इच्छितो. मानवी समाजाने स्थापलेल्या या न्यायालयाच्यावर जर एखादे ईश्वरी न्यायालय असेल तर त्या न्यायालयात माझे कृत्य अन्याय्य ठरणार नाही असा मला आत्मविश्वास वाटतो.

खरे सांगायचे म्हणजे मी ज्यावेळी गांधीजींवर गोळ्या झाडल्या त्याच वेळी माझेही आयुष्य संपुष्टात आले. तेव्हापासूनचे माझे दिवस मी ध्यानधारणात आणि ईशचिंतनात घालवीत आहे. ह्या काळात माझ्या कार्याचे जे परिणाम माझ्या नजरेस पडले त्यामुळे माझ्या मनाला संपूर्ण समाधान प्राप्त झाले आहे.

गांधीजींच्या प्रयाणानंतर हैदराबादचा प्रश्न आपल्या सरकारने सैनिकबळाचा वापर करून योग्य रीतीने व अविलंबे करून व्यवस्थित रीतीने सोडविलेला आहे. ऊर्वरित भारताचे हल्लीचे सरकार आता व्यवहारी पद्धतीने आपले राजकारण हाताळीत आहे. आपले गृहमंत्री, आपले राष्ट्र आधुनिक शस्त्रास्त्रांनी आणि युद्धसाहित्यांनी सुसज्ज असे सैन्यबळ बळगून असले पाहिजे असे मत प्रदर्शित करतात. मात्र ते अजूनही हे पाऊल गांधीजींच्या श्रेयवादाशी सुसंगतच आहे असे म्हणत असतातच. त्यांनी स्वतःच्या समाधानासाठी फार तर असे म्हणावे. पण ते अर्थातच खोटे ठरेल.

या राष्ट्राकरिता गांधीजींनी हालअपेष्टा सोसल्या आहेत हे कबूल करण्यास मी तयार आहे. जनतेच्या मनात त्यांनी जागृती निर्माण केली ही पण गोष्ट खरी आहे. त्यांनी कोणतीही गोष्ट वैयक्तिक स्वार्थासाठी केलेली नाही. परंतु तरीसुद्धा त्यांनी आपल्या अहिंसेचा सर्व बाजूंनी होत असलेला पराभव कबूल करण्याचा प्रामाणिकपणा दाखविला नाही. असे म्हणणे माझ्या मनाला यातना देते. गांधीजींनी केलेल्या त्यागापेक्षाही अधिक त्याग केलेल्यांची आणि गांधीजींहून अधिक बुद्धिवान आणि वीर्यशाली पुरुषांची चरित्रे मी वाचली आहेत. पण ते काहीही असले तरी मी गांधीजींनी या देशाची जी सेवा बजावली आहे, त्या सेवेपुढे नी गांधीजींपुढे मी आदराने मानच लववीन. मी त्यांच्यावर गोळ्या झाडण्यापूर्वी प्रत्यक्ष त्यांचे शुभचिंतन करून त्यांना प्रथम प्रणिपात केला. परंतु माझी त्यांच्याविषयी इतकी वैयक्तिक आदराची भावना असूनसुद्धा या थोर देशभक्तालासुद्धा जनतेची फसवणूक करून या भारत देशाला विच्छेदित करण्याचा अधिकार नव्हता असे मला स्पष्टपणे वाटत होते

मी महात्माजींचा वध तर केला–

पण आता मी आणि महात्माजी दोघेही जड देहाने या जगात राहणार नाही. मी जातीने ब्राह्मण, याला माझा इलाज नाही. पण माझ्यामते मी आहे फक्त हिंदू, माझ्या हिंदू रक्ताबद्दल मला अभिमान आहे आणि म्हणून कुठले तरी रागलोभ साधून घेण्यासाठी माझ्या पोटजातीचा उल्लेख केला गेला आहे. पण ब्राह्मणातच टिळक, गोखले, आगरकर, नेहरू, राजगोपालाचारी, डांगे, एस्. एम्. जोशी, गोरे... शेकडो लोक आहेत त्यांची ब्राह्मणद्वेष्ट्यांना का आठवण होत नाही ? मी गांधीचा खून केला तो मी ब्राह्मण म्हणून निश्चित नव्हे. ब्राह्मण–ब्राह्मणेतरांची वैरे त्यांनी खुशाल आपआपल्यापरीने भांडावीत वा उगाळावीत. माझे कृत्य वाईट असले तर ते हिंदूचे कृत्य म्हणूनच वाईट वा चांगले असेल. किंबहुना ब्राह्मणी संयमी–थंड अशा डोक्या-

मुळे मी या महत्वपूर्ण निर्णयाला फार उशीर केला. मी जातीने तापट माथ्याचा—क्षत्रियकुलाचा—सळसळणाऱ्या रक्ताचा असतो तर पाकिस्तान निर्माण होण्यापूर्वीच मी हे कृत्य करून मोकळा होतो. पण माझी परंपरा कांही शस्त्रधारण करणारांची नव्हे. शस्त्रधारण करणारे, समाजाचे रक्षण करणारे, भूमीचा सांभाळ करणारे जर अहिंसात्मक बनले तर या भूमीचे रक्षण करावयाचे कोणी ? माझ्यासारख्या ब्राह्मणाने ? अन्यायाविरुद्ध दंड करायचे कोणी ? पोथीपुराणात मग्न राहणाऱ्या तापस्याने ? क्षत्रिय भेकड बनले; त्यांनीच समाज बुडू दिला, त्यांनीच आयाबहिणींची विक्री केली तरी तापस्याने संतापू नये ? जे काम वास्तविक ब्राह्मणेतरांचे, ते त्यांनी केले नाही. जे काम वास्तविक शस्त्रपूजकांचे ते त्यांनी केले नाही आणि मी ते केले तर त्यासाठी माझी सारी जमात बहिष्कृत. ब्राह्मणेतराना विद्या शिकू दिली नाही, पाणी मिळू दिले नाही, अवमानाने वागवले, चातुर्वण्याने विषमता वाढवली या सर्व गोष्टीसाठी ब्राह्मणांना जी काय व्हायची ती शिक्षा जरूर व्हावी. पण क्षत्रियांचे काम ब्राह्मणांनी केले—राष्ट्र विकणाऱ्यांना शासन केले म्हणूनच त्या जातीविरुद्ध काहूर कशासाठी ?

वास्तविक मी कसला ब्राह्मण ! मी कधीच जात—पोटजात मानली नाही. माझे दैवत जे सावरकर त्यांनी अस्पृश्यतेवर शस्त्र उगारले व समानतेचा धोशा धरला. वर्णविरहित, बलिष्ठ हिंदुसमाजाची मागणी केली. त्यासाठीं बहुजनसमाजाची मनधरणी केली. त्यांच्या लेखी श्राद्धपक्ष नव्हते. त्यांच्या लेखी रूढाचार आणि ग्रंथप्रामाण्य यांना मुळी जागाच नव्हती. असा हा कडवा हिंदूसुद्धा हरामखोरांनी जातीय ठरवला. जातीयतेचा उच्छेद करणारा हा माणूस जातीय. त्यांचे अनुयायी जातीय. आणि पुरोगामी कोण तर जातीशिवाय ज्यांना बोलता येत नाही ते ते म्हणे दलित. ते म्हणे बहुजनसमाजाचे पुढारी. फुल्यांच्यापेक्षा तर्कशुद्ध, आंबेडकरांच्याहून कडवा, शाहू छत्रपतीहून तेजस्वी असा हा बुद्धिवादी भांडखोर माणूस खरा बहुजनसमाजाचा नेता असायचा पण भेकड आणि दुबळचा राजकारणाने त्याची पोटजात काढून त्यांना बदनाम करण्याचा यत्न केला. सावरकराचे अखंड हिंदुसमाजाचे तत्त्वज्ञान आणि दलितांविषयीची कळकळ गाडून त्यांनाच जातीय ठरवण्यात आले. होय. ते धर्माभिमानी जरूर होते. पण जातीय ? त्यांनी पुंड मुसलमानांविरुद्ध दंड थोपटले. पण तेच हात बहुजनसमाजापुढे जोडले: जातिमुक्त समाजासाठी या देशात सावरकराएवढा आक्रोश कोणीच केला नाही. सारी ब्राह्मणजात नष्ट झाली तरी हरकत नाही. पण सावरकरांना विसरणे मात्र फार फार महाग पडेल. जातिमुक्त हिंदुसमाज—शस्त्रसज्ज हिंदुसमाज—विज्ञाननिष्ठ हिंदुसमाज निर्माण करायचा असेल तर गांधीजींच्या हृदयपरिवर्तनाधिष्ठित अस्पृश्योद्धारापेक्षा सावरकरांची हक्काधिष्ठित समानता श्रेष्ठ होय.

आम्ही सारे जेव्हा विसरले जाऊ तेव्हा या माझ्या परमपवित्र भूमीवर हिंदूंचेच राज्य असेल. येथील भेकड संस्कृती तेव्हा मर्द संस्कृती झाली असेल. सारा समाज एकसंध उभा असेल आणि गांधार–शरावती यांच्या पलीकडे त्याचे पाऊल असेल. नव्या मनूचा नवा समान वेद येथे दुमदुमेल, आणि त्या भारतभूमीकडे कोणीही वाकडे डोळे करून पाहणार नाही. मी जे कर्म केले, मी ज्यासाठी देहदंड सोसला ते हे माझे स्वप्न कोणीतरी पुरे केले म्हणजे मी कुठेही असलो तरी सुखी होईन.

सिंधूच्या किनाऱ्यावर अस्वस्थपणे हिंडणारे क्रांतिकारक त्या दिवशी स्वस्थचित्त होतील. सिंधूनदीकाठचा परिसर हिंदूंच्या गीतांनी भारून गेला की वाट पाहणारे सारे संत–महंत आशीर्वाद देतील. सिंधूच्या मुक्तीशिवाय सारे काही आम्हाला व्यर्थ आहे.

मित्रांनो, मी चाललो. माझ्या या बऱ्यावाईट कृत्याची ही तरफदारी नव्हती. मी केलेले हे कृत्य अघोर असेल, बेकायदा असेल, तुम्हाला आज रुचलेले नसेल. ठीक आहे. तुमचा निर्णय बदलेपर्यंत मी थांबेन. तो दिवस फार दूर नाही.

दिवाळी १९६९

• • •

महात्माजींचा हिंदूद्रोही नातू

आज जाऊ उद्या जाऊ म्हणता म्हणता चार दिवसावर दिवाळी अंक आला. अजून जायला जमले नाही. विषय डोक्यात भिरभिरतो आहे. मन कोठेतरी दुखावले आहे. पाचगणीसारख्या एका थंड हवेच्या गावात तो विषय माझी वाट पहातो आहे. मला वेळ होत नाहीय. तिथे जायला अनेक व्यवधाने मागे लागलेली आहेत आणि सारा कारभार एकाकी आहे. आधी पैसे कमी–तोटयात जाणारे सोबतसारखे उपद्व्याप–कागद दुर्मिळ–लेखकांकडच्या खेपा–आयत्या वेळेचे नकार–जाहिराती... अरे बापरे जाहिराती म्हटलं म्हणजे नको ते प्रवास–नकोत त्या खेपा-अगदी नाईलाज होऊन टाकलेल्या चतकोर भाकरीसारखे जाहिरातींचे तुकडे–पुन्हा मागील वर्षाची वसुली–अजीजी...

खरे तर नको हा वृत्तपत्रव्यवसाय असे वाटण्याइतकी या व्यवसायात घाल-

मेल आहे. हजारो रुपये हातून जातात. हाती काहीच उरत नाही. लेखकांचे राग-रुसवे तर विचारू नका. जाहिरातीत नाव मागेपुढे झाले तर प्रभाकर तामणे–शामराव ओक यांच्यासारखे लेखक एकदम अनेक दिवसांचे संबंध तोडण्याइतपत कालवा करतात. माणसे वयाने वाढतात तशी समजाने का वाढत नाहीत हेच कळत नाही. केवळ ऑफिसात चार खेपा घातल्या अन् गाठ पडली नाही म्हणून नारायण धारपासारखा माणूस इतका नाराज होतो की लेखन–कर्तृत्वाच्या एका मुलाखतीत ज्या मासिकाने त्यांना लौकिकपदी पोचवले. त्याची तो साधी नोंद करू इच्छित नाही. भाव्यांच्या सारखा ज्येष्ठ आणि संभावित लेखक तर त्यांच्याशी त्याच्या वाचकाच्या झालेल्या न्याय्य मतभेदात त्या वाचकाची बाजू घेतली असे समजून साऱ्या समृद्ध अन् खोलवर मैत्रीवर पाणी सोडतो. यांपैकी कोणाचेही पै–पैशाचे देणेघेणे नाही, भांडण नाही. उलटपक्षी अगदी वेळेवर–इतरांपेक्षा अधिक वक्तशीरपणे त्यांना पैसे मिळाले. एवढ्यातेवढ्यासाठी माणसे भांडू लागली म्हणजे वाईट वाटते. त्यात तत्त्व नसते–आढ्यताही नसते. संपादकांचे वैपुल्य झाले आहे–कोणाची कोणाला गरज उरलेली नाही हेच बहुशः कारण असावे. माझे कधी चुकत नाही असे थोडेच आहे. चुकते पण मी मैत्री विकायला काढीत नाही.

असा विनकिफायतशीर धंदासुद्धा मला आवडतो. एकतर या धंद्यात धंदा आणि हौस याची सीमारेषा ठरवता येत नाही. माणसे सकाळ–संध्याकाळ येत असतात. प्रतिभावान्–काहीतरी घडवणारी–नव्या जगात हिंडून आलेली. त्यातली काही या जगातली नसतातही. परमेश्वराचा स्पर्श झालेले काही कलावंत आले की देवळाला पावित्र्य असते तसे माझ्या कार्यालयाला येते. त्यातही पुष्कळ माणसे उबदार असतात. खूपखूप माया जोडतात. कोणी माझ्या ललित साहित्यावर प्रेम करतात–कोणी गद्य लिखाणावर, विशेषतः माझ्या आक्रमक लेखनावर प्यार करतात. कोणाला माझे लेखन मुळीच आवडत नाही–मी आवडतो. पुष्कळसे लंगडे, पांगळे, बायकी असे सहव्यवसायी माझ्या चैनबाजीचा, मित्रपरिवाराचा मत्सर करीत, माझी निंदा करीत माझ्या कार्यालयाबाहेरून जातात, त्याची घाण आतपर्यंत येते. त्यांचे विषारी फूत्कार अस्वस्थ करतात पण मनाच्या रोगावर इलाज नसतो. अशा विकृतीची दया करावी हेच शेवटी पटते. जीव–जिवाणूला सुद्धा गल्लीबोळात जगू द्यावे हा संतांचा उपदेश मनी राहतो.

पण या धंद्याला जे 'तारुण्या' चे दान आहे ते नाकारणे करंटेपणाचे आहे. म्हातारे होणाऱ्या संपादकांना या व्यवसायातून ढकलले जाते. हे म्हातारेपण मनाचे असते. रंगनाथ देशपांडे, माधव मनोहर, ग. ल. ठोकळ ही मंडळी अजूनपर्यंत ऐन पंचविशीतच नाही का राहू शकली. प्रा. फडकेसुद्धा परवा परवापर्यंत तरुणच होते. हे जमायला हवे. जमेल. आज ना उद्या जमेल. पण तोचतोचपणा–तीच वैरे–तेच छंद–

स्वतःबद्दलचे तेच तेच बोलणे माणसाला एकदम जीर्ण करून टाकते. 'आमच्या वेळी' चे कालबाह्य पुराण करणारे पुष्कळ साहित्यिक संपादक या धंद्याला पांजरपोळाची कळा आणतात. कधी कधी कॉलेजातले तरुण–उमलणारे–खूप अस्वस्थ असणारे–कदाचित् उद्याचे मर्ढेकर होणारे–भेटतात आणि जखम करून निघून जातात. त्या जखमा मात्र फार सुंदर असतात. उगवत्या सूर्यासारख्या. अशाच जखमा होत रहाव्यात असे वाटते. स्तुतीची, निंदेची, धमकीची, याचनांची पत्रे वाट पहात असतात. दिवस कसा जातो तेच कळत नाही.

मोठी मजा असते.

मी पत्राशीच्या जवळ जवळ येत चाललो हे मला मुळी कळतच नाही. मला संदर्भग्रंथ कसे वापरायचे ते समजते म्हणून मी विद्वान, मला चार लोक वागवता येतात म्हणून मी संपादक–बरे–वाईट चार शब्द लिहिता येतात म्हणून लेखक. एरवी संपादकाने लिहिण्याची या भागात आजकाल फारशी पद्धत नाही, आणि मी तर ज्याला 'खाज' किंवा कंड याशिवाय अन्य पर्यायी शब्द नाही या विकाराने ग्रस्त झाल्यामुळें या व्यवसायात पडलेला. 'पैंजण' काय, 'बुवा' काय, तिथे मला नीटसे व्यक्त होता येत नव्हते पण आता 'सोवन' आहे–तिथे थोडे हुंदडता येते. कधी ते हुंदडणे थोडे मर्यादेबाहेर जात असेल, पण सर्वसामान्यतः मलूल अशा समाजाला जागते ठेवण्याला यावाचून पर्याय नसतो. वृत्तपत्रव्यवसाय तसा मला नवीन नाही. १९४८ ते ५१–५२ पर्यंत मी एक साप्ताहिक चालवले होते. बापूसाहेब माटे त्यात खूप लिहित. नानासाहेब गोखले (अरुणोदय संगीत मंडळीचे चालक) ह. वि. वाडेकर, मनमोहन, भा. द. खेर, द. का. हसबनीस, वि. वि. हडप, ज्योतिषी लवाटे अशी मंडळी त्यात लिहित. पण तेव्हाची भट्टी जमली नाही.

वृत्तपत्रव्यवसायाची गंमत ही आहे की जिथे अन्य कोणाला प्रवेश नाही तिथे वृत्तपत्रव्यावसायिकाला सुखेनैव प्रवेश मिळतो. सत्याच्या तो एवढा जवळ जाऊ शकतो की कधीकधी अंग भाजते. अंग भाजण्याच्या धोक्यापेक्षा सत्याचे आकर्षण एवढे आहे की त्या आगीचा चटका त्याला जळून जाईतो कळतच नाही. अनेकदा या सत्याच्या शोधात हाती येते ते सत्य नसतेही; सत्याभासी असत्य असते. पण हाती काय येते हे दुय्यम आहे. सत्याचा पाठलाग हा खरा आणि वृत्तपत्रव्यावसायिकाचे ते सुविहित कर्तव्य होय. ती एक नशा आहे आणि त्या नशेला अन्य तुलना नाही वा पर्यायही नाही.

सत्यशोधनाची तडफड, तो जीवघेणा पाठलाग, ती झुंज, ते डाव-प्रतिडाव हे केवळ संपत्तीने किंवा वारसा हक्काने मिळण्याजोगे नाही. 'किर्लोस्कर' हे संपन्न मासिक आहे पण 'सत्यकथे' ची बोच त्याला नाही 'सत्यकथा' हेच साहित्यिकांचे मासिक. पुष्कळजण तेथे प्रवेश नाही म्हणून नाके मुरडतात, पण त्यांचे डोळे मात्र

त्या मासिकाच्या पायरस्त्यावर लोभावत असतात. दैनिकात 'लोकसत्ता' किती खपते. पण त्याला काही खास रागलोभ नाही. सत्यासत्याची चाड नाही. लोकरंजनासाठी राजकीय मताला ते खुशाल मुरडू लागते. आजचा नव्हे, पण कालपरवाचा 'केसरी' कमी खपत होता. निदान 'सकाळ,' 'लोकसत्ता' पेक्षा कमी खपत होता. पण 'सकाळ' च्या अग्रलेखाने जे होत नसे ते त्यातील पत्रकर्त्याच्या स्फुट सूचनेने होत असे. ती एक यज्ञवेदी होती. वाटते, आयुष्यात काही जमले नाही तर त्या काळच्या ज्वलंत केसरीचा लेखक नाही, निदान प्रुफरीडर व्हावे.

पण जमाना बदलतो आहे. व्यक्ती गेली की ती इतर मिळकतीप्रमाणे वृत्तपत्राची मिळकत ठेवून जाते. पण वृत्तपत्र ही तशा अर्थाने मिळकत नव्हे तर व्रत आहे. तो ठेवा नाही, ती कर्जी आहे. कोणीतरी खर्ची पडल्याशिवाय जनमानसात खोल रुजणारी पत्रे निर्माण होत नाहीत. आज टिळकांचे वारस केसरी ही मिळकत समजतात पण टिळकांची छाती तेवढी वजा करून ही मिळकत सांभाळणे म्हणजे सावकारीवरचे व्याज खाणे आहे. टिळक हवेत तर तो गरजणारा केसरी हवा—केसरी हवा तर अनृताविरुद्ध लढाई हवी. आणि लढाई शिखंडी करीत नाहीत. आज केसरीत जमा झालेल्या व सुस्थितीच्या दिशेने चालणाऱ्या 'राजकन्या' केसरीला 'पपी' करीत आहेत. असू देत. जमाना बदलला आहे. त्याला कोण काय करणार!

आणि म्हणून वृत्तपत्रांची नशा कमी होत चालली आहे. स्वास्थ्य कोणाला नको असते—मलासुद्धा हवे आहे. घर बांधावे अशी इच्छा आहे. मित्राने पाठविलेली मोडकी गाडी विकून चांगली ॲम्बॅसिडर मिळाली तर हवी आहे. आणि किमान ५००० पुस्तकांचा संग्रह हवा आहे. एखादा उपसंपादक हवा आहे—सुसज्ज छापखाना हवा आहे आणि निदान कागदवाल्याचा तगादा ताबडतोब थांबायला हवा आहे. पण हे सर्व होण्यासाठी वृत्तपत्रीय नशा मात्र हवीच हवी. ती जाणार असेल तर मात्र वरचे काही नको. त्यापेक्षा आहे ते फार चांगले आहे. कारण याहो परिस्थितीत काही क्षण असे येतात की ते अनेक दैन्ये भुईसपाट करतात. एकदम श्रीमंती कोसळू पहाते. एक एक दिवस सारे कसे बदलून जाते.

तसे खूप दिवस गेल्या दोन वर्षात आले आहेत. पण परवा एक दिवस एकदम कोसळला. दिवस चालू झाला होता. प्रेसवर काम चालू करून देऊन मी ऑफिसात आलो होतो. सिगारेट शिलगावून काम करावे या विचारात होतो. तेवढ्यात माझ्या एका मित्राचा फोन खणखणाणला. फोनवर तो म्हणाला की, 'माझ्याकडे कोणी लष्करी अधिकाऱ्याने (नाव मी विसरलो आहे.) एक गृहस्थ पाठवला आहे. त्याला एक पुस्तक छापावयाचे आहे.'

पुस्तक छापण्यात मला फारसा रस नव्हता. पण पुढे तो म्हणाला–' त्याची स्वतःची कहाणी मोठी विचित्र आहे. एकदा तू ऐक. '

या खुर्चीवर कित्येकदा उगाचच दुसऱ्याची दुखणी ऐकत बसावे लागते. कुणाचा अहंभाव, कुणाची लाचारी, कुणाचे स्वप्नरंजन, कुणाची मनोवेदना. मी ' ठीक ' म्हणालो अन् कामाला लागलो.

पंधरा एक मिनिटांनी एक गृहस्थ दबकत दबकत ऑफिसमध्ये आला. वेष बावळा होता. खालच्या मानेने तो बोलत होता. पुरेपूर आश्वासन दिल्यावर तो मोकळेपणाने बोलू लागला. त्याने एक विचित्र असे कथन केले. त्या कथनाच्या पुरस्कारार्थ त्याने पिशवीतून एकामागोमाग एक अशी पत्रे, फोटो, तारा काढावयास सुरवात केली. त्याच्या तशा अर्थाने गावंढळ बोलण्यात एक प्रकारची चीड होती– आवेश होता. बघता बघता तो लाल झाला. संतापाने धगधगू लागला. त्याच्या त्या लांबलचक कहाणीत कुठेतरी खोलवर सत्यही धगधगत होते. ह्या सत्याची मला ओढ आहे. ते भेटण्यासाठी मी तडफडत असतो. आकार नसलेल्या त्याच्या कलाहीन कथनातून मला काहीतरी निराळे दृश्य दिसू लागते.

त्याचे कथन संपलेच नसते. मी थांबवले. एकतर पुष्कळ मंडळी खोळंबून होती. संपादकाने आपल्याला खोळंबत ठेवलेले कोणाही लेखकाला आवडत नाही. मी त्याला सांगितले, ' तुम्ही जे म्हणता ते जर खरे असेल तर ते भयंकर आहे. ज्याच्या विरुद्ध तुमची तक्रार आहे ती मंडळी मातब्बर आहेत. आणि त्या संस्थेच्या प्रमुखपदी गांधीकुटुंबातला माणूस आहे. पूर्ण चौकशी केल्यावाचून मी तुम्ही म्हणता त्यावर विसंबून काहीच करू शकणार नाही.'

डोळ्यात पाणी आणून, अत्यंत कळकळीच्या स्वरात समोरच्या गृहस्थाने आपल्या वृत्तांताची सत्यता सांगितली. मी सदरहू कहाणी छापू शकणार नसलो तर आपल्या खर्चाने कहाणी छापायची त्याची तयारी होती. त्याने आपल्या मातृभाषेत हिंदीत वेडीवाकडी काही पाने लिहिली होती. त्याच्या सांगण्यात काही वेळा विचित्र अपेक्षा येत. पण एकूण त्याचे म्हणणे विचारात घ्यावे असे होते. मी त्याला म्हणालो, ' मी चौकशी करतो–तुला कळवतो. '

आणि मग मी त्याने दिलेले धागेदोरे तपासू लागलो. राजमोहन गांधी हे नाव मला परिचित होते. महात्मा गांधींचा हा नातू राजगोपालचारींचा हा नातू. देवीदास गांधींचा हा मुलगा ' हिंमत ' नावाचे एक साप्ताहिक संपादित करतो. याचे सर्व शिक्षण परदेशातच झाले. वारंवार परदेशला जातो. कुठचा तरी परदेशचा पैसा आणतो इतपत मला त्याची माहिती झाली होती. ख्रिश्चन मिशनऱ्यांशी याचे चांगले लागेबांधे आहेत. मॉरल रीआर्मामेंट या संस्थेच्या प्रमुखपदी तो आहे आणि

या संस्थेने पाचगणी गावात पाचपन्नास लाख रुपये खर्च करून कसले तरी केंद्र चालू केले आहे.

राजमोहन गांधी किती झाले तरी महात्मा गांधींचा नातू आहे. महात्मा गांधींवरचे माझे प्रेम जगजाहीर आहे. अशा संदर्भात हे माझे लिखाण वाचले जाईल, यामुळे मी जास्तच चौकस होतो. मी राजमोहन गांधींना पत्र लिहिले आणि त्यांची भेट मागितली. ते परदेशी होते. त्यांच्या चिटणिसाने मला *M. R. A.* या संस्थेच्या अन्य जबाबदार अधिकाऱ्याला भेटावयाचे सुचवले. त्यानुसार मी दिनांक ४ रोजी दुपारी श्री. माथुर, मॉरल रीआर्मामेंट, एशिया प्लेटो, पाचगणी व श्री. हिरालाल जेधिया (मुकादम) या दोघांना तारा केल्या. आणि दि. ६ ऑक्टोबरला—रविवारी—पांचगणीस पोचलो.

आता जो मनुष्य मजकडे या सर्व प्रकरणाचे सूत्र घेऊन आला तो हिरालाल जेधिया आणि ज्या संस्थेविरुद्ध त्याच्या तक्रारी ती मॉरल रीआर्मामेंट ही संस्था असे दोघेही मला भेटणार होते.

हिरालाल जेधिया हा एक राजस्थानी गृहस्थ आहे. त्याचे वय सुमारे ५४—५५ आहे. तो जातीने राजस्थानी भंगी असावा आणि पाचगणी म्युनिसिपालिटीत तो, त्याची बायको, सॅनिटरी विभागात काम करत आहेत. हरिजनांचा उद्धार करणारी देवता म्हणून या हिरालालला महात्माजींबद्दल अतीव आदर वाटतो. वीस-बावीस वर्षांपूर्वी महात्माजींचा मुक्काम पाचगणीत होता. योगायोगाने महात्माजींची सेवा करावयाचा योग हिरालालला आला. जेथे महात्माजींचा मुक्काम होता त्या इमारतीची स्वच्छता करण्याची कामगिरी हिरालालकडे होती. एकदा बोलताबोलता बापूजी म्हणाले, 'तुझ्यावर प्रेम करणाऱ्यावर मी प्रेम करतो. तुझ्यासारख्याचा अव्हेर करण्याचा मी तिरस्कार करतो.' बापूजींच्या त्या आपुलकीच्या बोलण्याने हिरालाल थरारला. काहीतरी अनाकलनीय भाषण आपण ऐकले असे त्याला वाटले. निरक्षर माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करण्याची बापूंची ही रीत होती. हिरालाल भारावला. तो म्हणाला, 'बापूजी, माझी सर्व अपत्ये मी तुम्हाला देऊन टाकीन. तुमच्याजवळ ती हरिजनांचा उद्धार कसा करायचा याचे शिक्षण घेतील.' पण त्यानंतर फारच थोड्या अवधीत महात्माजींचा वध झाला. आणि हिरालालच्या मनात रुजू लागलेले आत्मोद्धाराचे बीज मुळातच करपले. काहीतरी लकाकून जावे आणि डोळ्याला तो प्रकाश जाणवण्यापूर्वीच सारे नभ अंधारावे असे हिरालालचे झाले. गांधी गेले म्हणजे आपला आधार गेला असे त्याला वाटले आणि खालच्या मानेने त्या विचाऱ्याने हे दुःख गिळून टाकले.

पण कोठेतरी ठुसठुसत असणारे हे शल्य एक दिवस अकस्मात् जागे झाले. १९६४ च्या मे महिन्यात या हिरालालची राजमोहन गांधींशी गाठ पडली. राज-

मोहन हा एक हुशार माणूस आहे. हिरालालचे आणि बापूजींचे ते तथाकथित संभाषण त्याला माहीत असावे. तो पाचगणीस का आला हे तेव्हा हिरालालला कळण्याजोगे नव्हते. मॉरल रीआर्मामेंट ही तेव्हा अमेरिकेच्या पैशावर चालणारी व त्यामुळे बदनाम झालेली संस्था त्याला फारशी परिचित नव्हती. आल्याआल्याच राजमोहनने हिरालालवर मायाजाल टाकले. आपण हरिजनांच्या उद्धारासाठी पाचगणीत महाविद्यालय काढणार असल्याचे त्याने घोषित केले. हे विद्यालय केवळ हरिजनांसाठी असणार होते. शिवाय हिरालालला सुंदर व शानदार बंगला तो बांधून देणार होता. अट एवढीच की त्याने पूर्वी बापूजींना कबूल केल्याप्रमाणे राजमोहनच्या स्वाधीन त्याची मुले करावीत. या मुलांचे सर्व शिक्षण व संस्कार स्वतः राजमोहन करणार होता.

हिरालाल 'गांधी' या नावाने आधीच सुखावला होता. कारण महात्माजींचे स्वप्न त्याच्या नातवाच्या हातून पुरे होणार होते. त्यामुळे तर हिरालालचा आनंद गगनात मावत नव्हता. शिवाय जातीचा उद्धार, स्वतःची समृद्धी यामुळे राजमोहनच्या मागणीचा त्याने एकदम स्वीकार केला. मॉरल रीआर्मामेंट या शब्दाचा अर्थ ज्याला कळत नव्हता तो हिरालाल एकदम त्या संस्थेचा हितेच्छु बनला आणि त्याने आपली तीन मुले, 'गौरी, मंगला आणि साईलाल' राजमोहनच्या स्वाधीन केली. पाचगणीच्या शाळेतून ती त्वरित काढली गेली आणि मोठ्या शहरातील उत्तम व परिपूर्ण शाळेत रवानगी करण्यासाठी राजमोहनच्या स्वाधीन करण्यात आली.

या मुलांनी यापुढे कधीच शाळा पाहिली नाही. पुस्तकाचे, शिक्षकांचे किंवा विद्यालयाचे त्यांना दर्शनही घडले नाही. घडणारही नव्हते. कोणीतरी अस्पृश्य मुले राजमोहनला हवी होती. हिंदुस्थानातील दारिद्र्याचे, अज्ञानाचे चांगले प्रदर्शन करावयास राजमोहनला दुसरी चांगली वस्तू सापडली नसती. म. गांधींनी ज्या अस्पृश्याचे 'हरिजन' केले त्यांनाच देशोदेशी फिरवून विक्रीची वस्तू करण्याचे राजमोहनने योजले होते.

ही तर गोष्ट निश्चितच आहे की, हिरालाल हा गरीब माणूस आहे. त्याला चांगली दहावारा (कदाचित् जास्तही) मुले आहेत. त्या सर्वांचे पालनपोषण करणे त्याला मिळणाऱ्या वेतनात शक्य नाही. हेही शक्य आहे की मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याची परस्पर जबाबदारी घेतलेली पाहून तो हुरळला असेल. पण दारिद्र्याची हेटाळणी करण्याचा अधिकार धनवंताला दिला कोणी ? शतकानुशतके ज्ञानाचे दरवाजे बंद असणाऱ्या समाजाला हा मोह का न पडावा ? हा लोभ काही संपत्तीचा नव्हता, ज्ञानाचा होता. राजमोहनने हिरालालची मनःस्थिती

पूर्णपणे ओळखली होती. आणि त्यामुळेच त्याची ही मुले त्याला दैवाने दिलेला ठेवा वाटली.

मला अजूनही मॉरल रीआर्मामेंट हे कोडे उमगले नाही. मी स्वतः पाचगणीला गेलो. तिथल्या प्रमुखाची म्हणजे माथुर यांची भेट घेतली. गोड बोलण्यात हा गृहस्थ प्रवीण होता. शक्यतो अडचणींचे प्रश्न टाळण्याचे खास शिक्षण त्याने घेतलेले होते. ही संस्था नव्हे, हा विचार आहे, असे काहीसे भावडे स्पष्टीकरण त्याने दिले; परंतु त्या इमारती, फर्निचर, पैसा, पगार या सर्वांना काही शास्त्रशुद्ध स्वरूप आहे. ती संस्थाच आहे. त्या संस्थेचे धोरण, कार्यक्रम, भवितव्य याविषयी माथुर यांनी काही सांगितले नाही. प्रश्नोपप्रश्नात त्याने अनेक प्रकारे त्या संस्थेच्या कामाचा कसलाही थांग लागू दिला नाही. राजमोहन गांधी स्वतः तेथे असूनही त्यांची गाठ पडू दिली गेली नाही. ह्या संस्थेत प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष काम करणाऱ्या कोणा विद्यार्थ्याची गाठ पडेल अशा आशेने मी त्याला ती भेट करू द्यावी असे सुचवले पण तेही त्याने सुखेनैव टाळले. पण त्या टाळण्यात कटुता नव्हती. साखरेत शब्द घोळवून तो बोलत होता. सुंदर कपडे, उच्च व्यक्तिमत्व, गोड इंग्रजी या बळावर त्याने मला दीड तास केवळ झुलवत ठेवले यात मुळीच शंका नाही. स्वतः माथूर म्हणजे तिथला क्रमांक तीनचा अधिकारी. तर मग वरचे अधिकारी आणि त्यांचा प्रतिपरमेश्वर राजमोहन काय जातीचे असतील ते देव जाणे ! चांगली चांगली मुले या चकचकीत आयुष्यक्रमाकडे, उत्तम इमारतीकडे, गोड भुलावणीने भुलतात. तिथे एकटी राहतात. कीर्तनकार जसे माया–आत्मा–नश्वरता वगैरे शब्द वापरून अध्यात्मिक वातावरण निर्माण करतात तसेच स्वार्थत्याग–स्वार्थरहित सेवा–सद्विचार आदी शब्दांची पखरण करून इथं कारभार चालतो. खुद्द अमेरिकेतही विशोभित वाटावी एवढी सुंदर वास्तू, बागा, फर्निचर, पियानो, राहण्याची सोय, इथे झाली आहे. म्हटले जाते की, देशोदेशीच्या नागरिकांच्या देणगीतून हे झाले आहे. देशोदेशीचे नागरिक राजमोहन गांधी अन् त्याचा गोतावळा इथे चैनबाजीने रहावा एवढ्यासाठी यांना पैसे पाठवीत असतील तर ते मूर्ख असले पाहिजेत. दरिद्रीनारायणाची सेवा मखमली कपडे घालून अन् एअरकंडिशन्ड खोल्यातून राहून करावयाचा हा मामला माझ्या समजाच्या आटोक्याबाहेरचा आहे. अर्थात् इथे येणारे भारतीय उच्चतर स्तरातले असतात. ज्याप्रमाणे थिऑसफी हे लाडके वेड काल–परवापर्यंत श्रीमंत समाजात नांदत होते, त्याच प्रकारचे हे वेड आहे. एवढे बरे आहे की येथे प्रत्यक्ष काहीच करायचे नसते. येथे चर्चा असते–चर्चासत्रे असतात. तेथे पाचदहा दिवस आपल्या खर्चाने (रोजी किमान ५० रुपये) राहावयाचे, छान छान जेवण करावयाचे आणि गोड गोड भाषेतील स्वार्थत्यागाची गाणी ऐकावयाची. अमेरिकन पैशाचा जो महापूर या देशात गेल्या दहा–पंधरा वर्षांत वहातो आहे

त्यातून अनेक प्रचारकेंद्रे उत्पन्न झाली. ती सर्व उघडपणे अमेरिकेचा प्रचार करीत नाहीत–पण ती अखेरी अमेरिकेची वाहुलीच आहेत. अमेरिकेच्या सूत्रात बुद्धिवादी समाजाचे विघटन महत्त्वाचे असते. त्यामुळे पत्रकार, लेखक, प्राध्यापक यांना विकत घेण्यासाठी अनेक उपद्व्याप अमेरिकेच्या पैशाने चालू असतात. त्या चळवळी वाह्यतः उदार, स्वातंत्र्यवादी, कम्युनिस्टविरोधी, लोकशाहीच्या पुरस्कारार्थ आणि दलितोद्धारार्थ असतात. मॉरल रीआर्मामेंट ही संस्था त्यांपैकीच एक आहे.

केवळ अमेरिकेने पुष्टित झालेली संस्था एक वेळ आम्हाला चालली असती. इथे जोंवर पाकिस्तानधार्जिणी पत्रे अन् संस्था आहेत, इथे जोंवर कम्युनिस्टधार्जिणी पत्रे व संघटना आहेत, इथे अरब-जगाचे हित पाहणारी ब्लिट्झसारखी वकिलात आहे तर आम्ही तक्रार म्हणून कोणाविरुद्ध करायची ? अमेरिकन पैशाने देश विकायला काढणारे उच्चवर्णीय आणि आर्थिक फायद्यासाठी लाचार झालेले कनिष्ठ-वर्गीय या सापळ्यात अडकणारच. कुणाला परदेशप्रवास हवा असतो. कुणाला समाज-सेवेच्या नावाखाली करमणूक हवी असते, कुणाला रिलीफ हवा असतो, कुणाला हीनगंडाने पछाडलेले असते. या अमेरिकन सापळ्यात मी–मी म्हणणारे धनिक, विद्वान, सेवक सापडतात. जेव्हा त्यांना सत्यस्वरूप कळते तेव्हा ते भ्रमचित्त होतात. हिरालालसारखे.

आणि हिरालाल तरी भ्रमचित्त का झाला ? राजमोहनने त्याची फसवणूक केली किंवा आर्थिक लाभ नाकारला म्हणून नव्हे. तो तर त्याला किंवा त्याच्या मुलांना मिळतच होता. तो चक्रावला–राजमोहन जेव्हा त्याला धर्म बदलावयास सांगू लागला–बैबल वाचावयास सांगू लागला तेव्हा. हा हरिजन गरीब आहे, उच्च-वर्णीयांबद्दल त्याच्या मनात राग असेल पण त्याला आपल्या धर्माचा अभिमान आहे. धर्म सोडण्याची कल्पना त्याच्या डोक्यात येणेच शक्य नव्हते. हा धर्म बदलण्याचा प्रस्तावही राजमोहनने मोठ्या चतुराईने घडवून आणला.

राजमोहनच्या ताब्यात गौरी, साईलाल आणि मंगला गेल्यावर राजमोहनच्या डोक्यात निराळ्याच कल्पना घोळू लागल्या. भीक मागणे हा जगातला सर्वांत श्रेष्ठ स्वरूपाचा धंदा आहे हे त्याने ओळखले होते. इंग्लंडच्या वातावरणात हिंदुस्थान व इतर भूकग्रस्त आशिया यावद्दल एकूण जगात, अनुकंपा आहे याची त्याला कल्पना आली होती. महात्मा गांधींचा वारसा आणि हिंदुस्थानातील लोकांच्या दारिद्र्याची भुकेकंगालपणाची–दैन्याची रडगाणी या जोरावर आपण युरोप–अमेरिकेतून पैशाचा पाऊस पाडू हे या लबाड ठकाने ओळखले. आणि 'इंडिया अराईज्ड' (जागा झालेला हिंदुस्थान) या नावाने त्याने एक संगीताचा कार्यक्रम ठरवला. खूप रडायचे, दारिद्र्याचे प्रदर्शन करावयाचे, झोळी फिरवायची, फाटके कपडे पेहरायचे अशा द्रव्यदायी कार्यक्रमाची परिणामकारकता चुणचुणीत मुले आणि मुली यांनी फारच

वाढते हे राजमोहनला सहज कळण्याजोगे होते. त्यातून ती मुले जर हरिजनांची असतील तर सोन्याहून पिवळे.

राजमोहनला अशी करुणा उत्पन्न करणारी हरिजन मुले हवी होती आणि ती त्याला हिरालालने पुरविली. ही मुले स्वाधीन होताच राजमोहनने आपले 'नाटक' वसवण्याचे काम चालू केले. रडावे कसे व किती हे त्यांना त्याने सप्रयोग शिकविले. या घनोत्पादक व्यवसायात पडायचे असल्यास त्या दहावारा वर्षाच्या मुलांचे शालेय शिक्षण कशासाठी करायचे ? शिकून तरी काय करायचे ? पैसेच मिळवायचे ना ! हा गांधीचा नातू–राजगोपालचारीचा नातू–देवीदास गांधींचा मुलगा त्या पोरांना भारतीय दुर्दशेचे चित्र उभे कसे करावे ते शिकविण्यात गढून गेला. हिरालाल जेव्हा त्या मुलांना मुंबईत भेटावयास जाई तेव्हा नाटकातलाच एक भाग म्हणून ती मुले त्याला चक्क खोटे सांगत. शाळा चांगली आहे–शिक्षण उत्तमच आहे, मग हिरालाल खुपीत असे. एकदा तो म्हणाला, 'शाळा पहायला हवी.' तेव्हा राजमोहन म्हणाला, 'ती मुलींची शाळा आहे–पुरुषांना तेथे प्रवेश करण्यासाठी परवाना लागतो.'

असे दिवस जात होते. शहरात राहिल्यामुळे मुले चुणचुणीत झाली होती. हिरालालला कृतकृत्य वाटत होते. एक दिवशी कलकत्त्याची तार आली तेव्हा हिरालाल तेथे गेला. हॉटेलमधे उतरून तो मुलाची आणि राजमोहनची वाट पहात होता. कुणीतरी सांगितले की तुझ्या मुलाचे आज नाटक आहे. 'मुलाचे नाटक', हिरालाल घाबरून गेला. मुलाचे नाटक हो काय भानगड आहे हेच त्याला समजेना. थिएटरचा पत्ता शोधून तो राजमोहनपुढे जाऊन उभा राहिला. त्याची मुले भरगच्च भरलेल्या थिएटरमध्ये लोकांच्या डोळ्यातून पाणी काढीत होती. मुलांची ही नाट्यकला पाहून रागवावे की कौतुक करावे हेच हिरालालला कळेना. मुलांनी दोन वर्षात शाळेचे तोंड पाहिलेले नाही हे त्याला थोडयाच वेळात कळले. तो राजमोहनवर खूप रागावला. गोड भाषेचा वारसा मिळालेला राजमोहन हिरालालला म्हणाला, 'अस्पृश्यांच्यासाठी मला पाचगणीत ते कॉलेज काढावयाचे आहे त्यासाठी हे नाटक करतो आहे. तुझा, तुझ्या मुलांचा, तुझ्या कुटुंबाचा, तुझ्या जातीचा त्यात उद्धारच आहे. तुझ्या मुलाचे शिक्षण आम्ही खाजगी शिक्षक ठेवून करतो आहोत !'

खुळा हिरालाल, राजमोहनचे मायाजाल त्याला अनाकलनीय होते. त्याचे स्ववांधवावरचे प्रेम अमर्याद होते. तोही राजमोहनच्या अस्वली खेळात सामील झाला. तोही त्यांच्यावरोवरच्या जगप्रवासाला तयार झाला, दरवेशाच्या खेळातली ही लहानमोठी अस्वले अश्रूंच्या भांडवलावर जगातून लक्ष्मी हस्तगत करण्यासाठी वाहेर पडली.

पण दरवेशी पैसा मिळवतो अन् अस्वल गाजरावर राजी राहते. चांगले

अनुक्रम ७६ ..... दि: १९८५
क्रमांक ..... २२४८ ..... बोर्ड दि. ३०/६/८७

कपडे, चांगले खाणे–पिणे यावर हिरालाल भुलला. पैशांचा पाऊस पडत होता. राजमोहनला एका मुलीच्या भानगडीत दिल्ली पोलिसांनी अडकवून धरले म्हणून तो उशीरा सायप्रसला पोचला. लहानलहान वयाची कोवळी मुलेमुली आणि राजमोहनसारखे लांडगे असा हा पन्नास जणांचा ताफा युरोपात व मध्य आशियात हिंडला. तेच भुकेल्या भारताचे चित्रण, तीच अन्नान्नदशा, तीच रडत कहाणी, प्रेक्षकांच्या डोळ्यातून पाणी काढण्यासाठी या लहान पोरांना उंच स्वरात किंचाळाव्या लागणाऱ्या करुण स्वराची भेंडोळी.

सर्वसामान्यतः राजमोहनने या 'भारत–दारिद्र्य–दर्शनात' थोरामोठ्यांची पोरेवाळे अडकवली होती. परदेशच्या प्रवासाचे आमिष, नाट्यकलेची घुंदी यामुळे राजमोहन हे का करतो, कशासाठी करतो इकडे त्या मुलांचे पालक कशाला लक्ष देतील. उच्चभ्रू समाजातली भटकणारी मुले या आईवापांच्या अशा बेछूट वागण्यातून निर्माण होतात. या टूरनंतर राजमोहनविरुद्ध चारदोन ठकवाठकवीच्या तक्रारी नोंदवल्या गेल्या. पैशाच्या वळावर त्यांची तोंडं बंद करण्यात आली. या तक्रारी नेमक्या कशावद्दल होत्या याचा ठावठिकाणा सरकारने अवश्य घ्यावा.

एकूण तीस ते चाळीस लाख रुपये या कामी राजमोहनने गोळा केले. ही सर्व रक्कम रिझर्व्ह बँकेकडे कळविली गेली की नाही ? कळवली नसल्यास गांधी' नातवाला त्यातून सुटका कशी मिळाली हेही तपासण्याजोगे आहे.

या प्रवासातून राजमोहन श्रीमंत झाला. कीर्तिमान तर झालाच. भारत पोखरू पहाणाऱ्या परकीय सत्तांना भरल्या कुटुंबातला मातब्बर माणूस मिळाला. मग त्यांचे गोडवे गावयास आरंभ झाला.

मॉरल रीआर्मामेंटची आजची वास्तू ही केवळ वरच्या पैशातून निर्माण झाली आहे असे नव्हे तर अमेरिकेने या चळवळीवर खास मेहरबानी केली आहे. कम्युनिस्टांविरुद्ध आम्हालाही लढावयाचे आहे, पण ते या भाडोत्री अमेरिकन एजंटाकरवी नाही. आमचे राज्यकर्ते नादान असतील जर ते शक्य झाले तर आमच्या बळावर आम्ही बदलू. ते अमेरिकेच्या दातृत्वाने किंवा कम्युनिस्टांच्या गुंडगिरीमुळे आम्ही बदलू इच्छित नाही. भारत ही आम्ही अमेरिकेची आणि कम्युनिस्टांची साठमारी खेळली जाणारी मैदाने होऊ देणार नाही.

हिरालालची मुले परत आली ती वापाचे उणे काढत. राजमोहनच्या तालमीत ती चांगली तयार झालेली होती. मुलाचे शिक्षण न होता त्यांच्या आयुष्याची चार मौल्यवान वर्षे खोट्या थापाथापीत राजमोहनने व्यर्थ घालविली म्हणून हिरालाल तक्रार करू लागला. त्यावर उतारा म्हणून गौरी– हिरालालची धोरली मुलगी त्यालाच शिकवू लागली. गौरीप्रमाणेच सारी मुले आईबापाशी बदलून गेली. त्यांची भावडी प्रेमळ दुनिया मोडून गेली. राजमोहनने नवे गुलाम तयार केले,

म. १२ दा. १७९८२ ५१

अखेरी बऱ्याच वादानंतर राजमोहनने मुलांना शाळेत घालण्याची कबुली दिली. पण तो हलकेच म्हणाला, 'हिरालाल, तुमचा देव एवढा सामर्थ्यशाली नाही. (हिरालालच्या भाषेत पॉवरबाज) तेव्हा तू येशूपुढे माथा लववीत जा अन् मी सांगतो ती प्रार्थना कर. हिरालाल अडाणी नाही. गांधीच्या स्पर्शाने व जागृतीने तो शहाणा झाला आहे. त्याने राजमोहनचा कावा ओळखला. राजमोहन आणखी पुढे म्हणाला, 'मी सुद्धा रोज येशूची प्रार्थना करतो आणि मला तो आदेश देतो. येशू माझ्यावर प्रसन्न आहे–'

राजमोहनची ही येशू–प्रशस्ती चांगली दोन महिने चालू होती, पण हिरालालचे मन भावत नव्हते. त्याला पैशाचा मोह दाखविण्यात आला, पण तो बदलला नाही. हिरालालला साऱ्या युरोपभर हरिजन पुढारी म्हणून हिंडवून आणले होते. त्याची चौकाचौकातून व्याख्याने झाली होती, फोटो आले होते, राष्ट्राध्यक्ष झाकीर हुसेनबरोबर त्याचे फोटोही निघाले होते. थोडक्यात हरिजन म्हणून त्याचा उपयोग व्हायचा तो झाला होता. त्याच्या मुलांचा वापर झाला होता. राजमोहनचे खिसे भरले होते. आता तो श्रीमंत झाला होता. असला भिकार कार्यकर्ता पोसण्याचे त्याला कारण नव्हते.

एक दिवस हिरालालची मुले घरी परत आली. सामानाशिवाय. शिवलेल्या नव्या कपड्याशिवाय पुन्हा पूर्वीचे जिणे जगण्यासाठी.

कोवळी पिसे झडलेली ही पाखरे चार वर्षांनी आता घरटचात आली होती. आई–वापांच्या उबेत आली होती. जगाच्या क्रूर खेळातून ती फेकली गेली होती.

शाळा त्यांचा स्वीकार करू शकत नव्हत्या.

ती तशीच घरीच वसून होती. अनंत तऱ्हांनी प्रयत्न करून हिरालालला राजमोहन आता थांग लागू देत नव्हता. ज्या चिमण्या जिवांचा खेळ करून त्याने सोन्याची लंका बांधली त्या सोन्याचे दर्शन आता दुर्लभ झाले होते.

हिरालाल आपली ही कहाणी सर्व जगाला सांगणार आहे, हे कळताच एक दिवस राजमोहन हिरालालकडे भेटावयाला गेला. हिरालालचे तोंड गप्प करण्यासाठी त्याने ३०००० रुपये देऊ केले. पण पैशाने प्रश्न सुटण्याची वेळ गेली होती. हिरालालचे डोळे उघडले होते. आपल्यासारखीच पुष्कळांची फसवणूक होणार हे तो कळून चुकला होता.

त्या गरीब माणसाने ते पैसे नाकारले आणि तो राजमोहनविरुद्ध युद्धाला आज उभा आहे.

कदाचित तो युद्ध हरेलही, पण त्याची युद्ध करण्याची धमक और आहे. अमेरिकन राजसत्ता, देशोदेशीचे धनिक, इथलेच लाचारलेले, लाचावलेले उच्चभ्रू

राजमोहनचे आज भाट आहेत. एका गरीब अस्पृश्याची हाक कोणाला ऐकू जाणार !

पण हा देश गरीब असला तरी भिकारी असू नये, असे मानणारे आम्ही पत्रकार या माणसाच्या मागे उभे राहू.

महात्माजींच्या राजकारणाविषयी आमच्या मनात गंभीर शंका आहेत; पण त्यांचे हिंदुधर्मावरचे प्रेम वादातीत होते. त्यांना धर्मरहित समाज नको होता तर समधर्मी समाज हवा होता. आम्हाला एवढे अर्थात अपुरे वाटते. आजवर जे बाटवले गेले ते निश्चितपणे सत्तेने, लालचीने व पैशाने बाटवले गेले. ते ख्रिश्चन असोत वा मुसलमान असोत. त्यांच्यावर एकेकाळी जी जबरदस्ती झाली ती चूक आम्हाला दुरुस्त व्हावी असे वाटते. पूर्वीच्या धर्मात पुन्हा नेणे, हा जबरदस्तीने धर्म बाटवण्यापेक्षा निश्चित कमी प्रतीचा गुन्हा आहे. तो आम्ही करू म्हणतो. महात्माजींनी वर्णरहित हिंदुसमाजावर अनिवार प्रेम केले. ते अंतर्बाह्य हिंदू होते. त्या हिंदू महात्म्याचा अवलक्षणी नातू राजमोहन, हिंदू धर्मावर उठला आहे. देश विकायला निघाला आहे. परकीय आर्थिक आक्रमणाचा वाहक झाला आहे. हेरगिरीचे एक मोठे केंद्र त्याने पांचगणीस स्थापन केले आहे. त्याला गोंडस नाव दिले आहे. धनिकांना व श्रीमंतांना आतिथ्याने व श्रीमंतीने त्याने मोहात पाडले आहे. परदेशगमनाच्या मोहानं पुष्कळ तरुण एम्. आर. ए. च्या सापळ्यात गेले आहेत. आणि भोंगळ भाषणबाजी शिकले आहेत.

हा धोका आहे. हा देशद्रोह आहे.

हिरालालच्या निमित्ताने मॉरल रीआर्मामेंट आणि राजमोहन गांधी यांना जनतेसमोर चौकशीसाठी पेश केले पाहिजे.

समाजाचा बुद्धिभेद करणारी ही बांडगुळे समूळ कापली पाहिजेत.
हिरालालने हे जळते सत्य माझ्या दरवाज्यात आणून सोडले आहे.
त्याच्यासाठी मला उभे राहिले पाहिजे.
वृत्तपत्रात असल्याचा आनंद अशावेळी जागा होतो.
हिरालाल, तू घाबरू नकोस ! आम्ही तुझ्या पाठीशी आहोत.
महात्म्याच्या आशीर्वादाने तू काही स्वप्ने पाहिलीस.
त्याच्या नातवाने ती चोळामोळा केलीत.
काही हरकत नाही. न्यायाची घंटा आपण वाजवू या.
एक दिवस न्यायालयाला जाग येईल.
हिरालाल आम्ही आहोत... तुझ्यावरोबर.

दिवाळी १९६८

• • •

पत्रव्यवसाय हा जरी धंदा असला तरी पत्रकाराची वृत्ती हा मात्र एक महान् धर्म आहे. धंद्याला धर्माचे स्वरूप द्यावं, पण धर्माचा मात्र धंदा करू नये. जनताजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्रांती व्हावी, म्हणून पत्रकारांच्या लेखणीलेखणीमधून क्रांतिरसांच्या चिळकांड्या उडाव्यात आणि वृत्तपत्रे ही क्रांतिरसांची कारंजी व्हावीत ! जनताक्रांतीचा जयजयकार करणे हाच खरा पत्रकारांचा धर्म आहे ! '

–आचार्य अत्रे

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्यासारख्या अजस्त्र व्यक्तित्वाचा वलदंड माणूस कालपुरुषाने बघताबघता हस्तगत केला याबद्दल कोणीही विस्मयचकितच होईल. वास्तविक प्रत्यक्ष कालपुरुषालासुद्धां त्यांची लफडीकुलंगडी बाहेर काढण्याची धमकी द्यायला अत्रे हा माणूस कचरला नसता. 'मेरिलिन मन्रोवर झडप घालणारा बदमाष किंवा हेमिंग्वेच्या असामान्य प्रतिभेवर गोळी झाडणारा नरराक्षस' अशा शीर्षकाने खुद्द अत्र्यांनीच या काळपुरुषाची हवेलंडी उडवली असती. कळीकाळानंही शरण जावे असा आवेश आणि शब्दफेक अत्र्यांच्या लेखणीत होती. आणि म्हणून अत्र्यांची लेखणी आणि वाणी बंद पाडल्याशिवाय खुद्द काळालाही आचार्यांच्या जवळ जाता आले नाही.

पण आचार्य अत्रे यांच्या अक्राळविक्राळ व्यक्तिमत्वापेक्षा मला अंतःकरणपूर्वक आठवतात ते म्हणजे पुण्याच्या गल्लीबोळातून हिंडणारे अत्रे मास्तर–कवी केशवकुमार. त्या काळात अत्रे देखणे दिसत असत. हे थोडे अतिशयोक्तीचे वाटेल, पण अत्रे हे स्वरूपवान नसले तरी देखणे आणि भारून टाकणारे पुरुष होते. त्यांच्या त्या उंच्यापुऱ्या व्यक्तिमत्त्वात एक हळुवार अंतःकरणाचा, तसा भावडाच, श्रद्धाळू पुरुष तेव्हाही वसत होता आणि त्याचेच नाव केशवकुमार.

टीकाविषय झालेल्यांनाही हसण्यावाचून गत्यंतर नसावे अशी नर्म–विनोदी उपहासगर्भ टीका त्या विनोदी कवितातून नुसती शिगोशिग ओसंडते आहे. त्यानंतरच्या काळात अत्रे यांच्या वेछूट लेखणीने पुष्कळांवर शरसंधान केले आणि त्या लेखणीच्या धारेने सारेजण रक्तबंबाळ झाले. नाजुक गुदगुल्या करीत विरोधकांना ठार करणारे विडंबनकार अत्रे मात्र बघतावघता गायब झाले.

अत्र्यांच्या आयुष्यातला तो कवीचा कालखंड इतका चांगला होता की अखेरी त्यांच्या अनंत व्यापातूनसुद्धा त्यांचे हळवे कविमन सदैव हुंकारत असे. काही चांगले पाहिले की ते गलबलून जात आणि त्या चांगल्याचा ते इतक्या अतिरिक्त पद्धतीने पाठपुरावा करीत की पुसता सोय नाही. त्या अतिशयोक्त स्तुतीत त्या क्षणाला तरी कधीच खोटावा नसे. खरोखरीच अतिशय सामान्य व कलेच्या दृष्टीने अनुल्लेखनीय अशा पुष्कळ कलाकृतींना वा व्यक्तींना त्यांनी एवढ्या पदवीला नेऊन पोचवले की, अत्रे यांचा व्यासंग किंवा जाण ज्यांना ज्यांना माहीत असे त्यांना विस्मय वाटे. ती अतिरंजित भाषा पुष्कळदा नाटकी वाटे. पण तशी ती नसावी. कारण तेवढ्या क्षणापुरते त्या कलाकृतीवर वा त्या व्यक्तीवर ते बेहद्द लट्टू होत. लहान मुलाला रंगीत खेळणे मिळाल्यावर तेवढा क्षण ते मूल खरोखरीच त्या खेळण्यात बुडून जाते तसेच अत्र्यांचेही होई. म्हणून अत्र्यांच्या साहित्यिक दृष्टीबद्दल पुष्कळांच्या मनात शंका आहेत तशा माझ्या मनात मुळीच नाहीत. त्यांच्यातला रसिक आणि बालक जीवनातल्या प्रत्येक आनंदात बुडी मारण्यासाठी एवढा उत्सुक असे की समोर आहे तो सागर किंवा नद नव्हे तर ती विहीर किंवा डबके आहे याचेही ते भान विसरत असत.

आणि म्हणूनच अत्र्यांचे मृत्युलेख हे उत्तम ठरत असत. एकतर मृत्युलेख म्हणजे मूल्यमापन नव्हे. उलटपक्षी थोडे भडक पण भावस्पर्शी असे जीवनाचे ते दर्शन असते. अत्र्यांच्या मृत्युलेखातली माणसे खरोखरच अमर झाली. त्यांच्या आयुष्यातले मर्म खुद्द त्या त्या व्यक्तींनाही कळले नव्हते, एवढे अत्र्यांना कळले. पण त्या मागची प्रेरणा हीच असे. मृत्युलेख एवढ्या सहृदयतेने, उत्कटतेने आणि फुलून लिहिणारा साहित्यिक खरोखरी जगातही नसेल. अत्र्यांचा मृत्युलेख वाचून

अनेकदा चित्रगुप्तालाही त्या व्यक्तींच्या पापपुण्यांच्या हिशेबांची शंका पडली असेल, अशा तऱ्हेने ते मृत्युवश झालेल्या माणसाचा गौरव करीत असत.

अत्रे यांच्यातला सारा विनोद अलीकडे वाष्कळपणाकडे झुकला याचे मुख्य कारण हेच की त्यांच्या जीवनातले कारुण्य संपले. विनोदाचे सिमेंट कुठेतरी अश्रूचो ओली लाभली तर पक्के वसते. अलीकडे सुखाची, धनाची व कीर्तीची अशी काही वरसात त्यांच्यावर झाली होती की कारुण्य कोठेतरी अवघडून शिवशक्तीच्याच अंतर्गृहात लपले होते. अत्र्यांच्या जीवनात अनंतहस्ते वैभव आले आणि त्यांच्यातला सहृदय, सखोल, रडवणारा आणि हसवणारा असा एक विनोदी जीवनभाष्यकार ते घालवून वसले.

अत्र्यांच्या आयुष्यातले, तीन कालखंड होत. एक त्यांचे पुण्यातले साहित्यिक जीवन. दुसरे त्यांचे चित्रपटातील रगेल जीवन आणि अखेरचे मराठा कालातील त्यांचे आक्रमक आणि भव्य वृत्तपत्रीय जीवन. या तीनही कालखंडात अत्र्यांच्या लेखणीचो विविध रूपे होती. साहित्यिक म्हणून त्यांचा अस्त होत असतानाच पत्रकार म्हणून ते जन्म पावले आणि त्यांची खरी आठवण इतिहासाला नोंदावी लागणार ते ती पत्रकार म्हणूनच. एवढ्या व्यक्तिमत्वाचा अन् कर्तृत्वाचा पत्रकार या देशात तरी झालेला नाही हे सत्य नाकारून चालणारच नाही.

एका लेखणीच्या वळावर अत्र्यांनी हे सारे मिळवले. कोणा सासवड नावाच्या एका आडगावच्या कुग्रामातील हा सामान्य वुद्धीचा मुलगा. कोणतेही पूर्वसूत्र नसताना मास्तर होतो अन् चांगला मास्तर होतो. परदेश पाहून येतो. पण त्या आळणी अन् कळाहीन आयुष्याला कंटाळून एके दिवशी मखमली पडद्याआड येऊन उभा राहतो. मृतवत् रंगभूमीला आपण संजीवनी देऊ असे आव्हान देतो अन् ते यशस्वी करतो. पण तेही यश पचवून व अपुरे ठरवून मग कचकड्याच्या दुनियेत उडी घेतो. यशापयशाचा हिशेव केला तर त्यांची चित्रपटनिर्माता व दिग्दर्शक ही कारकीर्द काही यशस्वी नव्हे. पण लाखो रुपयांचा हिशेव करतानासुद्धा मराठी माणसाला झिंग येते तेथे हा माणूस हुंड्या मागून हुंड्या लिहीत सुटतो अन् त्या मानल्या जातात आणि मुंवईच्या झुलत्या दुनियेला हा वघता वघता आपलासा वाटतो हे अद्भुतच नव्हे काय ? त्या कालखंडात आपल्या लेखणीची कर्तवगारी अत्रे विसरले अन् म्हणून अडचणीत सापडले. ते पहात होते. व्यापारी. पण व्यापाराला लागणारा तसा तेढा हिशेव त्यांना माहीत नव्हता. त्यांनी पुष्कळांना वुडवले असेल पण त्या वुडवण्यात अडाणीपणाचा भाग मोठा होता. दुष्टपणाचा खचित नव्हता. अत्रे स्वतः वुडले. आणि त्यांनी पुष्कळानाही वुडवले. वाकी सारे वुडले पण अत्रे मात्र त्यातूनही वाहेर पडले. त्या कालखंडात अत्र्यांची माझी एक दोनदा गाठ पडली आहे. हा वलदंड माणूससुद्धा त्या काळात

पार खचला होता. आत्महत्त्येच्या गोष्टी वोलत होता. तसा सह्याद्रीसुद्धा एखाद्या-वेळी नाही का खचत. पण नियतीची तशी इच्छा नव्हती. तसे दैव अत्र्यांच्यावर नेहमीच प्रसन्न होते. सर्व वाजूंना अंधार व्हावा अशा वेळेलाच अत्र्यांना दैवाने हात दिला. त्यांच्या कर्तृत्त्वाला मैदान मोकळे करून दिले. अत्र्यांनीही कोणत्याही क्षणी कच खाऊन अशा संधीचा अपव्यय केला नाही. तें प्रत्येक साहसाला सामोरे गेले. मग दैवाला यश त्यांच्या पदरात ओतावे लागले.

चित्रव्यवसायात फटके खाऊन दैत्यासारखा सामर्थ्यसंपन्न माणूस कोसळणार तोच नियतीने त्याला हात दिला. किंवहुना अत्र्याना मदत करण्यासाठीच संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू झाली असे म्हणता येईल. अत्र्यांचे सारे गुण संयुक्त महा-राष्ट्राच्या या चळवळीत उजळून आले. त्यांच्या लेखणीची धार वाढली. त्यांच्या शब्दांना निराळेच ओज आले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे निदान पन्नास टक्के यश एकट्या अत्र्यांच्या ओंजळीत खुशाल टाकावयास हवे. लोकशाहीत निर्णय फिरवण्यासाठी वृत्तपत्रांचा केवढा उपयोग होऊ शकतो हे अत्र्यांनी तेव्हा सिद्ध केले.

जर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ न होती तर अत्रे हे साहित्यिक म्हणूनच जगले असते आणि तेवढेच मानसन्मान त्यांना मिळाले असते. पण या चळवळीने त्यांना राजकीय पुढारीपणही मिळाले. त्या वाणीतला प्रसाद गेला पण तेथे आवेश आला. त्यांच्या वाणीतला युक्तिवाद गेला पण तेथे चेतवणारा अग्नी आला. अत्र्यांना नवतारुण्यच लाभले. त्यांचा कायाकल्पच झाला. एखाद्या विशीतल्या तरुणाला शोभणारा उत्साह–आग्रह त्यांच्या वाणीत. वा लेखणीत प्रकट होऊ लागला.

अत्र्यांचा हा कालखंड म्हणजेच नव्या महाराष्ट्राची सुप्रभात. मराठी माणसाला शिवाजीनंतर दिल्ली दरवारी मिळालेले दुसरे यश. अत्र्यांच्या लेखणीतील भवानी तलवारीची धार आणि त्यांच्या वाणीतून उसळणारी समर्थ वाणी यानी पुन्हा एकदा सारा महाराष्ट्र ढवळून निघाला. वृत्तपत्रसृष्टीतला हा कदाचित जगातला विक्रम ठरावा. खिशात पाच दिडक्या नसणाऱ्या एका लेखकाच्या लेखणीने एका राज्याची निर्मिती व्हावी, एक समर्थ पत्र उभे रहावे, पाचपन्नास लाखांची 'लोक-शक्ती' उभी रहावी हा खरोखरच अजव पराक्रम म्हणावा लागेल. जोपर्यंत महा-राष्ट्र राज्य अस्तित्त्वात आहे तोपर्यंत तरी अत्र्यांचे स्मरण अपरिहार्य आहे.

याच कालखंडात अत्र्यांना आपल्या लेखणीची खरी ताकद समजली. त्यांनी त्या लेखणीला हवी तशी रावबली. लोकांनी इतके प्रेम अन्य कोणाही पत्रकारावर केले नाही. आतुरतेने वाट पहावी असे 'मराठा' एवढे लोकप्रिय पत्र यापूर्वी कधी निर्माण झाले नाही. पुढे होईल अशी आशा नाही. कोणाही पत्रकाराची या जेष्ठतम पत्रकारापुढे क्षणभर तरी मान लवलीच पाहिजे. लेखण्या सोडा आणि तलवारी

हाती घ्या हा मंत्र सांगणाऱ्या सावरकरांच्या तत्त्वज्ञानाचा अर्थ समजावून घेऊन अत्र्यांनी लेखणीचीच तलवार केली हे कसे बरे विसरावे.

अत्र्यांना गवसलेले हे नवे सामर्थ संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर मात्र बेहिशेबी वापरले. जें अत्र्यांना शरण जात, ते त्यांच्या शागीर्दीत जमा होत. ते सोडून अत्र्यांनी मग कुणाचाच मुलाहिजा ठेवला नाही. दुखविल्या गेलेल्या माणसांच्या अखेरच्या विश्वासांचीच त्यांना ओढ लागली. लेखणीला तलवारीचे स्वरूप न राहता पुढे पुढे खाटकाच्या सुरीचे स्वरूप येऊ लागले. महाराष्ट्रात मी-मी म्हणणारे टीकाकार, साहित्यिक, विद्वान अत्र्यांना घाबरू लागले. त्यांच्या सुमार नाटकावर खोट्या स्तुतीचे रकाने भरू लागले. अत्र्यांच्या पूजेसाठी ह्या साऱ्या क्षुद्र माणसांची रीघ लागू लागली. अत्रे पुण्यवान नव्हते. त्यांनी जीवनातले सर्व सुखस्वाद अतिरिक्त भोगले होते–कसलाही मुलाहिजा न ठेवता, तरीही ही समाजावली वास्तविक सामान्य पण पदवीने मोठी माणसे थोड्या पापासाठी अत्र्यांवर चवन्या ढाळू लागली. आणि वघतावघता अत्र्यांच्या सामर्थ्याला राक्षसी सामर्थ्याचे स्वरूप प्राप्त झाले.

आपली राक्षस या शब्दाची कल्पना थोडी चुकीची आहे. ज्याच्या सामर्थ्याचे भय वाटते तो राक्षस. राक्षस दुष्ट असतात आणि म्हणून देव त्याचा पराभव करतात हे काही खरे नव्हे. राक्षस हा उग्र प्रवृत्तीच्या सामर्थ्याचा आविष्कार आहे. सम्राट चंद्रगुप्ताचा मंत्री हाही 'अमात्य राक्षस' होता. ज्याच्या वृद्धीची, शक्तीची भीती तथाकथित पाप्यांना, भेकडांना किंवा दुर्बलांना वाटते तो खरा राक्षस. सर्व राक्षस वाईट असतात असे थोडेच आहे. घटोत्कच किंवा मयासुर हेही असुर किंवा राक्षसच होते. अत्र्यांचे जीवन हेही अशा भयप्रद सामर्थ्याचे अंग बनू पहात होते. अत्र्यांच्या मृत्यूने सचिवालयात आनंदीआनंद झाला असेल. अत्र्यांच्या दप्तरात प्रत्येक मंत्र्याच्या खाजगी कुलगडयांची खास नोंद असे. त्यासाठी अत्रे स्वतः पाण्यासारखा पैसा खर्च करीत. शिवाय एकाची वदनामी करण्यासाठी दुसरा मंत्री आपणहून अत्र्यांना सहकारी मंत्र्याची सारी कुलंगडी कळवीत असे. अत्र्यांचे संहारक सामर्थ्य अशा या अमूल्य माहितीमुळे वाढले होते आणि अत्रे कालवश झाल्यामुळे सर्व मंत्र्यांना एका विचित्र अशा सापळ्यातून अवचित सुटका झाल्यासारखे झाले असणार.

एक पत्रकार सत्ताधिष्ठित अशा पापी माणसांवर हुकूमत ठेवू शकतो या एकाच गुणावर मी अत्र्यांच्या पुढे नम्र आहे. शासनाला कापावयास लावणारे अत्र्यांसारखे अन्य व्यक्तिमत्व आता नाही ही माझ्या मनातली खरी व्यथा आहे. मुद्रणस्वातंत्र्यावर नुसती व्याख्यानबाजी करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की स्वातंत्र्य ही भीक मागून मिळवावयाची गोष्ट नव्हे. ती भांडून किंवा ओरबाडून मिळवण्याची

गोष्ट आहे. अत्र्यांनी सर्वसमर्थ अशा या किडलेल्या शासनाला आपल्या लेखणीच्या धारेवर खेळवत ठेवले होते. आणि म्हणून पत्रकार म्हणून जगत असताना अत्र्यांचे हे ऋण मान्य करणे म्हणजे पत्रकार या पदवीचा गौरव करणे होय असे मला वाटते.

आम्हाला हवे आहेत असे निर्भय, बलदंड आणि सामर्थ्यशाली पत्रकार. लाचार अशा या दुनियेत एक दिवा झगझगत होता. एकतरी उंच मानेचा माणूस असा जगत होता की ज्या मानेपुढे सारी सत्ता, सारी संपत्ती, सारी लोकशक्ती नम्र होत होती. तिथे मला स्वतःलाही नम्र होताना मुळीच अवघडल्यासारखे वाटत नाही. मात्र असे जरूर वाटते की या अजस्त्र व्यक्तिमत्वामागचे कवीचे काळीज मात्र कधीच संपावयास नको होते.

गमतीची गोष्ट अशी की अत्र्यांनी सर्व प्रकारची पापे करूनही पापी माणसांना ते कर्दनकाळासारखे वाटत. कारण अत्रे जसे होते तसे लोकांनी पत्करले होते. त्यांच्या दुर्गुणांनाही लोकगंगेने पवित्र केले होते. आणि त्यांच्या रूपाने सत्याचा वाली अन् अनृताचा वैरी म्हणून उभा ठाकलेल्या 'प्रल्हादासुरावर' लोकांनी मनोमन प्रेम केले. ज्यांच्या उत्कर्षाआड त्यांचे ब्राह्मण्य आड आले नाही अशा महाराष्ट्रात तीन व्यक्ती आहेत. कॉम्रेड डांगे, सोनोपंत दांडेकर आणि आचार्य अत्रे. बहुजनसमाजावर कडाडून हल्ले करूनही ते त्या समाजात अप्रिय झाले नाहीत याचे एकच कारण. हा माणूस आपल्यावरील सर्व अन्यायाविरुद्ध प्राणपणाने झगडेल याविषयी लोकांची खात्री होती.

वृत्तपत्रकार म्हणून प्रत्येकाला वाटते की आपला शब्द नेमका टीकाविषय झालेल्या व्यक्तीच्या मर्मावर जाऊन पडावा. प्रत्येकाजवळ 'अत्रे' व्हावे असे स्वप्न असते. आता त्या स्वप्नातले 'अत्रे' गोठून गेले तरी ते स्वप्न तसे ओले राहील. कोणाही पत्रकाराला निर्भयतेने काही अन्यायाविरुद्ध लिहावेसे वाटेल तेव्हा त्याने खुशाल अत्र्यांची आठवण करावी. आपोआपच त्याच्या लेखणीला धार चढेल. माजलेल्यांचा माज उतरवणारी ती अत्र्यांची शक्ती पाठीवर हात ठेवून त्या पत्रकाराच्या शब्दात मंत्रसामर्थ्य आणील. वृत्तपत्रकारांच्या दैनंदिन जीवनाला प्राणभूत असणारे पत्रकार अत्रे आता सोडून गेले तरी माझी खात्री आहे की जेथे जेथे पुरुषसिंहांची छाती हवी, जेथे जेथे शब्दमाध्यमातून दुंदुभीचा स्वर हवा जेथे जेथे मर्मभेदक शरसंधान हवे तेथे तेथे आपले अजस्त्र व्यक्तिमत्व घेऊन अत्रे हजर राहतील. आज जरी ती प्रचंड मुलूखमैदान तोफ निस्तब्ध झाली असली तरी अजूनही त्या तोफेचा तो गगन भेदणारा आवाज विरलेला नाही. कदाचित तो दीर्घकाळ विरणार नाही.

त्या गरजणाऱ्या मुलूखमैदान तोफेमुळे थरथर कापणारे ते बगळे आता क्षण-

भर निश्चित झाले असले तरी जेव्हा अन्यायाची परमावधी होईल, सत्ता माजू लागेल आणि किडलेले सडलेले शासक स्वार्थांध होतील तेव्हा त्या हिरण्यकश्यपूच्या नाशार्थ कारण झालेला प्रल्हाद जन्म पावेल. आणि जनसिंहाला जाग आणील. लोक रस्त्यावर ओवसाओवसी रडत आहेत आणि तिकडे सचिवालयात. ...आज आनंदी आनंद आहे.

दिनांक २२ जून १९६९

● ● ●

नाते तेंडुलकरांशी : तीस वर्षांचा जमाखर्च

परवा भारतीय नाट्यसंघाने विजय तेंडुलकरांच्या शांतता कोर्ट चालू आहे या नाटकाला उत्कृष्ट ठरवून पाच सहस्र रुपयांचे पारितोषिक दिले. या तेंडुलकरांच्या यशावद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना तेंडुलकरांची अन् माझी ओळख केव्हा झाली तेही आपोआप आठवले.

त्या गोष्टीला सुमारे ३० वर्षे झाली असतील. कदाचित थोडी जास्तच. विजय तेव्हा शाळकरी मुलगा होता. गोरा. भावुक डोळ्याचा. वास्तविक माझा स्नेह होता तो त्याच्या वडिलाशी. म्हणजे धोंडोपंत तेंडुलकरांशी. त्यावेळेस पुण्याच्या लक्ष्मीरोडवर लकडीपुलानजीक माझे ग्रामोफोन रेकॉर्डस् भाड्याने देण्याचे दुकान होते. पुणेकरांचे उद्योग हे असलेच दरिद्री असतात. पण त्यावेळेस माझे वय होते सतरा. मी मॅट्रिकच्या वर्गात असेन. ते दुकानही नीट चालत नव्हते. शेजारी तेंडुलकरांच्या वडिलांचे पुस्तकाचे दुकान होते. तेही नीट चालत नव्हते. म्हणजे ते चालतच नव्हते. स्वाभिमानापायी चांगली नोकरी सोडून त्यावेळेस ते पुण्यात चाचपडत होते. समानधर्मी भेटल्यामुळे आमच्या दुकानातल्या जागेत पोटभाड्याने त्यांनी आपले दुकान आणले. दुकानाचे आठ रुपये भाडेसुद्धा आम्हाला तेव्हा जास्त झाले होते. धोंडोपंतांचे पुस्तकाचे दुकान तेथे आल्यावर ना. ह. आपटे तिथे येऊ लागले. आणि असाच एक दिवस विजयही तेथे आला.

वास्तविक विजय माझ्यापेक्षा फार लहान नाही. पण काही वेळा चारदोन वर्षांनी मोठा असणारा माणूस वयाने फार मोठा वाटतो. विजयला मी तसा वाटत

असेन. माझी स्मरणशक्ती जर चूक नसेल तर त्यावेळी नाटककार ना. वि. कुलकर्णी यांचा मुलगा व चित्तरंजन कोल्हटकर हेही त्याच्या समवेत असावेत. काहीही असो, वाङ्मय प्रांतात खुडबुड करणाऱ्या माझ्यावद्दल विजयला कुतूहल होते आणि तो त्यामुळेच माझ्या पाठोपाठ येत असे. त्याने माझे एक अर्धेकच्चे नाटक आपल्या सुवक हस्ताक्षरात मला लिहून दिलेले स्मरते. पण त्या कालखंडात विजय लेखक होईल असे मात्र मला तरी वाटले नाही.

शिक्षणावावत त्याची आवाळ चाललीच होती. घरी अठराविश्वे दारिद्र्य होते. थोरला भाऊ आपला मार्ग स्वतंत्रपणे काढीत होता. म्हणजे त्याचा त्याच्या कुटुंवाला उपयोग नव्हता. घर मोठे होते. खरे म्हणजे सारे काही निरुत्साहजनक होते. अर्धवट शिक्षण टाकून तेंडुलकर पोटाच्या उद्योगाला लागण्यासाठी मुंवईला आले.

का कुणास ठाऊक या प्रचंड महानगरीत एक एकाकी तरुण येऊन पडला. मिळेल ती कामे करू लागला. सुदैवाने छापखाने, प्रकाशने मासिके आणि वृत्तपत्रे यांच्यातच त्याचा पोटार्थी उद्योग झाला. आणि हळूहळू त्याच्यातून एक कळी उमलू लागली. दारिद्र्य भोगूनही त्या जखमा त्याने चेहऱ्यावर कधी वागवल्या नाहीत. त्याचे प्रदर्शन केले नाही. ते त्याच्या रक्तातही नव्हते. मुंवईच्या भकास एकाकी जीवनात त्याला त्याच्या साहित्याची सूत्रे सापडू लागली. वसुधा मासिकाचे संपादन त्याच्याकडे आल्यापासून त्याची वाटचाल झपाट्याने होऊ लागली.

त्याच्या व माझ्या त्या काळातच परतभेटी होऊ लागल्या. माझे 'प्रदीप' हे साप्ताहिक वंद केले त्यालाही खूप वर्षे झाली होती. आणि अनेक यशे-अपयशे स्वीकारीत मी मुंवईत नोकरीला आलो होतो. मला वाटते, त्याचे 'मधल्या भिती' हे नाटक त्यावेळेस तो लिहित होता. त्यापूर्वी त्याची दोन नाटके...कदाचित तीन नाटके रंगभूमीवर आलेली होती. विजया जयवंत-(खोटे-मेहता) यांनी त्याचे श्रीमंत नाटक दिग्दर्शित केले. 'श्रीमंतापासून शांतता'पर्यंत तेंडुलकराचा जो प्रवास झाला त्यात महनीय असे स्थान विजयावाईना आहे. त्यावेळेस विजयावाई आणि विजय यांच्यावद्दल मी काहीसे ऐकलेही होते. मला तेव्हा वरे वाटले होते.

कारण त्यांनाच विजयचा सूर नेमका सापडला होता आणि त्यांच्याच तालमीत पुढे आलेल्या रंगायनाच्या कलावंतांनाही तो आज सापडलेला आहे. दाराच्या फटीत सापडलेल्या झुरळासारखी मानवी मनाची पुष्कळदा अवस्था होते. जीव जात नाही, पण अर्धमेला होतो. सुटका अशक्य असते. हे अर्धमेले आयुष्य वाह्यतः हसतमुखाने जगावे लागते. हृदयातून रक्त ठिवकत असते. पण लोकांचे लक्ष रंगीत अशा पंखाकडे जाते. मानवी जीवनाविषयीची तेंडुलकरांची अशी काहीशी दृष्टी असावी. त्यांच्या नाटकातील झगडा दोन व्यक्तिमत्वामधला नाही-दोन समाजा-

मधला नाही–दोन वर्गातला नाही. त्याचा झगडाच मुळी माणूस आणि क्रूर निसर्ग यातला आहे. आणि म्हणून तो कानेटकर–कोल्हटकरांसारखा भडक असू शकत नाही. त्यांच्या नाटकात व्यक्तिगत अभिनयापेक्षा रंगमंचावरचा प्रत्येक माणूस आणि त्या भोवतालची नैसर्गिक शक्ती यांचा संमिश्र मूड निर्माण होणे अगत्याचे असते. विजयाबाईंनी तो मूड नेमका टिपला आहे. म्हणूनच बाजारू पद्धतीने वा कोणाच्या सोयीसाठी लिहिलेली तेंडुलकरांची नाटके नेहमीच खालच्या पातळीवर जातात. रंगायन हे तेंडुलकरांचे घर आहे–माहेर आहे.

सांगत होतो ते त्यांच्या 'मधल्या भिंती' या नाटकाबद्दल. हे नाटक त्यांनी मला न्यू इंडिया इन्शुअरन्स कंपनीतल्या धुळीने माखलेल्या तळघरात वाचून दाखवले. तेव्हापासून पुढच्या दोन तीन नाटकापर्यंत माझे त्यांचे पुष्कळच जाणे येणे होते. त्यांच्या गप्पांना ठराविक वेळ नव्हता किंवा आकार नव्हता. त्यांच्या नाटकाचे शेवट मला कधीच आवडलेले नाहीत. पण ती चूक त्यांची नाही. माणूस आणि निसर्ग यांच्यातील झुंजीला अखेर कोठे असते. म्हणून त्यांच्या सर्व नाटकाच्या अखेरी ही निरूपणे वाटतात. नाटकाचा मतितार्थ स्पष्ट करणाऱ्या पुरवण्या वाटतात आणि तेंडुलकरही त्याबद्दल नेहमीच साशंक असतात, 'चिमणीचे घर हाते मेणाचे' या नाटकाचे नऊ प्रयोग झाले आणि प्रत्येक प्रयोगाचा शेवट रंगभूमीवर निराळा घडला. पण म्हणून तो प्रत्येक शेवट एकच आक्रोश करीत होता की ही लढाई एकाकी आहे, या लढाईत अखेरी निसर्ग जिंकणार आहे. पण त्या लढाईवाचून पर्याय मात्र नाही.

माझ्याकडून माझ्या मुंबईच्या जीवनात त्यानी थोडेफार लिहून घेतले. 'सुंदर मी होणार' वरती मी वसुधात परीक्षण लिहिले, आणि पु. ल. चा दीर्घ-कालीन रोष ओढवून घेतला. मध्यंतरी विजय एका राहण्याच्या जागेच्या अडचणीत आला. मला वाटते मी स्वतःलाच जागा हवी अशा हिरीरीने जागा शोधली आणि खारला त्याला रहायला नेले. तेंडुलकरांच्यातल्या कलावंतावर मी नेहमीच प्रेम करीत आलो आहे. त्यांच्यातला माणूस कित्येकवेळा मला स्वार्थी वाटतो. कदाचित त्यांचे गणित कच्चे असल्यामुळे त्यांचे हिशेब त्यांच्या लेखी बरोबर असतीलही. पण म्हणून ते हिशेब पुष्कळदा खरे नसतात. त्याला मतभेद सोसतात–पण ते दोपांपुरते. अन्यथा त्याच्यावरची टीका त्याला सोसत नाही. त्या टीकेने त्याच्यातला माणूस खवळतो. आणि कित्येकदा फार खालच्या पातळीवर जातो. मध्यंतरी बाळ गाडगीळ यांनी तेंडुलकरांची–मला वाटते 'मी भवभुती' या लेखात थोडी मस्करी केली. पण त्या लेखामुळे तेंडुलकर इतके खवळले की त्यांनी बाळ गाडगीळांच्यावर फार पोरकट हल्ला केला. आणि ते वैर अजूनही त्यांच्या मनात आहे. वीणेसाठी

निमंत्रणानुसार गाडगिळांनी लिहिलेल्या एका लेखात तेंडुलकराची त्यानी मस्करी केली होती. तो लेख आपली मैत्री खर्ची घालून त्यानी ठोमरे याना छापू दिला नाही.

अगदी परवाचेच उदाहरण घ्या ना. माधव मनोहरांनी 'शांतता'च्या चौर्याचा गुप्तस्फोट केला. वास्तविक त्यावर तेंडुलकरानी काही लिहायचे नाही. कारण चौर्यकर्म वादातीत होते. समीक्षकापेक्षा ललित लेखक वाङमयात दीर्घकाळ टिकणार असतो आणि म्हणून तेवढचापुरते खळबळ उठवणारे टीकालेख त्याने फार उरावर घेऊ नयेत. तेंडूलकर माधवराव मनोहरांच्या टीकेला उत्तर द्यायला सरसावले. पण आपल्या लेखाला प्रत्युत्तर मात्र देऊ नये अशी मला अट घातली. अर्थात ती मानणे वृत्तपत्रनीतीत मला पटतच नव्हते. ही अटही अन्यायजनक आणि त्याचे उत्तरही खोटे होते. मेलेल्या माणसांचे हवाले देण्यात मतलब नसतो. निदान त्याना स्मरून तरी खरे सांगावे. पण तेही त्यांनी केले नाही. परिणाम असा झाला, त्यांचे एक दोस्त श्री. प्रभाकर परांजपे यांनी त्यांचा खोटेपणा उघडकीला आणणारे पत्र पाठवले ते मी छापले. मग तेंडुलकरातला माणूस खोटा पडला. याचा राग म्हणून त्यांनी प्रभाकर परांजपे यांची नालस्ती करणारी पात्रे स्वत: लोकसत्तामधल्या स्तंभात निर्माण केली. लोकसत्ता हे त्याचे खासगी पत्र नव्हते. पण परांजप्यांच्या वरचा राग व्यक्त करायला त्यांनी तो स्तंभ वापरला. अखेरी त्याबद्दल लोकसत्तेच्या संपादकांना हस्तक्षेप करून क्षमा मागून तेंडुलकरांना आवरावे लागले. परांजपे यांचे ते पत्र मी छापले म्हणून तेंडुलकर मी केलेले सर्व काही विसरून आता माझ्याशी बोलत नाहीत. समोर भेटले तर पलिकडच्या फूटपाथवरून जातात. खरे म्हणजे हे सारे पोरकट आहे, हसू येणारे आहे. पण हसू येत नाही. गेल्या तीस वर्षांहून अधिक काळ एकत्र येऊन मी तेंडुलकराना ओळखू का शकलेलो नाही ? तेंडुलकर कलावंत म्हणून यशाची एक पायरी चढतात आणि माणूस म्हणून एक एक पायरी खाली उतरत आहेत. हे चांगले नव्हे. माझ्या मनात अनेक प्रसंग गर्दी करतात. वस्तुत: लक्षावधी रुपये गमावून एका रेकार्डकीपरची नोकरी करावयाच्या अवस्थेत न्यू इंडियात मी आलो. माझी ऐपत ती काय ! पण त्यातही कलावंत तेंडुलकरांच्या हाकेला मी दाद दिली. पुढे मुंबईतल्या हौशी नाटचसंस्थांशी फाटफूट झालेल्या स्थितीत रंगमंच (याच संस्थेचे पुढे रंगायन झाले) स्थापना केवळ तेंडुलकरांसाठी मी केली. कारण स्थापनेच्या वेळी विजयाबाई कलकत्त्याला होत्या. आम्ही ' चिमणीचे घर' हे नाटक सादर केले. त्यासाठी मीच सारे पैसे खर्च केले. त्यात घातलेल्या रकमेपैकी काही अजूनही रंगायनकडून येणे आहेत. गंमतीची गोष्ट अशी की पुढे रंगायनचा इतिहास लिहिला गेला तेव्हा तेंडुलकरांचे माझे संबंध ठीक असूनही त्यात माझा कोठे उल्लेखही केला गेला नाही. दु:ख खरोखरीच पैसे गेल्याचे नाही, कारण ते पैसे जात होते तेव्हा मी फार मोठा आनंद उपभोगत होतो. कसल्याही गोष्टीची

जमवाजमव नेहमीच सुंदर असते. खूप उमेदी असतात. नवी तरुण माणसे भेटतात. आणि आपली अपेक्षा नसल्यामुळे त्यांचे वेत, मनोरथ यातील चैतन्य तुम्हाला सुखवू शकते. त्या इतिहासात माझे नाव नव्हते तेही एका परीने बरे झाले. कारण पुढे मी मुंवईही सोडली. पुण्यात नव नाटयाचा न नाटयाचा...वगैरे अंधारच आहे. आणि उगाचच इथले लोक मला चिकटले असते. एकाग्रतेने धंदा करणाऱ्याला नाटकाचे वेड हा मोठा शाप आहे. ते वेड फार वेळ खाते.

जुना इतिहास चांगल्या आठवणींवरोवर शल्ये मागे ठेवतो. सर्व इतिहास घडूनही 'सोवत'चे संपादन तेंडुलकरांना मी वहाल केले होते. पण 'किर्लोस्कर'चा मुंवई अंक संपादन करण्यास मिळाल्यामुळे करतो म्हणून पत्करलेले काम त्यांच्याच्याने लांबू लागले. एक परीने तेही बरे झाले. एरवी मलाही संपादक म्हणून बरे वाईट नाव मिळाले ते मिळालेच ना. नंतर ते सोवतमध्ये लिहिणार असे ठरले. त्यांनी सोवतचे पहिले पाच अंक वॉम्बे कॉलिंग सदर लिहिले. खरोखरीच ते चांगले होते. तेंडुलकरांचे लेखन नेटके, सुटसुटीत आणि शाश्वत अशा सुखदुःखाची चिकित्सा करणारे असते. मोवदल्याचे मजवर सोपवले होते. ते मान्यही झाले. पण त्याच सुमारास मी देत असलेल्या मोवदल्याच्या दुप्पट मोवदला मिळताच मला कोणतीही पूर्वसूचना न देता सोवतचे लिखाण वंद करून ते 'माणूस'मध्ये लिहू लागले. असे मैत्रीला न शोभणारे व लेखनपेशाला न शोभणारे ते अनेकदा वागत आलेले आहेत. दिवाळी अंकाच्या गोष्टीच्या वावतीतला पत्रव्यवहार छापण्याजोगा आहे. त्यासंबंधी जी पत्रोत्तरे झाली ती फार दुःखदायक होती. ज्या एका कलावंतावर मी अनेक वर्षे मनोमय प्रेम केले त्या साऱ्या प्रेमाला धक्का देणारी होती.

हे जरी खरे असले तरी अजूनही कुठेतरी खोलवर तो भावूक डोळ्याचा–अनवाणी चालणारा–विटक्या हाफपॅन्टमधून मजकडे येणारा विजय माझ्या अंतःकरणात शिल्लकच आहे. कुठेतरी वयाचा विसर पाडून मला लिहिते करणारा तेंडुलकर माझ्या लक्षात आहे. एखाद्या अनोख्या दुःखावर झेप घेणारा एक हळवा राजपुत्र माझ्या मनासमोर आहे. रात्ररात्र हट्टीपणाने प्रुफे तपशीत राहणारा उद्योगी तेंडुलकर माझ्या मनात आहे. पुनश्च अनुवादातसुद्धा वाचनीयता निर्माण करणारा एक सहसंपादक अजून रेंगाळतोच आहे. पण ह्या सर्वात उंच उंच असा एक प्रतिभासंपन्न कविमनाचा नाटककार–कथाकार–शब्दचित्रकार विजय तेंडुलकर मला व्यापून टाकतो आहे. हर्षवेडापलीकडे मनाची एक अवस्था असते. त्या अवस्थेशी ज्याचे नित्याचे नाते आहे असा एक कलावंत मला व्यावहारिक रागलोभ विसरायलाच लावतो यात मी सुखी आहे.

तेंडुलकरांच्या भाग्याचे मला कौतुक आहे. कलावंत म्हणून मिळालेल्या सन्मानाचे मला कौतुक आहे. देवाने सर्व काही नेले तरी अशा तरुण माणसावर

काही उणिवांबद्दल रागावण्यापेक्षा त्याच्यातल्या कलावंताशी नाते जोडण्याइतपत रसिकता त्याने मजजवळ ठेवावी एवढी आशा आहे. भले तेंडुलकरांनी इंग्रजी कल्पना वापरल्या तरी मला त्याचे सोयरसुतक नाही. कुठेही तेंडुलकरांचे नवे नाटक लागू दे. मी ते उत्सुक डोळ्यांनीच पाहीन. अखेरी मीही एक सामान्य प्रेक्षक आहे. बाकीची सर्व नाती तेव्हा फजूल असतात. ते माझे नाते अखंड राहो एवढीच इच्छा आहे.

दिनांक १५ फेब्रुवारी ७०

● ● ●

ना. ग. नारळकर

राजकारणी पुरुष, रंगभूमि–चित्रपट वा संगीत सृष्टीतले बादशहा किंवा फार तर साधूसंत यांच्या आख्यायिका लोक सांगतात आणि ऐकतात. या कहाणीत ना आख्यान–ना आठवणी–ना हरवलेली सुखदुःखे. ही आहे एका मास्तराची गोष्ट.

मॅट्रिकचे वर्ष होते. पुढची स्वप्ने आयुष्य चवदार करीत होती. कॉलेजच्या रंगीबेरंगी जीवनाच्या दरवाज्यातून जे दिसे त्याने अस्वस्थता वाढे. बापट, नगरकर वगैरे मंडळी अभ्यास मंडळात जात, आम्ही संघात जाऊन कंटाळून परतलो होतो. अंग शिवशिवत होते. काही तरी करावे वाटत होते. सामर्थ्याची जाणीव उत्पन्न झाली होती. कधी कधी फार मोठी, मजबूत, कर्तबगार माणसे पाहिली की उत्साह आटत असे. पण सर्वसामान्यतः अंगात मस्ती आली होती. आणि त्या मस्तीतच तो प्रसंग घडला.

आमची शाळा पुण्यात नमुनेदार होती. त्या शाळेत एक नवे हेडमास्तर आले होते. त्यांच्याबद्दल आम्ही खूप ऐकले होते. त्यांच्या शिकवण्याच्या, प्रेमळपणाच्या अनेक गोष्टी ऐकून आमचे कुतूहल जागे झाले होते. शाळा रोज नवे रूप घेत होती. आज काय नव्या मोऱ्या झाल्या. मोठे पूर्ण उंचीचे आरसे आले. रोजच्या बातम्या लावण्यासाठी बोर्ड आले. भोरकर–फलटणकरांची मुले चपराश्याने आणलेल्या डब्यातून खास खोलीत मधल्या वेळेस खायची आणि आम्हा कारकुंड्यांच्या मुलांना

हिपुटी करायची. तेही थांबले. प्रार्थना अधिक वक्तशीर झाली. शाळा एकंदर सुंदर झाली. मुलांना आवडू लागली.

आम्हाला प्रा. म. शं गोडबोले यांच्यासारख्या खाष्ट हेडमास्तरांची आजवर सवय होती. त्यांना काही विचारले की ते प्रथम छडीने उत्तर देत. मग शब्दाने. या त्यांच्या छडी प्रकरणात एक पोरसवदा मास्तर सापडले होते म्हणतात. अशा पार्श्वभूमीवर नवीन सुधारणावादी हेडमास्तर आम्हाला शामळू वाटले, तर त्यात नवल ते काय ? असल्या पुळचट माणसाला धडा शिकविण्याची दुर्बुद्धी झाली आणि आम्ही गोता खाल्ला.

वास्तविक आमच्या शाळेत पु. ग. सहस्त्रबुद्धे, निजामपूरकर, वी. जी. जोशी, मिरजकर, गोडबोले, फणसे असे नामवंत आणि छडीवर प्रेम करणारे खूप शिक्षक होते. छडी आमची मैत्रीणच होती. त्यामुळे शिक्षा अंगवळणी पडली होती. तेव्हा भय कुणाचे ?

आमचा वर्गही छट होता. भांडणे करणारा अन् आडदांड. आम्हाला पु. ग. रग्वी शिकवायचे. आधीच मर्कट तशात...

मॅट्रिकचे वर्ष नुकते सुरू झाले होते. कदाचित पहिला आठवडाच असावा. देशमाने सरांचा गणिताचा तास होता. देशमाने सर सरळ, सज्जन शिक्षक. ते फार गरीब होते. आमच्या वर्गातल्यासारख्या लागवणकर, पानसे, गोखले, शिवराम तेलंग, मारवाडी अशा आडदांड मलांना शिकविण्याची त्यांची जात नव्हती.

कारण काहीच घडले नव्हते.

पहिल्याच तासाला ते येतात न येतात तोच ४० मुलांनी एकदम जयघोष केला. 'हरहर महादेव'च्या घोषाने सारी शाळा थरथरली. हे काय चाललंय असा प्रश्न साऱ्या शाळेस पडला असेल. देशमाने सर काय करावे या विचारातच होते.

तेवढ्यात काळसावळचा उंच व्यक्तीने आमच्या वर्गात प्रवेश केला. ज्याअर्थी देशमाने सर त्यांच्याशी आदबीने बोलत होते त्याअर्थी तेच हेडमास्तर होते. त्यांचे काहीतरी बोलणे झाले आणि देशमाने निघून गेले. समोरच्या व्यक्तीने वर्गातल्या चाळीस मुलांकडे रोखून पाहिले. त्या पहाण्यात संताप नव्हता पण अस्वस्थता होती. तोल सुटलेला नव्हता तरीपण नित्याचा खेळकर मिस्किलपणा लोपलेला होता. आवाजाला थोडी धार वाढली–

ते म्हणाले, 'आता हरहर महादेव असे कोण कोण ओरडले–'

सारा वर्ग गप्प राहिला.

'आता जे जे ओरडले त्यांनी उठून उभे रहावे–'

तरीही कोणी उभा राहीना.

आवाज अधिक रखरखीत आणि धारदार झाला,

'सेक्रेटरी कोण आहे ?'

तेलंग उठला.

'वर्गात आत्ता कोण कोण ओरडले ?'

तेलंग गप्पच.

'जा, छडी घेऊन ये–'

तेलंग छडी घेऊन येईतो एकटक पहात हेडमास्तर उभे होते. आणि आम्ही जीव मुठीत धरून काय होणार ते पहात होतो.

छडी आणताच वर्गातल्या प्रत्येक मुलाच्या हातावर तीन तीन छड्या उपसल्या गेल्या. साधा सुस्कारा सुद्धा न काढता वर्ग हा शिक्षा निमुटपणे सोशीत होता.

शिक्षा संपली. छडी खाली ठेवली गेली. आणि हेडमास्तरांनी आमच्याकडे वळून पाहिले.

त्यांच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. आम्ही अस्वस्थ झालो.

शिक्षा करणाऱ्या खवीसाच्या डोळ्यात पाणी. पण पाणी खळाळत होते. शिक्षेपेक्षा आम्ही यानेच जास्त अस्वस्थ झालो. खादीच्या रखरखीत रुमालाने त्यांनी डोळे कोरडे करण्याचा यत्न केला आणि ते सद्गदित आवाजात म्हणाले,

'मुलानो, तुम्हाला मी आज शिक्षा केली. जी छडी मी इतरांना वापरू देत नाही ती मी वापरली. कठोरपणे वापरली. मुलांचा मी मित्र आहे. तुमचे म्हणणे मला ऐकायचे होते. तुमच्याशी हितगुज करायचे होते, पण त्याऐवजी मला छडी वापरावी लागली. मोठ्या उमेदीने या नामवंत शाळेत मी आलो. या शहरातल्या उत्तमोत्तम कुटुंबातल्या मुलांचा मित्र व्हायला आलो, पण पहिल्या घासालाच खडा लागला. आज ज्या छड्या मी तुमच्या हातावर मारल्या त्या मी तुम्हाला मारल्या नाहीत. त्या मी मलाच मारून घेतल्यासारखं मला वाईट वाटतंय. त्या छडीचे वळ माझ्या हृदयावर खोलवर उमटले आहेत. या व्यवसायात पडल्याचा मला जो आनंद वाटे तो सारा आज अचानक संपल्यासारखा वाटतो. मुलांनो, तुमच्यांपैकी खरोखरच कोण कोण ओरडले हे मला आत्तासुद्धा नाही का सांगू शकणार तुम्ही–'

बिचकत बिचकत चार दोन जण उठले. मग सारेजण उठले. ताठ उभे राहिले.

आणि मग समोरच्या शिक्षकाच्या डोळ्यांतले अश्रू निघून गेले. तेथे एक अद्भुत आनंद विलसू लागला. हर्षभरित होऊन ते म्हणाले, 'मुलांनो अपराध कबूल करायला सर्वात मोठे धैर्य लागते. ते तुम्ही दाखवलंत. मी तुमचा फार आभारी आहे. तुमच्यात एकजूट आहे–तुम्ही शिक्षेला भ्याला नाहीत, तुमच्यात धैर्य आहे, उद्या तुम्ही फार मोठे नागरिक व्हाल. तुमच्यासारख्या मुलांचा शिक्षक होतो याचा मलाही अभिमान वाटेल. पण तुमच्या गुणांना थोडी शिस्त नको का ?

वडीलधाऱ्या शिक्षकाविषयी आदर नको का? तुमची काही तक्रार असली तर तुम्ही तुमच्या या मित्राकडे केव्हाही या....आता आपण एक सुंदर इंग्रजी कविता वाचू या–'

वर्डस्वर्थची 'सॉलिटरी रीपर' आम्ही त्या दिवशी शिकलो, पण आम्ही त्याहून खूप काही शिकलो.

मग नानांची आमची मैत्री जमली. अन् आम्ही मागू ते असाध्य असले तरी नानांनी दिले. आणि आम्हाला सर्वांशाने व्यापून टाकले.

त्या विद्यार्थीविडया शिक्षकाचे नाव आहे. कै. ना. ग. नारळकर.

आता उरल्या आहेत केवळ त्यांच्या स्निग्ध आठवणी.

दिनांक २८ मे १९६७ ● ● ●

एक हरवलेली कविता

कवि मनमोहन ही मराठी काव्यातील एक अद्‌भुत शक्ती होती. भूतकाळ मुद्दामच वापरतो आहे. कारण वीज चमकून गेल्यावर उरतो फक्त करुण अंधार. त्या तेजाची आठवण काढत काजवे न्याहाळावे अशी अवस्था होते.

ही त्यांची केवळ स्तुति नव्हे किंवा साहित्यिक शहामत नव्हे. मनमोहनांनी मला सामान्य वाचक म्हणून एकेकाळी शहाणे केले होते. नियतीची क्रूर ऐट अशी की, आता त्यांना शहाणे करायची त्यांनी माझ्यासारख्या मित्रावर पाळी आणली आहे. कवीने एवढे स्वस्त होऊ नये. उंचावरची द्राक्षे मिळाली नाहीत तरी जमिनीवरचे गवत चघळू नये.

मनमोहनांनी त्यांच्या चाहत्यांची फार विकट अवस्था केली. त्यांची कथा गल्लीबोळातल्या कोणत्याही हस्तलिखित मासिकांची अवस्था असणाऱ्या स्थानी दिसली कि मला संताप येई. एखाद्या सामान्य कल्पनेवर त्यांनी अस्थानी शब्दांची आतषबाजी केली की, मला वाईट वाटे. मामुली शब्दात मामुली कल्पना म्हणजे हद्द झाली. कवि म्हणून मान्यता मिळविणे दुर्लभ, टिकवणे तर फारच दुर्लभ.

परिस्थितीने नातूना कडवे केले, जिद्दी केले, तेव्हा कवि मनमोहन जन्म

पावला. पण परिस्थिती सुधारली, मान्यता मिळू लागली. आणि पुन्हा मनमोहन, नातू झाले. कविता रुसून गेली. शब्दांना ते पारखे झाले. ती उंच उंच शिडी आडवी झाली. अन् ज्यांना त्या शिडीच्या दोन पायऱ्या चढता आल्या नसत्या ते सर्वच शिडी तुडवू लागले. हक्क होता म्हणून त्यांच्या या स्थित्यंतरावर मी रागावलो. त्यांच्या गोष्टीशेजारीच त्यांना दिलेल्या चार शिव्या सुद्धा मी छापल्या. थोडा परिणाम झाला, पण फार थोडा. मनमोहन निदान लिहायचे थांबले. चांगले लिहायला लावणे काही हाती नव्हते. पण सामान्य मजकुराच्या भडिमारातून आम्ही चहाते थोडे फार मुक्तता पावलो.

मनमोहनांचा पुन्हा जन्म होत आहेसे वाटते. फक्त वाटतेच! भावडेपणाने म्हणा.

वास्तविक मर्ढेकरांच्या खूप पूर्वी मनमोहन यांनी रविकिरण मंडळाची अॅड्रेस्ड ('स') काव्याची चौकट मोडून टाकली. गद्य कविता पद्य केली. पर्वतीच्या उंचीवत मशगूल होणारी कविता हिमालयाच्या जरी नव्हे तरी निलगिरी पर्वताच्या उंचीपर्यंत नेली. कसलेही पूर्वसंकेत मोडताना न संकोचणारा हा माणूस आपल्या विक्षिप्त-विचित्र वागण्यामुळे अगदी उपेक्षित राहिला. एकादा भागवत, चित्रे किंवा मोटे त्या माणसाला त्याच्या ऐन भरात भेटता तर मनमोहनचे सोने झाले असते. दुर्दैव असे की कवितेची किंमत आकारात ठरविणारे म. म. केळकर अन् वसंत काणे त्यांना भेटले. अखेरी व्हायचे तेच झाले. राख उडवून टाकणारा रसिक भेटला तर अग्नि पेटता राहतो, नचपेक्षा शेकून घेणाऱ्याचे अंग थोडे कोमट होते. आणि तो मात्र थंड होतो. मनमोहन असेच निस्तेज झाले.

मनमोहनांचे काव्य हे खरे पाहता नीट छापले गेलेच नाही. कुठेतरी चौकटीत, भयाण शुद्धलेखनाने विद्ध, आडवाटेच्या मासिकात त्या कवितांनी आयुष्य काढले. या रत्नाला पैलू पडलेच नाहीत. कारण हा शनीचा खडा होता. लाभेल त्याला लाभणारा. नचपेक्षा वाटोळे करणारा. शिवाय माणूस म्हणून वा मित्र म्हणून या कवीत जेवढे दोष होते तेवढे या पुणेरी सदाशिव पेठेला पचणारे नव्हते. भाट, चारण, स्तुतिपाठक आणि साहित्यपरिषदेतील विटाळ गेलेले गटबाज टीकाकार हयांना तर मनमोहन हा भयप्रद माणूस वाटत होता. घरासमोर पेरुगेट होते म्हणूनच या खारट वसाहतीत नातूंना नांदायला मिळाले. या मनस्वी माणसाला 'विटनिक युग' फार पूर्वी सापडले होते. ज्यांचे अंतर्बाह्य जीवन पेटलेले असते किंवा क्रियाशून्य होते त्यातूनच बंडखोर निर्माण होतात-मनमोहन तसाच होता.

पण गृहस्थ नातूने अखेरी मनमोहनमधला विक्षिप्तपणा, विचित्र वेष आणि उद्धट वाणी काबूत आणली. पण त्याबरोबर त्याने सारे तेजही शोपून घेतले. त्याने लिहिले-

शव हे कविचे जाळू नका हो, जाळू नका हो ।
जन्मभरी तो जळतच होता ॥
फुलेहि त्यावरी उधळू नका हो, उधळू नका हो ।
जन्मभरी तो फुलतच होता ॥

पण त्याला अखेरी जळण्याचीच भीती वाटली अन् फारच थोड्या प्रशंसेने तो फुलू लागला.

आपली सहचारिणी मृत्युमुखी पडल्यावर मनमोहनांनी लिहिले–

वृंदावनातील तुळस जळाली, मागे उरल्या दगडविटा ॥ ध्रु. ॥
घर भरले पण फुटे उंवरा । श्वसन उरे पण थिजला वारा
उरात माझ्या तुटल्या तारा । अर्घ्या आभाळातून अवचित
मागे फिरला का सविता ॥

अर्घ्य उचलता प्रीत तिरातून । हाय किनारा जाई दुभंगुन
पापणिच्या मग लक्ष भुजातुन । भरते हिरवे विलवर,
काळिज कासारिण आता ॥

एकच होता एकच होता । माझ्या या कवितांचा श्रोता
जीवनात या जीवन आता । छाया ठेवूनि आगे मागे
प्रकृतिला का ये जाता ॥

झपूर्झाच्या कैदेतून सुटल्यानंतर कवि मनमोहन यांच्या प्रतिभेने उड्डाण घेतले १९४६ च्या एप्रिल महिन्यात. सुभाषचंद्रांच्या स्वप्नाची एक सामर्थ्यशाली कविता मनमोहनांनी वाङ्मयशोभेला दिली. मराठी काव्यविश्वात केव्हाही चमकावी अशी ही तेजस्वी कविता अजूनही अंगावर रोमांच आणते. त्या रोमांचाची सुद्धा फुले होतात.

ही दर्दभरी कहाणी आता मनमोहनांवर रुसली आहे.

ही कविता कुठेतरी हरवली आहे. मनमोहन तर ती पुन्हा शोधत आहेतच. आम्ही सुद्धा ती शोधत आहोतच. अशी ही हरवाहरवच नेहमीच हृदयद्रावक असते.

मनमोहनांची कविता आता ऐकिवात येणार नाही. कारण ती ग्रंथित झाली नाही, आणि होईल असे वाटत नाही. या अफाट माणसाने ती जतन केली नाही. तो रसिकांची वाट पाहत होता. पण रस्ताच चुकला होता. रसिकही त्याची वाट पाहत होते आणि त्यांचीही वाट निराळी झाली होती. ही चुकामूक दुर्दैवी आहे येवढेच खरे. त्यांच्या विसरलेल्या कवित्वाचे काही पैलू दिसावेत म्हणून आम्ही त्यांना विनंती केली. जुनी दोस्ती भक्तिभावाने स्मरून त्यांनी एक गठ्ठा कणिका आणून दिल्या. या वेळेस नेहमीप्रमाणे सिनेमा पोस्टर हाती नव्हते. त्यामुळे दोन इंची अक्षरात त्या लिहिलेल्या नव्हत्या.

मनमोहनांची प्रकृती उग्र आहे असा प्रवाद आहे तो खोटा आहे. एका वलदंड

प्रकाशकाची त्यांनी मान पकडली ही गोष्ट पुण्यात सर्वश्रुत आहे. पण त्या व तशाच गोष्टीचे भांडवल करून मनमोहनांच्या माथी अनेक दोष मारले गेले ही गोष्ट सर्वथा खरी की त्यांच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत द्रव्यार्जनाचे सर्व उपलब्ध मार्ग त्यांना हाताळावे लागले. त्यांना ज्यांनी जगवले त्यांच्याशी मनमोहन कृतज्ञ आहेत. मनमोहनांवर अनेकांनी काय काय प्रकारे मोहोव्वत केली, त्याची मी यादी देऊ शकेन, पण ती गोष्ट मोहव्वत करणाऱ्यांवर वा करून घेणाऱ्यांवर अन्यायजनक ठरेल. पुण्यातील एक संस्कृतचे प्राचार्य त्यांच्या कवितेवर प्रेयसीप्रमाणे आपक आहेत. मुलीला सायकल हवी होती त्यावेळेस कसलाही पूर्वपरिचय नसताना एका अर्थमंत्र्याने पयांच्या कन्येला सायकल घेऊन दिली. त्यांचे रेशन तर त्यांच्या अनेक मित्रांनी भागवले. अर्थात् त्यांच्या त्या भिक्षांदेहीच्या पद्धतीशी मी कधीच सहमत नव्हतो. ण तरीही मी त्यांना वश होत होतो. समर्थांनी विद्वानांना जीवनाचा एक आपद्-धर्म म्हणून 'ॐ भवती भिक्षांदेही' हा मंत्र दिला आहे आणि त्याचा अवलंब करण्याची लाज निदान जन्माने हिंदु असणाऱ्याला वाटू नये. पण त्या पथाचीही काही पथ्ये आहेत. ती मनमोहनांनी पाळली नाहीत. मित्रांच्या साहाय्याने संसार रेटून नेणाऱ्या कवि मनमोहनांचा रेसचा शौक त्या काळातही सुटला नाही. तोच काय पण कोणताच शौक मनमोहनांनी कधी सोडला नाही. आपल्या कवितेवर फिदा असणारे सर्वजण आपल्यावर फिदा असतात असली चुकीची समजूत त्यांना करून घेतली. ज्यांना त्यांच्या मनाची सरलता पटली त्यांनी त्यांच्या सर्व दोषांसकट त्यांचे कौतुक केले हा भाग निराळा. आता त्या केवळ आठवणी आहेत, कारण वसंत संपला आहे.

मनमोहन यांचा बहर ओसरला आहे, पण तरीही इतर अनेक कोंवड्यांहून हा कोंवडा उंच बांग देतो.

मनमोहनांनी आपल्या बदलत्या आयुष्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. अन् पुन्हा एखादी गरुडझेप मारली पाहिजे. त्यांच्या लेखणीला भवानीचे टोक यावे अन् समर्थांचा कमंडलू त्यांची दौत व्हावी. त्यांच्या डोळ्यासमोर बालकवींचे रक्ताळलेले शरीर असावे अन् त्यांचे शब्द अर्थांच्या पायघड्यावरून सूर्यलोकात पोहोचावेत. यशे, खोटी कवतिके, कवि-संमेलने, वाकडे अभिप्राय ह्या साऱ्या ह्या उंच माणसाच्या पाय कापणाऱ्या करवती आहेत. मनमोहनांना दिव्यत्वाची प्रचीति आली तर त्यांच्या यशाच्या आरतीस्तव चंद्रसूर्यांच्या झांजा वाजतील.

मार्च १९६६

● ● ●

- स. प. कॉलेजसमोरील गोळीबार
- ऐंन पंचविशी
- ओॲसिस
- कुठेतरी खोलवर
- पतनाचा क्षण
- मैत्रीचा सुगंध
- हरवलेले पुणे
- औरंगजेबाची फर्माने आम्ही मानीत नाही
- हे तेवढं करायचं राहून गेलं

सर परशुरामभाऊ कॉलेजसमोरील गोळीबार :

मला खरोखरीच गोळी लागली का, असे चेष्टेने मला मित्र विचारतात ! मी त्यांना सांगतो–' छे हो, लिमलेटची गोळी अन् बंदुकीची गोळी सारख्याच मानणाऱ्यांना कशाला ह्या गोष्टी. ' पण एकादे वेळेस ते सोनेरी दिवस समोर येतात–आणि म्हणतात आम्हाला आमची गोष्ट सांगा ना.

१९४२ च्या मार्च महिन्यातील गोष्ट. एका चमत्कारिक राजकीय संघटनेच्या कामात अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले होते. परीक्षेला बसायची इच्छा नव्हती.वडील दुर्वासा सारखे असल्यामुळे त्यातून सुटका नव्हती. मामला गंभीर होता. त्यामुळे लष्करात भरती केल्याच्या अर्जाला अनुकूल उत्तर आल्याने हायसे वाटले. लष्कराला लागणाऱ्या सर्व गोष्टी–उंची, व्यक्तिमत्व, दांडगेपणा असल्यामुळे सर्व दिव्यातून लवकर पार पडता आले. वडिलांचे इंग्रज अधिकारी इंगल्स यांच्या शिफारशीने तर काम सोपे झाले. त्यामुळे परीक्षेला न बसण्याची कल्पना सांगूनही वडील नाराज झाले नव्हते. वडिलांची लष्कराला अनुकूलता होती. ती केवळ सावरकरांच्या लष्करभरतीच्या आदेशातून उद्भवली होती. ते परमभक्त होते सावरकरांचे.

परीक्षा नाही तर मग रिकामे बसण्यात अर्थ नव्हता. लष्करभरतीची अखेरची चाचणी व्हायला अवकाश होता, म्हणून मी मिलिटरी अकौंटस्मध्ये चिक-

टलो. हे ऑफिस होते वानवडीला टेंटस्मध्ये. स्टेशनरी नव्हती, टेबले नव्हती. एकूण सारी मौज होती. मी तेथे कसा आणि कुणामार्फत गेलो हे आठवत नाही. मला तेथे काय लायकी पाहून काम मिळाले हे मला अजूनही कळलेले नाही. महत्त्वाच्या तारा वा पत्रे त्या–त्या सेक्शनमध्ये नेण्याची व त्यावरील अंमलबजावणी काय झाली ते नोंदवून परत आणण्याची कामगिरी मजवर होती. मी ती सर्व पत्रे बहुशः फाडून टाकीत असे. एकादे पत्र पोहोचे. त्यामुळे माझे काम तासाभरात संपे. मग मी वानवडीहून गावात येई. बादशाहीत आमच्या मित्रपरिवाराच्या गप्पा रंगत. परत मी चारचे सुमारास वानवडीस पोचे आणि सुपरिंटेंडेंट पुरंदरे यांचे समोर हजर होई. खूप काम केल्याचा आविर्भाव आणून, मीच केलेल्या पोच–सह्यांचे व कामाच्या बिल्हेवाटीचे फॉर्म्स त्यांच्याकडे देई. आणि पुन्हा परवानगी घेऊन लवकर ऑफिसातून सटके.

नोकरीमुळे हातात थोडे पैसे होते. तसा मॅट्रिकपासून मी स्वतःचा खर्च स्वतःच चालविण्याइतका स्वयंपूर्ण झालोच होतो. ग्रामोफोन रेकॉर्ड भाड्याने देण्याचे दुकान १९३७–३८ साली मॅट्रिकच्या वर्गात जाण्यापूर्वी वडिलांपासून चोरून काढले होते. पण पगाराच्या पैशाने आता अधिक चलनवलन करता येऊ लागले. पुस्तके विकत घेता येऊ लागली. माझ्या राजकीय गटाचे काम चालविता येऊ लागले. त्यामुळेच माझ्या मनातला राजकारणातला रस अधिकाधिक उकळू लागला.

बापूसाहेब माटे यांचा संपर्क त्याच काळातला. ते एक नंबरचे गांधीद्वेष्टे–काँग्रेसद्वेष्टे. घरी वडील सावरकरभक्त, शाळेत पु. ग. सहस्रबुद्धे अन् पुढे कॉलेजात बापूसाहेब माटे. अभ्यासाची वाट मी सोडलेलीच होती. आता काँग्रेसच्या–गांधींच्या–नेहरूंच्या शत्रुत्वाची वाट धरली होती. सावरकर वाङ्मय मुखोदगत होऊ लागले. हिंदुत्वकोपात मुसलमानांच्या धर्माज्ञा कशा परधर्मीयांच्या द्वेषाने बरबटलेल्या आहेत याचे मूळ कुराणामधून अध्ययन सुरू झाले. पारशांना हिंदू केले पाहिजे; कारण त्यांच्यात आर्यत्व अधिक कसे आहे ते बापूसाहेब सांगू लागले.

पण तरीही नेहरूंचे रूप, इंग्रजी वक्तृत्व, गांधीचे साधेपण, सुभाषबाबूंचे शिवाजीप्रमाणे झालेले पलायन, हिटलरचे प्रभावी नेतृत्व, संकटातून नौका हाकारणारा चर्चिल ... अनेक गोष्टी मोहवीत होत्या. गांधीजी दुबळे राजकारण सोडून हिंसक राजकारणाकडे वळत होते. त्यांच्या मनात नसेलही. पण त्यांच्या आदेशाचे पर्यवसान सशस्त्र बंडखोरी, असेच होणार होते. अगतिकतेतून आणि निराशावादातून गोखले यांचे गुरुपण सोडून ते टिळकांच्याच राजकारणाची कास धरीत होते. त्यांनी पहिल्या महायुद्धात टिळकांच्या सैन्यभरतीच्या विरोधाला, इंग्रजांना अडचणीत पकडून अडवू नका, यासाठी विरोध केला–तेच गांधी या युद्धात इंग्रजांची

अडवणूक करायला सिद्ध झाले होते. आपल्या स्वातंत्र्यसंग्रामाची (टॅक्टिकल मूव्ह) हालचाल करण्यासाठी १९४२ सालची जागतिक परिस्थिती गांधींना अनुकूल वाटत होती. इंग्रजांचे लक्ष आपल्या स्वदेशरक्षणाच्या कार्यात गुंतलेले होते. हिंदुस्थानसारख्या प्रचंड भूभागात लष्करी बळावर क्रांति–चळवळ थोपवणे इंग्रजांना अशक्य आहे, हेही गांधींनी ओळखले होते.

या गांधींच्या लढाऊ पवित्र्याने मी स्वतः गांधीभक्त बनू लागलो होतो. गांधींचा तो लढाऊ पवित्रा पाहून मला अभिमानाचे भरते आले होते. गांधींची राजकारणातून हकालपट्टी करावी असे म्हणणारे बापूसाहेब माटेसुद्धा क्षणभर गांधींवरचा राग विसरले होते.

अशा तप्त वातावरणात मुंबईत अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भरले. साऱ्या भारतवर्षाचे डोळे तिकडे लागले होते. तरुणवर्ग तर लढण्याची हाक यावी म्हणून वाट पहात होता.

आणि गांधींची सुप्रसिद्ध 'क्विट् इंडिया' ही आरोळी उठली. अगतिक झालेल्या गांधींनी, स्वतः हिंसेचे तत्त्वज्ञान सोडले नाही तरी अनुयायांना मात्र त्या जोखडातून मुक्त केले. कोणत्याही मार्गांनी गांधींनी इंग्रजांशी मुक्तियुद्ध खेळण्याचे स्वातंत्र्य तरुणांना दिले.

सरकारने या परिस्थितीचा फायदा घेऊन एका रात्री सर्व पुढाऱ्यांची तुरुंगात रवानगी केली–अज्ञातात भारतीय नेतृत्व रवाना केले. दुय्यम दर्जाच्या पुढाऱ्यांनी त्यांच्या जागा घेतल्या. अच्युतराव पटवर्धन भूमिगत झाले आणि ४२ ची चळवळ सुरू झाली.

पुढे जे घडले ते सर्वथा मला वर्तमानपत्रातूनच कळले. युद्धाच्या पहिल्या दिवशीच मी युद्धपराङ्मुख झालो. एका सुंदर वैभवशाली, रक्ताला चेतना आणणाऱ्या अशा या लढ्यात मी अगदी हकनाक पहिला बळी पडलो. मला तसे पाहिले तर खूप काही करण्यासारखे होते, मी केलेही असते.

१० ऑगस्ट रोजी पुण्यातल्या सर्व कॉलेजातून हरताळ पाळण्याचे ठरले होते. मी त्या दिवशी सिकनोट पाठवून रजाच घेतली. हे अर्थात् वडिलांना कळवणे शक्य नव्हते. गांधीजींची चळवळ त्यांना नापसंत होती. गांधी उद्या या हिंसक कृत्याचे उत्तरदायित्व नाकारतील असे त्यांचे म्हणणे होते. मी म्हणे, ते उद्या पाहू. पुढे वडिलांचे म्हणणे खरे ठरले ते सोडून द्या. पण त्या दिवशी गांधी हे देवपुरुष वाटले. वाटायला हवेही होते. सकाळी सात वाजता मी होस्टेलवरच गेलो. तिथे प्रार्थना होती. पण उपास करण्याची टूम कुणा गांधाळाने काढली. उपासाचे खूळ मला केव्हाच मंजूर नव्हते. पण मीसुद्धा त्या लफड्यात अडकलो. वडिलांना न कळत हे सारे करावयाचे होते, हे निराळेच. मी तेवढ्यात घरी येऊन वडिलांना तोंड दाखवून

गेलो. सर्व कॉलेजातील विद्यार्थ्यांची एक मिरवणूक काढून स. प. कॉलेजच्या रमाबाई हॉलमध्ये सभा घेण्याचा निर्णय घेतलेला होता आणि मी हजर राहावयाचे यात आश्चर्य काय ? माझ्यातले बदल वडील न्याहळत होते, प्रकृती बरी नाही म्हणून मी जेवण टाळले होते. मग ऑफिसला जातो म्हणून मी सूंवाल्या ठोकला. वडील साएटिकाने आजारी होते. त्यांच्यासाठी आमच्या घरोव्याच्या डॉ. चपलाबाई खाडिलकरांना निरोपही द्यावयाचा होता.

पुढे काय होणार याची कल्पना असल्यामुळे मी सायकल होस्टेलवर टाकली आणि प्रवेशद्वाराशी आलो. प्रवेशद्वार बंद होते. फक्त स. प. कॉलेजच्याच विद्यार्थ्यांना आत प्रवेश होता. आत प्रवेश करणाऱ्याविरुद्ध बाहेर जमलेले लोक हुर्रेवडी करत होते. त्या दिवशी कॉलेजमध्ये प्रवेश हा देशद्रोह होता. तारा देवधर (प्रा. दि. ब. देवधर क्रिकेटियर यांची कन्या) आत जाणाऱ्यांना वांगड्या देत होती असे म्हणतात, पण मी काही ते पाहिले नाही. बाहेर गर्दी वाढत होती. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी कॉलेजचे प्रवेशद्वार उघडून रमाबाई हॉल स्वाधीन करावा म्हणून प्रि. करमरकरांशी चर्चा–विनंत्या करीत होते. करमरकरांचे म्हणणे वाजवी होते. ते म्हणाले, ' स. प. कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांनीच सभा घेतली तर मी तिकडे दुर्लक्ष करीन. सरकारी अधिकाऱ्यांना मी काही तरी उत्तर देईन. पण सर्व कॉलेजांची सार्वजनिक सभा अशा तप्त वातावरणात मी येथे घेऊ दिली तर ही संस्था नामशेष होईल. तुम्ही सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या कॉलेजात जावे, तेथे कार्हीही करावे. प्रिन्सिपॉल तुमच्या उद्रेकाला जागा करून देतील. सार्वजनिक सभेचा हट्ट तुम्ही सोडावा. आणि तुम्हाला जर हे पटत नसेल तर तुम्ही सभा शिवाजी मंदिर किंवा शनवारवाडा येथे घ्या. '

त्यांचे म्हणणे रास्त होते असे तेव्हाही मला वाटले. आज तर वाटतेच, पण मुलांची टाळकी नेहमीच गरम असतात. त्यात ज्या राजकीय पुढाऱ्यांना संघटित जमावापेक्षा हुल्लड, रक्तपात, लाठीहल्ला, निषेध ... यांचे जास्त प्रेम, त्यांच्या हातात इथल्या विद्यार्थी संघटना होत्या. आजच्या प्रमाणे रा. स्व. संघ तेव्हाही तयारी करीत होता. गेली तीस वर्षे संघ वीर्यसंचय करतो आहे. त्यातून अपत्यसंभव केव्हा व्हायचा देव जाणे ! नाही म्हणायला संघानेही जनसंघाच्या रूपाने जीवनातल्या लढाईत भाग घ्यायला आता प्रारंभ केला आहे. हे पाहून माझ्यासारख्या राष्ट्रवाद्यांना हर्ष होतो आहे. तेव्हा मात्र संघाला देशातल्या भावी अराजकाची कसलीही कल्पना आली नाही. क्षणाक्षणाला विद्यार्थ्यांचे लोंढे स. प. कॉलेजच्या प्रवेशद्वाराशी जमा होऊ लागले. जमाव वाढू लागला तसतसे पोलीस अस्वस्थ झाले. त्या जमावाला नेतृत्व नव्हते. त्यामुळे पोलिसांना कोणाला अशी अटक करता येईना. अगोदरच पुण्यातले वातावरण तापले होते. त्यात भर रस्त्यावर वाईल्ड (तापलेला) विद्यार्थी-

समूह जमू देणे डी. एस्. पी. ला मंजूर नव्हते. असिस्टंट डी. एस्. पी. कोणी अर्ध-इंग्रज होता. मला वाटते, हॅमंड त्याचे नाव असावे. त्याच्या डोळ्यात सूडाची आग पेटलेली होती. सारे पोलीसही ही गडबड थांबविण्यापेक्षा भडकविण्यासाठी, दहशत बसविण्यासाठीच आले आहेत, असे त्यांच्या डोळ्याकडे पाहताच सहज लक्षात येण्याजोगे होते. सातारहून खास आणलेले हे पोलीस होते, असे मला कळले. त्यांना खास वळ येण्यासाठी नाशिक रमचे घुटके दिले होते. उगाच आपल्याच बांधवावर गोळी झाडायला नको अशी त्यांना एखादवेळी दुर्बुद्धी न व्हावी, यासाठी ही खास व्यवस्था केली असावी.

पण जसा जमाव वाढला तशी पोलिसांची चुळबूळ सुरू झाली. वादशाही-पासून जीवनपर्यंतचा रस्ता नुसता फुलला होता. मधेच कडे करून पोलीसी गाड्या आणि पन्नास एक पोलीस उभे होते. समोरच्या खजिनामहाल गल्लीचा रस्ता तेवढा थोडा मोकळा होता.

तेवढ्यात पोलिसांची आणखी कुमक आली आणि त्यावरोवर पोलिसांनी लाठीहल्ला सुरू केला. पूर्वसूचना न देता ! मुली कॉलेजच्या आवारात शिरल्या आणि कॉलेजचे दार मुडपण्यात आले. काही जणांनी कॉम्पॉऊंडवरून उड्या मारल्या, आणि वाकीचे शक्य तेवढ्या गतीने पळू लागले. अर्थात् हजारो माणसे जीव घेऊन पळताना हकनाक पडून जखमी झाली. मोघे नावाचा एक विद्यार्थी सायकल घेऊन या गर्दीत उभा होता. तो आपल्याच सायकलवर पडला आणि त्याच्या पायावर लोक पाय देऊन पळत होते. त्याच्या पायाचे चक्क दोन तुकडे झाले. अन् पुढे लाकडे जोडतात तसे स्टेनलेसच्या पट्टीने ते जोडावे लागले. पुष्कळांना खरचटले, कुणाचे पाय मुरगळले. भय आणि सूड या गोष्टीनी जमाव नेहमीच वेडसर होतो. सामुदायिक घवराट काय असते, याची झळ पानशेतच्या वेळी पुण्याने अनुभवलीच आहे. तशीच गांधीवधानंतर झालेल्या जाळपोळीत सामुदायिक वेड्या जमावाने भले-बुरे, मित्र-शत्रू यापैकी काहीच पाहिले नाही. तीच गोष्ट आज घडत होती. लाठीहल्ला सुरू व्हायच्या आत जी पळापळ सुरू झाली, त्यायोगे जी ढकलाढकल झाली त्याने मी अगोदरच लकीच्या पुढे आलो होतो. मला आपले उगीचंच वाटत होते की, या पोलिसांना सामोरे जाऊन, एक तर घाव झेलून किंवा प्रतिकार करून कुणीतरी धडा शिकवायला हवा.

माझे मन त्या वेळेस भलभलते विचार करीत होते. तसे धडपणे न वापरता येणारे स्फोटक हत्यार त्यावेळेस मजपाशी होतेही. मी काही भलत्या साहसात जर त्यावेळी गुंतलो नसतो, तर मला वाटते माझ्या जिवाचे तेथेच काही बरेवाईट झाले असते. माझ्या आयुष्यातली सारी दुःखे अविवेकी, भावनावश निर्णयानेच मला भोगावी लागली आहेत. पण माणसाला हा विवेक शिकण्यासाठी पन्नाशीपर्यंत

आयुष्य फुकट घालवावे लागते हेच खरे. माझी विवेकशक्ती इतरांच्या बाबतीत अचूक निर्णय घेते पण स्वत:च्या बाबतीत मात्र ती बहुतेक वेळा चुकीच्या मार्गाने गेली. मग ते निर्णय मी जिवापाड जतन केले, दु:खे भोगली आणि आज जे सामान्यत: सुखाचे आयुष्य भोगतो आहे, ते मोठ्या कष्टाने परत मिळवले.

सांगायचा मुद्दा एवढाच, मी जमावावरोवर वाहवत जायला हवे असे वाटत होते, पण माझे पाय घोटाळत होते आणि नको तेथे प्रतिकार करण्याची दुर्बुद्धी माझ्या मनात उत्पन्न झाली होती.

पण हा विचार मनात येत असतानाच माझ्या ध्यानात आले की, रस्ता निर्मनुष्य झालाय् अन् गोपाळ गायन समाजाच्या फूटपाथवर मी उभा आहे.

रस्त्यावर चार–दोन माणसे जखमी होऊन पडली होती. चपला, चार–दोन छत्र्या, एक पर्स, सायकलमालाकावाचून इतस्तत: पडले होते.

सुरक्षित जागी वसून ही रणधुमाळी पाहणारे श्री. गोपीनाथपंत तळवलकर हेही वहुश: श्री. भागवतांच्या माडीवर उभे असावेत.

आणि हे पहावयास मला जाग आली तेव्हा निकटपणे माझ्याकडे रोखून एक आडदांड पोलीस पहात होता. वास्तविक जवळपास निर्मनुष्य झालेल्या या रस्त्यावर आता शांतता प्रस्थापित करण्यासारखे काहीच नव्हते. पण आपल्या हत्याराला काहीच काम न मिळाल्यामुळे तो पोलीस चवताळून खुनशी बनल्याचे स्पष्ट दिसत होते. आणि मग मी समजलो की, त्याच्या हाती चांगली उंची रायफल आहे. तोपावेतो मला पोलिसांचा लाठीमार पहावयास मिळेल असे वाटले होते. गोळीवार अनपेक्षित होता.

त्या पोलिसाने रायफल रोखली. तोपावेतो मी वेसावध होतो. पण मग मात्र निसर्गाच्या प्रेरणेने मी चार ढांगा दूर झालो आणि एकदम दुकानाच्या पायरीवर चढलो.

हे दृश्य पुष्कळ मंडळी पहात होती असे मला वाटले, कारण दाराआडून, गजाआडून, सज्यातून रस्त्यावरची रणधुमाळी पाहणारी शूर माणसे तेथे पुष्कळच असावी. काही तेथे राहणारी होती. पण पुष्कळसे प्रेक्षकही होते. कुणीतरी मला हाक मारली. आणि माझी नजर वर जाताच, काय घडले ते कोणास ठाऊक, माझा पाय जळतो आहे, असे मला वाटले अन् मी खाली पडलो.

मी पुष्कळ वेळ तसाच पडलो असेन. कारण मला उचलले तेव्हा रक्ताचे चांगलेच थारोळे खाली झाले होते. त्या रक्ताकडे वघवतही नव्हते. एरवी मी त्या दृश्याने किंवा वेदनेने वेहोष झालोही असतो, पण का कुणास ठाऊक कसली तरी अवर्णनीय सहनशक्ती मला प्राप्त झाली होती. त्यावेळेस सूडाची भावना अधिक तीव्र होती. मला कुणीतरी उचलून नेले. कुणी निकम, कुणी वापट, नक्की काही

सांगता येत नाही. प्रथम मलाच धोपेश्वरकरांच्याकडे नेले असावे. माझ्याप्रमाणेच आणखी दोघे तर थोड्याच वेळात तेथे आणले गेले. अर्थात् त्यांच्या जखमा गोळीच्या नव्हत्या, तर पळापळीच्या होत्या. पण या जखमा होत्या. स्वातंत्र्यसंग्रामातील युद्धाच्या नांदीच्याच. सर्वांनाच वीरमरण मिळत नाही. पण लढाईत भाग घेणाऱ्या सर्वांनी मिळून लढाई लढलेली असते आणि मग प्रत्यक्ष आघाडीवर मृत्यू भेटो वा कारखान्यावरील बॉंबहल्ल्यात मृत्यू भेटो, तो वीरमृत्यूच. त्याचप्रमाणे ब्रिटिश सरकारच्या पाशवी अन् निर्घृण अशा दंडेलीला बळी पडणारे सर्वच स्वातंत्र्यसैनिक होते.

डॉक्टर ढमढेरे यांना या जखमींचा सुगावा लागला होता. आणि त्यांनी आपली गाडी पाठवली होती. पोलिसांनी दहशत उत्पन्न केल्यानंतर अवघ्या तासाभरात वाहन मिळून आमची ससूनमध्ये खासगीरीत्या रवानगी झाली, ही गोष्ट फारच तत्परतेने झाली म्हटले पाहिजे. मोटार रक्ताने माखली होती. दोन्ही सहरुग्ण जखमी बेहोष झाले होते. मामला फारच उदास होता. पण म्हणून असेल, माझे डोके फिरले होते. लढाईच्या पहिल्याच दिवशी काहीही महत्त्वाचे काम न करता मी गोळी खाऊन निकामी झालो होतो. पाय जळत होता, त्या वेदनेपेक्षा वेदना होत्या असमर्थतेच्या. खरं सांगायचे तर एका वेडसरपणामुळे गोळीचे दुःख असे जाणवत नव्हते. मी अफाट वडबडत होतो.

मी हॉस्पिटलमध्ये जाईतो माझी शुद्ध टिकली. मग मला आठवतंय् ते फार थोडं. मला शुद्ध आली ती चांगली रात्र झाल्यावर.

आणखी पुष्कळ लोक जखमी म्हणून तिथे आले होते. या जखमीत रात्री आणखी भर पडली, कारण अप्पाबळवंत चौकात पुनश्च गोळीबार चालू झाला. सारा एक वॉर्डच या जखमींनी भरला म्हणानात.

माझ्या शेजारी माझी थोरली वहीण उभी होती. ती माहेरपणासाठी आलेली. गावात कर्फ्यू. त्यात वडील संतापलेले. मला गोळी लागलीय हे सांगण्यासाठी प्रा. रा. वि. ओतुरकर आणि आता डी. एस. पी. असलेले प्रा. शेषाप्पा कुलकर्णी घरी गेले तेव्हा सौ. चपलाबाई खाडिलकर वडिलांना इंजेक्शन देत होत्या. दोघेही प्राध्यापक तसे वडिलांना अपरिचित. कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांची असली वार्ता सांगण्यासाठी ते आलेले, भांबावलेले. त्यांनी निदान इंजेक्शन पुरे होईतो दम धरावा. पण त्यांनी ही वार्ता सांगताच त्याही अवस्थेत माझे वडील कडाडले, 'चालते व्हा— हरामखोर लेकाचे. पोरांना काहीतरी शिकवता अन् त्यांची माथी फिरवता. गांधी एक गाढव अन् तुम्ही सात गाढव—'

मग ते चौखूर पळत सुटले.

वडिलांनी आजारात घरातल्या सर्वांना त्रास दिला. माझे नाव कुणी काढले

की ते संतापत–कारण मी काँग्रेसच्या चळवळीत भाग घेतला. मला भेटायला येण्याची सर्वांना बंदी. हा सारा प्रकार बहिणीने मला सांगितला. तिलासुद्धा असेच काहीतरी सांगून यावे लागले. मी देशभक्तीने अजून तापलेलाच होतो. मी केले त्यात देशभक्ती काय पण शहाणपण सुद्धा नव्हते. पण मी नाही म्हटले तरी माझा पूर्वेतिहास लक्षात घेऊन मी स्वातंत्र्यसैनिकच ठरणार होतो. शिवाय मी शासनाची गोळी खाल्ली होती. स्वातंत्र्यानंतर केवळ भाऊगर्दीने नकळत मेले गेले ते जर हुतात्मे ठरले तर पारतंत्र्यात परकीयांच्या दंडेलीत गोळी खाल्ल्यावर काय कोणीही कोणतीही–विरुदावली लावावी. मला आज साऱ्याच घटनांचे हसू येते. पण त्यावेळेस मोठमोठ्या मातब्बर व्यक्ती आम्हाला भेटत–काही भावडया लोकांची श्रद्धा तर पायाला हात लावण्यापर्यंत जाई. देशभक्तीचा उतावळेपणाशी असा संबंध जोडला जाई.

ससूनमधले वातावरण एवढे देशभक्तीने भारावून गेले होते की, या रुग्णाची सेवा करणे हे आपले कर्तव्य असेच सर्वांना वाटत होते. बाहेरच्या घडामोडी तारायंत्राप्रमाणे आम्हाला कळत. आम्हाला दुर्मिळ औषधे–जी ससूनमध्ये एरवी औषधालासुद्धा उपलब्ध होऊ शकली नसली ती मिळत असत. मोसंबी–संत्री यांचा तर एवढा खच पडू लागला की, त्यापैकी काही आम्ही भेटीला येणाऱ्यांना देऊ लागलो. आम्हाला मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी वाचून दाखवत, डोके चेपत, गप्पा मारून करमणूक करीत. मेडिकल कॉलेजमधल्या मुली सकाळपासून संध्याकाळपर्यंत चिवचिव करीत असत. त्यात मुर्डेश्वर नावाची एक मुलगी होती. कृष्णवर्ण एवढा सुंदर असतो हे मला त्यावेळेस प्रथमच कळले. तिचे डोळे तर रत्नाप्रमाणे तेजःपुंज होते. तिची वस्त्रे नेटकी, रंगदार आणि निराळीच असत. तिच्या आगमनाची मी नेहमी प्रतीक्षा करी. ती आली, हसली, लाघवी शब्दात तिने काही शब्दांची देवघेव केली की, साऱ्या वेदनांचा उपशम होई.

हॉस्पिटलमधे मी १० ऑगस्टपासून ३१ ऑगस्टपर्यंत होतो. त्या अवधीत डॉक्टर घारपुरे यांनी माझ्या पायावर आणखी एक शस्त्रक्रिया केली. हॉस्पिटलमधे आमच्यापैकी धनुर्वाताने एकजण मरण पावला. त्यामुळे आम्हाला इंजेक्शने देण्यात आली. आणि कुणीतरी सांगितले की, ज्याच्या बाबतीत धोका आहे, त्याची अॅम्प्युटेशन्स (हाडतोड) करण्यात येणार आहे. आम्ही रात्ररात्र जागे राहू लागलो. पण डॉ. घारपुरे यांनी सर्वांची समजूत घातली.

पहिले काही दिवस वेदनेचे दुःख असह्य होते. कमरेपर्यंत प्लॅस्टर असल्यामुळे हालचाल शक्य नसे. त्यामुळे झोप लागेना. मग डॉक्टर खुशाल मार्फीन देत. एरवी एवढ्याशा वेदनांना डॉक्टर क्वचित्च मार्फीन देतात. पण आमच्या वेदना त्या

पोर-डॉक्टरांना नको असत. आपल्याकडून काही गैरव्यवस्था झाली असे वाटू नये म्हणून आम्ही म्हणू ते सर्व करण्याकडे त्यांचा कल असे.

मला घरच्यांपैकी वहीण भेटून गेली. अन् आई चपलावाई खाडिलकरांच्या मोटारीतून वडिलांना चोरून भेटून गेली. पण माझे ज्येष्ठ मित्र श्री. वापूसाहेव माटे, केसकर नावाची एक सहाध्यायिनी, तर वारंवार भेटत. काँग्रेसचे नंवर दोनचे पुढारी तर रोजच येत. माझ्या माहितीनुसार एका रात्री तीन वाजता अच्युतराव पटवर्धन तेथे सर्वांना पाहून गेले. भूमिगत काँग्रेस पुढाऱ्यांचा तळ आमच्या बंगल्यात गिरमे यांच्या विऱ्हाडी असे. हे मला नंतर कळले तेव्हा तर माझी हसून पुरेवाट झाली. काँग्रेसच्या चळवळीत मी भाग घेतला म्हणून घरादाराला मला भेटूसुद्धा न देणाऱ्या माझ्या वडिलांच्या खोलीखालीच खादी टोपी तूर्त न वापरणारे वरेच काँग्रेसवाले सुखाने रहात होते. सुरक्षित तर होतेच होते.

हळूहळू चळवळीचे वातावरण उतरू लागले तसतशी ससूनमधली आमची राजासारखी वडदास्तही कमी होऊ लागली. हे अनंतकाळ चालणार नव्हते हे काय आम्हाला कळत नव्हते थोडेच ? मध्यंतरी १५ ऑगस्टला मी 'महू' येथे लष्करात जॉईन् व्हायला हवे होते–ते न झाल्यामुळे चौकशी होऊन वडिलांना पुष्कळच त्रास झाला होता. त्यामुळे ते आणखी विघडले होते.

मध्यंतरीच्या केव्हातरीच्या गोळीवारात एक चौदा वर्षांचा मराठा मुलगा पोटातून ब्रेनगनची गोळी गेल्यामुळे जखमी होऊन आला होता. तो आला तेव्हाच त्याची सर्वांनी आशा सोडली होती. त्याच्या पोटाची चाळण झाली होती, पण रात्री डॉ. के. सी. घारपुरे यांनी त्या मुलाचे तातडीचे ऑपरेशन केले. ते चांगले तीन तास चालले होते. नंतरचे आठ दिवस ते पोर फारसे शुद्धीवर आले नाही. पण डॉक्टरांनी अशा सोडलेली नव्हती. अनिवार प्रतिकारशक्तीने त्या मुलाचा पुनर्जन्म झाला आणि आमच्यापेक्षा दुप्पट त्याची सुधारणा झाली.

आमच्या प्लॅस्टर्सना विंडो ठेवलेली नव्हती. यापूर्वी जखम असेल तेथे एक खिडकी ठेवीत. तेथून जखम धुणे–ड्रेसिंग करणे, अशा क्रिया करीत. स्पॅनिश युद्धात केवळ वेळच्या वेळी ड्रेसिंग करता येत नसल्यामुळे प्लॅस्टर्सना विंडो ठेवता आल्या नव्हत्या. पण त्यातून डॉक्टरांना एक नवी पद्धती सापडली होती. जखमा आपोआपच आपल्याभोवती जंतूविरोधी वातावरण तयार करतात आणि त्या भरत येत. या वेळेसही त्या पद्धतीचा अवलंब केला गेला. त्यामुळे त्या प्लॅस्टर्सना आता घाण येऊ लागली होती. आम्हा रुग्णांना जर ती तापदायक होत होती तर भेटणाऱ्यांना ती असह्य होत असावी. पण त्याबद्दल कुणी कधी नाकसुद्धा मुरडले नाही. उलट जी अत्तरे, जे सेंटस् मी अजूनही पुन्हा कधी अनुभवले नाही, ते दुर्मिळ सुगंध मला तेव्हा मिळाले. कुणीतरी एक पोरसवदा नर्स तेथे होती. ती मोठी रूपवान नव्हती, पण

तिचे चालणे, हसणे, बोलणे सारेच काही मोहक होते. त्या दुर्बल अवस्थेत तसे वाटत होतं म्हणा हवं तर. पण आजही त्या आठवणी सुंदर आहेत. ती रोज येई. बहुशः त्या कालखंडात तिची रात्रपाळी होती. ती संध्याकाळी येई. तिच्या केसात एकादे फूल असे. ती सर्वांची हसतमुखाने विचारपूस करे. अन् माझ्यापाशी येताच थबके. इतरांच्यापेक्षा माझ्याशी थोडा जास्त वेळ बोले याची मला मौज वाटे. मग रात्री कधीकधी काम आटोपले म्हणजे ती गप्पा मारायची. नर्सच्या गप्पात अकारण एक नको ती सहानुभूती असते. अकारण समजूत घातल्याचा भास होतो. पण तसे काही तिच्याजवळ नसे. उलट त्या पोरसवदा बाईला एक छान ठमका होता. तिच्या संभाषणात तिच्या गावच्या आठवणी फार होत्या. ती कारवारची होती, त्या आठवणीत बुडून गेलेली ती तेजस्वी डोळ्यांची मुलगी अजून मला आठवते आणि कारवारच्या त्या सागरतीराचा मला मत्सर वाटतो.

राजकीय चळवळी पुण्यातून किंवा मुंबईतून हलल्या होत्या. सुभाषबाबूंचा आझाद रेडिओ भारत-गर्जना करीत होता. हॉस्पिटलमधले वातावरण दिवसेंदिवस कळाहीन होत होते. घरी परतणे शक्य नव्हते. एक दिवशी असे कळले की, ज्या रुग्णांना अपघाती इजा झाल्या त्यांना सोडून इतरांना सरकार डिस्चार्ज मिळताच कैदेत ठेवणार आहे–आणि त्या बातमीसरशी एकदम चक्रे फिरू लागली. त्या रात्री पंधरासोळा लोकांना डिस्चार्ज दिला गेला. पैशाची व्यवस्था नव्हती, त्यांना कोणीतरी पदरमोड करून पाठवून दिले.

मला ससूनमधून हलणे भाग होते. अखेरी मी वहिणीकडे इचलकरंजीस जावयाचे ठरवले. आमच्या मामांनी–रा. ह. गोखले यांनी पैसे आणून दिले. एरवी रोज त्यांच्याकडून डबाही येत असेच. त्यांच्या कर्तव्यदक्षतेला आणि सरळपणाला सीमाच नव्हती. जुन्या जमान्यातली शब्दाला पक्की, पदरमोड करून आपल्या प्रौढत्वाची शान सांभाळणारी पिढी आता हरवली. आई भेटून गेली. इचलकरंजीला पोचवायला कोण येणार हा प्रश्न होता. त्या वेळेस कॉलेजमध्ये हजेरी अगदी कडक होती. तो प्रश्न बापूसाहेब माटे यांनी उपप्राचार्य ज. नी. कर्वे यांना गळ घालून सोडवला. एकनाथ गोळे हा आमचा सहाध्यायी मित्र होता. (हा आता मुंबईस रेडिओलॉजिस्ट आहे.) त्याला त्यांनी माझ्यावरोबर दिले. त्याला बरोबर घेऊन ३१ ऑगस्टला पहाटे चार वाजता मी ससून सोडले.

या ससूनमध्ये माझ्या खूप आठवणी अडकलेल्या होत्या. नाव–लौकिकवान पुढारी, पितृतुल्य स्नेही बापूसाहेब माटे, कॉलेजातील एकादी भावना व्यक्त करू न शकणारे मित्र–मैत्रिणी, परिचित-अपरिचित अशा पुष्कळांनी दाखवलेले प्रेम, आत्मीयता ही अमर्याद होती. त्यातूनच पुढे आयुष्यातील पुष्कळ चांगल्या सोबती जडल्या. त्या सर्वांपेक्षाही समाज कसा मनाने निकोप अन् उंच होऊ शकतो, हेही

मला समजले. देशभक्तीची ज्योत घराघरातून पेटलेली असते. फक्त तो सारा प्रकाश एक व्हायला हवा असतो. म्हणजे देशातले तम नष्ट होणार असते. या आजच्या विकट अवस्थेतही आपल्या समाजावद्दल मी कधी उदासीन होत नाही कारण जेव्हा जेव्हा प्रसंग हाक मारतो तेव्हा माणूस उदात्त होतो, देशभक्त होतो याविषयी माझी खात्री पटलेली आहे. चिनी आक्रमणाच्या वेळीसुद्धा नागरिकांची मानसिक पातळी उंच गेली ते सर्वांनीच पाहिले आहे. फक्त त्या मनातील भावना वाहेर काढणारा समर्थ नेता हवा.

माझ्या आयुष्यावर कायम परिणाम करणारा १० ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट हा कालखंड असा गेला. साथीदार गेले, काही नव्याने मिळाले. राजकीय स्वप्ने उध्वस्त झाली. कारण लोकांना न दिसणारे का होईना पण चिरस्थायी पंगुत्व माझ्या शरीरात आले.

आता पंचवीस वर्षे झाली. स्वातंत्र्य आले. स्वातंत्र्याच्या लढचात या ना त्या निमित्ताने हिरीरीने, क्वचित् भावनाप्रधानतेने भाग घेणाऱ्यांचे आपल्या देशाला विस्मरण झाले आहे. या कृतघ्नपणावद्दल मनात खंत आहे.

दिनांक २० ऑगस्ट १९६७ ● ● ●

ऐन पंचविशी

मला तुम्ही माझ्या पंचविशीतील हकीगती विचारता–का रे बावांनो !

काय हो, या हकिगती मला तुम्ही का विचारता ? तुमच्या मनात असं तर नाहीना की आता मी पुरेसा म्हतारा झालोय, तेव्हा जुन्या आठवणी सांगायला हरकत नाही. हे पाहा, तुम्ही माझा चक्क अपमान करताय. माझे केस थोडे पांढरे झाले आहेत, हे मला कबूल आहे. पण मला म्हातारा का म्हणता ? मी तर अजून ऐन पंचविशीतच आहे.

तुमची शंका वरोवर आहे. या देशात जन्म घ्यायचा म्हणजे जन्मायच्या वेळेसच चाळीस वय असते. रडतराऊ चेहरे, सुरक्षितता, सावधानता, आनंदीपणाचा उपहास, सौंदर्याची उपेक्षा–आहे खरे या समाजाचे वैशिष्ट्य. तेव्हा त्या हिशोवाने

तर मी आलो की पंच्याहत्तरीला ! पण पुष्कळांची वयं वाढतात तशी पुष्कळांची कमी होतात. निदान व्हायला हवीत. मला तर वाटतंय, काल–परवा माझी वीस वर्षे पूर्ण झाली.

खरे सांगू, आज किती मुक्तपणाने वागायला मिळते. बोलायला मिळते. एखाद्या देखण्या स्त्रीजवळ जाऊन तिचे तारुण्याचे आणि सेंटचे गंध घेत तिला म्हटले, 'हाऊ ब्युटिफुल !' तर पूर्वीसारखी ती अंगावर फिस्कारून येत नाही. ती हसते. ती सुंदर असतेच असे नाही. सुंदर दिसते. देवाने दिलेले वरदान ती भोगीत असते. कोण काय म्हणेल याखाली ती दडपून गेलेली नसते. तिच्या त्या हास्यामुळे माझ्या वयातली आणखी एक-दोन वर्षे कमी झालेली असतात.

स्त्री दुर्मिळ होती–म्हणजे सुशिक्षित स्त्री गाठा-भेटायला दुर्मिळ होती तेव्हा तिच्याबद्दल फार विचित्र कल्पना असायच्या हो. एखादी पडदानशील स्त्री पाहिल्याप्रमाणे पदर सरकला की तरुण अस्वस्थ होत. आताची गोष्टच निराळी आहे. आता त्या पदरातल्या वस्तूबद्दल फाजील औत्सुक्य उरलेले नाही.

या घटकेला माझ्या तोंडाला चिचेने पाणी सुटते. चौकात उभे राहून पेरू खावा वाटतो. रस्त्यावर गप्पांचा फड उभा ठेवावा वाटतो. आणि एखादी यौवना पदर फडफडवीत तंग कपड्यात स्कूटरवरून गेली, की तिच्या मागे आपण असायला हवे होते यावद्दल हुरहूर लागते. रस्त्यात भेटणाऱ्या, कॉलेजात दिसणाऱ्या वा पार्टीत जमलेल्या या साऱ्या स्त्रिया काही स्वतःसाठी मिळवावयाच्या नसतात. मनाच्या पिंजऱ्यात पाखरू एकच ठेवायचे हे खरे. पण उडणारी पाखरे, त्यांची झेप, त्यांची टवटवी ! तारुण्य राखण्याची चेतना तेथून मिळवायला हरकत नाही. नाही का ?

परवा तारकेश्वरी सिन्हांचे भाषण ऐकायला गेलो आणि स्वतःला हरवून बसलो. वाटले, काय जहांबाज बाई आहे. तेवढीच चतुर. पुणेकरांना खूप करण्यासाठी कर्वे काय, मोरे काय, एस्. एम्. काय, टिळक काय, शिवाजी काय... सर्वांची नावे नेमकी पाठ करून तिने समोरच्या तारुण्याचा अनुनय केला. एका मुलीला गौरवण्यासाठी अशीच तिच्या प्रत्येक अवयवातील सौंदर्याची यादी–मी सुनवली होती. क्षणभर वाटले, ही बयासुद्धा ऐन पंचविशीत आहे. चेहऱ्यावर कळकटपणा नाही, उपदेशाचा डोस नाही, मुद्दाम केलेले विभ्रम नाहीत...आहेत ! पंचविशीत जगणारी माणसे आहेत म्हणायची अजून या देशात !

येते, तारुण्यही सांभाळता येते आणि ते आतंकनिग्रह गोळ्या किंवा मदनमस्त पाक घेऊन येत नाही. 'आमच्या वेळी असं होते' ही भाषा आली की मौज गेली. बापूसाहेब माटचांचे व्यक्तिमत्व जसे आपापल्या परीने चांगले होते, प्रा. शिवाजीराव भोसले यांचे व्यक्तिमत्व आहे. मास्तर कृष्णांच्या चाली तशाच जितेंद्र अभिषे-

कीच्या चाली. त्या त्या काळातले गंधर्व आणि लता तेवढयाच चांगल्या असतात. झाडाला गतवर्षी फळ येते तसेच या वर्षी येत असते. पुढल्या वर्षी येणार असते.

पंचविशी बदलत नाही. बदलतात कपडे. दुटांगी धोतर गेले. आली पँट. गोल पातळे गेली, आली सुरवार. आतले शरीर तेच असते. भुका त्याच असतात. सावरकरांचे वक्तृत्व ऐकून उठलेले रोमांच, गंधर्वाची गाणी ऐकल्याने हरवून गेलेले कान नायडूंच्या तडाखेबंद सिक्सरने गरगरलेले डोळे, पेशवाईतल्या रश्श्याने जिभेला सुटलेले पाणी...आजही तेच आहे. कॉलेजात स्टॅपिंग वाढले तरी वंडखोर हात तेच आहेत. खालच्या मानेने चालणाऱ्या मुली ताठ मानेने चालल्या म्हणून त्यांची मने तशीच विनम्र आहेत. आणि विभ्रम तसे सुंदरच आहेत.

अजूनतरी जग सुंदर आहे. माणसे सुंदर आहेत. समोर अन्याय पाहिला की मागचा-पुढचा विचार न करता पावले अजूनही तिकडे वेगाने पडतात. अजूनही एखादा वक्ता आवाहन करणारे बोलू लागला की रोमांच उठतात, अन् आयुष्य झोकून द्यावे वाटते. मंत्र्यांच्यासाठी पोलिसांनी रस्ता रोखला की वाटते, त्यांच्या हातातला दांडा त्यांच्या टाळक्यावर मारावा, किंवा अजूनही एखादा यशवंतराव, एखाद्या देशभक्त छगलांचा अपमान करू म्हणाला की माथे फिरते केवळ म्हाताऱ्या विधवा बाईप्रमाणे वोटे मोडण्यापेक्षा रक्त सळसळते. कधी कधी कृती घडते तेव्हा रक्ताचे सार्थक होते.

जग कितीही बदलू द्या. माझ्या दुनियेला मी बदलू देणार नाही. त्या दुनियेला तारुण्याचे आवाहन आहे. उद्याचा भव्य काल समोर उभा आहे. सभा आहेत. संमेलने आहे. सम्मीलने सुद्धा आहेत. जिथे उपदेशाची चेष्टा होते पण दोस्तीला मात्र कुशी लाभते, जिथे पुंडाईपुढे माघार नसते तर उत्तर पुंडाईनेच असते, तिथे फक्त काहीतरी घडावे. चांगल्या-वाईटांची शहानिशा वृद्धांनी करावी.

होय, अजून तरी तसे आहे. ज्या क्षणी दुसऱ्याच्या चुकांमुळे मी केवळ विव्हल होईन आणि घरात बसून राहीन तेव्हा माझी पंचविशी मला सोडून जाईल. चटट्यापटट्याचे कपडे कुणी वापरले की माझा पोटशूळ उठेल तेव्हा माझी षष्टी झालेली असेल. या अशा महाभयंकर जमावात माझी मान उंच राहायला एकच कारण आहे. कारण मी पंचविशीच्या उंबऱ्यावर उभा आहे. जेव्हा सौंदर्याचा विसर पडेल, अंगावर सुरकुत्या असलेले कपडे घालून मी रस्त्यावरून कुणी ओळखते का म्हणून हिंडू लागेन, जेव्हा माझे भाषण कुणी छापेल का म्हणून दैनिकांचे उंबरठे चढू लागेन, जेव्हा सवाई गंधर्वाची रंगत छोटया गंधर्वात नाही असली-भाषा तोंडी येईल तेव्हा मात्र माझ्या पंच्याहत्तरीचा समारंभ साजरा 'करवला' गेला असेल.

पण तशी वेळ येऊ देणार नाही. आणि आलीच तर मी आपल्या पावलांनी

नदीकाठी जाईन. ओंकारेश्वर, संगम किंवा लकडी पूल येथे जाणार नाही. तेथे म्हातारे लोक जातात. मी जाईन वंडगार्डनवर. भल्या पहाटे, जेव्हा खूप धुके असेल तेव्हा. मी स्वत:ला हळूच पाण्यात झोकून देईन. पाणी मला बाहेर फेकू लागेल तर त्याला समुद्रात झेप घेणाऱ्या चिरतरुण सावरकरांची मी शपथ घालीन. आणि मग त्या थंड, शांत रस्त्यावरून गुरुदत्त, हेमिंग्वे, किंवा मेरलिन मन्रो यांच्या घरचा रस्ता धरीन. ते झोपले असतील तर मी दाराशी वाट पाहात असेन. अशी झोप फार सुंदर असते. ती मोडायची नसते. केव्हा तरी जेव्हा मग माझे म्हातारे झालेले शरीर फुगून पाण्यातून वर येईल, तेव्हा पाडगावकर किंवा मनमोहन यांच्या कवितासंग्रहाची पाण्याने न भिजलेली पाने खिशातून बाहेर पडतील.

साल्यांनो, आज तरी मी पंचविशीतच आहे.

(मनोहरमधून)

मार्च १९७०

● ● ●

ओॲसिस

आयुष्याच्या रखरखीत वाटचालीत कुठेतरी सावली लाभते, आणि मग ती सावली हेच साऱ्या आयुष्यातील रम्य स्थळ बनते. तेथे पुन्हा पुन्हा जावे, पराभव विसरावेत, अपमान पोटात घालावेत, खचलेल्या मानेला ताठा लाभावा, मचूळ आयुष्यात सुगंध फुलावा असे वाटू लागते.

ती वस्तू, व्यक्ती, स्थळ, हौस, क्रीडा... जीवनाला नवा अर्थ देते. रोज मरू पहाणाऱ्या आत्म्याला संजीवनी देते. बहुतेकांच्या आयुष्यात अशी एक विसाव्याची

जागा असतेच. नचपेक्षा स्वाभिमानी, प्रतिभासंपन्न, महत्त्वाकांक्षी, पराक्रमी, अहंकारी माणसांना या दुनियेत जगताच आले नसते. कोडगी माणसे केवळ सवयीने जगतात. पण माणसाची तेजस्वी ज्योत विझता विझता नव्या इंधनाने पुन्हा पेटते. जणू काही ती सतत पेटतच होती. स्वाभिमानी माणूस त्याच्या स्वाभिमानी स्वभावाला न पेलणारे तडाखे झेलतो ते केवळ अशा विसाव्याच्या आधारानेच.

आता हा विसावा प्रकृतीनुसार ठरतो. संगीताच्या मैफली, शिकार, रहस्य-कथांचे वाचन, प्रवास, पत्रे, टेनिस, स्केटिंग, चित्रपट, नाटके, प्रिय मित्र–मैत्रिणीशी संभाषण, वनभोजन, कामतृप्ती ... अनेक प्रकारचे विषय मनाला भुरळ घालतात–ओढ लावतात. आयुष्याच्या सहारातले ओॲसिससुद्धा सारे आयुष्य सुसह्य करते.

माझे आयुष्य मी सहारा कधीच मानलेले नाही. मला ती नेहमीच पायवाट वाटते. अखेरीस सारे काही मानण्यावरच असते की नाही ? दुःखामुळे मला दीर्घकाळ त्रास होऊ शकतच नाही. पायवाटेवर कधी दगड, कधी काटेही येतात. पण आपल्यापुरती भली वाट मिळते. मी ती वाट शोधतो. रस्ता चुकला म्हणून खंत मानली नाही. आणि कळून सवरून चुकलेल्या रस्त्यावरून परत फिरण्याचे प्रयत्नही केले नाहीत. कुठेतरी चालायचेच ! मग इथे काय, तिथे काय, हा हिशोब मी मानला. त्यामुळे त्या त्या क्षणाच्या सुखावर मी संतुष्ट असतो.

आयुष्य सुंदर असते. कितीतरी सुंदर, आकर्षक, चित्तथरारक आमिषे सदैव रेंगाळत असतात. त्यांना नाकारणे हे खरे पुष्कळवेळा आनंदाचे असते तसेच त्यांना स्वीकारणेही आनंदाचे असते. सुखाची दुनिया निर्भेळ सुख आणीत नाही म्हणून नेमके सुख वेचून घ्यायला शिकावे लागते. मला वाटते मी ते शिकलो आहे. त्यातूनच पुष्कळशा दुःखांचा मला स्पर्शच झालेला नाही.

ही गोष्ट खरी की हे सारे करावयाचे त्यासाठी आपले स्वतःवर थोडे प्रेम असायला लागते. विश्वास असावा लागतो. आपली म्हणून काही शुद्धाचाराची कल्पना असावी लागते. स्वतःचा विश्वास असणारी कोणतीही जीवनपद्धती हाच खरा सदाचार होय. पुष्कळ वेळा तीच आपण उल्लंघतो. मग मात्र अनाचार होतो. मन सांगत असते की हे काम भले नाही. तरी आणिक अतिरेकी मोहात मन गुर-फटते. तिथे व्यभिचार होतो.

आणि म्हणून जीवनातील सर्व मोह एका मर्यादेपर्यंत जीवनोपयोगी असतात. सदाचारच असतात. मद्य वाईट असते हे ज्याला पटते त्याने मद्य पिता नये. ज्याचे मन परस्त्रीगमन हे निंद्य आहे हे आक्रंदून कोकलते त्याने ते करू नये, पण मद्यपान काय, सुंदर स्त्री काय, मुळात वाईट गोष्ट नसते. तुमच्या मनाच्या तोलकाटचावर तिचे माप ठरते.

मला स्वतःला म्हणूनच अमूक पाप, तमूक पुण्य असा निवाडा करता येतो.

फारसा पश्चात्ताप करावा लागत नाही. अर्थात पुष्कळ लोकांच्या मते मी बेफाम माणूस आहे. मद्य नर मी पितोच पण स्त्रीसुख हेही मी पाप मानत नाही. मी स्वतः-हून कोणास काहीही करावयास उद्युक्त केलेले नाही किंवा कोणाचे घर वसविलेले नाही. जे सुख माझ्या दरवाज्याशी आले, मला रुचले, माझ्या शरीराला आणि मनाला सुखकारक वाटले ते मी त्याज्य मानलेले नाही. पापपुण्याच्या पुस्तकी कल्प-नांवर माझा विश्वास नाही. पुढच्या जन्मी काय होईल याच्या चिंतेत हा जन्म मी सुतकीपणाने आणि भेकडपणाने जगायला तयार नाही.

याचमुळे मी अनेकदा साहसांना उद्युक्त झालो. अनेक नोकऱ्या केल्या, व्यवसाय केले. अनेकदा अंगावर यातील एवढी साहसे केली. पण माझ्या या जीवनदृष्टीमुळे मी त्यातून कोणताही वाईटपणा न येता बाहेर पडलो. आजही मला त्या जन्या-यश–अपयशाने गदगदून येत नाही. ते संपले आहे ही भावना जागी राहाते. माझ्या आयुष्यातल्या अनेक उत्तानात एक अनपेक्षित कलाटणी मिळाली. माझा संपन्न संसार सोडून मी एका व्यक्तित्वसंपन्न स्त्रीच्या प्रेमात पडलो. सगळे पडतात तसाच पडलो. पण मी ती केवळ घटकाभराची करमणूक मानली नाही. मी बारा वर्षे एका विवा-हित स्त्रीबरोबर नवरा–बायकोसारखा संसार केला. तो करताना माझ्या कुटुंबियां-वर मजकडून अन्याय झाला असेल जगाच्या रूढ अर्थाने ते पाप होते. थोडी बेजबाबदारी होती. पण आज जो कोणी मी आहे त्याची अनुभवसृष्टी मुळी त्या कालखंडातच जन्म पावली, त्याला काय करणार ? मी चारचौघांसारखे जीवन जगून माझे कुटुंब सुखी केले असते. पण मग आजचा 'मी' इथे नसतो तो जगावेगळा संसार मला मांडावा लागला तेव्हा मी खूप मनस्ताप सोसला पण माझ्या भल्याबाईट कल्पनांनुसार मला तो करता येईना. आणि संघर्षातच अडकून पडावे, मनोदौर्बल्यातच खिचपत राहावे, हे मला मानवण्यासारखे नव्हते. मोठ्या ईर्षेने मांडलेला तो संसार अगदी नाइलाजाने मला मोडावा लागला पण तेथेही मला वाटते, मी स्वतः निर्माण केलेल्या 'भल्याबाईट' आचारसंहितेशी इमानच राखले. परिणामी या घटकेला त्या संसाराची आठवण येते. सोडल्याबद्दल हळहळ वाटते, पण पश्चात्ताप वाटत नाही.

त्या मानसिक अवस्थेत एका स्त्रीचा माझा परिचय झाला. एका दिवंगत नटमित्राची ती प्रेयसी होती. अर्थात मित्राची पत्नी, प्रेयसी, रखेली माझ्या लेखी वर्ज्य. जग खूप मोठे आहे. आपल्या शक्तीच्या मानाने जग फारच मोठे आहे, मग मैत्रीशी बेइमानी करण्याची गरज काय ? आपल्या मोहाला आपण चॅनलाईझ् करायला हवे म्हणून ती स्त्री मला वर्ज्य होती. ही स्त्री एक गणिका होती. अगदी बाजारात मिळणारी ती वस्तू नव्हती, पण देहाचा अखेरी ती व्यापारच करीत होती आणि का कुणास ठाऊक मला व्यापारी पद्धतीने स्त्रीशी देवघेव करण्याचे

कारण पडले नाही आणि जमलेही नाही. वाटेल त्याने यावे आणि तोंड खुपसावे इतक्या सार्वजनिक ठिकाणी रमण्याइतका उदारपणा किंवा कोडगेपणा मजजवळ नाही. माझे मित्र सांगतात की खरे स्त्रीसुख अशाच ठिकाणी मिळते. कदाचित खरेही असेल पण मला जमले नाही एवढे खरे.

त्या स्त्रीचे शिक्षण बेताचे आहे. पण गणिकेला मनुष्यस्वभावाचे जे ज्ञान असते ते मोठ्या मोठ्या मानसशास्त्रज्ञांना नसते. मोठमोठे पुरुष एखाद्या मंदबुद्धी स्त्रीपुढे कसे लाचार होतात–किती दुबळे होतात–हे तिलाच कळू शकते. ही स्त्री चतुर खचित होती. चैतन्यदायी होती. उंच होती. सडसडीत होती. तिच्या त्वचेची मुलायमता खरोखरीच अपूर्व होती. रंगरोपणे किंवा सुगंध फासल्याशिवाय ती देखणी व गंधित होती. अशा स्त्रिया दुर्मिळ असतात. सौंदर्याची मापने फक्त चेहऱ्यात करण्यात आपली फसगत होते.

अशी ही स्त्री बोलताना फारच छान दिसे. मला तिला बोलके करायला मुळीच प्रयास पडले नाहीत. तिला बुद्धी आहे. कथनकला आहे, तिला हितगुजाची आवड आहे, याकडे पुरुषजातीचे दुर्लक्ष झाले होते. सारे येत ते तिच्या देहाशी झोंबत. शिक्षणाच्या अभावामुळे तिला असंस्कृत मानत आणि म्हणून रतियुद्धापलीकडे तिच्याकडून पुरुषांच्या अपेक्षा नव्हत्या म्हणून माझी तिच्या देहाबद्दलची अनासक्ती तिला अपूर्व वाटली. माझी तिच्याशी हितगुज करण्याची इच्छा तिला एकदम आवडली, असे वाटले.

मुंबईला त्या काळात मी नेहमी जात–येत असे. कामे संपली आणि डेक्कनला वेळ असला तर मी तिच्याकडे जात–येत असे. नुकतीच ती झोपेतून उठून आळसावून वाचत बसलेली असे. मी जाताच माझे ती मनभरून स्वागत करी आणि चहाचे घुटके घेत आमच्या गप्पा सुरू होत. तिचा जीवनपट तर तिने मला उलगडून दाखविलाच, पण तिच्याशी संपर्क आलेल्या अनेक पुरुषांची तिने जी तपशीलवार सखोल व्यक्तिचित्रे माझ्यापुढे उभी केली, त्यापुढे तर मी मी करणाऱ्या लेखकानी हात टेकावेत.

मला तिने अनेक कथाविषय पुरवले. मी स्वतः त्यावर कथा लिहिल्या. माझ्या तरुण लेखक मित्रांनाही कथाबीजे दिली. आपल्या कथनात काही साहित्यगुण आहेत, असे तिला मुळीच वाटत नव्हते. पण तिच्या भावडेपणातच जीवनसत्त्व होते. दुःखाला खोली होती.

तो एक माझा विसावा होता. कालपरत्वापर्यंत तरी होता. माझा तो मित्र अपघातात वारला तेव्हा तर एखाद्या पतिपरायण स्त्रीप्रमाणे ती कितीतरी दिवस अस्वस्थ होती. एकदा मी तिच्याकडे गेलो असताना ती घरी नव्हती, तीच काय, तिची आई, भाऊ कुणीच नव्हते. चौकशी करता कळले की तिची आई आजारी

पडल्याने ती सर्वजण हॉस्पिटलमध्ये गेली आहेत. का कुणास ठाऊक, एरवी कुणासाठीही हॉस्पिटलमध्ये न जाणारा मी पत्ता शोधत हॉस्पिटलमध्ये गेलो. मला पाहातच ती एकदम आश्चर्यचकित झाली आणि रडायला लागली, ही सहानुभूती तिला अनपेक्षित होती. तिच्या दुखावलेल्या अंतःकरणाला कुठे तरी स्पर्श झाला होता आणि ती माझ्या अधिकच जवळ आली.

पण आता ती काही पुन्हा भेटणार नाही. ती कुठेतरी अदृश्य झाली. माझ्या आयुष्यात ती विसावा म्हणून वावरली, पण मी तिच्या आयुष्यात विसावा असेनच असे नाही. या जबरदस्तीत अर्थही नसतो. मी तिचा तपास घेणार नाही, कारण मला भेटायचे असते तर ती मला भेटू शकली असती. कदाचित तिला अशा तऱ्हेने संबंध ठेवणे गैरसोईचे झाले असेल. काय असेल ते असो, ती आता मला भेटणार नाही.

पण ती भेटली नाही म्हणून काय झाले ? तिने काही काळ मला विसावा दिला हे मी विसरता कामा नये. तिचे एक मोडके-तोडके पत्र मजजवळ आहे. मी तिला हॉस्पिटमध्ये भेटल्यानंतर लिहिलेले. जुने कागदपत्र चाळताना ते कधीमधी हाती येते. त्या पत्राच्या दर्शनाने माझे आजचे बेडौल शरीर सुंदर होते, वार्धक्य गळून जाते-मला माझ्या सुंदर आयुष्यातली पायवाट दिसू लागते. वाटते, ती म्हणे त्याप्रमाणे मी तिला एकदा आपली म्हणायला हवी होती. ती म्हणाली होती, 'तुम्ही काही माझं गिऱ्हाईक नाही-माझे मित्र आहात, हे सारे तुमचं आहे. तुम्ही इन्कार करू नका...'

मी हसून जाई. मी इन्कार केला नव्हता तरी स्वीकारही केला नव्हता. तिला शरीरापेक्षा स्पर्शाची भाषा समजत होती. तिच्या देहाची पायवाट मी एकवार तुडवावी अशी तिची इच्छा होती.

पण ज्याचे त्याचे रस्ते निराळे असतात आणि म्हणूनच मी जीवनाला पायवाट मानतो. कुठेतरी गडप झालेली आणि कुठूनतरी येणारी. दोन्हीही अज्ञात. म्हणून असतो तो क्षण सत्य. एकादे झाड दिसले तर तिथे रमावे, कोणी साधू भेटला तर विरक्तीचा क्षण यावा, कोणी बालक भेटले तर बालपण यावे, त्याच्याशीच खेळावे, कोणी वृद्ध भेटला तर त्याला आधार द्यावा. कोणी कामांगी भेटली तर तिला डोळा घालावा अन् आडोशाला न्यावे, येईल ते त्या त्या मर्यादेने भोगावे. पण फार रेंगाळू नये. फार गुंतू नये. गुंतावा गुंतावळा होतो. साऱ्या शक्तीचा चुराडा करतो.

विसाव्याचा शोध करून तो लागत नाही, तर आहे तोच विसावा मानला पाहिजे आणि नेमके आपल्याजवळ काय आहे याचा अंदाज घेतला पाहिजे. गम्मत आहे ती हीच की सर्व सुखे हात जोडून या म्हणत असताना ती आपल्याला दिसत नाहीत. अज्ञात सुखाच्या रंगीबेरंगी मृगजळाचा मोह तेवढा अनावर होत जातो

आणि आपोआपच आपला कारवा ओॲसिस शोधत भटकतो–अंतापर्यंत–आणि हाती उरते ती केवळ तप्त वाळू. त्यापेक्षा आपला कारवा हाच ओॲसिस मानला– अकारण तृष्णा लागूच दिली नाही किंवा लागणार असेल तर आपल्या गरजेपुरते जल जवळ बाळगले तर तो ओॲसिसचा वृथा शोध थांबेल.

पण मग कदाचित पुष्कळांना प्रवासच नकोसा वाटेल.

दिवाळी १९७०

● ● ●

कुठेतरी खोलवर

एका खोलखोल विहिरीच्या काठावरमी उभा आहे.
मला तळ पहायचाय.
पण त्या खोल खोल अंधारातून.....
शिरशिरे आणणाऱ्या थंडगार हवेतून.....
शेवाळातून....
मला नीटसे दिसत नाही.
पण
जाणवते आहे-निश्चित जाणवते आहे.
साऱ्या परिसरावर हुकमत गाजवणारा, भारून टाकणारा,
विद्ध करणारा, हर्षभरित करणारा,
कृतज्ञ ठेवणारा
विहिरीचा स्वच्छ तळ आता स्वच्छ समोर दिसू लागला आहे.
कुठे तरी खोलवर.....कुठे तरी खोलवर.

फार वर्षे झाली आहेत. चांगली तीस पस्तीस वर्षे. मन उघड्यावर पडलेले असते तर उन्हापावसाने झिजून गेले असते किंवा घुळीने माखून गेले असते. पण मुळातच ते फार खोल आहे. थांग न लागण्याइतके. वर्षे कितीक गेली वा शल्ये जळून गेली तरी ते टवटवीत राहते. कधी कधी काळाला जे नष्ट केले असे वाटते ते जसेच्या तसे अगदी फ्रिजमधे ठेवल्यासारखे मनाच्या गाभाऱ्यात टिकून राहते. हिरवेगार–टवटवीत–अगदी झाडावरून नुकत्या खुडलेल्या फुलासारखे.

माझे आयुष्य तसे फार सुखाचे गेले असे म्हणता येईल. पण लोक म्हणतात तशा अर्थाने सुखाचे नाही. संपत्तीत मी लोळत पडलो नव्हतो, कीर्तीच्या शिखरावर आरूढही झालो नव्हतो. स्त्रियांचा मी प्रिन्स चार्मिंग नव्हतो तरीही मी सुखी होतो. कारण वर नमूद केलेल्या सर्व स्थानांच्या जवळजवळ मी पोचलो होतो. पैसे मी पाहिले. खूप पाहिले. लक्षावधी रुपये आणि तेही अगदी तरुणपणी–स्वकष्टार्जित 'कीर्ती' तशी अनेक अर्थांनी कमावली. गमावली देखील. आणि मी प्रिन्स चार्मिंग नसलो तरी पुष्कळांना आवडावा असा होतो. (भूतकाळात बोलले म्हणजे आत्मश्लाघा होत नाही म्हणतात) मी जे जे अपेक्षिले ते बहुतेक मला मिळाले. पण मला टिकवता मात्र फारसे आले नाही. पैसा मी चुकीच्या औदार्यात गमावला. कीर्ती मी रूढार्थाने चंट वागून गमावली आणि आकर्षकपणा केवळ वयाने गमावला. हे सारे घडले म्हणून माझ्यावर अन्याय झाल्याचा दावा नाही. फक्त त्या गमावण्यात काही वेदना होत्या. त्या वेदना केव्हा केव्हा सलतात. ज्याचे लहानपण गर्दीत जाते, त्या त्या माणसांना झगडत मोठे व्हावे लागते. आमच्या वाड्यात चांगली पन्नास मुले होती–त्या मुलांच्या समुदायात वावरावे लागे. शारीरिक सामर्थ्य, सौंदर्य, सांपत्तिक परिस्थिती, हजरजबाबीपणा याची तेथे परीक्षाच होई. एवढ्या मुलांत उठून दिसण्यासाठी फार यातायात पडे. त्यामुळे बालपणीच केवळ अस्तित्वासाठी खूप झगडावे लागले. घरच्या बालबोध वागण्यामुळे अंगी चुटचुटीतपणा नव्हता. फाजिल शिस्तीमुळे कपडालत्ता, खाणेपिणे, यावाबतीत अनावश्यक पारतंत्र्य होते. वडिलांनी डोळे वटारले तर सर्व भावंडे मुतावीत असा वडिलांचा दरारा होता. आणि तो केवळ घरात नव्हता तर सर्वत्र होता. त्या काळच्या इंग्रजी हापिसात सुद्धा होता. आणि म्हणून आमच्या शैशवाच्या पक्ष्याचे पंख नेहमीच कापलेले दिसत. वडील घराबाहेर पडले म्हणजे एकप्रकारचे आम्हाला स्वातंत्र्य गवसे.

त्या वाड्यात अर्थात्च मुलीही होत्या. त्यात अगदी फार देखणी कुणी नसावी. होत्या साध्याच. खणाच्या चोळचा घालणाऱ्या–धारवाड, इचलकरंजी, नागपूर येथल्या पेठांची लुगडी नेसणाऱ्या–वाचनाचे ज्ञान, शिवलीलामृत फारतर महिपती

येथपर्यंत असणाऱ्या वायकांच्या त्या मुली. जास्तीत जास्त हेडक्लार्क पदावर पोचलेल्या कारकुनाच्या मुली. त्या अशाच सुखवस्तु घरात जाणार होत्या. काळाशी भांडून थोडीथोडी कपात करीत हातभर लांबीचे पोलके सुतासुताने कमी करून फारतर कोपरापर्यंत आणणार होत्या आणि स्लीव्हलेसचा जमाना येईल तेव्हा तरुण पिढीला शिव्या देणार होत्या. ब्राह्मण, त्यातही कोकणस्थ ब्राह्मण, त्यातही मध्यमवर्गीय ब्राह्मण–शिवाय पुणे. पेशव्यांच्या गोखले सरदारांचा वाडा... छः छः म्हणजे खरे तर या वाड्यात आधुनिकतेला मुळी वावच नव्हता.

त्यावेळेस मी निळ्या रंगाच्या अर्ध्या चड्ड्या वापरी. त्यांचा रंग पहिल्या दोन धुण्यात जाई. पण खाकी रंगापेक्षा त्या बऱ्या दिसत. त्यावर रेषांचा एक पिवळट सदरा असे. पायात येरवड्याच्या चपला असत. चपला ही त्या काळातली चैन होती. चेहऱ्यावर एक सखोल वावळटपणा असे. डोक्यावर शेंडीच्या जागी शेंडीच्या खुणा असत. थोडक्यात त्या वाड्याच्या संस्कृतीला शोभणारा एक गबाळा मुलगा असे माझे तेव्हाचे वर्णन होऊ शकले असते. त्यातच गुडघ्याला, पायाला पडून झडून झालेल्या जखमा–खपल्या... माझे मलाच आज हसू येते.

पण अशा मुलांची कुठल्या तरी वाड्यातल्या मुलीवरून चेष्टामस्करी होई. त्यांपैकी कुणाचेही कुणाशीही कसलेही लफडे झाले नाही वा लग्न झाले नाही. पण मुलीवरून चेष्टा करायची ही वाईट खोड घरादारातून त्यावेळी होती. कधी कधी त्याचे स्वरूप मात्र जीवघेणे होई.

आमच्या वाड्यात एक कुटंब राही. आजचा समाजवादी कार्यकर्ता मधू लिमये यांचे ते मामा होत. मधू लिमये हासुद्धा एक बावळट, सदा रडणारा दुवळा असा माझा वालमित्र. त्या कुटुंवातील एकजण परप्रांतात चांगल्या हुद्द्यावर नोकरीला होते. त्यांची सारी नोकरी क्वेटा, लाहोर, जम्मू एवढेच नव्हे तर परदेशातही झाली होती. समृद्धी व सत्ता यामुळे त्यांचा खूप दवदवा होता. त्यांचा थोरला मुलगा क्वेटचाच्या भूकंपात वारला. त्याना एक मुलगी होती. तिला आम्ही छगुल म्हणत असू. ह्या नावाचा अर्थ मला कळला नाही पण अजूनही त्या नावाने रोमांच उठतात. ही मुलगी तेव्हा कशी होती हे आता सांगता येणार नाही. कारण आता तेव्हाचे डोळे नाहीत. आजच्या डोळ्यांनी खूप दुनिया पाहिली–खूप लावण्ये पाहिली–त्यामागचे सामान्यपण पाहिले. तेव्हाचे डोळे निराळे होते. कसलेही सळसळणारे तारुण्य, कोवळेपणा, आकर्षकता एकदम मनाला हळवा करून जाई. छगुल या नावाने मी तेव्हा अडकलो होतो. खरे तर आजही अडकलो आहे.

आमच्या घरी रात्री दरवार असे. त्याला आमचे नातेवाईक–वहुशः वडिलांनी नोकरीला लावून दिलेली मंडळी, मामा, आतेमामा असे असत. वडील लोडाला टेकून बसत. मग तेवढ्यापुरते आपल्या तापसी दुनियेतून ते खाली उतरत. जरा

खेळीमेळी, चेष्टामस्करी होई. त्या अशाच बैठकीत छगुलचे सुटीवर आलेले आई-वडीलही सामील होत. बोलता बोलता मला मांडीवर घेऊन त्यांनी सांगितले की हा शेंडीवाला जावई आपल्याला पसंत आहे. चेष्टेची मस्करी पुढे एवढी वाढली की माझा खरोखरीच जावई म्हणून उल्लेख होऊ लागला. कौतुक होऊ लागले. चेष्टा नको असली तरी तिच्या आईने दिलेले पेढे, द्राक्षे, काजू गोडच लागत.

ही चेष्टा पुढे एवढी नित्याची झाली की त्याला थोडे गंभीर स्वरूप आले. छगुल त्यावेळी भोवे मास्तरांकडून गाणे शिके. तिचे 'करमरिया' किंवा 'स्वकुल तारक सुखा'चे सूर अजून माझ्या कानात गुणगुणतात. तिचा आवाज चांगला होता. पण पुढे काय झाले कुणास ठाऊक, तो आवाज ती विनाकारण हरवून बसली. खरोखरीच तिला तिच्या आवाजाची किंमत कळलीच नाही, अन् तिची स्वतःचीही किंमत किती ते समजले नाही.

तिचे गाणे, तिचे वागणे, तिचे असणे, खरे म्हणजे चांगल्या श्रीमंत कुलाचे होते. ही वस्तू आपल्यासाठी नव्हे असे मला वाटे. माझ्या आणि तिच्यात एवढे जमीन–अस्मानाचे अंतर होते की छगुल माझी वायको ही चेष्टा मला क्रूर वाटे. पण ती चेष्टा नव्हती. तिच्या आई-वडिलांची सद्भावनाच होती. माझे वावळट दिसणे वरवरचे असते असे त्यांना वाटत होते.

वाड्यातील मुले अर्थात माझी चेष्टा करीत. त्या चेष्टेत खूप खूप कुचेष्टा असे. आज मला कळतंय की ती सारी मुले फार मूर्ख होती. माझ्यासारख्या पुरुषाला छगुल अगदीच सहजसाध्य होती. पुरुषाच्या चेहऱ्यावरचे वावळेपण फार काळ टिकत नाही. कर्तृत्वाला धुमारे फुटले की पुरुष तर निराळे रूप धारण करतो. आज बाजू पलटली आहे. पण तेव्हा समवयस्क मुले मला फाडून खात.

एकदा परत गेल्यावर छगुलचे आई-वडील पुष्कळ दिवसांनी परत येत. ते जाऊन खूप खूप दिवस झाले होते. माझी चेष्टा प्रतिदिनी होत होती. एक दिवस 'बापू आले' असे कोणीसे म्हटले म्हणून मी तडक दिंडी दरवाज्याशी गेलो. दोन घोड्याच्या बग्गीतून बापू उतरत होते. दोन घोड्याच्या बग्गीतून आम्ही फक्त संस्थानिक वावरताना पहात असू. त्याकाळी फॅशनमध्ये मोडणाऱ्या कपड्यात छगुलची आई उतरत होती. कोरे करकरीत कपडे, हँडबॅग, थर्मास, कॅमेरा, वॉकिंग स्टिक आणि मुद्देसूद होल्डॉल ... सारेच चकचकीत. परीटघडीचे. वास्तविक प्रवासाचा आणि मळकटपणाचा एवढा अविभाज्य संबंध माझ्या मनात होता. ही साजिऱ्या कपड्यातली अन् अधांतरी माणसे मुळी या भूमीवरची नव्हतीच. आणि मग छगुल बग्गीतून खाली उतरली.

पांढराशुभ्र फ्रॉक–पांढरा म्हणजे किती, टिनोपॉलयुक्त–तेव्हा टिनोपॉलचा शोध लागला नव्हता तरी. दोन वेण्या होत्या–पुढे ओढलेल्या. त्यात फुले होती–

विलायती. म्हणजे नावे माहीत नसलेली. रंगीत, चकचकीत अशी हातात एक गमतीदार पर्स होती. पर्स हा शब्द आज कळला. तिची मान ताठ होती. कण्यात आणखी ताठा आणणाऱ्या उंच टाचेच्या सँडल्स होत्या. त्याही पांढऱ्याशुभ्र होत्या. छगुल मूळची सावळी. पण लाहोर–सियालकोटच्या थंडीने गोरी दिसत होती. आणि त्यात मुक्त हस्ताने तिने पावडर लावली होती.

तिच्या आणि माझ्यात कसलं साम्य होतं! मनात हिरमुसला होत आ वासून मी तिच्याकडे बघत होतो. ती खाली उतरली. टपटप सँडल्स वाजवीत मुलांच्या घोळक्यात निघून गेली. मला पाहून तिने न पाहिल्यासारखे केले.

स्त्रीची नजर किती कुचेष्टेची असू शकते हे त्या चिमुरड्या वयात मला एकदाच आणि अखेरचे कळले.

अजूनही कोठलीही स्त्री परिचयाची झाली की प्रथम बालपणी माझ्या समोरून चालत गेलेली, माझ्या नजरेचा अव्हेर करणारी, चौदा वर्षांची गोरीगोरी-पान दिसणारी छगुल मला आठवते. तिने मला केलेली ती जखम आठवते आणि मग एरव्हीचा माझा मऊपणा, खेळकरपणा एकदम संकोचतो आणि स्त्रीशी मी पुरुषासारखा ताठरपणे वागतो.

दिवाळी १९६८

• • •

पतनाचा क्षण

कोणत्या तरी एखाद्या हट्टासाठी जगण्याचे भाग्य लाभावे अशी माझी देवाजवळ प्रार्थना असते. इंधनाशिवाय जशी ज्योत प्रकाशत नाही त्याचप्रमाणे काहीतरी ईर्षेशिवाय जीवन उजळत नाही हेच खरे. आणि त्यामुळेच काहीतरी मला जाळीत असावे आणि माझे आयुष्य सदैव पेटते असावे अशी माझी इच्छा असते. तसे जर पाहिले तर आपल्याला ओळखणारे खरोखरी फारच थोडे लोक असतात. नीट यादी केली तर पाचपन्नास माणसेही आपल्याला नीटशी ओळखत नाहीत. आपले बरेवाईट झाले तर एखादा सुस्कारा सोडणारे शेपन्नास असले म्हणजे लौकिकदृष्ट्या आयुष्य यशस्वी झाले असे आपण म्हणतो. या शेपन्नास माणसांचा समुदाय खरे म्हणजे त्या

माणसाचा समाज असतो. या समुदायाच्या लहरीवर सामान्य माणूस आपले जीवन वेतीत असतो. आपली जीवनविषयक कल्पनासुद्धा या एवढचा छोट्याशा समाजाच्या खुषीपुरती मर्यादित असते. एखाद्या माणसाच्या परिवारात व्यापारामुळे जर गुजराथी, सिंधी, मारवाडी मित्र असतील तर तो खोटी जाहिरात करणे, माप खोटे लावणे, अनीतिकारक मानले जात नाही. पण खोटे वायदे देणे अनीतिकारक मानले जाते. त्याचे मध्यमवर्गीय, शिक्षक, कारकून मित्र असतील तर त्याच्या नीतिविषयक कल्पना बहुशः स्त्रीसंबंधापुरत्या मर्यादित राहतात. माणसाच्या मनाचे पतन वा उत्थापन म्हणूनच तसे पुष्कळसे सापेक्ष असते. सत्याची, नीतीची, बंधुत्वाची अबाधित अशी व्याख्या कधीच नसते.

आपल्या भक्ष्यावर लक्ष ठेवून त्याच्या अत्यंत नाजूक क्षणी ते गिळंकृत करणे आणि जीवन व्यतीत करणे हा जंगलचा कायदा आहे. माणूसही पुष्कळ अंशी पशू असला तरी तो एकांडा नाही. त्याच्या जीवनमरणाचा लढा हा एकाकी नसतो आणि म्हणून आपले भक्ष्य केवळ सावजाच्या नाजूक क्षणाशी त्याला निगडित करता येत नाही. एवढेच नव्हे तर आपल्यावरही तसाच अनपेक्षित प्रहार होणार नाही याविषयीच्या खात्रीने तो जगात वावरू शकतो.

आणि म्हणून आपली नीतिमूल्ये पुष्कळदा भयापोटी उत्पन्न पावतात. रस्त्यावरून जाताना जेव्हा एखादी गौरवर्णी पुष्टांगी आपल्या तारुण्याचे मस्तवाल दर्शन करीत बेदरकारपणे जात असते तेव्हा विव्हल न होणारे मन केवळ दुर्दैवी होय. पण ही घायाळ मनःस्थिती लपवून माणसे तेथून नजर उचलतात–केवळ भयाने. जर जनशक्तीचे किंवा दंडसत्तेचे भय नसते तर कोणतीही लोभनीय वस्तू, व्यक्ती किंवा वृत्ती ही नेहमीच स्पर्धेचा विषय होईल आणि समता किंवा समान वाटपाचा न्याय धुडकावून देऊन बलवंताच्या मालकीची होईल.

म्हणजे आपले पावित्र्य किंवा नीतितत्त्व हे काही स्वयंसिद्ध नव्हे तर ! ज्याने सुखदुःखाच्या किंवा मोहाच्या स्थानाकडे हेतूपुरस्सर पाठ फिरवली असे विरक्त किंवा तृप्त आत्मे सोडले तर बाकीच्यांचे काय ?

त्यांची पतने होत असतात. त्यांच्या जिभा लाळावत असतात. त्यांच्या मनात अनंत गढूळ विचार घोंगावत असतात. पण भयाने त्यांच्या स्नायूचे बळ गेलेले असते. वखवखलेल्या जिभा नाइलाजाने आत ओढीत हे लांडगे पुन्हा अंधाऱ्या गुहेत जाऊन घोरत पडतात.

पण मी तर यालाही पतन म्हणत नाही. प्राण्याला भूक लागली तर त्याने खाल्ले पाहिजे. त्यासाठी जीवनमरणाचा लढा दिला पाहिजे. म्हणजे त्या भुकेची तृप्ती अपरिहार्य आहे–तो धर्म आहे. धर्मच कसा अधर्म होईल ? मग पतन तरी कोणते ?

स्त्रीसुखापासून वर्षानुवर्षं वंचित असणारा नौसैनिक जेव्हा वेश्यागमन करील तेव्हा फार तर त्याला संयम नाही किंवा त्याची रुचि चांगली नाही असे म्हणता येईल. भुकेलेल्याने रस्त्यावरचे सडके फळ खाल्ले तरीही त्याने फार मोठे पाप केले असे म्हणता यावयाचे नाही.

मग पतन कोणते आणि असे पतन घडते तरी कसे ?

आरंभी म्हटले की कोणत्याही एखाद्या हट्टासाठी जगायचे मला भाग्य लाभावे अशी माझी प्रार्थना आहे ती अशासाठी की हट्टाविना-ईर्षेविना माझे आयुष्य बेकार होईल. पुष्कळजण अभागी त्यावाचून जगतात. मला आजपावेतो तसे करावे लागले नाही हे माझे भाग्य आहे. पण या हट्टाला तडा जाण्याजोग्या गोष्टी घडल्या. त्या आठवल्या की मी स्वधर्म का सोडला याबद्दल मला फार फार वाईट वाटते. आणि त्याबद्दलची खंत माझ्या मनातून मुळीच जात नाही.

मी वयाने २३ वर्षांचा होतो. वडील वारलेले होते. ४२ च्या चळवळीत गोळी खाल्ल्यामुळे शारीरिक कष्टाची कामे करून नाव काढणे सुतराम सुद्धा शक्य नव्हते. कुटुंब उभे रहावे या अभिप्रायाने विवाहही केला होता. जीवनात काही भलीवाईट स्वप्ने बांधली होती. पु. ग. सहस्रबुद्धे–बापूसाहेब माटे यांनी कुठेतरी ठिगणी टाकली होती. आणि अंतर्यामी मन धुमसत होते. व्यवसाय होता शिक्षकाचा. पण उडी होती फार मोठी. इष्टमित्रांच्या एकत्र निवासासाठी गर्दीच्या शहरी जीवनापेक्षा उपनगरासारखी वस्ती करावी अशी माझी कल्पना होती. आणि त्यासाठी मी जमिनीच्या शोधात होतो. घालवण्याजोगे काही नसल्यामुळे कोणत्याही साहसाला मन तयार होते. एक दिवशी सहज बोलत असता मोतीलाल सरेलाल नावाच्या एका व्यापारी मारवाड्याची गाठ पडली. ते म्हणाले, 'मी देतो तुम्हाला एक जमीन.' गाडीत घालून ते मला पुणे-आळंदी रस्त्यावर घेऊन गेले. त्यांनी दाखवलेली जमीन चांगली पस्तीस एकर होती. मी म्हणालो, 'माझ्या खिशात या वेळेला सत्तर रुपये आहेत. तुमची ही एवढी जमीन मी घेणार कसा ?' ते म्हणाले, 'तुम्हाला ही जमीन आवडली असेल आणि तुमच्या उपयोगाची असेल तर तुम्ही आता करार करा. पैसे सवडीने द्या.' मी केवळ हसलो. कारण सत्तर रुपये खिशात असताना मी पन्नास हजार रुपयाची जमीन घेण्याची भाषा बोलत होतो. मला हे त्यांचे प्रपोजल प्रथम चेष्टेचे वाटले. ते म्हणाले, 'तुम्ही हसू नका. ही सर्व जमीन मी तुम्हाला १०५० रु. एकरप्रमाणे देतो. मी तीनशे रुपयाप्रमाणे घेतली आहे. जमीन सुरक्षित आहे. चांगली आहे. तुम्ही उत्साही आहात. तुमच्या हाताला यश आहे. मी तुमच्या हातावरच्या रेषा पाहून सांगतो की तुम्ही यशस्वी व्हाल. आज तुम्ही ५० रुपये देऊन करार करा. आजपासून पंधरा दिवसात तुम्ही पाच हजार रुपये उभे करा. आणि जमिनीचा ताबा मी तुम्हाला ५००० रु. देताच देईन.'

तसे घडले. मी तो करार केला. माझ्या लेखनशक्तीचा पहिला हुंकार मला तेव्हा मिळाला. मी काढलेल्या पहिल्या पुस्तिकेत एका आदर्श वसाहतीचे मी स्वप्नचित्र उभारले होते. त्यावर लोक लट्टू झाले. अवघ्या पाचशे रुपयात एक प्लॉट याप्रमाणे २५० प्लॉटस् विकले गेले. मजजवळ धड फर्निचर नव्हते–जमिनीचा नकाशा नव्हता. स्टाफ नव्हता. अवघ्या पाच दिवसात एका जाहिरातीला म्हणून आलेल्या ५०० माणसांच्या अर्जातून अडीचशे प्लॉटस् विकले गेले. स्कीम यशस्वी झाली.

मग खरेदीपत्र झाले. उद्घाटनाचा मोठा समारंभ झाला. वैकुंठभाई मेहता अध्यक्ष होते. ११००० फुटांची प्लॉटची मर्यादा केवळ माझ्यामुळे ५००० फुटापर्यंत आली. तसा (जी. आर.) मुंबई सरकारच्या रेव्हेन्यू खात्याने केला आणि वसाहतीच्या नफ्याच्या पैशातून मी माझ्या असोसिएटेड टेंडर्स या संस्थेचा व्यापही वाढवला.

या सर्व प्लॉटधारकांची सहकारी सोसायटी केली तर त्यामुळे घरबांधणी सोपी होईल–स्वस्त होईल, या कल्पनेने मी एक सहकारी सोसायटी निर्माण करावयाचे ठरवले. मला या व्यवहारात सुमारे ५० हजार रुपये फायदा कागदोपत्री दिसत होता. तो सर्वांना ज्ञात होता. तो गृहीत धरूनच सदोंनी प्लॉट घेतले होते. मी नफा न घेता सहकारी तत्त्वावर संस्था चालवावी असे मागाहून काहींना वाटले. अर्थात् मला ते मंजूर का असावे ! त्यामुळे त्यांचे पैसे परत घेऊन ते निघून गेले.

कायद्याचे यथास्थित ज्ञान नसल्याने सोसायटी रजिस्टर करावयासाठी त्या दिवशी जे हजर होते त्या चौदा लोकांच्या मी सह्या घेतल्या. संस्था रजिस्टर झाली. तोपावेतो सर्व गुण्यागोविंदाने चालले होते. पण सहकारी मान्यता मिळताच त्यातली काही अगदी जवळची मंडळी कायद्याची भाषा बोलू लागली. अर्थात् कायद्याने काही होणार नव्हते. पण गुंतागुंत मात्र वाढणार होती. वसाहतीच्या जमिनीची मालकी माझी. पण नकाशा सोसायटीच्या नावे मंजूर झालेला. त्या चौदा सभासदांचे पैसे सोसायटीकडे वर्ग केलेले. आणि घरची समजली जाणारी माणसे (नातेवाईक आणि जिगरीदोस्त) मत्सराने पेटलेली. मजजवळचा सर्व पैसा त्या नव्या जमिनीत अडकलेला. प्लॉटधारकांची प्लॉट ताब्यात लवकर देण्याची निकड. या सर्व प्रकारात शब्दाशब्दी, पत्रोपत्री होऊ लागली व काही अधिकाऱ्यांचे दडपण येऊ लागले. धमक्या दिल्या जाऊ लागल्या. जी माणसे खरे तर परवा परवापर्यंत माझ्या समोर वसायला भीत असत ती आढ्यतेने मला तुरुंगात घालायच्या धमक्या देऊ लागली.

माझ्या भलाईला ही भलतीच फळे आली. आरंभी काही तशी कल्पना नव्हती. भल्या बुद्धीने मी सोसायटीचा मांड मांडला. त्यासाठी माझे एकेकाळचे स. प. कॉलेजमधले लेक्चरर यांना त्यांच्या विनंतीवरून सोसायटीचे अध्यक्ष केले. पण याच माणसाने पलटी खाल्ली आणि मला धोक्यात आणले. त्यांना त्यावेळेस पैशाची

गरज होती. त्यांनी माझ्याकडे पाचशे रुपये लाच मागितली आणि ती दिली तर आपण हे प्रकरण मिटवू असे सांगितले. आजच्यासारखा त्याही विश्वासात मी भांडखोर होतो–हट्टी होतो. त्यामुळे त्यांची ती मागणी मी नाकारली.

त्या चौदा लोकांच्या सोसायटीत माझे एक जवळचे नातेवाईक होते, तेही त्या मंडळींना सामील झाले. त्यांचे म्हणणे 'न्याय–अन्याय आम्हाला माहीत नाही. आज तुम्ही कोंडीत आहात आणि सोसायटीजवळ पैसे नाहीत. आमच्या पैशावर तुम्ही फायदा मिळवला आहात. तो आम्ही तुम्हाला पचू देणार नाही.' ते नातेवाईक जवळचे होते. अगदी जवळचे होते. मत्सराने तेही पेटले होते. एवढंचाशा वयात मी हजारो रुपये मिळवावेत हे त्या मिलिटरी अकौंटमधल्या कारकुनाला कसे रुचावे ! वास्तविक त्यांचा माझ्या व्यवसायाशी कवडीचा संबंध नव्हता. मी फुकट दिल्यामुळे त्यांचे नावे प्लॉट होता. त्यावद्दल संध्याकाळी त्यांचे ऑफिस सुटल्यावर ते मला थोडीफार मदत करीत. मदत म्हणजे मला भेटावयास आलेल्या माणसांशी मी भेटेपर्यंत गप्पा मारीत बसणे. त्यांचे म्हणणे 'माझ्या या उद्योगात ते माझे सहकारी होते.' त्यांनी या प्रकल्पात एक पैसाही घातला नव्हता. उलट माझ्या पैशाने चहापाणी करण्याची त्यांची उत्तम सोय झाली होती. वुडालो असतो तर सहानुभूतीदर्शक असे दोन शब्दसुद्धा त्यांनी काढले नसते. उलटपक्षी 'खाशी जिरली' अशा आनंदातच ते वावरले असते. पण केवळ वेळ घालवण्यासाठी माझ्या ऑफिसात येऊन बसणाऱ्या या माझ्या नातेवाईकाला पैशाचा लोभ सुटला. मी अडचणीत सापडलो तर आपोआपच त्यांचे सहाय्य मागेन यासाठी त्यांनी आपले कायदेबाज डोके माझ्याविरुद्ध वापरले आणि मग हे चौदा सभासद व उरलेले दोनशे सभासद अशा दोन फळ्या पडल्या.

कायदा माझ्या बाजूला होता. तरी सरकारमान्य संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना त्रास देता येईल असे करता येण्याजोगे खूप होते. मला असे दिसू लागले की या नातेवाईकांमुळे ही वसाहत होणार की नाही ? पैसे भरलेल्या लोकांना पैसेही मिळणार नाहीत–आणि प्लॉटही मिळणार नाही–माझ्या नशिबी मात्र केवळ वेइज्जत येईल.

माझ्या पतनाचा हाच क्षण होता. सारे आयुष्य समोर होते. धंद्यात जम वसत होता. हक्क, कायदा, याबद्दल हट्ट धरायचा आणि मुकाबला करायचा, की एका सामान्य घरभेदी नातेवाइकाला शरण जायचे ! मग जायचेच तर माझ्या लाचखाऊ शिक्षकांना का नाही शरण गेलो ?

घरातूनही दडपण येत होते. डिपॉझिटर्सचा ताण वाढत होता. मी अखेरी त्या नातेवाईकापुढे तडजोडीचा हात केला.

त्याला रोख रुपये तीन हजार मला द्यावे लागले. त्याच्या एका सामान्य

पराडा ग्रंथ संग्रहालय, डाणे. स्वाधीन १०१
क्रमांक ...1.9.6.7.2... दि: ...1.2.6.6.
किंमत ...3.9.8.6... मॉर्क दि: 2.7.6.4.7

नाटकाचा मला निर्माता व्हावे लागले. त्यात माझे काही पैसे गेलेच होते. त्याचे पुस्तक मला काढावे लागले. त्यातही काही पैसे घालवले होते. त्यांची कुरकुर आणि पिरपिर कायमची गप्प करावी, एका घरमेद्याला शांत करावा, सौभाग्यवतीना संतुष्ट करावे, म्हणून मी आयुष्यात हार घेतली–केवळ सुस्थिरता पाहिली. पण ती सुस्थिरता तशी विकत मिळत नाही हे मला कळायचे होते–करू नये ती तडजोड केली. स्वास्थ्यमय भविष्याकडे पाहून तत्त्वच्युत झालो. कोणताही अधिकार नसताना त्या माणसाला तीन हजार रुपये दिले आणि त्याच्या प्रीत्यर्थ दोन हजार रुपये खर्च केले.

तत्त्व सुटले की मग थांबता येत नाही. कारण मग तुमची घसरगुंडी होते. मी दिलेल्या पैशाने काहीच झाले नाही. वाद धुमसत राहिला. पैसे घेऊन हा माणूस नामानिराळा राहिला. तडजोडीसाठी म्हणून आणखी एक गोडबोल्या माणूस या वादात पडला. त्याचे नाव परदेशी. त्याने तर साफ मला कापला. माझ्यावतीने तडजोड करायला जो पुढे झाला तोच नेमक्या वेळेस प्रतिपक्षाला सामील झाला.

सरकारी डिपार्टमेंटस् परस्परविरुद्ध निर्णय देत होती. लोक मात्र हवालदिल झाले. एका बालवयाच्या तरुण माणसावर विसंबून त्यांनी पाच हजार रुपये गुंतवले होते. नुकतेच टिळक पोल्ट्री फार्मचे प्रकरण झालेले होते. मनातून त्यामुळेच मी थोडा बावचळलो होतो. त्याच वेळेस मी न्यायालयात जायला हवे होते. पण तो दीर्घसूत्रीपणा मला नको होता. मला सोन्याची खाण सापडली होती. धनवंत व्हायचे होते. आणि आणखी एक पतनाचा क्षण आला. वास्तविक मुळात मी या सर्व कामात घट्ट कुठे उभा राहिलोच नाही. पुढे कोर्टाने माझ्या बाजूने न्याय दिला. पण फार पुढे. मी तेव्हा कोर्टदरबाराला घाबरलो हे खरे. आणि एक तडजोड झाली. त्यात ५००० रुपये त्या सोसायटीस देणगी द्यावी व २०००० चा ट्रस्ट करावा असे मला मान्य करावे लागले. एकूण ५०,००० रु. फायदा झाला तेव्हा तो निम्मा निम्मा वाटावा असे ठरले. म्हणजे २५ हजार सोसायटीला मिळाले. सहकारी सोसायटी अशा तऱ्हेने धंदे करू शकते का, हा विचार तेव्हा मनात आला नाही. कोठून तरी हे मिटवावे व धंद्याला लागावे या विचाराने ग्रासून मी अव्यवहार्य गोष्टीला तयार झालो.

पैशाला गळती लागली की हाती फक्त कसा राहतो–पैसा गळून जातो. या कस्तुरबावाडीच्या योजनेत अंती मला दहा-पंधरा हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. त्या प्रकरणाचे कस्तुरबावाडी कोर्टदरबार अजून चालूच आहेत. सोसायटीच्या पदाधिकाऱ्याच्या बापाचा पैसा खर्च होत नाही म्हणून त्यांचे ठीक आहे. पण मी पदरचा खर्च करून आता भांडतो आहे. पैशापरी पैसा गेला आणि वाईटपण तेवढे उरले. माझे सच्चे मित्र प्लॉटवर घर बांधू म्हणून वाट पहात मरून गेले. ज्याअर्थी

मी फायदा वाटून द्यायचे तत्त्व कबूल केले त्याअर्थी सोसायटीचाच हा सर्व फायदा होता असे म्हणणारे लोक आपोआपच निर्माण झाले.

आयुष्यात एक धडा मी शिकलो आहे, तो हा की न्यायाला पर्याय नसतो. सत्याला तडजोड नसते. हक्कांना कर्तव्ये असतात. त्याची गल्लत केली तर पदरात फक्त मानहानी पडते. वयाच्या पंचविशीत लक्षावधी रुपये मिळवून पुन्हा मी कोरडा ठणठणणीत राहिलो.

आणि सर्व भलाईची किंमत फक्त वाईटपणात घेऊन मी या धंद्यातून बाहेर पडलो. माझा हट्ट घट्ट ठेवून मी उभा राहिलो असतो तर माझे कोणी वाकडे करणार नव्हते! आणि समजा, सर्वनाश झाला असता तर काय विघडणार होते? तो नाहीतरी झालाच. ही सारी संपत्ती माझ्या अंजलीतून गळून गेलीच. मी भणंग झालोच. पण माझे पतन झाले, मी तत्त्वाला मुरड घातली, ते चुकले. मी न्यायापेक्षा अन्यायी लोकांना शरण गेलो, हे शल्य उरलेच. आणि मनात येते... परमेश्वराने पुनः पुनः असे मोहाचे प्रसंग किंवा स्वास्थ्याचे आमंत्रण आणावे आणि त्यावेळेस मात्र त्यासाठी घट्ट उभे राहण्याचे वळ द्यावे. जे गळले ते माझे तारुण्य, ती उभारी ...पुन्हा येणार नाही. पण तो बंडखोरपणा मात्र प्रतिदिनी वाढतो आहे. पतनाची ती जाणीव अजूनही अंगावर सणक आणते आहे.

दिवाळी १९६८

● ● ●

मैत्रीचा सुगंध

माणूस एकटा जगू शकेल असे मला वाटत नाही. हिमालयात एकांतात जप-जाप्य वा समाधीत असणाऱ्या ऋषिमुनींनाही अंतर्यामात जोडीदार गवसलेला असतो आणि त्या जोडीदाराशी हितगुज करण्यातच त्यांच्या समाधीला अर्थ येतो. आपण व्यावहारिक माणसे तर दुसऱ्या माणसासाठी वेडी असतो. जन्म घेण्यासाठी आई तर हवीच असते पण बाकीची सारी नाती केवळ आपल्या आनंदासाठीच आपण जोडतो. माणसाने वर्षानुवर्षे जतन करून ठेवलेला गुण म्हणजे संघजीवना-विषयी आसक्ती. कळप करून राहणारा प्राणी म्हणून मनुष्य अनेक वर्षे ओळखला जात आहे.

कळप करण्याच्या या त्याच्या गुणामुळेच माणसाला आनंदाचे–उन्मादक आनंदाचे क्षण शोधावे लागले. शर्यती, सभा, सम्मेलने, खेळ, स्पर्धा, प्रवास... मानवी मनाचा सारा आवेश, आस्वाद या संघजीवनात उघड होतो.

कळप करून राहता राहता माणसाला स्वामित्वाची जाणीव उत्पन्न झाली. केवळ स्वतःच्या पात्रापात्रतेचा विचार न करता स्वतःचे असे काहीतरी हवेच हवे असे वाटण्यातून कुटुंबसंस्था जन्माला आली. अवशेष ठेवण्याच्या आकांक्षेतून तिची वृद्धी झाली आणि संग्राहक प्रवृत्तीतून ती वळकट झाली. प्रासाद, वास्तू, वस्तू, बचत, पुढच्या पिढीपर्यंतही उपयोग न होणारी वृक्षवृद्धी, इन्शुरन्स हे सारं काही 'दुसरा' माणूस स्वतःइतका प्रिय होऊ लागला म्हणूनच. एरव्ही आजच्यापुरती, फार तर पावसाळ्यापुरती शिकार करणाऱ्या माणसाने ही दुनिया उभारली नसती.

माणूस घर करू लागला, कुटुंब करू लागला आणि मुख्य म्हणजे आपले गट व कुटुंबे आपल्या रुचीप्रमाणे निवडू लागला. सुगंधाची चव जशी जशी वेगवेगळी तद्वत् माणसाला कोणते माणूस आवडावे त्याची याची आवडही निरनिराळी.

निवड आली आणि या सिलेक्शनमध्येच मनुष्याच्या मैत्रीचा पहिला हुंकार जन्म पावला. आपल्या हर्षखेदाच्या वेळी जवळ असण्यास बरे वाटेल असा आपला शेजार असावा असे माणसाला केव्हा तरी वाटले. एक वाद्य वाजताच त्याच उंचीने शेजारचे वाद्य झंकारले (रेझोनन्स्) म्हणजे वातावरण अधिक गहिरे होते हा अनुभव माणसाला यापूर्वीच आला होता. अत्युच्च आनंदाच्या वेळी वा दुःखाच्या वेळी आपल्यावर लोभ करणारा किंवा सहानुभूती असणारा आपला सन्मित्र जवळ असण्याने ते ते प्रसंग अधिक परिणामकारक होतात हा अनुभव येताच मैत्रीला पल्लव फुटले. संगीत सभा, हिरव्या माडीवरील पद–झंकार, शकीला बानूची कव्वाली, गंधर्वाचे गाणे, सुंदराबाईची लावणी, ब्रेबॉर्न स्टेडियमवरील हलकल्लोळ, काश्मीरची सफर, एकादी बोच देणारी शोकांतिका... चांगले गाणे, नाचणे, नाटच, साहित्या क्रीडा या मुळी एकट्याने भोगावयाच्या गोष्टी नव्हेत, हे कळताच माणूस मित्राच्या शोधात राहू लागला.

चांगला मित्र लाभणे ही सर्वथा परमेश्वरी कृपाच होय. हे दैवी वरदान आहे, यांत बुद्धी, भावना, हिशेब कामी येत नाही.

आणि कोणता मित्र चांगला याची व्याख्याही दुर्मिळ आहे. चांगला मित्र बुद्धिमान असतोच असे नाही. बरोबरीचा असतो असेही नाही, जर तो चांगला मित्र असेल तर मग उणीव कसलीही नसते; बुद्धीची, वैभवाची, वयाची... सारी अंतरे क्षणार्धात तुटतात. मित्रत्व हे कसे जडते. याला हिशेब कुठे आहे. खरे म्हणजे कोणत्याच अद्भुत गोष्टीला हिशेब नाही, तसेच तो मैत्रीला नाही.

ज्यांचे मित्रत्व लाभले त्याची यादी शोधताना माझ्याहून तीस–चाळीस

वर्षांनी वडील अशा माझ्या मित्राची आठवण होते. त्याचा प्राध्यापकाचा पेशा बोजड मिशा, चारित्र्याची रग हे काहीही त्या मित्रत्वाच्या आड आले नाही त्यांच्या कडव्या हिंदुत्वनिष्ठ मताचा दुराग्रह त्यांनी त्यांच्या तरुण मित्रावर कधीच केला नाही. त्यांच्या मैत्रीची तीव्रता माझ्या श्रीमंतीत आणि पुढच्या दैन्यात सारखीच राहिली. माझ्या श्रीमंतीत आम्ही माझ्या मोटारीतून हिंडत राहिलो. मोटार माझ्या मांडीखालून निघून गेली, पण आमचे हिंडणे तसेच चालू राहिले. मी मुंबईला गेल्यावर दर शनिवारी न चुकता रिक्षा करून आमच्या घरच्या मुलाबाळांची चौकशी करण्याचा खंड त्यांनी मोडला नाही. आता मोटार पुन्हा आली पण माझा तो वृद्ध मित्र मात्र मला सोडून गेला–त्याचे नाव श्री. म. ऊर्फ बापूसाहेब माटे.

मैत्रीवद्दल विचार करताना मग आठवतात ते माझ्या वडिलांचे मित्र.

माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे देण्या–घेण्याचे हिशेब, अत्यंत काळजीपूर्वक ठेवलेल्या त्यांच्या हिशोववह्यावरून मी करू शकलो. माझ्या वडिलांचा कारभार खूप मोठा होता अन् मित्रपरिवारही अनंत होता. मोठचा विश्वासाने त्यांच्यावर सारेजण सोन्या–चांदीची, कापडचोपडाची अन् जमीनजुमल्याची व्यवस्था सोपवीत. त्यामुळे मिया मूठभर अन् दाढी हातभर... या न्यायाने त्यांचा स्वतःचा कारभार थोडा अन् इतरांचा फार अशी त्यांची परिस्थिती असे. त्यांच्या सात–आठ भावंडांत ते वडील आणि माझ्या आईच्या सात–आठ भावंडांत ती वडील. यामुळे आम्ही नातेवाईकांच्या बाबतीतही समृद्ध होतो. या सर्वांचे सर्व जोखमीचे व्यवहार वडिलांच्या आकस्मिक मृत्यूमुळे मला निस्तरावे लागले. पण वडिलांच्या व्यवस्थितपणामुळे माझी कसलीही गैरसोय झाली नाही.

या सर्व व्यवहारातून मोकळा होण्याच्या कामी माझ्या वडिलांचे मित्र बोपर्डीकर यांचेही मला फार साहाय्य झाले. सहज योगायोगाने वडिलांचे दुसरे एक मित्र सप्रे एका दिवशी मला भेटायला आले. त्यांनी मला विचारले, 'बोपर्डीकरांचे तीनशे रुपये तू दिलेस का?' मी म्हणालो, 'नाही.' 'नानांच्या हिशोवात ते कुठे लिहिले नव्हते अन् बोपर्डीकरकाकांनी त्यावद्दल मला काही सांगितलेही नाही.' 'पण त्यांना तू ते विचार.' या त्यांच्या प्रश्नावर मला अकारणच संशय आला. पैन्पैचा हिशोव ठेवणाऱ्या नानांच्या हिशोवात तीनशे रुपये एवढी रक्कम गफलतीने राहील हे शक्यच नव्हते. तरी पण संशयनिवृत्ती करून घ्यावी म्हणून दुसरे दिवशी मी बोपर्डीकरांना त्यावद्दल विचारले. त्यावर तसे काही काही पैसे आपण दिले नसल्याचे सांगताच मी म्हणालो, 'तरी मला वाटलंच होतं काका, की नाना चुकायचे नाहीत म्हणून.' त्यावर तो विषय तसाच राहिला.

वरेच दिवस गेल्यानंतर शेअर्सच्या व्यवहाराच्या एका फाईलमध्ये वडिलांच्या

हस्ताक्षरात वोपर्डीकर काकांकडून मिळालेल्या तीनशे रुपयांची नोंद आढळली अन् मी उगीचच खजील झालो. भर उन्हाची सायकल दामटीत मी काकांकडे गेलो, अन् त्यांना ती नोंद दाखवीत विचारले, 'काका, तुम्ही पैसे दिले असताना मला खोटे का सांगितले ?'

'हे पहा गजानन, ते पैसे मी नानांना दिले त्यांच्या मुलांना नव्हे ! माझा मित्र गेला–माझे पैसे गेले. त्यांच्या मुलांकडून ते पैसे वसूल करायला मी काय सावकारी केली ?'

आमच्या कुटुंबातील सर्वांनी विनंती करूनही काकांनी ते पैसे घेतले नाहीत.

आमच्या वडिलांचे मित्रमंडळ हे असेच–वोपर्डीकरकाकांसारखे. आजच्या जमान्याला अव्यवहारी वाटणाऱ्या मित्रप्रेमानं बद्ध होते. वडिलांच्या मृत्यूनंतर रक्ताचे कोणतेही नाते नसताना माझ्या वडिलांच्या मित्रांनी आमच्या कुटुंबावर मायेची पाखर घातली. आमचे कोर्टदरबार स्वखर्चाने लढवून आमच्या मिळकती आम्हाला मिळवून दिल्या. आमच्या आजारात आईची वायकामुळे शुश्रुषेला पाठवली. आपला मित्र मेला तरी आपली मैत्री जिवंत असते याची त्यांनी याद ठेवली.

प्रत्येक गोष्ट देवाण–घेवाण या तत्त्वावर करायची म्हटलं तर त्यातला रंग उडून जातो. शिवाय, आपण केलेल्या उपकाराचे मूल्य हे दुसऱ्याला नेहमीच वाटेल असं समजणंसुद्धा चूकच असतं. आपल्या सेवेची, वस्तूची किंवा निवडीची किंमत दुसरा माणूस आपल्या निवडीप्रमाणे करील हे शक्य नाही अतएव धड तो व्यवहारही होत नाही वा शुद्ध स्नेहही होत नाही.

मला आठवतं आहे आमच्या घरी एक गृहस्थ येत असत. कोणत्याही सणाला त्यांची वायको आमच्याकडे कामधामासाठी येई आणि आपल्याला सूनबाई म्हणून घेई खालच्या मानेने काम करताना मी त्यांना माझ्या बालपणापासून वर्षानुवर्षे पाहिलं आहे. वडील वारले त्यावेळेस सांत्वनादाखल भेटण्यासाठी ते आले असताना त्यांनी माझे सांत्वन करण्याऐवजी मला त्यांचे सांत्वन करावे लागले. साध्या कारकुनाच्या हुद्यावरून सात–आठशे रुपये पगार मिळविण्याइतपत ज्याने आपला अभ्युदय करून घेतला त्याची वायको हयात असेपर्यंत तशीच खालच्या मानेने आमच्या घरात सूनबाई म्हणून वावरली. तसे करताना तिला कमीपणा वाटला नाही.

माझ्या वडिलांच्या तामसी स्वभावाबाबत इथं लिहिणं जरा अप्रस्तुत आहे, तरी पण त्यांचे वरिष्ठ सहकारी आणि हाताखालचे अंमलदार या सर्वांशी वागण्याची त्यांची एकच एक न्यायनिष्ठुर पद्धती होती. ऑफिसमध्ये ११ वाजल्यानंतर आयुष्यातला एकही दिवस ते उशीरा गेले नाहीत वा उभ्या हयातीत त्यांनी अकारण रजा घेतली नाही. कोणत्याही अपराधाबद्दल त्यांनी क्षमा मागितली नाही वा कधी केली नाही. माणसानं कर्तव्यकठोर असावं आणि केलेले कायदेकानू शंभर टक्के पाळावेत

असे त्यांना नेहमी वाटे. कॅनॉलमधील पाणीवाटपाचं काम त्यांच्या हातात असताना एक मुसलमान बागाईतदार पाण्यासाठी हट्ट धरून बसला. त्यावेळच्या प्रचलित नियमाप्रमाणे त्याला पाणी देणे शक्य नव्हते. ती गोष्ट अनेकवार सांगूनही त्याची समजूत पटेना. आपण पी. डब्ल्यू. डी.खात्याचे मंत्री नूरी यांचे नातेवाईक असून तुम्ही पाणी दिले नाहीत तरी ते त्यांच्याकडून मिळवू, तुमची एवढी पत्रास नको, असे त्याने सांगताच आपल्या स्वभावाला अनुसरून त्या बागाईतदाराची चपराश्याकडून माझ्या वडिलांनी हकालपट्टी केली. तो खरोखरीच नूरींचा जवळचा नातेनाईक असल्यामुळे प्रकरण रंगले व सचिवालयातून माझ्या वडिलांना बोलावणे आले. पेन्शनीला आलेल्या नोकरीच्या सुरक्षिततेसाठी सबुरीने वागावे असा सल्ला माझ्या वडिलांना सर्व मित्रांनी दिला, तथापि व्हायचे तसे झाले. न्याय आपल्या बाजूला असल्याची खात्री असल्यामुळे व अन्यायापुढे मान लवविण्याची सवय नसल्यामुळे मंत्र्याशी भांडण करून माझे वडील मुंबईहून परतले, आणि कोणत्याही संकटास तोंड देण्याची त्यांनी तयारी केली. इमानदारपणे वर्षानुवर्षे नोकरी केल्यानंतर मिळणाऱ्या पेन्शनपलिकडे काहीही संचित नसणाऱ्या, वयातीत माणसाच्या या अविवेकी निर्णयावर केवळ चर्चा करून त्यांचे मित्र थांवले नव्हते, तर असे काहीसे होईल ही गोष्ट गृहीत धरून उपाययोजनेसही लागले होते.

दुसरे दिवशी सकाळी बडतर्फीचा हुकूम येण्याऐवजी ५० रुपये अधिक पगारावर राज्यसरकारकडून मध्यवर्ती सरकारकडे बदली झाल्याचा हुकूम पाहून ते चकितच झाले. त्यांच्या एका मित्राने आपली अधिक पगाराची नोकरी त्यांच्यासाठी खाली करून ही बदलीची जागा त्यांना मिळवून दिली. केल्या कामाचे चीज करणारे व न्याय-अन्यायाचा विवेक बाळगणारे काही इंग्रज अधिकारी काही काळ माझ्या वडिलांचे वरिष्ठ अधिकारी होते. त्यांच्या साहाय्याने माझ्या वडिलांच्या एका दिलदार दोस्ताने दरमहा ५० रुपयांचे नुकसान सोसून मित्रऋण फेडले. नचपेक्षा त्या परिस्थितीला वडिलांनी तोंड कसे दिले असते ते काही सांगता येत नाही. अन्यायाला सामोरे जाण्यापेक्षा दारिद्र्याला सामोरे जाणे त्यांना अधिक पसंत पडले असते.

काही दिवसांपूर्वी मला राहण्याच्या जागेची गरज लागली होती. चौकशी करताना आमच्या कुटुंबाचे एक जुने मित्र ... यांच्या वंगल्यात एक जागा रिकामी आहे असे कळले. अर्थात ही जागा मला मिळणार ह्याविषयी माझ्या मनात कसलाही संदेह नव्हता आणि या खात्रीनेच एके दिवशी मी त्यांच्याकडे जाऊन त्यांना विचारले, 'काका तुमच्याकडे जागा आहे असं कळलं म्हणून मी आलो आहे. मला जागा हवी आहे.' 'अरे, तुला नक्की जागा दिली असती पण आपला देशपांड्याचा विनू पुढच्या महिन्यात इंग्लंडहून यायचा आहे. त्याला लागेल जागा म्हणून ठेवलीय रिकामी.'

'त्यानं काही पत्र वगैरे लिहिलंय का तुम्हाला ? का भाडे पाठवलंय.'

'पत्र कशाला लिहायला हवं ? तो यायचा नक्कीच आहे. मग जागा कुठे शोधणार या दिवसात तो ? आता या दिवसात जागा मिळणं किती कठीण आहे तुला माहितीच आहे.'

मित्रप्रेमाच्या या खुणा आता पुसट होत चालल्या आहेत. सोनेरी रंगाची चित्रे कालमानानं फिकी होत हांत पिवडी फासल्यासारखी केविलवाणी होत आहेत. जुन्या पाऊलवाटा काटचाकुटचांनी भरून जाव्यात अन् सांवली नसलेले इस्त्री केल्याप्रमाणे झकपक वाटणारे काटेकोर काँक्रीटचे रस्ते प्रवासात यावे तसं झालं आहे.

सुगंधांच्या सर्व प्रकारात मैत्रीचा सुगंध हा भान हरपवतो. फुलांच्या वाजारात मत्रीचे बकुळ-पुष्प हे दीर्घकाल सुगध देते. सावली नसेल तेव्हा सावली, त्राण नसेल तेव्हा आधार आणि रात्र असेल तेव्हा प्रकाश देण्यात मित्रत्व हे एक आवश्यक साधन आहे. वाटचाल जेव्हा निरर्थक होते, तेव्हा मैत्रीने तिला अर्थ येतो, वाटचाल जेव्हा विकट होते तेव्हा मित्रत्व ती सुकर करते. निरस संसार, असह्य दारिद्र्य, तीव्रतर अपमान हे सारे सु-मित्राच्या वळावर निभवून नेता येते.

पण अशी मैत्री आता दुर्लभ होत आलेली आहे अन् मैत्रीची आता गरजही वाटेनाशी झाली आहे. माणसं स्वतःवरच आता अनिवार प्रेम करू लागली आहेत. ती आत्मसंतुष्ट झाली आहेत म्हणावं तर ती संतुष्ट दिसत नाहीत. आणि कोणत्याही साहस-कर्मात बुडी मारून खोलवर जाण्याचे धारिष्ट्य त्यांना करवत नाही. किरकोळ त्यागाना आपण पारखे होत चाललो आहोत आणि किरकोळ अपराधही आपण पोटात घालू शकत नाही. दिल् मोठं असल्याशिवाय आणि त्या मोठ्या दिलात अनेक अप्रिय गाष्टी जतन केल्याशिवाय दोन माणसं एकत्र येऊ शकत नाही. माणूस जोडावा लागतो तो त्याच्या गुणदोषांसुद्धा, किंवहुना दोषांवर पांघरुण घालण्याची तयारी असल्याशिवाय गुणावर खरा लोभ करताच येत नाही. अखेर शेवटी आपण कमी पडतो ते इथेच

मैत्री किती दिवसात होऊ शकते असे काही गणित नाही. तरीपण जितक्या झटपट जमण्याची शक्यता असते तितक्या झटपट मोडण्याचीही भीती असते. या संदर्भात एक आठवण आठवते. गेल्या वर्षभरापूर्वी माझा एका तरुण लेखकाशी परिचय झाला. ज्यावेळेस तो परिचय झाला त्यावेळेस त्या लेखकाच्या नोकरीवावत काही गंडांतरे येऊ पाहत होती. योगायोग असा की, मी दिलेल्या काही आकमक पवित्र्यामुळे त्या गंडांतरातून त्याची सुटका झाली. या उपकारामुळे ऋणबद्ध होऊन म्हणा किंवा मला अज्ञात असणाऱ्या काही गुणांवर लुब्ध होऊन म्हणा, त्या मित्राने माझ्यावर अकारण लोभ केला. मला जवळजवळ जबरदस्तीने त्याने प्रेमात पाडले. तिन्ही त्रिकाळ त्याच्या माझ्या गाठीभेटी होऊ लागल्या. त्याच्या कुटुंबियात माझा

प्रवेश झाला. त्या आमच्या नवागत प्रेमाची त्याने मोठ्या प्रमाणावर जाहिरात केली. मी नको म्हणत असताही केली. त्यावद्दल माझ्या शत्रूतही तो अप्रिय झाला.

हे सारे शुद्ध प्रेमाच्या पोटी झाले याविषयी शंका नव्हती. तरीपण स्वभावतःच सर्वथैव भिन्न प्रकृतीच्या आम्हा दोघांची अकल्पितपणे गाठभेट होणे आणि अवेळी वसंत फुलून त्याचा प्रीतिवृक्ष वनणे ही गोष्ट सहजासहजी स्थिर होणारी नव्हती. वावटळ आणि झुळूक यांचा जो अन्योन्य संबंध तोच संबंध झपाट्याने फोफावलेल्या आमच्या स्नेहाचा झाला. एक प्रसंग तर मला असा आठवतो आहे की, माझ्या एकाकी वास्तव्याची कणव येऊन भल्या पहाटे हा गृहस्थ थर्मास भरून चहा घेऊन आला होता. अशल्या गोष्टी सहजासहजी विसरण्याजोग्या नसतात आणि मैत्रीत अंतर आले तरीही त्या विसरू नयेत. पुढे एका अत्यंत क्षुद्र कारणावरून मित्रत्वाला बाध येणारे कृत्य त्याच्या हातून घडले आणि माझ्या ध्यानी आले की, कारणपरत्वे कोसळणारी प्रीती निरंतर टिकणारी नसते. त्या माझ्या मित्राच्या आयुष्यातले माझे कार्य संपलेले होते आणि उपयुक्ततावादी जीवनात मैत्रीची फरफट करण्यात काही हशील उरले नव्हते.

या जमान्यात मित्रत्व हे सुद्धा सेंटस्प्रमाणे झाले आहे. दीर्घकाल टिकणारे अत्तर अन् क्षणभरानं फिका होणारा सेंट ही नव्या जुन्या प्रीतीची प्रतीके समजायला हरकत नाही, मात्र जमाना बदलला तरीही एकाद्या वेळेस मैत्रीचा असा काही खुशबु दरवळून जातो की मन हमेशा बेहोष राह्यला तयार असते. आपल्यावरोवर मित्रालाही आवडणारा वुशशर्ट आणणारा, पहाटेच्या वेळी चहाचा थर्मास घेऊन येणारा, आर्थिक अरिष्टाच्या वेळी आपल्या गरिबीच्या संसारातील सर्व संचित घेऊन येणारा मित्र अवचितपणे कधी तरी, कुठे तरी भेटतो. जीविताच्या या रखरखीत प्रवासात दूरवर भिडलेला एखादा पाण्याचा ओहोळ दिसतो म्हणून प्रवास सुसह्य वाटतो व अनेकदा ते मृगजळ ठरते. मात्र खरोखरीच पाण्याची एखादी शीतल धार तृषार्त मानवाच्या ओठाला भिडली तर सारा शिणवटा दूर होतो. अत्यंत उत्तम सहचारिणी मिळून, वत्सल आईवाप मिळून, आज्ञाधारक कनिष्ठ भावंडे मिळून वा विशालहृदयी ज्येष्ठ भ्राते लाभूनही जे दुःख आपल्या जीविताच्या घटात शिल्लक राहते ते केवळ निरपेक्ष मैत्रीलाच निपटून टाकणे शक्य आहे. क्षुद्र उण्यादुण्यांनी जी मैत्री डावलते, जो स्नेह दुरावतो व जो लोभ करपतो त्याविषयी काय लिहावे ? पण सदैव ताजे आणि टवटवीत राहणारे मैत्रीचे फूल उन्हाने कोळपत नाही, थंडीने करपत नाही किंवा पावसाने उन्मळत नाही. त्याचा सुगंध भणभणत येत नाही पण तो सुगंध सदैव तुमची संगत करतो. दमछाट झाली तर सामर्थ्य देतो आणि पराक्रमाचा भाट होतो.

स्नेह दुर्मिळ आहे म्हणूनच त्याचे मोल अमोल आहे. स्नेहमार्ग दुस्तर आहे

म्हणूनच तो पुण्यकारक आहे. स्नेहाचा रस्ता मोठ्या उंचीला नेतो म्हणूनच नवीन क्षितिजे दृष्टीला येतात. साऱ्या जगाचं साम्राज्यपद देऊ इच्छिणाऱ्या परमेश्वराला मी नम्रतेने नकार देईन आणि माझ्या संगतीचे सुख मिळविण्यासाठी चार-पाच मैलाची वाट तुडवीत येणाऱ्या माझ्या मित्राला सामोरा जाईन. कारण, त्याच्या स्नेहात मला कुठेही घेऊन जाण्याचे सामर्थ्य आहे. कल्पवृक्षाची छाया सोडून खोट्या अहंभावी सुरूची सावली कोण करंटा पत्करणार ?

फेब्रुवारी १९६७

● ● ●

हरवलेले पुणे

या पुण्यात मी जन्मलो. वाढलो. वरावाईट घडत गेलो. या मातीबद्दल मी कृतज्ञ आहे. केवळ इथे मी जन्मलो एवढ्यासाठीच मी कृतज्ञ नाही. इथे जन्मलो ही केवळ दैवगती, पण या मातीची काही मनोहारी दृश्ये मी पाहू शकलो. इथे घडलेला इतिहास, इथे जन्मलेली माणसे, इथल्या ताठ मानेच्या वास्तू, इथली लोकशाहीची अभिजात परंपरा...हे सारे पाहताना मला धन्य वाटते. मी परप्रांत पाहिले, देशोदेशीच्या अनेक हकीगती वाचल्या तरीपण पुण्याची थोरवी माझ्या मनातून हटत नाही. सैनिकी विद्येत, उद्योगप्रियतेत, आदरातिथ्यात प्रसिद्ध असलेला पंजाब, कला आणि साहित्यात मान उंच करणारा बंगाल, सेवावृत्ती, पांडित्य आणि अभिजात वक्तृत्व यात मुरलेला तामिळनाड, साहसी व्यापारातील गुजराथ हे भारतातले श्रेष्ठ प्रांत होत. पण त्याहून मुंबई प्रांताचे भाग्य थोर. इथेच स्वातंत्र्ययुद्धातले अनेक मनसुबे लढले गेले. पार्लमेन्टरी लोकशाहीचे पुरस्कर्ते गोखले–रानडे येथेच जन्मले. स्त्री-स्वातंत्र्याचा कैवार आणि समतेचा प्रसार इथेच आगरकर-कर्व्यांनी केला.

सावरकरांसारखा परमेश्वरी कर्तृत्वाचा, वक्तृत्वाचा नेता याच प्रांताने निर्माण केला. भारतातील कामगार चळवळी याच प्रांतात उभ्या राहिल्या. टिळकांचे, गांधीचे कर्तृत्व येथनच घडले. खरे पाहता जीवनातल्या सर्व भव्य अन् उदात्त अशा प्रेरणा येथे वैपुल्याने लाभल्या. दलितांचे कैवारी फुले, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आंबेडकर,...हेही याच प्रांतातून निर्माण झाले. येथल्या स्त्री–पुरुषशिक्षणाचा

प्रसार, शिक्षणसंस्था, शेअर बाजारचे महत्त्व हे सारे ध्यानात येते आणि मन आनंदाने भरून येते. अशा या मुंबई प्रांताचे नाक म्हणजे पुणे. एक काळ तर असा होता की पुणे या शहराभोवती एक असामान्य कर्तृत्वाचे वलय होते. मुंबई सुद्धा पुण्याला वचकून असे.

या मुंबई प्रांतात गेल्या शंभर वर्षांत केवढी स्थित्यंतरे घडली. येथेच महत्त्वाच्या सर्व पक्षांच्या कचेऱ्या होत्या. कामगारविषयक चळवळीचे मुंबई हेच केंद्र होते. साऱ्या भारतातल्या शांततेची आणि सुखाची हमी इथले गरीब, मध्यमवर्गीय वेगवेगळ्या पक्षाचे नेते देत होते. मग ते काँग्रेसवाले असोत, किंवा कम्युनिस्ट असोत, किंवा हिंदुमहासभावादी असोत, किंवा सोशॅलिस्ट... सारे पुणेरी होते अन् परवा परवापर्यंत सारे ब्राह्मणही होते. खरे बोलायला कोणाची भीती असू नये. ते ब्राह्मणही होते म्हणल्याने वास्तविक डोके विथरावयाचे कारण नाही. ज्या समाजात शिक्षण, विद्वत्ता, सेवावृत्ती यांचा प्रसार झाला होता, जे जन्मजात वंडाचा झेंडा घेऊन निघाले, त्यांनीच हे करावयास हवे होते. ज्यांनी अन्य लोकांना कमी लेखले, त्यांच्या प्रगतीला अडसर घातला, त्यांना ज्ञानापासून वंचित केले, त्याच ब्राह्मणांच्या पुढल्या पिढ्यांनी त्यांच्यावरचा अन्याय दूर करावयास हवा होता. त्यात मोठेसे चुकलेही नाही, किंबहुना त्यात काही थोरवीही नाही. ज्यासाठी ब्राह्मणांनी विद्याभ्यास केला, त्याचसाठी दुरितांचे तिमिर जावो ही आरोळी त्यांनीच घ्यावयास हवी होती. ज्ञानेश्वरांनी ती सर्वाआधी दिली, आणि तेल्या-तांबोळ्याचे पुढारीपण पत्करून लोकमान्यांनी त्याची सांगता केली.

पुण्याचे आयुष्य तसे खरे पाहता पाचशे वर्षांचे. एक मामुली वस्ती. त्याला पराक्रमी पाय लागले शिवाजीचे अन् मग त्याच पुण्यात स्वातंत्र्याची ज्योत फुलली. कालपरत्वे ती अन्यत्र गेली तरी परत पुण्यात आली. पुण्यातच तेजाने झळाळली. इथेच शाहिस्तेखानाची मस्तवाल बोटे तुटली, जशी पंडित नेहरूंची उद्दाम बोटे पुण्याच्या महर्षी कर्व्यांनी किंवा चिंतामणराव देशमुखांनी तोडली तशी. पुढे याच पुण्यात शाहिरांनी सावळ्यागोंधळ घातला आणि शृंगाराच्या पिकदाण्यात तोंडे खुपसली. पराक्रम लोपला, क्षीणता, सुखासीनता याच पुण्याने भोगली. पेशवाईचे वैभवाचे चार दिवस सरले आणि त्या आठवणीमुळे पारतंत्र्याचे कडवट घोट घेताना तर पुणेकरांना अधिकच दुःख झाले. इंग्रजांनी कारकुनी करण्यासाठी ज्या शाळा काढल्या त्यातून वाघिणीचे दूध पिऊन नवविचारांनी भारलेले तरुण निर्माण झाले. समाजाच्या दुःस्थितीचे खरे कारण पारतंत्र्य हे त्यांनी ओळखले आणि त्यांनी त्या सत्तेविरुद्ध दंड थोपटले. होय ते सर्व ब्राह्मणच होते. पाश्चिमात्य क्रांतीचे पहिले वारे त्यांच्याच प्रगल्भ आणि संवेदनाक्षम कानांनी झेलले. आणि त्यांनी ते सामान्य समाजाच्या अंगावर उघळून दिले. सारा समाज नवविचारांनी ढवळून निघाला.

मग देशहितवादी, फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, चिपळूणकर, रानडे, गोखले, टिळक, आगरकर... मोठी तेजस्वी पुरुषांची मालिकाच निर्माण झाली. ती वहुतेक माणसे पुण्यानेच पुरवली. पुण्यानेच पोसली.

स्वातंत्र्याच्या चळवळीला पुण्याच्या मुठेचे पाणी वरदान ठरले.

तेच पुणे ! जिथे टिळकांनी स्वातंत्र्याची मागणी केली, सावरकरांनी परदेशी कापडाची होळी केली... गांधींनी ४२ चा वंदिवास जिथे भोगला... तेच पुणे.

पुणे–तेच पुणे कसे असेल ? ते पुणे आता उरलेले नाही.

परवा एकदा पुण्याभोवती सैर केली. ज्या पुण्याचा मला परवापरवापर्यंत अभिमान वाळगता आला त्या पुण्याचे अलिकडचे स्वरूप पाहून क्षणभर झीटच आली. पुण्याचे हे भयानक स्वरूप पाहून मला वाटले, आपल्या शासनाला कशाचेच नियोजन करता येणे शक्य नाही. किंवहुना सुसंस्कृत समाजरचना हे मुळी त्या शासनाचे उद्दिष्टच नाही. पुणे काय किंवा पुण्यासारखी जुनी, शानदार, अंगावरोवर वाढत असलेली सारी नगरे इतिहास वरोवर वाळगत आली, आणि तो इतिहास वाळगण्याची अनेक उत्तर हिंदुस्थानी शहरांप्रमाणे त्यांना शरम वाटली नाही. पुण्याचे इतिहासकालीन मोठेपण सांगावे असा आजचा विषय नाही, पण त्या ऐतिहासिक नगरीला आलेले आजचे स्वरूप मात्र फार खेदजनक आहे.

तसे मी पुण्यावर अनेकदा लिहिले आहे आणि मरेपर्यंत पुण्यावर लिहिल्यावाचून माझे भागणार नाही. पुण्यातल्या अनेक वाईट आणि चांगल्या गोष्टी मी पाहिल्या आणि त्या आठवल्या म्हणजे पुण्यात उमर काढल्याचा कधी पस्तावा होत नाही. हिंदवी राज्याचे उदक इंग्रजाहाती सोडलेल्या त्या पुण्यातच, मोगली सलतनतीला अखेरचे धक्के देण्याचे मनसुवे पहिल्या वाजीरावांनी रचले होते. आणि भटाब्राह्मणाच्या पळीपंचपात्राच्या ढाली–तलवारी केल्या आणि कद–मुकटे रक्ताने रंगवून काढले होते. महाराष्ट्र गिळून टाकण्यासाठी आलेल्या शाहिस्तेखानाचे भाग्य थोर म्हणून तो केवळ वोटावर सुटला. पुण्यात एक काळ भारतीय स्वातंत्र्याचे यज्ञ घडले. इतिहासावर जगावे असे सांगणाऱ्यांपैकी मी नव्हे. कारण इतिहासाची प्रेरणा न घेतली तर इतिहासाची स्मारके न वनता थडगी वनतात. शिवाजीचे, वाजीरावाचे, नाना फडणविसांचे, लोकमान्य–आगरकरांचे, राजवाडे–केतकरांचे कर्तृत्व इथे फुलले आणि एका क्षुद्र गावठ्या गावाला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सोळाव्या शतकात नदीकाठावर पाचपन्नास घरांचा हा कसवा केवढा तरी इतिहास करून गेला आहे.

तो इतिहास थोर आहे म्हणून केवळ माझे पुण्यावर प्रेम नाही. पुण्याची हवा फार समशीतोष्ण म्हणून माझे पुण्यावर मन वसलेले नाही. (पानशेतनंतरचे अपुरे) पाणी सुद्धा फार रुचकर म्हणूनही मला पुण्याचा मोह नाही. पुण्यात तसे मोह पडावे

असे पुष्कळ आहे–होते म्हणा हवे तर... पण तसे मोह पडणारे सौंदर्य अनेक शहरात असू शकेल–बंगलोर, नाशिक, डेहराडून या शहरांविषयी अशी पुष्कळ ख्याती आहे. तरी पण जे पुण्यात आहे ते पुण्याबाहेर कधीच नव्हते.

पुण्यात तशा शुभ्र संगमरवरी फत्तराच्या इमारती नाहीत. दिवाण–इ–खास नाही, आम–तर नाहीच नाही. इथला दगड काळा भक्कम. वेडौल आकाराच्या दगडी इमारती अजून जखमा अंगावर घेत उभ्या आहेत. कधी त्या नगरपालिकेच्या रस्तारुंदीत गेल्या म्हणजे त्यांचे भकासपण फारच जाणवते. सर्वत्र साधे वेगरूळ शिल्प. अगदी दौलतीला भूषण आणणाऱ्या पंतप्रधान बाजीराव बाळाजीच्या खास वास्तूचे सुद्धा. देवळेसुद्धा खुजी–गरीब. रस्ते तर भिकार. या भिकार गल्लीबोळांची पुण्याला एवढी सवय होती की, वर्वे यांनी रस्ते रुंद करण्याची कल्पना काढताच साऱ्या पुण्यात हाहाःकार उडाला. मोठे म्हणून केलेले ते रस्तेही आता तोकडे आहेत हा भाग वेगळा. पूनम् निघण्यापूर्वी पुण्यातल्या हॉटेलना रंग लावण्याची प्रथा नव्हती. किंवहुना कोळशाच्या धुराचा दाट थर बाहेरून दिसला आणि भज्यांच्या तळणीचा वास आला म्हणजे पाटी नसताना हॉटेल ओळखू येई. शाळांच्या इमारती साधारण हत्तीखान्यासारख्या उंच पण कुबट. त्या साऱ्या वास्तुशिल्पात शक्य तेवढे गवाळेपण भरलेले. मला वाटते, डोळे दिपविणारी पुण्यातली पहिली वास्तू स. प, कॉलेज किंवा सेंट्रल बिल्डिंग असावी.

पुण्यात या घडीलाही वाहने हा स्वतंत्र कौतुकाचा विषय व्हावा. त्यांची गती तर गर्वाचा विषय व्हावा. पुण्यात वाहने आली, आणि ताठ मानेने पाच-दहा मैलांची रपेट करणारी प्रजा नष्ट झाली. नाहीपेक्षा पासष्टी उलटलेले अनेक धोंडूमामा किंवा शॉसाहेब अजून सायकल चालवून चारचाकीना हसतात ते पाहण्याजोगे आहे.

पुण्यातली पर्वती, चतुश्रृंगी ही स्थाने सहारा वाळवंटात असावी एवढी रखरखीत अन् वोडकी आहेत. या उलट परवा परवापर्यंत म्हणजे वर्ष्यांच्या बागा तयार होईपर्यंत (पेशवे पार्क, एरंडवणा पार्क, संभाजी पार्क) पुण्यात बागा आहेत हेच फारसे कोणास ठाऊक नव्हते. वास्तविक एम्प्रेस गार्डन, बोटॅनिकल गार्डन, वंड गार्डनमधे मराठी वाङ्मयातले अनेक नायक प्रेम करून गेले पण या सर्व बागातून किरीस्ताव मंडळीच दिसत असत.

पुण्यातली मैदाने आता संपलीच. 'पाचवड' या एका सुंदर मैदानावर कॉलेज आले. पी. वाय्. सी.वर अजागळ योजनेपायी बंगले उठले. आणि राहिलेली जागा आता बंदिस्त झाली. स. प. कॉलेज, खरे लोकशाहीप्रधान कॉलेज. तिथे मात्र मुक्तद्वार आहे. प्राकार मोठं आहे, पण मुलांच्या किल्ल्याप्रमाणे कुठेही, केव्हाही इमारती बांधत राहायची शि. प्र. मंडळीला खोड आहे, त्यामुळे ते मैदान आकसत चाललंय. पण वैवाहिक प्रेमिकांना अजून तेवढीच सोय आहे.

कमीत कमी तीन मैल चालल्याशिवाय आता मोकळी जागा मिळणे अशक्य आहे. अन् दूरवर मोकळ्या जागेवरच अंधारात प्रेम केले पाहिजे असेही फारसे उरले नाही. त्यावर तोड निघते आहे. डोळे मिटले म्हणजे रस्त्यावर, थिएटरात, सर्वत्र एकांतच असतो. लोकांनीही डोळे मिटावेत अशी साधी अपेक्षा असते.

पुण्यात अजूनही नाटक हीच प्रमुख करमणूक आहे. नवी पिढी सिनेमाकडे झपाटचाने वळते आहे. पण चित्रपटातला भडकपणा, अवास्तवता अन् तोच तोचपणा अखेरी पुन्हा नाटकाला चांगले दिवस आणीत आहे. पुण्यातले नाटक-वेडे अजूनही कोणत्याही नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला हजर असतात. बालगंधर्वांच्या आठवणी निघतात, दिनानाथांचे स्वर कानात फिरू लागतात, तरीही एखाद्या नव्या मायावतीचे गुणगान मुक्तहस्ताने इथे होते. छोटचाच्या श्रावणापूर्वीच्या अखेरच्या सौभद्राला हाऊस फुल्ल मिळते. न चुकता गद्य, संगीत, फार्सिकल, एकपात्री ... सारी नाटके यथान्याय मान वसूल करून परत जातात. अजूनही चावट, अश्लील नाटके –जी मुबईत गर्जून चालतात, ती इथे सफा पडतात. त्यातले सिनेनट आणि ॲटमबॉम्ब फुसके निघतात.

पुण्याचे एकेकाळचे वृत्तपत्र केसरी होते, आता ते सकाळ झाले आहे. एकतर नेतृत्व बदलले–विचार बदलले आणि त्याहीपेक्षा केसरीमागची प्रेरणाच बदलली. केसरीने नेतृत्वही गमावले अन् धंदाही केला नाही. सकाळने निश्चितपणे पुण्यातल्या वाचकाचे मन जिंकले. त्यांना अनेक गोष्टी वाचायला शिकवल्या, अनेक सदरात औत्सुक्य उत्पन्न केले. सकाळचे संपादन वैगुण्यांसकट जाणवते ...

ज्ञानप्रकाश, केसरी ... साराच जमाना गेला. टिळक, रानडे, गोखले, आगरकर, राजवाडे, केतकर, माटे ... सारी मंडळी गेली. इतिहास वाट पाहत नाही. सणस, ढेरे, मगर, तेलंग या पिढीकडे पुण्यातले चलनवलन गेले. ही नावे शिवाजीनगर स्टेशनवर सुद्धा पोचत नाहीत, मग दिल्लीला कुठली पोहोचणार ? राज्यकर्त्या पक्षात पुण्याबद्दल आकस आहेत. इथल्या बुद्धिमान माणसांना वरचे दरवाजे बंद आहेत. त्यामुळे खुजी माणसे येथे पेशवे बनली आहेत.

पुण्यातली मोठी माणसे गेली. पुन्हा ती तशी माणसे उत्पन्न होतील असे वाटत नाही. पण याचे कारण पुण्यात विद्वत्ता, चारित्र्य, साधना संपली हे नव्हे, तर एकंदर साऱ्या समाजाचा, साऱ्या देशाचा आणि एकूण भारतीय शासनाचा या गुणांवर विश्वास उरलेला नाही. हरहुन्नरी, हजरजबाबी, गोडबोली, संधिसाधू, गट करून राहणारी, व्यवहारकुशल मंडळी आता दिल्ली सांभाळीत आहेत. एखादा शास्त्री अपवाद. चव्हाण सुद्धा थोडे मागासल्यासारखे दिसतात. याचे कारण अजून त्यांना ती दिल्लीतली लाचार खानदान पचवता आलेली नाही. चव्हाणांच्या शब्दात ताठरपणा आहे. शहाण्याविषयी ममत्व आहे.

पुण्यातली विद्वत्ता ओसरत जाईल असे दिसते. विद्वत्तेचे प्रेम उरावे असे वातावरणही नाही. नादी माणसे निर्माण व्हायला वातावरण हवे. दुर्मिळ गुणांची जोपासना वाटेल त्या भूमीत होत नाही. महाराष्ट्राच्या खडकाळ भूमीत पुण्यासारख्या दरिद्री गावातच हे पीक फार चांगले निघू शकले असते. पण त्या गोष्टीची देशाला गरज वाटत नाही.

एखादा बावा पुरंदरे तरुण वयात मळकट दप्तरात डोके खुपसून सिनेमा–ट्विस्ट–रॉक अँड रोलकडे पाठ फिरवतो आणि शिवाजीपायी मन वाहून घेतो; पण तीही अस्सल संशोधकाची प्रतिभा नव्हेच नव्हे. राजवाडे होण्याची त्याची आकांक्षा नसावी. पण आहे तेही थोडके नसे. शासनाला भीक न घालता अ. ज. करंदीकरांनी दमदार राजकीय लेखन केले, पण तिथेही अफाट वाचन, खूप चिंतन दिसते. खरे म्हणजे त्यांच्या पांडित्याची फारच आवाळ झाली. सामान्य दर्जाचे तर्कतीर्थ लक्षाधीश होतात अन् हा अनंत माणूस रोगाशी झगडत, झटापट करीत, न वाकता दिवस गुदरत आहे. पुण्यातली ज्ञानाची सदावर्ते बंद झाली. नेटिव्ह लायब्ररी, भारत इतिहास संशोधक मंडळ, सार्वजनिक सभा, डेक्कन जिमखाना, सोशल क्लब, केसरी कचेरी यांसारखे अड्डे मावळले. आता माणसे जमतात ती ज्ञानाच्या ओढीने नव्हे, तर गट केल्याशिवाय या जमान्यात जगता येत नाही म्हणून. पूर्वी तरुण वर्गात अभ्यास–मंडळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्रसेवादल, सेवक संघ, व्यायाम शाळा, मोर्चे, मिटींगस् ... अशा अनेक राजकीय व अभ्यासाच्या जागा होत्या. जगातल्या सर्व बऱ्यावाईट घडामोडींचा तत्परतेने तरुण पिढीवर परिणाम दिसे. आता राजकारणाशी तरुण मंडळी फटकून वागतात. स्वप्ने असतात ती देशभक्तीची नव्हेत, सावरकरांप्रमाणे आपल्या देहातील ज्वालाग्राही पदार्थाने समाज पेटविण्याची नव्हेत–सुंदर, भव्य, उदात्त स्वप्नासाठी नव्हेत. ती असतात अजगरासारख्या चेतनाशून्य, निर्जीव, स्वास्थ्यमय आयुष्यासाठी. कचकड्यासारख्या गुळमुळीत मुलीसाठी, चित्रातल्यासारख्या रेखीव भडक घरासाठी, क्षणार्धात लक्षाधीश होणाऱ्या चित्रपटातल्या नायकांची, आपल्या लायकीपेक्षा, शिक्षणापेक्षा ... संस्कृतीपेक्षा, उच्च, सुंदर, खानदान, श्रीमंत सखी मिळविण्याची, एक नव्हे अनेक ... ज्ञान, सेवा, नाद, कला यासाठी आयुष्य पेटविणारी पिढी गेली. समोर एखाद्या अश्राप स्त्रीवर कोणी गुंड हात टाकत असेल तर पेटून गुंडाचा हात कलम करणारी तरुणांची पिढी गेली. स्वतःची मते, स्वतःचे हट्ट, स्वतःचे स्वत्त्व यासाठी उपेक्षा, अडवणूक, छळ, अपमान सहन करावयास तयार असणारी सामाजिक स्थितीच संपली. बाळूकाका कानिटकर, सेनापती बापट, एस्. एम्. यांच्या निष्ठा आणि सेवा ही चटोर मुले चेष्टेचा विषय करतात. त्यांना आयुष्याचा अर्थ कसा कळणार, कारण पद्मश्री पु. ल. च्या काकाजीच्या तोंडच्या गालिवप्रमाणे 'तुमने पीही नही' असा न्याय ते त्यांना लावू पहातात.

तरुण पिढीपुढे आकर्षक तत्त्वज्ञान नाही. आणि आजच्या सत्ताधिष्ठित नेत्यांचे डागाळलेले जीवन त्यांच्या समोर आहे. ज्याला कोणत्याच अंगाचे चारित्र्य नाही अशी अनेक सामान्य बुद्धीची माणसे जातीच्या तत्त्वावर, दादागिरीच्या बळावर, द्रव्याच्या साहाय्याने मोठ्या पदावर दिसतात. तरुण पिढीला हेच जीवन आकर्षक वाटते. कारण मी मी म्हणणारे त्या नेत्यांपुढे लाचार होतात. मग कोणी नाना पदव्या त्यांना बहाल करतात तर कोणाच्या डागाळलेल्या चारित्र्याची ते तरफदारी करू लागतात. साधी वकिलीसुद्धा ज्याला करू देऊ नये त्या माणसाला प्रांताचा मुख्य प्रधान होण्याची स्वप्ने शक्य कोटीत दिसतात. जगावर कुत्र्याप्रमाणे भुंकणारे अत्रे सुद्धा त्या व तसल्या माणसाशी जमवून घेतात.

तरुणांनी काय करावे! कोणाचे आयुष्य पत्करावे? वाळूकाका कानिटकरांचे, की वाळासाहेब देसाईंचे. सेनापती बापटांचे आणि हनुमंतय्यांचे... का ह्यापेक्षा सिनेमातले ते रंगीबेरंगी आयुष्य बरे. शिक्षण नको, अभिनय नको... खरे म्हणजे काहीही नको. फुकटाफुकटी मिळालेली लोकप्रियता... स्वैराचार, द्रव्य...

या चित्रपटांनी आमचा सारा समाज भकास केला, उजाड केला. कारण कधीही दृष्टीला न पडणाऱ्या किंवा आयुष्यात न घडणाऱ्या सुंदर आयुष्याची वाट पहात तरुण पिढी पहिली चार पावले चालते. ते काल्पनिक आयुष्य मिळविण्यासाठी काहीही करायचे ठेवीत नाही. ते मिळत नाही असे पाहतात आणि मग वैफल्याने सारे काही निर्लज्जपणाने मिळेल ते चोखून चोखून चोथा झालेले पोकळ आयुष्य अंगावर मिरवतात...

असे हे आमचे पुण्यातील तरुणांचे जीवन. संध्याकाळच्या पूनमच्या दिशेने चक्कर मारताना ती स्वप्ने आठवायची अन् कुठल्या तरी बँकेत, कुठल्यातरी सरकारी कचेरीत पाटचा टाकायच्या, कॉलेजच्या काळात शिवलेल्या टेरिलीन पॅन्टस् जपून वापरायच्या. एरवी पिवळा हत्ती ओढायची पण संध्याकाळी मात्र चारचौघात गोल्ड फ्लेक शिलगावयाची. त्या पुष्ट, श्रीमंत गाडीतून हिंडणाऱ्या, मुंबईहून आवक झालेल्या भिरभिऱ्या डोळ्यांच्या पोरी मिटक्या मारीत पहायच्या अन् अंधारून दृष्टी क्षीण झाली की ते मखमली आयुष्य फेकून देऊन नेहमीची लक्तरे धारण करायची.

मला ते पूर्वीचे कॉलेज-जीवन, सजीव रस्ते, व्यायाम शाळा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संचलने, सेवादलाची शिबिरे, कम्युनिस्टांची अभ्यास-मंडळे... हे सारे आठवते. आणि अवघ्या अठरा वर्षांत आमचे सामाजिक जीवन एवढे स्वास्थ्यप्रिय का झाले ते समजत नाही. स्वातंत्र्याची एवढी झिंग आम्हाला का यावी. उलट स्वातंत्र्याची सुंदर फळे चाखण्यासाठी आम्ही उत्सुक असायला हवे.

पण स्वातंत्र्य मिळाले–अगदी चुकून मिळाले, केवळ दैवगती म्हणून मिळाले, विना-सायास मिळाले, म्हणूनच आपल्याला अशी मरगळ आली की काय ?

पुण्याभोवती आता कारखानदारीने तट केला आहे. पार तळेगावपर्यंत, लोणी-पर्यंत, कात्रजपर्यंत, आणि वारज्यापर्यंत–सुमारे सहाशे चौरस मैलात कुठेही, कसेही उद्योगधंदे काढायची परवानगी देऊन या शांत, ज्ञानपिपासू, सुरेख शहराची कळा एवढी कुरूप का केली ? कोथरूडसारख्या सर्वथा जनवस्ती वाढविण्यासाठी असणाऱ्या सुंदर विभागात किर्लोस्कर क्युमिन्स आणि वजाज इलेक्ट्रिकल्स हे कारखाने का काढू दिले ? वास्तविक त्या वाजूकडे पुष्कळ वसाहती झाल्या होत्या. तरी सुद्धा क्षुद्र स्वार्थासाठी जमीनमालकीत हितसंवंध गुंतल्यामुळे या श्रीमंतांनी नागरिकांच्या हिताहिताचा विचार केला नाही. मध्यमवर्गीय माणसाने आता झोपडपट्टीतच राहिले पाहिजे. अशी अवस्था या चांडाळांनी का आणावी ?

पुण्याचे वाटोळे झाले तसे आता अन्य ठिकाणचे तरी होऊ नये. तिथेही वजाज-किर्लोस्कर नागरी वस्तीवर आक्रमण करणारच. गावांनी आपला वांध न सोडता वाढावे, सुंदर व्हावे, उद्योगी व्हावे. पण वाढ म्हणजे वेढवपणा नव्हे. या देशात धरणे वांधण्याच्या जागांवावत मोर्चे निघू शकतात हे पाहून मन थक्क होते. म्हणजे धरणाची मजवूती, उपयुक्तता व सोय ही महत्त्वाची नसून कोणत्या ठिकाणचा पुढारी अधिक उपद्रवकारक आहे हे महत्त्वाचे आहे. तर मग उटकमंडला कापड-गिरण्या, महावळेश्वरला स्टील प्लॅन्टस्, पंढरपूरला रसायनाचे कारखाने अवश्य काढावेत. वाईला कत्तलखाना काढावा तसे होत आहे. लोणावळ्यात इंडस्ट्रिअल इस्टेट काढणाऱ्या शहाण्या मंडळींना म्हणावे तरी काय ? मुंवईच्या परिसरात गोदरेजच्या कारखान्याने केवढी मौल्यवान जागा हकनाक अडविली आहे हे पाहिले की मन विपण्ण होते. वास्तविक हे सर्व कारखाने पाणी, वीज, हमरस्ता, रेल्वे या सोयीच्या जागी पण खूप आत आत काढायला हवेत पण मग चालकांना थोडी गैरसोय होते ... ती त्यांनी का सोसावी. अखेर टाटा, विर्ला, वजाज ह्यांच्याच धनाने काँग्रेस सत्ताधीश झाली नाही काय ?

हा सारा प्रपंच पुण्याच्या महाभयंकर स्वरूपाने सुचतो. आम्ही गैदी वनायचा निर्णय केव्हाच घेतलेला आहे. आता तर वशिल्याला ऊत आला आहे. सुखी, समृद्ध, शांत, सुंदर समाजाची आता केवळ स्वप्नेच पाहायची. परवा सहजगत्या एक परदेशी परिचय–पत्रिका हाती आली. युगोस्लोव्हियातील सर्वात मोठ्या शहरात एकही धुराची चिमणी नाही असे अभिमानाने छापलेले त्या नगरीचे सुंदर चित्र त्या अंकात होते, म्हणजे केवळ धुराच्या चिमण्याच राष्ट्राच्या समृद्धीला आणि संस्कृतीला आवश्यक नाहीत असे त्या मुजाण टिटोला वाटते म्हणायचे ! पण आमची कला,

नाट्य, वास्तुशिल्प, नगररचना, शासन हे खालपासून वरपर्यंत डागाळलेले आहे, सडलेले आहे, परक्यांच्या नकलेने किडलेले आहे.

माझे पुणे आता उरलेले नाही एवढे मात्र खरे.

जानेवारी १९६७

• • •

औरंगजेबाची फर्माने आम्ही मानीत नाही

'गांधीहत्या आणि मी' या पुस्तकाला आपण बंदी घालणार असे एक फर्मान दिल्लीच्या औरंगजेबाने काढले आहे. अशी फर्माने आजवर महाराष्ट्राने मानली नाहीत मग..... 'गांधी हत्या आणि मी' या पुस्तकाच्या निर्मितीचा हा इतिहास.

'गांधीहत्या आणि मी' हे पुस्तक मी प्रसिद्ध केले. हे पुस्तक पुष्कळ प्रकाशकांच्याकडे मी स्वतः पाठवले. त्यांना ते खुपीने देऊ केले. पण त्यांनी नानाविध सबबी सांगून ते नाकारले. हा अग्नी त्यांना आपल्या खिशात नको होता. वास्तविक या पुस्तकातील सर्व लेख 'पैंजण'मधे क्रमशः प्रसिद्ध झाले होते, गाजले होते. त्यात काही प्रक्षिप्त असते तर आपले काकदृष्टीचे (ही काकदृष्टी फक्त हिंदू विचारापुरती मर्यादित आहे ते सोडा) सरकार केव्हाच इलाज करून मोकळे होते. तरी पण मोठमोठ्या मान्यवर प्रकाशकांनी हे पुस्तक नाकारले. श्री. रा. ज. देशमुख स्वतःला मोठे धाडसी प्रकाशक मानतात. त्यांनीही हे पुस्तक नको म्हणून सांगितले. मॅजेस्टिकचे श्री. कोठावळे यांना हे पुस्तक देऊ केले. पण त्यांनाही ते नकोसे दिसले. नाइलाजाने मलाच प्रकाशक होणे भाग पडले. वास्तविक प्रकाशन हा खरे

म्हणजे अर्धवेळेचा व्यवसाय नव्हे. म्हणून अत्यंत नाखुषीने मी या ग्रंथप्रसिद्धीचा पत्करं घेतला.

पण ही लेखमाला लिहिली का, कशी लिहिली गेली हेही थोडे पहाणे गमतीचे ठरावे. 'पैंजण' मधे अगदी आरंभापासून माझे, श्री. अ. ज. करंदीकर यांचे व श्री. द. श्री. मराठे यांचे याच स्वरूपाचे राष्ट्रवादी, गांधी तत्त्वज्ञानाचा फोलपणा सांगणारे लेखन सतत प्रसिद्ध होत होते. माझी सावरकरप्रीती तर सर्वश्रुत आहे. फक्त हिंदुसभेच्या वोडक्या वायांच्या घोळक्यात मी कधीच वसू शकत नाही. हिंदुसभेनेच सावरकरांचे तत्त्वज्ञान मारले असे मला सतत वाटते. स्वतःच्या विचारावर कोणाचीही हुकमत न मानण्याच्या माझ्या स्वभावामुळे रा. स्व. संघ व जनसंघ या विभूतिपूजक संस्थांशी, त्यांचा पुष्कळ कार्यक्रम असूनही, मला जमवून घेता आलेले नाही. कम्युनिस्ट, संप्रदायी वा जातीयवादावर पोसलेले पक्ष हे तर मला शत्रुस्थानी आहेत. मी करायचे तरी काय असा प्रश्न माझ्यापुढे नेहमी त्यामुळेच उभा राही. ४२ च्या चळवळीत पंगुत्व आल्यामुळे शारीरिक कष्टाच्या कोणत्याही राजकारणाला माझा आता उपयोग नाही. तेव्हा निखळ राष्ट्रवादी भूमिका पत्करून सतत लिहीत राहणे, प्रचार करीत राहणे व आवाज उठवणे एवढेच माझ्या हाती उरते. तेच मी करीत आलो आहे. सदरहू पुस्तक त्यातलाच एक यत्न.

राष्ट्रवादाला सध्या दोन शत्रू आहेत. कालवाह्य बुद्धतत्त्वज्ञान आणि त्यावर आधारलेला गांधीवाद हा एक शत्रू व आपल्या देशापेक्षा मार्क्स मोठा मानणारा कम्युनिझम हा दुसरा. कम्युनिस्टांशी मुकाबला कसा व कधी करावयाचा याचा विचार पुढे प्रस्तुत आहे. पण गांधीवादाच्या जोखडातून मान काढल्याशिवाय कम्युनिस्टांशी लढण्यासाठी सामर्थ्यच येणार नाही. म्हणूनच गांधीवादाची संपूर्ण हकालपट्टी करणे हे आजच्या राष्ट्रीय विचाराच्या बुद्धिवादी समाजाचे पहिले कर्तव्य असायला हवे असे मला निश्चयपूर्वक वाटते. गांधींशी माझे शत्रुत्व नाही. एक माणूस देशाला तारू शकतो– आणि सर्वनाशाला नेऊ शकतो असे जरी वरवर दिसले तर ते तेवढे खरे नसते. अखेरी तो माणूस म्हणजे त्याची विचारधारा हेच सत्य असते. म्हणून गांधींवरचा राग म्हणजे गांधीवादावरचा राग हेच सत्य मनी उमजले पाहिजे.

ह्या धोरणाने मी 'पैंजण'ची राजकीय वाजू सांभाळली. पण मध्यंतरी अश्लील वाङ्मयाच्या लाटेत पैंजणचे नाव उगाचच गोवण्यात आले. खटला झाला ते मासिक मेनका... पैंजण नव्हे (जरी संपादक वेहेरेच असले तरी) हाही विवेक कोणी दाखवला नाही. त्या राजा वेहेऱ्यांशी माझे कोणतेही नाते नाही आणि त्यांना राजकारणात काही स्वारस्य नाही. पण अश्लील मासिकाच्या शिक्क्यात पैंजणचे

नाव नित्य आले आणि खपाचा फायदा मात्र मी उठवू शकलो नाही. पैंजण आजच राजकीय लिखाण देते हेही विधान पैंजणचे जुने अंक चाळून कोणीही खोडू शकेल. माझी मते फार जुनी आहेत. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी पहिले कान पिरगळले आणि वाचायला शिकवले, डोळे उघडायला त्यांनी ज्ञानचक्षूचे अस्तित्व मला पटवले. मग कै. बापूसाहेब माटे यांनी राजकारणाचे पहिले धडे दिले. माझी मते केवळ कुणी मजवर हिप्नॉटिक परिणामाने किंवा भावनेने लादलेली नाहीत. ती अभ्यासावर घडवलेली आहेत. ती बदलण्याची मजवर पाळी आली नाही. उलटपक्षी १९४९ ते १९६७ या कालखंडात ती मते अधिक सुदृढ घडली. श्री. गोपाळ गोडसे यांच्या वर निर्दिष्ट केलेल्या लेखमालेमुळे लोकांचे लक्ष पैंजणकडे राजकीय मतपत्र म्हणून गेले हे कदाचित खरे असेल. पण सरकारचे मात्र यापूर्वीच गेले होते. कारण पैंजणमधल्या तीन लेखांनिमित्त पैंजणचे विद्वान लेखक श्री. अ. ज. करंदीकर यांना सरकारने पकडले. (दिनांक ३१–३–१९६५ रोजी स्थानबद्ध केले) व दि. २–८–१९६५ रोजी मुक्त केले. सरकारच्या लेखी सदर लेख आक्षेपार्ह, जातीयवादी आणि इतिहासाशी प्रतारणा करणारे होते.

आज ही हकीगत लोकांना नवी वाटेल पण याहीपेक्षा एक अद्‌भुत हकीगत सांगतो. ती ऐकून मराठीच नव्हे तर अन्य भाषीय वृत्तपत्रे किती भेकड आणि नालायक आहेत याचा पुरावा मिळेल अ. ज. करंदीकर हे एक उपेक्षित लेखक– त्यांचे विचारसुद्धा उपेक्षित. त्यामुळे त्यांच्या अटकेला आणि सुटकेला कोणीच प्रसिद्धी दिली नाही. वास्तविक स्थानबद्धतेतून त्यांची झालेली सुटका ही मराठी वृत्तपत्रसृष्टीतला एक नवा पायंडा होता. वृत्तपत्रकारांना एक नवे विचार-स्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य न्यायमूर्ती वि. अ. नाईक यांनी बहाल केले होते. पण दुर्दैवाने त्याचे रहस्य कुणाला कळलेच नाही. गेल्या शे–दीडशे वर्षांत लेखनस्वातंत्र्यावर असणारी टांगती तलवार आपल्या अपूर्व युक्तिवादाने श्री. नाईक यांनी मागे घेण्यास सरकारला भाग पाडले. श्री. अ. ज. करंदीकर हे भारतातले पहिलेच लेखक अशा स्वरूपाच्या तथाकथित सरकारद्रोही लिखाणातून सुटले आहेत. या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याची जाणीव खरे तर पत्रकारांना व्हायलाच हवी. त्यांनी गौरवाने आपल्या स्वातंत्र्याचा हा जाहीरनामा छापावयास हवा होता. पण एकजात भेकड असणाऱ्या या वृत्तपत्रांना स्वतःला मिळालेल्या या अभूतपूर्व देणगीची योग्यता कळलेलीच नाही. दुर्दैव मराठी पत्रकारांचे, दुर्दैव एकूण पत्रकारांचेच. इंडिया लॉ रिपोर्टमध्ये हा अभूतपूर्व निकाल केवळ ॲकॅडमिक इंटरेस्टसाठी छापलेला आहे.

वृत्तपत्रीय स्वातंत्र्यासाठी पैंजणच्या हातून हे जे कार्य नकळत घडले, त्यामुळे मला थोडा धीर आला होता. न्यायान्यायविवेक आपल्याला कळतो, कायद्याच्या चौकटीत काय देता येते हेही समजते, अशी माझी खातरजमा झाली आणि त्याच

वेळेस गांधीवधाची संपूर्ण हकीगत आपण दिलीच पाहिजे ही माझ्या मनी मी पक्की खूणगाठ बांधली.

गांधी किती मोठे आहेत हे मला माहीत नाही असे मुळीच नाही, पण या क्षुद्र हाडामासाच्या देहापेक्षा माझे राष्ट्र एवढे मोठे आहे की, त्यापायी एक नव्हे तर शेकडो गांधींच्या आहुत्या पडल्या तरी हरकत नाही असेच मी मानतो. कदाचित् गांधीसुद्धा तेच म्हणत असतील. नोआखालीत जेव्हा गांधींनी आपले प्राण वाजीला लावले तेव्हा राष्ट्रापेक्षा— राष्ट्राच्या ऐक्यापेक्षा, एकाचे–अगदी गांधींसारख्या एकाचे–प्राण त्यांनी क्षुद्र मानले हे तर उघडच आहे. गांधींचा वडेजाव मानणाऱ्यांनी एक गोष्ट ध्यानात घ्यावी की, गांधींचे आयुष्य देखील देशकार्यातच समर्पित होत होते. गांधींचे बरेवाईट राजकारण या देशाच्या मुक्तीपायी खर्चले जात होते. मग गांधींचा जयजयकार करताना देशाचा विसर पडून गांधी कसे मोठे होणार? गांधी अखेरी माणूस होते–रक्तामासाचे–जसा नथूराम होता तसेच. त्यामुळे आपल्या पवित्र आणि सुंदर देशापेक्षा ते क्षुद्र होते–कुरूप होते. आपल्या देशाचा सर्वनाश आणि गांधी यात तुम्ही काय पत्करले असते? गांधींनी काय पत्करले असते? राष्ट्राने काय पत्करले असते?

इतिहासाची पाने चाळून पाहिली की, लक्षात येईल की, ज्यांनी हा भरतखंड वसवला, ज्यांनी वेद रचले, ज्यांनी नालंदा–तक्षशीलेचे विद्यापीठ स्थापले, ज्यांनी अनेक मंत्र रचले, संस्कृती उभारल्या, ज्यांनी या भव्य राजधान्या बांधल्या त्या फार थोर–गांधीपेक्षा फार थोर थोर माणसांची नावनिशाणीसुद्धा उरली नाही. माणसाचं नाव काळ खाऊन टाकतो–कार्य ठेवतो. इतिहासाचा हाच घडा आहे. माणसापेक्षा भूमी श्रेष्ठ. भूमीपेक्षा संस्कृती श्रेष्ठ. संस्कृती शिल्लक राहिली तर भूमी परत मिळवता येते, याचे इस्त्राएल हे नुकतेच घडलेले सुंदर उदाहरण. सिंध्यांनी आपली संस्कृती टिकवली तर सिंध परत मिळविण्याची भाषा इतिहासाला सोडून नाही. पण आमच्या राजवटीचे–गांधींचे–इतिहासाशी वाकडे आहे. इतिहासाने पदोपदी सिद्ध केलेली गोष्ट त्यांनी मानली नाही म्हणूनच भारतात जाहीर न केलेले प्रचंड धर्मयुद्ध घडले आणि मोजदाद न केलेली लक्षावधी लोकांची हत्या झाली. आपल्या बुद्धीवर विश्वासणाऱ्या मुसोलिनी, हिटलर, औरंगजेब आणि अखेरी गांधी नेहरू या सर्वांचा पराभव फक्त अहंकाराने झाला. इतिहासाशी प्रतारणा केल्याने झाला. मानवी मनाच्या मर्यादा न ओळखल्याने झाला. ही सर्व नावे दंतकथा सांगायला उपयोगी पडतील. पण इतिहासाने या नावांना केव्हाच गिळून टाकले आहे. गांधी–नेहरू त्या मानाने गिळण्यास सोपे आहेत. कारण त्यांनी काही केलेलेच नाही, इतिहासात नमूद व्हावे असे त्यांचे एकच कृत्य–फाळणी. एका नव्या धर्मराज्याची

स्थापना, एका नव्या कलहाची बीजे नव्या चेंगीझखानासाठी रणभूमी, आणि येती काहीं शतके सिंधू–सतलज यांची पात्रे रक्ताने रंगणार याचा जाहीरनामा.

थोडे कठोर आहे पण सत्य आहे हे क्षणिक तरी उंच जाऊन या धरतीकडे पाहिल्यावर मला तर या आर्यधर्मावर तुटून पडणाऱ्या गिधाडांच्या रांगाच्या रांगा दिसतात. नेहरूंच्या कर्तृत्वाला आणखी एक पीस आहे. आर्यसमाजाशी द्रविडीयनं समाजाचे झालेले एकजीवन नेहरूंनी भाषावार प्रांतरचनेच्या निमित्ताने पुन्हा एकवार विस्कळीत केले. तीनशे वर्षांपूर्वी भारताचे जे स्वरूप होते ते विस्कळीत स्वरूप भाषावार प्रांतरचनेने आज भारताला आणलेले आहे. म्हणजे मध्ययुगीन विस्कळीतपणामुळे भारताला अधोगती लागली आणि आपण संपूर्ण विनाशाप्रत गेलो त्याची ही ही पुनरावृत्ती. आपण पायऱ्या वर चढावयाच्या ऐवजी उतरत निघालो आहोत. उंचीला मर्यादा नसते. अवघे अवकाश आपल्या महत्त्वाकांक्षेला मोकळे असते. पण उतरतीला मात्र धरणी असते. त्याखाली म्हणजे मग कबरीत जावे लागते. या एकसंध देशाची परत एकदा चिरफाड होणे मला या गांधी–परंपरेत अशक्य वाटत नाही. बळाने जुलूम करता येतो, व्यक्तिस्वातंत्र्य हिरावता येते, गरिबांना लुटता येते आणि रक्तामासाच्या नद्या वाहिल्या जातात. त्याचप्रमाणे कृतनिश्चयाने सामर्थ्याने, बळाने अनृत नष्ट करता येते, पराभवाची परतफेड करता येते, विकृतांना वठणीवर आणता येते, हुल्लडबाजांना हुसकावता येते. बळाचा वापर वाईटच होईल असे का धरावे ? शिवाजी हा हुकूमशाहाच होता. तरी आपण त्याचा जयजयकार करतो. म्हणजे सत्तेचा वापर करण्याच्याही पद्धती असतात. अतिरिक्त दुबळेपणा हा अतिरिक्त माजोरीपणाइतका नव्हे तर जास्तच घातक रोग आहे.

गांधी–नेहरूंची इतिहासातली कामगिरी एवढीच की, औद्योगिक क्रांतीपासून माणूस परत मागे नेण्याचा गांधींचा हट्ट होता आणि गांधींचे मार्ग वापरून मार्क्सचे तत्वज्ञान या भूमीत रुजविण्याचा नेहरूंचा हट्ट होता. परिणामी मार्क्स आणि बुद्ध दोघेही कबरीत स्वस्थ समाधीत राहिले आणि आम्हाला गवसले पापात आकंठ बुडालेले पटनाईक, मिश्रा, हनुमंतय्या, पाटील, इंदिराजी यांचे नेतृत्व.

आणि म्हणून लोकांना इतिहास सांगणे आवश्यक होते. मी मनाशी ठरविले होते की, स्वातंत्र्याच्या चळवळीचा समग्र इतिहास आपण जरूर लिहू या. सूर्याच्या मावळतीपासून राहूच्या उदयापर्यंत. टिळकांच्या मृत्यूपासून नेहरूंच्या उदयापर्यंत.

पण दिवसाचे बारा तास पोटासाठी प्रुफे, तगादे, वायदे, किरकोळ पत्रव्यवहार, आलेल्याचा पाहुणचार याकामी गेल्यावर शांतपणाने गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास चाळणे, नेमका पुरावा गोळा करणे तज्ज्ञाच्या मनाला उतरेल असा त्याचा अन्वयार्थ लावणे ही गोष्ट पुरी करायला मला दहापाच वर्षे लागतील असे दिसले.

असा समग्र विषय एकसंध लिहिता येत नसेल तर अलग अलग असा इतिहास का लिहिला जाऊ नये ? आणि लिहायचाच असेल तर गांधीहत्येच्या प्रकरणापासून का लिहू नये ?

करंदीकरांच्या लेखाच्या निमित्ताने एक दिवस आमच्या कार्यालयात एक बाई आल्या. त्यांनी केलेले अभिनंदन, कौतुक संपल्यावर त्यांनी आपले नाव सांगितले, सिंधु गोडसे. मी चमकून बसलो. एकवार सुटका झालेल्या आणि सत्यनारायण प्रकरणात पुन्हा बंदिवास झालेल्या गोपाळ गोडसे यांच्या या पत्नी. वास्तविक, गांधींचा खून करणाऱ्या गोडसे कुटुंबावर माझ्या मनात थोडा राग होता. खून करण्यामागची भूमिका समजून सुद्धा मला असे वाटत होते की, गांधींचे राजकारण उतरणीला लागले असताना, गांधी ही नेहरूंना अडगळ वाटत असताना, गांधींचा खून करून गोडशांनी साधले काय ? एक तर गांधी हे मार्टिअर (देवस्वरूप) झाले. त्यांच्या तत्वज्ञानाचा फोलपणा सिद्ध करावयाचा आमचा रस्ता कायमचा बंद झाला. गांधी गेले अन् गांधीवाद मात्र आमच्या वोडक्यावर कायम बसला. रोज सकाळी गांधी–गीता ऐकणे नशिबी आले. एरवी गांधी हे नाव कुठे आश्रमात, कुठे जयप्रकाशजी-सारख्या निरुपयोगी नेत्यांच्या तोंडात, कुठे अच्युतराव पटवर्धनांसारख्या विटाळ गेलेल्या पुढाऱ्याच्या व्याख्यानात ऐकावें लागले असते पण आज पंचायतीची सभा असो की पार्लमेंटचे अधिवेशन असो, गांधी, गांधीवाद, गांधीपूजा यावाचून आपली सुटका नाही. म्हणजे नुकसान राष्ट्रवादाचे झाले. तर्काचे झाले. गांधीवध ही गांधी-वाद्यांना आपत्तीऐवजी संधी ठरली.

नथूराम कदाचित चांगला असेल, कदाचित वाईट असेल. पुस्तक वाचून ज्याने त्याने काहीही ठरवावे पण नथूरामशी ज्याची गाठभेट झाली त्यापैकी कुणालाही तो माथेफिरू वाटणे शक्य नव्हते. फार तर मी त्याला मूर्ख म्हणतो. आपल्याला अस्थिचर्मविभूषित मोहनदास करमचंद गांधी या माणसाला मारावयाचे नसून शक्तीचा, विज्ञानाचा, पौरुषाचा अव्हेर करणारा गांधीवाद नष्ट करावयाचा या गोष्टीचा त्याला विसर पडला. परिणामी राष्ट्रवाद मृतवत् झाला. षंढवाद यशस्वी झाला. तरवार गंजून गेली–फक्त ढालीचे राजकारण उरले.

शास्त्रीजींनी गांधींची अहिंसा व नेहरूंचे पंचशील मोडीत घातले. वल्लभभाईंची व्यावहारिक राजकारणनीती त्यांनी आचरली. म्हणून भारताची अब्रू थोडीफार वचावली. थोडीफार अशासाठीच की, ताश्कंदसारखा आपल्याला गैरसोयीचा नि पाकिस्तानचा भेकडपणा पोटात घालणारा तह त्यांनी केलाच. पण असो...त्यांनी पुरुषार्थाची काही पावले टाकली. पण नेहरूंची युवराज्ञी, अलाहाबादची मलिका आपल्या बापाचे फसलेले राजकीय डाव पुन्हा खेळतच आहे.

सांगण्याचा मुद्दा असा की, सौ. सिंधूताईंचे स्वागत मी जरा माफकच केले.

पण त्यांच्या लेखी मी कटाच पत्रकार असा होतो की अप्रिय, अहितकारक असा हा विचार मांडीत होतो म्हणून त्या येत होत्या, भेटत होत्या, कौतुक करीत होत्या.

एक दिवस त्या गोपाळला घेऊन आल्या. गोपाळ अबोल होता. त्याच्या डोळ्यात तसे तेज नव्हते. दीर्घकाल तुरुंगवासाने त्याच्या काही चमत्कारिक लकबी बनल्या होत्या. पण त्याची मान ताठ होती. बोलणे विनयाचे, नम्र पण निश्चयी होते. सर्वसाधारण गप्पा झाल्या. मग घरीही मी त्या दोघांना एकदा बोलावले. सरकारने कैद्याचे पुनर्वसन करण्याचा पत्कर घेतला म्हणतात. पण गोपाळसारख्या बुद्धिवादी माणसाला १८ वर्षानंतर मुक्त केल्यावर त्याने करावे तरी काय याचा सरकारने कधीच विचार केला नाही. गृहमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रांना कोरडे जवाब आले. मुलाखती असफल झाल्या. 'पुढे काय ?' हा गोपाळचा प्रश्न सुटलेला नव्हता. आणि मला गोपाळच्या बोलण्यातून पत्नीला आपण भारभूत होऊ नये ही तीव्र जाणीव जाणवली. मी त्यांना म्हणालो, 'तुमची गरज किती' त्यावर गोपाळ खिन्न हसला. मी म्हणालो 'मी काही कोणी श्रीमंत सावकार नाही. पण मला तुमची व्यथा समजते. दरमहा तुम्ही मजकडून तूर्त २५ रुपये घेऊन जात जा. आपण पुढे काय ते पाहू.'

बोलणे होता होता, लोकांच्या गाठीभेटी घेताघेता गोपाळ हळूहळू रुळत चालला, बोलका झाला, सिगरेट ओढू लागला, तेव्हा माझ्या ध्यानात आले की, या माणसाने भोगलेले दुःख बोलके होऊ शकेल. फुंकरीची आवश्यकता आहे. त्याने आपण लिहिलेले काही लिखाण, कविता आणून दाखवल्या. पण त्या सामान्य होत्या. उत्तेजन द्यावे असे त्यात काही नव्हते. गोपाळ गोडसे या नावाखाली त्या खपल्या असत्या. त्या कवितात मुलाला, बायकोला, कुटुंबियांना मामुली प्रसंगानिमित्त कवितेत गाठावलेली पत्रे होती. एका दंडिताने पाठविलेली पत्रे या दृष्टीने त्या दंडिताला आणि त्याच्या कुटुंबियांना ती पत्रे खरोखरीच अनमोल होती. पण साहित्य म्हणून ती मामुली होती. पण हे असे त्याला मला म्हणवेना. मामला होता त्याच्या एकटेपणावर फुंकर घालण्याचा. मी तर त्यांना फुलवायला सिद्ध झालो होतो.

त्याच सुमारास काही कामानिमित्त मी ग्वाल्हेरला गेलो अमता गांधी खटल्यातील आरोपी डॉक्टर परचुरे भेटले. डॉ. परचुरे यांच्या व्यक्तिमत्वाने मी भारला गेलो होतो. त्यांचे भेदक डोळे, आडमाप बोलणे आणि त्याहीपेक्षा त्यांच्या भयानक कल्पना यामुळे माझ्या लक्षात आले की, गांधीवधाचा कट होणे मुळी शक्य नव्हते. कट करणारी माणसे खूप मोठी योजना आखतात, सारा चोरटा गुपचूप कारभार ठेवतात, पैसे जमवतात, सुटकेची व्यवस्था करतात, पण या प्रकरणातली सारी माणसे मरायलाच तयार होती आणि व्यवस्था म्हणून कसलीच

नव्हती. नाना आपटे आणि करकरे पळून जाणार होते पण केवळ पैसे नसल्यामुळे पळून जाऊ शकले नाहीत ही त्यांची कटाची तयारी. परचुऱ्यांच्या गोष्टीतही पुष्कळ हकिगती मला कळल्या आणि तेव्हा गांधीवधाची हकिगत आपण प्रसिद्ध केलीच पाहिजे असा माझा निश्चय झाला.

आमच्या कार्यालयात गोपाळ अधून मधून येई. तेव्हा मी त्याला सांगितले, अजून काही उद्योग नाही तर तू आपल्या आठवणी लिहून काढ. ताज्या आहेत तोवर त्या लिही. मग रागलोभ थिटे होत जातात. त्यालाही आत्मविश्वास नव्हता आणि मला त्याची मुळीच खात्री नव्हती. त्याच्यापेक्षा सिंधूताई खूप बोलत आणि नेमके हवे ते बोलत. काही दिवस गेल्यावर गोपाळने मला एक लेख आणून दिला. तो लेख तसा फारसा चांगला नव्हता. पण गोपाळ लिहू शकेल याची पावती त्या लेखाने मला मला दिली. 'स्वत:बद्दल लिही, पण निष्कर्ष काढू नकोस' हे माझे त्याला पदोपदी टुमणे होते. कधी कधी त्याला ते माझे बोलणे आवडत नसावे. पण मी माझा ठेका सोडला नाही. एकतर गोपाळ हा कुणी तज्ज्ञ नाही, पंडित नाही. व्यवहाराने दिले तेच त्याचे ज्ञान. त्यामुळे गांधी-नेहरू यांच्या राजकारणाचा अन्वयार्थ त्याने लावू नये; स्वत:बद्दल, भावाबद्दल, कुटुंबाबद्दल सारे काही ज्ञात–अज्ञात त्याने लिहावे अशी माझी मागणी होती. प्रथम त्याला ते जमत नव्हते. पण पुढे पुढे लेखनाचा आत्मविश्वास वाढत गेला. आणि त्याच्या लक्षात आले की, आपण चांगले लिहू शकतो. जेव्हा जेव्हा तो तर्कवाद करतो तेव्हा तेव्हा त्या तर्कात अपरिहार्यपणे समर्थन येते. पण ते का येऊ नये ? न्यायालयाला सुद्धा ज्या शासनाने दाद दिली नाही, ज्याच्याविरुद्ध हेकटपणे सर्व तऱ्हेचा युक्तिवाद करून ज्याची शिक्षा स्वत:च्या अधिकारात सर्वथा अन्याय मार्गाने ज्या शासनाने वाढवली आणि त्याला फक्त वेडे व्हायचेच बाकी ठेवले – त्या शासनाविरुद्ध एका सामान्य नागरिकाने मुक्तीनंतरही चित्तविचलित न होऊ देता साधनशुचिता बाळगावी ही अपेक्षा हलकटपणाची आहे. खरे तर त्याची चीड एवढी अनावर असावयास हवी होती की अधिकारमदाने ज्यांनी त्याच्या क्लेशास हातभार लावला त्यांचा त्याने सूड व्यावयास हवा. पण गोपाळ हा अगदी थंड माथ्याचा माणूस आहे. नथूरामही तसाच होता. सूड गांधीवादीच घेतात, तेच घरे जाळतात, तेच पूर्वीचे रागलोभ आठवून आज सूड उगवतात. राष्ट्रहितापेक्षा ज्यांनी मनात अन्य काही ठेवले नाही ती भली माणसे क्षुद्र आणि मदोन्मत्त माणसांविरुद्ध सूड घेण्याचा विचारसुद्धा मनात आणीत नाहीत. कारण त्या सूडाने देशाचा काहीच फायदा होणार नसतो. ज्या सावरकरांना हकनाक गांधीवध अभियोगात गुंतवले गेले. त्यांनी मुक्ततेनंतर सूड उगवला का ? त्यांना ते सहज शक्य होते. त्यांना पुष्कळ निष्ठावंत

अनुयायी होते. व्यक्तिगत स्वरूपाचा सूड–नाश हा राष्ट्रवाद्यांना कधीच मान्य नव्हता. गांधीवध हा विफलतेतून झालेला एकमेव अपवाद. अर्थात तोही चूकच.

गोपाळचे लिखाण संयमित, रसपूर्ण, तरीही आवेशपूर्ण होते. मी सदैव त्याला वजावीत होतो की, वावारे तूं स्वतःचीच कहाणी सांग. त्याने कधी ती कक्षा ओलांडली तर मी ते लिखाण आत खेचीत होतो. समर्पक शीर्षके सुचवून पुढच्या लेखातील विषयाची चर्चा करीत होतो. पण या क्षणी हे कबूल करावयास हवे की हे सर्व लिखाण गोपाळचेच आहे. शीर्षके बहुतेक माझी आहेत. लेखनात माझा हातभार मुळीच नाही. मी गाळले खूप आहे. क्वचित शब्द, फार तर वाक्य वाढवले असेल–नसेल. पण तो संपूर्ण मजकूर गोपाळच्या लेखणीतून उतरलेला आहे. पहिले चार–पाच लेख मला आवडलेले नाहीत. कारण त्यात रसनिष्पत्ती झालेली नाही. पण पुढचे 'आरोपी क्रमांक आठ', 'दूरत्वाचे दिवस' हे माझ्या दृष्टीने मराठी साहित्यात फारच चांगले साहित्य मानावे लागेल. या सर्व पुस्तकात गोपाळच्या काव्यशक्तीचा खरा अनुभव सिंधुताईवरील लेखात येतो. आपल्या विरहामुळे जळणाऱ्या पत्नीची व्यथा, संयम, कार्यतत्परता आणि लढण्याची जिद्द ही त्याने इतक्या समरसतेने वर्णन केली आहे की मी–मी म्हणणारे साहित्यिक उणे ठरावे. मराठीतले अव्वल दर्जाचे लेखक (इथे नावे मुद्दाम लिहित नाही, कारण ती सर्व मंडळी सरकारी रोपास पात्र व्हावीत अशी माझी इच्छा नाही) आणि 'सोबत'चा सर्व मित्रपरिवार या पुस्तकाने भारून गेला आहे. कित्येक वेळा गोपाळच्या मनाविरुद्ध मी या लेखातून खूप काटछाट केली आहे. याचे उदाहरण सिंधुताईवरचा लेख–याच लेखात आपल्या तुरुंगवासाच्या काळात ज्या अनेक मित्रांनी (विशेषतः अभ्यंकर कुटुंबाने) जी मदत केली त्याबद्दल गोपाळने लिहिले होते. कलादृष्टया पत्नीवरच्या या लेखात अन्य कोणतीही नाती मला गौण वाटली. खळखळ न करता गोपाळने ते मानले. आझादाच्या आत्मचरित्रावर गोपाळने एक परीक्षणवजा लेख लिहिला तो मात्र या आत्मकथनात पत्करण्याचे मी नाकारले. तो लेख उत्तम आहे. गोपाळचे अन्य साहित्यगुण त्यात चांगले व्यक्त होतात. पण तो आत्मकथेचा भाग होऊ शकत नाही. तो लेख पंजण ६६ च्या दिवाळी अंकात लेख म्हणून छापला. लेखमालेचा भाग म्हणून नव्हे. पुस्तकात तो लेख घ्यावा म्हणून गोपाळ अजून फार खळवळ करतो. मीं कृतनिश्चयाने ते नाकारतो.

लेखमाला लिहिली जात होती तेव्हा सी. आय. डी. खाते जागरूक होते. आमच्या कार्यालयात सी. आय. डी. चे शिपाई अंकाच्या प्रती मागावयास येत. प्रथम काही दिवस झगडा नको म्हणून मी त्या देत गेलो. पण सरकारला विनामूल्य प्रती आम्ही का पुरवाव्यात? अगोदर दरमहा दहापंधरा प्रती रजिस्टर पोस्टाने सरकारला फुकट द्याव्या लागतात. त्या पोहोचूनसुद्धा पुन्हा सरकारी

तक्रारी असतातच. हा भुर्दंड आम्ही का भरावा ? एक दिवस मी प्रती मिळू शकणार नाहीत असे सांगितले. पुढे दरमहाचे दरमहा पावणेचार रुपये टाकून सी. आय. डी. खाते आमचेकडून तीन प्रती विकत घेऊ लागले. त्याशिवाय मुंबईला प्रती नेल्या जात त्या निराळ्याच. या लेखमालेचे चांगलेच स्वागत झाले. ज्या माणसाच्या हाती अश्लील म्हणून बदनाम झाल्यामुळे पैंजण दिसणे शक्य नव्हते, तेथे तेथे पैंजण दिसू लागले. केसरीचे ट्रस्टी श्री. भाऊसाहेब मोडक यांनी जेव्हा पैंजणची मागणी केली तेव्हा मी ओळखले, पैंजणचा वाचक खरोखरीच बदलला आहे.

ही लेखमाला कुठेतरी संपवणे भागच होते. लोकांचे कुतूहल अमाप होते. लेखांक पुष्कळ झाले होते. तेव्हा मी गोपाळला या पुस्तकासंबंधी माझी मते सांगितली. आजपावेतो कोणताही 'व्यवहार' असा दोघात घडला नव्हता. घरीही जाणेयेणे फारसे घडले नव्हते. दोस्ती म्हणतात ती तर मुळीच घडली नव्हती. पण आपण या माणसाशी कृतज्ञ असले पाहिजे ही गोपाळची भावना मला सदैव जाणवे. माझ्याशिवाय हे पुस्तक निघणे अशक्य होते हे गोपाळ जाणून होता. हा धगधगता अग्नी होता आणि तो घेण्यासाठी पोळलेले हातच योग्य हे तो अनुभवत होता. माझ्यावर त्याचा पदोपदीचा विश्वास होता. अजूनही आहे. कोणी त्याला म्हणते, 'तुझे पुस्तक येवढे खपले, तुला त्या वेहेऱ्यांनी काय दिले.' माझी खात्री आहे, गोपाळ म्हणत असेल, वेहेऱ्यांनी प्रतिष्ठा दिली. लोक त्याला म्हणतील, प्रतिष्ठेला काय जाळायचेय. त्यांनी द्रव्य किती दिले ते सांग. गोपाळ हे सांगणार नाही. मी या साऱ्या प्रकरणात काय भाग घेतला, काय धोका पत्करला, हे गादीवर टेकून कुत्सितपणे प्रश्न विचारणाऱ्याला काय कळणार ? असे असूनही या लेखमालेपोटी एकूण रु. ३००० गोपाळला पोचवले. हे पुस्तक येवढे खपेल–जप्त होणारच नाही याची कल्पना असती तर मी गोपाळला याहून अधिक रक्कम देऊ शकलो असतो. पण प्रतींची संख्या मोजकी, छपाई संगमची भारी दराची, ब्लॉक, चित्रे नेटकी. खर्चाकडे न पाहता केलेली. यामुळे अखेरी माझ्या दृष्टीने हा फारसा फायद्याचा व्यवहार झाला नाही. पण सर्वसामान्यतः लेखकाला रोख दहा टक्के रॉयल्टी दिली जाते, त्यानुसार मी ती गोपाळला दिली असे म्हणता येईल. मला रु. ३००० एवढीही रक्कम उरली नाही. उरावी अशी अपेक्षा नव्हती. बिलामत न येता हा व्यवहार उरकावा एवढीच आशा होती. ती सफल झाली. पुढच्या आवृत्तीत मी यथाक्रम पुस्तक विकेन त्यानुसार १५ टक्के रॉयल्टी गोपाळला जरूर देईन. मलाही भरपूर पैसे मिळतील. मी त्यावर खूष आहे.

पण कोणी कोणी म्हणतात, या प्रकरणी मी पाचपन्नास हजार कमावले. त्याला काय उत्तर देणार ? प्रती काढल्या ४०००. गोपाळ रोज प्रेसमधे जाई तेव्हा

तो आकडा नक्की हे त्याला ठाऊक होते. इतर मान्यवर प्रकाशकांप्रमाणे जास्त प्रती काढून कमी दाखवून सरकारला अन् लेखकाला बुडविण्याची माझी इच्छा नाही. हाती आलेल्यापैकी तीनशे प्रती भेटी दाखल गेल्या.

आजही या पुढच्या आवृत्तीचा इंग्रजी–हिंदी वा अन्य आवृत्तीचा मला लोभ नाही. गोपाळने त्या आवृत्त्या खुशाल कोणालाही द्याव्यात. माझे कर्तव्य मी केले आहे. त्याचे त्याने करावे–तो करीलही. कसल्याही करारांशिवाय आजवर सारा व्यवहार पुरा झाला. पुढेही होईल. अखेरी करारापेक्षा इमान हेच खरे आणि आम्ही दोघेही त्यात उणे पडणार नाही. अशी मला खात्री आहे.

पुस्तक बाजारात येण्यापूर्वी जप्त झाले असते तर? कठीण प्रसंग होता. माझा स्वतःचा मोठा प्रेस असूनही मी हे पुस्तक एका अधिक मोठ्या प्रेसमधे म्हणजे संगममध्ये छापले. जामिनाच्या रूपाने दहापाच हजाराचा एकमुखी फटका सहन करण्याची माझी ताकद नव्हती. मी तो फटका क्रमशः सहन केला असता. पण एक रकमेने सर्व खर्च अंगावर येता तर मला कठीण गेले असते. तेव्हा प्रेस अशा पाहावयाचा की तो बलवंत असावा. जामीन द्यावाच लागला तर सहज देता यावा म्हणून संगमची निवड. शिवाय आवृत्ती किती काढावयाची ते ठरलेले नव्हते. सर्व कंपोझ उभा ठेवणारा प्रेस हवा होता. म्हणून संगम निवडला. संगमच्या व्यवस्थापकात त्यावेळेस काही फेरबदल झाला आणि कबूल करूनही सर्व कंपोझ मधेच सोडविण्यात आला. आता कारण नसता सुमारे २४०० रुपये त्या कामी माझे हकनाक खर्ची झाले. पण मी काही करू शकलो नाही. कारण अजून मला प्रेसचे काही बिल द्यावयाचे आहे.

गांधीहत्या हे एक मोलाचे पुस्तक मी छापले, याबद्दल मला अभिमान आहे. दसऱ्याच्या दिवशी गोडसे पतिपत्नीचा काही सत्कार करावा अशी इच्छा होती. पण माझ्या दिवाळी अंकाची गडबड आणि त्याहीपेक्षा तयार झालेल्या पुस्तकाचे वितरण यात मी आकंठ बुडालो होतो हे गोपाळ पाहात होता. तोही आपल्या परीने मला साहाय्य करीत होता. त्याच्या शरीरकष्टाला सीमा नव्हती–उत्साह तर लग्नाच्या वेळचा होता–कदाचित् जास्त.

दसऱ्याच्या दिवशी मी झोपेतून नुकताच उठलो असेन. माझ्या मुलांशी काही आमोदप्रमोद करीत मी आळसावत चहा पीत होतो. तेवढ्यात गोडसेकुटुंब आमच्या घरी ठाकले. मुलावाळांसमवेत ते दांपत्य आले. वडीलकीचा मान त्यांनी दिला. पण वयाने गोपाळ माझ्याहून मोठा असणार. दसऱ्याची भेट म्हणून माझ्या हाती खरी सुवर्णपुष्पे त्याने ठेवली आणि मला चकित केले. त्याने खरोखरीच मुक्ततेचे सोने लुटून आणलेले होते. सुवस्त्रांनी, सुहास्यानी, कृतज्ञतेने त्या सोन्याचे तेज अधिकच चकाकत होते. माझ्या पत्नीलाही त्यांनी कांही अहेर दिला. सुहा-

सिनीने सुहासिनीचे स्वागत केले. गोपाळने एक प्रकारे सीमोल्लंघन केले. हे सुचावे यातच त्याचे आणि त्याच्या कुटुंबाचे मोठेपण आहे. माणसाची खरी श्रीमंती बँकेतल्या पैशावर नसते–ती असते अशाच कृतज्ञतेवर.

तसे अजून खूप सांगावयाचे राहिले आहे. पण सांगू किती. अनेक खासगी पत्रातून माझे कौतुक झाले. समक्ष भेटीत अनेकजण चार कृतज्ञतेचे शब्द बोलून जात. हे कोणीतरी करावयास हवे होते. असे ते म्हणत. म्हणणारे फार मोठे कर्तबगार लोक आहेत. लेखक, डॉक्टर, पत्रकार, इंजिनिअर, मराठा, महार, ब्राह्मण आणि एक तर मुसलमान होता. मी आता खरे म्हणजे नामानिराळा झालो होतो. पुस्तक छापून संपले होते. आता तीच–तीच गाणी मला गायची नव्हती. माझ्या लेखी हे प्रकरण संपले होते. याउप्पर गोपाळ लिहील ते–सांगेन ते मी छापणार नव्हतो. तसे गोपाळला सांगितले. 'हे एवढेच. आता थोडे थांबू या. तेच तेच करण्याने सारेच काही बोथट होते.' त्याच्या कन्येने लिहिलेला एक सुंदर लेख त्याने मला आणून दिला. पण मी मनाशी ठरवले की अधिक छापण्यात मौज नाहीं. तो लेख पुढे मराठ्यात छापून आला. मला दुःख झाले नाही. एक अलौकिक, आवश्यक इतिहासग्रंथ मी छापला. माझ्या लेखी पुत्र जन्मला. त्यावरोबर वाहेर येते ती गदळ असते. त्याचे कौतुक होऊ नये.

आता मी पुष्कळ गोष्टी शांतपणाने पाहतो. पण ग्रंथप्रसिद्धीचा दिवस जवळ येत चालला तेव्हा मी भांवावलो होतो. या पुस्तकाला प्रस्तावना कोण लिहिणार? एक भावे अण्णा सोडले तर माझ्यासमोर एकही नाव नव्हते. अव्यांसारख्या झुंजार माणसालासुद्धा नको हा अग्नी असे झाले होते. आजाराच्या सबबीखाली त्यांनी प्रस्तावना लिहिण्याचे नाकारले. मी म्हणालो, ठीक आहे. मी काही फार मोठा लेखक नाही. मला सूर्यच काय पण दिवटीसुद्धा होता येणार नाही. पण लुकलुकती मेणवत्ती होऊन मींच रस्ता दाखवीन. या अशा अद्वितीय पुस्तकाला प्रस्तावना लिहायची माझी लायकी नव्हती. मी अखेरी एक दिवस चार शब्द लिहिले. वाटले फाडून टाकावी ती पाने. पण पुस्तकाचे मोजमाप तर करणे भाग होते–शोध तर हवाच होता. कुणी शोध घेत नाही म्हणून तसेच भुंडे पुस्तक कसे छापावे. उंबरठ्यावर माप ठेवल्याशिवाय नववधूला मी कसे घ्यावे. मग ओंजळीत धान्य घेऊन उंबरठ्यावर पडावे आणि सुकुमार पायांनी ती मूठ उधळून घ्यावी, असे ठरवले. ती लक्ष्मी आहे. तिचे स्वागत केलेच पाहिजे. मग मी लिहिलेली प्रस्तावनेची पाने माझे मित्र श्री. वि. शं. पारगांवकर आणि श्री. श्री. ज. जोशी यांना दाखवली. ही दोन माणसे अशीं आहेत की, वहुशः त्यांची मते परस्परविरोधी असतात. पण या प्रस्तावनेच्या वाचनानंतर कसलाही मतभेदाचा सूर न काढता त्यांनी मान्यता दिली, कौतुक केले.

मी राजकारणी नाही. कोणत्याच पक्षाचा सभासद नाही. कोणत्याही राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रचारक नाही. त्यामुळे या पुस्तकाच्या प्रकाशनामागे काही उद्देश चिकटविले जाणार नाहीत. जे घडते त्याचा अन्वयार्थ लावणे हा माझा पेशा आहे, आणि म्हणून घडले त्याची नोंद करणे माझे कर्तव्य ठरते. तरीही हे पुस्तक मी प्रसिद्ध करू नये असा मित्रांनी सल्ला दिला. जुनी मढी उकरण्यात काय फायदा असेही विचारले गेले. मी एवढेच म्हणालो की, इतिहासाचा उद्देशच मुळी तो असतो. इतिहास अप्रिय असला तरी तो लिहिण्यावाचून गत्यंतर काय ?

हे पुस्तक तुमच्या कधी काळी हाती पडेल असे मला वाटले नव्हते. विषय सनसनाटी, राजकर्ते असहिष्णु, लोक काही शब्दांनीच वुजणारे, अशा परिस्थितीत एका गुन्हेगाराची कहाणी छापण्याचे धाडस कोण करणार ?

–आणि तो गुन्हेगारही सामान्य नव्हे. महात्मा गांधींचा खुनी. महात्मा गांधी त्या काळातले श्रेष्ठ पुरुष. पुन्हा त्यांच्या लौकिकात संतपणाचा प्रवाह मिसळलेला. अशा माणसाचा खून–तोही अगदी विचारपूर्वक कट करून–केला गेला. गोपाळ गोडसे, या कहाणीचा निवेदक, त्या कटातील एक प्रमुख आरोपी, प्रत्यक्ष खून करणाऱ्या नथूरामचा धाकटा भाऊ. हा गुन्हेगार आपल्या १८ वर्षाच्या कारावासानंतर आपली हकीकत–विशेषत: गांधी खुनाच्या कटाची हकीकत सांगतो आहे–कसलाही राजकीय हेतू न ठेवता.

गांधीचा खुनी जर गावंढळ, मतलबी, अडाणी किंवा वेडसर असता तर गांधींच्या नावाचा व्यापार करणारे दु:खी झाले, तरी संतापले नसते. गांधीवादाची किंवा गांधींची प्रतिमा त्यामुळे डागाळली नसती. पण खुनी, खून करणारे, खुनाला प्रत्यक्ष सहाय्य करणारे किंवा दुर्लक्ष करणारे हे सारे सुशिक्षित होते, सुजाण होते, देशभक्त होते ...

होय. ते देशभक्त तर होतेच होते. या देशावर जेवढे गांधींचे प्रेम होते तितकेच या सर्व मंडळींचे या भूमातेवर होते. किंबहुना या मायभूमीवरच्या काही वच्यावाईट प्रेमामुळेच गांधीहत्येसारखे कृत्य त्यांच्या हातून घडले. त्या कृत्याचे उत्तरदायित्व गेल्या पाच पन्नास वर्षातील राजकीय नेतृत्व–विशेषत: गांधींजीचे मुसलमानविषयक धोरण–व म्हणुन देशाची झालेली फाळणी–हजारो सिंधी, पंजाबी, बंगाली भारतीयांचा सर्वनाश–अनेक कारणांवरही टाकता येईल–गांधीहत्या केवळ एक खून एवढेच त्या घटनेकडे पाहून चालणार नाही. ती एक राजकीय हत्या होती. त्या हत्येत वैयक्तिक स्वार्थ किंवा सत्तेचा हव्यास नव्हता, तर अगतिकता होती. चुकीच्या मार्गाने हे थांववण्याचा अडाणी यत्न होता. खून करणाऱ्यांना हे कळले नाही की खून माणसाचा करता येतो–तत्त्वाचा नाही, म्हणून गांधी तेवढेच मारता आले–गांधीवाद तसाच राहिला, फोफावला.

आजच्या बदलत्या परिस्थितीत आम्ही येवढे तरी छापू शकतो. आज गांधी तत्त्वज्ञान आचके देत लाहोरच्या वेशीवर रक्तबंबाळ होऊन उभे आहे. अहिंसा, सत्य यांच्या चिंध्या साऱ्या भारतभर विखुरल्या आहेत. आणि एकोणीस–वीस वर्षात स्वातंत्र्याला नरकाची कळा आली आहे.

गांधीहत्या हा आता इतिहास आहे. सत्याशिवाय पर्याय नसतो. म्हणून हा ग्रंथ सत्यशोधनाच्या रस्त्यावरचा एक नम्र यत्न आहे. लेखकाचा अधिकार मर्यादित आहे, याची त्याला आणि मला जाण आहे. कायद्याची बंधने गृहीत धरलेली आहेत. आणि म्हणून आमच्या शक्तींना काही मर्यादाही आहे, हेही सर्वांनी ध्यानीं ठेवावे.

वर्षे निघून जातील. नथूराम गोडसे विस्मृतीत जाईल. सावरकर विस्मृतीत जातील. कदाचित् गांधी–नेहरू ही आजची दैवते विसरली जातील. विसरण्याजोगी परिस्थिती निर्माण होईलही. पण हा भूभाग तसाच राहील तिथे माणसं असतील. तो इतिहासाची मागची पाने चाळतील. या वैभवशाली देशाचे खंड का पडले याचा इतिहास वाचतील. एका भेकड राजनीतीवरचा तो कलंकित भाग, त्यातील रक्तरंजित गंगा–सिंधू नदीच्या खोऱ्यांचा इतिहास त्यांच्या नजरेसमोर येईल. तेव्हा गांधी जरूर आठवतील, नेहरू आठवतील–सावरकर तर निश्चित आठवतील; निरनिराळ्या संदर्भात अशा इतिहासकारांना नथूराम गोडसे या अत्यंत लहान माणसाची कदाचित् पुसटती आठवण तेव्हा होईल.

मनुष्यजातीला उन्नत करणारी भावडी तत्त्वज्ञाने चुकीच्या ठिकाणी वापरली की देशाची भूमी लाल होते, याचा आणखी एक धडा मिळेल. जसा पृथ्वीराजाला मिळाला, जसा देवगिरीच्या रामदेवरायाला मिळाला.

आणि तेव्हाचे इतिहासकार या देशाचा आजचा इतिहास लिहितील. त्यात मृत झालेल्या बुद्धवादाप्रमाणेच मृत झालेल्या गांधीवादाची चिकित्सा करणारी काही पाने असतील.

काळ कोणी रोखू शकत नाही. तो रोखावा म्हटले तरी ते शक्य नाही. झाली –बघता बघता वीस वर्षे झाली. इतिहास निराळीच सत्ये सांगू लागला. आणखी काही वर्षांत येथे निरनिराळीच स्वप्ने स्फुरतील, कोणी सांगावे.

कुणास ठाऊक, त्या वेळेस कुणाच्या पदरात काळ काय न्याय टाकील ?

असा हा ग्रंथनिर्मितीचा इतिहास. पत्रकाराने निर्भय असावे. शासनाला धारेवर धरावे. सत्यासत्याचा शोध चालू ठेवावा ही आमची वृत्तपत्रसृष्टीची परंपरा आहे. पारतंत्र्यात ही परंपरा खंडित झाली नाही. पण स्वातंत्र्यांने लाचारांच्या फौजा निर्माण केल्या. आजची वृत्तपत्रे ही सारी लोकांना हव्या असणाऱ्या अफूच्या गोळ्या पुरवणाली दुकाने बनली आहेत. मी लहान आहे, क्षुद्र आहे. मजजवळ गमावण्या–

जोगे फारसे काहीं नाही म्हणून असेल, माझी मान मात्र ताठ आहे. ती तशी राहो एवढेच देवाजवळ मागणे आहे. पैशाशिवाय पळभरही न चालणाऱ्या या जगात पैसा न मागता, मागतो आहे ती ताठ मान ! ती अशासाठी की, त्या धनवंताच्या घोळक्यात तीच उठून दिसेल.

२८ जानेवारी १९६८ • • •

हे करायचं राहून गेलं

माणसाला आयुष्य एकदाच मिळतं. म्हणजे पूर्वजन्म किंवा पुनर्जन्म या तत्त्वज्ञानी माणसानी काथ्याकूट केलेल्या गोष्टी आपल्यातरी आटोक्यात नसल्यामुळे आहे एवढाच जन्म आणि तेवढ्याच कालावधीत घडेल तेच जीवन असतं. म्हणजेच मानवी कर्तृत्वाला मर्यादा ती केवढीशी. या एवढ्याशा आयुष्यात माणसाला किती तरी गोष्टी करायची इच्छा असते. प्रत्यक्षात त्यांपैकी फारच थोडे घडते. क्वचित काही घडतही नाही. केवळ पोटाची रिकामी पोकळी भरण्यापायीच त्याचं आयुष्य केव्हा विझून जातं हे त्याचं त्यालासुद्धा कळत नाही. कितीतरी सुखं भोगायची राहिलेली असतात. कित्येक सुंदर स्थळे पाहायची रहातात. कित्येक सौंदर्ये भोगायची रहातात, कित्येक उत्कट अनुभव हातातच येत नाहीत आणि कधी न पकडता आलेल्या सुखाचे आभास हेच आपले आयुष्य होऊन बसते. परंतु सुखाच्या अनुभवांचा अभाव आणि अतृप्ती यांनी तर मानवी जीवित भरलेलंच आहे. आपली कुवत न ओळखता सर्व सुखांच्या मागे धावतपळत सुटणे हा मानवी स्वभावधर्म आहे. माझ्याही आयुष्यात अशा न मिळालेल्या कितीतरी सुखांची यादी मी सांगू शकेन. यांपैकी कितीतरी सुखानुभव मला मिळूही शकले असते. परंतु नियतीचा हा खेळ असा गमतीने खेळला जातो, की हातात आलेलं सुख आपल्या ओंजळीतून गळून केव्हा जाते हे कळतसुद्धा नाही.

माझ्या शारीरिक सुदृढतेवर आणि उंचीवर खूप होऊन प्रभाकर नातू (आत्ताचे भारत सरकारचे एक लष्करी चिटणीस) यांनी मला उत्तम बॉक्सर बनविण्याचा चंग बांधला होता. सुप्रसिद्ध गुगली गोलंदाज कै. सदू शिंदे यांनी मला

तालीम देऊन गोलंदाज करण्याचा यत्न केला होता. लष्करी पेशा स्वीकारण्याचाही योग माझ्या आयुष्यात येऊन गेला. परंतु इतरांना दुर्लभ असणारे हे योग मला मात्र वापरता आले नाहीत. कितीतरी गोष्टी मला सहजसुलभ होत्या. पण करंटेपणाने मी बहुतेक गमावल्या आहेत. म्हणून अमुक एक गोष्ट आपल्या आयुष्यात घडली नाही याबद्दल आता खंत वाटून उपयोग नाही. कारण कोणतीही गोष्ट जरी प्रत्यक्षात घडली असती तरी आजचे जे आयुष्य मी भोगतो ते न मिळाल्याबद्दल खंत करण्याची संधी मिळाली असतीच की नाही ! सुखाचा, सौंदर्याचा, कर्तृत्वाचा वा कीर्तीचा अनुभव उणा पडला म्हणून खंत वाटत नाही. आयुष्य ही इतकी सुंदर गोष्ट आहे की सुखानुभवाच्या वेली तेथे सदैव डंवरलेल्या असतात. विजय मर्चंटसारखा क्रिकेटपटू, देव आनंदसारखा बायकांचा लाडका नट, जयंत नारळीकरसारखा बुद्धिमान गणिती, अत्र्यांसारखा वादळी पत्रकार व्हायला कुणाला आवडणार का नाही ? एखाद्या अलिशान इमल्याचा स्वामी असावं, आपल्या दातृत्वाने जगाची मान लववावी आणि समाजातून हिंडताना कौतुकाचे आणि कुतूहलाचे मुजरे स्वीकारावेत असे जर कुणाला वाटत असेल तर त्याची चूक आहे असे मी म्हणणार नाही. परंतु असले काही आपल्याला मिळाले नाही ह्याबद्दल मात्र मला मुळीसुद्धा चुकल्यासारखं वाटत नाही.

परंतु सुखाप्रमाणे काही दुःखेसुद्धा भोगण्यात मोठी मौज असते. आपल्यावर कोणीतरी आशिक असावं आणि आपणही कुठे तरी मनोमय गुंतलेलं असावं—मात्र प्रत्यक्ष मीलन मात्र घडू नये... या मीलनासाठी तळमळत राहावं... जळत राहावं, आणि दोघांनीही हे जळत राहणं हसतमुखाने पचवावं हे माझ्या लेखी एक सुखच आहे. माझ्या आयुष्यात तशा उत्कटत्वानं कोणी प्रेम केलं असेल असे मला वाटत नाही. पुष्कळ स्त्रियांशी माझी मैत्री जडली. परंतु जिथे दोघेही मनोमय पुरेपूर पेटलेले होतो असे मात्र घडले नाही. आयुष्याच्या भावडया कालखंडात अशा तन्हेचं भारून टाकणारं प्रेम ज्यांच्या वाटयाला आलेलं असेल त्यांचा मला हेवा वाटतो. ज्या स्त्रीवर मी जीव टाकून प्रेम केले ती स्त्री... खरं पाहता कोणत्याही तन्हेनं असामान्य नव्हती—पण मला ती लाभू शकली नाही. कारण माझ्यावद्दल तिला कधीच प्रेम वाटलं नाही. त्याला अर्थात कोणाचाच काही इलाज नव्हता आणि ज्या स्त्रीने माझ्यासाठी जीव टाकला तिच्याबद्दल मला आदर होता, पण प्रेम मात्र नव्हतं. त्यामुळे ज्याच्यासाठी मनुष्यप्राण्याची ओढ असते ती प्रेमिकाची धुंदी मला कधीच लाभली नाही. स्त्रीसंगातील शारीरिक धुंदी कितीही गवसली आणि त्यावेळेपुरती ती कितीही अपूर्व असली तरी ती प्रेमाची धुंदी नव्हे—ती वासनेची वेहोषी. प्रेमाची खरी धुंदी मला लाभली नाही. एखाद्या सामान्य स्त्रीचे मनोभावे प्रेम आणि आत्मार्पण ज्या पुरुषांना लाभतं अशा सुदैवी पुरुषांपैकी मी एक नाही.

समुद्रात राहून माशाने कोरडे राहावे तसा स्त्रियांच्या संगतीत राहूनही मी स्त्री-प्रेमाला पारखा राहिलो. इतर पुरुषांच्या मत्सराचा विषय होऊनही मी भुकेलाच राहिलो. असं होण्यासाठी माझे स्वभावदोषही कारणीभूत असतील. परंतु धुंद प्रेमाचा एक क्षणही माझ्या आयुष्यात आला असता तर माझ्या आत्ताच्या यशापयशात फार भर पडली असती. त्या अनामिक प्रेमिकेला भेटायचं राहून गेलं याची खंत मनात राहतेच. उतारवयात माणूस अधिक हिशोबी बनतो. या कालखंडात एखाद्या स्त्रीने माझ्यावर मनभरून प्रेम केलंही असेल, पण त्या प्रेमातली गूढता आणि गाढता आता मला समजत नाही. आणि म्हणून माझ्या आयुष्यात जसे धुंद प्रेम मिळायचं राहून गेलं तसंच माझ्याकडून दुसऱ्या स्त्रीलाही ते मिळालं नसल्याची शक्यता आहे, हाही उद्वेग मनात उरतोच.

लहानपणापासून, देशासाठी सर्वस्व देऊन टाकणाऱ्या माणसांच्याबद्दल माझ्या मनात एक विलक्षण ममत्व आहे, आणि तशी संधी माझ्याही आयुष्यात मला मिळाली होती. पण प्रत्येक वेळेला ती संधी कुणी तरी ओरबाडून माझ्याकडून काढून घेतली. बेचाळीसच्या चळवळीत भाग घेण्याच्या उत्कट इच्छेपायी मी सरकारी नोकरीतून रजा घेऊन पहिल्या दिवशीच्याच पुण्यातील उद्याणात हजर राहिलो. बेचाळीसच्या चळवळीत पुढे जे अभूतपूर्व पराक्रम घडले त्या पराक्रमात एक सैनिक म्हणून का होईना मी नक्कीच कुठेतरी असायला हवा होतो. परंतु पहिल्याच दिवशी गोळी लागून पंगू होऊन हॉस्पिटलात जो मी जखडला गेलो तो पार चळवळ संपेपर्यंत. ह्याच नव्हे तर अशा अनेक आत्मार्पणाच्या प्रसंगी असं काही तरी विपरीत घडलं की मी दरवेळेस बाजूला फेकला गेलो. माझ्यावर नियतीची अशी कृपा (अवकृपा) का होत होती हे मला कळलेले नाही. माझ्या मनात ती खंत बाकी उरते ती उरतेच. त्या आत्मार्पणाने किंवा शरीरदंडाने नेमकं काय घडलं असतं ते मला सांगता येत नाही. परंतु खवळलेल्या समाजाच्या लाटेवर राहणं, पराक्रमाच्या दंतकथेतील एक शब्द होणं, आणि कुर्बान करण्यासाठी रक्ताची कारंजी उडतात त्यातील एक थेंब होणं यापरते परमभाग्य माझ्या दृष्टीने तरी दुसरे कोणतेही नाही. समाजाला पत्रकार लागतात, लेखक लागतात, शासक लागतात–तसेच सर्वस्व देऊन टाकण्यासाठी तत्पर असणारे सेनापती बापट, बाळूकाका कानिटकर यांसारखे वेडे पीरही लागतात. वेड्या पीरांपैकी मी एखादा झालो असतो तर मला अधिक आनंद झाला असता. बंदिस्त खोलीत बसून देशभक्तिपर विचार लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष त्या देशाच्या मातीवर उभा राहून आपल्या रक्तानं देशभक्तीची गीता लिहिणाऱ्याची थोरवी काही निराळीच आहे.

राहून गेलंय ते हे असंच काहीतरी आहे. प्रत्येक क्षण नव्या धुंदीने भारला जावा असं मनोमन मानणारा मी पंगुत्वामुळं आज एका बंद खोलीत पांढऱ्यावर

काळं करीत बसतो. रानात गरजणाऱ्या सिंहाची आणि टेपरेकॉर्ड केलेल्या सिंह-गर्जनेची बरोबरी कशी होणार ?

पण आपल्या हातात तरी त्यातलं काय आहे ? आयुष्यातल्या राहून गेलेल्या या उणिवांमुळेही आयुष्यालां काही खोली येत असेल.

असेल. तसंही असेल.

दिवाळी १९६९

● ● ●

- माझ्या बहुजन समाजातील मित्रांनो
- नेते हवेत ग बाई नेते हवेत
- भाषावार प्रांतरचना
- कमंडलू आणि राजदंड
- शरीरविक्रीचा व्यवसाय केव्हा सोडणार
- वरच्याचा पाय ओढा पण खालच्याला हात द्या
- अर्धशिक्षितांची फौज
- नाठाळ बायकोला वठणीवर आणणारा कायदा
- जोगिणी निर्यातीचा राष्ट्रीय व्यापार
- आता एकच झेंडा हवा आहे
- कोण जिकले, कोण हरले
- या भयंकर साथीला आवरणार कसे ?
- अनुभव आणि आविष्कार

माझ्या बहुजनसमाजातील मित्रांनो

या चिमुकल्या 'सोबत'ला काही एक स्थान येऊ पहात आहे.
कदाचित् यामुळेच असेल, सोबतला टीकाकार निर्माण होऊ पहात आहेत.

'आपण' सारखे परधर्मीय मदतीवर चालणारे वृत्तपत्र माझे शत्रू झाले तर त्यासारखा मला आनंदच नाही. अराष्ट्रीय, जात्यंध, धर्मांध, अविवेकी किंवा लाचार या सर्वांचे वैर ओढवून घ्यावे यासाठी तर मी व्रतबद्ध आहे.

मला वैर नको आहे ते फक्त बहुजनसमाजाचे.

पण काही मंडळी जाणूनबुजून जुने वाद उकरून आमच्याबद्दल गैरसमज पसरवीत आहेत. तेव्हा माझ्या सर्व वाचकांना काही स्वच्छ सांगणे प्राप्त झाले आहे. 'सोबत'चा खप खूप वाढावा अशी आकांक्षा नसल्याकारणाने मला बहुजनसमाजाचे लांगूलचालन करण्याची मुळीच गरज नाही. पण लोकशाहीवर माझी श्रद्धा आहे. या राष्ट्राच्या अभ्युदयाचा रस्ता एकसंध समाजात मला दिसतो आहे, म्हणून जातीजातीतील वैर वाढता नये, अशी माझी धारणा आहे. येवढ्यासाठी बहुजनसमाज जागा करण्यावाचून पर्याय नाही. आणि म्हणूनच कोणी अडाणी माणूस 'बहुजनसमाजाचे' नाव घेऊन हे वैर वाढविण्यासाठी 'सोबत'चा उपयोग करील तर तो वेळच्यावेळी रोखणे माझे कर्तव्य आहे.

'गांधी हत्या आणि मी' हे पुस्तक मीच छापले आहे. त्याबद्दल मला कधीही खंत वाटलेली नाही वा वाटणार नाही. कारण माझ्या लेखी गांधीवधाची दुसरी वाजू प्रकाशात येणे अगत्याचे होते. लेखनस्वातंत्र्य म्हणून का होईना, बलदंड पक्षाने वा गांधीभक्तांनी लेखकांचे हे स्वातंत्र्य हिरावता कामा नये. दिवाभीताप्रमाणे या देशात कोणी वागू नये आणि म्हणून मोठ्या स्वरात कोणालाही आपली मते मांडता आली पाहिजेत. यातच लोकशाहीचे वर्धन आहे. विरुद्ध मताचे खंडन करण्याचे मार्गही सर्वांना मोकळे आहेतच पण केवळ दमदाटीने कुणीही कुणाचेही स्वातंत्र्य हिरावून घेऊ नये. उद्या सावरकरभक्तांचे राज्य झाले आणि एखादा शंकरराव

देव किंवा विनोबा भावे गांधी तत्त्वज्ञानावर लिहू म्हणेल तर तेही लिहिण्याचे त्याला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. आणि त्यासाठी मी तेव्हा हजर असलो तर असाच झगडेन आणि 'त्या' सरकारी रोपाचा धोका पत्करेन व ते पुस्तकही छापेन.

'गांधी हत्या आणि मी' या पुस्तकाशी माझा केवळ एक 'इतिहास ग्रंथ' म्हणूनच संबंध आहे. कारण तो ग्रंथ छापून होताच श्री. गोडसे यांचे अन्य साहित्य काहीही छापावयाचे नाही हा निर्णय मी त्यांना सांगितला आणि पाळला आहे. त्यांचे अन्य साहित्य अन्यत्र प्रसिद्ध होते आहे. त्यांच्या नावाचा किंवा प्रसिद्धीचा फायदा मी उठवू शकेन, पण मी ते केलेले नाही. जे काम करणे आवश्यक असूनही कोणी करायला धजले नसते ते काम मी केले. मात्र मी काही दुसऱ्याची मते स्वतःच्या खांद्यावर वहाण्याचे कायमचे कंत्राट घेतलेले नाही. या पुस्तकाच्या प्रसिद्धीने त्यांना अन्य मार्ग उपलब्ध झाले आहेत आणि माझेही कार्य झाले आहे.

नथूराम 'गोडसे कल्ट' हा एक मूर्खपणाचा शब्द आहे. नथूराम गोडसे हा एकांडा माणूस होता. जर खरोखरच तो हिंसक माणूस असता तर केवळ गांधींचा खून करून तो कशाला थांबता! नेहरू, आझाद, किडवाई किंवा जिना... खून करावयाला त्याला पुष्कळ माणसे मौजूद होती. त्याचे पूर्वीचे रेकॉर्ड खुनी-बदमाष असे नव्हते. खूप मोठी संघटना त्याने बांधली असेही नव्हते. कारण ती तशी असती तर मग खुनांचे सत्र चालू राहिले असते. गोडसे दुर्दैवाने ब्राह्मण होता म्हणून महाराष्ट्रात ब्राह्मण वर्चस्वाविरुद्ध बरेच दिवस धुमसत असलेला द्वेष या निमित्ताने पुरा उफाळून आला. गोडसे मुसलमान असायला हवा होता. निदान गोडसेने एखादा भाडोत्री खुनी त्या कामी वापरायला हवा होता, म्हणजे ब्राह्मणद्वेष्ट्या मंडळींची फार गैरसोय झाली असती अन् मुसलमानांच्या संहारासाठी तत्पर असणाऱ्यांची चंगळ झाली असती. ब्राह्मणद्वेष्ट्या मंडळींना गांधींचा मृत्यू ही एक संधी मिळाली आणि त्यांनी त्या संधीचा फायदा घेतला. गोडसे निदान असा शहाणा नव्हता हे तर सिद्धच झाले आहे. गोडसे हा पूजनीय आणि वंद्य गृहस्थ आहे असे सांगणारा माझ्या माहितीत कोणी माणूस नाही. गांधींचा खून हेही थोर कृत्य होते असे सांगणारा मला अजून माहीत नाही. कारण गांधींचा खून होऊ शकला तसा सावरकरांचा होऊ शकला असता! खुनाने जर प्रश्न सुटले असते तर मग निवडणुकीचा रस्ता धरण्याचे कारणच काय? एका माणसाच्या नाशाने त्याचे फक्त शरीर नष्ट होते आणि मग अनेक वर्षे त्याचे पुतळे बोकांडी बसतात.

तरीही भूपतने केलेला खून आणि नथूरामने केलेला खून यात फरक करायला लोकांना शिकवले पाहिजे. कसलाही स्वार्थ किंवा आकांक्षा या खुनापोटी नव्हती हे तर मान्य करावयास हरकत नाही. चतुर खुनी खून करून पळत काढतात. त्या चतुर खुन्याच्या जातीचा नथूराम नव्हता. कारण आतापर्यंतच्या सर्व

राजकीय हत्यांचे खुनी रहस्यमय राहिले. केनेडी बंधू, लिंकन, उपाध्याय यांचे खुनी तर पळून गेले. मृत्यूला सामोरे जाण्याचे त्यांना नैष्ठिक सामर्थ्य नव्हते. नथूराम-जवळ ते होते. ज्या अवैध कृत्याला तो अखेरी तयार झाला तसे तो सदैव करत होता असेही दिसत नाही. मग लोकांना विथरवणारे कृत्य त्याने मानसिक विकृतीत केले की काय ? तसेही नाही. थंड डोक्याने त्याने पिस्तुलाचा चाप ओढला, वैद्यकीय तपासणीत त्याच्या हृदयाचे ठोके अगदी स्थिर पडत होते असे ठरले आहे. तो पळून गेला नाही. ते त्याला सहज शक्य होते. तो जर खरा कट असता तर कट-वाल्यांनी पकडण्यापूर्वी किंवा पकडल्यानंतर त्याला सोडवले असते. पण तो कट एवढ्याच अर्थाने होता की, चार मित्रांनी काही सोयी करून नथूरामकडून ते कृत्य घडवले व त्या कृत्याचे उत्तरदायित्व विकृतीत नव्हते, स्वार्थात नव्हते किंवा सूडात नव्हते. पाकिस्ताननिर्मितीच्या काळातील विलक्षण अशा मनुष्यहत्येने आलेली विफलता त्याला कारण होती. असा प्रसंग साऱ्या राष्ट्राच्या इतिहासात क्वचितच घडतो. जणू काही त्या हत्येने त्यापूर्वीची हत्या दुरुस्त होणार असते ! गांधी–नेहरू यांचा खून करण्याने जर हिंदुस्थान अखंड राहणार असता तर ते कृत्य जरी न्याय-दानाने जरी गुन्हा ठरविले असते तरी राष्ट्रभक्तांनी क्षम्य मानले असते. पण दुर्दैवाने वैफल्यातून झालेल्या या खुनाने राष्ट्राचा कसलाही फायदा झाला नाही. उलट गांधीवाद काही वर्षापुरता घट्ट झाला. आता 'लाहोर'ने गांधींच्या आणि ताश्कंदने नेहरूंच्या तत्त्वज्ञानाचा पुरता फज्जा उडवला ते सोडा. परिस्थितीच माण-साचा पराभव करू शकते. गांधीवाद आणि नेहरूंचे राजकारण त्यांच्या नसण्यामुळे निष्प्रभ झाले नाही. ते परिस्थितीने झाले.

गोडसे वाद किंवा कल्ट जर खरोखरीच अस्तित्वात असता तर नेफातील पराभवानंतर त्याला जे जबाबदार होते त्यांचे खून पडते. कच्छ दिल्याबद्दल आणखी कोणाचे खून पडते. खून करणाऱ्याला हजार वाटा मोकळ्या असतात. तसे घडले नाही अन् घडणारही नाही. पाकिस्ताननिर्मितीने मनाचा तोल गेला अशी पुष्कळ माणसे होती हे विसरू नये.

गोडसे कल्ट या शब्दाला म्हणूनच अर्थ नाही. गोडसे–विचार म्हणजे काय ? गांधींचा विरोध ! काँग्रेसला विरोध मुळीच नाही. एकतर गोडसेजवळ तत्त्वज्ञान नव्हते. गोडसे–विचार ही कपोलकल्पित गोष्ट आहे. जीर्ण मतवादी, प्रतिगामी– म्हणजे गोडसे कल्ट म्हणावयाचे काय ? दुसऱ्याचे तोंड जबरदस्तीने बंद करणे म्हणजे गोडसे वाद काय ?

गोडसे–विचार जर वरीलप्रमाणे असेल तर गांधीवधोत्तर झालेले प्रकार हेही गोडसे कल्टचा भाग मानावा लागेल. जबरदस्तीचा विचार जर कोणी अधिक करीत असतील तर ते कोण ? मरून गेलेला गोडसे का गांधींच्या मागे राज्य करणारे

पुंड... असो ! त्या वादात फारसा अर्थ नाही आणि उपयोग नाही–नव्हताही. जिला घराबाहेर काढायची तिला शिदळ ठरवावी लागते, त्याप्रमाणे हल्ली राजकीय दृष्ट्या अस्पृश्य करावयाचे असेल त्याला गोडसेवादी म्हटले की काम झाले.

हा राज्यकर्ता पक्ष दीर्घकाल सत्तेवर असल्यामुळे सत्तेची धुंदी खालपर्यंत पोहोचली आणि तिचे रूपांतर गुंडगिरीत झाले. सत्तांधतेचे दुसरे नाव गुंडगिरी असते. या गुंडगिरीने बहुजनसमाजाची दिशाभूल केलेली आहे. इतकेच नव्हे तर बहुजन समाजाच्या सांस्कृतिक आणि राजकीय विकासाच्या वाटा रोखल्या आहेत. सत्ता हातात ठेवण्याकरिता गुंडगिरी पोसणे आणि बहुजनसमाज (मतासाठी) सतत अज्ञानात ठेवणे हे राज्यकर्त्या पक्षाचे धोरण अगदी ठरून गेलेले आहे. आणि ही मांड अगदी पक्की करण्यासाठी त्याच्याच जोडीला जातीयवादाचे कुंड सतत धगधगत ठेवणे हे राजकर्त्या पक्षाचे ठाम धोरण आहे. त्याला अज्ञ बहुजनसमाज बळी पडत आहे. ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

मी स्वतः ते पुस्तक छापले म्हणून मी 'गोडसे' ला कुणी खास मानीत नाही. मी नथूरामाला तर पाहिलेलेही नाही. सावरकरवादाला नथूरामच्या कृत्याने फार मोठा धक्का बसला यात शंका नाही. गांधीवधामुळे सावरकर बहुजनासमोर निराळ्याच भूमिकेत मांडले गेले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी हेतुपुरस्सर सावरकरांना बहुजनांपासून खेचून दूर फेकले. गांधीवधाच्या अभियोगात मुद्दाम सावरकरांना गुंतविण्यात आले. मराठा समाजाला खरे नेतृत्व ज्या रणझुंजार अशा नायकाचे हवे तो नायक सावरकर होता. क्षत्रिय मराठा समाजाचे दैवत खरे म्हणजे रणझुंजार सावरकर असायला हवेत. पण गांधी–नेहरूंनी एकदा सावरकरांवर प्रतिगामी म्हणून शिक्का मारला अन् पुढच्या गावगांधींनी 'सावरकर' काय, त्यांचे म्हणणे काय, याचा विचार न करता सावरकरांची कुचेष्टा केली. याच पंडित जवाहर नेहरूंनी शिवाजी हा चुकलेला देशभक्त म्हणून त्याची हेटाळणी केली होती. पण अखेर लोकमत मानून मान खाली करून त्यांनाच, त्याच शिवाजीच्या पुतळ्याच्या उद्घाटनासाठी प्रतापगडावर यावे लागले. नेहरू हयात नाहीत हे दुर्दैव. नचपेक्षा सावरकरांच्या बद्दलची असूयेने केलेली सर्व वक्तव्ये पोटात घालून त्यांनाही 'सावरकरांचे' स्मारक उद्घाटनावे लागले असते. तो काळ फार दूर नाही. नेहरूंचे एकूण ज्ञान बेताचे, दूरदृष्टी तर माफक म्हणूनच चीन प्रकरणी, काश्मीर प्रकरणी, फाळणी प्रकरणी देशाचे तुकडे तुकडे झाले. मराठा समाजाने डोळे उघडून आपल्या दैवताचा नीट अभ्यास करावा म्हणजे शिवाजीचा खरा वारसदार कोण ते त्यांना कळेल. लक्षावधी निर्वासितांच्या रक्ताच्या कर्दमात लोंबणारी अहिंसा, रक्तरंजित झालेल्या हिमालयातील पंचशील आणि लाहोर वेशीवर झालेले हिंदु-मुस्लिम ऐक्य एकवार पुन्हा तपासावे. महात्मा गांधी की जय ! आरोळी मोठी छान आहे.

गांधींचा जय म्हणजे कशाचा जय ? टकळी गेली. रामरहीम यांचे ऐक्य मालेगाव–नगर, औरंगाबाद येथे सुरेख झाले आहे ! संयमाचे मूर्तिमंत पुतळे(!) आज मंत्री आहेत, ब्रह्मचर्य हा तर चेष्टेचा विषय आहे. आचार्य–प्रार्थना–सूतकताई–आश्रम या साऱ्यांची राड झाली. फाळणीचा निर्णय माझ्या प्रेतावरून जाईल ही गर्जना खोटी ठरली. एवढेच नव्हे तर लाचार, दुबळ्या नेतृत्वाने मान्य केलेले पाकिस्तान अधिकाधिक मस्तवाल झाले आहे. तटस्थतेचे धोरण इतके यशस्वी झाले आहे की रशियाने आपल्या शत्रूला मदत करू नये यासाठी सारा देश चिंतातुर होऊन बसला आहे–गांधींनी काय जिंकले ? गांधीवाद फक्त पुस्तकात राहिला. तो तिथेच चांगला होता. बुद्धाची अहिंसा फक्त पुस्तकात पाळतात तशीच गांधींची ही गोड गोड अहिंसक गाणी फक्त गांधी जयंतीलाच शोभून दिसतात. देशाचा कारभार चालविताना शेणामातीचे पुढारी चालत नाहीत हेच खरे.

म्हणूनच गेल्या वीस वर्षात आपण गांधींच्या पासून किती दूर गेलो याचा इतिहास शिकायला हवा. म्हणजे गांधींचे नाव घेऊन इतरांना तुच्छ लेखण्यात अर्थ नाही, हे ध्यानी येईल. आणि त्यासाठी पूर्वग्रह सोडून सावरकरांना समजून घेतले पाहिजे.

शिवाजींने जे सांगितले तेच सावरकरांनी सांगितले. शिवाजीच्या पावलावर पाऊल टाकूनच सावरकरांनी हिंदुपदपातशाहीच्या, धर्मांतराच्या, भाषाशुद्धीच्या, क्षात्रतेजाच्या प्रेरणा घेतल्या, एवढेच नव्हे तर वोटीतील त्या अद्‌भुत उडीची प्रेरणाही आग्ऱ्याहून केलेल्या अद्‌भुत सुटकेतून घेतली. सावरकर हा शिवाजीचा या काळातील अवतार होय ! दुर्दैवाने सावरकर ब्राह्मण जातीत जन्मले. त्यातही ह्या जात्यंध महाराष्ट्रात जन्मले. नचपेक्षा सावरकरांच्या रूपाने शिवशाहीच पुन्हा अवतरली असती.

शिवाय दुर्दैव असे की कर्मकांडात हिंदुत्व पहाणारे अनुयायी त्यांच्या हिंदु शब्दामुळे भुलून त्यांच्याभोवती गोळा झाले. वास्तविक सावरकरांचे हिंदुत्व सोवळ्या–ओवळ्या जातिसंस्थेत किंवा देवधर्मात नव्हते. ते होते राष्ट्रवादात. दाढ्या वाढवणारे, श्राद्धपक्षात, शुद्ध–अशुद्धात सर्वस्व पहाणारे अराष्ट्रीय लोक सावरकरांच्या भोवती गोळा झाले. सावरकरांना अस्पृश्यता मान्य नव्हती–जाती मान्य नव्हत्या. शाकाहार सुद्धा मान्य नव्हता. गाईला ते उपयुक्त पशु मानत–अंत्यसंस्कार, श्राद्धपक्ष या सर्वांवर त्यांनी कडाडून हल्ले केले आहेत. पण सावरकरवादाची चेष्टा करण्यापूर्वी तुम्ही मंडळींनी त्यांचे वाङ्मय वाचण्याचा यत्न तर करायला हवा. उगाच काहीच न वाचता कुणी तरी स्वार्थापायी सावरकरांना निंदून गेले त्यांची री का ओढावी ? सावरकरांना हिणवण्याने काय साधणार ? आजच्या मराठा संस्कृतीला सावरकर फार जवळचे आहेत–ठोशाला ठोशा

उगारणारे, स्वहिताला जपणारे, भारताच्या पूर्ववैभवाची आठवण ठेवणारे, आया-बहिणी व देवदेवळे यांना लुटणारे इस्लाम शत्रुस्थानी ठेचणारे. यात खरे पहाता महाराष्ट्रीय समाजाने वाईट मानावे असे काय आहे ? शिवाजीच्या पूजेला तयार असणारा महाराष्ट्र गांधींना जवळ तरी कसे करू शकतो हा मला प्रश्न पडतो. हिंदवी स्वराज्यात मुसलमान मरावेत असे जसे छत्रपतींनी मानले नाही, तसेच सावरकरांनीही मानले नाही. हे मूलतः हिंदूचे राज्य आहे. आणि हिंदूंच्या औदार्यावर अहिंदूंनी राहिले पाहिजे एवढाच दोघांचाही हट्ट होता. सावरकरांना अहिंसा अमान्य होती. म्हणजे ते काय ऊठ-सूट आल्या गेल्या विरोधकांना गोळ्या घालाव्यात अशा मताचे होते काय ? शठं प्रति शाठ्यम् याचा अर्थ केवळ धटिंगणाशी हाणामारी असा आहे. शठं प्रति शाठ्यम् म्हणजे गुंडगिरी नव्हे. कोणाची तरी पापे सावरकरांच्यावर खपवून त्यांची निंदा करणाऱ्यांनी हे ध्यानात घ्यावे की सावरकरांचे आता मागे आहे ते फक्त तत्त्वज्ञान. मुसलमान प्रश्नाची गंभीरता १९३६ सालापासून या राष्ट्रात फक्त सावरकरांनी सांगितली आणि आपल्या जीवाचा आटापिटा केला. पण औदार्याच्या खोट्या कल्पनांनी आणि दंगलीच्या भयाने आमचे सारे नेतृत्व मुळी थंड बनले होते. सावरकरांची कुचेष्टा करीत होते. त्यांच्या सैनिकीकरणाला इंग्रजांची रिक्रूटभरती म्हणत होते. त्याच हरामखोर नेत्यांनी-सावरकरांनी ज्या तरुण पोरांना ४२ साली सैन्यात धाडले त्यांच्याच बळावर लाहोर जिंकले. आणि पाकिस्तानविरुद्ध जय मिळविला आणि देशात लोकप्रियता मिळवली हे विसरून चालणार नाही पाकिस्तान आघाडीवर गांधींची अहिंसा उपयोगी पडली नाही. नेहरूंचे सहजीवन उपयोगी पडले नाही. अमेरिकन रणगाड्यांनी नेहरूंच्या तटस्थेच्या चिंधड्या केल्या. आज सैन्याचे संपूर्णपणे हिंदीकरण झाले आहे. आपण पाकिस्तान व चीनशी आज लढू शकतो ते काय गांधींच्या कृपेचे फळ आहे ? गांधींच्या चरक्याने चिनी सैन्य थांबले म्हणता, का पंचाने राष्ट्राची अब्रू राखली. इंग्रजांसारखे सहिष्णु राज्यकर्ते गांधींना भेटले म्हणून या दुबळ्या माणसाला तत्त्वज्ञान निर्माण करता आले. हिटलर, आयूब, माओ, स्टॅलिन यांनी पहिल्या सत्याग्रहातच महात्माजींचा निकाल लावला असता. आणि त्यांना मोठे होऊच दिले नसते. सत्याग्रह, अहिंसा, हृदयपरिवर्तन, संयम हे सारे सद्गुण, हे सभ्यता मानणाऱ्यांसाठी आहेत. युद्धात पडलेली राष्ट्रे नीती गुंडाळून ठेवतात. आणि हाती शस्त्र धरतात. तेव्हा ते महात्मा किंवा साधू यांचा विचार करीत नाहीत. त्यांना समजते शत्रूची ताकद-नैष्ठिक नव्हे तर पाशवी आणि अखेर राष्ट्राला तारते ती शक्तीच. तीच राष्ट्राची मान उंच करते.

पाकिस्तावर आपण विजय मिळविला त्याचे खरे शिल्पकार सावरकरच होत. स्वतंत्र राष्ट्राला लागणाऱ्या स्वतंत्र सैन्याची सावरकरांची कल्पनाच आज

आपली मान उंच ठेवू शकेल. अजूनही आपले सरकार शहाणे झाले आणि सावरकरांच्या तत्त्वज्ञानाचा आश्रय करू लागले तर कुणीही अपमान करावा, कुणीही कुचेष्टा करावी असे आपल्या परराष्ट्रीय राजकारणाचे जे हसे झाले आहे ते होणार नाही. रशियाच्या कृपेने युनोत काश्मीर प्रश्न जिंकायचा किंवा स्थगित ठेवायचा, अमेरिकेच्या मध्यस्थीने चीनला थोपवायचे, रडया नासरची बाजू केवळ इथल्या मुसलमानांचे चोचले पुरविण्यासाठी घ्यायची हे काय राष्ट्राला स्वातंत्र्य मिळाल्याचे लक्षण आहे की काय ? कल्पक, चढाईखोर, स्वार्थी, असा एखादा वैनायक या देशाचे तारु किनाऱ्याला लावील. गांधी–नेहरूंनी आज जे वादळ आपल्या राष्ट्राभोवती निर्माण केले आहे त्यातून या राष्ट्राचे तारु सुखरूप पार पडणे अतिशय कठीण आहे. परकीय मिशनरी, जातीयता, मुसलमानांचा आगाऊपणा, आर्थिक घसरगुंडी, प्रांताप्रांतातील भांडणे, अन्नाची कमतरता, चीन–पाकिस्तानचे आक्रमक पवित्रे, कम्युनिस्टांच्या देशद्रोही हालचाली ही सारी संकटे आपल्या भोंगळ नेतृत्वामुळे उत्पन्न झाली आहेत. प्रश्न सोडविण्यापेक्षा ते भिजत घालण्यात नेहरू प्रवीण होते. तोच वारसा नेहरूकन्या चालवीत आहे. क्वचित् प्रसंगी एखादा डाव आपल्या अंगलट येईल ही भीती असतानाही संकटाला समोर जाण्यातच नेतृत्वाची कसोटी लागते. आयुष्याच्या अखेरी गांधींची सर्व स्वप्ने विरून गेली होती. मुसलमानांनी त्यांचे नेतृत्व नाकारून नवे राष्ट्र निर्माण केले होते. नेहरूंच्या अखेरीस तर नेहरूंची सारी राजकीय प्रतिष्ठा पणास लागली होती. चिनी आक्रमणाचा आणि पराभवाचा नेहरूंनी धसका घेतला आणि त्यातच त्यांचा अंत झाला. अमेरिकेने जर कळ फिरवली नसती तर चिनी सैन्य नेफातून किती खाली आले असते कोण जाणे. शत्रू ज्यांना ओळखता येत नाहीत, मित्र ज्यांना सांभाळता येत नाहीत त्यांनी आजवर या देशाचे राजकारण केले आणि सारा सत्यानाश केला.

म्हणून बहुजनसमाजातील बुद्धिवंतांनो, तुमची जबाबदारी मोठी आहे. तुम्ही छत्रपतीचे वारस आहात. तेव्हा तुमची दैवते कोणती हे तुम्हाला नीट निरखले पाहिजे. कुणीतरी रेडीमेड दिलेल्या शिव्या तुम्ही भाडयाने घेऊन आपल्या दैवताची चेष्टा करू नका. सावरकर ब्राह्मण नव्हते. हिंदू सुद्धा नव्हते. ते अस्सल भारतीय होते. ते शिवाजीचे मानसपुत्र होते. प्रताप, चंद्रगुप्त, शालिवाहन यांच्या बरोबरीचे ते एक श्रेष्ठ पुरुष होते. ब्राह्मणांवरचा राग सावरकरांवर काढू नका. सावरकरांच्याबद्दल तुमची मने दुरुस्त होणार असतील तर ब्राह्मणांनी खुशाल हाराकिरी करावी. आम्ही ब्राह्मण–अब्राह्मण वाद कधीच डोक्यात घेतला नाही. आमच्या बापजाद्यांनी तुमच्यावर काही अन्याय केले त्याची किंमत तुम्हाला हवी असेल तर खुशाल मागा. ती आम्ही बिनतक्रार देऊ. देतोही आहोत. पण आमच्या दुःस्वासाबरोबर

या परमपवित्र मातृभूमीला विनाशाच्या कडयावर नेऊ नका. टिळक, आगरकर, गोखले सारे ब्राह्मण होते. एवढेच नव्हे तर नेहरू, राजगोपालाचारी, पंत ... हेही ब्राह्मणच. एका गोडसेमुळे ब्राह्मणजात वाईट होत असेल तर अनेक देशभक्तांच्या रांगामुळे ती चांगलीही असेल. चांगुलपणा जातीवर नसतो हेच खरे सत्य. या देशात लोकशाही ब्राह्मणांनी आणली. येथे रुजवली. या लोकशाहीतूनच तुम्ही देशाचे मालक झाला. हे राज्य आता तुमचे आहे. चांगल्या वाईटाचा हिशेब करून आता राज्य केले पाहिजे. लायकीनुसार माणसे राष्ट्रकार्यार्थ जुंपली पाहिजेत. जगन्नाथाच्या रथाला हजारो हात लागले तर तो हलणार. हा हात ब्राह्मणाचा म्हणून लाथाडू नका. ती शक्ती लहान असेल, जुने अन्याय त्या हातावर कुठे कुठे दिसत असतील तरी आता तुम्ही राजे झाला आहा. राजाला हा क्षुद्र मत्सर ठीक दिसत नाही. ब्राह्मण-अब्राह्मण म्हणून भुई झोडपीत सुटणे याला अर्थ उरला नाही. सुशिक्षित मराठेही आता ब्राह्मण होऊ पहात आहेत. याचाच अर्थ जातिवाचक मोठेपणा जाऊन आता कृतिवाचक मोठेपणा येऊ पहात आहे.

बहुजनसमाजाने आता झुंड शक्तीपेक्षा ज्ञानशक्तीवर अधिक अवलंबून राहावयास हवे. तथाकथित ब्राह्मणांवर खरी मात ज्ञानसाधनेनेच होईल. अशा वेळेस ज्ञानाचा देखावा करता नये. ज्ञानाचा रस्ता सोपा व्हावा, पूर्ण ज्ञानच स्वस्त होऊ नये. आज बी. ए. होणे हातचा मळ झाला आहे. पण त्या पदवीत अभिप्रेत असणारे ज्ञान मात्र दूर गेले होते. केवळ पदवीधरांच्या फौजांनी राष्ट्राची प्रगती होणार नाही. उलट, चुकीच्या अहंता निर्माण होतील. ज्ञान मिळवण्याचे सर्व मार्ग विपुल प्रमाणात उपलब्ध करून दिले तरी ज्ञानाचा दर्जा कमी होऊ नये. पण ते होते आहे. एका ब्राह्मणाकडून ही सूचना आली तेव्हा तिच्यात काहीतरी काळेबेरे आहे असे मानू नये. जगातल्या अन्य समर्थ राष्ट्रांशी उणावलेल्या ज्ञानाने आपण कसे मुकाबला करणार ? अखेरी इथल्या वामणी वर्चस्वाच्या विरुद्धच्या खोट्या लढाईत जगातली लढाई हरायचा प्रसंग आपणावर येऊ नये. हा वाद आता मातीत गाडावा असे आमचे नम्र मागणे आहे.

बहुजनसमाजातील माझ्या मित्रांनो, माझे मनोगत तुम्हाला समजेल काय ? हे मागणे एका भांडखोर माणसाचे आहे. पण त्याचे भांडण तुमच्याशी नाही. त्याचे भांडण षंढवादाशी आहे. त्यांचे भांडण नेभळ्या नेतृत्वाशी आहे. त्यांचे भांडण भारताच्या शत्रूशी आहे. म्हणून म्हणतो, माझ्या मित्रांनो, तुमच्या या चिमुकल्या 'सोबत' वर लोभ ठेवा.

दिनांक ११ ऑगस्ट १९६८

● ● ●

नेते हवेत ग बाई नेते हवेत !

आपला हा देश केवढा खंडप्राय, विशाल, बहुभाषिक, बहुधार्मिक. त्याचे प्रश्न किती अनंत, किती गंभीर. डुकरांसारखी प्रजा वाढती आहे ती आवरायची कशी ! शिवाय जे आपण करीत नाही, करू शकत नाही ते आपल्या अनुयायांच्या गळी कसे उतरावयाचे. परचक्र तर चहुंबाजूंनी आपल्या देशावर येत आहे. आपली भूमी कणाकणाने कमी होत आहे. चारदोन पिढ्या या पद्धतीने ही भूमी पुरवून खाता येईल. पण पुढे राज्य करायला जमीन शिल्लक उरली पाहिजे ना. औदार्य आणि सहिष्णुता आपल्या रोमरोमी एवढी भिनून गेली आहे की बाहेरच्या आक्रमकांना आपण आक्रमक म्हणू शकत नाही आणि अंतर्गत दंगेखोरांना दंगेखोर म्हणू शकत नाही. भूमी कमी होत आहे, प्रजा वाढते आहे–पण अमेरिकेत गहू पिकतो आहे आणि इंग्लंड–जर्मनीत शस्त्रास्त्रांचे कारखाने शस्त्रे घडवीत आहेत, तोवर तरी चिंता करण्याचे कारण नाही. दरवेळेच्या सीमेवरच्या कटकटीत आपली काही भूमी जात आहे. या अवाढव्य हत्तीचे लचके तोडून तोडून तरी किती तोडणार ! तरी पण भारतीय नेत्यांच्या पुढे अनेकदा या सर्व कटकटी अनेक प्रश्न उत्पन्न करीत आहेत. चिंताग्रस्त झालेले सारे नेते प्रश्नांना सामोरे जाण्याऐवजी तो प्रश्न व्यापक आणि विक्षिप्त करण्याकडे आपली चतुराई वापरतात.

आजचे नेते म्हातारे झाले आहेत, नाउमेद झाले आहेत–खचले आहेत. तरुण रक्त यावे असा फक्त सभेत आक्रोश करावयाचा असतो आणि आपल्या खुर्चीला मात्र धक्का लागू द्यावयाचा नाही हे मरूपणे आचरायचे असते. खरे पाहता, या देशाचा कारभार पहावा अशी दानत आणि लायकी असणारे नेते आमच्या देशाला कधीच लाभले नाहीत. आणि जे काही लाभले त्यांना स्वार्थी आणि लाचार सहकाऱ्यांनी नेस्तनाबूत करून टाकले. गेल्या वीस वर्षांत आपण काय काय मिळवले याचा जमाखर्च मोठा उद्वेगजनक आहे. गांधीवादी नेतृत्वाने कित्येक लक्ष एकर जमीन प्रथम पाकिस्ताननिर्मितीत, नंतर पाकिस्तानी आक्रमणात आणि अखेरी चिनी आक्रमणात घालविली. इतकेच नव्हे तर या भूमीशी कालपरवा एकनिष्ठ असलेले कोटचवधी नागरिक या देशाचे आज कट्टे वैरी झाले आहेत. दोन धर्मि-

यात आजवर कधी नव्हती तेवढी तेढ निर्माण झाली. औरंगझेबाला किंवा खिलजीला जे जमले नाही ते मुसलमानांच्या स्वतंत्र सलतनतीचं स्वप्न गांधी–नेहरूंनी खरं करून दाखविलं. आपली भूमी आपखुषीनं दुसऱ्याला देऊन टाकण्याचं आणि तरीही ती परत मिळवण्याचा यत्न करणाऱ्यांविरुद्धच शस्त्र उगारण्याचं जगाच्या इतिहासात नेहरूंचं कदाचित् हे पहिलंच उदाहरण असेल ! तेही जावो. इंग्रजांविरुद्ध म्हणून जे जे बंडखोरीचे प्रकार स्वातंत्र्ययुद्धाच्या निमित्तानं आपण केले ते स्वतंत्र राष्ट्र झाल्यावर आपल्याच शासनाविरुद्ध उलटतील हे समजण्याइतकं शहाणपण असू नये यापरते दुर्भाग्य ते काय ? भाषावार प्रांतरचना हे भारतीय एकात्मतेच्या सर्वांशाने विसंगत असणारे प्रमेय पत्करून या नेतृत्वानं भारताची अनेक शकलं केलेलीच आहेत. लोकशाही राहणार असं गृहीत धरून विचार करावयाचा तर मध्यवर्ती शासन दिवसेंदिवस कमकुवत होत जाणार ! आणि भारतीय एकात्मतेचे खोबरे होणार. बंडखोर राज्ये स्वतंत्र झाली नाहीत तरी मुजोर होणार आणि त्याचे पारिपत्य करण्याचे त्राण मध्यवर्ती शासनाला राहणार नाही. दोन प्रांतातील सीमा, पाणीवाटप, कारखान्याची उभारणी, विद्यापीठाचे स्थान यासारख्या प्रश्नावर तणातणी होणार आणि रक्त सांडणार. प्रांताप्रांतात विलक्षण स्वरूपाचा द्वेषभाव सुरू होण्याची चिन्हे दिसतच आहेत. आज ना उद्या अन्य प्रांतीयाला आपल्या प्रांतात प्रवेशच मिळणार नाही अशीही स्थिती होणे दुरापास्त नाही. तीन–चारशे वर्षांपूर्वी जी शासनव्यवस्था होती ती सुभेदारी पद्धत पुन्हा दृष्टीपथात आली आहे. शिवसेनेसारखी किंवा द्रविड-मुन्नेत्र कळघमसारखी संकुचित चळवळ सरकार चालू देते आहे, याचा अर्थ तिथल्या स्थानिक असंतोषाला मध्यवर्ती सरकारजवळ उतारा नाही. इतकेच नव्हे तर ह्या चळवळी थांबवण्याची ताकदही मध्यवर्ती शासनाजवळ नाही.

भाषावार प्रांतरचना ही एक विलक्षण विचित्र आपत्ती आहे. दैववशात् क्वचित्च लाभणारी लोकप्रियता लाभूनही नेहरूंसारख्या अदूरदृष्टी नेत्याने एक भाषा, एक शासन याचा अवलंब करण्याचे धारिष्ट्य स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या आनंदाच्या उधाणाच्या वेळेस दाखवले नाही, याबद्दल त्यांना क्षमा करता येणार नाही. जेव्हा कधी मध्यवर्ती शासन समर्थ बनेल तेव्हा आजची राज्यव्यवस्था मोडून काढावी लागेल. जिल्हा पातळीवर असणारी दुबळी आणि मध्यवर्ती शासनावर सर्वस्वी अवलंबून असणारी राज्ये निर्माण करणे हेच अखेरी आपल्या देशाच्या बलसंवर्धनाच्या दृष्टीने उपयोगी पडेल. त्यायोगे तणाप्रमाणे वाढलेले आणि खाऊन खाऊन माजलेले अनेक अगदी क्षुद्र आणि सामान्य नेते मोडीत निघतील हे खरे पण त्याला इलाज नाही. नालायक माणसांची सोय लावण्यासाठी आपण स्वातंत्र्य मिळवलेले नाही. आपल्या राष्ट्राच्या सीमा सुरक्षित राखणं आणि आपल्या सहजीवनाच्या आणि पंचशीलच्या मूलं तत्त्वज्ञानात बसत नसलं तरी पाकिस्तान, बलुचिस्तान,

अफगाणिस्तान, तिबेट आणि वेळप्रसंगी ब्रम्हदेश, सयाम, इंडोनेशिया आणि सिंहल-द्वीप या भूप्रदेशावर आपलं लक्ष असायला हवं. एकेकाळी हे आपलं साम्राज्य होतं, हा इतिहास तर खराच पण त्याहीपेक्षा आशियावर स्वामित्व कुणाचं असावं– ह्या लढाईत आपली इच्छा असो वा नसो आपल्याला उतरावं लागणार आहे. उद्याच्या भवितव्याचं स्वरूप डोळ्यासमोर असल्याशिवाय शासक होण्याचा कोणालाच अधिकार नाही. ऑस्ट्रेलियाची प्रचंड आणि संपन्न भूमी केवळ गौरवर्णीय जमातीसाठी राखून ठेवण्याविरुद्ध आज ना उद्या आपल्याला– आपल्या लोकसंख्येच्या वाढत्या प्रश्नांचा विचार करताना– उभं रहावं लागेल. आणि अशा वेळेस आपण कमकुवत ठरलो, दुबळे ठरलो तर या भूतलावर शिल्लक राहण्याचा आपल्याला अधिकार उरणार नाही. मनुष्य कितीही प्रगत झाला तरी तो अखेरी एक प्राणी आहे. आणि जगण्याजोगं असतं तेच जगू शकतं हा निसर्गाचा कायदा त्यालाही लागू आहे. तसा न्यायान्याय विचार करायचाच तर मुसलमानांचं स्वतंत्र राष्ट्र होऊ शकतं तर ख्रिश्चनांचं, बुद्धांचं, शिखांचं, जैनांचं स्वतंत्र राज्य व्हायला काय हरकत आहे ? धर्माधिष्ठित राज्य, ही कल्पना पत्करल्यावर अन्य धर्मियांनीच काय पाप केले आहे ? पाकिस्तानच्या निर्मितीत न्याय कोठे होता ! होती दंडेली, होती गुंडगिरी, होती ताकद. त्या ताकदीपुढे हिंदूसमाज नमला म्हणूनच पाकिस्तान होऊ शकले. याचाच अर्थ समर्थांपुढे असमर्थ हतबल झाले. जिनापुढे नेहरू मूर्ख ठरले. पण म्हणून इतर असमर्थ, असंघटित धर्माला आपण तोच न्याय लावीत आहोत. आपल्या भूमीचा तुकडा तोडून देणे हे न्यायतत्त्व ज्या कोणा मूर्खांना मान्य असेल त्यांना पुढचेही सर्व सोपस्कार मान्य केलेच पाहिजेत. गांधी-गीतेपुढे त्यांना हतबल झालेच पाहिजे. पण आमचा राष्ट्रपिता भगवान श्रीकृष्ण आहे. आम्हाला ऐकायचेच असेल तर आम्ही त्या महात्म्याचे ऐकू. हा आर्यावर्त जसा होता तसा घडवू. हे आर्यांचं साम्राज्य पूर्वस्थितीत आणू आणि एखादा चतुर नायक हे सर्व कमीत कमी संहाराने किंवा बळजोरीने घडवू शकेल. सामर्थ्यापुढे जग नेहमीच नम्र होते. फक्त तो अनुभव नवीन असल्यामुळे आपल्याला विचकल्यासारखे होईल. हे करताना आपण जगावेगळे काही करतो वा आपण पापाचा रस्ता धरला आहे, असा काही शुचितावादी गवगवा करतील. परंतु या दिवाभीतांच्या फडफडण्याकडे लक्ष देऊन चालण्यासारखे नाही. जीवनमरणाच्या लढचात चिलटे झुगारून द्यावी लागतात, रानडुकराला चुकवावे लागते पण सिंहाशी मुकाबला करावा लागतो. आणि हे सर्व घडून आपण शिल्लक राहिलो तर आणि तरच, आपण मागे उरतो–जय पावतो.

उद्या काय घडणार हे आज सांगणारे नेतृत्व दुर्दैवाने आपल्याजवळ उपलब्ध नाही. लोकशाहीच्या पहिल्या मंथनातून जेवढी गदळ वर आली तेवढे कौस्तुभ हाती लागले नाहीत. परंतु भारतीय रूपगर्विता मोठ्या दिमाखानं स्वयंवरासाठी

उभी आहे. तिच्या नशिबात क्रूरकर्मा हिटलर किंवा स्टॅलिन आहे की चर्चिल-सारखा धीरोदात्त वर आहे, हे सांगणं मोठं कठीण आहे. कदाचित नेपोलियन-सारखा धीरोदात्त नायक किंवा शिवाजीसारखा कर्तृत्वाचा पुरुष त्या रूपगर्वितेचा स्वामी होईल. गढूळलेल्या वातावरणात खराच आशेचा किरण दिसायला हवा असेल तर वरच्या नामावलीत शोभेल असा एखादा वैनायकही निर्माण होईल. जातीव्यवस्थेवर आधारलेली समाजव्यवस्था मोडणारा आणि एका समर्थ आणि समान धर्माची प्रतिष्ठापना करणारा. कालपुरुषाशी जमवून घेऊन ह्या आर्य-धर्माची ध्वजा चतुर्खंडात नाचवणारा एखादा नायक जर का इथे स्वामी झाला तर कुणास ठाऊक, जे जे आज प्रतिगामी वाटते वा जे जे आज आक्रमक वाटते ते सारेच जगाला अनुसरावे असे वाटेल. या खुज्या लोकांच्या देशातलं आजचं नेतृत्व खुजं आहे असा युक्तिवाद म्हणजे स्वतःच्या नालायकीची जाहिरात करणं आहे. जीवन-मरणाच्या लढ्यात लहानसहान प्राणी इतके गुंगलेले असतात की त्यांना कुठल्या तरी वेडानं झपाटल्याशिवाय ते माणूस होत नाहीत ही चेतना प्राप्त झाली की मातीच्या शिपायातून सैनिक होतात आणि पराक्रमांच्या जयगाथा लिहिल्या जातात. झपाटून टाकणारं वेड खुज्यांना उंच बनवतं. आणि मग मानवी इतिहासात काही नवीन पानं लिहिली जातात.

पण हे सारंच म्हणणं या घडीला कालविसंगत आहे. आपले सारेच नेते लहान आहेत. अविवेकी आहेत. अदूरदृष्टी आहेत. याचं कारण राजकारण हा त्यांच्या पोटाचा व्यवसाय आहे. देशाचं भवितव्य बदलविण्यासाठी त्यांच्याजवळ वेळही नाही. आपल्याखालची खुर्ची सांभाळणं, त्यासाठी गट करणं आणि दुसऱ्या गटांना शह देणं यासाठी नेत्यांची सारी बुद्धी आणि अक्कल खर्ची पडते आहे. देशापुढे उभ्या रहाणाऱ्या मोठमोठ्या समस्या, उत्तर शोधण्यासाठी या नेत्यांचे पाय धरीत आहेत पण त्यावर उत्तर देण्याचं धारिष्ट्य नेते दाखवू शकत नाहीत. आपल्या खुर्चीला आधार देणाऱ्यांपैकी काही हात कमी होतील या भयाने कोण-ताच वादग्रस्त प्रश्न हाताळणं त्यांना शक्य नाही. कारण त्या प्रश्नाला निर्णायक असं उत्तर दिलं तर काही जण असंतुष्ट होणार. अनेक प्रांतातली मंत्रिमंडळं धडा-धड कोसळतात तीही मध्यवर्ती सरकारातील सत्तेचा तोल साधणाऱ्या पुढाऱ्यांच्या-मुळं. प्रत्येक मंत्र्याचं राजकीय अस्तित्व सदैव संशयग्रस्त स्थितीत असताना त्यानं जोखमीचे निर्णय घ्यावे तरी कसे ? काहीतरी शाश्वती असल्याशिवाय कोणत्याही राजकारणी पुरुषाला दीर्घकाळ परिणाम घडविणारे निर्णय घेणं अशक्य आहे. सनदी नोकरांच्या निर्णयशक्तीवर विश्वासून जमतील तेवढे निर्णय घ्यावयाचे, अशक्य तेथे ते पुढे ढकलावयाचे आणि धोक्याचे असतील त्याला फाटे फोडावयाचे या मार्गाचा अवलंब केल्यावाचून राजकीय जीवन आज तरी अशक्यप्राय आहे.

आणि म्हणून आहेत तेवढे नेते आता पुरेनासे झाले आहेत. आपल्याला अनुकूल होतील असे समझोते घडत आहेत. जुनी वैरे विसरून दोन दावेदार गळ्यात गळे घालीत आहेत. दोघांच्याही पोटापाण्याचा तो प्रश्न असतो महाशय! राजकारणात नीती–अनीतीपेक्षाही अखेरी सत्तास्थानाला महत्त्व जास्त असते. मोरारजींना बदनाम करण्याचा जो प्रयत्न झाला त्यात काँग्रेसवालेच अग्रिक होते असे म्हणतात. स. का. पाटील आणि चव्हाण यांची युती हाही एक इंदिराजींना अवघड पडणारा तिढा सत्तास्पर्धेसाठीच होता. देशाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिपदे स्वीकारावयाची नसून मंत्रिपदे टिकवण्यासाठीच मंत्रिपदे मिळवायची असा काहीसा विचित्र प्रकार दिसू लागला आहे. विदर्भाला शेतकी विद्यापीठ मिळाले नाही म्हणून होत असलेल्या आंदोलनात महाराष्ट्र मंत्रिमंडळातील मंत्रीच जास्त भाग घेत आहेत. या चळवळीने जोर धरावा यासाठी प्रयत्न करणारे काही मंत्री मुख्यमंत्रिपदाकडे डोळे लावून बसले आहेत.

म्हणून मला वाटतं, भांडणारे मंत्री आणि काम करणारे मंत्री अशी दोन प्रकारची मंत्रिपदे असावीत म्हणजे राजकारणही रंगेल आणि देशही चालेल. काम करणारे मंत्री निदान पाच वर्षे तरी बिनधोकपणे काम करू शकतील.

आणि म्हणून भारतीय शासनाला आणखीन मंत्री लागणार आहेत.

जनता झिंदाबाद! लोकशाहीचा विजय असो!!

दिनांक ८ सप्टेंबर १९६८

● ● ●

भाषावार प्रांतरचना

आता आमच्या राज्यकर्त्यांना असा प्रश्न विचारावासा वाटतो की या अठरा–एकोणीस वर्षात भाषावार प्रांतरचनेच्या दुबळ्या खुळाने तुम्ही काय साधलेत? एक राष्ट्रभाषा ठरवून राष्ट्रभर तिची अम्मलबजावणी करण्याचा वकूबदेखील काँग्रेस

सरकारला दाखविता आला नाही ! गेल्या एकोणीस वर्षांतील या नागड्या अपयशाची जबाबदारी कोण घेणार आहे ? राष्ट्राने हा जाब आपल्या राज्यकर्त्यांना मागितला पाहिजे ... ... कारण भाषावार प्रांतरचनेमुळे एक-संघ राष्ट्रीयत्वाला तडा गेला की मग आत्मनाशाशिवाय दुसरा मार्गच राहाणार नाही. हे ओळखण्याची जबाबदारी आता भारतीय जनतेवरच आहे.

काँग्रेसने अनेकवार दिलेल्या आश्वासनानुसार वा ठरावानुसार, आंध्रच्या श्री. रामलू यांच्या उपोषणाच्या नंतर झालेल्या प्रक्षोभामुळे, महाराष्ट्र, पंजाब आदि प्रांतात झालेल्या भाषीय उठावानुसार अखेरी भाषावार प्रांतरचनेचे स्वप्न हाती आले. ही मागणी जेव्हा जन्म पावली होती तेव्हा शासन परक्यांचे होते. पक्षपात, फाटाफूट, परस्परांविषयी अनुदारता अस्तित्वात होती. इंग्रज मुत्सद्दी त्याकामी फार दक्ष होते. आणि म्हणून निदान भाषीय पायावर प्रांतीय एकता ही एक आवश्यक बाब होती. कोणत्याही उपायाने घर, गाव, तालुका, जिल्हा, प्रांत आणि भारत या क्रमाने एकात्मता साधावी हा विचार आमच्या तत्कालीन पुढाऱ्यांनी केला. भाषा ही विचारवाहिनी असून तिच्या उदकानेच संस्कृतीचा प्रसार जलद आणि खोलवर होतो हे सर्वमान्य तत्त्व त्यावेळी पुढाऱ्यांनी ध्यानी ठेवले. अप्रगत भाषांची प्रगती व्हावी, एकत्वाची भावना दृढ व्हावी, शिक्षणाचा अभाव असला तरी व्यावहारिक ज्ञानावर शासनात भाग घेता यावा, गरीब जनता भाषिक अज्ञानामुळे नाडली जाऊ नये असे उमदे तत्त्वज्ञान त्यामागे होते. खरे म्हणजे या सर्व गोष्टींपेक्षा चळवळीला निमित्त हवे होते. तसे पाहिले तर मिठावरच्या कराचे केवढे स्तोम गांधींनी केले. राज्य चालवायचे तर कर वसूलावेच लागतात. साखरेवर कर आहे, गुळावर सुद्धा पर्यायाने कर आहे तर मिठावर तो का नसावा ? समुद्राच्या पोटात मीठ अमाप आणि फुकट आहे हा युक्तिवाद तर तद्दन मूर्खपणाचा. मॅगेनीझ-

सुद्धा भूगर्भात खूप आहे आणि ती देवाची देणगी आहे तरी आपण देवाचा हवाला सोडून खुशाल त्यावर कर बसवतोच. बरे, मीठ गरिबाची गरजेची वस्तू आहे म्हणून तिला करमाफी असावी, हा तर अगदीच भावडा युक्तिवाद होता. कारण चहा, कापड, वगैरे गोष्टी तितक्याच निकडीने गरिबांना लागतात. म्हणजेच सरकार-विरोधी वातावरण तापविण्यासाठी सोपी, तरीही मूर्खपणाची 'मीठ' चळवळ आपण केली. धरणे बांधण्याचे कामी विरोध करून आपण एकेकाळी किती मूर्खपणाने वागलो. खुपीने, जबरदस्तीने, समजुतीने शेतकऱ्यांच्या जमिनी प्राप्त करून धरणे निर्माण करावीच लागतात हा शोध ब्रिटिश येथून हलताच आपल्याला कस. लागला ? मग आपण मुळशी धरणाविरुद्ध आंदोलन का केले ? तेव्हा तर शेता कऱ्यांना त्यांच्या जमिनीचे दाम त्वरित आणि पुरेसे मिळणार होते. आज स्वतंत्र राजवटीत जमीन तर जातेच आणि दामही पदरात पडत नाही. या नव्हे अनेक चळवळींचे उद्दिष्ट त्या चळवळींचे यश हे नसून एकूण शासनाविषयी असंतोष हेच होते. आणि म्हणून स्वतंत्र होताच त्यातल्या अनेक चळवळी आपण अर्ध्याच सोडून दिल्या—काही कालचक्र फिरवून मोडून टाकल्या.

पण हे भाषावार प्रांतरचनेचे खूळ मात्र आपण कवटाळून धरले, ते केवळ अडाणीपणाने, मूर्खपणाने, दूरदृष्टीच्या अभावामुळे. अनेक वर्षांच्या झोपेतून हा अंधारलेला खंड जागा होत होता. तो प्रकाश पहात होता. हा देश नेत्यांवर विश्वासून होता. पण हा भूभाग दुर्दैवीच होता. जे अनेक शतकात घडले नाही, जे खुद्द विक्रमी जेत्यांना किंवा प्रतापी योद्धयांना जमले नाही ते भारतीय एकछत्री साम्राज्य आपखुपीने, एकविचाराने, समर्थ राज्ययंत्रानिशी आपल्या हाती देऊन ब्रिटिश चालते झाले होते. या पर्वणीचे आपण काय केले ? हिमालयाच्या कुशीत वाढणारा, गंगा पवित्र मानणारा, वेदाचा घोष करणारा, आसेतु—हिमाचल भूभाग आपण एक राखला का—एकसंघ केला का—मजबूत केला का ? नाही. त्रिवार नाही एकराष्ट्रीयत्वाचे तत्त्व सोपे दिसते तरी प्रत्यक्षात फार विकट असते. एकराष्ट्रीय-त्वाची प्रबल भावना उभी राहते त्यामागे एकसूत्री जिद्द, अभिमान, सांस्कृतिक एकता, समान अहंकार उभा असावा लागतो. धर्माने राष्ट्र निर्माण होते, तत्त्व-ज्ञानाने राष्ट्र निर्माण होते, शतकांच्या एका अमलाखालील राजवटीत राष्ट्र निर्माण होते, आक्रमणाने एकराष्ट्रभावना साकार होऊ शकते, वर्णद्वेषाने एकराष्ट्र उभे होते, गरजेपोटीही एकराष्ट्र उभे होते. शहाणा नेता यांपैकी सोयिस्कर गोष्टी वापरून एकराष्ट्रीयत्वाचा सेतू पार करतो.

पण आमच्या नेत्यांना केवळ दूरदृष्टी नव्हती तर स्वतःच्या चुकीच्या राज-कारणाची अहंकारी घमेंड होती. सर्व शहाण्या माणसांचे आक्रोश फुका गेले. राष्ट्रे चालवायची किमानही अक्कल नसणाऱ्या या पुढाऱ्यांनी, इंग्रजांनी नाखुषीने घडू

दिलेले एकराष्ट्रीयत्वाचे रोपटे मुळापासून खुडून काढले. राष्ट्राभिमान ही सर्वव्यापी वस्तु आहे पण गांधी नेहरू हे खऱ्या अस्सल राष्ट्रवादाचे शत्रू होते. ते आमच्या राष्ट्राचे नेतृत्व करतानाच त्यांनी आमच्या राष्ट्रविषयक विचारांची परागती केली. जी जी स्वप्ने गांधी-नेहरूंनी पाहिली त्यांची अवघ्या पंचवीस वर्षांत माती झाली ही त्यांची दूरदृष्टी. गांधींची अहिंसा-लाहोरच्या वेशीवर शेवटचे आचके देऊन निधन पावली. नेहरूंचे पंचशील नेफात रक्ताळून मरण पावले. खादीची चळवळ, परराष्ट्रीय धोरण, तटस्थता, हृदयपरिवर्तन, संयम, सहजीवन यांपैकी-यासंबंधी काही-काही म्हणून केवळ औपधालासुद्धा उरले नाही. अमेरिकेच्या विरुद्ध पवित्रे घेऊन आपण अमेरिकन गव्हाचे मिंधे नाही हे दाखविण्याच्या नादात नेहरूंनी ज्या ज्या राष्ट्रांची वेळोवेळी तरफदारी केली ती सर्व राष्ट्रे आपल्या पाक-भारत युद्धाच्या वेळी गालातल्या गालात हसत तमाशा पहात बसली होती.

अशा या भावडचा स्वप्नांपैकीच नेहरूंचे भाषावार प्रांतरचना हेही एक महा-मूर्खपणाचे स्वप्न होते. भाषावार प्रांतरचना करण्याची पाळी नेहरूंवर त्या एका रामलूच्या मृत्यूचेवेळी आली नेव्हाच भारतीय एकात्मतेला आपण आग लावली. केवळ भाषेसाठी अलग शासन मागणे व व्यवहारसुकरता, शासनविषयक सोयी न पाहता प्रांत निर्माण करणे हे अशास्त्रीय, अनैतिक व परस्परांवर अविश्वास वाढविणारे होते. मोरारजी मुख्यमंत्री होते म्हणून महाराष्ट्राचे काडीमात्र नुकसान झाले असे मला वाटत नाही. उलट वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळापेक्षा मोरारजी अधिक चांगले शासक होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत काही मराठी माणसे मेली तशी महागुजरात-च्याही चळवळीत काही माणसे मेली. निदान पक्षपाताचा आरोप मोराजींवर कोणी करणार नाही. शासकाने जे करावयाचे ते त्यांनी अधिक कठोरपणे केले असे फार तर म्हणता येईल. संयुक्त महाराष्ट्र काय किंवा विभक्त पंजाब काय निर्माण झाल्यामुळे कोणताही वा कसलाही फायदा पदरात पडलेला नाही. वरे, संयुक्त महाराष्ट्र होऊन मराठीचा उद्धार होऊन ती एक जागतिक कीर्तीची भाषा होण्यास मदत झाली म्हणावे तर मुंबई सरकारची क्रमिक पुस्तके त्याची साक्ष फार उत्तम देतील. मध्य-वर्ती शासन जर मजबूत असेल तर कोणत्याही भाषिकांनी कोणत्याही अन्य भाषिकां-वर अन्याय केला असे घडेलच कशाला ? काहीतरी पोरकट युक्तिवादाला, अभि-निवेशाला बळी पडून आपण उगाचच प्रांतपुनर्रचना केली व अवाढव्य प्रचंड प्रांत निर्माण केले. अनेक सीमाप्रश्नांची भांडणे सुरू केली, अनेक कटकटी, चळवळी, कमिशने यांचा खर्च ओढवून घेतला अन् मिळवला द्वेष, परस्परांवरील अविश्वास.

भाषावार प्रांतरचनेने काय मिळवलं याचं गोव्यातील निवडणुका हेही एक सुंदर उदाहरण होय. सर्व मराठी भाषिकांचे राज्य निर्माण झाले. त्यांच्या सर्व

आकांक्षा एकात्म झाल्या ना, मग गोव्यातील मराठी भाषिकांनी सवता सुभा का पत्करला ? केवळ भाषेसाठी त्यांनी महाराष्ट्रात सामील का व्हायचे ? त्यांच्यावर कोणता घोर अन्याय आज होतोय ? त्यांना महाराष्ट्र देऊन देऊन काय देणार ? एकत्र येऊन त्यांचे कोणत्या दृष्टीने भले झाले असते. विदर्भाचे झाले का ? केवळ भाषा हेच व्यवच्छेदक लक्षण ठेवून प्रांतनिर्मिती करणे हे किती अडाणीपणाचे व प्रतिगामी आहे हे शाळेतला पोरही सांगेल. संयुक्त महाराष्ट्रातील भाषावादी लढाईचे यश हे भाषेसाठी नव्हते तर सर्वांना एक न्याय व महाराष्ट्राला दुसरा न्याय मिळाला त्या महाराष्ट्राच्या अपमानात होते. महाराष्ट्रावर नेहरूंचा–दिल्लीचा-एक फार जुना आकस आहे पण तो आकस मराठी माणसाला खुपत होता. शिवाजी वद्दल नेहरूंनी जे अनादराचे उद्‌गार काढले त्यानेही मराठी माणूस दुखावला होता.

महाराष्ट्राला नेहरूंच्या उद्दाम भाषेला मराठी धार एकदा दाखवायची होती, चसंयुक्त महाराष्ट्राच्या ळवळीत नेहरूंवद्दलचा महाराष्ट्राचा क्षोभ होता. अखेरी त्याची दखल नेहरूंनी घेतली. आणि मग भाषीय युद्धाचे कारण संपले. नेहरूंचा पराभव झाला. वेळगाव--कारवारसाठी महाराष्ट्र आता काही करणार नाही हे सीमेवरच्या लोकांनी पक्के ध्यानात ठेवावे. गोव्याचा प्रश्नही आता संपला असे खुशाल समजावे. मराठी माणसाचा नेहरूंवरचा--दिल्लीवरचा राग आता कायमचा ओसरला आहे व भाषिक द्वेषात मराठी माणसाला मुळीच रस नाही.

शिवसेनेने मुंवईत चळवळ उभी केली पण तिलाही यश मिळणार नाही–भाषिक द्वेषामुळे तर मुळीच मिळणार नाही. भाषा हे वैर वाढवण्याचे साधन होऊ नये–होऊ दिले जाता कामा नये. शिवसेना मुळातच खच्ची व्हायला हवी. कारण तिचे स्वरूप राष्ट्रहितविरोधी आहे. दक्षिण विरुद्ध उत्तर भारत युद्ध पेटविणारे आहे

क्षणिक लाभासाठी आमच्या वैभवाचे दार आम्ही करंटे बंद करू देणार नाही. भाषावार प्रांतरचनेने कोणालाच खरे सुख झालेले नाही. सर्व प्रांतांच्या सीमाविषयक कटकटी अगदी इस्त्रायल–जॉर्डन राष्ट्राप्रमाणे पेटल्या आहेत–पेटत्या रहाणार आहेत.

भाषिक एकजूट हवी म्हणतानाच परभाषेविषयी ममत्व हवे असे अभिप्रेत होते. आपल्या राष्ट्राला अखेरी एक राजभाषा हवी असे तेव्हा मुळी कोणी लक्षातच ठेवले नाही म्हणून सर्व भाषांना समान दर्जा मिळाला व लोकसभा हे भाषा-मंडळ बनले. नव्या जगाशी संबंध ठेवताना ज्ञान, कला, साहित्य, सौंदर्य यांचे दर्शन लवकरात लवकर, अधिकात अधिक लोकांना देण्यासाठी एकभाषा व एक लिपी निर्माण करावी लागेल याकडे दुर्लक्ष झाले. स्वातंत्र्याबरोबरच काही गोष्टी सुलभ तऱ्हेने प्रस्थापित करता आल्या असत्या. १९–२० वर्षात भाषिक वैविध्य लोपून आपली शासने, लोक-व्यवहार, वृत्तपत्रे, एकभाषिक झाले असते. पण निराळी संस्कृती

म्हणून हैद्राबाद, पांडेचरी, गोवा यांचे अस्तित्व ठेवण्याचा हट्ट धरणारे नेहरू, डोंबाऱ्यासारखे आदिवासी नाच करणारे नेहरू लोकभाषा निर्माण करण्यासाठी अन्य भाषांचा बळी देण्यासाठी तयार होण्याची शक्यता मुळीच नव्हती. सहजीवन, पंचशील असल्या खुळापेक्षा नेहरूंनी आपल्या सुलतानशाहीच्या बळावर भाषिक बंडे मोडली असती तर केवढे तरी राष्ट्रकार्य झाले असते.

भाषावार प्रांतरचना नको तर मग हवे काय ? या खंडतुल्य देशाची शासकीय विभागणी कशी करावी ? पूर्वी होते तसे आडवेतिडवे प्रांत असू द्यावेत की काय ? शासनाची सोय हे प्रांतविभागणीचे पहिले तत्त्व असले पाहिजे. भौगोलिक सोय, नैसर्गिक साधनसामुग्रीचा विकास, दळणवळणाची साधने आणि समान संस्कृती या सर्वांचा समन्वय करून प्रांत विभागणी व्हायला हवी होती. वास्तविक एका एका नदीच्या खोऱ्यांचा एक प्रांत ही फार नैसर्गिक विभागणी झाली असती. गोदा खोरे, कृष्णा खोरे,... संस्कृतीचा इतिहास लिहिणाऱ्यांना नेहमीच नद्यांच्या चलन. वलनावर अवलंबून रहावे लागते. नदी हीच समृद्धी असते. संस्कृतिवाहिनी असते- पण खरे पाहता हे अवाढव्य प्रांत निर्माण करण्याचे वेड आपण सोडून दिले पाहिजे. अमेरिकेची राज्यघटना पाहून आपण भारताची घटना केली. इंग्रजानी पाडलेल्या प्रांत विभागणीत फार मोठे फरक करायला नको म्हणून मित्रेपणाने आपण ही राज्ये निर्माण केली. ती राज्ये बळकावून बसलेल्यांना पुन्हा फेरबदल नको होते. परिणाम इतकाच झाला: राज्ये हळूहळू प्रबळ होत जाऊन मध्यवर्ती शासन दुबळे होत जात चालले आहे. राज्ये एका पक्षाकडे आणि मध्यवर्ती शासन अन्य पक्षाकडे, असे विचित्र दृश्य आता निर्माण झाल्यावर तर राष्ट्ररक्षण हळूहळू विकट होत जाईल, असेच भय वाटते. देशाच्या भल्यासाठी–समृद्धीसाठी आणि जगाच्या बाजारात काहीतरी प्रतिष्ठा मिळविण्यासाठी मध्यवर्ती शासन हेच बलशाली असले पाहिजे. ते तसे ठेवायचे असले तर मध्यवर्ती शासनाशी फटकून वागण्याचे सामर्थ्य प्रांतात उरताच कामा नये.

ज्या पक्षाला या देशात राज्य करावयाचे आहे त्यांनी भारत–व्यापक संघटनाच केल्या पाहिजेत. स्थानिक संघटनांच्या बळावर गुंडगिरी करून, स्थानिक सत्ता काबीज करून मध्यवर्ती शासनाला सदैव दमदाटी देण्याचे राजकारण करू देता नये. काही तत्त्वांवर, राजकीय कार्यक्रमांवर आधारलेले व्यापक पक्षच भारतीय राजकारणात शिल्लक उरले पाहिजेत. लोकशाहीचा प्रयोग अधिक सुबुद्ध करावयाचा असेल तर अशा व्यापक पक्षाची उभारणी व्हावयास हवी.

एवढ्यासाठी आटोपशीर, छोटेखानी अशा 'युनिटस्'मध्ये भारताची फेरविभागणी केली पाहिजे. इंग्लंडची राज्यघटना जशी छोटया छोटया काँटीजच्या स्वयंपूर्ण घटकाची आहे, तशीच स्वयंपूर्ण पण कमजोर घटकांनी भारतीय घटना

एकसंध भारताला अधिक फलदायी होईल. ५ ते १० लक्ष लोकवस्तीसाठी एक. विभाग अशाप्रमाणे भारतात छोटेखानी प्रांत राहावेत. मध्यवर्ती शासन त्यायोगे वळकट होईल व कामाचा उरक वाढेल. कारण ते सत्तेचे खरेखुरे विकेंद्रीकरण होईल. या छोट्या छोट्या राज्यांचा लोकव्यवहार लोकांनी हव्या त्या भाषेत करावा. परंतु रेल्वे, पोस्ट, कस्टम, इन्कमटॅक्स, एक्साइज ... आदि मध्यवर्ती शासनाचे सर्व व्यवहार हिंदीतूनच होतील. शिक्षणात हिंदी भाषेचे जुजवी ज्ञान अपरिहार्यपणे सक्तीचे राहील. शालेय शिक्षण त्या त्या राज्याने स्थानिक भाषेत खुशाल घ्यावे, पण उच्च शिक्षण हिंदीतून असेल. वृत्तपत्रांचे क्रमशः हिंदीकरण करण्यात यावे. रेडिओ, टेलिफोन, तारा यावरही हिंदी प्रसार अवश्य जारी करावा. लोकसभेत हिंदीतच बोलण्याची सक्ती व्हावी.

राजकीय पक्षाचे स्वरूप या नव्या राज्यघटनेत पुरे बदलेल. शिवसेना, द्रविड कळघम् सारख्या स्थानिक असंतोषावर पोसलेल्या संस्था नामशेष होतील, राजकीय पक्षात अखिल भारतीय प्रतिष्ठेसाठी चुरस लागेल. निकोप लोकशाही, पर्यायी पक्ष सिद्ध होतील.

भारतीय राजकारणातील राज्यातील प्रचंड मंत्रालये, सचिवालये, गव्हर्नर्स ... हा सारा खर्च वाचेल. आमदार-नामदार नाहीसे होतील. लाचलुचपत पुष्कळ कमी होईल. पुष्कळच निर्णय त्या त्या छोट्या राज्यावर ठेवले की वरपर्यंत वशिले लावण्याची क्रिया थांबेल. जीवनविषयक गरजांचे वाटप त्वरित होईल. निर्णयाची अंमलबजावणी स्थानिक माणसावर राहील.

भारतात पूर्वी गणराज्ये होती असे म्हणतात. 'गणपती' हा अशा गणराज्याचा नायक. आपल्या देशाच्या प्रकृतीशी छोटी गणराज्ये सोयिस्कर आहेत.

पण हे सारे किती अवघड कार्य आहे, याची मला कल्पना आहे. माजलेली व मदांध झालेली राज्यशासने, हल्लीच्या राजवटीवर पुष्ट झालेली लालचावलेली पुढारी मंडळी या योजनेला विरोध करतीलच. लोक नाना तऱ्हेच्या शंका काढतील, त्या सर्व शंकांची शास्त्रीय उत्तरे मी तज्ज्ञांकडून मिळवलेली आहेत. मोठमोठ्या धरणयोजना, कारखाने, उद्योगनगरी, बंदरे यांच्या कारभाराचे काम हा पहिला प्रश्न असेल. त्याचे उत्तर त्या त्या प्रकल्पाचेही निरनिराळे राज्य बनवता येईल. नियंत्रण जर शहाणे असेल तर अशिक्षितही चांगले राज्य करू शकतात. न्यायाची बूज असलेल्या रामशास्त्रीला पेशवे माधवरावही वचकून असतात. आणि म्हणून भारताचे पुष्कळ प्रश्न सोडवण्याची शक्ती या नव्या प्रांतविभागणीत आहे. अर्थात् साष्टांग नमस्काराने राजकीय प्रश्न सुटतात-उपासाने स्वातंत्र्य मिळते अशासारखे सर्व प्रश्न या योजनेत सोडवण्याची बालिश कल्पना मी केलेली नाही. अन्नटंचाई,

जननियंत्रण, संरक्षणसिद्धता, फॉरेन एक्स्चेंज, हे प्रश्न सोडविण्याची ताकद या योजनेत अभिप्रेत नाही पण पुष्कळ प्रश्नांचे स्वरूप अधिक सोपे मात्र होईल.

दि. १८ जून १९६७

● ● ●

कमंडलू आणि राजदंड

रामशास्त्री आणि माधवराव यांची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. राज्यकारभाराच्या निकडीच्या प्रश्नाचा विचार करावयास आलेल्या मुत्सद्यांना माधवराव देवपूजेत असल्यामुळे त्यांना भेटीसाठी तिष्ठत थांबावे लागे. खुद्द रामशास्त्र्यांनाही असे थांबावे लागले तेव्हा ते श्रीमंतांना म्हणाले, 'श्रीमंत, आपण आता क्षत्रिय धर्म पत्करला आहात. तेव्हा त्याचं उचित तेच कर्म करणे. देवपूजा करावयाची असेल तर राज्य सोडून मजसमवेत गंगाकिनारी चलावेत. तोपर्यंत राजधर्म सांभाळावा.' सूज्ञ माधवराव, रामशास्त्र्यांच्या बोलण्याचा अर्थ समजले आणि राजधर्म सांभाळू लागले. परिणाम–पानिपताचे अपयश धुऊन गेले. पुनश्च शिवाजीचे हिंदुपदपातशाहीचे स्वप्न साकार झाले.

आपले दुर्दैव असे की आपल्या सरकारात एखादा तडफदार आणि स्वहित सांभाळणारा माधवरावही नाही आणि चळू लागलेल्या माधवरावाला वठणीवर आणू शकेल असा रामशास्त्रीही नाही. हा प्रचंड देश चालतो तरी कसा हा प्रश्न पडावा अशी खरोखरीच आपली स्थिती आहे. नेफातील पराभवामुळे झालेला बदल सोडला तर आपले तेव्हाचे लष्कर म्हणजे दिवाळीतल्या किल्ल्यातले शिपाई प्यादे वाटावे इतपतच मजबूत होते. इथल्या दंगली काबूत आणायला या लष्करी पलटणी मात्र फार उपयुक्त ठरत. फक्त नेफा आघाडीवर आमच्या रणनेत्यांनी, जवानांनी आणि राजनैतिक पुढाऱ्यांनी जे वर्तन केले त्याएवढी नामुष्की आपण क्वचितच अनुभवली असेल.

चीनने लढाई केली याबद्दल मी चीनचे फार फार आभार मानतो. कमंडलू घेऊन राजदंड सांभाळणाऱ्या मूर्ख, दांभिक, स्वप्नाळू आणि अहंमन्य नेत्यांना चीनच्या स्वारीने नेस्तनाबूत करून टाकले. नेहरूंनी या पराभवाचा धसका घेतला.

सारे खोटे मोठेपण धुळीस मिळवणारा चाउ एन् लायचा तो फटकारा नेहरू सहन करू शकले नाहीत. नेहरूंच्या हातातील कमंडलू फुटला आणि राजदंड गळून पडला. आणि सारी स्वप्ने भग्न पावलेला तो भग्नस्वप्न राजपुरुष फाशी न चढवि-ताही मरण पावला.. नेफा पराभवाचा प्रमुख आरोपी अशा तऱ्हेने हाय खाऊन मेला. दुसरा लोकांनी लाथाडला, आणि तिसरा दिवाभीताचे जिणे जगत कोठेही भटकत आहे.

चीनच्या ऐवजी पाकिस्तानची स्वारी आधी होती अन् त्यावेळेला जर आमची हीच अवस्था झाली असती तर मात्र सारा हिंदूसमाज हेलपाटून गेला असता. नशीब बलवत्तर म्हणून चीनने सावध केले. बेहोशीतले नेते सावध झाले. तरवारीचे गंज काढले गेले. लष्कराला दारूगोळा मिळाला. कपडे मिळाले. आणि झाकून टेवलेल्या टॅंवसवरची धूळ पुसली गेली. शांततावादी राष्ट्राला लष्करावर खर्च करणे शोभत नाही असे म्हणणारे कृपलानी शस्त्रास्त्रांची तयारी आपण का केली नाही, असे प्रश्न विचारून लोकसभेत टाळ्यासुद्धा मिळवू लागले. पाकि-स्तानी अखेरी आपलेच भाई. त्यांच्या लष्करी वल्गना खोट्या ठरल्या म्हणून या हिंदू राज्याला माणसाचे जिणे जगता आले.

पण नेफा आणि छांव या युद्धातील जयपराजयामागे जी मीमांसा आहे ती अंती माधवराव पेशव्यांप्रमाणेच आहे. हे राज्य चालवावयाचे ते स्वतःच्या मनाच्या शांतीसाठी नव्हे, कोणा महात्म्याच्या मोठेपणासाठीही नव्हे किंवा कोणा पंडिताच्या अदूरदर्शी स्वप्नाळू मायाजालासाठी नव्हे, तर ते इथल्या चाळीस कोटींच्या भल्या-साठी. भल्यासाठी म्हणजे केवळ त्यांच्या अन्नोदकाची सोय करण्यासाठी नव्हे तर त्यांच्या सन्मानासाठी, त्यांच्या आकांक्षापूर्तीसाठी त्यांच्या ऐतिहासिक अस्तित्वा-साठी. राज्य चालविण्याचा अनुभव नसला तर माहितगाराची ऐट नसावी. अप-यशाला सामोरे जाण्यासाठी धैर्य नसले तर अपयश ओढवून घेणारे आगाऊ पवित्रे नसावेत, राजदंड धरण्याचे नैतिक वळ नसेल तर राजदंड हाती घेऊ नये. निदान किमान क्षत्रियकर्माचा विसर पडू देऊ नये. पण असेच घडले. ज्या देशाने चंद्रगुप्त, शालिवाहन, हरिहर, शिवाजी, बाजी, रणजी असे कुलपुरुष सांगावे तेच मुळी अशोक, मानसिंग, रावबाजी यांचा वारसा सांगू लागले. ज्या देशाने वशिष्ठ, शंकराचार्य, चाणक्य, रामदास यांचा गुरुपदेश घ्यावा तेच बिरबल, बुद्ध, बाळाजीपंत नातू यांचेकडून शहाणपण शिकू लागले. पण याचे कारण इतकेच होते की आम्हाला राजधर्म खऱ्या अर्थाने कधी कळलाच नाही. त्यामुळे कमंडलू एका हाती अन् राजदंड दुसऱ्या हाती असा मोठा वदतो व्याघाताचा देखावा आम्ही या भूमीवर निर्माण केला.

कोणतीही संस्कृती फार काळ स्थिर रहात नाही. ती गंजू लागते. कालची

महान राष्ट्रे कालची महान तत्वज्ञाने आज फिकी वाटतात. मूर्खपणाचीसुद्धा वाटतात. त्याचे कारण रोजरोज आयुष्याचा अर्थ निराळा होत जातो. या चक्रातले आरे सारखे असले तरी वेगळे असतात आणि त्या चक्राच्या केवळ फिरण्याने खालची मातीच बदललेली असते. ग्रीक, चिनी, बाबिलोनीय, आदि संस्कृती संपल्या आणि निराळ्याच संस्कृती उभ्या राहिल्या. चीन, भारत, इटाली ही एकेकाळी वैभवावर असणारी राष्ट्रे धुळीला मिळाली अन् इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स ही राष्ट्रे वरचढ झाली. गेल्या युद्धात ह्याही राष्ट्रांचे कंबरडे मोडले. अमेरिका, रशिया, चीन, आदि शक्ती मातब्बर झाल्या. हा सृष्टीचा खेळ अगदीच पोरबुद्धीने चालत नाही. त्याचा योग्य तो अन्वयार्थ लावूनच राजकर्त्यांना लोकांना जागे करावे लागते. आपल्या हाती आपल्या संस्कृतीची कालमर्यादा वाढवणे एवढेच उरते.

हिंदुस्थानच्या नशिबात पुन्हा एकदा पुनरुत्थानाचा काळ आल्याची चिन्हे होती. पण अशियातील आपल्या स्वामित्वाला चीनने असा फटकारा हाणला आहे की स्वामित्वापेक्षा अस्तिवाचीच आज चिंता वाटते आहे. संस्कृतीच्या या चक्रानुवर्ती फेरवदलात येणारी दुर्मिळ संधी आपण आज गमावली तर पुन्हा हजार पाचशे वर्षे अंधार राहील. म्हणून नियतीने पुढे केलेले वैभव, उत्थान, अभ्युदय, आता नाकारण्याचा करंटेपणा आपण करता नये.

याचसाठी सावरकरांचा हट्ट होता. इतिहासाची पुनरावृत्ती होते हे त्यांना जसे कळले तसे सुदैवाने अन्य कोणाला कळलेच नाही. इतिहासाचा अर्थ लावणे आणि भविष्याचा अंदाज करणे हे तर खरे पहाता राष्ट्रपुरुषाचे काम. पण दुर्दैवी भारताला नेतृत्व मिळाले भिकाऱ्याचे—याचकांचे—लाचारांचे—दुबळ्यांचे—शरणार्थींचे बाद झालेले धर्मचक्र फिरवण्याचा अट्टाहास करताना नव्याने हाती आलेला राजदंड आता हातून जाण्याची वेळ आली आहे. अशोकाने धर्मचक्र हाती घेतले ते चंद्रगुप्ताच्या समृद्ध आणि सुविहित साम्राज्यनिर्मितीनंतर तेही-चाणक्याच्या चतुर राज्यकारभारानंतर. पण आम्ही भीकमागे धर्माधर्माची चिकित्सा करतो आणि पराभूत होतो. चेष्टित होतो आहोत.

धर्मप्रसार करणाऱ्या यात्रिकांनो, एक गोष्ट लक्षात ठेवा. धर्माचा प्रचार फक्त समर्थ लोक करू शकतात. महंमदाची तलवार आणि ख्रिश्चनांच्या बंदुका यांनी जगभर धर्मप्रसार केला. आज नवे धर्म जनतेवर लादले गेले तेही संगिनीच्या टोकानेच. कम्युनिस्टांचे तत्त्वज्ञानही टँकच्या आणि तोफांच्या बळावर प्रसार पावते आहे. तुम्हाला खरोखरीच जगाला काही द्यायचे आहे का? शांतीच्या प्रचारासाठीसुद्धा हत्यारबंद फौजा लागतात. नवे विचार रुजवावयासाठीसुद्धा जमिनीवर

कुदळच मारावी लागते. हा असा कठोर न्याय आहे. तो कोणाला चुकला नाही. बुद्ध धर्माचा प्रसार अखेरी समृद्ध अशा अशोकाच्या सत्तेने केला.

कमंडलू आणि राजदंड एकत्र वागवणाऱ्या आमच्या नेत्यांनी राजदंड फेकून दिल्यासारखाच आहे. कारण कमंडलूचे दोन फायदे असतात. स्वतः कष्ट करून चरितार्थ करण्याची संन्यासावर जबाबदारी नसते. कारण त्याला केव्हाही हात पसरता येतो. आणि याचनेतही परमेश्वरी अहंता आणता येते. आपल्याकडे भिकारी नाही तरी पोट भरण्यासाठी भीक मागतातच कुठे ? ते तुम्हाला पुण्य मिळावे यासाठी भीक मागतात. आमचे राजकर्ते धान्य, यंत्रे, शस्त्रे, सल्ला आणि मनुष्यबळ याची भीक मागतात. ती काही त्यांच्या प्रजेच्या पोषणासाठी नाही तर त्या देशाला परमेश्वरी कृपाप्रसाद मिळावा म्हणून. त्यांच्या देशातले उद्योगधंदे उत्तम चालावेत म्हणून.

'संत नेतृत्व' हा कोणत्याही देशाला एक शाप आहे आणि या शापात गेली पन्नास वर्षे आपण अडकलो आहोत. शापमुक्त होण्यासाठी अहिल्या कितीएक शतके दगडाप्रमाणे केवळ पडून आहे पण आम्हाला हवा असणारा 'धनुर्धारी' राम वनवासी आहे आणि 'सत्यवचनी' राम गादीवर आहे.

दिनांक २२ सप्टेंबर १९६८

• • •

शरीरविक्रीचा व्यवसाय केव्हा सोडणार ?

अमेरिकेत यंदा हवापाणी उत्तम आले आहे आणि गहू तर असा पिकला आहे की अमेरिकन शेतकरी भाव उतरणार म्हणून चिंतेत आहे. अमेरिकेत गहू किती पिकतो, याचे आकडे आमचे शेतीखाते नेहमी तयार ठेवते आणि मगच सरकार अन्नधान्य परिस्थिती जाहीर करते. मोरारजीभाई किंवा इंदिराजी काय, आपण स्वयंपूर्ण होणार असे सांगू लागल्या आहेत—याचा अर्थ अमेरिकेत पाऊस चांगला पडला एवढाच, हे शहाणे लोक ओळखतात. आपण स्वयंपूर्ण नाही झालो म्हणून तरी कुणा लेकाला खेद आहे म्हणा ! तिकडे जॉन्सनसाहेब पळीपंचपात्री अन् उदक घेऊन बसलाच आहे. तुम्ही नुसते मागा की दान सोडतो असे त्याचे म्हणणे आहे. आता दाता

देणारा आहे–अगदी मन मोठं करून देणारा आहे–आणि इथल्या लोकांना स्वयंपूर्णतेच्या गप्पा सुचतात तरी कशा ? (इश्श–मला वाई आश्चर्य वाटते–इति इंदिराजी)

आता हे खरे आहे की स्वयंपूर्णतेच्या त्या गप्पाच आहेत. उगाच कम्युनिस्टांनी कुरकुर करू नये म्हणून स्वयंपूर्णतेच्या घोषणा हाणायच्या–एक वर्षात यंव् केले नाही तर फाशी जाईन, अशी वाह्यात आश्वासनं द्यायची ... त्याचं एक बरंय की फाशी देणे ज्यांच्या हाती आहे, तेच ह्या घोषणा करताहेत. नचपेक्षा अन्नधान्य नको पण फाशी आवर असे एकादेवेळेस व्हायचे. या घोषणा खऱ्या समजून जॉन्सनसाहेब उगाचच घाई करतात. या येवढ्या धान्याचे करायचे काय या प्रश्नामुळे घुटमळतात आणि पाकिस्तान या बुद्धिवळाच्या डावात आपली प्यादी एक घर पुढे सरकवते. एकदम सर्वत्र हाहाःकार उठतो, निषेध होतात, इमर्जन्सी जाहीर होते, आपल्या अमेरिकेतील राजदूतवासात भूकंप होतात–मग एकदा मोरारजी किंवा स्वर्णसिंग वॉशिंग्टनला भेट देतो अन् पुन्हा स्थिरस्थावर होण्यापूर्वी शेदोनशे कोटींचे कर्ज आपल्या वोडक्यावर चढते. पाकिस्तानने त्या वेळेपर्यंत आपल्या सेना मागे घेतलेल्या असतात.

खरे म्हणजे केवळ अन्नासाठीच आपण अमेरिकेवर अवलंबून आहोत हेच आपल्याला कमीपणाचे आहे. राजाच्या आश्रितांनी सुद्धा राजाइतके चांगले नसले तरी मखमली चढावच घातले पाहिजेत–आणि राजाने वापरून फेकलेले रेशमी अंगरखा पेहरला पाहिजे. अमेरिकेसारख्या राष्ट्राचा आपल्याला आश्रय मिळाला हे केवढं वरं आपलं भाग्य. एखाद्या श्रीमंत शेटने एखाद्या देखण्या मस्तवाल वाईला कायमची ठेवावी तसेच अमेरिकेने भारताला ठेवून दिलेले आहे. अन्नवस्त्राची उत्तम सोय आहे. रखवालीला गुरखा आहे. आणखी हवे तरी काय ? आतल्या आत नटावे, मुरडावे–त्याला मोकळीक आहे. आता आपल्या भाग्यात दुसरी वाटेकरीण नाही येवढी काळजी घ्यायची आणि शेटला धरून जायचे.

इथे भारताचे चुकते. खायचे अमेरिकेचे आणि प्रेम त्या लाल इजारवाल्याशी. शेट कामाला गेला असे पाहून त्या लाल इजारवाल्या सोळभोकाशी गप्पा माराय्च्या, त्याची मिगची प्रेझेंटस् घ्यायची, अधूनमधून लाल झगे पांघरायचे, हे त्या शेटला कसे आवडावे ! एक तर त्या लाल इजारीतल्या दरिद्री माणसाला धरून राहावे किंवा शेटशी इमानाने रहावे. पण वाईला आवडतो तो लालचुटूक माणूस–तो तर भिकारी. मग मौज करायची ती शेटच्या पैशावर. 'तशी मी मिंधी नाही हं कुणाची–माझी मी स्वतंत्र आहे' असे नाक वर करून वाई सदा वडवडत असते. याला अर्थ एवढाच की, ही वाई गरतीही नव्हे आणि धंदेवालीही नव्हे. तिला मौज कळत नाही–ना त्याग. तिला स्वार्थही कळत नाही–परमार्थही.

पण आता हा रखेलीचा संसार पुरे झाला की ! दुसऱ्याची मनधरणी पुरे

झाली की ! दुसऱ्याचे मनोरंजन वस्स झाले. संध्याकाळ आली की नटायचे, नवी साडी नेसायची, शेटच्या मर्जी–गैरमर्जीची काळजी घ्यायची अन् मग शेटकडून नवा दागिना किंवा पै–पैसा उपटायचा ... हे काय आयुष्य झाले ?

या किळसवाण्या आयुष्यापेक्षा मोलमजुरीचे आयुष्य काय वाईट ? नाही मिळणार नायलॉन–डेक्रॉनच्या रंगीत साड्या, नाही मिळणार ब्रेड–बिस्किटे–जाम्स, टिन्ड मांसाहार, दूधडबे ! आपल्या जमिनीत उगवलेली भातभाजी खाऊन उंच मानेने जगता तर येईल. काय वाईट आहे त्यात. एक दिवस उपास पडेल. वेळी फाके पडतील. पण खूप कष्ट केले तर ओली कोरडी भाकरी नक्की खाता येईल– नाही येणार म्हणल्यावर ही लाचारी कधी संपायचीच नाही. हे रखेलीपण असेच राहील. आपल्याला हातपाय आहेत. सत्तेचे झोपडे आहे. थोडी जमीन आहे. आणि फार नाही पण स्वत:पुरती अक्कल आहे ... मग थोडे कष्ट, थोडा घाम, थोडा त्याग का शक्य नसावा–

खरे म्हणजे कोडग्या माणसाला स्वाभिमान शिकवू नये म्हणतात, पण राहवत नाही म्हणून यत्न करायचा. शेटला सोडले तर आपले कसे होईल या भीतीपायी असाच जन्म जाणार या बाईचा असे दिसते. कुणीतरी या बाजारवसवीला चार कानपिचक्या दिल्या पाहिजेत.

स्वत: कष्ट करायला नको. नुसती बडबड–नुसत्या योजना–हालचाल नाहीच. अशा परिस्थितीत ही लाजिरवाणी अवस्था संपणार केव्हा ? आणि हा शेट आपल्याला का पोसतोय याचा थोडा तरी विचार करायला नको का हिनं ! एकतर बाई ठेवणे–पैसा खर्च करणे, यात त्या शेटच्या वैभवाचे प्रदर्शन होते. स्वत:ची शान वाढते. स्वत:चे मनोरंजन होते आणि धंदा बरकत वाढते. पण बाई, तुझा फायदा काय ? आजचा दिवस बरा गेला ... इतकेच की नाही.

एक दिवस बाईट वाटेल. क्षणभर त्रास होईल. सुखस्वास्थ्य गमवावे लागेल. अंगावर घाम थबथबेल–पण या घामाइतके मोठे धन कोणतेच नाही. जगात सोने चोरीला जाते–घरे भूकंपात जमीनदोस्त होतात, बँका बुडतात; पण घामासारख्या सोनेरी धनाला कसलेही भय नाही. अश्रू हे जवाहिर–घाम हे सुवर्ण. यांनी एकदा तुम्ही संपन्न झालात की मग सारी दुनिया तुमच्यासाठी गुढ्या उभारील. तुमचे स्वागत करील.

शरीर विकण्यापेक्षा मन विकणे फारच किळसवाणे.

मन किडके करणारा, शरीर–उपभोग घेणारा हा शेट केव्हातरी एकदा हाकलून द्यायलाच हवा. केव्हातरी धीर करून हा निर्णय घ्यायलाच हवा.

दिनांक ७ जानेवारी १९६८

● ● ●

वरच्याचा पाय ओढा पण खालच्याला हात द्या

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख गोळवलकर गुरुजी यांनी 'नवाकाळ' पत्राला एक मुलाखत दिली. या मुलाखतीचे यावेळेचे खास प्रयोजन काय व हिंदुधर्माच्या गुंतागुंतीच्या रचनेबद्दल आजच अशी प्रक्षोभक विधाने करण्याची आवश्यकता काय हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे. गुरुजी केवळ धर्मपीठाचे प्रमुख असते तर त्याकडे दुर्लक्ष करून गप्प बसता आले असते. कारण धर्मपीठाचे आणि समाजाचे नाते केव्हाच तुटले आहे. पण गुरुजी एका व्रतबद्ध झालेल्या व शिस्तीचा आग्रह असणाऱ्या राष्ट्रवादी हिंदुसंघटनेचे प्रमुख आहेत. एका माणसाच्या आज्ञेने चालणारे शेकडो अनुयायी त्यांच्याजवळ आहेत. त्यांच्याच अनुज्ञेने किंवा आधिपत्याखाली प्रमुखत्वे करून हिंदू अस्मिता जागी करणारा जनसंघ हा राजकीय पक्षही अस्तित्वात आहे. त्यांच्या उद्‌गारामागे केवळ भाबडा धर्महट्ट नाही तर काही राजकीय सिद्धान्त आहेत—शक्ती आहे. म्हणूनच त्यांच्या सर्व विचारांचा मागोवा क्रमप्राप्त झाला आहे. नचपेक्षा केवळ उपेक्षेनेच त्याची वासलात लावता आली असती.

गुरुजींच्या बाकीच्या मुलाखतीतील बहुतेक विचार अस्सल राष्ट्रवाद, राष्ट्रहितदक्षता आणि सद्‌विचार यांनीच भरलेले आहेत. तसे ते असणारही. त्यांच्या त्या विचारांच्या सत्यतेबद्दल आमच्या कोणाच्याही मनात काही अंदेशा नाही. वृत्तपत्रांचा व तथाकथित पुरोगामी टीकाकारांचा गुरुजींच्यावर रोष आहे तो त्यांच्या जन्मसिद्ध वर्णभेदाच्या पुरस्कारावर. गुरुजींचा निषेध करणारे, आज सर्वच ब्राह्मणांचा, सावरकरांचा, उच्चवर्णियांचा या निमित्ताने निषेध करीत आहेत, यामागे केवळ साचलेला आकस आहे. कारण या वर्णाश्रम पद्धतीविरुद्ध, रूढीविरुद्ध, गोमातेच्या कल्पनेविरुद्ध सावरकरांनी अमाप लिहून ठेवले आहे. हिंदुधर्मियात जातीनुसार कोणी श्रेष्ठ नाही, कनिष्ठ नाही, एवढे सांगून केवळ ते थांबले नाहीत, तर ब्राह्मणांनीच नव्हे तर मराठ्यांनी–माळी, शिंपी, न्हावी, कुणबी या सर्वांनी केवळ सामाजिक धाकधपटशाच्या बळावर कोट्यवधी नागरिकांना या देशात अनेक वर्षे गुलामांसारखे वागवले, त्याविरुद्ध त्यांनी खरमरीत हल्ले चढवले. सर्व समाज

रोटीबेटी बंधनातून मुक्त केल्याशिवाय हा समाज एकसंध होणार नाही, आक्रमणाविरुद्ध जय पावू शकणार नाही, उंच मानेने चालू शकणार नाही आणि येथील सामाजिक अस्वस्थता संपू शकणार नाही, हे सनातनी–ब्राह्मण–मराठे या सर्वांचा विरोध पत्करून त्यांनीच गर्जून सांगितले. एका दमात सावरकरांना व गुरुजींना प्रतिगामी म्हणणारे तद्दन मूर्ख आहेत असे खेदाने म्हणावे लागते. वर्णाश्रमाचा धिक्कार करणारा आणि पुरस्कार करणारा हे एकाच वेळेस प्रतिगामी कसे ठरविले जातात ? कदाचित ह्या टीकाकारातच ही खोलवर रुजवलेली जातीयता आहे असे म्हणण्यावाचून मग गत्यंतर राहात नाही. गांधी-विनोबांनी मात्र या वर्णव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे हे या संदर्भात लक्षात ठेवावयास हवे. गांधींचा अस्पृश्योद्धार दयेवर आधारलेला आहे–जसा त्यांचा समाजवाद दयेवर आधारलेला होता. या नव्या जगात 'न्याया'ची बरोबरी दया करू शकत नाही. हक्काची बरोबरी सवलती करू शकत नाहीत. म्हणून साऱ्या हिंदुत्वनिष्ठांना 'गोळवलकरी' समजून धोपटणे मूर्खपणाचे वा ढोंगीपणाचे ठरेल. किंवा धोपटावयाचेच असेल तर त्यावरोबर पुष्कळांना रांगेत उभे करावे लागेल.

आपण गांधी–विनोबांना पुरोगामी मानतो आणि गोळवलकरांना प्रतिगामी मानतो ते का, हेच मला कळत नाही. हिंदू जातिव्यवस्थेची ही चौकट त्या सर्वांनी मनोमन मानली आहे. फक्त कर्मावरून गुणवत्ता वा श्रेष्ठता ठरवू नये असे त्यांना वाटते. कोणतेही कर्म त्यातील आत्मनिष्ठ सत्यानुसार केले म्हणजे ते सत्कर्मच होय असे ते सर्वजण मानतात.

परंतु कर्माची श्रेष्ठता–कनिष्ठता रद्द केली, श्रमाचे हीनत्व नष्ट केले तर चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्ध त्यापैकी कोणाचीच तक्रार नाही. गोळवलकर गुरुजीही यापेक्षा निराळे काहीच सांगत नाहीत. उलटपक्षी वर्णव्यवस्था लवचिक असावी असे ते म्हणतात. शिवाय या जन्मातील कर्मावरून पुढील जन्मातील उच्च वर्ण प्राप्त होणार असेल तर या जन्मातील कर्मालाच श्रेष्ठत्व प्राप्त होते. जर चांगल्या कर्माला चांगले फळ अभिप्रेत नसेल तर धर्माची गरजच काय ! तो शुद्ध भोगवाद होईल. चांगले वागल्यामुळे पुढील जन्मी चांगले पारितोषिक मिळते त्यामुळे माणूस सावधानतेने पुण्याच्या आधीन होईल व वाईट वर्तनाला पायबंद बसेल.

गोळवलकर गुरुजी गांधी–विनोबा परंपरेतीलच आहेत. गोळवलकरांचा निषेध म्हणजे चातुर्वर्ण्य मानणाऱ्या सर्वांचा निषेध असा जर अर्थ होत असेल तर आजपावेतोचे सर्व नेते, (सावरकर सोडून) त्या यादीत येतात. आणि अशा सर्व नेत्यांच्या निषेधाच्या सभेला मी अवश्य हजर राहू इच्छितो. इतकेच कशाला, आमची संतपरंपरा, तुकोबा, नामदेव, जनाईसकट–वर्णव्यवस्था सुखाने पत्करते आहे. शिवाजीला राज्याभिषेक करून घेण्यासाठी आपल्या क्षत्रियत्वाची जाण का

व्हावी ! आजचे शहाण्णव कुळीचे मराठे इतर कुणवी मावळ्यांना हीन का लेखतात ! केवळ गोळवलकरांच्या निषेधाने, माझ्या मित्रांनो, तुम्ही समाधान पावू नका. किंबहुना या संधीचा फायदा घेऊन वर्णाश्रमव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या सर्वांनाच न्यायासनापुढे खेचा.

पण हे लक्षात ठेवा, ज्यांना तुम्ही आज नेते मानता, ते तुमचे नेते कधीच होऊ शकणारे नव्हते. बहुजन समाजाला हीन ठरवण्यासाठी सदैव परमेश्वरी प्रेरणेचा हवाला देणारे नेते, मग ते गांधी, विनोबा असोत वा गोळवलकर, तुकोबा असोत, हे सारे नेते तुम्हाला वर्णदृष्ट्या कधीही वर येऊ देणार नाहीत. तुमच्यासाठी ओरडणारा, भटाभिक्षुकांकडून शिव्या खाणारा, वर्णव्यवस्थेविरुद्ध आक्रोश करणारा, रोटीबेटी व्यवहार मुक्त व्हायलाच हवेत असे ओरडून सांगणारा एक महान नेता तुम्ही गांधींच्या मागे लागून पायदळी तुडवलात. जर आज गोळवलकरांचा निषेध तुम्हाला करावयाचा असेल तर सामाजिक समतेचा पुरस्कार करून सर्वनाश पत्करलेल्या सावरकरांचे जयगानही त्याच सुरात तुम्ही केले पाहिजे.

आपण या सर्वच प्रकरणात एक गोष्ट विसरतो आहोत ती अशी की आता तो तथाकथित परमेश्वरप्रणित धर्म, ते वेद, ती मनुस्मृती किंवा वर्णव्यवस्था जातिभेद हे सारे आपल्या लोकशाहीने, शासनाने, घटनेने फेकून द्यावयाचे ठरवले तर अशक्य नाही. देव जर आंधळा असेल किंवा अन्यायी असेल तर त्याला फोडण्यावाचून गत्यंतर नाही. यच्चयावत् मनुष्यप्राणी, जो एका भूमीशी इमानाने बांधलेला आहे तो समान मानावयाचा नसेल तर 'राष्ट्र'वाचक शक्ती कधीच उभी राहणार नाही. आपण नेहमीच दुबळे राहू. मनूने स्त्रियांना स्वातंत्र्य देऊ नये असे म्हटले ते आपण कोठे ऐकले ? तेव्हा भले स्मृतिपुराणे, वर्णव्यवस्थाव टिकविण्यासाठी कोणी आटापिटा करोत, कोणी गुरुजीही कालबाह्य वर्णव्यवस्थेवर प्रवचने करोत, सर्वत्र समानता ही आता अटळ गोष्ट आहे. आणि ती आणू पहाणारे आपले मित्र आहेत. म्हणून तुमच्या नेत्यांच्या मनोभूमिका एकदा नीट तपासून पहा.

शिडीच्या वरच्या पायरीवरच्या माणसाचा मत्सर करून भागत नाही. खालच्या पायरीवरच्या माणसाला हात देण्याची तयारी हवी. आज होतो आहे तो वरच्याला फक्त खाली खेचण्याचा प्रयत्न आणि म्हणून वर्णभेदाविरुद्ध उभे राहाणाऱ्या सर्वांना या घटकेला खाली उभे असणाऱ्याला न्यायच देण्यासाठी बद्ध झाले पाहिजे.

दिनांक ९ फेब्रुवारी १९६९

• • •

नाठाळ बायकोला वठणीवर आणणारा कायदा . . .

ज्या काही प्रांतात काँग्रेसचे राज्य स्थिर आहे त्या राज्यात महाराष्ट्र हा अग्रभागी आहे. यशवंतराव चव्हाण यांनी अत्यंत धूर्तपणाने व हिकमतीने महाराष्ट्रात सर्व पक्ष जवळपास नेस्तनाबूत करून टाकले आहेत. वस्तुतः डांगे, गोरे, एस्. एम्, अत्रे, फर्नांडिस, गायकवाड आदि सर्व पक्षोपक्षांचे झुंड महाराष्ट्रात मौजूद असताना व कामगारविषयक चळवळीत हा प्रांत अग्रेसर असताना, त्या त्या पक्षांना महाराष्ट्राबाहेर थोडे फार तरी यश मिळालेले दिसते. तरी महाराष्ट्रात मात्र खाली मान घालून वावरावे लागत आहे. त्यातही यशवंतरावांची मर्दुमकी हीच आहे की आपल्याहून अन्य कुणालाही त्यांनी महाराष्ट्र काँग्रेस पक्षातही वाढू दिले नाही. पुंडांना वठणीवर आणण्यासाठी दुबळ्यांना हात देण्याचे त्यांचे कार्य महाराष्ट्रात सतत चालू असते. काल परवापर्यंत पुढे पुढे नाचणारे शेंदूर लावलेले, कितीतरी दगड साहेबांची कृपा फिरली की धोंडे झालेले महाराष्ट्राने पाहिलेले आहेत.

श्री. साहेबमजकुरांची जी धोरणे आहेत, त्यातील प्रधान धोरण हे आहे की फोडा आणि झोडा. म्हणजे जिल्हापातळीवर दोन गट निर्माण करावयाचे. त्यांच्यापैकी कधी एकाला, कधी दुसऱ्याला हाताशी धरायचे आणि दोघांनाही झुंजत ठेवायचे. कधीकधी या झुंजीमुळे फायदाही होतो. स्पर्धेमुळे पुष्कळशी कामेही होतात. आणि आपल्या मतदारसंघाला खूष करण्यासाठी स्थानिक नेते धडपडतात, आणि अभ्युदयी अशा योजना घडू शकतात. कोल्हापूर–सांगली–कऱ्हाड विभागात या स्पर्धेतून पुष्कळ समृद्धी निर्माण झाली. पण पुष्कळ ठिकाणी केवळ क्षुद्र मत्सरापायी कार्याचा नाशही झाला. मात्र साहेबांची ज्या बाजूवर कृपा, त्या बाजूस यश हे ठरून गेल्या कारणाने महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यातले दोन्ही गट साहेबांचा अनुनय करीत राहतात. अजूनही साहेबांचे राजकीय डावपेच याच धोरणानुसार चालू आहेत.

आणखी एक गोष्ट साहेबांनी येथे केली. ती म्हणजे इथल्या जातीयवादाचे पुनरुज्जीवन. आज साहेब प्रत्यक्ष जातीयवादी चळवळीत नाहीत. पण मराठी राजकीय वर्तुळात वाह्यातपणे वागणाऱ्या व बोलणाऱ्यांचा जो गट दिसतो आहे व जातीय दृष्टीतून सर्व गोष्टींचे इंटरप्रिटेशन केले जाते आहे त्याचे मूळ सूत्रधार श्री.

चव्हाण आहेत. 'आंदोलन' मासिकाच्या एका दिवाळी अंकात श्री. चव्हाण यांच्य. राजकीय कार्याचा परामर्ष घेणारा एक लेख आला होता. आजचे यशवंत स्वरूप नवे आहे पण चव्हाणांच्या राजकीय कार्याचा आरंभ कसा झाला त्याचा मूलविचार त्या लेखात होता. आज बुद्धिवादी राजकारणात उदासीन आहेत याचा श्री. यशवंतरावांना खेद होतो. पण ते तसे आहे याला प्रमुखत्वे जी कारणे आहेत. त्याला यशवंतरावांचे महाराष्ट्रराज्याचे प्रमुख मंत्रीपदावरील धोरण हे कारणीभूत आहे. बुद्धिवंताना जात एकच असते, ती म्हणजे विद्वत्तेची. पण त्या बुद्धिवंतांचा धर्म-जात-पोटजात यांचा विचार अभ्युदयाचे वेळी त्याच काळात होऊ लागला असेंब्ली–पार्लमेंटच्या सदस्याचे निवडीचे वेळी जुने अनुभवी आणि प्रामाणिक कार्यकर्ते केवळ उच्चवर्णीय म्हणून डावलले गेले तेही त्या यशवंत काळात. मग साध्या सेन्सॉर बोर्डाची रचना असो किंवा कसले कमिशन असो, उघड उघड जातीच्या वळावर अधिकार नसलेली माणसे जाऊन बसली. तीही शहाणी माणसे नव्हेत, तर होयबा माणसे. बहुजन समाजातील स्वाभिमानी, बुद्धिवादी माणसेही अशीच मागे पडली तसा कोणी प्रश्नच विचारला तर किमान दहा-पंधरा तरी शहाण्या पण स्वाभिमानी मराठा माणसांची नावे सहज सांगता येतील. या संदर्भात श्री. बाबासाहेब घोरपडे हे नाव मुद्दाम लक्षात ठेवावे. लाचार आणि सहजगत्या मोहाला बळी पडणाऱ्या लोकांचा तांडाच्या तांडा त्या काळात सत्तेभोवती गोळा झाला आणि आज त्या सर्व माणसांची अवस्था अशी आहे की त्यांचे सत्तास्थान संपले की अगदी त्यांचा समाजसुद्धा त्यांना देवडीजवळ उभा करणार नाही.

जातीवादी राजकारणातून अनेक दुष्ट परंपरा निर्माण झाल्या आणि त्याचबरोबर स्पर्धेऐवजी सवलतीवर जगण्याची सवय निर्माण झाली. परवा न्हावी समाजाने आम्हाला अनुसूचित जाती ठरवावे अशी मागणी केली. खरे म्हणजे ब्राह्मणाची सुद्धा आता हीच मागणी आहे. कारण कोणी काही म्हणले तरी स्पर्धेपेक्षा सवलत केव्हाही लाभदायकच. आणि कंपनीच्या फायद्याचा वाटा म्हणून द्यावयाचा बोनस हा जसा हक्काचा झाला तसा कंपनी तोटचात चालली तरीही तो चालूच राहिला. सवलती हाच दैनंदिन व्यवहार झाला आहे–त्या गैरलागू झाल्या तरी. १२०० रुपयाच्या उत्पन्नाखाली शिक्षण फुकट झाले. याचा लाभ बहुसंख्य श्रीमंत बहुजनसमाजच घेतो आहे. या दिवसात शहरात १२०० रुपयाच्या आत कोणत्याच कुटुंबाचे उत्पन्न असू शकत नाही. उदारमतवादाची, औदार्याची, बहुजन समाजाच्या उद्धाराची एवढी फरफट कोणीच केली नसेल.

पण काँग्रेसच्या मजबूत उभारणीत साहेबांनी पुष्कळवेळा पुष्कळ पवित्रे टाकले. शिवसेनेला असलेला पाठिंबा घ्या, बुद्धिवंताचा आज होऊ लागलेला गौरव घ्या, कृषी विद्यापीठ चळवळ घ्या किंवा बाळासाहेब देसायांचे पॅन्सी दत्त प्रकरण

घ्या. या सर्वांमागे एक यशवंतसूत्र आहे. त्यांच्या अनुयायात कोण देव आहेत आणि कोण दैत्य आहेत याची त्यांच्याजवळ चांगली नोंद आहे. पण पुष्कळ वेळा पापाला पोटात घालावे लागते, हे ते ओळखतात. आज काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या इस्टेटीची मोजदाद केली तर असे आढळून येईल की दहा वर्षांपूर्वी अन्नाला महाग असणारी मंडळी आज परदेशी बनावटीच्या मोटारी उडवत आहेत, लाखालाखाचे खुपीचे सौदे करीत आहेत, चारदोन हजार दरमहा देऊन पुण्यामुंबईत दुसरा घरठाव ठेवीत आहेत. हा पैसा गैरव्यवहारातून आला आहे. स्त्री, मद्य, लाच यातून मुक्त असणारी काँग्रेस कार्यकर्ती मंडळी आता दिवसेंदिवस लुप्त झाली आहेत.

त्याकडेही साहेबांनी दुर्लक्ष केले. कारण ही सारी पुंड मंडळी अखेरी आपल्या संस्थेशी, काँग्रेसशी इमानदार होती. पापाचा पैसा का होईना, पण संघटनेच्या कामी देत होती. पक्षाची इभ्रत मोठी मानत होती.

पण सहकारी म्हणून निघालेल्या चळवळीची फलश्रुती आज विचित्र झाली.

सरकारने खेडचापाडचात पसरलेल्या या अत्यंत कष्टकरी शेतकऱ्यांच्या गरजा भागवण्याच्या उदात्त हेतूने भूविकास बँका, लँड मॉर्गेज बँका, कूळकायदा, तगाई योजना, सहकारी बँका, भूविकास संघ, शेतकरी संघ असे मोठे चैतन्यदायी विश्व निर्माण केले. अर्थात त्याची अंमलबजावणी किंवा प्रत्यक्ष कार्यवाही त्या, त्या विभागातून निवडून येणारे आमदार करणार हे उघडच होते. प्रथमच मिळालेली सत्ता, द्रव्याचे अपरिमित बळ आणि सत्तेचा ध्यास या साऱ्यांच्या योगाने सहकारी शेतीविकासाची सारी उदात्त कल्पना हवेत विरून गेली आणि थोडे मूठभर लोक ती सर्व सत्ता व संपत्तीकेंद्रे आज बळकावून बसले आहेत. एक एकर शेती असणारे आता पहाता पहाता शेदीडशे एकरांचे बागाईतदार झाले आहेत. संपत्तीच्या बळावर सत्ता टिकवता येत आणि सत्तेच्या बळावर संपत्ती मिळवता येते. या दुष्टचक्रात सहकारी चळवळ सापडली आणि सहकारी संस्थात लाचखाऊ दलालांचा बुजबुजाट झाला.

सरकारने गुंतवलेली लक्षावधी रुपयांची रक्कम आज धोक्यात आहे. सरकारी पैसा हा परत करावयाचा नाही अशी समजूत बळावते आहे, आणि त्यामुळे गरीब शेतकऱ्यांचा विकास अजून घडावयाचा राहिला तो राहिलाच. सरकारी मदत मग ती पैशाची असो, तंत्रज्ञांची असो, खतावियाणाची असो, हे कर्ज नसून भीक आहे ही भावना अत्यंत लांच्छनास्पद आहे. दारिद्र्याला मदत हवी–भीक नको. भिकारी निर्माण करण्याचा प्रयोग म्हणजे तर सहकार नव्हेच नव्हे!

या सर्व सरकारी मदतीतून जी समृद्धी होते तिच्यापासून सरकारचा फायदा काय? तर शून्य. इतर सर्व व्यवहारांवर आयकर आहे पण शेतीवर नाही! का? एकरीं पाच ते दहा हजार रुपयांपर्यंत उसासारखे पीक फायदा देते. पण या फायद्या–

पैकी एक पैचाही कर घ्यावयास या नव्या श्रीमंत वर्गाचा विरोध आहे. या उत्पन्नात कसलाही धोका नाही. साहस नाही. कीड नाही. अवर्षण नाही. मग या विनधोकादायक व्यवसायावर का कर नाही ? तर या सधन नवश्रीमंत गावोगावच्या पुंड शेतकऱ्यांच्या आधारावर काँग्रेसचा गोवर्धन उभा आहे. मग मरो तो सहकार मरो तो न्याय. शेतीवर कर बसवायचा म्हणजे अर्थातच अन्नान करणाऱ्या शेतकऱ्यांवर कर बसवायाचा नाही तर जेथे अमाप पैसा मिळवण्याचे नवे साधन सहकारी कृपेमुळे उत्पन्न झाले त्या साधनावर कर बसवायचा. कोयनेचे पाणी ज्या उसासाठी सोडायचे व विजेचे उत्पादन कमी करायचे त्या उसाने सरकारी तिजोरीला यथान्याय कर दिलाच पाहिजे. पण सरकार ज्याच्या पैशाचे वाममार्गाने मिंधे आहे त्यांना कायदा शिकवणार कसा ! ज्या शेतकऱ्याच्या हितासाठी सहकारी, कारखान्यांचा पसारा केला तेच शेतकरी जास्त भाव येत होता तेव्हा सहकारी कारखान्यांना ऊस नाकारून गूळाचा पैसा करीत होते. वास्तविक सहकार काही केवळ फायद्यात नसतो, तो तोट्यातही असतो. पण पोशाखी उद्धाराची ही दिशाच चूक आहे त्याला काय करणार !

शेतकरी हा गरीब प्राणी आहे व त्याला जग लुबाडते ही भावडी समजूत आता विसरलेली बरी. उलट शेतकरी हा चांगला लुच्चा व व्यवहारी बनला आहे. सरकारी कायद्याचा अर्थ त्याला चांगला कळतो–सर्व सवलती व पळवाटा तो उपटतो आणि तरीही सभ्य नागरिक म्हणून सरकारला लेव्ही घालणे, सरकारी कर्जे फेडणे, तगाईचा पैसा तगाईसाठीच वापरणे एवढेही तो करत नाही. वसुलीचा यत्न केला तर एखादा भांडखोर पुढारी पकडून तो सरकारलाच दम देतो. वाळासाहेब देसाई यांनी तर पाच एकराच्या आत सारावंदी करण्याची कल्पना काढली आहे. त्याचे कारण वसूल करावयाचा सारा आणि वसुलीची दगदग व खर्च यांचे प्रमाणच जमत नाही. पण हा काही राज्य चालवण्याचा मार्ग नव्हे. गरिबांना साहाय्य करा, पण कर्ज म्हणून–ते कर्ज वापरण्याचे ज्ञान द्या. त्या कर्जातून होणाऱ्या अभ्युदयापैकी यथान्याय भाग समाजाला परत मिळालाच पाहिजे. पण भूमिपुत्रांना दिवाळखोर ठरवणाऱ्या आणि दिवाळखोरीचे शिक्षण देणाऱ्या शासकाबाबत काय बोलणार ?

हा देश भिकाऱ्यांचा आहे. अमेरिकेकडे सरकार भीक मागते. येथेही बिर्ला–बजाज यांचेकडे भीक मागते–आणलेली भीक ते अधिक भिकारी लोकांना वाटते आणि त्यांना बेशरम आणि निर्लज्ज भीकमागेपणाचे शिक्षण देते आहे.

सहकारातून नव्याने निर्माण झालेल्या मांडवलदारी शेतकऱ्यांचे प्रमुख म्हणजे आजचे सहकारमहर्षी, गावोगावचे श्रीमंत सत्तापती, संघटनेचे खांब म्हणून दुर्लक्ष करून आजवर माजू दिलेले पुंड. पण आता हे सारे सहकारमहर्षी म्हणू लागले–

'आमच्या पैशावर तुम्ही पक्ष चालवता—तुमच्यासारखे अनेक यशवंतराव आम्ही तयार करू—' एकतर यशवंतराव कोणी करून तयार होत नाहीत. ते जन्मावेच लागतात आणि शिवाय यशवंतरावांनीच या संपत्तीवृक्षाला पाणी पाजलेले आहे याची या सहकारमहर्षींना आठवण नाही. त्यांना ती आठवण करून देणे भाग झाले आहे. 'बाबांनो, तुम्ही सुखात राहा. पण पक्षाविरुद्ध बागाल किंवा पक्षधोरणात लुडबूड केलीत तर मग तुमची ही उसनी वस्त्रे फेडल्याबाचून आम्हाला गत्यंतर नाही.' एका व्यक्तीने प्रमुख अधिकारपद सहा वर्षांपुढे चालू ठेवण्यास मनाई करणाऱ्या सहकार दुरुस्ती बिलाची ही अशी करुण कहाणी आहे.

आणि मग राजीनामे, रागरुसवे, आदळआपट चालू झाली.

चार पावसाळे अधिक पाहिलेल्या आणि कोणालाही वठणीवर आणू शकणाऱ्या नवऱ्याला अशा नाठाळ बायकांचे काय हो? जरा करड्या स्वरात हाक मारली आणि जवळ आल्यावर पाठीवरून हात फिरवला, वेळप्रसंगी एक धपाटा दिला म्हणजे अशा बायका पुन्हा मुरके मारू लागतात.

वसंतरावदादांनी राजीनामे परत घेतले म्हणतात.

दिनांक २७ एप्रिल १९६९

● ● ●

अर्धशिक्षितांची फौज !

'दैनिक मराठा'त केशवराव धोंगडे, प्रा. देशमुख, उत्तमराव मोहिते आदी काही क्षुद्र वृत्तीच्या माणसांवर खूप कडाडून लिहिले जात आहे. कोणीतरी हे करावयासही हवे होते. श्री. अत्रे यांच्या व्यतिरिक्त कोणी या जातीयवादी जहरी प्रचाराविरुद्ध फारसे लिहू शकेल असे मला वाटत नाही. कारण आज न्यायाच्या बाजूने उभे राहणे हेच जातीय झाले आहे. अर्धशिक्षित, मूर्ख, अहंमन्य व अडाणी माणसे केवळ संख्येच्या बळावर सज्जन माणसांविरुद्ध काहीही भकत सुटलेली दिसत आहेत. आणि राजकीय पुढारी बाह्यतः त्याचा निषेध करीत आतून हा जातीयवाद पोसण्याचा धंदा करीत आहेत. या सर्व अडाणी माणसांना थोर, उदात्त आणि त्यागी पुरुषांविषयी किळस निर्माण झालेली दिसते आणि गेली अनेक वर्षे परंपरेने उत्पन्न

झालेल्या श्रद्धा मोडून काढण्यात एक विखारी आनंद त्यांना मिळतो आहे. अत्रे त्या-विरुद्ध उभे आहेत. याचे कारण त्यांचे ब्राह्मण्य त्यांच्या आड येत नाही. अन्यांच्या सर्व दुर्गुणांचे एकाच गुणामुळे विस्मरण होते आणि तो गुण म्हणजे त्यांनी मिळविलेले बहुजनसमाजाचे निखळ प्रेम. आणि म्हणून जे अत्रे करू शकले ते अन्य कोणी करू शकणार नाही. अत्रे, सोनोपंत दांडेकर, आणि कॉम्रेड डांगे यांना याही जमान्यात त्यांचे बामणीपण बांधले नाही हा खरोखरीच त्यांचा पराक्रम मानला पाहिजे. यापुढच्या पिढीत मात्र कोणाही बामणाला त्या तिघांनी प्राप्त केले तसे बहुजन समाजाचे नेतृत्व मिळविणे अशक्य आहे.

या जातीय लिखाणात वरवर न्यायाचा अभिनिवेश दिसतो. तो इतका उथळ असतो की पहिल्या प्रश्नातच त्यातील नागवा अडाणीपणा उघडा पडतो. शिवाजी महाराजांचे मोठेपण कोणत्याही अर्थाने श्री समर्थ रामदास लुबाडू इच्छित नाहीत. कारण गुरु जरी कितीही थोर असला तरी शिष्य भेकड असतात असे तर आजही दिसते आहे. म्हणजे शिवाजीचे सर्वांगीण मोठेपण सिद्ध करण्यासाठी समर्थांना खाली ओढण्याचे काहीच कारण नाही. बरे, ते करण्यासाठी कल्पनाशक्तीशिवाय कोणताच पुरावा नाही. म्हणून मग कुणालाच न सुचलेली शक्कल काढण्यात आली. 'सावधान' या आरोळीबरोबर श्रीसमर्थ हे लग्नमंडपातून पळून गेले तेव्हा लग्नासाठी तयार असलेल्या त्या मुलीचे काय झाले असेल, या एका विवंचनेने श्री. केशवराव घोंगडे यांनी एवढे रामायण केले आहे की ते वाचून या माणसाला झाले आहे तरी काय हा प्रश्न पडावा. जगावेगळी माणसे जेव्हा काही मोठ्या यशासाठी सर्वस्व सोडतात तेव्हा मागे काय होईल याचा ते विचार करीत नाहीत. भगवान बुद्धाने संसाराला लाथ मारली आणि तो आत्मज्ञान मिळवण्यास एकांतात गेला तेव्हा त्याने आपल्या तरुण पत्नीचा अन् अर्भकाचा विचार केला नाही. क्रांतिकारकांनी देशभक्तीपायी आपली प्रेयसी-पत्नी-आईबाप यांचा विचार न करता सर्वस्व दिले. आता एखादा वेडा टीकाकार म्हणू शकेल की ज्याला आत्मज्ञान हवे होते, देशभक्ती हवी होती. त्यांनी सुकुमार आणि अश्राप स्त्रियांवर प्रेम करावेच का ? त्याला उत्तरच नाही. उच्चतर ज्ञान, श्रद्धा, कांक्षा यांचा शोध जवळच्या माणसांना जाळून टाकतो पण विशाल विश्वाला निवारा देतो. समर्थ रामदास स्वामी यांनी त्या कोवळ्या सौभाग्यकांक्षिणीकडे पाठ फिरवली. पण साऱ्या महाराष्ट्रदेशाला पोटाशी कवटाळले. ब्राह्मणद्वेषाने पिडलेल्या रोगी माणसासाठी आज तरी कोणतेच औषध उपलब्ध नाही. त्याचे शांतवन एवढेच करता येईल की आता वर्णाने ब्राह्मण कोणी उरलेले नाहीत. कर्माने ब्राह्मण आहेत त्यांचा बुद्धिभेद किंवा अपमान कोणतीही सत्ता किंवा संख्या करू शकणार नाही. कोणा ब्राम्हणानी, कोणा बहुजन समाजावर जो काही अपकार कधीकाळी केला त्याचा हिशेब या घडीला चुकता करून घेण्याची

भाषा मूर्खपणाची आहे. एकतर लोकशाहीने या देशात बहुजन समाजाला सिंहासनाचा कबजा दिला, शिक्षणाची साधने मिळवून दिली आहेज, सेवाभावातून किंवा धर्मबंधनातून मुक्त केले आहे. आणि उंच मानेने जिणे प्राप्त करून दिले आहे. उंच मान हा आनंदाचा आणि अभिमानाचा विषय आहे. मात्र ती मान पेलण्यासाठी ज्ञानाचे मजबूत पाय त्या धडाखाली हवेत आणि ज्ञान, सत्य, न्याय यावर विश्वासलेली समाजव्यवस्था हीच टिकून राहणार आहे याचा विचार करता ज्ञानाची उपेक्षा व सत्याची चिरफाड फार महाग पडणारी आहे.

प्रथमच कुऱ्हाड हाती मिळाल्यामुळे बावरलेल्या वॉशिंग्टनप्रमाणे आमच्या बहुजन समाजाचे झाले आहे. हाती आलेल्या सत्तेने कुणाची छेड काढू अन् कुणाची नको असे त्यांना झाले आहे. जुने अपमान त्यांच्या डोक्यात सणक आणीत आहेत. पण हीच वेळ त्याही समाजाच्या परीक्षेची आहे. सत्ता धारण करणाऱ्याला अधिक जबाबदाऱ्या असतात. त्या पदवीला साजेसे त्याने वागले पाहिजे हे सूत्र यशवंतराव चव्हाणांनी ओळखले आहे. पण त्यांच्या भोवतालच्या नकली नेत्यांना काही ते उमजलेले नाही. सिंहासन मग ते जनतेचे असो किंवा सत्तेचे असो, चिरस्थायी होते ते संतुष्ट समाजावर. जुन्या अपमानाचा बदला घेण्याची वृत्ती जशी बहुजन समाजाने सोडली पाहिजे, तशीच आपल्या हातून निसटून गेलेला मोठेपणा परत मिळविण्याचे स्वप्न ब्राह्मणाने कधीही पाहता कामा नये.

बहुजन समाजातील पुढाऱ्यांनी हेही ध्यानात ठेवले पाहिजे की सत्तेच्या सिंहासनाहून श्रेष्ठ आहे ज्ञानाचे सिंहासन किंबहुना तेच अधिक चिरस्थायी आहे. ते पद प्राप्त करून घेण्यातच खरा पुरुषार्थ आहे. किंबहुना ते पद मिळवायचे ते सवलतींचा आश्रय करून मागीलदाराने नव्हे तर स्पर्धेत टिकून पुढच्या दाराने.

ज्ञान स्वस्त करावे, पण हलके करू नये. फी माफी, फुकट पुस्तके, फुकट न्याहरी, फुकट गणवेश वगैरे सर्व काही करून ज्ञानाची साधने बहुजन समाजाला उपलब्ध करावीत. पण ज्ञानाचा दर्जा घटविण्याची जी लाट निघाली आहे ती बहुजन समाजाला एक दिवस बुडवून टाकील.

आज लक्षावधी अर्धशिक्षित लोक निर्माण होताहेत. पण खरे म्हणजे ते केवळ साक्षर आहेत. हजारो पदवीधर निर्माण होताहेत. पण त्यांच्याजवळ पदवीचा कागद असतो. ज्ञान नसते. अज्ञानी असंतुष्ट अर्धशिक्षितांची फौजच्या फौज आपण निर्माण करतो आहोत. सर्वांना नोकरी देणे अशक्य असते आणि पदवीधर आपला मूळ व्यवसाय विसरलेला असतो किंवा त्याला तो करणे कमीपणाचे वाटू लागते. ज्यांच्या भवितव्यासंबंधाने काहीही विचार केलेला नाही असे हे असंतुष्ट, अर्धशिक्षित--तशा अर्थाने निरुपयोगी नागरिक निर्माण करण्यात काय हित आहे ! वाटल्यास ब्राह्मणांना नोकरीसाठी अपात्र ठरवा. पण शिक्षणाशी संबंध येऊन

ज्यांची स्वप्ने बदलली आहेत अशा नवागत बहुजन समाजाचे काय करणार ? या असंतोषातून त्यांना ज्ञानाची, ज्ञानवंतांची, सेवेची, निष्ठेची कुचेष्टा करण्याचा मोह होतो आणि आजच्या या सुशिक्षित बहुजन समाजातून केशवराव घोंगडे, उत्तमराव मोहिते किंवा प्रा. देशमुख यांच्यासारखी माणसे निर्माण होतात. आपल्या अपयशाचे खापर कोणावर तरी फोडण्यावाचून त्यांचे भागणार नसते. आणि ती मग अशा तऱ्हेने भूमीत गाडलेली वेडे उकरून वर काढतात. आणि त्यातील हाडे चघळीत बसतात.

शाळा–कॉलेजात जाणे, पदवी घेणे ही पोशाखी ज्ञाननिष्ठा आता बस्स झाली. श्रमनिष्ठा गेली आणि खरी ज्ञाननिष्ठा लाभली नाही असे त्रिशंकू निर्माण होताहेत याकडे राजकीय नेत्यांनी आणि ज्ञानपीठाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष दिले पाहिजे नाहीतर विकृतीची पैदास वाढेल आणि ती या समाजाच्या मुळालाच हात घालेल. विद्यापीठे फायद्यात चालविण्यासाठी फीवाढ हा जसा उपाय नव्हे तसाच शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ते हलके करणे हाही उपाय नव्हे.

दिनांक ३० मार्च १९६९

● ● ●

जोगिणी-निर्यातीचा राष्ट्रीय व्यापार

लंडन येथील एका वृत्तपत्राने केरळ येथील तरुण मुलींची विक्री चालते असे प्रसिद्ध करून खळबळ उडवून दिली. भारतातील सर्व पत्रे, लोकसभा या विक्रीच्या वातमीने गजबजून गेली आणि निषेधाचा एकच एक गदारोळ उडाला. मला प्रथम या चर्चेचा उलगडाच होईना. भारतातल्या काही मुली परदेशात–विशेषतः इटालीतील प्राचीन मठात जाऊन धर्मप्रसार, रुग्णसेवा, शिक्षण यासारखी कामे करतात तर त्याबद्दल खरे तर रागवण्यासारखे काय आहे ! एका नव्या उद्योगाचा शोध गरजेपोटी लागला याबद्दल डॉलरभुक्त किंवा पौंडतृपार्त देशाने आनंदाने नाचावयास हवे. परदेशात विकता याव्यात अशा वस्तू या दरिद्री देशात अभावाने असताना कधीकाळी नव्हे त्या निर्यातमालाचा शोध केरळमधील पुथेनपुरा नामक धर्मगुरूने लावला, यासाठी त्याला खरोखरीच पद्मभूषण किंवा भारतरत्न पदवी द्यावयास हवी होती.

या धर्मगुरूच्या निमित्ताने हा व्यापार पुरातन आहे याचाही शोध लागला हे वरे झाले. कोणताही व्यापार म्हटला म्हणजे त्यात थोडे चांगले–वाईट आलेच. माल नाशवंत असेल तर त्याची निगा घ्यावयास हवी. ती त्या धर्मगुरूनी घेतली नाही हे गैरही असेल, म्हणून ही निर्यात थोपविणे अराष्ट्रीय काम होय. उलटपक्षी यासाठी एखादी एकाधिकार व्यापारपद्धती सरकारने शोधून काढून या व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करून टाकावे. सरकारला या निर्यातीतील रहस्य कळले नसावे असे दिसते. या देशातून मानवी कवटया, स्त्रियांचे केस, माकडे, आदि गोष्टी निर्यात होतात. मुंबई–कलकत्त्याच्या बाजारातून सुबक देहाच्या कमनीय तरुणी इराण-इराक येथील सुलतान–नवाब याना पुरवण्याचा व्यापार चालतो. युरोपातील पुत्र-हीन जोडप्यांना अनेक अनाथालयातील बालकेही विकण्यात येतात. या दरिद्री देशातील 'माणूस' किंवा माती एवढीच निर्यातयोग्य वस्तू परदेशात खपते. अमेरिकेत वा इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी पाठवलेली बुद्धिमान तरुण कारटीसुद्धा जादा पगार, गौरांगी मैत्रिणी, वातानुकूल घरे देऊ करून अमेरिका विकत घेते. विकत देण्याजोगे आपल्याजवळ मनुष्यवळ आहे. तेवढी माणसे पोसणे येथे आपोआप कमी होते. मग या जोगिणींच्या विक्रीबावत एवढा कोलाहल का बरे ?

या तरुण, कोवळ्या मुली या देशात नाही तरी दारिद्र्यामुळे बेकार व अविवाहितच राहणार होत्या. तसा लग्नाचा नवरा त्यांना मिळणारच नव्हता. रोममधल्या कोणा पाद्रयाची मेहेरनजर वळून यांपैकी काही जोगिणींना 'कामानंद' मिळणे शक्य होते. त्यांच्या भोजनप्रबंधाची सोयही या मठातून चांगली झाली असती. अर्धपोटी व अर्धवस्त्र अशा या गरीब मुलींवर प्रेमाची पाखर घालावयास येशू ख्रिस्ताचा जो धर्म आणि ख्रिश्चन धर्मपीठ उभे झाले तर त्यात बावगे काय झाले! एवीतेवी त्या आकाशातील बापाच्या कन्या झाल्याच होत्या. मग त्या बापाच्या आज्ञेने दयेचा पाझर फुटून त्यांनी रुग्णसेवेसाठी त्यांच्या पवित्र भूमीकडे प्रयाण केले तर काय बरे चुकले ! महमदी धर्माचे पालनकर्ते नाही का मक्का-मदिनेच्या दिशेने पळत सुटतात. जाताना नाही का ते आपल्या लग्नाच्या, बिनलग्नाच्या, पळवलेल्या, जिंकलेल्या बायका घेऊन जातात.

वास्तविक, केरळमधल्या या जोगिणींच्या बाबतीत जबरदस्तीचाही प्रश्न नव्हता. त्या मुलींच्या आईबापांच्या संमतीने हे सारे घडले होते. आपल्या अन्य भाऊबहिणींच्या ऐहिक उत्कर्षासाठी या मुलींनी आपल्या पारलौकिक उत्कर्षाचा सोपान चढला होता. त्या त्यांच्या धर्मकृत्यासाठी ख्रिश्चन धर्मपीठांनी धर्मप्रसारार्थ गोळा केलेल्या लक्षावधी रुपयांची देणगीही त्यांना दिली होती. या व्यवहारात अगदी अवास्तव खर्च त्यांनी केला तरीसुद्धा सारी मंडळी आकाश कोसळल्याप्रमाणे रोमच्या धर्मपीठांच्या नावाने शंख करीत आहेत. एवढा पैसा त्या जोगिणींना

त्यांच्या आईवापांना किंवा गावातील दादांना त्यांच्या आयुष्यात पहावयास मिळाला नव्हता. पैसा मिळवण्याची ही एकमेव संधी त्यांनी गमवावी असे त्यांच्या लेखी काही घडलेही नव्हते. या देशात आणि त्यातही गेल्या पंचवीस वर्षांच्या नरकासुरी राज्यात कोवळ्या मुलींची विक्री हा प्रमाद तर मुळीच नाही, उलट केवढा तरी किफायतशीर व्यापार आहे, हेही लक्षात घ्यावयास नको का ?

केरळमधल्या जोगिणींच्या विक्री व्यवहारात सरकारला काही किफायत झाली नाही किंवा सत्ताधीशांना कसली मौजही मिळाली नाही ही तर खरी गोम नव्हे ? तसा यत्न केलाच तर प्रत्येक जोगिणीमागे ख्रिस्ती धर्मपीठ सरकारला आवश्यक तेवढा कर देईल. सरकारचे उत्पन्न वाढेल. पूर्वी चौकाचौकातून स्त्री गुलामांची विक्री होत असे. आता ती चर्च–मशिदीतून झाली म्हणून फारसे बिघडले नाही. सगळे काही ईश्वरेच्छेने किंवा इंदिराइच्छेनेच होत आहे. त्याला आपण माणसे काय करणार ?

या प्रकारामुळे आपल्या देशाची अब्रू गेली असा एक आक्रोश पुष्कळजण करतात. एकतर अब्रू या शब्दाचा अर्थ आपल्याला ठाऊक नाही आणि तशी आपल्या देशाला अब्रू होतीच कुठे ? आफ्रिकेतल्या भारतीयांना लाथा घालून हाकलून देत आहेत, पण आपले सरकार बिचारे काही करू शकत नाही. ब्रम्हदेशामधल्या भारतीयांना अन्नान्नदशेत दिवस काढावे लागले. पण आपले सरकार त्यांचे प्रश्न सोडवू शकले नाही. रावात येथे आपण अगदी सुंदर जोडे खाल्ले. रशियन नकाशात भारतीय भाग चीनच्या अंकित दाखवला आहे, पण आपण त्यावद्दल ब्रही उच्चारत नाही. जगात भारतीय हा एक चेष्टेचा शब्द आहे आणि भारत सरकार हा गमतीचा विषय आहे. भारतीय मंत्री परदेशात गेले की सर्कशीतला विदूषक आल्याप्रमाणे परदेशात हसू फुटते. आपल्याला आपल्या देशाच्या सीमा अजून ठाऊक नाहीत. आपल्या सरहद्दीचे नकाशे आपल्याला अमेरिकेने पुरवले म्हणतात. आपल्या लष्करी गरजा अमेरिकन सेनानी नेमक्या सांगतात आणि अन्नांची इंडेंटस (मागणीपत्रके) अमेरिकन शेतीखाते भरून देते.

या देशाला जगाच्या बाजारात किंमत आहे ती फक्त एकाच गोष्टीमुळे. मरावयासाठी भरपूर असणारी लोकसंख्या. प्रजा मेली तरी कसलाही संकोच न करता आंतरराष्ट्रीय करार हसतमुखाने करणारी आपली बेशरम पांढरी सत्ता. प्रत्येक वेळला आंतरराष्ट्रीय राजकारणात हिंदुस्थानची फटफजिती झाली. इस्लामी जगत्, कच्छ निवाडा, काश्मीर प्रश्न, ताश्कंद करार, सिलोनमधील भारतीय, पाकिस्तान सीमा... प्रत्येकवेळेस प्रत्येक अपयश आपण गौरवाच्या झाकीत स्वीकारले. भगवान गांधींची चहा केली. नेहरूंचा गौरव केला. बुद्धाचे जयजयकार केले. शांततेसाठी स्वाभिमान सोडणे ही तर आपली परंपरा आहे.

अशा या परंपरेत वाढलेल्या व कोड आलेल्या पांढऱ्या शासनाला जोगिणीच्या व्यापारावर बोलण्याचा मुळीच अधिकार नाही. उलटपक्षी हा व्यापार सरकारने आपल्या ताब्यात घ्यावा व त्याचे राष्ट्रीयीकरण करावे. राष्ट्रीयीकरण हा सर्व प्रश्नावर तोडगा होय . शिवाय राष्ट्रीयीकरण करताच या व्यापाऱ्याला प्रतिष्ठा येईल. केरळमधल्या कोवळ्या मुलींना राष्ट्रकार्यार्थ-देशहितार्थ समर्पण करावयास नैतिक आधार लाभेल. नि केरळमधल्याच का, सर्वच प्रांतातल्या मुली मुक्तपणाने हव्या त्या देशाला पुरवता येतील. हल्ली परदेशात 'गिनी पिग्ज'वर किंवा माकडांवर प्राणीशास्त्रज्ञ प्रयोग करतात. अहिंसा पाळणाऱ्या आपल्या शासनाने या प्राण्याऐवजी येथील अनाथ मुले पुरवण्याचा मक्ता घ्यावा. त्यामुळे या शोधाची गती वाढेल व संशोधनाशी या तऱ्हेने तरी आपल्या देशाचा संबंध येईल. नाही तरी मंत्र्यांना परदेशदौऱ्यासाठी हुंडणावळ कमी पडते ती या व्यापारातून भरून निघेल.

केरळमधला कोवळ्या जोगिणींनो, तुमचा देह अखेरी देशकार्यार्थ खर्ची पडतो आहे याविषयी संदेह बाळगू नका. येशू तुम्हावर दया करील. आमेन. गांधी शताब्दीनिमित्त नवा व्यापार.

दिनांक १३ सप्टेंबर १९७०

• • •

आता एकच झेंडा हवा आहे !

बेचाळीसच्या चळवळीत इंग्रजांची हुजरेगिरी केल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन होईतो लाल मंडळी काळीठिक्कर पडली होती. मुंबईसारख्या त्यांच्या बालेकिल्ल्यातसुद्धा स्वातंत्र्य चळवळीत कम्युनिस्टांनी केलेल्या देशद्रोहीपणाला क्षमा होऊ शकली नाही. सार्वजनिक सभा त्यांना वर्ज्य झाली. भर उन्हाळ्यात जमिनीत तोंड खुपसून बसणाऱ्या जलचराप्रमाणे सारी कॉम्रेड मंडळी त्यावेळेस मान तुकवून गल्लीबोळात लपून राहिली होती. पण समितीचे राजकरण सुरू झाले आणि त्या पोपटांना शब्द फुटले. कोणत्याही सर्वपक्षीय चळवळीचा कम्युनिस्ट फायदा लुटतात. इतर भोंगळ पक्षातील मतभेद, महत्त्वाकांक्षा आणि स्वार्थ यांची कम्युनिस्टांच्या दप्तरी नोंद असते. एका वेळेस एकाबरोबरच लढाई द्यावयाची हा त्यांचा युद्ध-

संकेत असतो. समितीच्या राजकारणात एकेक पक्ष नेस्तनाबूत करून सारी समितीच आता कम्युनिस्टांनी वळकावून टाकली आहे.

समितीच्या राजकारणात, निदान महाराष्ट्रात कम्युनिस्टांना पुन्हा स्थिरता लाभली. संयुक्त महाराष्ट्राची प्राप्ती समितीने करून दिल्यामुळे कम्युनिस्टांनी त्या विजयाची किंमत वसूल केली. वास्तविक अन्य पक्ष त्यात सामील असूनही ते त्या-वेळेस काहीच फायदा उठवू शकले नाहीत. फक्त कम्युनिस्टांची मान उंच झाली. पण कम्युनिस्टातही दुहीचे वारे शिरले. कॉ. डांगे यांच्या वृद्धत्वाला कम्यु-निस्टातल्या आक्रमक व त्यामानाने तरुण नेतृत्वाने झुगारून दिले. ते स्वतःला खरे मार्क्सिस्ट म्हणवून घेऊ लागले. लाल रंगातही फिकट लाल आणि गर्द लाल असे भेद निर्माण झाले. कम्युनिझमने आंतरराष्ट्रीय राजकारण सोडून दिल्यावद्दल माओने वंड पुकारले. आणि त्या वंडाला इथल्या कम्युनिस्टांपैकी पुष्कळांनी साथ दिली. कम्युनिस्ट पक्ष पुन्हा अडचणीत सापडला.

पण नेहरूंच्या तटस्थ राजकारणामुळे कम्युनिझमला एक निराळी प्रतिष्ठा प्राप्त झाली. भारताला जगातल्या सर्व राष्ट्रांकडून भीक हवी होती. त्यामुळे जोगवा घेऊन सर्वांच्या दारोदारी जावे लागे. अमेरिकेकडे भीक मागताना मोरा-रजी, स. का. पाटील यांना पाठवावे आणि रशियाशी सौदा करताना मेनन महा-शयांना पुढे करावे असे राजकारण हात होते. नेहरू होते तोपर्यंत मनाशी हां हिशेब तरी सदैव राहात होता. कम्युनिस्ट मातले की अमेरिकेकडे वाटाघाटीसाठी एखादा मातवर पुढारी पाठवावा आणि अमेरिकन लष्करी सल्लागार हिंदुस्थानला धमकी देऊ लागले की लाल अस्वलाशी लगट करावी हे मुळातच तत्त्वशून्य राजकारण आहे. पण नेहरूंनी ते अनेक गोष्टींचा विचार करून पत्करले. काश्मीर प्रश्नावर जर रशियाने व्हेटो वापरला नसता तर कोणते संकट ओढवले असते. ऊनोत रशियाच्या वळावर अमेरिकेचे तोंड वंद करावे आणि आशियातील कम्युनिस्ट साम्राज्यवादाला रोखण्याच्या वेळी अमेरिकेचे पाय धरावे यात क्षणिक सोय झाली; पण त्यामुळे अनेक धोके उत्पन्न झाले.

आज त्या सर्व धोक्यांना आपण तोंड देत आहोत. नेहरूंचे तटस्थतेचे धोरण नेहरूपुत्रीने आता सोडून दिले असून रशियन तंत्रानुसार तिने राज्यकारभार चालू केला आहे. ज्यांचा काल लाल रक्ताने माखलेला आहे त्यांना आज मंत्रिमंडळात महत्त्वाची स्थाने प्राप्त झाली आहेत. रशियन तंत्रज्ञांच्या रूपाने व साहाय्याने डांगे यांनी भारतीय राजकारणात, सैन्यात, कारखान्यात पुष्कळ ठिकाणी लाल रंगाचा शिडकावा केला आहे. कम्युनिस्टांनी पुष्कळ ठिकाणी नेहरूंच्या बोटचेप्या धोरणाचा फायदा उठवून घट्ट मोर्चे बांधले होते. त्यातून आता विषारी फूत्कार बाहेर पडू लागले. पण मुंबईत अकस्मात शिवसेनेचा उदय झाला आणि कम्युनिस्ट पक्षाचे

मुंबईतले अधिराज्य संपलं, कामगारांची संघटना ही तशी जरी पक्षात विभागलेली असली तरी 'कामगार' हे येथून तेथून एकच असा आजवरचा पायंडा होता. आणि म्हणून त्यांची एकजूट अभेद्य होती. वेळीअवेळी संप करून, कायदा हातात घेऊन, मुंबई बंद करण्याच्या धमक्या देऊन सर्वच कामगार संघटनांनी कामगारांपेक्षा स्वतःच्या पक्षाचा आणि कार्यकर्त्यांच्या हिताकडे लक्ष दिले. राष्ट्रीय हित, उद्योग-धंद्यातली परिस्थिती, नागरिकांची सोय हे सारे अत्यावश्यक दृष्टिकोन त्यांनी गर्ह्य मानले. परिणाम असा झाला की कामगारांच्या साहाय्याने कम्युनिस्ट किंवा तथाकथित समाजवादी यांनी मुंबईचे आर्थिक जीवन विस्कळीत करून टाकले.

आणि शिवसेनेने आपल्या बलदंड संघटनेच्या बळावर कम्युनिस्टांच्या या राष्ट्रविघातक कृत्याशी मुकाबला करण्याचे ठरवले. मुंबईत झपाट्याने परप्रांतीयांचा वर्चस्वा वाढत होता तेव्हा कामगार, कारकून, कलावंत यांना साहजिकच स्पर्धेला तोंड द्यावे लागले. मराठी कामगारालाही या स्पर्धेत उतरावे लागले आणि त्याच्या लक्षात आले की मराठी माणसावर अन्याय होतो आहे आणि आपण आवाज उठवला पाहिजे.

वास्तविक कामगारांना कायद्याचे, सरकारचे आणि एकूण साऱ्या पुरोगामी विचाराचे आज संरक्षण आहे. स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी कामगार संघटना राखवताना कामगारांचे नुकसान होईल तेव्हा मात्र या साऱ्या राजकीय संघटना चूप होतात. कामगारांच्या न्याय मागण्या मांडणे निराळे आणि त्याला अराजकाला उद्युक्त करून मॉस्कोची चलती वाढवणे निराळे. शिवसेनेने केलेले कम्युनिस्ट विरोधाचे आवाहन कामगारांनी–विशेषतः मराठी कामगारांनी–मानले आणि कामगारांच्या झुंडशाहीचा मुंबईत तरी निकाल लागला.

झाले ! कम्युनिस्टांचे मुंबईतले अस्तित्वच संपले. सार्वजनिक सभा संपल्या. ते अराजकाला उत्तेजन देणारे डांगे यांचे वक्तृत्व संपले. कोणत्याही व्यासपीठावर डांगे यांना उभे राहणेच मुष्कील झाले. आधीच मार्क्सिस्टांनी-नक्षलवाद्यांनी कम्युनिस्टांची वस्त्रे फेडली आणि शिवसेनेने तर त्यांना नंगे केले. मराठी माणसाच्या विराट शक्तीने मुंबई भारून गेली.

पुन्हा जमिनीत तोंड खुपसून वर्षाकाळाची वाट पाहणे कम्युनिस्टांच्या नशिबी आले. कम्युनिस्ट पार्टी ऑफिसची भर दिवसा लुटालूट झाली. साध्या गिरणीगिरणीतल्या सभासुद्धा अशक्य झाल्या. अनेक वर्षे अनेक पराभव पत्करलेल्या कम्युनिस्टाना हा पराभव फारच जिव्हारी लागला. कालपरवा उगवलेल्या या चिमूटभर मुलाने जगभर थैमान करणाऱ्या लालबाजीला नेस्तनाबूत केले.

कम्युनिझम आणि कम्युनिस्ट या दोन गोष्टी होत. पुस्तकातील तत्त्वज्ञान आणि त्या तत्त्वज्ञानाच्या उपासकांचा दैनंदिन आचार पुष्कळदा विसंगत असतात.

मॉस्कोच्या सोईनुसार भारतीय नागरिकांचे जीवन घडवू पहाणाऱ्या कम्युनिस्टांना आम्ही यशस्वी होऊ देता नये. त्यासाठी वेळप्रसंगी श्री. बाळ ठाकरे यांच्या बाजूला उभे राहावे लागले तर आम्हाला त्यात कमीपणा वाटणार नाही. श्री. कृष्णा देसाई प्रकरणात ठाकरे यांच्या बतीने वकीलपत्र घेतले म्हणून मला मुळीच खंत वाटत नाही. शिवसेनेकडून अनंत चुका घडल्या असल्या, त्याच्या संघटनेत हिंसक शक्ती कितीही असल्या, तरी त्या या देशाचे अहित होऊ देणार नाहीत. शिवसेनेलाही आपण उठवलेला प्रांतीयतेचा भस्मासूर आता गैरसोईचा वाटतो आहे. त्यांच्या चुकांचे समर्थन करण्याचा पत्कर मी किंवा माझ्यासारखे अनंत पत्रकार यांनी घेतलेला नाही, पण जर त्या संघटनेकरवी काही भले होत असेल तर तेही आम्ही त्यांच्या गत अपराधासाठी लाथाडावे की काय ?

कृष्णा देसाई प्रकरणात शिवसेनेचा हात असणार नाही असे मी पूर्वीच भाकीत केले आहे. इतक्या सामान्य कम्युनिस्ट कार्यकर्त्याच्या खुनाचा विचारही कोणाच्याही मनात येणे शक्य नाही. कृष्णा देसाईचे पूर्वायुष्य तपासले की त्या खुनाचे रहस्य सहज शोधता येईल पण मी मागे लिहिल्याप्रमाणे शिवसेनेला नेस्तनाबूत करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षानेच एका कार्यकर्त्याला बळी दिले असले पाहिजे. कम्युनिस्टांच्या तत्त्वज्ञानात हे चपखल बसते. मुंबईतले हरवलेले साम्राज्य कम्युनिस्ट पक्षाला हवे आहे. मॉस्कोहून आयात झालेल्या हत्याराने कृष्णा देसाई स्वर्गात गेले असतील आणि आपल्यामुळे कम्युनिस्ट पक्षाला पुन्हा मुंबईत तोंड वर काढता येईल म्हणून कृष्णा देसाई हेही स्वर्गात कदाचित खूप असतील.

परवा वनमाळी हॉलमध्ये कॉ. डांगे यांनी फार दिवसानी तोंड उघडले. कृष्णा देसाईंच्या मृत्यूचे खापर शिवसेनेवर फोडून त्यांनी आपल्या व्यासपीठाला जागा करून घेतली. तरी अजून ठाकऱ्यांची भीती त्यांच्या डोक्यातून गेलेली नाही. पोलिसांच्या कोंडाळ्यात बसून परवा त्यांनी कृष्णा देसाईची उत्तरक्रिया पुरी केली. कृष्णा देसाईच्या मृत्यूचा अधिकाधिक लाभ उठवण्यासाठी ते सिद्ध झालेले आहेत. शिवसेनेच्या हिंसाचाराचा निषेध करता करता शिवसेनेचे शिरकाण करण्याची हिंसक भाषा ते बोलतात याची गंमत वाटते. शिवसेना ही संघटना एका व्यक्तीच्या आदेशानुसार चालते असे आवेशयुक्त भाषेत सांगून ते म्हणतात म्हणून शिवसेना फॅसिस्ट संघटना आहे. मग कम्युनिस्ट पार्टी ही काय लोकशाही, निवडणुका मानणारी पार्टी आहे ? मॉस्कोहून सूचना आल्या शिवाय हातातला घाससुद्धा तोंडात न घालण्याइतकी जी संघटना एकारलेली आहे तिच्या प्रवक्त्याने ठाकरे यांना हुकुमशहा म्हणावे हे खरोखरीच अजब आहे. हुकूमशाहीत स्टॅलिन हा हिटलरपेक्षा अधिक क्रूरकर्मा होता हे जगप्रसिद्ध आहे. पण तो खून करताना खुनी माणसाचे चारित्र्यहनन करी. रशियाच्या तालावर चालणाऱ्या भडगुंज्या नाच्या

पोऱ्यानी दुसऱ्याचा ताल चुकला म्हणून कोकलण्यात अर्थ नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या माथी जेवढे खून आहेत ते जगातल्या सर्व खुनी दरवडेखोरापेक्षा जास्त आहेत. तेव्हां डांगे यांचा हा कोरडा आक्रोश हा बदमाषाच्या साधुत्वासारखा आहे.

पण ते असो. पोलीस पहाऱ्यात का होईना डांगे बोलू लागले. शिरकाणाची भाषा बोलू लागले. चांगली गोष्ट आहे. ते अशीच आक्रस्ताळी भाषणे करतील तर चांगलेच आहे. शिरकाण करणे सोपे जाते. कारण मग त्याचा संरक्षणाचा नैतिक अधिकार नष्ट होतो. हिंदुस्थानात यादवी माजावी, गरीब नागरिकांचे खून घडवावे, उद्योग-कारखान्यांपुढे आर्थिक अरिष्ट आणावे आणि जनतेचा शासनावरचा विश्वास ढळवावा हे उद्दिष्ट ठेवून कम्युनिस्टांची पावले पडताहेत. मग त्यासाठी मुसलमानांचे धर्मवेड वाढवायचे, हिंदु समाजातील चिडलेल्या व उपेक्षिलेल्या जातींच्या उद्धाराऐवजी त्याना चिथवायचे, इंदिरा गांधींवर वेगवेगळी दडपणे आणून, दमदाटी देऊन राजकारणात चंचुप्रवेश करावयाचा... अशा अनेक कसरती चालू आहेत.

हे तर निर्विवाद की जनसंघ–संघ–शिवसेना हचा साऱ्या जागरूक आणि राष्ट्रहितदक्ष संघटना हे कम्युनिझमचे अखेरचे शत्रू आणि जो मुकाबला होणार– मग तो कामगार संघटनात असो–किसान चळवळीत असो–लोकसभेत असो वा रस्त्यारस्त्यावर असो–तो याच शक्तींशी. काँग्रेसची जी शकले झाली तीही याच तत्त्वावर आणि आता ज्या युती होत आहेत त्याही त्याच तत्त्वावर. काँग्रेसमधला स्वार्थी आणि कम्युनिस्टधार्जिणा गट आपले भक्त एका छत्राखाली आणू लागलेला पहाताच अन्य राष्ट्रवादी शक्ती एकत्र जमू लागल्या. होते आहे तेच चांगले आहे. मात्र आज शासन कम्युनिस्टधार्जिण्यांच्या हाती आहे हे विसरून चालणार नाही. कोणत्याही उपायाने राष्ट्रवाद्यांनी शासन हाती मिळवले पाहिजे. त्यासाठी आजच व्रतबद्ध होण्याची वेळ आलेली आहे. आजचे कम्युनिस्ट आणि त्यांचे सहप्रवासी यांचे चाळे यामुळे का होईना सर्व मतभेद, व्यक्तिगत प्रतिष्ठा व स्वार्थ विसरून सर्व राष्ट्रवादी शक्ती एकत्र आल्याच पाहिजेत. वेळ फार थोडा आहे. या वेळात शासन आणि प्रचार यायोगे कम्युनिस्ट वाटेल ते करू शकतील. या थोडक्या अवधीत कम्युनिस्टांना त्यांच्या पद्धतीनुसार भेटावे लागेल. आणि ती तयारी करण्यासाठी मुहूर्त वघून चालणार नाही. आजच-नव्हे आत्ताच तयारीला लागले पाहिजे.

दिनांक १९ जुलै १९७०

● ● ●

कोण जिंकले, कोण हरले ?

९९ नोव्हेंबरपासून महाराष्ट्र राज्य सरकारच्या सरकारी नोकरांनी चालू केलेला बेमुदत संप कोणतीही हमी न मिळवता सपशेल माघार घेऊन परत घेतला.

'संप मागे घेतल्याशिवाय वाटाघाटी नाहीत' हे वसंतरावांचे म्हणणे अखेरीस सरकारी नोकर संघटनेला कबूल करावे लागले. नेत्यांच्या अडेलतट्टूपणामुळे संप १२ दिवसापर्यंत लांबला व सरकारी नोकरांचे पुष्कळ आर्थिक नुकसान झाले. शासनाची ही भूमिका सर्वथा न्याय्य होती. युद्ध सुरू केल्यानंतर तह होईल असे गृहीत धरून युद्ध उभारणे हे नेहमीच महाग पडते. याही वेळेस सरकारी नोकर संघटनेने सुरू केलेला हा वेजबावदार संप त्यांना महाग पडल्यावाचून राहणार नाही. सरकारने याकामी जी खंबीर भूमिका घेतली त्याबद्दल आम्ही सरकारचे फार फार आभारी आहोत. सरकार केव्हाही, कुणापुढेही व कसेही नमते ही भूमिका, केव्हाही कोणत्याच शासनाला शोभत नाही. नेहमीच दंगलीला भिऊन सरकार जर मूर्ख झुंड शक्तीला नमू लागले तर त्यावर आमचा विश्वासच राहणार नाही. या खेपेस सरकार 'सरकार'सारखे वागले. लोकांना त्यांनी शासकीय घट्टपणाचा दिलासा दिला. यावेळेस वसंतराव नाईकांनी दाखविलेले धाडस आणि जिद् यांबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

या संपामुळे पुष्कळ प्रश्न उत्पन्न होतात. सरकारी नोकरांना संपाचा हक्क आहे काय ? मला वाटते तो नसावा. मुळातच अराजकाकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या देशात एकमेव दिलासा आहे तो म्हणजे इंग्रजी अमदानीपासून आपल्याला लाभलेली नोकरशाही. या नोकरशाहीत दोष होतेच आणि ते आजच्या शासकीय पक्षाने वाढवलेही आहेत, पण तरीही या देशाचे शासन अन्य अफ्रिका-आशियाई राष्ट्रांपेक्षा पुष्कळ पटीने चांगले आहे. या देशात लोकशाही राहवायची असेल तर सरकारी नोकरशाही पक्षीय राजकारणापासून आणि राजकीय दबावापासून दूर राखली पाहिजे. स्वातंत्र्योत्तर कालात सर्वच राजकीय पक्ष या नोकरशाहीवर आपआपल्या मताची लेबले चिकटविण्याचा उद्योग करीत आहेत. तो गैर आहे. लोकशाहीतील सत्तेची व संपत्तीची वाटणी ही सामान्यातल्या सामान्य नागरिकापर्यंत

पोचविण्यासाठी हो नोकरशाहीच वापरावी लागते. मंत्री किंवा खासदार अल्पायुषी असतात. चिरंतन शासन आणि दीर्घकालीन निर्णय यासाठी घट्ट, मजबूत, कार्यतत्पर अशी नोकरशाहीच हवी.

कामगार संघटना आल्या की त्या ताब्यात ठेवणाऱ्या राजकीय संघटना आल्या. एकच गोष्ट त्यातल्यात्यात चांगली होती की परवाच्या संपात राजकीय पक्षांचा शिरकाव होण्यापूर्वी सरकारी नोकरसंघटनांनी माघार घेतली. त्याबद्दल ते आभारास पात्र आहेत. काँग्रेसबद्दल आमच्या मनात केवढाही राग असला तरी तो त्यांच्या हातातील शासनावर नाही, तर त्याच्या कापुरुष वृत्तीवर आहे. आणि त्याच्या हातातील सत्ता आम्हाला हवी असली तरी ती मिळविण्यासाठी आम्ही चिरकालीन शासकीय कामगारांची शक्ती वापरता कामा नये. कम्युनिस्ट राजवटीत कुणाला संप करता येत नाही एवढी गोष्ट तरी कम्युनिस्टेतर पक्षांनी लक्षात ठेवावयास हवी. त्याचप्रमाणे समाजवादी राजवटीतही संप ही सत्तास्पर्धेतील शस्त्रे असू शकत नाहीत. या सरकारवरचा विश्वास उडावा म्हणून या सरकारच्या ध्येयधोरणावर वाटेल तो हल्ला करावा पण ते सरकारच बदनाम करावयासाठी राज्ययंत्र बंद करावयाची भूमिका घेणे हा राष्ट्रद्रोह आहे. आणि त्याकामी कुणीही पुढे झाले तर समजुतीपेक्षा दंडा हाच वापरायला हवा.

सरकारी नोकर संतुष्टात राखणे हे समाजवादाच्या घोषणा करणाऱ्या सरकारचे पहिले कर्तव्य आहे. कारण त्या समाजवादाची वाटचाल इंदिराजींच्या व्याख्यानातून किंवा मावळत्या सूर्यनारायणासमोरील अजागळ प्रतिज्ञांमधूनही होत नाही. संपत्तीच्या समानवाटपासाठी अखेरीचे साधन सरकारी यंत्रणाच असते. सरकारी नोकरांना विश्वासात न घेता चालवलेल्या कायद्यांची किती फरफट होते हे आपण आज पहातोच आहो. स्वातंत्र्यानंतर सरकारी नोकरांबाबत सरकारने जे धोरण ठेवले ते अत्यंत घृणास्पद होते. पोलीस खात्यातील नोकरांचे अपुरे पगारमान, निवासाची अव्यवस्था, बदल्यातील आडमुठेपणा या सर्वांमुळे या देशाचे हे संरक्षकच आज भक्षक आणि लुटारूंचे साथीदार झाले आहेत. सरकारी नोकर हे बेपर्वा, आळशी आणि अडाणी आहेत. याचे कारण स्वातंत्र्योत्तर कालात त्यांच्या कामाचे बदललेले स्वरूपच त्यांच्या कोणी ध्यानी आणून दिलेले नाही. त्यांच्यावर निर्णयाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यापेक्षा कामे कुजवण्यातच धन्यता मानली गेली. वशिल्याने, जातीने, प्रांतीयतेने बढत्या मिळाल्या. त्यामुळे नालायक माणसे लायक माणसांवर स्वार झाली. लायकांचा उत्साह ओसरला आणि मग दिवस ढकलणे एवढेच सरकारी नोकरांचे कर्तव्य उरले. स्वातंत्र्यानंतर सरकारी नोकर हे चाकर राहिले नाहीत तर सेवकही झाले. पण ही भावना कुणी फुलवलीच नाही. संपत्तीच्या नव्या प्रवाहांना रस्ते दाखवण्यापेक्षा ते प्रवाह फायलीत मुरवणे यातच

शासकीय कर्मचारी धन्य मानू लागले. काम करणे हे अपवादाचे झाले. काम करावयाचे तर त्यावर 'वजन' ठेवावे लागू लागले. सामान्य जनतेचा सरकारी नोकरांच्या संपाला मुळीच पाठिंबा नव्हता. असणार कसा ? थंड, आळसावलेले, वेळकाढू आणि सत्त्वहीन सरकारी नोकर प्रगतीच्या पाठीवरचे अडथळे होण्याची वेळ आली. हा सरकारी नोकरांचा संप शहाणपणाने मागे घेतला–विनशर्त मागे घेतला म्हणूनच बरे झाले. नचपेक्षा हजारो बुभुक्षित बेकार आज त्यांची जागा घेण्यासाठी उभे होते. संपवाल्यांच्या मदतीस कोणीही आले नसते आणि टाचा घाशीत त्यांना मरावे लागले असते. फर्नांडिस यांची आज काय दशा झाली आहे हे सरकारी नोकरांनी ध्यानात घेतले हे बरे झाले ! डांगे यांच्याजवळ अनुयायी नाहीत, लोकमत नाही, कामगारांची झुंड नाही तेव्हा त्यांच्या वल्गनाही निरर्थक आहेत याचाही विचार सरकारी नोकरांनी केला हे ठीक झाले. त्यांच्या नादाने त्यांनी स्वतःचे आणि देशाचे नुकसान करून घेतले असते.

हा संप अगोदरच आणखी एका कारणासाठी अभद्र होता. महागाई काय फक्त सरकारी नोकरांपुरतीच वाढली आहे ? सरकारी नोकरीशिवाय खासगी कंपन्यात कितीतरी नोकर काम करतात. सरकारी नोकरांपेक्षा या सर्वत्र पसरलेल्या समाजातील नोकरदारांची स्थिती फारच वाईट आहे. सरकारी नोकरांचे पगार वाढवणे म्हणजे पर्यायाने या अर्धपोटी नागरिकांना खिजवण्यासारखेच आहे. शिवाय महागाई भत्त्याच्या वाढीवरोवरच महागाई वाढन रहाते. ते दुष्ट चक्र आहे. कोणाही नोकर संघटनेने स्व–सदस्यांचे हितसंबंध लक्षात घ्यावे पण त्याचवरोवर एका मोठ्या सागराचा ते एक विंदुमात्र भाग आहेत हेही त्यांनी विसरू नये. ज्यांच्या मिळकतीची उद्याची शाश्वती नाही. ज्यांना पगारवाढ नाही, पेन्शन नाही अशा आपल्याइतक्याच गुणवान माणसांचे जीवित खडतर करण्यात आपण सहभागी होत आहोत ही त्यांनी जाणीव ठेवावी. आज सरकारी नोकराची स्थिती पुष्कळच चांगली आहे. मध्यवर्ती सरकारी नोकरांच्या सुखसोईनुसार आपल्याला वागवले जावे यासाठी त्यांनी धडपड करावयास हरकत नाही (कारण मिळाले तर अधिक कोणास नको असते.) पण म्हणून गुंडगिरीचा आश्रय घेऊन नागरिकांची गैरसोय करून आपण आपले मागणे पुरे करून घेऊ, हा भ्रम सरकारी नोकरांनी सोडून द्यावा. सरकारी नोकरांची कचेरीतील गैरहजेरी, उर्मटपणा, कामे टाळण्याची प्रवृत्ती, कायद्याचा फाजील कीस काढून जनतेला छळण्याची वृत्ती, कामाच्या वेळातच खासगी कामे, कथा-कादंवऱ्यांचे वाचन किंवा कँटीनमध्ये गप्पाटप्पा मारण्याची वृत्ती, ह्या आधी पुरेशा संतापजनक गोष्टी झालेल्या आहेत. सचिवालयात तासभर फेरफटका मारला म्हणजे याची प्रचीती येते. खरेतर जनतेने कायदा हातात घेऊन सरकारी नोकरांना आता सुधारण्याची गरज उत्पन्न झाली आहे.

सरकारी संप चिघळला असता तर लोकांनी सरकारी नोकरांनी निराळ्या भाषेत उत्तरे दिली असती. सरकारी नोकरांची संघटना आहे तशीच अडलेल्या व नाडलेल्या जनतेचीही संघटना होऊ शकते. बंगालमध्ये जे घडते ते इथे घडू नये असे वाटत असेल तर सरकारी नोकरांनी सेवाभाव वाढवला पाहिजे. कामावर प्रेम केले पाहिजे. पगाराची व सुरक्षिततेची किंमत आदा केली पाहिजे.

आणि शासकांनी ? त्यांनी तर आता बदलत्या काळाची पावले ओळखलीच पाहिजेत. आज मंत्र्यावर, खासदारांवर, सचिवालयातील चैनवाजीवर जो खर्च होतो आहे तो जर थांबला नाही तर वाका प्रसंग ओढवेल. मंत्र्यांना वाटत असेल की लोक चिडले तरी पोलीस आपला बचाव करतील. ती खोटी गोष्ट आहे. मंत्र्यांचा बचाव त्यांचे चारित्र्य, जनताहितदक्षता, साधेपणा आणि सचोटीच करू शकतील. आज प्रत्येक मंत्र्याचे चारित्र्य वादास्पद आहे आणि यात मुख्यमंत्री नाईकसुद्धा आगेमागे नाहीत. इतर प्रांतापेक्षा इथले मंत्री पुष्कळ चांगले आहेत पण इतर प्रांतांपेक्षा इथली परिस्थितीही निराळी आहे हे विसरू नये. मंत्र्यांचे हे वैभव दरिद्री जनतेच्या पैशातून उभे आहे. मंत्र्यांच्या बुडाखालच्या गाड्या या त्यांनी आमची सेवा करावी म्हणून आम्हीच दिलेल्या आहे. मंत्री आणि सामान्य नागरिक यांच्या जीवनात जेवढा फरक असेल तेवढे ते उद्याच्या अशांततेचे मूळ ठरेल. इथेही तरुण पिढी समाजपुरुषाच्या या विकृतीकडे डोळे उघडे ठेवून पहात आहे. आपण बादशहा आहोत या थाटात रहाणाऱ्या या नेत्यांना जाब विचारणारे कोणीच नाहीत ही समजूत चुकीची आहे. या शिशुपालाचे शंभर अपराध पोटात घातलेले आहेत आणि अस्वस्थ असा हा जनताजनार्दन शिशुपालाच्या मस्तकावर चक्र भिरकवण्याच्या तयारीत उभा आहे. उद्या या मंत्र्यांना रस्त्यावर कोणी ठोकून काढले तर त्याचे आश्चर्य वाटणार नाही. कारण त्यांची करणीच तशी आहे. आपल्या भोवतालच्या चार साथीदारांना संपत्ती देऊन 'उदार, मायाळू, कनवाळू' अशी बिरुदावले विकत घेता येतात पण ती बिरुदावले संतप्त नागरिकांच्या परशूला अडवू शकत नाहीत. तेथे तुम्ही समाजासाठी काय केलेत तेवढेच मदतीला येईल. सरकारी पहाऱ्यात आपण वाटेल ती वक्तव्ये करू असे नव्या 'श्रीपतीना' वाटते आहे, पण सरकारी पहारे कितीही मोठे असले तरी जनतेची ताकद त्याहूनही मोठी असते हे विसरू नये. आणि म्हणून विकास कार्याला पैसा नाही म्हणून ओरडा करणाऱ्यांनी तो देण्यासाठी स्वतःपासून साधेपणाला प्रारंभ करावा. मग इतरांना समाजवादाचा उपदेश करणे सोपे जाईल. मंत्र्यांचा कोरडा उपदेश कोणी ऐकून घ्यावयाचा नाही असे ठरवणारी बहुजन समाजातील तरुण पिढी उगवेल आणि ती या माजलेल्या राक्षसांना वठणीवरही आणू शकेल अशी मला खात्री आहे.

या संपामुळे जनतेला थोडी गैरसोय सोसावी लागली याचे मला मुळींच

वाईट वाटले नाही. आता यापुढे अशा गैरसोई पुष्कळदा सोसाव्या लागतील. मुंबई बंद करणारे अधिकच चेकाळतील मग ते शिवसेनेवाले असोत किंवा फर्नांडिसचे अनुयायी असोत. जनतेला यापुढे भयामुळे दरवाजे बंद करणे परवडणारे नाही. राजकीय डावपेच किंवा स्वार्थी मागण्या यासाठीं उद्योगनगरातले उद्योग थांबवणारे हे नेहमीच राष्ट्रद्रोही मानले पाहिजेत. आणि त्याना सरकारी साहाय्याशिवाय, पोलीस लष्कराशिवाय यापुढे लोकांनीच ठोकून काढले पाहिजे. हे बंदवाले गल्ली-बोळात आपल्या उग्र शक्तीचे थैमान घालीत आले की त्यांना त्याच गल्लीबोळाचा कोंडवाडा करून ठेचले पाहिजे. कोणत्याही कारणास्तव मृत्यू असो वा जन्मदिन असो काम बंद ठेवायची आपल्याला वाईट खोड लागली आहे, त्यासाठी आपण निमित्त शोधत असतो. यापुढे हे संप मोडण्यासाठी शासनाला–मग ते कोणत्याही पक्षाचे असो–आपण स्वयंस्फूर्तीने साहाय्य केले पाहिजे.

या देशात नको असलेली माणसे निवडणुकीच्या द्वारा हाकलून देता येतात. तेव्हा राज्ययंत्र बंद पाडण्याची गरज नाही. उलट ते अधिकात अधिक प्रभावी, कार्यक्षम ठेवूनच आपल्याला त्याचा उपयोग करून घेता येईल. शासनाचे डोळे उघडण्यापुरताच लाक्षणिक अर्थाने हा बंद उपयोगी आहे. पण आज कोणत्याही कारणाने राज्ययंत्र बंद पाडून–अराजक निर्माण करून लाल लांड्यांसाठी संधी उत्पन्न करू देणे चुकीचे ठरेल लाल रंगात फिक्कट लाल, गर्दलाल–पांढरट लाल असे काहीही नसते. सर्व कम्युनिस्ट सारखेच असतात आणि त्या देशाची संस्कृती–चालीरिती–धर्म या सर्वांशी त्यांचे वैर असते. एकाद्या हिंस्त्र लांड्याप्रमाणे सर्व सत्ता काबीज करून माणसाला ते गुलाम करतात. त्यांच्या विरुद्ध जे बंड करतील ते जनतेचे शत्रू ठरवले जातात. अत्यंत पाताळयंत्री, अभद्र अशा गुंडांचा तो एक गट असतो आणि सर्वंकष अशा यंत्रणेने ते लोखंडी पडदा लावून नागरिकाना कोंडून टाकतात. स्वातंत्र्याचे वारे संपून जाते. पाखराप्रमाणे सैरभैर फिरणारे प्रतिभावंत मग त्यांचे भाटचारण होतात. त्याची उदाहरणे अर्ध्या युरोपात घडताना दिसत आहेत. इथल्या भूमीतल्या तत्वज्ञान्यांनी आपण दुरितांचे तिमिर हरवू शकू असे ज्याला वाटत असते त्या सर्वांनी या लाल विंचवापासून स्वतःला दूर ठेवले पाहिजे.

पण आपल्या देशावर आज हे सावट फार झपाट्याने येते आहे. सत्ताधारी अधिकच लाचखाऊ नवाबी आणि जनतेपासून वेगळे पडत आहेत. जीवनमान प्रतिदिनी वाढते आहे. वाढत्या कायद्यानी कायद्याचे हसे होते आहे.

'सरकार' हे शाबूत ठेवणे हे सर्व सुजाण पक्षांचे, नागरिकांचे काम आहे आणि म्हणून सरकारी नोकरांना संप करण्याचा अधिकार देणे या गरीब आणि विस्कळीत देशाला परवडणारे नाही. कारण या देशातली नोकरशाही राजकारणी डावपेचापासून मुक्त असणे अंती हिताचे आहे.

दिनांक ६ डिसेंबर १९७०

● ● ●

या भयंकर साथीला आवरणार कसे ?

विज्ञानाने अनेक रोगांवर प्रतिबंधक उपाय काढले. आणि सहजगत्या जीविताच्या सर्वनाशावर उपाय शोधून माणसाला आनंदमय आयुष्य दिले. नवनव्या औषधांवरोवरच नवनवी चिकित्सा करून रोगाचे निर्दालन करण्यासाठी विज्ञानाने चंग बांधला. पण असा एक रोग आहे की ज्या रोगावर औषध नाही आणि वैज्ञानिक साहाय्याने त्या रोगाचा निचरा होण्याजोगाही नाही आणि तो रोग पहाता पहाता एवढा वळावला आहे की, त्यापायी संस्कृतिसंवर्धनाचा जो प्रवास मनुष्यजातीने केला त्यालाच धोका उत्पन्न होऊ पाहतो आहे.

हा रोग अमेरिकेत अगर युरोपात पैदा झाला असता, तर मुळीच बिघडण्यासारखे नव्हते. उपभोगाचा अतिरेक झाला की आपोआपच माणसे निवृत्तिमार्गाकडे वळतात, त्यांना आयुष्य निरर्थक वाटते आणि मग माणसाचे थिटेपण मनोमय जाणवते. या प्रचंड कोलाहलात एखादा जीव–जिवाणू वळवळावा असेच मानवी जीवन वळवळत असते. मोठेमोठे सम्राट, हुकूमशहा, तत्त्वज्ञ, शब्दकार या चलनवलनात निरर्थक वाटतात, हास्यास्पदही वाटतात. मानवी कर्तृत्वाची पराकाष्ठा, सुवत्तांचे विपुलत्व, इंद्रियजन्य उपभोगाच्या मर्यादा आणि मानवी शक्तीचा क्षणोक्षणी होत जाणारा ऱ्हास यायोगे ऐहिक गोष्टीवद्दल किळस उत्पन्न व्हावी व मग ऐहिकापलीकडच्या त्या अंतिम सत्यावद्दलचे कुतूहल वाटावे, अमानवी सामर्थ्याच्या शोधाची आस लागावी, निवृत्त, निस्संग, निरहंकारी माणसाच्या पूजेची वृत्ती बळावी हे क्षणभर उचित वाटते. ऐहिक स्वास्थ्याची पराकाष्ठा म्हणून हा आध्यात्मिक आवेश समजण्याजोगा आहे. पण भारतासारख्या देशात जिथे मानवी कर्तृत्वाची गेल्या कित्येक शतकात परीक्षाच झाली नाही, इंद्रियांच्या शक्तींना कोणी हाक दिलीच नाही, अंग झाडून कोणी श्रमावर प्रेम केलेच नाही, तिथे हा नवा अंधश्रद्धेचा, आळसाचा, निरुद्योगाचा, पराभूत निवृत्तीचा नवा रोग उत्पन्न झाला तर हा देश कधीच वर डोके काढू शकणार नाही. अगोदरच धार्मिक आणि चुकीच्या सामाजिक श्रद्धांपायी आम्ही जेरीस आलो आहोत. त्यातच आता उच्चभ्रू अध्यात्माची आणखी भर पडते आहे.

भारताची संस्कृती–संस्कृती आहे तरी काय ? देवाने ठेवले तसे रहावे, पराभव झाला तर पराभव झालाच नाही असे म्हणावे, अन्न मिळाले नाही तर खालच्या मानेने मातीत मिसळावे, पाऊस पडला नाही तर आभाळाकडे तोंड करीत स्तब्ध वसावे, ही आपली संस्कृती. मुळातच गेल्या अनेक शतकात अनेक अर्थानी ही संस्कृती पराभूत आहे. त्यात अनावर उदासीनता, अतर्क्य आशावाद, आणि भावडा युक्तिवाद यायोगे आपली संस्कृती जगात कशी श्रेष्ठ आहे, आपले पूर्वज कसे होते, आम्ही कसे टिकून आहात या शब्दाच्या दांडपट्ट्यांनी आपण विरोधकांना गारद करून टाकतो. पण गेला जवळ जवळ बारा–चौदा वर्षे शतके आपण हल्लेखोरांकडून एवढ्या लाथा खाल्ल्या आहेत की त्याला जगात तोड नाही. आपल्या स्त्रिया, देवळे, धर्म, इमले आपण खुशाल यवनाऱ्याना देऊन टाकले. आणखी घ्या म्हटले. हे उच्च संस्कृतीचे तर लक्षण नव्ह ? आपला धर्म, देव आणि संस्कृती जर श्रेष्ठ आहे तर मग ती सदैव पराभूत का होते आह ? एकामागोमाग देवळे फोडली गेली, राजकुले भ्रष्ट केली गेली, सुकुमार राजकन्या बटवया झाल्या तेव्हा आमचे संत, महत, शंकराचार्य, गुरुदेव, आचार्य, बुवा याच्यातील आध्यात्मिक शक्ती, देवत्व, पावित्र्याचे आज, चमत्कार कुठ गले होते. हे सारे अध्यात्माच्या नावाखाली पोट जाळणारे देवाधरचे बडवे त्यावेळी आपल्या लुग्या सावरत रानोमाळ पळाले. त्यांच्या अद्भुत शक्ती, त्यांचे अमानुष सामर्थ्य, त्याचे शिष्यगण, हे सारे मानवाने निर्माण केलेल्या एका दीडदमडीच्या लाखडी पात्याने पराभूत केले. देवाला माणसाने दगड केले. त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या केल्या. मग ज्या मूर्तीच्या बळावर हे तथाकथित ईश्वरी अवतार येथे अध्यात्माचा धंदा करीत होते त्या 'मूर्ती' भ्रष्ट झाल्या तरी त्यांच्या अध्यात्माच्या साम्राज्याला मुळीच डाग लागली नाही.

भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची गाणी गाणाऱ्या कीर्तनकारांनी, संतांनी, बुवांनी, इथल्या माणसाच्या पराक्रमाचे इंद्रियच खच्ची केले. जीवनाकडे त्यांना वळवण्याऐवजी जीवनापासून त्याना वळवले, जीवनावर प्रेम करावयास शिकविण्याऐवजी निरर्थक, पराभूत अशा अध्यात्माच्या शब्दजंजाळात त्यांना बुडवले. त्यामुळे आपला धर्म बुडाला, राज्ये बुडाली, यत्न बुडाला आणि हाती उरला काय... तर नागवा निवृत्तिमार्ग.

देवाशी नाते जोडणारे असे बुवा साऱ्या भारतात जागोजागी, गल्लीगल्लीत आहेत आणि त्यांचा धंदा उत्तम चालू आहे. मोठमोठ्या इस्टेटी, आश्रम, वसाहती त्यांनी उभारल्या आहेत. अनेक आळशी गुंडांना त्या इस्टेटी पोसत आहेत. अनेक पापांना तिथे प्रतिष्ठा आहे. अशा या बुवांच्या प्रचंड व्यापाराला अनेक मंत्री, खासदार त्यांना साहाय्य करतात. प्रत्येक बुवाच्या अनुयायात हे राजकारणी पुरुष असतात. मुंबई मंत्रिमंडळातील अनेक मंत्री अशा गुरुप्रसादाने पावन झालेले आहेत.

असल्या भुक्कड संतांच्या पायी मुळातच वेताची असलेली बुद्धी वाहिल्यावर या देशाचा राज्यकारभार ते कशाच्या बळावर करणार देव जाणे !

या देशातली प्रधान इंडस्ट्री म्हणून उद्योग खात्याने 'अध्यात्म' असा उल्लेख करायला हरकत नाही. इंडियन अध्यात्माला परदेशात चांगला भाव आहे. तिकडच्या लोकांना आपल्या संतांची दाढीची जंगले, अंगाला येणारी घाण, त्यांचे वस्त्रहीन शरीर, त्यांची न समजणारी वक्तव्ये आणि जादूटोणा याविषयी फार प्रेम आहे. अशा अनेक अमेरिकन मूर्खांनी येथे येऊन इथल्या योगविद्येचे, अध्यात्माचे शिक्षण घेण्याची मनीषा व्यक्त केल्यापासून तर इथल्या या संतमहंतांना फारच आनंद झाला आहे. जणू काही आपण अमेरिकेचा आधिभौतिक शास्त्राचा, प्रवृत्तीचा व विज्ञानाचा पराभवच केला अशा थाटात आता अध्यात्माची गाणी आणखी मोठ्या आवाजात त्यांनी सुरू केली आहेत.

या तथाकथित बुवांची–परपुष्ट असणारे वैरागी, महंत, गोसावी यांची जरी खानेसुमारी केली तरी ती पन्नास साठ लक्ष भरेल. गंगा नदीने या सर्व गोसावड्यांना स्वच्छ करायचे ठरवले, तर तिचे पावित्र्य ती हरवून बसेल. तारवटलेल्या डोळ्यांनी गांज्याच्या तारेत यांचे अध्यात्म फोफावत असते. धर्माच्या नावे जोगवा मागणारे अनेक पंथ, जाती, आणि पोटजाती आहेत. जो धर्म आळशी लोकांना पोसतो, त्यांच्या व्यसनांना उत्तेजन देतो आणि अशा तऱ्हेने पापी लोकांच्या पापाला मुक्त होण्यास मदत करतो त्याचा ऱ्हास अपरिहार्यच आहे असे म्हटले पाहिजे.

पण या पोटार्थी, आळशी, निरुपयोगी लोकांना खरोखरीच आयुष्याचा अर्थ कळलेला नसतो. सौंदर्याचा आनंद उमगलेला नसतो. ज्ञानाची कवाडे त्यांनी बंद केलेली असतात. या लोकांपेक्षा अधिक धोकादायक असे जर लोक कोणी असतील, तर विज्ञानाचा आधार घेऊन शास्त्रीय परिभाषेने लोकांना पंढ बनवणारे नवे बुवा, संत, दास, नित्यानंद, चैतन्यानंद ... पूर्णानंद ... हे. अशा शब्दांचा बकवा कशासाठी करतात–कुणापुढे करतात ? अन्नान्न झालेल्या लोकांना अध्यात्म्याच्या गोड गाण्यापेक्षा पसाभर तांदूळ मोलाचे असतात. आणि या घामट, ओशट अशा वेगडी संतांपेक्षा लवकर पिकणारी तांदळाची जात निर्माण करणारा एकादा मोहिते–पाटील त्यांना खरा परमेश्वराचा पुत्र वाटतो. अंतिम सत्याचा शोध घेण्यापूर्वी इथल्या सत्याची तोंडओळख व्हायला हवी, आयुष्यानंतर काय घडणार हे कळण्यासाठी आयुष्यात काय घडणार–काय घडवणार हे कळणे महत्त्वाचे आहे. परलोकात जाऊन आपण जे सुख मिळवणार ते अखेर इंद्रियजन्यच–अप्सरा–सोमरस–चिरतारुण्य हेच ना ? ही सुखे मिळवायला परमेश्वराचे दलाल कशाला ? फोरास रोडवरील एखादा दलाल ही सुखे थोडक्यात मिळवून देईल.

अशा या बुवांनी महाराष्ट्राला तूर्त हैराण केले आहे. भ्रमचित्त झालेला समाज

प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे वळतो आहे. श्रमाकडून समाधीकडे वळतो आहे. ज्ञानसंचयाकडून गुरुपदेशाकडे वळतो आहे. पुण्यातल्या तळ्यातल्या गणपतीच्या देवळात हल्ली जो तरुण समाज घुटमळतो, तो कर्तृत्वाकडून श्रद्धेकडे फिरलेला दिसतो आहे. बुद्धिवादाची परंपरा सांगणारे पुणे हे गाव अशी मामुली बुवांच्या इंग्रजी व्याख्यानातील निरर्थक शब्दामागे वेडचासारखे भिरमिरते आहे. वृत्तपत्रे शंकराचार्यांच्या निरुपयोगी गादीचे पुनरुज्जीवन करू पहात आहेत. मंत्राचे सामर्थ्य,साधनेचे सामर्थ्य, मौनाचे सामर्थ्य यांच्यावर रकानेच्या रकाने लिहिले जात आहेत. समाजाला निवृत्तीकडे फिरवीत आहेत. मासिकातूनही अशा बुवाच्या लीलांचे प्रस्थ वाढत आहे. दीपलक्ष्मी, वाङ्मयशोभा, रोहिणी ही ललित मासिकेही अंधश्रद्धांच्या पाट्या वाहून लोकापर्यंत पोचवीत आहेत. खपते म्हणून वीभत्स वाङ्मय विकणाऱ्यांप्रमाणे खपते म्हणून हे 'अ' धार्मिक वाङ्मय विकले जात आहे. किर्लोस्कर मासिक, विनायकराव सावरकर आणि महादेवशास्त्री दिवेकर यांनी महाराष्ट्रातून एकेकाळी खरवडून टाकलेली बुवाबाजी पुन्हा या देशात रुजू लागलेली आहे. हे धोकादायक आहे. निकोप समाजाचे हे लक्षण नव्हे. एकवेळ मला उन्मत्त झालेली, विकृत झालेली, अनावर झालेली वंडखोर प्रवृत्ती चालेल. कारण तेथे हालचाल आहे. हालचाल म्हणजे तेथे जीवन आहे. जीवनावर माझे फार प्रेम आहे. आणि म्हणून जेथे खळखळाट आहे, जेथे चलनवलन आहे, ते ते मला आवडते. पण पंढ करून टाकणारा निवृत्तीमार्ग हा सर्वात मोठा धोका आहे.

हा सर्व विचार इतक्या प्रकर्षाने सुचला याचे कारण माझ्या समोरचे दोन मासिकाचे अंक. एक आहे सह्याद्रीचा ताजा अंक. आचार्य अत्रे यांचे अनेक गुण अनेकानी सांगितले. पण श्री. भा. द. खेरांनी अत्रे यांचा एक नवाच पैलू सांगितला. ते त्या लेखात लिहितात 'मी त्यांचा हात हातात घेतला. अत्र्यांचा हात लोण्यासारखा मऊ असे. अध्यात्मिक वृत्तीत रंगलेला हात असा असतो हे मला माहीत होते.'

अत्र्यांची एवढी बदनामी मला वाटते आजवर कोणीच केली नसेल. एका खंद्या प्रवृत्तिमार्गी माणसाला बुवा करण्याचे सामर्थ्य पत्रकारात कसे असते त्याचा हा पुरावा. आता अत्र्यांचे अध्यात्म काय प्रकारचे होते त्याची एक आठवण देतो.

गतवर्षीची गोष्ट आहे. एक नामांकित, मूळच्या परधर्मीय नटी नुकत्याच परदेशातून परतून आल्या. त्या लगोलग आचार्यांना भेटावयास गेल्या–आणि म्हणाल्या, 'तुमचे पातंजल योगदर्शनावरचे आणि शांकरभाष्यावरचे लेख मी वाचले अन् तुमच्या आध्यात्मिक सामर्थ्याचा मला अंदाज आला. तुम्ही मला गुरुपदेश करावा.' अत्रे मिस्किलपणे हसले अन् म्हणाले, 'तुझे आयुष्य कसे गेले मी जाणतो अन् माझे कसे गेले हे तू जाणतेस. तुला इथले पुरुष अपुरे पडले म्हणून तू परदेशी जाऊन

आलीस, अन् या वयातही मला नव्या स्त्रीचा मोह सुटत नाही. गधडे, तुला कसला गुरुपदेश हवा आहे तो मला माहीत आहे आणि मी तरी तुला काय अध्यात्म शिकवणार हे तू ओळखायला हवेस–मूर्ख कुठली.'

दुसरा अंक आहे तो 'भालचंद्र दर्शन' या मासिकाचा. या मासिकाचे मुखपृष्ठ पाहूनच मी चकित झालो. हा कोण विख्यात वदमाप? असाच उद्‌गार त्या मुखपृष्ठाकडे पाहून आला. माझ्याप्रमाणेच माझ्या वाचकांचाही उद्‌गार निघेल अशी माझी खात्री आहे. त्या माणसाचे डोळे पहा–त्याची एकंदर ठेवण पहा... माझी खात्री आहे की पोलिसांनी नीट तपासले तर या माणसाचे रेकॉर्ड कुठेतरी सापडेल–जबरीसंभोग समसंभोग किंवा तशाच काहीतरी आरोपावरून हा माणूस कुठेतरी पोलिसांनी पकडलेला असला पाहिजे. या माणसाची संत होण्याजोगी लायकी काय ती त्याच मासिकाच्या एका लेखात आहे. ती अशी :—

'तो काळ साधारण इ. स. १९३२–३३ चा असावा, मे महिन्याचे दिवस होते ते. एक २९ ३० वयाचा, वेडसर, केस वाढलेला, अंगात फाटकी लक्तरे असलेला या गावात प्रविष्ट झाला. तो कोण होता व कोठून आला याचा थांगपत्ताच कुणाला नव्हता. त्यावेळच्या मोटारस्टॅंडजवळच्या श्रीकाशीविश्वेश्वर मंदिराशेजारील दोन आंब्याच्या झाडांच्या वेचक्यात त्याने आपले वस्तान ठोकले.

गावात फिरणे नाही, कोणाकडे काही मागणे नाही, कोणी त्याला काही दिले तर फेकून द्यावे, निर्विकार चेहेऱ्याने वसावे, हा त्याचा त्यावेळेचा वेडेचाराचा प्रकार. मुलावाळांनी दगडधोंडे मारावेत लोकांनी त्याच्याकडे तिरस्काराने व हेटाळणीच्या दृष्टीने पाहावे, कोणी त्याला शिव्या द्याव्यात–हा त्यावेळचा लोकोद्योग.

नंतर त्याने कामत नावाच्या एका इसमाच्या समाधीपाशीं जो मुक्काम ठोकला तो कायमचाच. या समाधीपाशीं घाण होती. वेवारशी कुत्री होती आणि त्याच्या जवळूनच बहिर्दिशेस जाण्याची पाऊलवाट होती. या वेड्या माणसाचे वेडसर चाळे तेथे चालूच होते. लोकांनी त्याला वेडा म्हणून मारहाण केली. पुढे-मागे हा वेडा एक मोठा सत्पुरुष म्हणून प्रसिद्धीस येईल, याची त्यावेळी कुणालाही कल्पना शिवली नाही. पुढे आवडी नावाच्या एका सहृदय बाईस या वेड्याची दया आली. ती विचारी भूतदया म्हणून या निरुपद्रवी माणसाची सेवा करू लागली. तेथेच पडून राहणे, तेथेच मलमूत्र विसर्जन करणे आणि कुठल्या तरी गूढगुंजनात रमून जाणे हाच त्याचा उद्योग.

ती बाई तेथे साफसफाई करी, त्याला जेवण भरवी. असे साधारणतः ७–८ वर्षे चालले होते. ही स्वारी उघडी–नागडी तेथे पडलेली असे. काही बोलणे नाही, चालणे फिरणे नाही, कुणाकडे याचना नाही. आपल्याच विचारात लीन होऊन तासन्‌तास, दिवसेन्‌दिवस व वर्षानुवर्षे हाच नित्यक्रम चालू असे या स्वारीचा.

शाळेत जाताना या स्वारीचे वेडेचार पाहिले आहेत. केव्हातरी गंमत म्हणून त्यांच्या हातात कागद पेन्सिल ठेवली आहे, पण त्यांच्या लिखाणात रेघोट्याशिवाय काही आढळले नाही, 'कोणी वंदा, कोणी निंदा, अपुल्या स्वहिताचा धंदा' हीच वृत्ती तेथे दिसत होती. भविष्यकाळ वर्तमानकाळाच्या उदरात दडपला होता.

पुढे वर्ष्याच दिवसांनी कै. भिकाजी निग्रे यांनी महाराजांनी कागदावर रेखाटलेल्या अक्षरावरून त्यांचे नाव 'भालचंद्र ठाकूर' असावे असा कयास बांधला. तेच त्यांचे नाव पडले. वास्तविक पाहता त्यांच्या गावाचा, घराण्याचा अगर इतर काही ठावठिकाणा लागतच नाही. कोणी त्यांच्यावर हक्क सांगायला आलाच नाही. ते मॅट्रिक परीक्षेत नापास झाल्यामुळे वेडावले असावे, असे पण बोलले जाई. वस्तुस्थिती काय होती, ब्रह्मदेवच जाणे.

होता होता भक्त मंडळी वाढतच गेली. जे त्यांची निर्भर्त्सना करीत, शिव्या घालीत, दगडधोंडे फेकीत तेच लोक त्यांचे चरण धरू लागले. भक्तलोक त्यांना काहीतरी देतात, त्यांच्यापुढे ठेवतात, परंतु महाराजांना त्यांचे काहीच नाही. ते कुणालातरी मारतात–तर केव्हातरी एखाद्यास गोंजारतात. महाराजांचे जीवन म्हणजे एक गूढ आहे. एक अद्वितीय रहस्य आहे. लोकांना त्यांच्या जगण्याचे मोठे आश्चर्य वाटते. गावात दोनदा मोठे प्लेग झाले, लोक सैरावरा पळाले, गाव ओस पडला पण हा अवलिया तेथेच होता. इतके दिवस एकाच ठिकाणी अन्नपाण्याविना पडून रहाणे का थट्टा आहे ? हालचाल न केल्यामुळे व पाय न पसरल्यामुळे त्यांचे पाय आता लुळे झाले आहेत. उभे रहाण्याची क्षमता आता पायात राहिलेली नाही. परंतु त्यांच्या शरीरामध्ये व चेहेऱ्यावर बदल होत गेलेत. अशा अवस्थेत तीन तपे निघून गेली. सामान्य मनुष्य अशा स्थिस्तीत जिवंत राहील की काय हाच मोठा प्रश्न आहे.

अलौकिक चमत्काराचे दाखले जरी देता आले नाहीत, तरी त्यांच्या विक्षिप्तपणाच्या खुणा लोकांना मनोमन पटलेल्या आहेत. त्यांच्या नजरेला नजर भिडवून आपणास त्यांच्या मानसिक व्यवहाराची कल्पना करता येते. त्यांची विक्षिप्त हालचाल व वेडेचार पाहून ही विभूती मनुष्य कोटीतील नक्कीच वाटत नाही.

शेकडो मैलांवरून भक्तगण श्रीभालचंद्र महाराजांच्या दर्शनासाठी धाव घेतात यात त्यांचे व्यक्तिमत्व काय थोडे दिसते ? श्रीसद्गुरु भालचंद्र महाराजांच्या लीलांमध्ये काय अद्भुत काव्य भरले आहे याची कल्पना पामराला करता येणार नाही.'

ज्या बुवांना धर्मग्रंथ माहीत नाहीत, ज्यांना पापपुण्य म्हणजे काय माहीत नाही, इंद्रियांचे उपभोग माहीत नाहीत–अशा या माणसांना संत म्हणून का भजायचे ? त्यांच्या टेऱ्या का वडवायच्या ? हे काय चालले आहे ? मेहरबाबा बोलत

नव्हते—त्यांचेच कौतुक, देवाने चांगले तोंड दिले ते बोलण्यासाठी, ते न वापरणे ह खरोखरी देवाचा अपमान मग जर देवाकडे मेहरबानांचा एवढा वशिला तर त्यांनी आपले स्वरयंत्र देवाला परत द्यायचे. एखाद्या मुक्याच्या कामी तरी ते येते. पुष्कळ संताना अत्यंत घाणेरडे रोग असतात. विकृति असते, त्यांचे भांडवल करून त्या म्हणे त्यांच्या लीला मानायच्या. कऱ्हाडची जुलेखाबी कोणते तरी पाणी देऊन रोग बरे करण्याच्या मिषाने पैसे कमवीत होती. अखेरी ती वेड्याच्या इस्पितळात पोचली म्हणतात. वस्तुतः या सर्व तथाकथित बुवा मंडळींना तेथेच पाठवायला हवे आहे. लोकांना भुलवून त्यांना कर्तव्यविन्मुख करणारे हे परमेश्वराचे दलाल खऱ्या-खुऱ्या समाजवादी रचनेत ठेचले जातील. कारण अशा निरुद्योगी लोकांना पोसणार कोण ?

आपल्या समाजात झपाट्याने पसरत जाणारे हे वेड काहीही करून थोपवले पाहिजे.

१३ जुलै १९६९ ● ● ●

अनुभव आणि आविष्कार.

साहित्य-क्षेत्रात उत्तम साहित्यिक व कनिष्ठ साहित्यिक अशीच फक्त वर्गवारी असावी असे मला वाटते. स्त्री-साहित्यिक व पुरुष-साहित्यिक, बहुजन समाजातील साहित्यिक व ब्राह्मण साहित्यिक, अशांसारख्या वर्गवाऱ्यातून सवलतीची अपेक्षा व्यक्त होते. साहित्यिकांचे लिंग, जात, धर्म, शिक्षण आदी सर्व वर्गवाऱ्या मला कलाबाह्य वाटतात.

मग स्त्री साहित्यिक असा वेगळा विचार करण्याचे प्रयोजनच उरत नाही. असा वेगळा विचार मनात येण्याचे कारण युद्धकाळापूर्वी स्त्रीवर सामाजिक बंधने फार होती व तिचा जीवन-विषयक अनुभव मर्यादित होता आणि म्हणून तिच्या साहित्यविषयक जीवनाला खोली नव्हती. तिला तसे समाजप्रवाहापासून वेगळे ठेवण्यात आले होते. पुरुषजातीच्या असहिष्णु वृत्तीविरुद्ध बंड करण्याइतकीही ती धिटाईखोर झालेली नव्हती. हिंदोळ्यावर, कळ्यांचे निःश्वास (मालतीबाई बेडे-

कर) हिरवळीखाली (गीता साने) वगैरे अपवाद. पण युद्धकाळानंतर स्त्री-जीवनाचे चित्र बदलले. आर्थिक ओढाताणीमुळे नोकरीसाठी स्त्री बाहेर पडू लागली. त्यामुळे स्त्रियांचे शिकणे ही चैन राहिली नाही. स्त्री–पुरुष संबंध अशा तऱ्हेने सामाजिक परिसरात वाढू लागला. 'स्त्री' ही केवळ पुरुषाची छाया या कल्पनेला तडा बसू लागला. स्त्रियांना बंदीत टाकणारे कायदे बदलले. स्त्रीच्या वर्तनाकडे पूर्वीएवढ्या वाकड्या नजरेने पाहणे दिवसेंदिवस अशक्य झाले आणि म्हणून स्त्रीची अनुभवकक्षा वाढू लागली.

आणि म्हणून अशा बदलत्या जीवनाचा तिच्या साहित्यावर काही परिणाम घडला का, तिच्या अनुभूतीची समज वाढली का, तिला खरीखुरी दृष्टी आली का हे पाहिले पाहिजे. एवढ्या अर्थानेच 'स्त्री' साहित्यिका निराळ्या विचारात घ्यावयाच्या.

या ठिकाणी आणखी एक प्रश्न उत्पन्न होतो, की युद्धोत्तर प्रश्नांचा निर्माण झालेल्या एकूण मराठी साहित्यात तरी म्हणण्याजोगा प्रत्यय येतो कुठे ?

उत्तर नकारार्थी आहे. आणि तो नकार स्त्रियांच्याही साहित्यापुढे खडा आहे.

मराठी साहित्य अजून स्वप्नरंजित अवस्थेत मश्गुल आहे. काही लेखकांचा वाकडा प्रवास या घटकेला बंडखोरीत जमा आहे. आरती प्रभू, दिलीप चित्रे आदी मंडळींचे राहोच पण विद्याधर पुंडलीक, शरच्चंद्र चिरमुले, ए. वि. जोशी हे बक्षिसाचे मानकरी खरे, पण लोकप्रिय नव्हेतच आणि प्रातिनिधिक तर नव्हेतच नव्हेत. महाराष्ट्र टाईम्स या नियतकालिकाच्या लोकप्रिय कथाकार स्पर्धेत पुन्हा असतात ते पु. भा. भावे, ग. दि. माडगूळकर, ग. ल. ठोकळ, वसुंधरा पटवर्धन, स्नेहलता दसनूरकर, अरविंद गोखले. याचा अर्थ आजचे मराठी वाङ्मय म्हणून आपण जेव्हा ओळखतो ते, कोणते ? चार टीकाकार 'ग्रेट,' 'वेगळे,' 'अस्टॉनिशिंग' या विशेषणांनी उल्लेखतात ते, की जे वाचून हजारो वाचक– सुबुद्ध (किंवा निर्बुद्ध) होतात ते ? मराठी वाङ्मयाची वाटचाल पाहताना वा. ल. कुलकर्णी, संभाजी कदम, श्री. पु. भागवत, माधव मनोहर या व अशा एकारलेल्या मतांचा कौल मानावा की लोकमतालाही थोडीफार किंमत द्यावी ?

लेखिकेच्या जगात तर फारच घालमेल आहे. शकुंतला गोगटे, चंद्रप्रभा जोगळेकर, ज्योत्स्ना देवधर, मणालिनी देसाई, शैलजा राजे, लीला श्रीवास्तव आदी लेखिका लोकप्रिय आहेत. आणि विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, सरिता पदकी आदी स्त्रियांना प्रशस्ती लाभूनही लोकप्रियता लाभू शकत नाही. अखेरी समाजावर परिणाम करते आहे ते साहित्य कोणाचे ? तपासणी कोणाच्या साहित्याची हवी ?

साहित्य हे आपल्या जीवनाचा एक भाग आहे. आपले जीवन हे खुजे, सुर-

क्षिततेचा हव्यास धरणारे आहे. एकूण मराठी वाङमयच भावडे, खोटे आणि मायावी वाटते. याचे मुख्य कारण आपल्यावर काहीतरी टिकवून धरण्याची जबाबदारी आहे, असे मराठी लेखक मानतो आणि संस्कृती टिकविण्याचा पत्कर आधी पुरुषांनी स्त्रियांच्या गळचात घातला आणि आता तो स्त्रियांनी स्वखुषीने गळचात अडकवून घेतला आहे. त्यामुळे धक्का देणारे, विस्मित करणारे, थरारून टाकणारे काही सुचणे हेच त्यांना अशक्य आहे. 'कोंडमारा' हे साहित्याचे प्रधान अंग वाटते आहे किंवा सर्व काही आबादीआबाद आहे आणि गंमत म्हणून रुचिपालटासाठी जीवनात संकटे येतात असे दुसरे सूत्र अजून स्त्री-वाङमयात टिकून आहे.

मराठी मनावर अजून सुरक्षिततेचे फार दडपण आहे. संसार, लग्न–संस्था, संस्कृती, मुले, समाज, परिवार या साऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, धोका न पत्करता आहे ते टिकवून धरावे हा आहे. आणि त्या पायीच इथली स्त्री कायद्याने मुक्त झाली तरी मनाने गुंतलेली आहे. मुक्त स्वातंत्र्याची तिला भीती वाटते. बंधनातच तिला सुरक्षितता वाटते.

मराठी स्त्री–लेखिका म्हणूनच कसलेच निराळे असे जागृतीचे लक्षण दाखवीत नाहीत. स्त्रीचे दुःख, स्त्रीवरील अन्याय, स्त्रीचे दास्य हा त्यांनी करुणेचा विषय केला आहे. स्त्रीवरील सामाजिक बंधने हे करुणेचा विषय झाल्यामुळे अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्यापेक्षा अन्यायाविरुद्ध तक्रार करण्यातच स्त्रीलेखिका धन्यता मानतात.

वास्तविक स्त्रीचे अनुभवक्षेत्र विस्तृत झाले, तिला आर्थिक स्वातंत्र्य लाभले. तिच्यामागचा सामाजिक ससेमिरा सुटला पण त्याची जाण स्त्री-लेखिकांच्या लेखनात मला तर जाणवतच नाही. एखाद्या पुरुषाचे अन्य स्त्रीशी संबंध असले तरी तो सुखी संसार करू शकतो असे आपण मानतो, पण अशी स्त्री मात्र आपण मानू शकत नाही. स्त्री-लेखिकांनाही तशी स्त्री भेटू शकत नाही. पुरुषांच्या सक्तीच्या वा खुषीच्या साहचर्याशिवाय राहणारी स्त्री, लग्नाशिवाय न कळत नव्हे, तर जाणून-बुजून माता बनू पाहणारी स्त्री, कोणत्यातरी वेडाने झपाटून संसाराकडे हेतुपुरस्सर लक्ष न देणारी स्त्री–अशा वस्तुतः तुरळक दिसू लागणाऱ्या स्त्रिया अजूनही स्त्री लेखिकांना भुरळ घालू शकत नाहीत. एक घरंदाज, सोशिक स्त्री हेच आज स्त्री–खरेखुरे कॅशक्रॉप आहे. वेगळे जीवन चित्रित करण्याचा जयवंत दळवी, बाबुराव बागूल, भाऊ पाध्ये या पुरुष–लेखकांप्रमाणे स्त्री–लेखिकांनी यत्न केल्याचेही दिसत नाही. सुबोध भाषा आणि नेटके निवेदन यातच स्त्री-लेखनाची प्रगती जाणवते. पण नवी बहुजन समाजातील स्त्री किंवा मध्यम वर्गातली नैराश्यवादी स्त्री तर अजूनही स्त्री–लेखकांना ज्ञातच नाही.

स्त्रीमन हे पुरुषापेक्षा संवेदनाक्षम आहे. पाप–पुण्यांचा विचार त्या ठिकाणी

एकाच वेळेला चालू असतो. कोणत्याही बारीकशा गोष्टीने तिच्या अंतःकरणात प्रक्षोभ निर्माण होतो. तो ती बाहेर प्रगट करत नाही. त्याचाच परिणाम ती खुलेपणाने बोलू शकत नाही व म्हणून खुरटत जाते. (आजचे स्त्री-लेखिकांनी लिहिलेले मराठी साहित्य हे मुळी स्त्री-मनाचे बोलच नव्हेत. स्त्रियांच्या मनःपटलावरील ती चलत्चित्रे नसून, पुरुषांनी घालून दिलेल्या एका खोट्या व्रतस्थ स्त्रीची ती वृथा बडबड आहे. त्या साऱ्या पुरुषी अनुभूतीची स्त्री ही गुलाम आहे.) पुरुषाचा मस्त वालपणा, मग्रुरी, धुंदी, आसक्ती आणि नावीन्याचा शोध या गोष्टीशी त्यांचा अजून परिचय सुद्धा झालेला नाही.

स्वातंत्र्यानंतर पुस्तकी स्वातंत्र्य मिळाले, पण स्त्री मात्र अधिक परतंत्र बनली असे वाटते. गृहाबरोबरच आर्थिक उचापती, सौंदर्य–स्पर्धा आणि सहचारित्वाची ओढाताण तिच्या नशिबी आली. या गोष्टीचे स्त्री-लेखिकांना दुःख नाही. त्याबद्दल स्त्री-साहित्यातून कसलेहीं बंड नाही. काही कवयित्रींच्या कवितांतून थोडे बंड जाणवते, पण अखेरी ती बंडेसुद्धा चहाच्या पेल्यातलीच !

मराठी स्त्री-लेखिका म्हणूनच पुरुष-लेखकांनी निर्माण केलेल्या चौकटीत बंड करतील. केवळ गंमत वाटावी म्हणून !

वास्तविक, सांसारिक श्रद्धांना तडा गेलेला आहे. स्त्री-पुरुष संबंधाचे स्वरूप बदलले आहे, स्त्रीला निवडीचा हक्क मिळाला, क्वचित प्रसंगी राजकीय जुगारात स्त्रियांच्या नशिबी धर्मांतर, बलात्कार आले; बहुजन समाजातील पुष्कळ स्त्रियांना केवळ शिक्षणामुळे त्यांच्या समाजात जोडीदार गवसेनासा झाला, चित्रपटातील उत्तान जीवन प्रत्यक्षात न भेटल्यामुळे मनोभंग झाला, आर्थिक दाणादाणीत प्रत्यक्ष शरीर नाही तरी सौंदर्य, गोड अनुनयाची भाषा, स्पर्श अशा गोष्टी स्त्रीला पदोपदी विकाव्या लागतात.

पण दुर्दैव असे की माजघर, वृंदावन, एकत्र कुटुंब–पद्धती, साध्वीपण, पातिव्रत्य, सौभाग्यलेणे या गोष्टींवर स्त्री-लेखिका अजूनही खूप असतात. वाचकांना खूप करतात आणि तडा गेलेल्या आरशातले आपले विद्रूप रूप पुनःपुन्हा सचिंत मुद्रेने पाहतात. खऱ्या समाजातले पेटलेले प्रश्न आणि सत्य यांना अजून तरी सामोरे जाणे स्त्री-लेखिकांना शक्य झालेले नाही.

'स्त्री' मासिक ऑगस्ट १९७०

● ● ●

- ग्रामीण नेतृत्वाचे नवे धुमारे
- जयंतराव, पुन्हा पुन्हा अभिनंदन
- मध्यमवर्गीय राजकारणविन्मुख का ?
- नव्या समाजासाठी शब्दांना नवे अर्थ द्या
- मी. . . मराठी भाषेचा छिन्नविच्छिन्न पुढारी
- प्रिय फेररबाबा
- 'गड सासवडा'ची एक स्फूर्तिदायक गोष्ट

ग्रामीण नेतृत्वाचे नवे धुमारे

प्रिय साहेबरावजी,

चि. सरला कुडूसच्या इस्पितळात आहे हे मला कळले आणि तुमचा निरोपही कळला. खरे तर वर्तमानपत्रात यापूर्वीच हे सारे येऊन गेले होते. तरीपण ज्या तळमळीने, आत्मीयतेने तुम्ही समक्ष सारे कळवलेत यावद्दल मी सदैव ऋणी आहे.

वर्तमानपत्रवाल्यानी तुमची व तुमच्या मित्राची जी निंदानालस्ती केली त्यामुळे तुम्ही रागावलात, ते तर बरोबरच आहे. पण मलासुद्धा राग आला. वास्तविक पुतणी माझी... माझ्या पुतणीवद्दल अन् गावातल्या तुमच्यासारख्या मातबर माणसाबद्दल, वृत्तपत्रांनी असे काहूर का उठवावे हेच कळत नाही. अशाने नव्याने पुढे येऊ पहाणाऱ्या ग्रामीण नेतृत्वावद्दल गैरसमज पसरतात हे या वृत्तपत्रांना कसे कळत नाही.

परवाच एका वृत्तपत्रकारांच्या संमेलनात अध्यक्ष म्हणाले, ग्रामीण नेतृत्वाकडे वृत्तपत्रे मत्सराने पहातात. मला एकदम ते पटले.

साहेबराव, तुमच्याबद्दल मी यापूर्वी पुष्कळ ऐकले आहे. गेल्या निवडणुकीत तुम्ही तुमच्या गावचे सरपंच झाल्यापासून पुष्कळच प्रगती केली आहे हे कळले. तुमचे जुने घर तुम्ही शाळेला अल्पमोलात विकून टाकून नवे ऐसपैस घर बांधले आहे. तुमची विखुरलेली शेती तुम्ही आता सामोपचारे एकवट करून घेतली आहे व नव्याने आलेल्या पाटाच्या पाण्याखाली ती आणून बागायती केली आहे. गावातल्या सर्व गरजू स्त्रियांना तुमचा आधार असतो. आणि लोक काय म्हणतील याची मुळीच पर्वा न करता तुम्ही त्यांना सहाय्य करीत असता. तुमचे एक ज्ञातेवाईक मंत्री आहेत त्यामुळे गावकऱ्यांचे पुष्कळ प्रश्न तुम्ही चटकन सोडवू शकता. एवढे उर्मट आणि बलदंड पोलीस खाते, पण ते सुद्धा तुम्ही मुठीत ठेवले आहे—खरोखरीच एका शेतकऱ्याच्या मुलाने हे सारे मिळवावे याचे मला कौतुक वाटते.

साहेबराव, तुमच्या कर्तृत्वाला आता कोठे सुरुवात झाली होती. हळूहळू

सचिवालयात तुम्ही येणार-मंत्री होणार हे अगदी उघड होते. पण शहरी नेतृत्वाला ग्रामीण नेतृत्वाबद्दल क्षुद्र मत्सर वाटतो आणि नाना कंड्या पिकवून ते त्या नेतृत्वाला खच्ची करतात हेच खरे ठरले.

तुमच्याबद्दल तशा वदंता खूप आहेत. तुम्ही पहिली वायको टाकून एका डॉक्टरीणवाईबरोबर लग्न केलेत. कुणी म्हणतात, या डॉक्टरीणवाईचा नवरा मेला त्यात तुमचा हात होता.

खरे म्हणजे हे सारे कुभांड आहे. तो माणूस कोणत्या रोगाने मेला हे सरकारी डॉक्टरने सर्टिफिकेटात लिहिले आहे. सरकारी डॉक्टर खोटा कसा असेल ? तो खोटे कशाला लिहील ? तुमचे अन् डॉक्टरीणवाईचे सूत अगोदरपासून होते म्हणे ! मी म्हणतो होते. यांच्या बापाचे काय जाते ? वयात आलेल्या वाईने वयात आलेल्या पुरुषाशी काही केले तरी कुणी लुडबुडण्याचे कारणच काय ? तो आणि ती पाहून घेतील. पण नाही. ही वृत्तपत्रे म्हणजे नुसती गिधाडे. खऱ्या प्रेमाची महती कशी कळावी त्यांना. त्यांनी तुमच्या त्या प्रेमाची विल्हेवाट लावली. तुमची गावंढळ वायको तुमच्या नव्या नेतृत्वाला कशी पुरी पडणार. तुम्ही केलेत तेच उत्तम होते. तेच अभिनंदनीय होते. चारित्र्याचे, लाचलुचपतीचे, दमदाटीचे पुष्कळच आरोप तुमचेवर लोक करतात. खरे तर निंदा कुणालाच चुकली नाही. तुम्ही या निंदकांकडे लक्ष न देता आपले काम चालू ठेवलेत म्हणून अभिनंदन.

खेड्यात काम करणे कठीण असते. लोक हट्टी असतात. अडाणी असतात. त्यांना जरबेत ठेवावे लागते. क्वचित धाक वसावा म्हणून दहशत उत्पन्न करावी लागते. त्याशिवाय का ५१ बैलांच्या रथांची मिरवणूक मिळते. उगीच का साखर-कारखाने निर्माण होतात. उगाच का निवडणुकी जिंकल्या जातात ? होतो कधी कधी थोडा अन्याय, पण जनतेच्या भल्यासाठी ते करावे लागते. आता कुठे ग्रामीण जनतेतून नव्या नेतृत्वाचे नवे धुमारे फुटू पहात आहेत. ते वाढू द्यायचे तर एवढ्याचे तेवढे करून उगाचच आरडाओरड करण्यात अर्थ काय ? पण लोकांना त्याचेच स्तोम माजवावेसे वाटते, हे आपल्या देशाचे दुर्दैव.

आता सरलेची गोष्ट घ्या ना ! तुम्ही तिला एकटीला राहू नका असे म्हणत होतात. तुमच्या घरी तुम्ही तिला जागा देऊ केलीत. पण तिने ती नाकारली. तिला कडूसमधे नोकरी लागली तेव्हा मी तिला बजावून सांगितले की, साहेबांचा लौकिक मोठा आहे. त्यांच्या आश्रयाने राहिलेल्याला सैतानसुद्धा काही करू शकत नाही. तुमचा वाडा मोठा आहे. सुंदर स्त्रियांकडे गावगुंडांचे लक्ष जाऊ नये म्हणून तुम्ही त्यांना आपल्या वाड्यात जागा देता यात तुम्ही केवढी समाजसेवा करता याची तुम्हाला कल्पना नसेल. मंत्रीमहाशयसुद्धा तुमच्या या सेवेबद्दल पुष्कळ खूप असतात व वारंवार ते तुमच्या गावाला भेट देतात. मंत्रीमहाशयांची त्यांपैकी पुष्कळ

स्त्रियांशी चांगली ओळख आहे. त्या स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याच्या कामी त्याना त्यामुळे गती येते. 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ,' हा सर्वात थोरला मंत्र. त्याचे प्रत्यंतर म्हणणेच तुम्ही.

सरला तुमच्या घरी राहायला राजी नव्हती, कारण काय तर म्हणे तुमचा बायकांवावतचा लौकिक चांगला नाही. आता काय म्हणावे या कर्माला ! तुमचा लौकिक वाईट म्हणजे काय ? तुम्ही काय भर रस्त्यात बलात्कार करता ? तुम्ही काय दिसेल त्या बाईवर हात टाकता...करता काय तुम्ही ? तुमच्यासारख्या माणसावर खूष कोण होणार नाही. सत्ता आहे, रूप–(तेही आहेच म्हणायचे), पैसा आहे. आपणहून तुमच्याकडे बायका येत असतील. अशा बायकांना फार तर तुम्ही नाही म्हणत नसाल. कामसूत्राप्रमाणे घरी चालत आलेल्या स्त्रीला नाही म्हणणे हे पंढपणाचे लक्षण होय. समजा तुम्ही तशा स्त्रियांना रिक्त हस्ताने वाटेला लावले तरी हेच कावळे म्हणतील, हा कसला नेता ! हेच का ते ग्रामीण पुरुषोत्तम. बरे, तुम्ही एकदा एखाद्या बाईला आपली म्हणलेत की मग तिला वरिष्ठ पदे काय, प्रमोशने काय...काय वाटेल ते तुम्ही मिळवून देता. म्हणजे खरे पहाता, आपमतलबीपणाच असतो या बायांचा.

सरला तर वेडी मुलगी होती. तिला व्यवहार तो ठाऊक नव्हता. या गावंढ्या गावात एकटीने राहायचे, वेळीअवेळी रात्री–अपरात्री हिंडाफिरायचे, यात केवढा धोका होता. जेवणाचे हाल व्हायचे ते निराळेच. तुम्ही परोपरीने तिला समजविलेत.

मंत्रीमहाशयांचा मुक्काम गावात असताना कुटुंबनियोजन केंद्रात जाण्या-वाचून तिला गत्यंतर नव्हते. गाडी देऊ केली तरी पायी गेली. आधी खेडेगावात स्त्रिया दुर्मिळ, त्यात छाती उघडी टाकणाऱ्या, चटपटीत कपडे नेसणाऱ्या बायका पहायला मिळत नाहीत. लोकांच्या गरजा आता वाढल्या आहेत. वाङ्मयातील नायिका समक्षात भेटाव्यात असे सर्वांना वाटते. सरला तर कोणत्याही कादंबरीत नायिका शोभावी अशी होती. रोज अशा बायका शहरातल्या लोकांनी मोप बघाव्यात आणि खेडचातल्या लोकांनी मात्र गवाळचा, गचाळ, काळचाबेंद्रचा बायका बघाव्यात हे समाजवादी धोरणात वसत नाही. एवढचासाठी परिचारिका, मास्तरणी, समाजसेविका यांची नेमणूक सरकारने केली. हे समाजवादाचे युग आहे. भुकेलेल्याला फार फार भुके ठेवू नये. अशा स्त्रिया नुकत्या कुठे खेडचात हिंडू फिरू लागल्या आहेत. भुकेच्या वेळेस आपण प्रमाणावाहेर जोराने चावून घास घेतो–

सरलेच्या बावतीस असेच घडले असेल.

पूज्य बापूजीसुद्धां असे म्हणाले होते की, पठाण बायका पळवतात हा एक सामाजिक प्रश्न आहे. खेडचातही अशीच एक सामाजिक गरज उत्पन्न होत आहे. आपण समजुतीने घेतले पाहिजे. सर्वांना पुरेशा चटकदार बायका सरकार पुरवू

राजा ग्रंथ संग्रहालय, जाम. स्वस्त
क्रमांक

शकत नाही. मंत्री, उपमंत्री, खासदार, आमदार या सर्वांची गरज भागून खेड्यात पाठवता येतील एवढ्या स्त्रिया सरकारजवळ आहेत कोठे ? धान्याप्रमाणेच अशा स्त्रिया कमी आहेत. खेड्यात जायला बायका तयार नसतात. मग कित्येकदा सरकारला अधिक पगाराचे आमिष दाखवावे लागते. कित्येकदा नोकरीवरून काढण्याचे भय दाखवावे लागते. सरकार प्रयत्नशील आहे. अशा बायका जनतेचा उद्धार करण्यासाठी खेड्यात पाठविल्या जातात. त्यांच्या रक्षणाची निराळी व्यवस्था करण्याची या रामराज्यात गरजच काय ? असा धोका आहेच कसला ? नवे नेतृत्व खेड्यात पैदा होत आहे. त्यांच्याकडे आपल्या आयाबहिणींचे रक्षण सोपविल्यावर सरकारने अधिक काय करावे म्हणता !

सरलाला तर संरक्षण देऊनही तिने नाकारले होते. साहेबराव, तुमच्या मायेचा तिने अव्हेर करावा आणि एखाद्या गावगुंडाच्या आधाराला जावे असे तर काही घडले नाही ना ? हा तर उघड उघड तुमच्या भलाईवर आघात होईल–

तिच्यावर कुणीतरी बलात्कार केला, तिला मारझोड झाली आणि म्हणून ती आजारी पडून हॉस्पिटलमध्ये आहे, असल्या गोष्टीवर माझा विश्वास नाही. वर्तमानपत्रे काहीही म्हणोत. कदाचित् असेही असेल की तुमच्या हितशत्रूंनी तुमच्याविरुद्ध या कंड्या पिकवल्या असतील. तुम्ही बलात्कार का कराल ? तुम्ही मारझोड का कराल ? बापूजींच्या नामोच्चाराशिवाय सुम्ही दिनक्रमाला सुरुवात करीत नाही. तर असे तुम्ही हे कराल च का !

तुम्ही मला दहा सहस्र रुपये पाठविलेत. आभार. सरलेची नोकरी या आजारामुळे खंडित होणार आणि वृद्धापकाळात माझे नुकसान होणार यामुळे कळवळून तुम्ही हे साहाय्य केलेत. याबद्दल मी फार फार आभारी आहे. तुम्ही म्हणता ते खरेच आहे. येवढ्या अडीअडचणीतल्या गावी माझ्यासारख्या वृद्धाला येणे जिकीरीचे आहे. तुम्ही आहातच. गावचे डॉक्टर आहेत. ती लवकर बरी होईल आणि मला भेटेल अशी मी आशा करतो. तुम्ही म्हणताच आहात, तेव्हा समक्ष येण्याचा विचार मी सोडूनच देतो. मी येऊन तरी काय करणार ? तिला त्रास होऊ नये म्हणून तुम्ही तिला कोणालाही भेटू देत नाही हे तुमचे आमच्यावर केवढे उपकार आहेत. वृत्तपत्रकार, पोलीस या सर्वांपासून तुम्ही तिला दूर ठेवण्यात यशस्वी झालात याबद्दल अभिनंदन–

खेड्यापाड्यातून तुमच्यासारखे नवे खंबीर नेते निर्माण होत आहेत. यावरून आपला देश आता कुठे जाईल याचा अंदाज येत नाही. नव्या नेतृत्वाच्या या नव्या धुमाऱ्यांना माझे प्रणिपात. जय रामराज्य. जय किसान.

दिनांक १० मार्च १९६८

● ● ●

जयंतराव, पुन्हा पुन्हा अभिनंदन

प्रिय श्री. जयंतराव टिळक, नमस्ते.

तुमच्या घरापासून किंवा केसरी वाड्यापासून चार पावलावर मी राहतो– आणि माझे ऑफिसही चार पावलावरच आहे. तुमच्या कार्यालयातले तुमचे अत्यंत विश्वासार्ह सहसंपादक माझे फार पुराणे ऋणानुबंधी आहेत. तुमच्याजवळ आणि माझ्याजवळ दूरध्वनी सुद्धा आहे, तरी सुद्धा या पत्राचा मी प्रपंच करतो आहे. मागे काही मुद्यांवर लिहिताना अपरिहार्यपणे मी तुमच्या विरुद्ध वा केसरीच्या वदलत्या धोरणाविरुद्ध लिहिले आहे. ते जर मी उघडपणे सर्व समाजाला समजावे या हेतूने लिहिले–(राहवले नाही म्हणून लिहिले) तर यावेळेस तुमच्याबद्दल अभिमान वाटावा, कौतुक वाटावे असा प्रसंग आल्यानंतर ते कौतुक तेवढे व्यक्तिगत, हे बरोबर नव्हे. शिवाय हे अभिनंदन करण्याचे कारणही सार्वजनिक आहे. हात राखून मला जशी टीका करता येत नाही तशीच हात राखून स्तुतीही होता नये एवढ्यासाठीच या अनावृत पत्राचा प्रपंच केला आहे.

केसरी हे एक सार्वजनिक मालकीचे वृत्तपत्र आहे असे मी मानतो. सकाळ, लोकसत्ता, ...आदि धंदेवाईक वृत्तपत्रांपेक्षा ते निराळे रहावयास हवे असेही मला वाटते. या पत्राला एक इतिहास आहे, परंपरा आहे आणि या पत्राचा तो इतिहास जेव्हा विसरला जातो तेव्हा तेव्हा माझ्यासारखे लोक मनात रंजीस येतात, अगतिक होतात. या अफाट, लाचार, स्वार्थी धुक्यात एकादा तरी दिशा दाखवणारा दीपस्तंभ असावा आणि तो केसरीचा असावा, असे व्यक्तिशः मला आणि साऱ्याच मराठी बुद्धिवादी समाजाला वाटते, यात आमची काय चूक. केसरीने सवंग होऊ नये. सरकार, शासन, उद्योगपति यांना विकले जाऊ नये, दुखणे लपवून औषधयोजना करणाऱ्या यशवंतरावजींची कड घेऊ नये, असेही आम्हाला वाटते. म्हणून केसरीचा सिंहनाद ऐकू न येता जर मयुराचे केकाटणे ऐकू आले तर मनाला खंत वाटते.

ही खंत मी वेळोवेळी व्यक्त केली याबद्दल मला अभिमान वाटतो. 'केसरी'ने केसरीसारखे वागावे, धंद्याकडे वेळप्रसंगी दुर्लक्ष करून अप्रिय पण पथ्यकारक अशा आरोळीची फेक द्यावी हेच ठीक नाही काय ? केसरीने शेळी बनू नये. जाहिराती, वृत्तपत्रकागदाचा कोटा...अशा सबबी सांगून आपला आवाज दबवू नये असे मला

वाटते. चटोर गोष्टी, व्यभिचाराच्या कथा देणारी पुष्कळ वृत्तपत्रे उपलब्ध आहेत. खप वाढविण्यासाठी तेही करून पहावे. या प्रयोगात तेच तेच करण्याचा मोह होतो आणि पाऊल घसरते.

हे सारे केसरीबद्दल वाटले म्हणून मी 'प्रिन्सेस'च्या समारंभाचेवेळी लिहिले होते. अशा कामाला राजकारणी, अपात्र अध्यक्ष आणण्याचा मोह झाल्याबद्दलही लिहिले होते. माझा काही वैयक्तिक राग किंवा स्वार्थ यामागे होता असा गैरसमज तुम्ही करून घेणार नाही अशी मला खात्री आहे. प्रतिष्ठितांची कुचाळी किफायतशीर असते या सवंग व्यापारापोटीही मी तुमच्यावर–तुमच्या वृत्तपत्रावर लिहिले नव्हते. जे लिहिले ते केसरीच्या अभिमानाने–मराठीपणाच्या अभिमानाने. जसे लोकमान्यांचे तुम्ही नाव लावता तसेच सारेच महाराष्ट्रीय लोक लावतात म्हणून.

आज तुमचे अभिनंदन करतो आहे त्याचेही कारण वरच्या विवेचनाशी संबंधित आहे. आज मराठी मध्यमवर्गीय माणूस परिस्थितीपुढे हतबुद्ध झालेला आहे. पराभूत मनोवृत्तीमुळे त्याचा तोल सुटलेला आहे. आपल्या पराभवाची चिकित्सा करून आपली सुधारणा करण्याच्या खटपटीपेक्षा तो त्या पराभवाचे खापर दुसऱ्यावर फोडू पहाण्याच्या मनःस्थितीत आहे. उघडपणे त्याची स्पर्धा फक्त दाक्षिणात्य कारकून किंवा कारकुनी पेशाचे अन्य व्यवसाय करणारे यांच्याशीच आहे आणि केवळ त्या स्पर्धेत आपला टिकाव लागत नाही, यास्तव तो ती स्पर्धा मुळातच उखडली गेली तर बरे, या अविवेकी निर्णयाला आला आहे. 'नोकरी' हे रणक्षेत्र करण्याच्या अत्यंत निकृष्ट स्तरावर तो डोके आपटत आहे आणि त्याही नोकऱ्या अधिकाराच्या नव्हेत. कुरूप बरे करण्याऐवजी पाय कापण्याच्या योजनेत आजचा मराठी माणूस आहे.

मराठी माणसाची ती अवस्था व्हायला जी अनेक कारणे आहेत ती सर्व– इथले नालायक नेतृत्व, ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद, उद्योगधंद्याविषयी अनास्था, जबाबदारीच्या जागा धोका घेऊन, साहस करून पत्करण्यापेक्षा सांगकाम्या पण कमी पगाराच्या जागांवर चिकटून बसण्याचे आपले भ्याड धोरण–महाराष्ट्रीयांच्या मूलभूत उणीवा...या व अशा अनेक विषयांशी संलग्न आहेत. केवळ मराठा म्हणून जर (नालायक असला तरीही) लुंग्यासुंग्या मराठा माणूस मंत्री होतो–प्रोफेसर होतो तर मग केवळ केरळीय आहे म्हणून पक्षपाताने केरळीयांना नोकऱ्या मिळाल्या तर ओरडण्याचे काय कारण ? पक्षपात प्रांताप्रांतात होऊ नयेत–अन् जातीजातीत व्हावेत की काय ? याचे उत्तर देण्याचा यत्न करताना (वेटेज) गुणहीनांना दिलेल्या सवलतीमुळे गुणवंतांवरील होणारे अन्याय, लोकसंख्येच्या प्रश्नामुळे केरळ–तामिळी यांची होणारी स्थलांतरे, मुंबईत एकवटलेली राष्ट्रीय कारखानदारी या सर्व प्रश्नांचा नको का विचार करायला ?

पण हा विचार कोण करणार ! हे अप्रिय सत्य मराठी मध्यमवर्गीयांपुढे कोण मांडणार ! बाळ ठाकरे यांच्यासारख्या स्वार्थी आणि लबाड माणसाच्या हातात ही विथरलेली माथी गेल्यानंतर मग ठाम उभे राहून त्यांना कोण सांगणार की 'बाप हो–तुम्ही चुकता आहात.'

मुंबईची वृत्तपत्रे शिवसेनेच्या विरुद्ध प्रचार करतात असे बाळ ठाकरे म्हणतात ते खोटे आहे. नवशक्ति हे मध्यमवर्गीयांचे पत्र सर्वथा आपले गिऱ्हाईक सांभाळण्यासाठी ठाकरे यांच्या बाजूला उभे आहे. मुंबईच्या मराठी वृत्तपत्रांनाही जगायचे आहे. आपल्या विथरलेल्या वाचकांना अप्रिय गोष्टी सांगायला तीही वृत्तपत्रे कचरत आहेत. त्यांच्या पोटाचा प्रश्न आहे हा. त्यांचे मालक त्यांना पगार देतात तो मिळवलेल्या नफ्यातून. त्यांना तुमच्या बऱ्यावाईटापेक्षा फक्त खप दिसतो–जाणवतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आरंभी विरोध करणाऱ्या 'लोकसत्ते' ने पलटी खाऊन संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने पुढे प्रचार केला. पोटार्थी वृत्तपत्रांचे असेच व्हायचे. त्यांना महाराष्ट्र मेला वा केरळ मेला दोन्ही सारखेच.

पण या वेळेला केसरीने आपले ब्रीद राखले. तुम्ही टिळकांचे नाव राखलेत. कोण काय म्हणतील, याचा विचार सत्यशोधनापेक्षा कमी दर्जाचा आहे. निर्भयपणाने, खणखणीतपणे तुम्ही माथेफिरू ठाकऱ्यांना त्यांचा मूर्खपणा समजावून सांगितलात. ज्या टाळ्या आधी बाळ ठाकरे यांना मिळाल्या त्याच विथरलेल्या डोक्याच्या शहाण्या हातांनी तुमच्या प्रसादपूर्ण, विवेकी भाषणालाही टाळ्या दिल्या.

जयंतराव, हे व असेच प्रसंग अधिकाधिक येतील तर मी फार फार आनंदित होईन. भाषावार प्रांतरचना ही आपण घोडचूक केलीय हे आता सर्वांनाच पटत चाललंय. एकसंघ असा हा बलवान स्वतंत्र देश हे तुमच्या आजोबांचे स्वप्न होते. तुमच्या शक्तीने तुम्ही त्या स्वप्नाचा पाठपुरावा करा. हे काय पुन्हा 'टिळका'लाच करावे लागेल असे दिसत आहे, त्यात उणे पडू नका.

परवाचे तुमचे वक्तृत्व अभिजात होते. स्वयंसिद्ध होते. एक काळ असा होता की केसरीवाड्यावरून जाताना आदराने आपोआप मान खाली झुके... ती वेळ पुन्हा यावी अशी माझी इच्छा आहे. दिल्लीचे ते पादशहा केसरीच्या आरोळीने घाबरले पाहिजेत. चव्हाणांना केसरीने गौरवाने बोलावण्यापेक्षा चव्हाणांनी त्या निर्भय न्यायालयापुढे मधून मधून आपणहून मुजऱ्यासाठी आले पाहिजे. सत्तेपेक्षा, धनापेक्षा, झुंडीपेक्षा, सत्याचे, बुद्धीचे व न्यायाचे सिंहासन उंच असते. लोकमान्यांनी निर्माण केलेले ते सिंहासन तसेच आमच्या आदराचा विषय राहू द्या. टाळ्यांचा लोभ न धरता तुम्ही टिळकांचे नाव उंच केलेत आणि तुमच्या ध्यानी आले असेल की, टाळ्यांची भीक मागावी लागत नाही. त्या चालत तुमच्या घरी येतात.

जयंतराव, पुन्हा पुन्हा अभिनंदन. आता केसरीवाड्यावरून जाताना, केसरी-

वाङ्मयाकडे नजर टाकताना मला आनंद वाटेल. आमची मान झुकविण्यसारखे तुमच्या हातून काही घडेल याची मी वाट पहात आहे.

तुमचा
ग. वा. बेहेरे

दि. २४ सप्टेंबर १९६७

• • •

मध्यमवर्गीय राजकारणविन्मुख का ?

श्री. बाळासाहेब देसाई यांना:– स. न. तुमच्यावर मी अनेकदा अत्यंत कठोरपणे प्रहार केले आहेत–अर्थात् त्याबद्दल मला कोणताही पश्चात्ताप होत नाही. तुमच्यावर कधीकाळी चार भले शब्द लिहिण्याचा योग येईल असे मला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते. परवा वृत्तपत्रातून तुमच्या एका भाषणाचा सार्यंत वृत्तांत मी वाचला आणि मला वाटले, हे तुम्ही मध्यमवर्गाला सहानुभूतिदर्शक भलतेच काय बोलताहात ? तुम्ही आणि यशवंतरावजी चव्हाण यापूर्वी अशाच स्वरूपाचे काही बोलला होतात हे मला स्मरले. पण मी तो एक राजकीय स्टंट म्हणून घेतला. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाचा विचार करताना तुम्हा दोघांना विचारात घेतल्याशिवाय आज काही बोलणे वेडेपणाचे आहे. आम्ही कितीही तुमच्याविरुद्ध काहूर उठविले, तुमच्या चारित्र्याचा पंचनामा केला, तुमच्या ज्ञानाची मर्यादा उघडी पाडली–तरी आपण पत्करलेल्या लोकशाहीची तुम्ही दोघेही प्रतीके आहात हे विसरण्याइतका मी मूर्ख नाही.

कोणत्याही प्रश्नाचा विचार करताना आपले भारतीयत्व मला विसरता येत नाही. आणि ते तसे विसरता येत नाही म्हणून शिवसेनेसारख्या लाभदायक आणि लोकप्रिय चळवळीशी मला फटकून रहावे लागते. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाचा एरवी मी विचारही केला नसता. त्या एका क्षुद्र वादापायी महाराष्ट्रावर सदैव अन्याय झाला आहे. भारतीय लोकसभेत महाराष्ट्राची मान सदैव खाली राहिलेली आहे आणि एका अत्यंत पुरोगामी, राष्ट्रहितदक्ष अशा महाराष्ट्रीय समाजातील बुद्धिवंतांना भारत मुकला आहे हे विदारक चित्र मला नेहमी अस्वस्थ करते.

कोणतेही शब्द वापरले तरी ब्राह्मणद्वेषाचे राजकारण तुम्ही लोकांनी आजवर केलेत आणि ते कोणत्याही लोकशाहीच्या तत्त्वाला धरून नव्हते असेच इतिहास सांगेल. ब्राह्मण मेले तरी कोणतेही ऐहिक नुकसान होणार नाही. परंतु ब्राह्मण्य मेले तर मात्र सारा अंधार होईल. ब्राह्मण ही एक जमात आहे. ब्राह्मण्य ही एक वृत्ती आहे. ब्राह्मणांचा नाश झाला, तर काही लाख लोक नेस्तनाबूत होतील. त्याने फारसे बिघडणार नाही. कोट्यवधी लोकांच्या या अर्धपोटी देशात काही लाख असणे अथवा नसणे याने काहीही घडणार नाही. घडणार आहे ते ब्राह्मणांच्या नाशावरोवर बुद्धिवादही नाश पावेल त्यामुळे. राज्य चालविणे ही गोष्ट शेत नांगरण्याइतकी सोपी नाही. आणि ही गोष्ट ज्या दिवशी आपल्या शासकांना कळेल तो दिवस आपण सणासारखा साजरा करू. राजकारण हा असा यज्ञ आहे की जेथे पायाची आहुती होत असताना तोंडातून स्वाहाकाराचे मंत्र उमटावे लागतात. आणि एवढ्यानेही भागत नाही. सारे आयुष्य जळत ठेवूनसुद्धा वाहेर फुलावे लागते आणि म्हणून ज्ञानाची, सेवेची, विज्ञानाची कारंजी आपल्याभोवती फुलू द्यावी लागतात.

वाळासाहेव देसाई, तुम्ही लोकातून नेते झाला, पण लोकनेते झाला नाहीत. जुनी सरंजामशाही संपल्यासारखी वाटली पण ती संपली नाही. नावापुरते राजे वरवाद झाले पण राजपदे शिल्लक राहिली. जुन्या राजांना ज्ञानाची जी तीव्रतर ओढ होती तिचा तर मागमूसही राहिला नाही. मिळालेली सत्ता अधिकाधिक लाभदायक कशी करावी आणि आपल्या पुत्रपौत्रांचा जीवनमरणाचा लढा कमी करावा यापरते मोठे उद्दिष्ट तुम्ही ठेवले नाहीत.

आपण उठल्या वसल्या शिवाजीचे नाव घेतो आणि वागतो मात्र त्याच्या तत्त्वाविरुद्ध. असे होऊ नये. शिवाजीच्या जीवित–चरित्राचा अन्वयार्थ नीट लावून पाहिला तर हे ध्यानात येईल की सर्व जातीजमातींचा त्यांनी यथान्याय उपयोग करून घेतला होता. राजकारणाचा किंवा समाजहिताचा गाडा एका जमातीला कधीच ओढता येणार नाही. प्रत्येक जमातीच्या काही मूलभूत सुप्त शक्ती असतात आणि जे काम करायला अन्य कोणाला अधिक शक्ती व समय व्यतीत करावा लागेल ते काम केवळ सवयीने आणि निष्ठेने ती जमात त्वरेने आणि सफाईने करील. अर्थात् म्हणून अन्य कोणी ती कामे करूच नयेत असे मात्र नव्हे. कारण तसे वंधन ठेवल्यामुळेच तर जातीव्यवस्था आल्या. पुन्हा तोच इतिहास आपण घडवणार नाही. ज्या त्या समाजातील अशा सुप्त शक्ती शिवाजीने रावबल्या म्हणूनच त्याला हिंदवी स्वराज्य उभे करता आले. तुमच्या हाती आलेले हे राज्य जर वैभवाला यावयाचे तर जातीपातीचा मोड तर व्हावयास हवा पण त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण उक्तींना मात्र वाव मिळावयास हवा.

तुम्ही परवा म्हणाला, मध्यमवर्ग (म्हणजे ब्राह्मणवर्ग) राजकारणाबाबत उदासीन आहे. ही गोष्ट खरीच आहे. ब्राह्मणवर्गाने ते औदासिन्य सोडावे ही विनंती केलीत याबद्दल मनःपूर्वक आभार. पण खरे म्हणजे ब्राह्मणवर्गच नव्हे तर सर्व सुशिक्षित, सुसंस्कृत, विचारी लोक राजकारणापासून दूर राहतात. यात जातीचा मुळीच प्रश्न नाही. सुशिक्षित मराठासुद्धा राजकारणाच्या धुराळ्यापासून दूर राहणे पसंत करतो याचे कारण राजकारण म्हणजे डावपेच–दुसऱ्याला शह देण्यासाठी करावी लागणारी सामर्थ्याची रस्सीखेच–शिवीगाळ–अपव्यवहार असा काहीसा अर्थ तुम्ही गेल्या दहा-पंधरा वर्षात राजकीय जीवनाला आणला आहे. आपला व आपल्या नातेवाइकांचा भाग्योदय करण्यासाठी आपण सत्तास्थाने मिळवावी असे एकदा का तुम्ही स्ववर्तनाने सिद्ध केलेत म्हणजे कोणताही समंजस, विवेकी माणूस त्या घाणेरड्या व लडबडलेल्या राजकीय पदासाठी आकांक्षा धरणार नाही. नेहरूंनासुद्धा स्वजनाच्या स्वार्थासाठी खाली येण्याचा मोह आवरला नाही. मग बाळासाहेब, तुम्हाला आम्ही दोष का द्यावा. पर्वत जेथे गडगडला तेथे खुरटया गुलटेकडीचा विचार वृथा कशाला करायचा.

अर्थात् हा दोष काँग्रेसच्या राजकारणापुरता मर्यादित नाही, हेही मी येथेच कबूल करून टाकतो. सत्ता मिळाली की माणसांना नशा चढते. बुभुक्षित माणसापुढे पंचपक्वान्नाचे ताट ठेवले की तो आपल्या शक्तीचा विचार न करता खादाडतो आणि मग आजारी पडतो. त्याप्रमाणे आजचे एकूण एक सत्ताधीश करताहेत. 'राजकारण आणि सत्तास्पर्धा' हा पुष्कळांचा पोटाचा व्यवसाय बनत चालला आहे. हे असेच चालले तर मला सांगा, कोणता विचारी माणूस या वाटेला हेतुपुरस्सर येईल. मराठे व बहुजनसमाजातील विवेकी लोकही दिवसेंदिवस या तुमच्या तथाकथित 'राजकीय' जीवनाकडे पाठ फिरवीत आहेत.

सर्वसामान्य माणसापेक्षा नेत्यावर चारित्र्यरक्षणाची अधिक जबाबदारी असते. कारण तो चारित्र्यशून्य असला की त्याच्या अनुयायांना तोच मोह होतो आणि त्याच्या चारित्र्यहननाला थोपवणे कोणालाच शक्य होत नाही. तो नेता, त्याचे अनुयायी यांच्या चारित्र्याची एकदा अवनती सुरू झाली की मग त्याचेच समर्थक भाटही त्यांना लाभतात. वृत्तपत्रेही त्या कृत्याचीच तरफदारी करतात. होता होता असे हे चारित्र्यशून्य नेते समाजातील चारित्र्याची मूल्येच बदलवून टाकतात.

रदारागमन, काळाबाजार, लाचलुचपत, वशिलेबाजी यांनी डागळलेले नेते सर्व समाज रसातळाला नेतात आणि शासकीय अधिकारी कर्तव्य बजावण्याऐवजी या मंत्र्याची सरबराई करून मंत्र्यांच्या व्यसनांची सोय करतात...आणि बढत्या उपटतात.

(बाळासाहेब देसाई, मी काय लिहिले याची खोच तुमच्या व तुमच्या सहकाऱ्यांच्या ध्यानी यावयास हरकत नाही.)

म्हणून तुमचे काय ते चालू द्या. तें थांबवणे आमच्या हाती नाही. पण समाज सुरक्षित आहे तो राजकारणविन्मुख अशा मध्यमवर्गीय समाजामुळे. त्याला नका ओढू तुमच्या या रबडचात. आणि मध्यमवर्गीय समाज जसे मी म्हणतो तो जातिवाचक समाज नव्हे, तर शिक्षणाने सुसंस्कृत झालेला समाज. ब्राह्मण, मराठे, अन्य बहुजनसमाजातील शिक्षितांचा समाज.

तरी सुद्धा तुमच्या परवाच्या भाषणात आत्मनिरीक्षणाचा एक समंजस प्रामाणिक विचार जाणवला म्हणून अभिनंदन. अशी पुन्हा केव्हा वेळ येईल तो सुदिन.

दिनांक २ जून १९६८.

• • •

नव्या समाजासाठी शब्दांना नवे अर्थ द्या.

प्रिय बाळासाहेब देसाई यांसी स. न.वि.वि. परवा तुमचा षष्टयब्दिपूर्ती समारंभ यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते साजरा झाला. यशवंतराव तुमच्या गुणगौरवपर बोलले ते ठीकच आहे. कारण तुम्हीच म्हणता की त्यांनी तुम्हाला आजच्या पदवीवर नेऊन ठेवले. बरे, चव्हाणांचे मोठेपणसुद्धा तुम्ही, वसंतरावजी, शंकररावजी आदी बळकट स्तंभावर अवलंबून. चव्हाणांशिवाय तुम्हाला अस्तित्व नाही आणि तुम्हा सर्वांच्या एकसंघ गढीकोटातील फौजफाट्याशिवाय चव्हाण बिचारे एकाकी काय करणार ? आजवर तुमचे सर्वांचे बरे चालले आहे. क्वचित थोडी कुजबूज झाली–मतभेद झाले तरी सर्कीटहाऊसच्या बाहेर तुम्ही ते येऊ दिले नाहीत. इतर प्रांतातील वातावरण बघता महाराष्ट्रात अजूनही दोन आवाज नाहीत. परस्परांनी परस्परांची योग्य ती ताकद जोखली म्हणजे हे असे अभंग राज्य उभे राहते. म्हणून तुम्हा सर्वांचेच त्या प्रसंगी अभिनंदन करायला हवे.

या प्रसंगात भाऊसाहेब खांडेकरही वक्ते होते. त्यांनीही तुमची प्रशंसा केली. भाऊसाहेबांची प्रशंसा विकत मिळवण्याजोगी नसावी. एकतर आयुष्यातील यशावर

ते संतुष्ट आहेत. त्यामुळे तुमच्याकडून त्यांना मिळवण्याजोगे–किंवा मिळण्याजोगे काही नाही. आणि त्यांची मनःप्रकृतीही अनृताची वा पापाची शिफारस करणारी नव्हे. चारदोनशे रुपयांच्या मानधनासाठी किंवा एखाद्या क्षुद्र हक्कासाठी तुमची किंवा चव्हाणांची युगप्रवर्तक म्हणून भलावणी करणारे या महाराष्ट्रात अमाप विचारवंत आहेत. प्रत्येकाचे हात कुठेतरी अडकलेले असतात. तुम्ही दोघेही असे शहाणे आहात की विरोधकांशी युद्ध खेळून त्यांना पराभूत करण्यापेक्षा उपकृत करून तुम्ही ओशाळे करता. या महाराष्ट्र राज्यातील संपादक, लेखक, तर्कतीर्थ, महामहोपाध्याय आणि विचारवंत म्हणवणारे प्राध्यापक अनेक वेळा तुम्ही ओशाळे करून जिंकले आहेत. मधूनमधून न्यायीपणाची ऐट मिरवण्याकरता एखादा संपादक जहाल स्फुट लिहितो पण केवळ फोनवर तुम्ही त्याच्या लेखणीचे टोक मोडून तरी टाकता किंवा दौतीतील शाई पातळ तरी करता. मला तुमच्या कर्तृत्वाचे आणि चतुराईचे नेहमीचे कौतुक वाटत आलेले आहे. मी मी म्हणणारे आणि अन्य वेळेला आपल्या पांडित्याच्या वा स्वाभिमानाच्या वल्गना करणारे गावठी केसरी आज तुमच्या दरबारात शेळचा झाले आहेत. यशवंतरावांचे महाराष्ट्रात एक अनन्य-साधारण स्थान आहे. याचा फायदा तुमच्या नेतृत्वाला मिळतो हे तर खरेच, पण तुमचेही काही गुण आहेतच की नाही.

यशवंतरावांचे एक बरे आहे, की ते दिल्लीला काय बोलतात, कसे वागतात, कोणत्या गोटात सामील होतात, कुणाचा अनुनय करतात यावर त्यांची इथली लोकप्रियता अवलंबूनच नाही. वस्तुतः महाराष्ट्राला त्यांचा अनुयायी वर्ग मुख्यत्वे क्षत्रिय मराठा समाज हा अहिंसा मानणारा नाही–मुसलमानांचे लाड चालू देणार नाही–कम्युनिस्टांचा सहप्रवासी नाही. तो ठोशास ठोसा देणारा, धर्मावर अतीव प्रेम करणारा आणि घट्ट राष्ट्रवादी आहे. एकतर राष्ट्रवादी म्हणवणाऱ्या पक्षांना इथल्या बहुजनसमाजाचा अनुनय करणे जमलेले नाही किंवा यशवंतरावांचे दिल्ली-तील चाळे आणि स्वरूप त्यांना समजावून सांगणे जमलेले नाही. तेव्हा त्या समाजा-वर आजतरी एकमुखी राज्य चव्हाणांचेच राहणार असे दिसते. दिल्लीतील राज-कारण गल्लीतील माणसांना कळतही नाही आणि त्यांच्यापर्यंत पोचतही नाही. शिवाय महाराष्ट्रातील वृत्तपत्रे यशवंतरावांनी केव्हाच पचवून टाकलेली आहेत. ती दिल्लीतील राजकारणाचा अर्थ चव्हाणांच्या सोयीनुसार लावतात. आणि म्हणून चव्हाणांच्या कारकीर्दीत भारताची अनेकदा नामुष्की झाली. पण चव्हाणांचे स्थान अजून घट्ट आहे. चव्हाणांच्या कारकीर्दीतच ताश्कंदचा करार झाला आणि आमच्या सह्याद्रीनेच–सैनिकांनी प्राणार्पण करून जे मिळवले ते आपल्या मुत्सद्दीगिरीने गमावले. सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावला असे आपण म्हणतो पण हिमा-लयाच्या गेलेल्या भूमीतली एक तसूभरही जमीन सह्याद्रीला सोडवता आली नाही.

उलट भूतान–सिक्कीम–नेपाळ इथे भारताबद्दल अप्रीती उत्पन्न झालेली आहे. ज्या गृहखात्यावर आमचा सह्याद्री हक्क सांगतो, त्या गृहखात्याच्या पत्रकानुसार या देशात गढूळलेले वातावरण व दंगे मुसलमानच करतात. पण तरीही आमचा सह्याद्री मुसलमानांच्या भारतीयीकरणाला कडाडून विरोध करतो. दिल्लीतले सारे राजकारण आज चव्हाणांचा विचार न करता चालते आहे. पण एकसंध महाराष्ट्र जोपर्यंत चव्हाणांच्या मागे उभा आहे तोपर्यंत सह्याद्री दिल्लीत सुरक्षित आहे आणि सह्याद्री दिल्लीत खडा आहे तोपर्यंत महाराष्ट्र त्याच्याशी इमान सोडणार नाही. म्हणून कसेही करून दिल्लीत असणे हे चव्हाणांच्या लेखी आज राजकारणाचे एकमेव सूत्र वनले आहे. ते कसोशीने ते टिकवीत आहेत.

आता इथले त्यांचे सुभेदार आपआपले सुभे कसोशीने शावूत ठेवीत आहेत. त्या सर्व सुभेदारीत, वाळासाहेव, आपण फार थोर आहात. परवाचा तुमचा षष्टचव्दिसमारंभ दणक्यात झाला. त्यात तुमचेही स्वत:चे गुण कारणीभूत आहेत. भाऊसाहेव खांडेकरांसारख्या भल्या माणसाला तुमची स्तुती करावीशी वाटते यातच मला सर्व पावले. तुमच्यावद्दल फेरविचार करायचा तर पुष्कळ गोष्टींचा फेरविचार करायला हवा. पापपुण्य–लाच–वक्षिशी–वाईवाजी या साऱ्यांचा पूर्वीचा अर्थ आता इतिहासजमा झाला. निष्क्रीय–पराभूत–आणि मूर्ख माणसे नीतिअनीतीचा वागुलवोवा करतात. वहुजनसमाजाचे प्रतिनिधित्व करावयाचे म्हणजे त्याच्या गुणांवरोवर दोपांचेही प्रतिनिधित्व करावयास नको काय ? हा खरा समाजवादी सिद्धांत होय. लोकांच्या लायकीनुसार त्यांना त्यांचे नेते मिळतात या सुप्रसिद्ध वचनाचा अर्थ समजावून घ्यावयास हवा. आणि म्हणून आजच्या जमान्यातील पुष्कळ शव्दांचा अर्थ आपण वदलला पाहिजे. पाप काय किंवा पुण्य काय अगोदर त्यांचा वडेजाव कशासाठी ? आणि करायचाच तर अखेरी त्या केवळ कल्पनाच नसतात काय ! त्यात कालमानानुसार वदल व्हायचेच. स्वातंत्र्यसंपादनानंतर त्याग, सेवा, विनंती, अर्ज, सत्याग्रह, हृदयपरिवर्तन आदी शव्द नाही का आपण मोडीत टाकले. पुन्हा इंद्रियदमन–औदार्य–त्याग वगैरे भानगडीत नाक खुपसायचे ... तर मग स्वातंत्र्य आपण मिळवले तरी कशाला ? पूज्य वाळासाहेव, आज राष्ट्राला गरज आहे ती या शव्दांना नवे रूप देण्याची. नव्या जमान्याला शोभेल असा समाजवादी–प्रगमनशील अर्थ या शव्दांना देण्यासाठी जापण पुढे झाले पाहिजेल आहे.

आता तुम्ही तर दरिद्रीनारायणच आहात. तुमच्या स्वत:च्या खात्यावर एक पैसा नाही असे तुम्हीच परवा जाहीर केलेत. कुठल्याही थिएटरात–हॉटेलात–एजन्सीत तुमची भागीसुद्धा नाही. म्हातारपणी राजकारणातून निवृत्त झाल्यावर मग तुमचे कसे होणार ? जरी तुम्हाला किरकोळ मानधन मिळाले तरी त्यात

तुमचे भागणार कसे ? येणाऱ्या जाणाऱ्याला मदत करावी, त्याचे अश्रू पुसावे ही तुम्हाला लागलेली सवय तुम्हाला म्हातारपणी भारी जड जाणार. आता लोक म्हणतात, तुमच्या मुलांच्या नावे खूप गडगंज संपत्ती आहे. पण त्याला तुम्ही तरी काय करणार ? मुलांनी उद्योग करून पैसा मिळविला तर त्याला अगदी मंत्री असला म्हणून बाप कसा अडवणार. शिवाय बापाचे ऋण फेडण्यासाठी मुलाला हे सारे करणे हे मुळी भागच आहे. लोक खरोखरी नतद्रष्ट आहेत.

काही लोक तर असे डँबीस आहेत की ते म्हणतात की मंत्री लोक पैसे खातात. मी म्हणतो की खातात. पण पैसे खाऊन काम करतात की नाही ? मग यात लबाडी कुठेय ! हा तर शहाजोग व्यवहार झाला. योग्य त्या कष्टांचा मोबदला का मिळू नये ? असा मोबदला घेणे ही खरे तर आजच्या काळाची गरज आहे. नव्यानव्या गरजा उत्पन्न होताहेत. लोकांजवळ खूप पैसा आहे. त्यांची पुष्कळ कामे अडून राहिलेली आहेत. अशा वेळेस कोणताही कार्यतत्पर मंत्री गप्प कसा बरे बसेल ! या हरामखोर पैसेवाल्यांचे–लायसेन्सवाल्यांचे पैसे गरिबापर्यंत पोचवण्याचा हा नवा रस्ता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्याला सापडला आणि आपल्या सामाजिक जीवनात क्रांती झाली. प्रिय बाळासाहेब, लाचलुचपतप्रतिबंधक कायदे सत्वर रद्द करून 'लाचलुचपत' या शब्दाऐवजी 'मेहरबानी' हा शब्द रूढ करून तमाम पुढाऱ्यांचे तुम्ही दुवे घ्यावेत. 'मेहरबानी' खाऊन काम किती दिवसात करावे, दोन्ही पक्षांकडून मेहेरबानी घ्यावी काय, मेहेरबानी घेतलीच तर पक्षाच्या खाती किती हिस्सा जमा करावा, किती स्वतःकडे किंवा स्वतःच्या मुलांच्याकडे ठेवावा यासंबंधी एखादी श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून सर्वांची प्रशंसा साधावी. माधवराव बागलांच्या सूचनेनुसार अंधश्रद्धा–देव–पूजा–अर्चा यांचा नायनाट करण्यासाठी उरलेले आयुष्य घालवण्याच्या फंदात न पडता तुम्ही गंजलेल्या शब्दांना नवे अर्थ देऊन समाजवादाची वाटचाल सोपी करावी ही नम्र विनंती आहे.

जाता जाता कल्पना सुचली म्हणून लिहितो. कोणत्याही पुरुषाला–कर्तबगार पुरुषाला बदनाम करण्यासाठी लोक नाना तऱ्हेच्या बावड्या उडवतात 'दारू आणि बाई' या दोन गोष्टी अशा आहेत की कोणीही उठावे आणि एखाद्याला बदनाम करावे. मी म्हणतो, खरे तर ही उठाठेव हवी कशाला लोकांना. ही मर्द पुरुष–सिंहांची कामे. दारू पिऊन रस्त्यावर लोळत नाही आणि जोपर्यंत ती बाई बोंब मारून उठत नाही तोपर्यंत या लोकांना ओरडण्याचे कारणच काय म्हणतो मी. कुणाला एक भाकरी तर कुणाला चार भाकरी लागतात. हा केवळ गरजेचा प्रश्न आहे. पण लोकांनी चारित्र्याचा मधुघट यातच बुडवून ठेवला आहे. तुमच्यावाबतीत या दोन्ही गोष्टींचा संबंध नाही म्हणा. पण मला हे समजत नाही की आता या कल्पनेत नको का बदल करायला. एखाद्या नटीला चित्रपटाचा कर माफ करून

हवा असतो, कुणाला हीसिंग बोर्डात ब्लॉक हवा असतो, तेव्हा अशा कोणी अडलेल्या बाया काही मागायला आल्या तर मी म्हणतो, लोकांचा यात संबंध काय ? शिवाय चार घटकाची सोबत जन्मभर थोडीच सांभाळायची असते ? बात केवढी क्षुल्लक अन् लोक मात्र त्याचा गाजावाजा फार करतात. खरे सांगू, मोठ्यांच्या व्यथा या लोकाना कळायच्या कशा? याबाबतीत बाळासाहेब आपण लक्ष घालावे व बदललेल्या समाजाच्या नव्या भुका जाग्या होत आहेत त्या पुऱ्या करणे हे कोणाचे काम आहे ते लोकांना समजावून द्यावे. मला वाटते, स्त्री–पुरुष संबंधाबाबत एवढा गहजब लोकानी का करावा ? मंत्री हा का माणूस नसतो, पुढारी हा का पुरुष नसतो.

बाळासाहेब, आपल्या वयाला साठ वर्षे झाली याबद्दल अभिनंदन. लोकादर, लोकप्रियता यात तुम्ही अग्रेसर आहात याबद्दल अभिनंदन. कोणाचेही–कोणतेही काम तुमच्याकडून होऊ शकते याबद्दल अभिनंदन. लोकांच्या सर्व गुणदोषांसकट तुम्ही त्यांचे खरेखुरे कनवाळू प्रतिनिधी आहात याबद्दल अभिनंदन. बहुजन समाजाच्या दृष्टीने एक बलदंड पुरुष, विचारवंताच्या दृष्टीने यथार्थ लोकप्रतिनिधी आणि सर्वच जनतेच्या दृष्टीने गुणावगुणाचे एक सामूहिक प्रतीक असे तुमचे व्यक्तिमत्व माझ्यासमोर उभे आहे. तुमच्यावाचून या महाराष्ट्र देशाला शोभा नाही. नव्या काळाची नवी गरज ओळखून समाजजीवन जगणारा, सेवाभावी, जागरूक, दरिद्री-नारायण असा एक पुढारी म्हणून मी तुमच्यापुढे नम्र आहे.

आपला,
ग. वा. बेहेरे

दिनांक २२ मार्च १९७०

● ● ●

मी मराठी भाषेचा छिन्नविच्छिन्न शिवाजी !

प्रिय पुणेकर,

माझं नाव विष्णु कृष्ण चिपळूणकर. लोक मला आता चांगलेच विसरलेले आहेत. माझ्या प्रेरणेने निघालेल्या न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा, किताबखाना, केसरी आदि सर्व संस्थासुद्धा मला विसरलेल्या दिसतात. माझी त्याबद्दल मुळीच तक्रार नाही. विसरू देत बिचारे मला. काही वेडे

लोक मला मराठी भाषेचा शिवाजी म्हणत असत. शिवाजीची चलती आहे आणि मला मात्र फार वाईट दिवस आले आहेत.

एक काळ असा होता की हा महाराष्ट्र झोपला होता. इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावला नंगा करून गंगाकिनारी पाठवला आणि इकडच्या भटाब्राह्मणांना सरकारी नोकरीला जुंपले. गरीब विचारी अडाणी जनता आपला क्षत्रियधर्म विसरून कृषिकर्मात मग्न झाली. आपल्या सेवेसाठी देऊ केलेल्या इंग्रजी भाषेच्या शिक्षणाने भटाब्राह्मणापैकी पुष्कळांचे डोळे उघडले. इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान आहे अशी समजूत करून घेणारे गोखले, रानडे, गांधी हे जसे या वाघिणीच्या दुधातूनच जन्माला आले तसेच स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे सांगणारे नरसिंह टिळक किंवा सावरकरही निर्माण झाले. इंग्रजी भाषेने साऱ्याच सुशिक्षित समाजाची क्षितिजे मोठी केली.

मी असा एक भाग्यवान की ज्याचे डोळे प्रथम उघडले. इंग्रज हे आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत ते देशभक्तीत, सामाजिक चारित्र्यात आणि विज्ञानात हे मी ओळखले. आणि म्हणूनच आपल्या राष्ट्राची अस्मिता जागी करायला हवी असे ठरवून मी तो उद्योग केला. तसा मी एकाकीच होतो. लोकहितवादींच्यावर मी कडकडून लिहिले, याच अर्थ त्यांचे म्हणणे मला सर्वथा अमान्य होते असे नाही. लोकहितवादी हे एकजात इंग्रजांशी फितुर होते किंवा देशद्रोही होते असे तर मुळीच नाही. फक्त आपल्या पराभवाच्या कामी आपल्या उणीवा सांगून मनोभंग करण्यापेक्षा चेतनेचा मार्ग हा यथायोग्य आहे अशी माझी धारण होती. आपल्या साहित्यिकांची, संस्कृतीची, धर्माची थोरवी सांगण्यासाठी मी ताठ मानेने उभा राहिलो. परकीय आक्रमणाविरुद्ध शिवाजी एकाकी उभा राहिला–तसाच मीही परकीय वैचारिक आक्रमणाविरुद्ध उभा राहिलो–एकाकी. आणि मराठी माणसाला हिंपुटी करणारी ही वैचारिक झापडे मी मोडूनताडून टाकली. मराठी भाषा मराठी तलवारीसारखी धारदार आहे. शिवाजीप्रमाणेच देवी भवानी मलाही प्रसन्न होती. मी मराठी भाषेच्या वाराने सारे गारदी मारून टाकले. आणि स्वाभिमानाची ज्योत उंच केली.

आणि माझ्या प्रेरणेने अन् माझ्या लेखनातून स्फूर्ती घेऊन टिळक-आगरकर यांसारखी ज्वलंत ज्योत पेटून उठली. या मराठी देशांतल्या सर्व सामाजिक व राजकीय गोष्टींचे पुनरुत्थान झाले ते माझ्या निर्बंधमालेने. पुढची अनेक वर्षे सारी देशभक्त मंडळी धाव घेत ती माझ्या निबंधमालेकडे. मलासुद्धा वाटे, हे निद्रिस्त राष्ट्र जागे व्हायला हवे आणि अवघ्या पाचपंचवीस वर्षांत बघता बघता हा सारा महाराष्ट्र देश खडबडून जागा झाला. भारतातला हाच भाग सर्वांत आधी पेटला.

इथेच अनेक स्वातंत्र्ययुद्धे घडली. येथेच वासुदेव बळवंत निघाला. क्रांतिकारकांचा हा देश इंग्रजांचा कट्टा वैरी बनला.

आज आपला देश स्वतंत्र झाला आहे. तेथे स्वराज्य आहे–तेथे बहुजन समाजाचे राज्य आहे, हे पाहून माझा अंतरात्मा संतुष्ट आहे. स्वराज्य हे सुराज्य असतेच असे नाही. पण स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही हेही खरे. त्यामुळे साऱ्या उणिवांसकट मी विष्णु कृष्ण चिपळूणकर स्वराज्य संपादनाच्या युद्धातला एक विनीचा सैनिक म्हणून नवस्वातंत्र्याचे स्वागत करतो. नवनेतृत्वाचे स्वागत करतो. हे अपरिहार्य आहे हे आम्ही तेव्हाच ओळखले होते. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल काढण्यात आलें. त्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या प्रेरणेतून महाराष्ट्रात शिक्षणाचे वारे शिरले. शिक्षणाने समतेचा प्रसार केला. शिक्षणाने समाजातले सर्व स्तर हलवून सोडले. लोकांचे राज्य येणार तेव्हा लोकनेत्यात बदल अपरिहार्य होते. उघड्या डोळ्यांनी तरीही आम्ही समतेचा, लोकशाहीचा, शिक्षणाचा प्रसार केला. आम्हाला घडले त्याबद्दल मुळीच खंत नाही. उलटपक्षी अज्ञ बहुजन समाजाला जागते करावयाला आम्हाला विलंब लागला याबद्दल आम्ही हिंपुटी आहोत.

पण बहुजनसमाज मात्र आम्हाला विसरला. एक शिवाजी आणि त्यानंतर महात्मा फुले. जणू मधे या देशात काही घडलेच नाही. अटकेवर पुणेकर गेले ते खोटेच. दिल्ली पुण्याने जिंकली ती खोटीच. वंगालवर भोसले चालून गेले ते तरी खरे की नाही ? मराठी राज्य भारतभर गर्जत होते. खूप खूप इतिहास मध्ये घडला. जसे शूर तसेच भेकड पेशवे राज्य करून गेले.

आणि त्या निद्रिस्त समाजाला जागे करणारी माझ्यासारखी माणसे तर कोठे अडगळीत पडली देव जाणे. इतिहास असा लपवून काय होणार ? तुम्ही पुढे मोठा इतिहास घडवलात त्याने मी भारून गेलो आहे. पण त्या सर्व मंदिराच्या पायात माझाही एक चिरा आहे. तो विसरण्याचे तुम्हाला कारण नाही.

महात्मा गांधींच्या हस्ते माझा एक छोटा, न दिसेल एवढा पुतळा पुण्यात–माझ्या कर्मभूमीत–पुण्याच्या भाजी मंडईत बसवला होता. कोणी तिकडे पहातही नव्हते. माझ्या जन्ममृत्यूचा दिवसही कोणाच्या ध्यानी नसतो. मी स्थापन केलेल्या संस्थासुद्धा मला विसरल्या. मग इतरेजनांचे काय ? बहुजनसमाजाचे तर सोडूनच द्या. मी खाली मान घालून पुण्यातले बहकलेले नेतृत्व रोज पहात होतो–कोणत्या देशासाठी आम्ही पेटून उठलो–कसल्या स्वराज्यासाठी आमच्यांपैकी काहीही देहदंड भोगले याचा विचार करीत.

एक दिवस माझे ते अस्तित्वही काहींना नकोसे झाले. माझ्या त्या पुतळ्याची शकले उडाली. मी कोण हेच कुणाला माहीत नाही. तेव्हा माझ्याबद्दल दुःखही

व्यक्त करायचे कारण नाही. नवे पुतळे उभे करण्यासाठी जुन्यांनी जागा खाली करावी असा तर माझा पुतळा फोडणाऱ्याचा हेतू नसेल.

पुतळा फुटू दे. माझा फुटतो तसा तो दुसऱ्याचाही फुटू शकतो. तसे हे काम सोपे आहे. पण अशा तऱ्हेने काय होणार. इतिहास पुसण्याचा हा मार्ग तसा धोकादायकच आहे. आज असा इतिहास लिहिला गेला. उद्या दुसरा लिहिला जाईल. हे माझा पुतळा फोडणाऱ्याच्या लक्षात आले नसावे.

यशवंतरावजी आता काका गाडगीळ व शंकरराव मोरे आदी नव्या देशभक्तांचे पुतळे उभारण्यासाठी पुण्यास धाव घेऊन येत आहेत.

फार छान–
आमचे जुने चौथरे आता रिकामे आहेत.
त्यांचीही सोय होईल.
आणि
आम्हालाही मुक्ती मिळेल.
जय महाराष्ट्र.

दिनांक ४ मे १९६९

• • •

-प्रिय फेररबाबा

प्रिय फेररबाबा, आलात. फार बरे केलेत. आम्ही वाट पहातच होतो. तुम्ही इथून गेलात तेव्हापासून आमचा डोळ्याला डोळा लागत नव्हता. फार वाईट वाटले. अनादिकाळापासून चालत आलेल्या आमच्या औदार्याला बट्टा लागण्याचा प्रसंग आला. मग आम्हाला खंत का वाटू नये ? आमच्या देशातल्या दीनदुबळ्यांची सेवा करण्यासाठी, त्यांना खरा धर्म शिकविण्यासाठी त्याना जेहन्नतचा रस्ता दाखवण्यासाठी आजवर तुमच्यासारखे अनेकजण आले. आम्ही त्यांचा स्वीकार केला. त्यांना घरे दिली, पैसा दिला, भूमी दिली. इतकेच कशाला बायकासुद्धा दिल्या. सातासमुद्रापलीकडून केवळ इथल्या लोकांची सोय पहाण्यासाठी इथवर आलेल्या पाहुण्याना आम्ही अगत्याने वागवले. त्यांनी कधीकाळी आडदांडपणा केला तरी आम्ही यज-

मानाचा धर्म विसरलो नाही. त्यांनी आमच्या घराची नासधूस केली तरी आम्ही तसा विचारसुद्धा केला नाही. त्यांनी आमची मंदिरे पाडली अन् तेथे आपल्या देव-दैवतांची मंदिरे उभारली म्हणून आम्हाला मुळीच राग आला नाही. राग येण्या-जोगे आहेच काय त्यात ! देव का राऊळातच असतो. तो सर्वत्र असतो. तो मशिदीत असतो, तो चर्चमध्ये असतो, तो नदीत असतो, विहिरीत असतो. मग आलेल्या पाहुण्याने आमचा देव नदीत किंवा विहिरीत टाकला तर त्यात डोके विघडवून घेण्यासारखे काय आहे. आमची देवकल्पना एवढी विशाल आहे की आम्ही अतिथीलाच मुळी देवस्वरूप पाहिले. त्यालाच आम्ही आपल्या सिंहासनावर बसवले. देवाची सेवा करावी तशी त्याची केली. त्याचे जोडे पुसले–हुजरेगिरी केली. स्वहस्ताने आपल्या कन्या त्याना दिल्या...जेवढे म्हणून करावयाचे ते सर्व केले. आमचा तो धर्मच नव्हता काय ? यजमानाने पाहुण्याला सर्वार्थाने तृप्त करावे अशा परंपरेत आमचे हे वर्तन बसत नव्हते काय ?

इतर पाहुणे आणि आमच्या परमपवित्र भारतभूमीतील पाहुणे यात पुष्कळ फरक होता. एकतर येथले पाहुणे हे विचारे बुभुक्षित प्रदेशातून आलेले होते. त्यांना नव्हती घरे. त्यांना नव्हती वस्त्रे–त्यांना बायकासुद्धा नव्हत्या. अशा वेळेला आमचे कर्तव्य काय होते ? येथे आलेल्या पाहुण्याना आम्ही पुरेशी वस्त्रे व पुरेशी घरे दिलीच पण पुरेशा बायकाही दिल्या. उगाच त्यांना वावगे वाटायला नको म्हणून आम्ही त्यांच्या भाईबंदांसाठी सुद्धा पुष्कळ बायका दिल्या. त्या येथून अर-वस्तान, इराण, इराक येथल्या रखरखीत प्रदेशात गेल्या आणि तेथेही आपले परमेश्वरप्रणीत वंशवृद्धीचे कार्य त्यांनी चालू ठेवले. पाहुण्याना आम्ही येवढे प्रसन्न केले की त्या पाहुण्याना ही भूमी मुळी स्वत:चे घरच वाटली.

आता यात तरी वावगे काय आहे हे समजत नाही. हजारो कोसावरून त्रास-दायक प्रवास करून येथपावेतो यावे, आणि ही परकीय भूमी आपली मानून येथेच आपले घर करावे असे त्यांना वाटावे हा तर आमच्या आदरातिथ्याचा उच्चतर परिपाकच नव्हे काय ! त्यानीही 'दिल्' मोठे केले आणि आमच्यासारख्या दरिद्री नापीक देशात राहवयाचे कबूल केले. अहो, आम्हाला नव्हती संस्कृती, तीही त्यांनी दिली. आम्हाला नव्हत्या कला, त्या या वाळवंटी प्रदेशातल्या परकीयांनी दिल्या. आदिवासी कालखंडातून आम्हाला वघता वघता त्यांनी आधुनिक काल-खंडात आणून सोडले. नागडया उघडया हिंदूंना त्यांनी वस्त्रे नेसवली. गृहहीन हिंदूंना त्यानी स्थापत्य शिकवले, राज्य करावयास शिकवले. त्यांनी म्हणूनच हे केले वरे काय !

त्यांच्या मागोमाग आणखी पाहुणे आले. हेतू अर्थात उदात्तच होता.

आकाशातील बापाची कृपा या भूमीवरच्या पोरांना देण्यावाचून याही पाहु-

ण्यांना दुसरे काही नको होते. यांच्या हातात तलवार नव्हती. अन् ते तसे भुकेले नव्हते. यांची भूक केवळ अन्नाची नव्हती. यांच्या हातात तराज़ू होता. यांनी किती तरी सुंदर सुंदर वस्तू व किमती चिजा आणून आपल्याला त्यांचा परिचय करून दिला. इथल्या चोराचिलटापासून रक्षण करण्यासाठी शस्त्रे दिली. उत्तम तऱ्हेने नोकरी करता यावी यासाठी यावनी भाषा शिकवली. खरे तर यांनी जे जे केले ते कोणीही कधीच करते ना. इस्पितळे काय, शाळा काय, सेवासंघ काय...आपल्या देशातून पैसा आणून इथल्या दीनदुबळ्यांची सेवा करण्यासाठी आलेल्या असंख्य प्रेषितांची रांग पाहून आम्हाला तर सद्गदित व्हायला होते आहे. काय ही सेवा-वृत्ती ! कसले तुमचे तुकाराम-ज्ञानेश्वर घेऊन बसलात. या संताच्या ते पासंगाला तरी लागतील काय ! येशूचे हे सेवक इथल्या लोकांना इतकी मदत करीत की ती सेवा पाहून आकाशातील बाप इथल्या पोरांवर अनुग्रह करी. या देशात आकाशा-तीला बापाने आणि परमेश्वराच्या प्रेषिताने कृपा केलेल्यांची संख्या गणितश्रेणीने वाढते आहे. आणि त्यात वावगे काय आहे. येशू काय किंवा महंमद काय, हेही परमेश्वराचेच अंश नाहीत का ! हे तरी काय व्यभिचार करा, खोटं बोला, मारा-मारी करा असे थोडेच म्हणतात. मग त्यांचे सांगणे आपण ऐकले तर वावगे हो काय ? देव सारे सारखेच. चर्चमधला देव आणि देवळातला देव यात जर फरक नाही तर मग देवळे ठेवण्याचा हट्ट कशाला ? पाहुणे म्हणतात तर देवळे पाडून चर्च किंवा मशीदी का उभ्या करू नये. पाहुण्याचे मागणे वढेच, मग त्यासाठी आपण तरी आपला धर्म का न सोडावा. 'जनू' म्हणले काय किंवा जेन म्हणले काय, असा काय फरक पडतो बरे ! 'बॉब' म्हणले काय, अन् बाबू म्हटले काय ! नावात आहेच काय एवढे. एवढ्या तेवढ्या क्षुद्र गोष्टीत तेढे वाद करून भांडणे करणाऱ्याचे निःसंतान होवो. दोन वेळ भरपूर जेवायला देणारा देव खरा. मग आपला हा दगडी देव जर भरपूर जेवावयास देत नाही–विहिरीला कर्ज देत नाही –पिकासाठी बेणे देत नाही तर मग हा देव काय कामाचा ! त्यापेक्षा आमचा फेररबाबाचा देव केवढा ताकदवान. तो सारे देतो. शेत देतो, घर देतो, विहीर देतो, बी देतो–मग त्या देवाची पूजा आपण का न करावी ?

आणि म्हणून फेररबाबा, तुम्ही आलात हे फार बरे केलेत. फेररबाबा, आम्ही डोळ्यात प्राण आणून तुमची वाट पहात होतो. आमची शेते ओसाड पडायची वेळ आली होती. आम्हाला पैसे कोण देणार बरे. तुम्ही आलात ते ऐकून फार बरे वाटले. तुम्ही आमचे मायबाप. तुम्ही आमचे धर्मगुरु. तुम्ही आमचा वेद. आयुष्य जगण्यासाठी मठ्ठ कल्पनांचा काय उपयोग ? त्याला रोकड लागते. रोकडचा विठोबा-पेक्षा रोकडा फेररबाबा अधिक फलदायी. फेररबाबा, तुम्ही आलात आणि आम्हाला सनाथ केलेत. काय म्हणता, आम्ही तुमच्या सद्धर्माचा अवलंब करावा ! करू की.

आठ कोटी लोकांना अल्लाने पावन केले. आणखी आठ कोटी लोकांना येशू पावन करेल. एवढ्या प्रचंड लोकसंख्येत आठ दहा कोट म्हणजे किस् झाडकी पत्ती. तुम्ही म्हणता तर आम्ही येऊ चर्चमध्ये.

पण त्या वसंता नाईकाने सारी घाण केली पहा. त्याने म्हणे तुम्हाला मुंबई राज्यात यायची बंदी घातली. त्याला खरे म्हणजे तुम्ही या देशात यायलाच नको होतात. पण तुम्ही इंदिराकाकूंचा वशीला लावून कशी जिरवलीत. म्हणे फेरर हेर आहे. या देशातली अशी कोणती गुप्त गोष्ट आहे की जी अमेरिका–रशियाला माहीत नाही. अहो, आमच्या यशवंतरावाचें एकूण लंगोट किती हे सुद्धा कोसिजिनला माहीत आहे. आता हेरगिरी कशाची करायची ? हायड्रोड पिकाचा आकडा कळवायचा का उपमंत्र्याची यादी कळवायची ? फेररसारखा थोर पुरुषही आकडेवारी करायच्या भिकार कामावर नेमला कसा जाईल. त्यासाठी एम्. आर. ए. आहे, मैत्रीसंघ आहेत, कल्चरल फ्रीडम असोसिएशन आहे, अमेरिकन दूतावास आहे. देवाचे काम करणारा ही भुक्कड कामे का करील ! येशूच्या पवित्र संदेशाचा प्रसार करावयासाठी द्रव्यबद्ध झालेला फेररबाबा असली कामे अलीकडे करत नाही हे त्या नाईकाला कोणीतरी जाऊन सांगायला हवे.

एका राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या शब्दाची मध्यवर्ती सरकारकडून खाशी जिरवलीत बाबाजी तुम्ही. नाही मुंबई प्रांत तर नाही. सारा हिंदुस्थान खुला आहे. तुमचाच आहे. तुमचा नसला तरी तुमचाच होणार आहे. आणि आंध्र तसा दूर नाही. एका रात्रीचा रस्ता. तेथूनही मनमाडचे राज्य चालवता येईल. तुम्ही अगदी चिंता करू नका. आंध्रमधे तुमचे तंबू रोवा.

सारा भारत तुमच्याकडे अपेक्षेने पहातो आहे. फेररबाबा, तुम्ही आलात. आता आम्हाला चिंता नाही. अनेक बाजूनी आपण तणावे दिले आहेतच. येशूच्या संदेशाचा प्रसार हा–हा म्हणता होईल, नाईकांचे गृहखाते तुमचे काही वाकडे करू शकणार नाही.

फेररबाबा, अखेरी तुम्ही आलात. फार फार बरे वाटले. तुमची रजा संपण्यापूर्वी तुम्ही आलात. आम्ही तुमचे फार आभारी आहोत. आम्हाला दम धरवत नाही. तुमचा पवित्र स्पर्श आम्हाला द्या. देश मोठा आहे. पण तुमचे मनही फार मोठे आहे. केरळ पवित्र झालाच आहे. आसाम तर गर्जू लागलाय. गोव्यात सुगंध सुटलेला आहे. गुजरात–महाराष्ट्रात तुम्ही रोपे लावलीच आहेत. सारा देश तुमच्या पवित्र संदेशाने भारून चालला आहे.

फेरर ही भूमी पवित्र व्हायला आता थोडे दिवस उरलेत नाही का !

दिनांक २४ नोव्हेंबर १९६८

● ● ●

'गड सासवडा'ची एक स्फूर्तिदायक गोष्ट

माननीय, प्रिय शंकररावजी उरसळ,
स. न. वि. वि.

गेल्या काही दिवसात अनेक वृत्तपत्रातून तुमच्याबाबत मजकर येत आहे. तुम्ही म्हणे दारू पिऊन सासवड येथील एका करपे नामक शिक्षिकेला मध्यरात्री पंचायत कचेरीत घेऊन गेलात आणि तेथे अनैतिक व्यवहार केलेत. शी: ! शी: ! मला तुमच्यासारख्या सत्पुरुषाबद्दल अशा तऱ्हेचे प्रवाद उठवणाऱ्या वृत्तपत्रांबाबत केवढा संताप आलेला आहे म्हणून सांगू ? पण काय करणार ! नव्या ग्रामीण नेतृत्वाबद्दल आकस असणाऱ्या ह्या बुद्धिवादी, भटाळलेल्या वृत्तपत्रकारांना हल्ली काही उद्योगच राहिलेला नाही. 'भटाळलेला' हा शब्द मी मुद्दामच वापरलेला लक्षात यावा. कारण आपल्याआड येणाऱ्या सर्वांना जातीय-ब्राह्मणी-गोडसे सांप्रदायी म्हणले की काम भागते हा आपल्याला नित्याचा अनुभव आहे. तेव्हा या सर्व वृत्तपत्रकारांच्या सडक्या मेंदूतून असले गलिच्छ आरोप बाहेर पडले त्याचे मुख्य कारण विद्याधर गोखले, गोविंद तळवळकर, पु. रा. बेहेरे, श्री. खाडिलकर, (आणि कै. आचार्य अत्रे) हे मुंबईचे आणि जयंतराव टिळक, ना. भि. परुळेकर, श्री. भिशीकर हे पुण्याचे असे सारे संपादक हे ब्राह्मण आहेत. आणि आपल्याला बदनाम करून पेशवाई निर्माण करण्याचा यांचा मनसुबा आहे, अशी मला जबरदस्त शंका येते.

या सर्व वृत्तपत्रांतून तुमच्या तथाकथित व कपोलकल्पित (चेष्टेने कुणी कपोललज्जित म्हणतात) अशा कहाणीचा जो वेगाने प्रसार झाला त्याबद्दल आता केवळ जातीय, गोडसेवादी वगैरे म्हणून भागणार नाही. काहीतरी केले हे पाहिजेच. हा प्रचार थांबवण्यासाठी तुम्ही काय काय केलेत ?

मला माहीत आहे, अशा कोल्हेकुईने तुमचे स्वकर्तृत्वावर निर्माण केलेले स्थान मुळीच धोक्यात येणार नाही. उलटपक्षी ते हलवून बळकट केलेल्या खुंटाप्रमाणे (!) मजबूतच होईल. असा आपल्या आयुष्यातला हा काय पहिलाच प्रसंग आहे की काय ? म्हणजे अशा प्रसंगातून तुम्ही पुष्कळवेळा तावून सुलाखून निघालेले आहात. पण वृत्तपत्रातून बोंबाबोंब अशी ही प्रथमच झाली. पण आपण मुळीच

चिंता करू नये. आपण काहीही केलेत तरी आपल्याला प्रेमाने पोटाशी घेणारे आपले मायबाप इथल्या आणि प्रांतिक काँग्रेस कचेरीत पुष्कळ आहेत. या नागरी, बुद्धिवादी समाजाचा आणि आपल्यासारख्या बहुजनसमाजाच्या पुढाऱ्याचा तसा म्हणला तर संबंध तरी काय आहे ? त्यांची मते निवडणुकीत आपल्याला काही मिळायची नाहीत. मग आपण त्यांची पर्वा तरी कशाला करायची ?

ते एक तर राहोच. पण असे खरोखरी तुम्ही केलेत तरी काय ? आता दारू पिणे हा एक येवढा मोठा गुन्हा थोडाच आहे. दारूबंदीचे धोरणही सरकारने शिथिल केले आहे. यापूर्वी हातभट्टीचा धंदा करणारे काँग्रेसवाले आता गुत्यांचे परवाने काढून राजरोज धंदा करू लागले आहेत. म्हणजे दारूबद्दल येवढा गवगवा करावा अशी परिस्थितीच राहिलेली नाही. पुष्कळ मंत्री, सभापती, काँग्रेस वृत्त-पत्रांचे संपादक सुखेनैव मद्यपान करू लागले आहेत. ती काळाची गरज आहे. देशात जी दारू होते ती 'स्वदेशी मालाचा' प्रसार या धोरणासाठी आपणच नको काय बरे संपवायला. नचपेक्षा येथे उद्योगाची वाढ तरी व्हावी कशी ? सहकारी कारखान्यांना दारूकारखाने काढण्याची परवानगीही देण्यामागे हाच उद्देश आहे. पुढेमागे तेथे साखर न काढता केवळ दारूच काढता यावी, अशीही सोय नव्या यंत्रसामुग्रीच्या खरेदीच्या वेळी ध्यानात घ्यावी अशा सूचना सहकार खात्याने दिल्या आहेत.

दारू ही आता तशी एक राष्ट्राची व आपल्या सर्वांची गरजच आहे. बरे दारू घेतली की आपोआपच अनेक इंद्रिये उत्तेजित होतात. आपला त्याला काहीच इलाज नसतो आणि इंद्रियांची भूक अपुरी तरी का ठेवावी ! एकतर आपण बापूजी किंवा विनोबा नाही, आणि शिवाय तशी संयमाची आवश्यकता तरी काय म्हणतो मी. का मन मारायचे ? दारू तरी त्या देवानेच निर्माण केली आहे ना ? मग तिला तरी का वगळायचे. अर्थात दारू घ्यायची म्हणजे बरोबर अन्य सोयही हवीच की ! पुन्हा त्यावेळी तुम्ही पुण्यात नव्हता. म्हणजे एरवी जी गोष्ट पुण्यात मुळीच अवघड नाही, ती तुम्ही सासवडला असल्यामुळे किती अडचणीची होऊन बसली पहा. अशा अवस्थेत ती सोय करण्यासाठी तुम्हाला स्वतः करपेवाईच्या घरी जावे लागावे, हे किती अन्यायाचे आहे, ही गोष्ट हे वृत्तपत्रकार लक्षात घेत नाहीत. तरी पण तुम्ही मन मोठे केलेत. आला प्रसंग निभावून नेण्यासाठी स्वतः तेथे गेलात. मग बाईही आल्या, व्हायचे ते होऊन गेले. खरे म्हणजे या टीकाकारांचे यात असे काय वाकडे झाले. क्षुद्र मत्सरी लेकाचे. तसा यांपैकी कोणी पत्रकार तुमच्याकडे येता तर तुम्ही त्यालाही संतुष्ट केले नसते का ? पण नाही. स्वतः बेचव आयुष्य जगायचे आणि तुमच्यासारख्या रसिक माणसाचे पाय ओढायचे. तुम्ही काय डरता की काय ? मुळीच नाही. आता तथाकथित करपेवाई आणि तुम्ही यांचा हा खाजगी

व्यवहार. तोही खुषीचा. वरे ही करपेवाई काय मोठी सती सावित्री होती की काय ? वाई तर चालूच होती म्हणतात. आणि नसली चालू, तर चालू केली म्हणून कोठे विघडले. कोणीतरी चालू केलीच पाहिजे की नाही. तुम्ही हे काम केले नसतेत, तर दुसऱ्या कोणीतरी हे केलेच असते. मग मी म्हणतो पुढाकार घेऊन तुम्हीच केलेत हेच ठीक झाले. अबलांचा उद्धार करणे, उन्नतीचा मार्ग दाखवणे व व्यवसायास लावणे हे तर पुढाऱ्यांचे काम आहे. आणि म्हणून क्षुद्र टीकाकारांनी तुमच्या पवित्र कार्यांची अवहेलना केली असली, तरी तुम्ही कामात मुळीच हयगय करू नये. सासवडनंतर खेड, मंचर, नारायणगांव, घोडेगाव अशा अनेक गावात कितीतरी शिक्षिका विचाऱ्या झुरत असतील. तुमच्या वाटेकडे डोळे लावून वाट वघत असतील. तुम्ही तिथे जाऊन त्यांचे 'सासवड' करावेत अशी त्यांची इच्छाही असेल. मला वाटते जनतासंपर्क साधण्याची तुमची हातोटी आणि इच्छा जगजाहीर असल्यामुळे प्रश्न आहे तो सवड मिळण्याचा.

प्रिय शंकररावजी, माझ्या लेखी आपले परवाचे धीरोदात्त वर्तन कौतुकास्पद आहे. सर्वांनी एवढी कोल्हेकुई केली पण तुम्ही गडवडला नाहीत. उलट करपेवाईचे पत्र तुम्ही हजर करून आपण सासवडला गेलोच नव्हतो, गेलो असलो तर करपेबाईकडे गेलो नव्हतो आणि गेलो असलो तर दारू पिऊन गेलो नव्हतो आणि दारू प्यालोच असलो तर पुढे काय घडले त्याबद्दल जबाबदार नव्हतो, अशा स्वरूपाचे एक गोंधळात टाकणारे पत्र प्रसिद्ध करून भल्याभल्यांची फजीती केलीत. आता करपेवाई तर म्हणतात की त्या रमणीय रात्री त्या मुळी घरावाहेरच पडल्या नाहीत, मग या आरोपाना अर्थ काय ? वरे इतक्या पतिव्रता, सत्यवचनी आणि शुभलक्षणी वाईच्या शब्दावर विश्वास तरी का न ठेवावा ?

या वृत्तपत्रकारांची एक नेहमीची युक्ती आहे. गांधी–विनोबा यांची साधी रहाणी, चारित्र्य वगैरेंचा सारखा उल्लेख करून ते आपल्यासारख्या थोर पुरुषावर अकारण अन्याय करतात. कोण हो हे गांधी, आणि विनोबा ? आणि नेमका यांचा व्यवसाय काय ? तुमच्यासारख्या माणसावरोवर उल्लेख करावा असे हे पुरुष आम्हाला माहीत नसावेत म्हणजे आश्चर्य आहे. गांधींचे ठीक आहे. ते खजूर खायचे. गाईचे दूध प्यायचे आणि त्याचा सारा खर्च अनुयायी चालवायचे. आणि त्यांचे साधेपणसुद्धा सर्व मौजमजा करून झाल्यावरच आलेले. आणि येवढे सारे करून त्यांचे अखेर काय वरे झाले ! तेव्हा त्यांच्या नावाची भीती घालून तुम्हाला अडवणाऱ्यांना महात्माजींच्या तत्त्वज्ञानाचा अर्थच कळला नाही. गांधींचे पुष्कळ अनुयायी मद्यपी होते. मांसाहारी तर बहुतेक होते पण तरी त्यांची अहिंसा त्यांना मान्य होती. तुम्ही जे आयुष्य जगता तसे जगून गांधींचे साधेपण आणि संयम मान्य करायला आपलं तरी काय जातंय. एक बरे आहे. गांधीयुगानंतर

चारित्र्य, नीती, संयम हे अनुयायांसाठी असतात हे नक्की ठरले आहे हे बरे झाले.

म्हणून म्हणतो शंकररावजी, तुम्ही या वृत्तपत्रांकडे दुर्लक्ष करावे. नवा विषय मिळाला की ही कुत्री तिकडे भुंकू लागतील आणि आपोआपच 'गड सासवडाकडे' दुर्लक्ष होईल. त्यामुळे तुमचे चालू आहे तसेच चालू राहील.

आता येवढेच सांगा, पुढच्या खेपेला तुमचा मुक्काम कुठंय. तुमच्याबरोबर आम्ही येऊ म्हणतो. थोडा बंदोबस्त जास्त करा म्हणजे झाले. ते तुम्हाला मुळीच कठीण नाही. पण लवकर बेत होऊ द्या. स्वातंत्र्यदिन आपण जरा निराळ्याच तऱ्हेने साजरा करू या.

तुमचा,
गोमा गणेश

दिनांक ६ जुलै १९६९

● ● ●

- अमेरिकन गव्हाची गलबते फोडून टाका
- हे सिंधुसरिते, मला तुझी आठवण येते
- चिमणे, रडू नकोस-डोळे पूस
- अरे, आमचे कौतुक करा-हार आणा
- भारत विकाऊ आहे.
- छत्रपती शिवाजीचा रजेचा अर्ज
- एक समजूतदार निर्णय
- सत्य अहिंसेच्या प्रयोगाचा जय असो
- रामराज्याची पहाट आता फार दूर नाही
- केसरीचा झुलणारा हत्ती झाला
- अजून गिधाडे का घुटमळू लागली नाहीत ?

अमेरिकन गव्हाची गलबते फोडून टाका

काही चौकशी करण्याकरता मी परवा 'माणूस' कचेरीत गेलो. गेलो म्हणण्यात काही अर्थ नाही. जाणार होतो. कारण मी तेथपर्यंत मुळी पोहोचूच शकलो नाही. कारण सर्व वाजूचे रस्ते वंद होते. बंद अशासाठी होते की त्या रस्त्यावर जिकडे-तिकडे टेरिलीनचे कपडे, मिल्क पावडरचे डबे, सौंदर्यप्रसाधनाची साधने, संतति-प्रतिबंधक साधने, गहू, मिलो, अमेरिकन फिल्म्स—आकाशाला भिडतील एवढ्या राशीने पडलेले होते. हा प्रकार काय आहे हेच मला उमजेना. ट्रान्झिस्टर्स, मिलिंग मशिन्स, कापूस ... विविध यंत्रे, न्यूजप्रिंट ... अशी जवळपास एकही वस्तू नव्हती की त्या ढिगाऱ्यात नव्हती. प्रत्येकावर चिठ्ठी *Made in U. S. A.* (अमेरिकन निर्मिती.)

मग शेवटी फोनचे संधान बांधले.

'माजगावकर आहेत का ?'

'माजगावकर कोण ?' असा उलट प्रश्न आला.

मी चकित झालो.

माणूसच्या कार्यालयाऐवजी जवाहर हॉटेलचा किंवा किर्लोस्कर मासिकाचा तर फोन मी फिरवला नाही या कल्पनेने मी नम्रपणे विचारले—

'ही माणूस कचेरीच ना—'

'होय.'

'माजगावकर आहेत का ?'

'हे माजगावकर कोण ?'

'संपादक—'

'नाही—माजगावकर वगैरे इथे कोणी नाही.'

'माणूस'चे संपादक माजगावकर कोण असा प्रश्न करण्याची धिटाई माणूसच्या कचेरीत पाहून मी चक्रावलो.

फोनवर पुन्हा ऐकू आलं–'हां! इथं अधूनमधून एक चष्मेवाला उंच माणूस येतो. तोच बहुशः माजगावकर असावा.'

'यस् करेक्ट.'

'पण त्या माणसाचं इथं निश्चित काय काम असतं हे मला ठाऊक नाही. मी येथे येऊन वर्षभर झाले. मी त्यांना पाचसहा वेळा पाहिलंय्. ते माणूसवद्दल फारसं कधी बोलताना ऐकलं नाही. पण शिवचरित्र, बाबा पुरंदरे, प्रतिष्ठान, यूथ फेडरेशन, पदयात्रा, चल्ला, मार्ग ...असे काहीसे बोलतात.'

'यस् तेच–तेच माजगावकर–तेच मला हवे आहेत.'

'कम्माल करता राव. तुम्ही म्हणालात की इंदिराजी हव्या आहेत तर आम्ही एकदोन दिवसात विमानातून दिल्लीहून त्यांना आणवू शकू–पण माजगावकर...त्यांचं नाव काढू नका. आता तीन महिने ते इथं नाहीत–'

'तीन महिने'

'हो तीन महिने. म्हणजे काय झालंय त्यांचा तूर्त मुक्काम कैलासावर आहे.'

'काय गांजा वगैरे ओढला आहात काय? कैलासावर म्हणजे कैलास पर्वतावर–हिमालयात–'

'चूक. कैलास म्हणजे वेरूळ येथील कैलास लेणे.'

'तिथे कशाला गेले आहेत ते?'

'अमेरिकन सरकारविरुद्ध आपण धान्य घेतो त्याविरुद्ध त्यांना आवाज उठवायचाय–'

'मग कैलास कशाला? पुणे, लोणावळे, पनवेल ही गावं काय वाईट, आम्ही काय अमेरिकन गहू खात नाही?'

'म्हणून कैलासची मजा त्यात नाही. अमेरिकेची जिरवायला चांगले बॅक्-ग्राऊंड नाही पुण्यात. जेव्हा फोटो निघतील तेव्हा काय बुधवार चौक किंवा कुंटे चौकाची पार्श्वभूमी दाखवायची–वेरूळची चित्रकला केवढी थोर आहे.'

'पण अमेरिकन गव्हाचा तिथे संबंध–'

'ते विनोबांना विचारा–'

'विनोबांना का?'

'ज्यावर पुन्हा प्रश्न नाही अशी उत्तरे पूर्वी फक्त गांधी देत–आता विनोबा देतात.'

'बरे ते जाऊ दे. मला माजगावकरांना भेटायचं, ते कसे ते सांगा.'

'चला.'

'चललो.'

'तसे नाही. कैलासहून–सिंधूसागरापर्यंत आहे मार्ग–माजगावकरांचा–'

'मग ऑफिसमधे भेटणार नाही म्हणता तर.'

'कधीच नाही–आज नाही–उद्या नाही चला–वेरूळ.'

मी वेरुळाला अजून निघालो नाहीं. कदाचित् जाईन. मला माजगावकरांच्यात असणारा प्रामाणिकपणा जाणवतो आहे. एक चमचा विनोबा, एक चमचा गांधी, पाव चमचा लेनिन, दोन चमचे सावरकर, (थोडा विक्रमादित्य–वगैरे) असे प्रिस्क्रिप्शन करून परमेश्वराने माजगावकरांना केले.

त्यांच्या वृत्तपत्राचे राजकीय धोरण काय हा आम्हा त्यांच्या सर्व मित्रांना प्रश्न पडतो. पण त्यावाचून माजगावकरांचे चालले आहे. मग आपण तरी कशाला तकलीफ करा. त्यांच्यात काहीतरी सल आहे. निव्वळ प्रचार–चर्चा–लेखणी यावर त्यांचा विश्वास नाही. ते पुष्कळसे भ्रमचित झाले आहेत. मागे त्यांनी माणूस प्रतिष्ठान काढले. मार्ग धरला. तो चुकीचा निघाला. कारण त्याला शास्त्राची जोड नव्हती. आताही नेमके तेच आहे. त्यांना काहीतरी करावयाचे आहे. परकीय मदतीचा ओघ स्वतंत्र राष्ट्रांना शरमिंदा करतो हे सत्य आहे. पण अशा चळवळीची अखेर कशात होईल ! अमेरिका तुमच्या दारी आली नसून आपण भीकमागे त्यांच्या दरवाज्यापुढे झोळी पसरत आहोत. म्हणजे राज्यकर्ते बदलले पाहिजेत. याच सत्याशी आपण येऊन पोहोचतो. राज्यकर्ते बदलले पाहिजेत–एकतर तलवारीने किंवा मतपेटीने. मतपेटी ही आता विकत घेण्याची वाव आहे. म्हणजे अमेरिकन मदत घेऊन काँग्रेसचा पराभव करायचा आणि मग अमेरिकन दात्यांशी युद्ध करायचे असा सुरेख मामला जमेल.

अमेरिकन गहू नाकारणे, (तेही तो खातखात) फार सोपे आहे. पण अमेरिकन विमाने, यंत्रे, लष्करी साहित्य नाकारणे म्हणजे पर्यायाने चीन-पाकिस्तानला 'आत या' म्हणणे आहे. आज चीन गप्प आहे तो केवळ अमेरिकेच्या लष्कराला भिऊन. आपल्या आरोळ्यांना नव्हे. नचपेक्षा कितीही शूर असले तरी भारतीय लष्कर चीनचा बंदोबस्त करणार कसा ? चाकू–सुऱ्यांनी की विळ्या–कोयत्यांनी ! अणुबाँब न करणाऱ्या राष्ट्राला अणुबाँब करणाऱ्या राष्ट्राशी मुकाबला करताना काय गांधींचा पंचा उपयोगी पडणार आहे ?

अमेरिकन नव्हे तर सर्वच परराष्ट्रांची मदत नाकारली पाहिजे. कैलास ते सिंधुसागर ही चळवळ अँटी–अमेरिकन होता नये तर 'अँटी–फॉरेन एड' (परराष्ट्र मदतविरोधी) व्हायला हवी. त्या चळवळीपासून डांगे–फर्नांडिस दूर ठेवायला हवेत. नचपेक्षा ही चळवळ अखेरी लालभाईंची मिरवणूक व्हायची. (होणारही आहे. फर्नांडिस निघालेच आहेत. पाठोपाठ डांगे येतील.)

बंद व्हावयास हवे ते परराष्ट्रावर भिस्त असणारे परराष्ट्रीय धोरण. पण इंदिराजींचा पिता घालून देत असणारे धोरण चालविण्याचा वारसा शास्त्रींनी

घेतला आणि पुढे इंदिराजींनी तेच धोरण धरले आहे. चुकले तर पंडितजी आणि जिंकली तर अलाहाबादची मलिका.

तरीपण तुमचा मार्ग चालू दे माजगावकर. आमची तुम्हाला सक्रीय सहानुभूती आहे. तुमचे पाय मागे ओढण्यापेक्षा तुमच्यावरोवर असणे निदान सोयीचे आहे. उद्या तुमच्या संचालनात फर्नांडिस–डांगे येऊन पुढे झाले तर त्यांना मागे नको का खेचायला–

आम्ही आहोत–तुम्ही चला.

दिनांक २८ जानेवारी १९६८ ● ● ●

हे सिंधुसरिते, मला तुझी आठवण येते . . . . !

हे सिंधुसरिते–आता तू कोठे आहेस–तुझी मला आज आठवण झाली. मी राष्ट्रगीत म्हणू लागलो आणि तू समोर दिसलीस. माझ्यावर कधी स्वतःच राष्ट्रगीत गायचा प्रसंग आला नव्हता.

आणि आला होता तेव्हा राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' होते–

विच्चारे राष्ट्रगीत–वंदेमातरम्.

ज्या राष्ट्रगीतात अनेक देशभक्तांचे निःश्वास अडकले होते–ज्या गीतात पदोपदी देशावर प्यार करणाऱ्या अनेक वेड्यांचे अश्रू आणि किंकाळ्या लोंवकळत होत्या–आणि केवळ वंदेमारम्च्या उच्चारासाठी ज्यांनी आपले प्राण पणाला लावले असे ते इतिहाससंपन्न आणि भावसंपन्न गीत होते. अजूनही मंद लयीत ते गीत कुणी म्हणू लागले की अंगावर रोमांच उठतात. मीही आपल्या परीने त्या गीताची सेवा केली आहे. ४२ च्या चळवळीत पायावर गोळी झेलताना मीही नकळत ओरडलो, 'वंदेमातरम् ! 'माझा पाय जसा कायमचा अधू झाला तसेच ते गीतही अधू झाले. राष्ट्रगीत म्हणून त्याचा पहिला मान गेला. एका लेखणीच्या फटक्यासरशी 'जन-गणमन अधिनायक' या गीताची राष्ट्रगीतपदी स्थापना झाली. मात्र वंदेमातरम् हे गीत लोकांनी डोक्यावर केव्हा घेतले हे कळणे कठीण आहे. एकदा आपल्या श्रद्धा वसल्या–आपण आपले रक्त एकदा का देऊ केले की मग ती वस्तू चर्चेची रहात

नाही. आपले आईबाप, आपली भूमी, आपली दैवते, आपला धर्म या गोष्टी मी-मी म्हणणाऱ्या साम्यवाद्यांना–आंतरराष्ट्रीयवाद्यांना–उदारमतवाद्यांनासुद्धा वेळ आली. म्हणजे चर्चेपलीकडच्या वाटतात. आपल्या श्रद्धास्थानात राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत हीही असतात.

वंदेमातरम् या शब्दात नमस्कार आहे तो जननीला–स्वतःच्या अन् सर्वांच्या त्या शब्दात एक मंत्रसामर्थ्य आहे. शब्दात हिप्नॉटिक इफेक्ट आहे. अजूनही या गीताने शृंगार-व्यवहार-क्रीडा आदी सर्व आनंदांना छेद जातो आणि एकदम आपल्याला अनामिक सामर्थ्याचे आवाहन मिळते. उभे राहा-आदर दाखवा अशी फर्माने काढण्याची अजून तरी त्या गीतावर पाळी आलेली मी पाहिली नाही.

'जनगणमन' हे आता राजमान्य गीत आहे. आम्ही त्यापुढेही नम्र आहोत. नम्र राहू. अखेर संसदेने सांगितले की आम्हाला ते मानले पाहिजे. पुढच्या पिढीला वंदेमातरम्चे मंत्रसिद्ध सामर्थ्य तेवढे जाणवणार नाहीही. पण आदर आणि प्रीती या गोष्टी भिन्न असतात. दोनही गीते संस्कृत शब्दांनी बहरलेली आहेत. पण एक गीत हृदयात आहे, दुसरे मस्तकात. वंदेमातरम् हे खरे म्हणजे गीत नव्हेच. तो एक फाशी गेलेल्या, देशहितार्थ खर्ची पडलेल्या अनेकांसाठी सोडलेला एक आर्त सुस्कारा आहे.

आहेत, जनगणमन आणि वंदेमातरम् ही दोनही राष्ट्रगीतेच आहेत. आदरणीय आहेत. मूल होत नाही म्हणजे राजा दुसरी राणी करतो. दोन्हीही राण्याच असतात. एक उपयुक्त–म्हणून सदैव आवडती. बँडवर वाजवता येत नाही म्हणून म्हणे वंदेमातरम्ऐवजी जनगणमन हे गीत स्वीकारावे लागले. असेल ! तसेही असेल. अमावास्येला राज्यग्रहण नको म्हणून रात्री १२ वाजता नाही का भारताने स्वातंत्र्य स्वीकारले ? शहाणे आणि वेडे अशा गोड गोंधळात आपल्याला रस्ता काढायचाय. तेव्हा हे असं घडायचंच.

हे सिंधूसरिते–राष्ट्रगीत म्हणताना मला तुझी आठवण का झाली ते सांगायचे राहूनच गेले. तुझी मला आठवण झाली कारण आपल्या नव्या राष्ट्रगीतात म्हणजे 'जनगणमन अधिनायक' तुझे नाव ओठातून आले. वास्तविक पूर्वी तुझे नाव तिथे नव्हते. 'पंजाब सिंध गुजरात मराठा' ओळीत कुणा शहाण्याने 'सिंधू' असे शब्द घुसडले असावे. सारी प्रांतांची नावे असताना सिंधू हे तुझेच नदीचे नाव तिथे का बरे यावे !

तू हुरळली असशील हे पाहून. तुला वाटले असेल की, तुझा मान मोठा–तू वयानेही ज्येष्ठ, म्हणून तुझा उल्लेख या गीतात असेल, पण वेडे सिंधू, तुझे नाव आलंय् ते केवळ पळवाट म्हणून. ते आमच्या नालायकीतून आलंय् तिथे. मूळची ओळ आहे, 'पंजाब सिंध गुजरात मराठा,' पण आपण सिंध तर विकून टाकला.

अजून सिंधचे नाव राष्ट्रगीतात राहिले तर मग आपले पवित्र (पाक) शेजारी काय म्हणतील असा प्रश्न पडला. मग हे नाव काढून टाकायचं ठरलं. पण मग तिथे ठेवा काय ? शहाण्या राज्यकर्त्यांनी कुणाच्या लक्षात हा आपला भेकडपणा येऊ नये म्हणून रविंद्रनाथांच्या परवानगीशिवाय त्यांच्या गीतात सिंध ऐवजी सिंधू घुसडून शब्दाला शब्द जुळवून घेतले. राष्ट्रगीत म्हणून नाणे चालू झाले. विचारतो कोण त्या दाढीवाल्या कवीला ?

पण सिंधू, तू एकूण दुर्दैवी नदी आहेस एवढे खरे. तुझे सारे देणे आम्ही विसरलो. तुझ्या ठायी स्फुरलेले वेदमंत्र विसरलो. अलीकडे आम्ही शांततेचे मंत्र म्हणतो–निधर्मी मंत्र म्हणतो. वास्तविक सिंधुसरिते, तुझ्या ठायी आम्ही पाहिली आर्यधर्माची ध्वजा आणि आता उरली आहे सर्वभक्षक–सर्वसमावेशक धांदोटी.

सिंधू, तू सारे काही सोसलेस. सारे प्रहार तुला सोसावे लागले. पहिले आघात तुझ्यावर पडले. अनेकदा आर्यांच्या रक्ताने तू माखून गेलीस. तू केलेले सर्व उपकार, सारे रक्त, त्याग, नालायक वैश्यांनी दिल्लीच्या सिंहासनाच्या अभिलाषेने ठोक भावाने विकून टाकले.

अगदी परवा परवा 'इस्रायल'ने काय केले ! इस्रायलची जॉर्डन नदी, सिंधू, तुझ्यासारखीच दुर्दैवी नदी. दोन हजार वर्षात तिची अन् तिच्या मायलेकरांची ताटातूट झाली होती. पण तिची लेकरे हट्टी होती–जिद्दी होती. सारी संपत्ती–समृद्धी देऊ केली तरी ती ठोकरून त्यांनी वाळवंटी रेताडातून वाहाणाऱ्या तुझ्या प्रवाहापाशी सर्वस्व वाहिले. सिंधू, जी तुझ्या पासंगाला लागणार नाही अशी ती चिरटोळी नदी जॉर्डन, हिंदूंच्या मानाने इवलीशी इस्रायली जमात, पण दोघेही कृतकृत्य झाले. केवळ स्वाभिमानामुळे–केवळ पेटलेल्या रक्तामुळे.

आज ना उद्या तुझे पुत्र तुझ्या मुक्ततेसाठी येतील अशी तुला आशा असेल तर ती व्यर्थ होय. बापूजींना तर ही कल्पना असह्य झाली असती. नेहरूंच्या शांतता-मय सहजीवनात हे बसणारे नाही... काँग्रेसला इस्लामी चंद्राची अवहेलना कशी रुचावी ! कम्युनिस्टांना–समाजवाद्यांना गेलेले परत मिळवणे यात प्रतिगामित्व दिसते–

म्हणून म्हणतो सिंधुसरिते, तू रडतच राहा. तुझे अश्रू तसेच ओघळत राहू देत. राष्ट्रगीतात तुझा उल्लेख राहिला म्हणून फुशारू नकोस. राष्ट्रगीताचा अन्वयार्थ समजून तुझ्या मुक्ततेचा कोणी यत्न करील, या तुझ्या भ्रमाला काय म्हणावे ! अग अजून काश्मीरवर आमचा कब्जा आहे म्हणून तुझी नावनिशाणी तरी शिल्लक आहे. नचपेक्षा सिंधु हा शब्दसुद्धा उरला नसता.

हे सिंधू ! तू निपुत्रिक आहेस का तुझ्या पोटी डुकराची अवलाद वाढली ? तू म्हणे केव्हातरी हिंदूंच्या संस्कृतीची खूण होतीस ! पण या अहिंसक राज्यात

-संस्कृती म्हणजे जंगली आदिवासींची केलेली निरर्थक अर्धनग्न नृत्ये असतात हे तुला माहीत नाही का ? या आमच्या खोट्या जगात नद्या–पहाड–नगरे ही केवळ स्थावरे. इतिहास हा नव्याने लिहिला पाहिजे ही इथली आरोळी. शिवाजी हा वाट चुकलेला देशभक्त हे त्यांचे निष्कर्ष. म्हणून म्हणतो हे सिंधूसरिते, तू वृथा शोकाकुल होऊ नकोस. तू एकदा निर्माण केलेली पुरातन संस्कृती आता केवळ उत्खननाचा विषय झाली आहे.

राष्ट्रगीत म्हणतेवेळी समरसरिते सिंधू, तू साक्षात् उभी राहिलीस. 'सिंध'ची सिंधू झालेली मला काल प्रथमच कळले. पण तुझे अश्रू पुसण्याचे सामर्थ्य या पंढ राजवटीतील माझ्यासारख्या नागरिकाला राहिलेले नाही. राष्ट्रगीत म्हणताना तुझी आठवण येईल. अन् मन चरकेल. आपण हळूहळू गमावत सुटलो आहोत. गांधार गमावला, सिंध–पंजाब गमावले, काश्मीर... (परमेश्वर जाणे ते–अर्धे काश्मीर तरी अजून शाबूत आहे की नाही !) नेहरूंच्या मताप्रमाणे गवत न उगवणारी १६००० चौरस मैल जमीन गमावली. नागालँड वाटल्यास आपला म्हणावा. पण तो नावांपुरता आपला आहे. लडाख, नेपाळ–भूतान ही आपल्या पंखाखालची राज्ये आता दुसऱ्यांच्या मदतीने आपल्या पदराबाहेर डोकावून आपला पाणउतारा करण्याच्या स्थितीत आहेत. बंगाल मुळात अर्धा गेला, आता कम्युनिस्टांनी उरलेला घ्यायचा मानस दर्शविला आहे. कच्छचे रणाचा वाद अजून संपलेला नाही. केरळमध्ये चीनच्या मैत्रीसाठी हपापलेल्या कम्युनिस्टांनी काळजीपूर्वक देशद्रोहाचे पीक लावले आहे, त्याचीही फळे येतील, कोरिया–व्हिएतनामची तियेही आवृत्ती निघेल.

असा हा आमचा सुरेख जमाखर्च असताना आणि आमच्या बोडक्यावर पाचसात कोटी अर्धशिक्षित, असंस्कृत जातीय मुसलमान असताना आम्ही तुझी सुटका कशी करणार, केव्हा करणार हे एक परमेश्वरच जाणे.

अल्लाच्या राज्यात तू राहतेस तेव्हा अल्लाच तुला सुखी ठेवो.

दिनांक ३१ डिसेंबर १९६७

● ● ●

चिमणे, रडू नकोस–डोळे पूस

तुझे ओलावलेले डोळे मला बघवत नाहीत आणि रडायला तरी कुठे वेळ आहे आपल्याला ? वेडे, रडून भागायचे नाही आता. दुःखाची का ही आपली

पहिलीच वेळ आहे ? मागे एकदा पानशेतनं तुझं घरदार नव्हतं का मोडून टाकलं ? तुझी मडकी–गाडगी नव्हती का रस्त्यावर आणली ? फाटक्या वस्त्रातून दिसणारा तुझा करपलेला देह बुभुक्षित नजराना नव्हता का उघडा पडला ? वेडे, तसं दुःख आपल्याला नवीन नाही. पण या मातीला घामाची ओळख आहे. अश्रूंची नाही. मग रडायचं कशासाठी आणि कुणासाठी ? म्हणून म्हणतो चिमणे, डोळे पूस.

अगदी खरं आहे की, फार फार कष्ट करून तुझं हे घरटं तू उभं केलं होतंस. त्यासाठी तुला खूप झगडावं लागलं. मिळायला हवी अशी किती तरी भूमी तुला नाकारली गेली. तुझं घर झाल, पण तुला गमवावंही खूप लागलं. पण वेडे, गमावणं हा तर आपला धर्म आहे. प्रत्येक वेळी आपण काहीतरी गमावीत आहोत. मला तर वाटतं, गमावण्याचाच आपल्याला एक छंदच आहे. चिमण्या–वोळक्यांचा संसार ठोकरून देऊन आपलं आयुष्यच गमावू पाहणारे मरणवेडे इथे पुष्कळ झाले. ह्या भूमीचा तो धर्मच आहे. आपल्या घरा–दाराची होळी करणारे स्वतःहून इथ खूप होऊन गेले, म्हणजे वेडे, संसार हा कःपदार्थ मानून घरादारांचा नाश करणाऱ्या परंपरेत तर तू जन्म पावलीस आणि मग आताच का रडतेस ? एवढंसं घर पडलं तर अशी व्याकुळ का होतेस ? घर छपराचं आणि भितीचं का होतं ? घर म्हणजे निवांतपणा. आपल्याला तो निवांतपणा कधी मिळाला आहे का ? भाकरी आपल्याला सुखानं कुणी खाऊ दिली आहे का ? आत्तासुद्धा तुझे डोळे पुसायला लोक येतील आणि तिखट हाताने तुला पुन्हा रडवून परत जातील. सहानुभूतीची तुला सवय नाही. पानशेतच्या वेळच्या पुरासारखा किंवा मदतीसारखा आणखी एक पूर तुझ्यावर चालून येतो आहे. पण अशा या पुरानं काही होत नाही. पानशेतने जे उद्ध्वस्त झाले त्यातले काही काही या मदतीच्या पुराने तारले नाही. उलट जे गेले ते गेलेच. मागे उरला आहे तो भीकमाग्या लाचारांचा ताडा.

चिमणे, कुणी साडी–चोळी पुढे करील, कुणी भाकरीतुकडा देऊ म्हणतील तर ती साभार परत कर. आपण दरिद्री आहोत, पण भिकारी नाही. आपल्याला मदत नको, हवी आहे उसंत. मान वर करण्यापुरती उसंत. आपण आपल्या पायावर उभे राहिलो तर हवा आहे रोजगार. आपल्या श्रमाला मेहेनताना देणारे दाते या दुनियेत नाहीत. आहेत ती केलेली पापे निस्तरण्यासाठी पुण्य जमा करणारे दानशूर. त्यात आणखीही एक बुभुक्षित जमात आहे. ती माणसे तुझ्यापेक्षाही जास्त वखवखलेली आहेत. तुझ्या डोळ्यातले अश्रू हे तर त्यांचे भांडवल असते. हे आता जनतेपुढे जोगवा पसरतील आणि तुझं पोट तसंच खपाटीला राहील. यांची पोटं तुडुंब भरतील. तुझं एक घर पडलं तर हे शेकडो घरं पडली म्हणून सांगतील. तुझ्या घराशेजारी एखादा पाण्याचा ओघळ वाहात आला तर हे महापूर आल्याच्या वार्ता छापतील. तू रडायची थांबलीस तर मग याचं कसं चालेल ? हे तुला गप्प

वसू देणार नाहीत. तुला सावध राहिलं पाहिजे ते ह्यांच्यापासून. लोकांना पेटवायचं आणि त्यावर आपली पोळी भाजायची हा तर ह्यांचा फार पुराणा धंदा आहे. त्यांना तुझ्या अश्रूचीही किंमत नाही आणि पडझडीचं सोयरसुतक नाही.

वाळे चिमणे, तुझं दुःख मी जाणतो. पण या दुःखाचं दुसऱ्या कुणी भांडवल करू नये म्हणून तरी डोळे पूस. दुःख आवर. एवढ्या तेवढ्या कारणासाठी भांडायचं हा तुझा धर्म नव्हे. तुझ्यावर इतके अन्याय झाले, पण तू कधी बंड करून उठली नाहीस, तशी तू सोशिक आहेस. अन्याय सहन करून करून तुझे सोशिकपण वाढलं आहे. तुझ्या अपेक्षाही फार नाहीत. तुला मनोरे नकोत, हवेल्या नकोत, नको शिरापुरी, मिळालंय तेवढ्यावर तू संतुष्टही आहेस. प्रत्येक वेळेला हमरीतुमरीवर येणं तुझ्या प्रकृतीतच नाही. पण तुझे काही चार उपद्व्यापी भाऊ आहेत. ते इवलासा भाकरतुकडासुद्धा तुला सुखानं खाऊ देत नाहीत. चौकाचौकात जाऊन धमक्या देताहेत, ओरडा करताहेत, अन्यायाची जाहिरात करताहेत. पण चिमणे, हे लक्षात ठेव. तुझे हे अश्रू पुसण्यासाठी त्यांचा कांगावा नसतो. भांडण सारखं पेटतं ठेवणं हा तर त्यांचा व्यवसाय आहे. आता तुझ्या अंगावरती वस्त्र नाही ना ? तर प्रथम ते तुझं अंग झाकणार नाहीत. तुझं ते उघडं अंग जगभर दाखवतील आणि टाहो फोडून भीक मागतील. कुणी तुला झाकू पाहील, कुणी तुझे अश्रू पुसू पाहील, तर ते त्याचा हात झटकून टाकतील. म्हणून म्हणतो चिमणे, तुझे अश्रू तुलाच पुसले पाहिजेत.

पूस डोळे. ताठ उभी राहा. आजवर तुझ्या ताठपणाची सह्याद्रीच्या बुलंद कडेकपाऱ्याशी मी तुलना केली. सह्याद्रीनं आपला ताठा सोडला म्हणून काय झालं ? तो घावरून गदगदा हलू लागला म्हणून काय झालं ? मृत्यूला न भिणाऱ्या मृत्युंजयाचा वारसा आपण घेतला आहे, मरणाची चेष्टा करणाऱ्या वंशाशी आपण नातं जोडलं आहे, पत्र्याच्या घराप्रमाणे संसार उधळले जात असताना बागनेटाना छाती देणाऱ्या कुलाचं रक्त आपल्या नसातून वाहात आहे. एवढ्याशा भूमीच्या डळमळचानं आपण डळमळावं हे वरं का ? हलू दे सह्याद्री ! हलू दे हिमालय ! आपण मात्र ताठ राहिलं पाहिजे. आपल्या ताठ मानेची जगात चेष्टा होते. पण चेष्टा तर सगळ्यांचीच होते. चेष्टा झाली तरी रक्ताचे धर्म बदलणार कसे ? या चेष्टेखोर जगाच्या रांगेत आता देवसुद्धा जाऊन बसला. आता देवसुद्धा त्या कुचेष्टेत सामील झाला. पण देव तरी काय, या दगडामातीच्या देशात त्याला निखळ भक्तीशिवाय दुसरे काय मिळणार आहे ? देवानं आम्हाला दिलं तरी काय होतं ? देवाचं औदार्य आम्ही अनुभवलंच केव्हा ? आमच्या पाठीवर त्याचा ममतेचा हात फिरलाच केव्हा ? कृपा असलीच देवाची, तर त्यानं आम्हाला हातपाय दिले आणि ताठ मान दिली एवढीच.

आता कठे आम्हाला बरे दिवस येत होते. तर त्यानं एक अकस्मात प्रहार केला. आता कुठे घराघरात प्रकाश येत होता. पोटभर भाकर आणि घोटभर पाणी डोळ्यांसमोर दिसत होतं. पण देवानं एका क्षणार्धात आमची सारी स्वप्ने मातीमोल केली. असू दे. देवाचा धर्म त्याच्यापाशी. चिमणे, तुझे हातपाय धड आहेत ना, मग अश्रू पुसून टाक. डोळ्यात आता पाणी येऊ देऊ नकोस. रडण्यासारखे दुर्दैव कोणतेच नाही. अश्रूने माणूस थकून जातो. दुबळा होतो. आणि आपल्याला थकून भागेल का? मग हे दगड कोण फोडणार? या रुक्ष रेताड जमिनीत मग बागा कोण फुलविणार? चिमणे, जे रडतात ते रडतच बसतात. त्यांना रडायला फुरसतही असते आणि समोर सुग्रास अन्नही असते. रिकाम्या पोटी तू रडणार तरी कशी आणि केव्हा? धरणी हादरली तरी तिची काळी सोवत तर हरवलेली नाही ना? सारा अवकाशसुद्धा गहिवरला आहे ना? हे आपल्याला पुष्कळ आहे. ऊठ, पदर कस, डोळे पूस, आपण तसे एकटे आहोत. आपल्या दुर्दैवाची चेष्टा कणारे मात्र पुष्कळ आहेत. आणि आपल्या दुर्दैवाचं भांडवल करून पोट जाळणारे तर त्याहून पुष्कळ आहेत. चिमणे, ऊठ ही घे कुदळ. हा कातळ तुलाच फोडायचा आहे. पडलेला निवारा तुलाच उभा करायचा आहे. पूस अश्रू आणि घाल घाव या भूमीवर. तुझ्या देहातून गळणाऱ्या घामाने कातळेसुद्धा लोण्यासारखी होतील. डोळ्यांतून येणारे पाणी मागे फिरव.

दिनांक २४ डिसेंबर १९६७

● ● ●

अरे आमचे कौतुक करा—हार आणा

परवा माझ्या डोळ्यात आनंदाचे अश्रू आले.

प्रसंग तसा नवीन नव्हता.

असे प्रसंग अलीकडे वारंवार येत आहेत.

राष्ट्रपिता महात्मा गांधी, त्यांचे सत्‌शिष्य पंडितजी, पंडितजींचे वारसदार लालबहादूर, आणि सुलताना इंदिरा या साऱ्या श्रेष्ठ पुरुषांच्या परंपरेत भारतीय संस्कृती, भगवान बुद्धाचे तत्त्वज्ञान, शांततायुक्त सहजीवन आणि अहिंसा यांचे पालन चांगले होत आलेले आहे हे मला चांगले उमगले. मूर्ख लोकांच्या नादी

लागून लालबहाद्दूर शास्त्री यांनी मध्यंतरी आपले शेजारी जे यवनबंधू त्यांच्यावर हकनाक शस्त्र उगारून आपले हसे करून घेतले. वास्तविक एवढा पैसा, एवढी जीवहत्या करून त्यांनी मिळविले काय ? ताश्कंद करार. तो त्यांना युद्ध न करताच नसता का मिळवता आला. युद्धखोर, आक्रमक, असहिष्णु व बळाचा वापर करणाऱ्या राष्ट्रांचा निषेध करण्यातच मानवजातीची सेवा होत असते. माणूस यानेच प्रगत पावतो. ते सोडून त्या खुज्या माणसाने अगदी खुळेपणाने लष्करी हालचाली केल्या. पण जाऊ दे. झाले ते होऊन गेले. ते अवसान थोडक्यात ओसरले म्हणून ठीक. नचपेक्षा महात्माजींना काय वाटेल–पपांना काय वाटेल–या चिंतेत इंदिराजींसकट सारे भारतवासीय पडले होते. देवाला काळजी म्हणून त्याने कोसिजिनमार्फत भारतीय परंपरेला गालबोट लावून दिले नाही.

असो. सांगायचे राहूनच गेले.

परवा आंतरराष्ट्रीय लवादाने कच्छच्या वादाबाबत लवादनिवाडा दिला. वाद म्हटला म्हणजे देवाणघेवाण आलीच. सगळेच आपल्यासारखे कसे होणार. माणसाने आपले मन मोठे केले पाहिजे. विचार व विवेक हे आपले खरे बळ असायला हवे. त्याऐवजी उठल्या सुटल्या आडदांडपणे वागून आपले हसे का करावे ? कच्छबद्दलचे भांडण आपण कसे छानपणे लवादाच्या वरणीत ठेवले. एवढ्या लवकर लवादनिवाडा घ्यायची काही घाई होती का लवादांना. पण हे बेटे गाढवच. आमच्या भारतीय परंपरेत हा अचपळपणा मुळीच वसत नाही. एवढा तडकाफडकी न्याय घ्यायला या लवादांना दुसरा उद्योग नव्हता की काय !

भारतीय संस्कृतीचा जयजयकार असो.

भारताची बाजू नेहमीच न्याय्य असते, हे आता जगाने मान्य केलेले आहे त्यामुळे कोणत्याही लवादात भारताचीच बाजू खरी मानली जाते. कच्छ वादात पाकिस्तानचे तीन हजार चौरस मैलांचे मागणे लाथेने उडवून अवघ्या तीनशे चौरस मैल भूमीवर त्यांचे थोबाड लवादांनी बंद केले. कोणीही शहाणा माणूस या लवाद–निवाडयावर खूष होईल. पाकिस्तानची जिरवली म्हणून आनंदित होईल. सुलताना इंदिरा तर खूष झाल्याच आहेत. राजाजी यांनीही खुषीच्या टाळ्या पिटल्या आहेत. जयप्रकाशजी गळ्यात ढोलके अडकवून तर नाचत सुटले आहेत. ही हसण्याची वेळ आहे. हा आनंदोत्सवाचा समय. अशा वेळी नाराजी बरी नव्हे हे या मधु लिमयांना, बाजपेयींना, कुणीतरी सांगायला नको का. आपण सत्तावीसशे चौरस मैल जमीन मिळवली, बाचवली म्हणजे मिळवलीच नाही का ? मग यानिमित्त आनंदाचे उधाण नको यायला ? नवा भूप्रदेश मिळविल्यानंतर पूर्वी राजे लोक केवढा हर्षोत्सव करीत आणि आज–

अरेरे ! भगवान बुद्धदेवा, पूज्य बापूजी, आदरणीय जवाहरजी, स्वर्गीय

लालबहाद्दूरजी, आपण घालून दिलेला हा अमोल घडा या वेडचा लोकांनी एवढचा लवकर विसरावा अं ! भारतीय परंपरा धर्मराजाची आहे–त्या महाकपटी कृष्णाची नव्हे. भारतीय परंपरा गझनीला निमंत्रण देणाऱ्या जयचंद राठोडची आहे. पृथ्वीराजाची नव्हे ... ... अरेरे ! आता या वेडचा लोकांना आवरावे तरी कसे ?

'पण पूज्य बापूजी तुम्ही मुळीच सचिंत होऊ नका. मी सुलताना प्रियदर्शनी तुम्हाला प्रतिज्ञेवर सांगते की, मी तुमच्या तत्त्वाचे पालन करून तुमचे नाव उज्ज्वल करीन. वेळप्रसंगी माथेफिरू चळवळचा लोकांवर मी गोळचा घालीन. त्यांच्या पुस्तकावर बंदी घालीन–त्यांच्यावर अश्रुधूर सोडीन. गुंडांची गय करून उपयोगी नाही–नाही का पपा. तुम्ही केले ते सर्व मी करीन. आपला परमप्रिय मित्र माओ याने आक्रमण केले असा खुळा कुविचार करून भारताची शान घालविणाऱ्या मूर्खांचे तुम्ही काय केलेत ? मी तेच करेन.

या भारतातील लोक तुमचे नाव ऐकले की अजून सद्गदित होतात. अजून टाळचा पिटतात. पपा, लोक म्हणतात तुमचे परराष्ट्रीय राजकारण चुकले म्हणून तुमचा अपमृत्यू झाला. वेडे कुठचे. चीनचा केवढा प्रचंड पराभव झाला हे जगाला माहीत नाही का ! ज्या भूमीवर गवतसुद्धा उगवत नाही अशी पाचपंचवीस हजार चौरस मैल जमीन आता रात्रंदिवस राखण्याचे काम त्यांना विनामूल्य करावे लागते. आणि या राखणावळीवद्दल आपल्याला खर्च काही नाही. आता यात पराभव कोणाचा झाला. जिंकले कोण ! माओला सारा भारत देश हवा होता. त्याला दिल्ली, पाटणा, कलकत्ता हवे होते. मिळाले का त्याला ? तेच त्या आयुवदादाचे. त्याला काश्मीर हवे होते. आम्ही युक्ती केली. सदा वर्फ असणांऱ्या काही निरुपयोगी टेकडचा त्याला दिल्या व तो खुळा त्यातच खूष. सांभाळायला त्रासदायक अशी जनावरे शेजाऱ्याच्या गोठचात वांधून, माहेरी जावं तसं केलं आम्ही.

कच्छच्या वावतीत तर आम्ही अशी वाजी मारलीय की, वास्तविक आमचे लोकांनी टाळचा वाजवून स्वागत करायचे. आमचे मुत्सद्दी, पुढारी ही संधी मिळावी म्हणून रात्रंदिवस रावत होते. सतत पाण्याखाली असणारी जमीन आम्हाला कोणाच्या तरी गळचात मारायची होती. अनायासे आपला आयुवदादा पुढे आला. नकटी, काळी मूर्ख मुलगी वरायला एखादा वर आपणहून यावा तसाच. मग आम्हीच तो सोहळा मध्यस्थांमार्फत पुरा केला.

परवा जेव्हा मुलताना इंदिराजी म्हणाल्या की लवाद निवाडा आपण मानलाच पाहिजे तेव्हा माझे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. वाटलं की भला थोरला हार घेऊन दिल्लीला जावे अन् आमच्या पंतप्रधानीणवाईचं स्वागत करावे. पण एवढी गेंदवाज फुले अलिकडे पुण्यात फुलत नाहीत म्हणून तो विचार सोडला झालं. म्हटलं जाऊ दे. पुष्कळ मंडळी तिथे स्वागत करणारच आहेत तिचे. इंदिराबाईच्या

त्या विशाल नि उदार उद्‌गारांनी मला एकदाचे हायसे वाटले. म्हटले त्या लाल-बहाद्दूराने मधेच लढाईविढाईचा पायंडा पाडला त्यामुळे सुलताना चुकते की काय! पण नाही. अखेरी रक्त कुणाचं आहे? ते असे भलत्याच ठिकाणी हार घेणार नाही. कच्छ लवाद आपण मानलाच पाहिजे!

या वेड्या मंडळींना एवढंही कळत नाही की असं आपलं काय गेलंय. आपला देश केवढा! त्यात कुठली ती वेरुवारी, कुठले ते छाड! हत्तीचा केस उपटावा तसेच आहे हे सारे. हत्ती अजून शाबूत आहे. अगदी रोज तीनशे मैल द्यायचे म्हटले तरी सारा भारत संपवायला हजार वर्षे लागतील. पण वेड्या मंडळींच्या हे डोक्यात कसं येत नाही हे कळत नाही. आपल्या देशाचा इतिहास आपण विसरता कामा नये. शिवाय त्यातली अ-णखी एक गोम लक्षात आलेली नाही. आपल्याजवळ अन्न कमी आहे अन् माणसे जास्त आहेत. माणसे काही मारता येत नाहीत. अन्न तर नक्कीच निर्माण करता येत नाही, मग खाणारी तोंडे दुसऱ्याच्या परडयात बांधली यात विघडणार कुणाचं. शेजाऱ्याचंच. नेपाळ व भूतान चीनच्या, काश्मीर व दक्षिण आसाम पाकच्या, उत्तर आसाम नागाच्या, दक्षिण भारत... जाऊ दे. आमची मुत्सद्देगिरी नाही यायची अजून तुमच्या ध्यानात. तुम्ही अजून वच्चे आहात. हे राजकारण आहे. तुम्ही वसा कोकलत हवे तेवढे. कच्छ लवाद आम्ही मानणार तर आहोतच पण एवढीच भूमी पाकला दिल्यावद्दल यूनोत तक्रार करणार. बोला सुलताना इंदिराजी झिंदावाद.

सुलताना सुलताना—अजव ये जमाना।
दोस्ती का तरीका—वहोत पुराना।
पपा की कहावत—मानना पडेगा।
कोसिजीन—जॉन्सन—है आपके नाना॥

दिनांक ३ मार्च १९६८

● ● ●

भारत विकाऊ आहे!

परवा सर्व वृत्तपत्रातल्या एका टेंडरच्या जाहिरातीचे सर्वानाच आश्चर्य वाटले. सरकारी ठेकेदारांना कोणतेही टेंडर म्हटले की अत्यानंद होतो आणि वयाणा

रकमेची ते तरतूद करतात. अक्षरओळख नसलेला माझा एक मित्र सरकारी कंत्राटदार आहे. अवघ्या पाच-दहा वर्षांत त्याने पाचपन्नास लाखांची कमाई केली आहे. त्याचे म्हणणे आहे की, एवढीच रक्कम त्याने पोलीस, सरकारी अधिकारी, कारकून, मध्यस्थ आदी माणसांवर वाटली आहे. 'यात गुन्हा आहे' असे मी म्हणताच तो हसला. तो म्हणाला, 'या देशात ज्याचा हात पापात बुडालेला नाही, असा कोण हरीचा लाल आहे? पुढारी निवडणुकीत वैध-अवैध पैसा उडवतात, तो येतो कोठून याची कोणी चिकित्सा केलीय? हजारपाचशे रुपये पगार मिळवणाऱ्या कित्येक अधिकाऱ्यांच्या बायका वापरतात ते जवाहीर, फ्रीज-ट्रांजिस्टर-कपडे... यांचा हिशेब कोण ठेवतो. अगदी साधनशुचितेचा आव आणणारे तुमचे गांधी-नेहरू यांना सदोबा पाटलांचे लक्षावधी रुपयांचे निवडणुकीचे फंड चालतच होते की नाही! आता पाटील हे पैसे कसे उभे करीत हे त्यांचे त्यांना माहीत. काँग्रेसला निवडणुकीसाठी कोटी-दोड कोटी रुपये परवा मिळाले, हे सर्व स्वकष्टाचे पैसे होते का? हे पापाचेच पैसे असणार. मोठमोठ्या उद्योगपतींना करोडो रुपयांचे लायसेन्स-परमिट-परवानग्या लागतात. त्या सुखेनैव, विनाविलंब देण्यासाठी थोडी थैली ते सैल सोडतात, आपखुषीने सोडतात-त्यात मोठेपणाही मिळतो आणि कामेही होतात. मोरारजी देसायांचा लंपट मुलगा कांतीलाल याला किर्लोस्कर कुटुंबाने आपली मुलगी दिली. मुलाचे वर्तन वाईट असा बोभाट होताच. त्यात शिक्षण पूज्य. आता काय कारण होते या शरीरसंबंधाला. मोरारजींनी स्वतः जातीने किर्लोस्करांवर नसेल केली मेहेरबानी. पण हीच किर्लोस्कर मंडळी मोरारजींच्या घरी राहून सचिवालयातील आणि दिल्लीतील सारी कामे करीत होती. मोरारजींच्या व्याहोपणाचा फायदा किर्लोस्करांनी मिळवलाच. मोरारजीनी पैसा लाच म्हणून घेतला नाही हे खरे, पण चांगली सुलक्षणी सून लाच म्हणून घेतली-मंडळी, हा व्यवहार आहे.'

या सर्व हकीकतींवर मी काय बोलणार! त्याने टेंडर फॉर्म माझ्याकडे टाकला आणि टेंडर आहे कशाचे ते मला विचारले.

मी टेंडर फॉर्म वाचू लागलो आणि थक्क झालो. मध्यवर्ती गृहमंत्र्याने जगातल्या प्रमुख देशात सदर टेंडरची जाहिरात केली होती, तशीच टाटा-बिर्ला-किर्लोस्कर यांच्यासाठी स्वदेशातही केली होती. ते टेंडर येणेप्रमाणे होते-

जाहीर लिलाव. भारताचा जाहीर लिलाव.

गृहखाते टेंडर क्रमांक ४२० (शासनविषयक) रक्कम १८०० कोटी किंवा अधिक.

टेंडर भरणारास शासनविषयक अनुभव हवा. अमेरिका, रशिया, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी (पोर्तुगाल-पाक-चीन सोडून) कोणत्याही देशाच्या राज्यकर्त्यां

पक्षाला किंवा संस्थेला टेंडर भरता येईल. स्वदेशात टेंडर भरण्यासाठी, परवानगी-साठी जॉर्ज फर्नांडिस, ज्योती बसू, नंबुद्रिपाद, मधु लिमये यांचे सर्टिफिकेट हवे. बयाणा–अमेरिकेच्या कर्जाची रक्कम. (अमेरिकेनेच टेंडर भरला तर प्रश्नच मिटला–)

अलीकडे या देशाचा कारभार त्रासदायक होऊ लागला आहे. संस्थानाधिपती नेहरू यांचे निर्याण झाल्यापासून राज्यकर्त्या पक्षाची झोप उडाली आहे. सर्व पुढाऱ्यांचे आसन अस्थिर आहे. 'घेराव', 'बंद', 'संप' यायोगे सर्वत्र अंदाधुंदी माजली आहे. वर्षानुवर्षे अधिकारावर राहिलेली मंडळी बेकार होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. ह्या बेकार कार्यकर्त्यांना अन्य काहीच उद्योगधंदा येत नसल्यामुळे त्यांच्या रोजगारीविषयीचा यक्ष प्रश्न कसा सोडवावा हीही अडचण आहे.

स्वातंत्र्य संपादण्याच्या कामात जे गुण होते तेच आता अवगुण ठरले आहेत. त्यामुळे ५० कोटी लोकांचा हा गाडा ओढण्याची शक्ती आमच्या व कोणत्याही पक्षात नाही. शासनाचा अनुभव नाही. इथली हवाही नवे काही शिकण्यास उपयोगी नाही.

यास्तव आम्ही जगातील व स्वदेशातील (परवानगी– मधु लिमये) तमाम शासनकर्त्यांना आवाहन करतो की, खालील अटीनुसार भारतीय शासन चालविण्यास जो अधिकात अधिक दराचे टेंडर पाठवील ते आम्ही मंजूर करू. (आता वेळ घालवू नये आणि पैसे रोखीत आणावेत. दम निघत नाही.)

दरमहा खालील रकमा रोख घरपोच पोहोचवाव्यात.

अटी:–प्राइममिनिस्टर–दरमहा दहा हजार रुपये.

(अन्य नेहरू कुटुंबातील मुले कुठे तरी चिकटून घ्यावी.)

इतर मंत्री ७५००
राज्य व उपमंत्री ५०००
खासदार २५००
प्रांताचे मंत्री ३०००
उपमंत्री १५००
आमदार १०००
राजकीय पक्षाचे पुढारी २५००
जिल्हाबोर्डाचे अध्यक्ष २०००

कार्यकर्ते (गुणवत्तेनुसार) १५०० पर्यंत

विनोबा भावे (आश्रमासाठी) प्रतिवर्षी १००००००

जयप्रकाश–पाकिस्तान व चीनची वकिली करण्यासाठी–१००००००

शेख अब्दुल्ला–उटकमंडला बंगला व ६००००.

ज्योती वसू–चीनचा पासपोर्ट.

(तपशील मागाहून जाहीर करू)

वरील सर्व असामींना साखर, दूध, धान्ये, परदेशी वस्तू भरपूर मिळाव्यात. मंत्र्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय परदेशात करावी. संप, घेराव, बंद यापासून मंत्र्यांचा व पुढाऱ्यांचा बंदोबस्त व बचाव करावा. चीन व पाकिस्तानशी युद्ध लढून ते जिंकण्याची कोशिस करावी. हारजीतीशी आम्हाला कर्तव्य नाही. मात्र वर्तमान-पत्रे किंवा ना. ग. गोरे यांना त्याविरुद्ध बोलू दिले जाऊ नये.

रेल्वे अपघात तावडतोब थांबवावेत. निदान मंत्री–आमदार प्रवास करीत असणाऱ्या रेल्वेना अपघात होता कामा नयेत.

श्रीमंत-सधन शेतकऱ्यांना कोणतेही कर नसावेत.

उसाच्या कारखान्यात ऊस नसला तरी साखर निर्माण करण्याची साधने बसवावीत.

प्रत्येक जिल्ह्यात एक धरण बांधावे. नदी नसली तर एक-एक तरी नदी अमेरिकेहून मागवावी.

प्रत्येक प्रांतात एक-एक लोखंडाचा कारखाना काढावा. मग त्या लोखंडाचे काय करावयाचे हा प्रश्न उद्भवू नये म्हणून त्या लोखंडाची पुन्हा लोहमिश्रित माती करावी. ती जपानला निर्यात करावी.

कोणास कोणत्याही भाषेत व्यवहार करण्याची मुभा असावी. उत्तरे कोणत्याही भाषेत मिळावी. त्यामुळे सर्वच भाषा सर्वांना येऊ लागतील.

सर्व सरकारी नोकऱ्यांतील मद्राशांचे, सैन्यातील पंजाब्यांचे, मंत्र्यांतील संयुक्त प्रांताचे, व्यापारातील गुजराथ्यांचे आणि काश्मीरमधील मुसलमानांचे प्रमाण कायम ठेवावे.

(आणखी तपशीलासाठी भेटा–त्या त्या देशातील वकिलाती–)

चीनला टेंडर भरण्यास परवानगी मिळावी यासाठी केरळहून व बंगालहून मोर्चा निघाला आहे–नेते ज्योती वसू, नंबुद्रिपाद, रणदिवे. रशियाला टेंडर द्यावे यासाठी स्वतः डांगे यांच्या नेतृत्वाखाली एक प्रचंड मोर्चा निघाला आहे.

अमेरिकेसाठी मोरारजी देसाई, पाटील, प्रभाकर पाध्ये आदी लोकांचे शिष्टमंडळ अगोदरच खास विमानाने गेले आहे. परंतु अवास्तव रोख रकमा बरोबर नेल्यामुळे वजन वाढले व हे विमान मधेच उतरवावे लागले.

आहे हाच कारभार चांगला आहे, यास्तव टेंडर काढूच नये, असे मत यशवंतरावांनी व्यक्त केले. त्यामुळे महाराष्ट्र काँग्रेस कमिटीची पंचाईत झाली, कारण त्यांचे मत टांगानिकाचे टेंडर स्वीकारावे असे होते, ब्लिटझचे करंजिया व कृष्ण मेनन यांनी नासरसाठी खटपट करावयाचे ठरवले होते. पण त्यांची गाडी दादर

स्टेशनवरच अडवून वाळ ठाकरे यांनी त्यांची गाढवावरून धिंड काढली. वाळ ठाकरे यांचे मत शिवसेना असताना–हिंदुस्थानच्या कारभाराची चिंता कशाला ! ठाणे नगरपालिकेचा शिवसेनेला अनुभव आलेला आहे. मात्र तेथल्या नगराध्यक्षाप्रमाणे झाकीर हुसेन यांनीही सांभाळून असावे. जनसंघाचे मत अजून ठरलेले नाही तरी पण हिटलरला शक्य तर बोलावून आणावे असे त्यांनी सुचवले, तेव्हा हिटलर मेला असे कोणीतरी पुटपुटले. मग वाजपेयींनी फ्रँकोला तार करण्याचे ठरविले. अगदीच कोणी नसेल तर शिवशाहीर ब. मो. पुरंदरे यांनाच छत्रपती करावे असाही विचार पुढे आला. अष्टप्रधानात अर्थात गो. नी. दांडेकर, गोळवलकर गुरुजी, वाजपेयी, मधोक ... आदी मंडळी आहेत. दिल्लीची राजधानी किल्ले रायगड येथे न्यावी लागेल एवढेच. नेताजी पालकरचे सरसेनापतिपद वाळ ठाकरे यांनी घ्यावे. वाटल्यास त्यांना शुद्ध करून घ्यावे.

सर्वात मौज केली ती प्रजासोशॅलिस्टांनी. त्यांना कोणाला बोलवावे हेच सुचेना. त्यांनी चुकीने द गॉल यांना तार पाठविली पण चूक लक्षात येताच लगेच टिटोला खलिता पाठविला. पण तोही चुकीचा निर्णय आहे असे ठरल्यामुळे साधना कार्यालयात सर्व देशांच्या आर्थिक धोरणाचा फेरविचार करण्यासाठी त्यांनी अभ्यास वर्ग चालविण्याचे ठरवले. मुख्य वक्ते रावसाहेब पटवर्धन, उपवक्ते–ग. प्र. प्रधान, यदुनाथ थत्ते–(सभा चालू आहे)

भारतातील मुसलमानांनी, परवानगी नसतानाही पाकिस्ताननेच टेंडर भरावे यासाठी मालेगाव, भिवंडी वगैरे ठिकाणी दंगली केल्या. (त्या जातीय नव्हत्या, असे दै. सकाळचे वृत्त.)

टेंडराची वाट पाहात मध्यवर्ती सरकारचे मंत्रिमंडळ पार्लमेंट हाऊसमधे वाट पाहात बसले आहे. कोणी नाहीच आले तर अमेरिकन गहू व शस्त्रास्त्रे आणि रशियन व्हेटो यांच्या बळावर राज्य चालविण्याचे ठरले.

जनता ... तिचा काय संबंध मंडळी ?

दिनांक १७ डिसेंबर १९६७

● ● ●

छत्रपती शिवाजीचा रजेचा अर्ज

मेहेरबान गृहमंत्री–मध्यवर्ती सरकार–माननीय प्रतिशिवाजी यशवंतरावजी यांसी ...

खऱ्या शिवाजीचा अर्ज की,

मोठ्या नाखुषीने गेली तीन-साडेतीनशे वर्षे दगडी चबुतऱ्यावर तुमच्या सर्वांच्या प्रेमाखातर मी उभा आहे. मी कधीही क्षणभराचीही विश्रांति आजपावेतो घेतलेली नाही, इकडे स्वामीजी, लक्ष ठेवावे. वर्षाला एक महिना भरपगारी रजा हे तत्त्व सरकारने सर्वांचे बाबतीत लावले असताना गेल्या अनेक वर्षांत एक दिवसाचीही विश्रांति मला मिळू दिली गेली नाही. अलीअलीकडे तर माझ्यावर कामाचा एवढा भार पडू लागला आहे की, माझा दुसरा गुडघाही निकामी होऊन उभे राहणेच मला मुष्किल होईल. सदोदित मला कामाला जुंपणारे बाळाजीपंत देसाई (सारामंत्री), 'शिवशक्ती-शिवशक्ती' ओरडणारे प्रल्हादबुवा अत्रे, बाळ ठाकरे, बाबा पुरंदरे, गो. नी, दांडेकर आणि गावोगावचे बाळशिवाजी (फलटण-वगैरे) या सर्वांविरुद्ध माझी गंभीर तक्रार आहे. आपण या तक्रारीचा योग्य तो विचार करावा. आणि माझ्या नावाचा व्यापार करणाऱ्यांवर कायदेशीर इलाज योजावेत.

वास्तविक ज्या कार्यासाठी मी जन्म घेतला, ते यावनी साम्राज्य केव्हाच नष्ट झाले. दिल्लीचे मोगली बादशहा चंबूगबाळे आटोपून रावळपिंडीच्या दिशेने केव्हाच परागंदा झाले. बाटलेल्या मुसलमानांचे पुन्हा हिंदूकरण करण्याचे आणि हळूहळू हिंदूसमाज एकसंध करण्याचे माझे कार्य माझ्याबरोबरच संपून गेले. बजाबा निंबाळकरला मी केवळ हिंदू करून घेतले नाही, तर त्याला माझी मुलगी देऊन, पुन्हा समाजात प्रतिष्ठित केले. अलीकडच्या कोणी शिवाजी-प्रतिशिवाजीने असे काही केल्याचे ऐकिवात नाही. हिंदवी स्वराज्य हा शब्द तर तुम्हा सर्वांना आता स्फोटक वाटत असेल. गाई-ब्राह्मणांचा प्रतिपाल ही तुम्हाला कालबाह्य गोष्ट वाटत असेल. गोवधबंदी तुम्हाला अजूनही करता आलेली नाही. आपल्या या निधर्मी राष्ट्राचे भाग्यचक्र तुम्हाला गोवधबंदीत अडकलेले आहे, असे भय वाटते. मुसलमानांच्या नाजूक हृदयविकाराचा तुम्ही साक्षेपाने विचार करता. त्या विचाऱ्यांना गोवधबंदीने डागण्या होतील, असा तुम्हाला शक येतो. म्हणून गाईच्या रक्षणाचे कार्य तुम्ही धेनुदास डोळ्यांच्यावर सोपवून, डोळे मिटून वेऊन शेळीच्या रक्षणासाठी सिद्ध झालात.

गाईचे एक असो. त्यांचे दुःख त्यांना थोडेच सांगता येते. ब्राह्मणांच्या प्रतिपालाचे काय ? जसे त्यांनी तुमचे जे काय बरे-वाईट केले तसा तुमच्या उद्धाराचा रस्ताही दाखविला. आज बहुजनसमाजाच्या हातात ज्या लोकशाहीच्या शासनामुळे सत्ता आली ती लोकशाही ब्राह्मणांनीच येथे आणली आणि रुजविली. महाराष्ट्रातील शिक्षणसंस्था व सामाजिक संस्था याही ब्राह्मणांनीच उभ्या केल्या. ज्या स्वातंत्र्याची फळे आज तुम्ही चाखता आहात, ते स्वातंत्र्य आणणाऱ्या चळवळी ब्राह्मणांनीच केल्या. त्या ब्राह्मणांचे वैर आणि सर्वनाश केल्यानंतर दिल्लीश्वरांच्या पुढे उभी राहण्यालायक चारदोन तरी माणसे आहेत कुठे तुमच्याजवळ ? मग महा-

राष्ट्राची वाजू कर्नाटकापेक्षा उणी का न पडावी ? एवढचा चार कोटीच्या देशात ब्राह्मण जातीचा एखादासुद्धा मंत्री तुम्हाला मिळू नये, याचे मला खरोखरीच आश्चर्य वाटते. गांधीवधाचे निमित्त करून आधीच मेलेल्या भटा-ब्राह्मणांची पडकी घरे जाळणाऱ्यांच्या तोंडी जयजयकारासाठी नाव येत होते तेही एका ब्राह्मण नेहरूंचेच, हेही गंमतीचे आहे ? कॉ. डांगे, एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे, मधु लिमये, राजगोपालाचारी ही सारीसुद्धा दुर्दैवाने ब्राह्मण मंडळीच आहेत.

ब्राह्मणांचे एक राहो. 'मराठा तितुका मेळवावा' या समर्थ उक्तीप्रमाणे निदान मराठे तरी एकदिलाने उभे राहावेत. तर त्यात आणखी शहाण्णव कुळीचे मराठे हे एक लफडे जागे झालेलेच आहे. पूर्वी पाळेगार, गावगुंड यांचा जो उपद्रव मी नष्ट केला तो पुन्हा आता जोराने फोफावलेला दिसतो. आणि मोगलांनी जसा महाराष्ट्र देश लुटून फस्त केला तसा पांढऱ्या टोपीवाल्यांनी हा देश लुटण्याचा सपाटा चालविला आहे.

गोब्राह्मणप्रतिपालक या माझ्या विरुदावलीची झाली तेवढी मस्करी आता पुरे. असा मी कोणता अपराध केला, की ज्यासाठी कथा, कादंबऱ्या, नाटके यामधे तुम्ही मला रावबावे. मी केलेल्या, न केलेल्या अनेक गुन्ह्यांची सजा रायगडला जाग आणून तुम्ही प्रत्येही देत आहात. खरं सांगू माझा मलाच आता कंटाळा आला आहे, मला थोडी विश्रांती हवी आहे. ही विश्रांती तुम्ही मला घेऊ देणार नाही याची मला खात्री आहे. तुमच्या उत्साहाला सीमा नाही आणि ऐतिहासिक सत्याची तुम्ही कधी कदर करीत नाही. वास्तविक आग्ऱ्याहून सुटका हा माझ्या लेखी माझ्या आयुष्यात फार गंभीर प्रसंग. पण आज तीनशे वर्षानंतर या घटनेला काही महत्त्व आहे का ? माझ्या दैनंदिन बऱ्यावाईट गोष्टीपेक्षा ज्यासाठी मी झगडलो ती तत्त्वे मोठी होती. पण तुम्हा लोकाना ती सोयीची नाहीत. त्यासाठी तीनशे वर्षांपूर्वी मी घालत असलेले पोषाख घालून मी चाललो त्या रस्त्याने जाण्याचा खुळेपणा करण्याची काही लोकांची तयारी आहे. मी जेव्हा महाराष्ट्रातल्या काना-कोपऱ्यातून हिंडलो, तेव्हा मोगल पाठीवर होते. स्वजनात फितूर होते, दाट दाट जंगले होती, जंगलात हिंस्त्र श्वापदे होती. माझ्या पावलावर पाऊल टाकून महाराष्ट्र तुडविणाऱ्या या शेंबड्या मुलांची मला कीव वाटते. कारण थर्मास, बॅटरी, रिव्हा-ल्व्हर, उत्तम पायरस्ते आणि संरक्षणासाठी सोबती घेऊन शिवाजीची वाट पुसणाऱ्या या खुळ्यांना इतिहासही कळत नाही, भूगोलही कळत नाही.

राजेरजवाडे मोडीत चाललेल्या या देशात माझ्या सामान्य कुवतीच्या वंश-जांच्यापुढे मुजरे घालणाऱ्या या हुजरेसंप्रदायाने माझी जी बदनामी होते त्यासाठी तरी बाबा पुरंदरे आणि गो. नी. दांडेकर या दोघांना गिरफदार करून रायगडावर नजरकैदेत ठेवले पाहिजे. मुजरा सिंहासनापुढे असतो, ज्ञानापुढे असतो, सेवेपुढे

असतो. केवळ 'भोसले' या नावासाठी नसतो. 'आग्र्याहून सुटका' स्मृतिदिन याप्रमाणेच 'शाहिस्तेखान अंगुलीकर्तन दिन,' 'अफझुलखान–वध–दिन,' राज्यारोहणदिन, अष्टविवाह–दिन, संभाजीजन्मदिन, असे अनेक दिन साजरे करून शिवव्यापार करणाऱ्यांना तावडतोव ताळ्यावर आणावे व नीट स्वराज्यरक्षणाच्या कामास जुंपावे.

या दोघांचे एक राहो. तशी ही वाळबुद्धी मुलेच आहेत. पण तिकडे वाळ ठाकरेंनी माझे नाव वापरण्याचे काही कारण होते का ? केरळीय लोकांशी लढण्याचा मी कधी सल्ला दिला होता का ? मराठी–मराठी अशा संकुचितपणाचा मी कधी पुरस्कार केला होता का ! मी केली ती हिंदवी स्वराज्याची घोषणा आणि ठाकऱ्याचा हा कारटा नोकरीचाकरीच्या अडचणीच्या कामी उभारलेल्या चळवळीसाठी माझं नाव वापरून राहिला आहे. काय म्हणावं या कर्माला ! हिंदुस्थान एक करण्यासाठी मी चार पावले टाकली तर मुळातच त्रिखंड झालेल्या या स्वराज्याची आणखी शकले उडविण्यासाठी झपाटलेला हा वेडापीर दहा पावले पुढे गेला आहे. त्यातल्या त्यात एक गोष्ट वरी आहे. हा जर यशस्वी झाला तर माझे पुतळे काढून टाकून तो आपलेच पुतळे त्या जागी उभारील आणि माझी सुटका करील.

या सर्वांवर कडी केली आहे ती त्या वरळीच्या अफझुलखानाने. महाराष्ट्रातील पवित्र देवदैवते आणि आदरणीय मूर्ती यांचे भंजन करीत आलेल्या अफझुलखानाचा (साधनशुचितेचा विचार न करता) मी वध केला. महाराष्ट्रातल्या सर्व आदरणीय व्यक्ती, संस्था आणि कर्तृत्वस्थाने यांचा पदोपदी विध्वंस करणारा हा अफझुलखान अद्यापि सामर्थ्यशाली आहे. त्याच्याकडे अजून कोणीच लक्ष का देत नाही ?

प्रतिशिवाजी यशवंतरावजी, माझी पुष्कळच कामे वाकी राहिली असली तरी आता माझ्या नावाचा चाललेला हा व्यापार मला बघवत नाही. केवळ माणुसकीला स्मरून तुम्ही आता मला रजा द्या. आपला इतिहास तसा चांगला सुपीक आहे. तुमच्या राजनीतीला शोभण्याजोगे असे अनेक पुरुष इतिहासानं उत्पन्न केले आहेत. राघोवा आहेत, दुसरे बाजीराव आहेत–आता काही दिवस माझा नाद सोडा. ही गोष्ट खरी की, माझं नाव सोडायचे म्हटले की, पुष्कळांच्या चरितांचे साधन नष्ट होईल. पण त्याला माझा काही इलाज नाही. कृपा–लोभ नसावा ही विनंती.

कळावे

आपला

गोब्राह्मणप्रतिपालक

शिवाजी शहाजी भोसले

(हल्ली मुक्काम–गोवा हिंदू असोसिएशन, मुंबई.)

दि. २६ नोव्हेंबर १९६७

● ● ●

एक समजूदार निर्णय !

'आज तू अशी चिंताक्रांत का दिसतेस'

'खरंच दिसतेय ?'

'तर !'

'चिंता वाटावी असं पुष्कळ घडलंय.'

'का बुवा. चांगली दोनचार लाख यात्रा परवा जमली. खूप गर्दी झाली. साऱ्या वडव्यांच्या, पुजाऱ्यांच्या, दुकानदारांच्या तिजोरीत आणखी थोडी भर पडली. 'पंढरपूर नुसते गाजून राहिलं... मग रुक्मिणी, चिंता कसली तुला–'

'तुमचं बरं आहे. तुम्ही नाही तरी फार भोळे आहात. तुम्हाला राग कसा तो माहीत नाही. बाहेर काय चाललंय याची काही कल्पना तरी आहे का तुम्हाला.'

'का बुवा, सारं काही ठीक आहे. मंत्र्याचे दौरे, आश्वासने, योजना चालू आहेत. यशवंतरावजींचा दरारा कायम आहे–देवाधर्मावरचे प्रेम वाढत आहे. चैतन्यानंद, विज्ञानानंद, मेहरबाबा, साईबाबा, रजनीश... कितीतरी संतमहंत केवढी गर्दी जमवीत आहेत. वा ऽ वा–मन कसं प्रसन्न होतंय, हा भक्तिभाव पाहून.'

'हेच ते, कोणी टाळ कुटले की तुम्हाला तिथे भक्ती दिसते. हे सारे 'आनंद' आणि 'बाबा' देवधर्माचा व्यापार करतात. चैनीत राहतात. गाड्या उडवतात. लोकांना अधूनमधून आत्मा–अविनाशी तत्त्व–त्याग, अहंकार–परमात्माप्रवेश वगैरेच्या अफूच्या गोळ्या (त्याही इंग्रजीतून)... दिल्या की मंडळी खूष. कसला देव–कसला धर्म–कसले तुमचे प्रेम.'

'जाऊ दे झालं. तू का चिंता करतेस. अग हे असंच चालायचं. आता लोकशाहीचा जमाना आलाय. देवांनी सुद्धा लोकांचे मन सांभाळून नको का ऱ्हायला. थोडं लोकांच्या मनासारखं करायला हवंच–'

'ते खरे. पण आता आपली पूजा–अर्चा करणारे बडवे. त्यांच्या कारभारात सरकार हस्तक्षेप करणार आहे म्हणे.'

'काय बिघडले. बरेच होईल. हे हरामखोर बडवे पुजारी चांगले गुंड झालेत. त्यांना धडा शिकविलाच पाहिजे.'

'पण त्यांचा कित्येक वर्षांचा तो हक्क आहे. त्यांना सोडून आपल्याला तरी करमेल का–'

'त्याला काय झाले. चांगले पुंड झालेत लेकाचे. दलाली करण्यात जन्म गेला हरामखोरांचा. देवळे सरकारने खुशाल ताब्यात घ्यावी, येणारे उत्पन्न वारकऱ्यांच्या सुखसोयीकडे खर्चावे. गरीब बिचारे माझे भक्त. त्यांचे दर्शनसुद्धा मला नीट घेता येत नाही. कोणी श्रीमंत तालेवार किंवा मंत्री आला की तास तास दारे बंद करून घेऊन या भक्तांना उन्हातान्हात बाहेर तिष्ठत ठेवतात.

'अहो, एकदा बोललात ते बोललात, पुन्हा मंत्र्यांच्याबद्दल अगदी बोलू नका.'

'का ?'

'आता काय सांगावे तुम्हाला, मंत्री काय हवे ते करू शकतील. पूर्वी तुम्ही जे जे चमत्कार केलेत त्याचे आज काहीच नाही. आजचे मंत्र्यांचे कितीक चमत्कार तुमच्यापेक्षा भव्य आणि विपुल आहेत–!'

'उदाहणार्थ.'

'अहो, परवा अकोल्याचे वारकरी बोलताना मी ऐकले की कृषी विद्यापीठ प्रथम राहुरीला होण्याचं ठरलं. सर्व गुणावगुणांचा विचार करून जागा ठरली. विदर्भात त्या निर्णयाविरुद्ध दंगली झाल्या.'

'वैदर्भीय मुख्यमंत्री, पाटबंधारे मंत्री, अर्थमंत्री असताना–'

'अहो त्यांना कोण विचारतोय. एवढ्या असंतोषाची कल्पना येत नाही तो प्रतिनिधी कसला आणि करोडो, लाखो रुपयांची आणि माणसांची हानी होते, असला असंतोष थांबवता येत नाही तो लोकनायक कसला ? नुसते मेले शेणाचे पुतळे–'

'असे म्हणू नकोस. शेवटी नाईकाने मार्ग काढलाच की नाही शोधून–'

'हा कसला कपाळाचा मार्ग. वरं, मग हे आधी सुचायला काय अक्कल लागत होती. आणि त्यासाठी साहेबांचा वेळ कशाला खायचा.'

'वेडी कुठची. अगं इथले दंगे होतात तेही साहेबांच्या कृपेने. आणि विझतात तेही साहेबांच्या कृपेने. अग, ही माया आहे नुसती. बुद्धीवळाच्या पटावरची प्यादी हलवण्यासारखे ब्रह्मांडनायक साहेब हस्तिनापुरी राहून इथला सारा कारभार करतात– '

'असेल बाई–पण त्यांना तरी आधी का सुचू नये म्हणते ते.'

'सुचलं होतं.'

'मग'

'सुचल्यावर लगेच गोष्टी करायला तो काही सामान्य नागरिक का आहे आणि तसे झाले असते तर त्या विद्यापीठाचे महत्त्व वैदर्भियांना कळले नसते. शिवाय साहेबांच्या शक्तीचे प्रदर्शन व्हायला नको का ग !'

विषय निघाला म्हणून सांगते. ही एक वाईट परंपरा पडली असं वाटतंय

मला. उद्या जे जे महाराष्ट्राला द्यायचे ठरेल त्यातले एक एक विदर्भ–मराठवाडा-कोकण यांना द्यायला नको का ? समजा, उद्या बाळासाहेब देसायांनी पुन्हा लग्न करायचे ठरवले तर शिवाजी महाराजाइतक्या नाहीत पण निम्म्या तरी वायका त्यांना करायला हव्यात की नाही.'

'नाही समजलो.'

'बाळासाहेब देसायांसारखा कर्तबगार जावई एकट्या महाराष्ट्राला का असा प्रश्न उत्पन्न होईल. पण त्यांना एक अकोल्याची, एक राहुरीची, एक परभणीची, आणि एक मालवणची अशा एकूण चार सोयरिकी कराव्या लागणार–'

'आयला गम्मत आहे की ग. आपल्या वेळेला या गंमती नव्हत्या बघ. पण मला वाटते चारांची तूर्त गरज नाही. मराठवाडा आणि कोकण इथली मंडळी अजून दंगली करायला शिकलेली नाहीत, तेव्हा त्यांच्या तोंडाला पाणी पुसायला हरकत नाही. तूर्त विदर्भ आणि महाराष्ट्र यांच्यात मात्र समान वाटणी केली पाहिजे–'

'त्यातल्या त्यात ठीक आहे म्हणा ते.'

'का ग'

'तुम्हाला सांगावे का नाही याचा विचार पडलाय'

'सांग, आता कोणी ऐकायला नाही.'

'अहो, परवा काही वारकरी भांडत होते–'

'कशावद्दल–'

'पंढरपूर विदर्भाला लांब पडते म्हणून त्यांच्या तक्रारी चालू होत्या. नाईकांना निर्वाणीचा खलिता पाठवून विदर्भात एक पंढरपूर असावे अशी चळवळ करायचा त्यांचा विचार आहे.'

'हॅड–काहीतरीच चळवळ आहे.'

'अहो खरेच सांगते–अगदी सीरियस–आता अकोला–अमरावती पेटणार, आमच्यावर अन्याय होतो, आमच्या पायाला एवढ्या लांबवर चालून फोड आले, आम्हाला पंढरपूर हवे, या आरोळ्यांनी वैदर्भीय जनतेची अस्मिता का काय ती जागी होणार. मग गोळीबार –कर्फ्यू–'

'खरंच होईल म्हणतेस.'

'अहो ते वारकरी काँग्रेसचे आमदारच आहेत. गुणवत्तेचा विचार करूनही पंढरपूर वर्धेच्या काठी असावे असा निर्णय त्यांच्या समितीने घेतलेला आहेच आणि त्यासाठी राजकीय दडपणाची जरूरी आहे असे तो तावातावाने म्हणत होता.'

'मोठी आफतच आहे. बरं पुढे काय–'

'असंतोष–दंगल–चर्चासत्रे–वैदर्भीय जनता प्रक्षुब्ध का झाली आहे याचा शोध–आत्मपरीक्षण–समजुतीच्या बैठकी–'

'आणि मग–'

'साहेबाचे मुंबईत आगमन. त्यांच्या अधिपत्याखाली मंत्रिमंडळाची एक बैठक आणि समजूतदार निर्णय–'

'कोणता–'

'त्यामुळेच थरकाप उडालाय माझा. कारण तो आमदार म्हणाला, चळवळीपूर्वीच साहेबांनी या तडजोडीचे आश्वासन दिले आहे–'

'आधीच–'

'भोळे आहात तुम्ही विठ्ठलपंत. अहो त्यांनी आश्वासन दिले म्हणून तर ही चळवळ सुरू होतेय–'

'मग सांग तरी, काय होता तो अमृतमय तडजोडीचा उपाय ?'

'विठोबा हे पंढरपूरचे दैवत. पंढरपूराचा विठ्ठलावर हक्क. तेव्हा विठ्ठलाचे मंदिर पंढरपुरातच असू द्यावे.'

'आणि मग–'

'मला येथून हलवून माझी वर्धेकाठी स्थापना ऽ ऽ'

विठ्ठल मूर्च्छितच पडला. तरीपण विटेवर उभा होता. पुढचे सारे त्याच्या डोळ्यासमोर साक्षात उभे राहिले. काँग्रेस आमदारच जर बोलला असेल तर मग फक्त साहेबांचे शिवाय ते वदलणे शक्य नाही. वर्षानुवर्षे सुखाचा संसार करणारी पतिव्रता रुक्मिणी आता दूर जाणार या कल्पनेने त्याला अश्रू फुटले.

अखेरी लोकांचा देव तो. विदर्भाचे आणि महाराष्ट्राचे मनोमन मीलन होण्यासाठी तर तो अठ्ठावीस युगे कटीवर हात देऊन उभा आहे. आपल्या भक्तांसाठी त्याने आजवर काय केले नाही ? मन घट्ट करून त्याने या लोकशाहीतील अभूतपूर्व समजूतदार निर्णयासाठी सामोरे जाण्याचे ठरवले आहे.

साहेब पुण्यात आले की त्यांना विचारण्यासाठी पुंडलिकाला पाठवावे का स्वतःच त्यांना सामोरे जावे याचा तो तूर्त विचार करीत आहे.

'विठ्ठल विठ्ठल–'

दिनांक ८ डिसेंबर १९६८

● ● ●

सत्य-अहिंसेच्या प्रयोगाचा जय असो !

महाराष्ट्र सरकार लॉटरी सुरू करून एक विक्रमी इतिहास निर्माण करीत आहे. तसे महाराष्ट्र सरकार फार व्यवहारी अन् शहाणे आहेच आहे. आपल्याला दारूबंदीचे पालन करणे अशक्य आहे असे कबूल करून त्यांनी दारू मुक्त करून टाकण्याचे धाष्टर्य दाखवले. आता साखर कारखान्यापेक्षा सहकारी रम कारखाने काढण्याची अहमहमिका लागली आहे. त्याचप्रमाणे मटका या लोकप्रिय जुगाराला आळा घालणे आपल्याला जमत नाही, यावर तोड म्हणून सरकारने मटका चालू करावा अशी सरकारी पातळीवर चर्चासुद्धा झाली. होईल, सरकारी मटका आज ना उद्या सुरू होईल. फूल नाही फुलाची पाकळी म्हणून मटका नाही तर लॉटरी सुरू करण्याचे सरकारने ठरवून लॉटरीची स्कीम तयार करण्यास अर्थखात्यास सांगितले आहे. जुगाराचे स्वरूप सरकारमान्य झाल्यास कोर्ट व पोलीस यांचे कामकाज कमी होईल असा भरवसा सरकारला वाटतो. त्यायोगे सरकारी खर्चात वचत किती होईल त्याचाही अंदाज घेतला जात आहे. ही एक नवीच जाणीव यावेळेस सरकारला झालेली आहे. म्हणून सरकारचा हा निर्णय सुवर्णाक्षरांनी किंवा मद्याक्षरांनी लिहून ठेवावा असे आम्हास वाटते. (महात्माजींच्या जन्मशताब्दीनिमित्त हा एक खास कार्यक्रम.)

एखादा अव्यवहारी किंवा मोरारजींसारखा मुख्यमंत्री जर या मौलिक क्षणी महाराष्ट्राचा नेता असता तर महाराष्ट्राचे केवढे नुकसान झाले असते याची लोकांना कल्पना नाही. (आम्हालाही नाही.) परंतु जुगार राजमान्य करून लॉटरीचा धंदा सरकारने करावयास त्या तिरपगड्याने नक्कीच फांदा पाडला असता. इतर राज्यांनी लॉटरी सुरू केली म्हणून आपण ती सुरू न करता त्यांच्याच लॉटरी वर बंदी करावी असेच तो म्हणाला असता. पण कल्याणकारी लोकशाही राज्यात आपले हट्ट लोकांवर लादण्यात अर्थ नसतो. लोक सुधारणे हे फार वेळचे महागडे काम असते. त्यापेक्षा जशी जनता राहते तेच राष्ट्रीय व सरकारमान्य जीवन केले तर ते अधिक सयुक्तिक आहे. लोकशाहीला धरून आहे. (असे गांधीवादी काँग्रस सरकारचे मत)

वघितलेत–आपण एका महान प्रयोगाला कशी नकळत सुरवात केली. आपली सक्ती हकनाक वाया घालवण्यापेक्षा जे घडते आहे त्यालाच शास्त्रशुद्ध स्वरूप देऊन सरकारची जमावंदी वाढवणे हे नव्या युगाचे मागणे आहे. सरकारने आणखी काही कल्याणकारी योजनांची पहाणी चालू केली आहे.

वेश्याव्यवसाय हा जगताला फार जुना व्यवसाय आहे. अनेक राजवटींनी तो व्यवसाय बंद करण्याचा यत्न केला. तो तसा का केला हे आम्हाला कळत नाही पण मनुष्यस्वभावातील या व्यवसायावरील आकर्षण न उमगल्यामुळे ही बंदी झाली. तरीही हा व्यवसाय चोरूनमारून चालूच राहिला. हा अत्यंत महत्त्वाचा व्यापार सरकारने हाती घेतल्यास सरकारला ५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल असे छातीठोकपणे सांगणारे आजच्या मंत्रीमंडळावर पुष्कळ मंत्री आहेत. चोरून-मारून व हलक्या लोकांनी चालवलेल्या या व्यवसायात रोगराईची भीती असते. शिवाय गरज असूनही लोकनिंदेच्या भीतीने हा व्यवसाय बरकतीने करता येत नाही. त्या मुळे लोकांनाही मनाजोगता माल उपलब्ध होत नाही.

सरकारने पूर्ण विचार करून महत्त्वाच्या ठिकाणी सरकारी वेश्यालये स्थापण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील धंदा करू इच्छिणाऱ्या सर्व स्त्रियांची वर्गवारी करण्याचे काम चालू झाले आहे.

जमावंदी मंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांच्याकडे हे खाते सोपविल्यास त्या खात्याकडून सरकारला भरपूर आदा होईल असे सर्वांना वाटते. त्या दृष्टीने गावोगावी जाऊन योग्य त्या व्यापारपेठांची व मालाची चाचपणी करण्याच्या दृष्टीने त्यांनी आरंभ करावा अशी सूचना त्यांना मिळालीही आहे. प्रांतिक वाद विसरून अखिल भारतीय पेठातून सरकारी वेश्यालयाला पुरवठा व्हावा यास्तव ते भारतदौरा करणार आहेत.

सरकारी वेश्यालयाची उभारणी करण्यासाठी खास सोयिस्कर इमारतीचे डिझाईन बनविण्यात आले असून काम होताच परस्पर जाता यावे यासाठी मागच्या व पुढच्या दाराची योजना खास केली आहे. इमारती वातानुकूलित असून त्यातील प्रत्येक इमारतीतील सरकारी मंत्री व पुढारी यासाठी राखीव जागा आहेत. लाल त्रिकोणाचे प्रवेशद्वारातून आत जाताच सरकारी ट्रेझरी आहे. तेथे पैसे भरून मगच वेश्यालयाच्या अंतर्गृहात प्रवेश मिळतो. या धंद्यावर भलत्याच लोकांनी गबर व्हावे व गरजूना नाडावे हे लोकशाहीला धरून नाही. या धंद्याचे राष्ट्रीयीकरण करून शुद्ध माल वाजवी दराने पुरविण्यास सरकार परकरबद्ध झाले आहे. (विना सहकार नही उद्धार).

आजच्या काँग्रेस मंत्रीमंडळाचा पूर्वानुभव लक्षात घेता, राष्ट्रीयीकरण करूनही

हा व्यवसाय वाढेल अशी आम्हाला उमेद वाटते. आम्ही सरकारी धोरणाचे अर्थातच समर्थन करतो.

गर्भपात करणे हा आजवर एक गुन्हा होता. पण गर्भपात करण्याची आवश्यकता केवढी असते हे आम्ही काँग्रेस पुढाऱ्यांना सांगावयास नकोच. अशा अत्यावश्यक गोष्टींवर बेकायदेशीरपणाचा आरोप करून वैद्, डॉक्टर, सर्जन या लोकांनी जनतेची लूटमार केली.

हे सरकार यापुढे गर्भपाताची सोय करणारी केन्द्रे चालविण्याचे ठरवीत आहे. या केन्द्राव्यतिरिक्त गर्भपात केल्यास मात्र गुन्हा मानण्यात येईल. गर्भपातगृहे चालविण्यासाठी निष्णात डॉक्टर व परिचारिकांची भरती करण्याचे काम चालू आहे. वाजवी दराने, गाजावाजा न करता मुले पाडण्यासाठी फक्त शंभर रुपये आकारण्याची शिफारस गर्भपात व्यवसायवृद्धि समितीने केली आहे. त्या व्यापारात काही नाही म्हणजे दोन तीन कोटी रुपये सरकारला मिळतील. शिवाय एक प्रकारे फॅमिली प्लॅनिंगला हा व्यवसाय उपयुक्तही आहे. लोकांनी याचा भरपूर फायदा घ्यावा. (दोन किंवा तीन पुरेत)

पुष्कळ वेळा काही पुढारी या लोकशाहीच्या कारकीर्दीत लोकांना, नेत्यांना व सत्तारुढ पक्षांना उपद्रव देतात. या पुढाऱ्यांना जीवे मारावेच लागते. (उदाहरणार्थ दीनदयाळ उपाध्याय) त्यासाठी हल्ली जो प्रकार चालू आहे त्यामधे जनतेची पिळवणूक होते. उदाहरणार्थ, एका तालुक्यातला एखादा पुंड आजच्या महान नेत्याविरुद्ध काही वेडावाकडा प्रचार करू लागला की त्याला खतम करण्यासाठी खूप पैसा खर्चावा लागतो. सरकारी आकडेमोड खात्याला असे आढळून आले आहे की अशा तऱ्हेने चारदोन कोटी रुपये दरवर्षी खर्ची पडत असतील. या तऱ्हेच्या व्यवहाराला सुपारी घेणे म्हणतात. मुंबईत अशा सुपाऱ्या घेऊन खून करणारे पुष्कळ गुंड आहेत. सुपारीचा हा व्यवसाय सरकारने केला तर गरजू लोकांना लुटण्याचे गुंडांचे काम आपोआप घटेल आणि लोकशाही अबाधित चालेल.

या सुपारी केंद्राची व्यवस्था आशा नाडकर्णी खटल्यातील मेहता–बलसारा द्वयीकडे देण्याचे घाटत आहे. (सत्यमेव जयते)

महात्मा गांधींच्या आशीर्वादाने हे सर्व व्यवसाय चालविण्याचे असल्यामुळे ते किफायतीत चालतील. अशा प्रकारचे जनतोद्धाराचे उपयुक्त धंदे सरकार स्वतःहाती घेऊन महात्माजींची शिकवण अमलात आणीत आहे हे पाहून आम्हास अभिनंदन करण्यावाचून गत्यंतर तरी कोठे आहे. मी. आझाद मिश्रण केंद्रे (येथे उत्तम भेस करून मिळेल) विनोबा हस्तोद्योग (खोटे पासपोर्ट, नोटा छापण्याचे शिक्षण केंद्र) आदी सर्व उद्योग चालू करून वकील, डॉक्टर, न्यायाधीश, या सर्वांची सर-

कार खाशी जिरवणार आहे. इतके दिवस या लोकांनी जनतेची गळचेपी केली, लूट केली. मरा लेकांनो उपाशी आता–

सहकाराचा विजय असो–
राष्ट्रीयीकरणाचा विजय असो.
सत्य, अहिंसा विजयी असो.
गांधी–नेहरू झिंदाबाद.
काँग्रेसराज्य झिंदाबाद.

दिनांक २ फेब्रुवारी १९६९ • • •

रामराज्याची पहाट आता फार दूर नाही

आपल्याला वाटते, भारतात आजच अंदाधुंदी–अनाचार– भ्रष्टाचार–काळाबाजार चालू आहे. असेच काही नाही. पूर्वी एकेकाळी असा प्रसंग इथे आला होता. त्यावेळेलाही हेच प्रश्न निर्माण झाले होते. तेव्हाचे सरकार जनतेचे होते. जनतेची जी नीती तीच याही सरकारची होती. लोक अशिक्षित, तर मग साक्षर लोकांचे सरकार तरी काय करायचं होतं तेव्हा ? लोकशाही या शब्दाला तेही सरकार जागणारे होते.

सुशिक्षित–नागर–बुद्धिवादी लोक नतद्रष्ट असतात. त्यांना लोकांचे राज्य पाहावत नाही. ते नाना खुसपटे काढत असतात. नाना शंका त्यांना सुचतात. एखाद्या मंत्र्याने थोडी इस्टेट केली की ते त्याची उगाचच निंदा करतात. वास्तविक ती मालमत्ता, तो मेल्यावर स्वर्गात का नेणार असतो ? ती इथेच राहणार असते. म्हणजे तो फारतर ती मालमत्ता काही काळ वापरणार असतो. एवढा गहजब करण्याजोगे त्यात काय असते ? आधीच हे विश्व नश्वर आहे. मंत्रीपद तर फारच नश्वर. तेव्हा क्षणकाल लाभलेल्या या काळाचा अगदीच उपयोग न करणे किती बरे खुळेपणाचे.

पण वर्तमानपत्रे उगाचच ओरडत सुटतात. दारूचेच पहा ना. ती फार घातक गोष्ट आहे. पूज्य बापूजींना ती आवडत नसे. मग अशी दारू समाजात कशी राहू

द्यावी ? दारूपायी खर्च होणाऱ्या रकमेत गरीबांचे दैन्य सरेल, घरात दिवाळी होईल–बायकापोरे सुखी होतील. पण हा नियम मंत्र्यांना का लावावा ? एक तर त्यांचा संसार सुखाचा चालू असतो. दारूमुळे आणखी सुवत्ता ती कशाला ? त्यांची मुलेसुद्धा हसतमुखाने बापाच्या जवावदारीत भाग घेतात. आणि शिवाय दारूविषयक प्रश्नाचा अभ्यास न करता दारूवर प्रवचन करणे अशक्य आहे. पुस्तके वाचल्याशिवाय परीक्षण करणे हरामाचे आहे. संगीत ऐकल्याशिवाय रसग्रहण कसे शक्य आहे ? केवळ याच बुद्धीने पुष्कळ मंत्र्यांना तोंड वाईट करून मद्याशी परिचय करावा लागतो. खरे तर ते त्यांचे कृत्य म्हणजे एक त्यागाचे उदाहरण. पण लोक म्हणतात हे ढोंगीपण झाले. अरे कृतघ्नांनो ! कुठे फेडाल ही पापे ? तसली घाण प्यायची या लोकसेवकाने अन् तुम्ही मात्र उसाचा रस, गुळाचा चहा, पाणीदार दूध वगैरे पेये घ्यावीत. धिक्कार असो तुमचा.

मंत्री काय, समाजधुरीण काय, साऱ्यांना आज काय–काय भोगावे लागते आहे ! त्यांना काय तिसऱ्या वर्गाचा प्रवास आवडत नाही. पूज्य बापूजीसुद्धा तिसऱ्या वर्गाने प्रवास करीत. पण तिसऱ्या वर्गात लोकच त्यांना बसू देत नाहीत. गर्दी करतात, मग गाडग्यांना उशीर होतो. जनतेच्या या प्रेमाला तोड नाही. पण रेल्वे ही जनतेची संपत्ती असल्यामुळे आणि ' वाघिणी चालत ठेवा ' या आदेशामुळे दारे झाकून घेऊन पहिल्या वर्गाच्या बंदिवासातून मंत्र्यांना प्रवास करावा लागतो.

भलतीकडेच मंडळी विषय चालला. अगदी मंत्र्यांच्या भाषणासारखा, दिशाहीन. पण मंत्र्यांची त्यात चूक नसते. त्या भाषणाचा जीवनाशी काही संबंध नसतो· समाजाशी नसतो. काही शब्द ... समाजवाद ... खेड्यातील जनता ... दुबळे बांधव ... संपत्तीचे समान वाटप ... सहजीवन. श्रमाचे महत्त्व. या शब्दांचे मूळचे अर्थ आता उरलेले नाहीत. त्यामुळे मधून मधून ' पूज्य बापूजी काय म्हणाले ... शिवाजी महाराजांचे रक्त ... आपली संस्कृती ... रामकृष्णांची शिकवण या कुवड्या घ्याव्या लागतात. बरे, यासंबंधीची पुस्तके वाचायची इच्छा का नाही मंत्रीमहाशयांची ? पण त्यांनी वाचावे केव्हा ? दाराशी भुकेली जनता दर्शनासाठी आलेली असताना कथा–कादंबऱ्या किंवा नाटके वाचून रोम जळताना फिडल वाजवणाऱ्या नीरोचे वंशज थोडेच व्हायचेय आपल्याला ...

पुन्हा विषय भरकटला. . .

तर काळावाजार, लाचलुचपत, भ्रष्टाचार वगैरे सर्वकाही त्याकाळीही समाजात होते. तेव्हा जनता त्यावद्दल तक्रार करू लागली. बदफैली बायका वाढू लागल्या, दूध दीड रुपया शेर झाले, साखर पाच रुपये झाली. लोकांनी केलेल्या या तक्रारी खऱ्या होत्या. मग त्या सर्व गोष्टींचा नायनाट कसा करावा ?

आपल्या मंत्र्यांसारखेच तेव्हाचे मंत्रीही शहाणे होते. पाप म्हणजे एक कल्पना.

आपण म्हणतो म्हणून ते पाप. मग आपण पापाला पाप म्हटलेच नाहीतर ? स्त्रियांना स्वातंत्र्याची देणगी दिली तर ? स्त्री दर महिन्याने शुद्ध होते. ती कोणाची गुलाम नाही. ती क्षणाची पत्नी अन् शतजन्मीची प्रेयसी ठरवले तर ! ठरवायचे आपणच ना ? मग उगाचच जे झेपणार नाही ते पुण्य मानायचे, यात काय हशील ?

त्याच चालीवर काळ्याबाजाराचे. रास्त दरापेक्षा अधिक दराने वस्तू बाजारात घ्याव्या लागतात ही गोष्ट पाहून सरकारला फार वाईट वाटते. पण म्हणजे काय ? शिवाय काळाबाजार का कोणी मनापासून करतो ? त्याही व्यापाऱ्यांना पोटे असतात. तेव्हा रास्त भाव आणि काळाबाजार यांच्यात तफावत जर न ठेवली तर मग असंतोष दूर होईल. सरकार तुमच्या सेवेला बसले आहे. तुमचे हित त्यांना पाहिले पाहिजे. आपण काळ्या बाजारात वस्तू घेतो यावद्दल तुम्हाला वाईट वाटते की नाही ? म्हणूनच सरकारने युक्ती केली. नेहमीचा बाजारच बंद केला. म्हणजे दीड रुपयात साखरेसारखी गोड वस्तू देणे कसे परवडणार ? पूज्य विनोबाजींना साखर आवडत नाही. साखरेचा अतिरिक्त वापर प्रकृतीस अपायकारक आहे. आपले सरकार दयाळू आहे, गरीबाचे हितरक्षण करण्यास ते तत्पर आहे. आता सरसकट साडेचार-पाच रुपयाला साखर मिळते. काळ्या व्यापाऱ्यांना उजळ माथ्याने जगता येऊ लागले. दलितांचा उद्धार तो हा असा करायचा असतो.

याच चालीवर सरकार यापुढे सर्व पापांची उचलबांगडी करणार. हल्ली सरकारपासून चोरून 'आकडे-मटका' वगैरे खेळावे लागतात. यात पैसा बुडण्याचा धोका असतो. शिवाय आपण गुन्हेगार आहोत ही जाणीव उगाचच पुष्कळांच्या मनात राहते. सरकार लोकांचे आहे. त्याचे हित सरकारने पाहिले पाहिजे. सरकार आता 'मटका व कॉटन फिगर' खेळण्याची सोय पोस्टापोस्टातून करणार आहे.

वेश्याव्यवसाय निंद्य ! का रे बाबांनो, वास्तविक स्त्री आणि पुरुष यांचे मीलन हे ईश्वरी चमत्कार आहेत. स्त्री का कधी पापी असते ? ती तर आदिमाया. तिच्याजवळ पाप असेलच कसे ? पुरुषाने आपले श्रम विकले तर पाप नाही; मग स्त्रीने विकले तर पाप का ? श्रमाचा प्रकार वेगळा खरा, पण यात नारी जातीवर अन्याय होतो. सरकार समतेचे भोक्ते आहे. वेश्या या शब्दाने अशा स्त्रियांना संबोधणे सरकारल. आवडणार नाही. त्या सेविकाच आहेत. शिवाय त्यांना घाणेरड्या वस्तीत राहावे लागते व लोकांना त्यांच्याकडे जाणे उगाचच अनीतीचे वाटते. कोणत्याही स्त्रीला कोणत्याही पुरुषाशी मोकळेपणाने चर्चा करता यावी अशी सरकारची इच्छा आहे. सरकारने गावोगाव या कामासाठी 'इन्स्पेक्शन' बंगले बांधण्याचे ठरवले आहे. हल्ली फक्त सरकारी अधिकारी व मंत्री या वास्तूचा उपयोग करतात. हा पक्षपात सरकारला मंजूर नाही.

कोर्टातील शिरस्तेदार काम करण्यासाठी आठ-बारा आणे मागतात. वास्तविक

एवढया क्षुल्लक रकमेसाठी तोंड वेंगाडणे सरकारी नोकरांना कमीपणाचे आहे. एक रुपयापेक्षा कमी रक्कम यापुढे घेऊच नये असे सरकारने त्या नोकरांना कळवले आहे. पट्टेवाल्याची झोप मोडून साहेबांस भेटण्याबाबत आता बंदीहुकूम काढण्यात आला आहे व त्याला एक रुपया दिल्याशिवाय आत सोडण्यास तो मुळीच बांधलेला नाही.

एखादे धरण फुटले तर उगाचच एखाद्या अधिकाऱ्याला जबाबदार धरणे यापुढे अग्राह्य ठरवण्यात आले आहे. कारण सर्वशक्तिमान प्रभूपुढे आपले काय चालणार ! पूज्य बापूजींनी शिकवलेल्या पावलावर पाऊल टाकून आपण अहिंसक कृत्य करता कामा नये. सरकारी अधिकारी कंत्राटदाराकडून पैसे खातात अशी बोंबाबोंब फार होते. पण ती लाच नव्हे असे सरकारला वाटते. आता टेंडर फॉर्ममधेच त्या दहा टक्के रकमेची व्यवस्था केली आहे ($\frac{1}{2}$ टक्का वर्क्स क्लार्क, एक टक्का ओव्हरसिअर, दीड टक्का डेप्यु. इंजिनिअर, दोन टक्के एक्झि. इंजिनिअर, ५ टक्के बांधकाम मंत्री) लाचलुचपतीचा यायोगे कायमचा बीमोड केला गेला आहे असे आम्हास वाटते.

रामराज्यातील पहाट आता दूर नाही. सरकार आता झपाटयाने भ्रष्टाचार-निर्मूलनाच्या उद्योगाला लागलेले आहे. दूध व साखर या व्यवसायातील अनीतीचा असा बंदोबस्त झाला आहे. क्रमाक्रमाने सारा समाज शुद्ध होईल. सत्याचा जय असो पूज्य बापूजींना लक्ष लक्ष प्रणाम.

दिनांक १० डिसेंबर १९६७

● ● ●

केसरीचा झुलणारा हत्ती झाला.

ज्याच्या केवळ पदाघाताने रान थरथरावे, ज्याच्या आरोळीने सारे जंगल गर्भगळित व्हावे, ज्याच्या झेपेने बलदंड अस्वले किंवा क्रूर लांडगे यांचा निःपात व्हाया तो केसरी आता गरीब झाला आहे. पाळीव झाला आहे. त्याची आयाळ झडली. सर्कशीत कुत्र्यामांजराबरोबर तो आता खेळ करतो. तो केसरी राहिला नाही.

आता तो केसरी भयभीत करीत नाही तर तो खुशामत करतो–आरत्या

ओवाळतो. यशवंत 'राजकन्येचे' स्वागत करतो... तिची अंबारी धारण करतो. तिच्या वैभवाचा वाहक होतो.

केसरी आता केसरी राहिला नाही. अंबारी वाहणारा तो हत्ती झाला आहे. दुसऱ्याची तो शोभा झाला आहे.

हा केसरी आता बालवाडी चालवतो. स्वयंपाकशाळा चालवितो. गुलाबाची प्रदर्शने भरवितो. शिवणकामाचे क्लास चालवितो. उच्चवर्णीय माद्यांचे मेळावे भरवितो. केसरी आता चांगला रसिक झाला आहे. आता स्त्रियांची संगत त्याला आवडते. स्त्रियांचे विविध उपयोग त्याला माहीत झाले आहेत. कधी तो आपल्या पिंजऱ्यात सहाय्यिका म्हणून तिला घेतो–कधी तो तिला मैत्रीण म्हणून मिरवतो. केसरी आता लांडोराप्रमाणे नाचतो. स्वयंप्रेरिकांचा ताफा आता या केसरीभोवती सदैव असतो. ऐदी बायकांच्या घोळक्यात हा केसरी आता कालक्रमणा करतो.

केसरीचे रुद्र स्वरूप आता संपले आहे. आता त्या केसरीच्या पालकांना केसरी हा उपयुक्त, व्यवहारी प्राणी करावयाचा आहे. आता गर्जना नकोत–नुसते हुंकार किंवा सुस्कारे हवेत अशी त्याची मागणी आहे. केसरीचे ओरडणे आता केकाटणे असते. कधी कधी तो ओरडणे सुद्धा विसरतो. परवा त्याच्या विद्यापीठाच्या परिसरात एक वलदंड, जंगली लांडगा पुंडाई करत होता. घाणीने तो वरवटला होता. पूर्वीचा केसरी असता तर विद्यापीठाच्या जंगलातील तो लांडगा त्याने फाडून टाकला असता. पण केसरी आता समजदार झाला आहे. कुणा एका म्हाताऱ्या महामहोपाध्याय कोल्ह्याने लांडग्याला पोटाशी घ्या असे सुचविले आणि केसरीने ते मान्य केले. कामविव्हल लांडगा केसरीच्या आश्रयार्थ आला. केसरीने त्याला अभयदान दिले. आणि तो म्हातारा कोल्हा नंतर वरळीच्या गोरिलाकडे गेला. त्याने या लांडग्याचा निःपात करू नये, म्हणून त्या वरळीच्या गोरिलाकडे भीड घातली. हा एक कोल्हा सांभाळला की, महाराष्ट्रात सर्वत्र उपद्रव करावयास रान मोकळे राहते, हा गोरिलाचा अनुभव होता. या गोरिलाजवळ सर्वांची अंडी-पिल्ली असत. सर्व प्राण्यांच्या नाजूक जागा तो नेहमी हेरून ठेवी, त्यामुळे त्याला सर्वजण भीत. पुण्याचा केसरी तर त्याला फार भीत असे. स्वतःची अनंत क्षते या गोरिलाला माहीत आहेत म्हणून हा केसरी या गोरिलाचे पाय धरतो.

त्यामुळे तो लांडगा आता पुंडारला आहे. तो आता पुन्हा विद्यापीठाच्या जंगलात येण्याची भाषा काढतो आहे. केसरीचे पाठबळ आणि गोरिलाचे अभयदान यामुळे लांडगा आता सुखरूप आहे. ज्याला सत्संग लाभला, तो सुखी झाला हे तर गुरुदेव रानडेच बोलून राहिले आहेत. केसरी आणि आचार्य गोरिला यांच्या सत्संगाने तो लांडगा आता शेपटी उगारू लागला आहे.

केसरीची आरोळी ज्यांनी फार पूर्वी ऐकली होती, केसरीचे भय ज्याकाळी

सर्व वनरक्षकांना वाटत होते ते दिवस गेले. आता उरली आहे लाचारी, माद्यांचा ताफा, मौजमजा. खूप खावे, शिकार करावी आणि स्वस्थ पडून रहावे अशी केसरीची आकांक्षा आहे. आपल्या डोक्यावर आता यशवंत अंबारी आहे तेव्हा आता या त्रिभुवनात आपल्याला भय नाही असा त्याचा अंदाज आहे.

केसरी केसरी उरला नाही म्हणून रडणाऱ्यांनो, तुम्ही वेडे आहात. त्याग, स्वार्थत्याग, पराक्रम, पौरुष, नेतृत्व या गोष्टी बोलायला सोप्या असतात. पण त्यात फार झेंगटे असतात. आपल्याला ती झेपायची कशी. चला. डॉग शो आहे. नंतर-गुलाबाचे प्रदर्शन आहे आणि मग एक संयुक्त यज्ञही आहे.

दिनांक २८ जुलै १९६८

● ● ●

अजून गिधाडे का घुटमळू लागली नाहीत ?

'गिधाड' हा एक पक्षी आहे. याला प्रेते फार प्रिय असतात. हा अशुभ, अवलक्षणी पक्षी मूळचा उत्तरेकडचा–व्होल्गा काठचा- यांची प्रजा फार झपाट्याने वाढते. रक्ताचा लाल रंग याला प्रिय. 'लाल रंग' ही याची खूण.

एखाद्या जंगलात एखादा प्राणी विकलांग होऊन मरणोन्मुख झाला की, गिधाडांना आनंद होतो. आणि तो मरण्यापूर्वीच ती त्या जिवंत प्रेताभोवतीं घिरट्या घालू लागतात. सर्व पशूंना गिधाडांची ही सूचना मिळते आणि या मेजवानीसाठी तेही दाही दिशातून भोजनस्थळी येऊ लागतात. म्हणून गिधाडे घुटमळू लागली की, समजावे मृत्यूची चाहूल लागली आहे.

याही जंगलात हा प्रचंड देहाचा सुस्त हिप्पो केवळ वयातीत झाल्यामुळे आणि अति खाण्यामुळे बेमार होऊन अस्ताव्यस्त पडला आहे. त्याच्यात चैतन्य औषधाला सुद्धा उरलेले नव्हते. गेली वर्षे दोन वर्षे तर या प्राण्याला घरघर लागली आहे. काल उजवा बाहू काम करेनासा झाला– पाय तर केव्हाच निकामी झाले आहेत– लाल पडलेले आहेत–सुजलेले आहेत. छातीतही नाजुक जागी अनंत विकार आहेत. क्षणाक्षणाला एकेक अवयव निकामी होताहेत. मात्र या जीर्ण प्राण्याची ताकदच एवढी मोठी आहे की, मरायलाही याला खूप वर्षे लागतील. पण गेल्या काही वर्षांत

त्याने अर्वाच्य खाल्ले. वृद्धपणाचे पथ्य म्हणून त्याने मानलेच नाही. परिणाम एवढाच झाला की डोळ्यासमोर मरण असूनही त्याला लवकर मरण येत नाही. गिधाडे जमा होऊ लागलीच तर त्यांना हाकलून देण्याचे त्राण सुद्धा त्यामध्ये नाही.

मग मृत्यूची चाहूल लागून गिधाडे का बरे येत नाहीत ?

वास्तविक या जंगलाचे राजेपण या गिधाडांना हवे आहे. उत्तरेकडे व्होल्गानीपर नद्यांचे विस्तीर्ण जंगल त्यांनी व्यापले. त्याला पन्नास वर्षांहून अधिक काळ लोटला. या गिधाडांनी १७ लक्ष मुडदे बघता बघता गिळंकृत केले. गिधाडांची संख्या वाढली आहे. त्यांना तिथले जंगल पुरत नाही. त्यांना खूप माणसे असणारा प्रदेश खूप आवडतो. खूप माणसे म्हणजे खूप रक्तपात, खूप रक्तपात म्हणजे गिधाडांची चंगळ. आता त्यांना नवे क्षेत्र हवे आहे. या सुंदर जंगलात हा अजस्त्र हिप्पो नसता तर त्यांनी हा हा म्हणता हे जंगल गिळंकृत केले असते आणि मग मुडद्यांची रास पडली असती.

हा हिप्पो नुसता अजस्त्र नाही. हा तसा कर्तबगार आहे–निदान होता. थोड्या जिव्हालौल्यासाठी फार मोठे संकट त्याने ओढवून घेतले आहे. हा आता मरणाच्या वाटेला लागला आहे. त्याला जगवू शकणारे धन्वतरी थकले आहेत. सारे रक्तच नासले आहे. हा हिप्पो मेला तर आपले कसे होईल, अशी चिंता वाटायच्या ऐवजी सारे प्राणी दूर उभे राहून या हिप्पोवर दगड मारीत आहेत. त्याच्या जिव्हालौल्याची किळसवाण्या आहाराची व अजस्त्रपणाची चेष्टा करीत आहेत. पण त्यांच्या हे ध्यानी येत नाही की, हा संपला की सर्व प्राण्यांचे स्वातंत्र्य संपले. केवळ त्याच्या आकारामुळे आणि अनुभवामुळे गिधाडाच्या घिरट्या इकडे सुरू झालेल्या नाहीत. हिप्पोला जगवले तर आपण जगू हा विचार कोणी करीतच नाही. हिप्पो मेला म्हणजे सारे आवादी आवाद होईल. अजस्र खाणारा मारला तर आपल्या वाट्याला सुखाचे घास येतील, अशी या खुळ्यांची समजूत आहे. पण हे जंगलचे जीवन ताब्यात ठेवण्याची ताकद नसल्यामुळे हिप्पोच्या मृत्यूनंतर या क्षुद्र प्राणीजगाला उद्यासाठी रक्षक नाही–आधार नाही–

गिधाडे या हिप्पोभोवती अजून का बरे येत नाहीत ?

हा आपल्याच मरणाने मरू दे, असे तर त्यांना वाटत नसेल ! त्याच्याच प्रजाजनांपैकी कोणाच्या दगडधोंड्यांनी हा मेला तर आपल्याला कलकलाट करून त्यालाच नेस्तनाबूत करता येईल, असा तर त्यांचा डाव नसेल ! आपण नामानिराळे राहून हिप्पोची मजा चाललीय ती पहावी, हा तर त्यांचा निश्चय नसेल ? का तिकडे होल्गा–नीपर किंवा होहँगहोच्या गिधाडराजाकडून त्यांना सबुरीचा सल्ला मिळाला असेल !

मूर्ख प्राणीजगत मात्र आता फुशारले आहे. या दांडग्या हिप्पोला नेस्तनाबूत

करायला ते सिद्ध झाले आहे. सारी गिधाडे आपली तीक्ष्ण नखे पाजळून वाट पहात आहेत. हा हिप्पो मरणे अशक्य कसे, हे ते सर्वांना सांगत आहेत. आणि सर्व प्राणी त्याला मान डोलावीत आहेत. गिधाडांच्या सल्ल्याने सर्वांनी संयुक्तपणे हिप्पो-विनाशाला आरंभ केला आहे–आज ना उद्या हिप्पो संपेल आणि मग उत्तरेकडून रक्ताला चटावलेल्या गिधाडांच्या फौजा या जंगलावर धाड घालतील. प्रथम त्या हिप्पोचा फडशा पाडतील आणि मग सारे जग गिधाडे व्यापून टाकतील.

कोणाची बुद्धी शाबूत आहे ?

कोण उद्याचे पहातो ?

कोण नव्या शत्रूच्या शोधात आहे ?

येथे गिधाडांचे राज्य व्हायला नको असेल, तर हिप्पोला जगवले पाहिजे. तो जगण्याजोगा नसेल, तर हिप्पोची जागा घेणारा एखादा वनराज निर्माण केला पाहिजे. पण त्याऐवजी ज्यांचे सर्वांना सदैव भय, अशा या गिधाडांचे हस्तक होणे–संयुक्त दल निर्माण करणे–निदान थांबवले पाहिजे–

काही वर्षांपूर्वी गिधाडांनी गरुडाचा पराभव केला. आणि गरुडापासून भय असणाऱ्यांनी या गिधाडाला सर्व प्रकारे मदत केली आणि गरुडाचा निःप्पात केला. पण त्यांच्या लक्षात आलं की गरुडापेक्षाही गिधाड हा पक्षी अधिक असहिष्णु, भयावह आहे.

सावधान–!

दिनांक ३ डिसेंबर १९६७

● ● ●

- हिरवे संकट
- युनुस सलिमसाहेबास सलाम
- भिवंडी जळाली . . . पुढे काय ?
- मूर्तिपूजक विरुद्ध मूर्तिभंजक
- तो शिवाजी तुमचा नव्हे !
- खुदा हाफिझ् पाणिनी, खुदा हाफिझ्
- येथून हिंदूंचे राज्य सुरु होते
- आम्हाला हिंदू म्हणून जगू दिले तरच . . .
- लांडग्यांना पिटाळण्याची वेळ आली . . .

हिरवे संकट

भारतापुढच्या ज्या अनेक समस्या आहेत त्यात सर्वात त्रासदायक समस्या कोणती म्हणून पुसाल तर ती आहे धर्मभेद. जाति-भेद– प्रांतभेद– दारिद्र्य–अज्ञान – आळस यांपैकी कोणतीही नव्हे. आपली राज्यघटना कितीही कोकलून सांगो की हे राज्य निधर्मी आहे. पण व्यवहारात हे राज्य हिंदूचेच आहे. पण बहुसंख्य लोकसंख्या असणारी जमात ही मतपेटीद्वारा राज्य करते हे जर खरे आहे तर बहुसंख्यांकांचे राज्य हेच सत्य उरते. अल्पसंख्यांकांचे शिरकाण करावे असे कोणी सुचवीत नाही. त्यांना रास्त संरक्षण अवश्य द्यावयास हवे. पण त्याचा अर्थ अल्पसंख्यांकांनी आपल्या 'अल्पते' चा वडिवार माजवून किती सवलती उपटाव्या याला काही अंत आहे की नाही ?

धर्म ही ज्याच्या त्याच्या घरची गोष्ट राहिली असती तर फार बरे झाले असते. पण दुर्दैवाने तसे प्रत्यक्षात आढळत नाही. या देशात धर्माचा विचार केल्या-शिवाय पान हालत नाही. आपले राष्ट्रपतींचेच उदाहरण घ्या ना. त्यांची जात जर हिंदू असती तर ते राष्ट्रपती झाले असते, असे मला मुळीच वाटत नाही. आपल्या निधर्मीपणाचा देखावा म्हणून आपण जी अनेक थोतांडे उभी करतो त्यातलेच हेही एक.

'राष्ट्रीय मुसलमान' हा शब्द तर काँग्रेस नेते हरहमेश वापरीत असतात. मुसलमानातून राष्ट्रीय मुसलमान वजा केले म्हणजे उरलेले अर्थातच अराष्ट्रीय मुसलमान ठरतात हेही या मूर्ख लोकांना कळत नाही. आणि नकळत अराष्ट्रीय किंवा राष्ट्रघातक मुसलमान, राष्ट्रीय मुसलमानांपेक्षा अधिक आहेत हेही सत्य उरतेच. गांधीवादी कसे कधीकधी सत्य बोलतात हे त्याचे उदाहरण होय. मौलवी हे राष्ट्रीय मुसलमानांना इस्लामचे शत्रूच मानतात. मग काही पांचपंचवीस उदा. हरणे देऊन मुसलमान हे कसे देशभक्त आहेत आणि हिंदुमुसलमान ऐक्यातच आपले कसे हित आहे हे आपण शिकवू पाहतो. गंमतीची गोष्ट ही की आपले पुढारी

आणि विचारवंत ही गोष्ट वेटच्या हिंदूंसच का शिकवितात कोण जाणे ! आजपावेतो इस्लामचे केवढे आक्रमण या भारताने सहन केले आहे याचा केवळ वस्तुनिष्ठ अंदाज घेतला तर ही शांतता-हृदयपरिवर्तन-समजूत-औदार्य व एकतेची करुण हाक केवळ मुसलमानांनाच द्यावयास हवी. पंडानी क्षमावृत्ती वाणवून काय उपयोग ? आक्रमणाला हिंदुसमाज एवढा सरावला आहे की आक्रमणाचे भय म्हणून त्याला वाटत नाही. एवढे मोठे प्रचंड पाकिस्तान हिंदुस्थानच्या सीमांभोवती निर्माण झाले ते आक्रमक इस्लाम आणि भेकड हिंदू यांच्यामुळेच होय. पण याची आपल्याला कसली म्हणून लाज वाटत नाही.

वेशरमपणा आणि भेकडपणा यालाही काही हद्द-असते. इतका सोन्यासारखा प्रदेश, ती भाग्यविधाती सिंधू, ते पाणिनीचे पेशावर, अनंत यज्ञयागांनी पवित्र झालेला पंजाब ... जाऊ दे. नुसत्या आठवणीसुद्धा जाळून टाकतात. हे एवढे गमावूनही तो आक्रमक इस्लाम अजून थांवलेला नाही. त्या राक्षसाची भूक अनावर आहे-उर्वरित हिंदुसमाजावर पुन्हा नव्या त्वेषाने त्याने जिहाद पुकारलेलाच आहे.

पाकिस्ताननिर्मितीच्या काळातल्या हिंदू समाजावरच्या जखमा नुकत्या कोठे भरत आल्या आहेत. अशावेळी वृत्तपत्रांचे काळजीपूर्वक वाचन केले, तर ध्यानात येईल की काही काळ खाली मान घालून स्तब्ध राहिलेली 'इस्लामी' परंपरा पुन्हा डोके वर काढू लागली आहे. पुन्हा लीगच्या हालचाली वाढताहेत. आपल्या आठ कोट धर्मांध मुसलमानी मतावर इस्लामी नेते राजकीय सौदेबाजी करू लागले आहेत. सवलती, मोठेपणा, पदाधिकार यांची खिरापत देऊन सत्तेसाठी हपापलेले सर्व पक्ष खुर्चीच्या मोहाने मुल्लामौलवींचा आशीर्वाद आणि त्या समाजाची मते खरीदताहेत.

हिंदुमुसलमान संबंधात हिंदूंनी आपणहून मुसलमानांची छेड काढली असे उदाहरण एकूण दुर्मिळच. या देशाचे मालक असूनही आम्ही येथे चोरासारखे वावरत असतो. वास्तविक बहुसंख्य समाजाचे अल्पसंख्यांक समाजाला भय वाटावे. पण बहुसंख्यांकांना स्वरक्षणार्थ संघटना काढाव्या लागतात हे खरोखरीच लांच्छनास्पद आहे. आणि त्याला कारण आपले चुकीचे औदार्य आणि सहिष्णुता.

आणि हे सारे कशासाठी ! परमपवित्र महंमदाच्या अनुयायांना सांभाळण्यासाठी. भारतीय सरकार पाकिस्तान सरकारपेक्षाही मुसलमान समाजाचे धार्जिणे आहे. आणि मुसलमान करू शकणार नाहीत येवढे ते मुसलमानांचे संरक्षण करीत आहेत. लोकांनी आपल्याला उदार म्हणावे, सहिष्णु म्हणावे-बुद्धानुयायी म्हणावे यासाठी ही खटपट करून अखेर घडते आहे का हिंदुमुस्लीम एकता ? हृदयपरिवर्तन समजदारांचे होते-अहिंसा तत्त्ववेत्त्याला समजते. सभ्यता हा सुबुद्ध माणसांचा गुणधर्म असेल, पण धर्मवेड-रक्तपात-आडदांडपणा यापेक्षा ज्यांचा इतिहास फारसे

काही निराळे सांगत नाही त्या 'नापाक' जंगलीना या 'पाक' गोष्टींचा उपयोग काय ? बलात्कारासाठी बखबखलेल्या माणसाला देवाची भीती दाखवण्याने बलात्कार टळत नाही, फक्त सुलभ होतो. बलात्कार टाळण्याचा मार्ग त्याविरुद्ध सर्व शक्तिनिशी झुंज देणे हाच असतो. पाच-सातशे वर्षात जबरदस्तीने वाढलेली ही प्रचंड यवन जनता-तलवारीने निर्माण झालेले पाकिस्तान-गुंडगिरीने केलेल्या कत्तली आणि दंगली हे सारे आम्ही विसरायचे ! मुसलमानांशी आम्ही समझोत्याने राहायचे ! त्यांचा द्वेष आम्ही करायचा नाही ! त्यांचे अहित आम्ही चिंतायचे नाही. का रे बाबांनो ! हे सारे आम्ही कशासाठी करायचे ! आजचे अल्पसंख्य उद्या समान होईतो निदान मतपेटीने आम्ही त्यांच्यापासून आमचे सिंहासन दूर राखू शकू. पण याच पद्धतीने जर हिंदूंचे यावनीकरण किंवा येशूकरण झाले तर फारच थोडया अवधीत हिंदू अल्पसंख्यांक होतील. मग हिंदूंचे रक्षण करावयास कोण आहे ? आज मुसलमानांचे रक्षण करावयास युरोपपासून चीनपर्यंत पसरलेले इस्लामी साम्राज्य आहे. युरोपने इस्लामला तलवारीनेच हाकलून दिले, हे आम्ही तेवढे का विसरावे ? दोन सहस्र वर्षांनी ज्यूंचे राज्य पुन्हा नांदू शकते व तेही सर्व बाजूंनी वेढलेल्या मुसलमानी साम्राज्याच्या मध्यभागी. इस्लाम पराभूत झालेला नाही असे थोडेच आहे ! मग सिंध-पंजाब-बंगालच्या भूमीची आकांक्षा आपण सोडून का द्यावी ? सामर्थ्यासारखे सत्य नाही, तलवारीसारखी अहिंसा नाही. किंवहुना हाती तलवार असेल तर आणि तरच हिंसा टळेल-रक्तपात टळतील.

पुन्हा एकवार मुसलमानी संस्कृती उर्वरित भारतात डोके वर काढीत आहे. सरकारच्या उदार आश्रयाने ती वाढते आहे. साधनशुचिता-अहिंसा-सत्य यांच्या भंगड अनुयायांना हे संकट जाणवणार नाही. कारण आंधळेपणाबरोबर वहिरेपणासाठी ही मंडळी प्रसिद्ध आहेत. त्यांना ठीक करणे शक्यतेच्या कोटीतले नाही. मनुष्यस्वभावाच्या मर्यादांवरच धर्माधर्म ठरतो. आणि म्हणून आपण सावधगिरीने हे संकट ओळखले पाहिजे. सत्ता संपादन करण्यासाठी किंवा टिकविण्यासाठी मुसलमानी लगट सुरू झालेली आहे. हिंदूंचा देश म्हणूनच 'हिंदुस्थान' ओळखला गेला तर त्यात प्रतिगामी किंवा अन्यायजनक काही नाही. मुसलमानांचे हित तें बघतातच. आपणही आपल्या हितासाठी सिद्ध व्हायला हवे. मुसलमान 'इस्लाम' हा अखेरचा शब्द मानतात. आपणही त्या शब्दाची अखेर योग्य त्या मार्गाने हुडकली पाहिजे.

काश्मीरवरचा अफाट खर्च, पाकिस्तानच्या सीमांवरचा लष्करी खर्च, हिंदु-मुसलमान दंग्यानिमित्त होणारी नुकसानी, पाकिस्तानच्या निमित्ताने करावा लागणारा पुनर्वसनाचा बोजा या साऱ्याने भारताची पीछेहाट झाली. झाले एवढे यवनस्तवन आता पुरे झाले. 'हिंदुमुस्लीम' ऐक्याच्या वांझ योजना या घटकेला

फलदायी होणार नाहीत. हिंदूंनी आपल्या मनावरचे आध्यात्मिक ओझे फेकून देऊन आता निदान मुसलमानांइतके आडदांड होणे आवश्यक आहे. ऐतिहासिक अनुभव, विज्ञानाधिष्ठित दृष्टी, जाति वर्णविरहित समान समाजरचना, यांच्यावर समर्थ हिंदुमत उभे राहिले आणि त्यांनी मुसलमानांप्रमाणे आपल्या समृद्धीसाठी तलवार हाती घेतली तर...आणि तरच नवी पाकिस्ताने नेस्तनाबूत होतील. नचपेक्षा दिवस वाईट आहेत. मांजराने उंदरांना खायचे त्याऐवजी उंदीर मांजराला कुरतडीत आहेत.

दिनांक ९ मार्च १९७०

● ● ●

युनूस सलीमसाहेबास सलाम

मेहेरबान युनूस सलीमसाहेब आमच्या पुण्यात येऊन पुणेकरांना पावन करून गेले. पुण्याची पुण्याई थोर म्हणूनच इंदिराजी सरकारातील हे एक 'पाक' मंत्री पुण्यास भेट देण्यासाठी आले. इंदिरा सरकारच्या आजच्या आसनाचा जो आधार मुसलमान समाज, तो मोठ्या उत्कंठतेने युनूस सलीमसाहेबांची पुण्यात वाट पहात होता. त्या समाजापुढे केवढे तरी गहन आणि विकट प्रश्न उभे आहेत. स्वारबाबा पीर व सुभानशा दर्गा यांच्यासारख्या मौल्यवान व परमपवित्र प्रार्थना-स्थानाविषयी त्या समाजाला केवढा वरे अभिमान आहे. इस्त्रायलमध्ये अल्-अक्सा आणि इकडे अल्-स्वारबाबा. या पुणेरी तर्कदुष्ट मूर्तिपूजकांना या पवित्र स्थानांची अडचण वाटू लागली आणि केवळ वाहनांच्या सोयीसाठी त्यांनी हे दर्गे? मुळातूनच उपटून काढण्याचा बेत करावा हे निधर्मी राज्यात कसे काय बसते? शिवाय मुसलमानी समाजासाठी कायदेमुद्धा खास निराळे करण्याचे भारतीय सरकारचे धोरण आहे, हे या नतद्रष्ट चांडाळांना का समजू नये! कोण हा गहजब? कोण हा अन्याय? गांधीशताब्दीच्या या वर्षात मुसलमानी धर्मभावना दुखवण्याची काय ही अमर्यादा. वास्तविक रस्ताच दुसरीकडे हलवायचा सोडून दर्ग्यासारखी पवित्र वास्तू हलवणे हे कितपत योग्य, याचा विचार व्हावयास हवा होता. एकवेळ हे पुणे शहर हलवले तरी चालले असते, पण अल्लाची ही पवित्र स्थळे सुरक्षित रहायलाच हवीत.

आणि हा आमचा न्याय्य हक्क आणि धर्महक्क मोठ्याने सांगणाऱ्या मौलाना येशूखानाव्यतिरिक्त अन्य नेता मुसलमान समाजाजवळ नव्हता. एकटा माणूस तरी काय काय करणार ! कुठे कुठे पुरणार ? आधी जातीय राजकारण चालू ठेवून हिंदु समाज दुर्बल करावयाचा, आणि शिवाय मुसलमान समाजाला संघटित करायचे, अशी दुहेरी कामे येशूखानांनी एकट्याने कशी करावीत ? फक्रुद्दीन अली साहेबांना 'रावात'सारख्या आंतरराष्ट्रीय प्रश्नामुळे इथल्या गोष्टीत लक्ष घालावयाला फुरसत कशी मिळणार ? शिवाय इंदिराबाईंनी कृपा कायम ठेवण्यासाठी त्यांना पुष्कळच मेहनत पडते. तेव्हा मौ. येशूखानांच्या सहाय्यार्थ युनूसमिया धावले हे वेस झाले.

युनूसमिया पुण्यात आले अन् सर्वांनी कावकाव केली. युनूसमिया काय मुसलमान नाहीत ? ते काय रझाकारी चळवळीत नव्हते ? ते काय दंगलीमागची राजकारणे खेळत नाहीत ? मुसलमानी समाजाने जे जे काही मिळवले ते दंगली करूनच. मग त्या समाजाच्या पुढाऱ्यांनी हे खेळ नकोत का बरे खेळायला ? भेकड, पौरुषशून्य व मूर्तिपूजक हिंदूंना या देशात मुळी जगायचा अधिकारच नाही. आणि हे हरामखोर म्हणे आमचे दर्गे पाडणार. युनूसमिया आले, त्यांनी इथल्या यवन समाजाशी गुफ्तंगू केले आणि त्यांना असे आश्वासन दिले की 'जगातली कोणतीही शक्ती आमची पवित्र स्थाने हलवू शकणार नाही.'

भारतातील सार्वभौमत्व, लोकसभा, सर्वोच्च न्यायालय यासारख्या मामुली सत्ता तर युनूसमिया मानतच नाही पण जगातली अन्य सत्ताही ते मानत नाही. ते जाणतात फक्त इस्लाम. येवढ्याशा चिरटोळ्या इस्त्रायलने साऱ्या प्रचंड अरब जगाची व जंगली यवन जगाची फजिती चालवली आहे आणि तरीही जगातल्या सत्तांना युनूसमियांनी आवतणे धाडावीत हे पाहून मोठी मजा वाटली. जगातल्या सत्तेचे जाऊ द्या पण आमच्या वसंतराव नाईकांची अन् कमिशनर मोघ्यांची स्वारवाबांनी वघता वघता पार दुर्दशा करून टाकली की हो !

शावास वसंतरावजी ! शाबास मोघे ! शाव्वास शिवाजीराव ढेरे ! तुम्ही सर्व मंडळी आडदांड, जंगली समाजाला योग्य त्या ठिकाणी ठेवणार असलात तर हिंदूंचा कळवळा येण्याची आम्हाला काही गरज नाही. आमचे मागणे लई नाही. थोडा स्वभिमान, थोडी सुधारणावादी दृष्टी, समान न्याय आणि सभ्यता एवढी जरी आम्हाला तुमच्यापाशी जाणवली तर आम्हाला भांडायचे कारणच नाही.

स्वारबाबा हलला. त्याच्या अंगावरून ट्रक–मोटारींची धुडे हिंडू फिरू लागली. नागरिक जीवन अडले होते ते व्यवस्थित सुरू झाले. शासनाजवळ काही न्यायबुद्धी आहे हे जाणवले. पुण्यातील काँग्रेसपक्षात स्वाभिमान आहे हेही कळले. भुकेकंगाल

अन् पराभूत वामणांपेक्षा मयूर आणि मुजोर मुसलमानांना ठीक करण्यासाठी आता स्थानिक काँग्रेस पुढारी सज्ज झाले हे पाहून तर फार बरे वाटले.

आम्हाला तर फार आनंद झाला आहे. एवढासा स्वारबाबा तो काय ! त्याचा आनंद तो काय ! आनंद झाला तो जागृत अशा सुबुद्ध शक्तींचा, स्वाभिमानी स्थानिक नेत्यांचा.

युनूसमिया, पुन्हा पुण्यात याल तेव्हा तुमचे आम्ही स्वारगेटावरच स्वागत करू. तोपर्यंत मियाजी, तुम्हाला आमचे दंडवत ! नव्हे सलाम ! ! ...

दि. १८ जानेवारी १९७०

●●●

भिवंडी जळाली . . . . पुढे काय ?

माझी मान खाली आहे. तोंडातून शब्द फुटत नाही. जातांना मी बडबडत होतो– खिदळत होतो. सगळ्यांची चेष्टा करीत होतो, पण येताना मात्र माझे हसू मावळले होते. मस्करी सरली होती. भिवंडीला जे काही मी पाहिले त्याने माझे मन बावचळून गेले होते. भिवंडीला जे जे मी ऐकले त्याने माझे कान गारठले होते. पंचेंद्रियांच्या शक्ती नष्ट करण्यासारखे भिवंडीत काहीतरी घडले होते.

मी महाराष्ट्रात राहतो. त्यातही पुण्यात राहतो. ज्या पुण्यात हिंदुत्वाच्या नावाने सदैव टाहो फोडला जातो, ज्या पुण्यातून भीमथडी तट्टाच्या टापा इस्लामी राजवटीला तुडवीत होत्या, ज्या पुण्यात बाल शिवाजीने स्वराज्याची स्वप्ने पाहिली, देव भंगविणाऱ्याचे हात जेथे कलम केले गेले आणि गाई मारणाऱ्यांना शिवप्रभूनी जेथे हत्तीच्या पायी दिले त्याच पुण्यात मी वाढलो. जुलमी, असहिष्णु जंगली संस्कृतीचा पुंडावा थांबवण्याची प्रतिज्ञा करणारा श्रीछत्रपती शिवाजी जिथे जन्मला, तिथेच मी सुदैवाने राहतो आहे. हिंदुपणाचा अभिमान मिरवतो आहे. माझी सारी शिवाजीनिष्ठा, हिंदुत्वनिष्ठा भिवंडीच्या अग्निप्रलयात आज जळून राख होण्याच्या बेतात आहे.

पुण्यापासून शंभर मैलांच्या अंतरावर हिंदुसनाजाचा अवमान करण्याचे धाडस केले गेले आहे. न्यायालयीन चौकशी काय व्हायची ती होवो, पण मी

पाहिले ते भिवंडीचे हिंदू निरपराध आहेत. ते बहुसंख्य पोटार्थी साळी आहेत. ज्यांनी काठीसारखे शस्त्रसुद्धा कधी हाती घेतलेले नाही अशा निरपराध हिंदूंवर मुसलमानांनी जाणूनबुजून प्राणघातक हल्ला चढवला, हे ठरवण्यासाठी एखाद्या शाळकरी पोराची बुद्धीसुद्धा पुरेशी आहे. हायकोर्ट न्यायाधीश कदाचित तेच सत्य कायदेशीर भाषेत सांगू शकेल. सर्व वृत्तपत्रांनी हे सत्य उघडउघडपणे मान्य केले आहे की, हल्ला पूर्वनियोजित होता व त्याची तयारी मुसलमानांनी फार पूर्वीपासून केली होती. भिवंडीचा दंगा मुसलमानांनीच केला हेही लोकसभेत सांगितले गेले. दंगा ठरवून करण्यात आला ह्याचीही वार्ता लोकसभेत दिली गेली. दंग्यात बाहेरच्याही मुसलमानांचा भाग होता. जाळपोळीची साधने जय्यत तयार होती. बघतावघता आठशे एक घरे जाळण्यात आली, आणि नुकसान बहुशः हिंदूंचेच झाले आहे. प्रतिकारार्थ हिंदू उठले... तेव्हा मुसलमानांचेही नुकसान झाले असेल. पण काळजीपूर्वक हिंदूंची मालमत्ता नष्ट करण्यात आली आहे. तिथला कर्फ्यूचा कालखंड संपला की कोणालाही जे घडले आहे ते डोळ्यांनी पाहता येईल. सरकार, झालेला सर्वनाश कमी दाखवण्याची कोशीस करील–झालेली पडझड आवरायला लागेल. पण तत्पूर्वी जमेल त्याने भिवंडीला भेट द्यावी, डोळ्याखालून तिथली राख जाऊ द्यावी. आणि मग अंतःकरण हलले तर–तरच मग काय तो धडा घ्यावा. शिवप्रभूनी जे मुगली आक्रमण थांबवायचा यत्न केला ते अजूनही थांबलेले नाही. अजूनही या भूमीच्या मालकांची दैना उडतेच आहे. उडणार आहे. कारण शासनकर्ते पक्षपाती आहेत. खोटारडे आहेत. यशवंतराव चव्हाणासारखा बेजबाबदार, नाटकी, लंबाड आणि संधिसाधू माणूस आज सत्तेवर आहे. तेव्हा हिंदूच्या नशिबी हाच अपमान असणार. डोळे असणारा कोणीही माणूस भिवंडीचा दंगा केवळ मुसलमानांच्या दांडगाईतून जन्म पावला हे सांगू शकेल. चव्हाण डोळे बांधून भिवंडीत गेले होते. गेले तेही काँग्रेसी आमदारांना घेऊन–ज्यांना भिवंडीतील मुसलमानी मते हवी आहेत. मुसलमानांची जी थोडी फार हानी प्रतिकाराचे वेळी झाली ती चव्हाणांनी पाहिली. ते पाघळले. वरोवर आहे. चव्हाणही नेते कुणाचे ! ते लोकसभेत सांगतात की भिवंडीत मुसलमानांची हानी झाली. थोडी शरम, थोडी लाज असणारा कोणीही एवढे धाडसाचे व खोटारडे विधान करणार नाही. पण चव्हाणांना आपले आसन राखावयाचे आहे. म्हणजे इंदिराजींनाही संतुष्ट करावयाचे आहे–म्हणजेच फकुद्दिन अली साहेबांची दाढी कुरवाळायची आहे. म्हणजेच हिंदूंवर अन्याय करणारे गरळ ओकायचे आहे. यशवंतरावजी, शाबास ! कृष्णेच्या परिसरात जन्म घेतलात, शिवप्रभूच्या पावनभूमीवर पोसलात, क्षत्रिय मराठ्याची जात सांगता आणि खुशाल भिवंडीच्या गरीब नागरिकांशी

बेइमान होता. तुम्ही कसले प्रतिशिवाजी, तुम्ही तर मूर्तिभंजक अफजुलखानाशी नाते सांगता.

हिंदूंच्या भेकडपणाची कीव करावी की दहापट लोकसंख्येच्या उरावर नाचून आपल्याला हवे ते मिळवणाऱ्या मुसलमानांचे कौतुक करावे, हेच कळत नाही. मुसलमानांनी दंगे करावेत आणि लोकसभेत इंदिराकाकू व त्यांचे सँडल–पुसे यांनी त्याची जबाबदारी आर. एस्. एस्., जनसंघ आदी पक्षांवर टाकावी हा आता शिरस्ता आहे. ही गोष्ट खरी की, दंगली सुरू झाल्या की जी पांढरी टोपी वगळाछाप, भेकड भुते घरेदारे लावून आपल्या तुंदिलतनू बायकांना मिठीत घेऊन वसतात तीं दंगे थांबल्यावर शांतता कमिटी स्थापन करायच्या वेळी उगवतात. आणि मग त्या दंगलकालात दंगेखोरांना ज्यानी रोखले, जखमीना ज्यांनी पाणी पाजले, अन्न पुरवले, सेवा केली, त्या गरीब संघवाल्यांवर आणि जनसंघवाल्यांवर दुगाण्या झाडतात. मुसलमानांना सारे रान मोकळे सोडले असते तर या पांढऱ्या टोपीकरांच्या तुंदिलतनू बायका मुसलमानांच्या घरी वीण वाढवीत नवे जहाँगीर, नवे भुत्तो निर्माण करत बसल्या असत्या एवढासुद्धा विवेक या मूर्खांना नसतो. मुसलमानांचा आवेश, क्रूरता यांचा वळी होणारे जनसंघीय हे जातीय आणि केवळ जातीयतेचा आधार घेऊन गादीवर येणारे हे ढवळे म्हणे पुरोगामी.

मुसलमानांना ही मस्ती कोठून येते हा विचार संशोधनाचा आहे. हिंदूसमाज चहूबाजूंनी सागरासारखा पसरलेला आहे. काहीही म्हणले–कितीही लेचेपेचे झाले– कितीही भोंगळ असले– तरी भारतीय शासन हिंदूचेच आहे. म्हणजेच पुरेसे शरणार्थी आहे. गेल्या हजार वर्षात जोडे खाण्याची सवय लागल्यामुळे पराक्रमाला व स्वाभिमानवृत्तीला वंचित झालेले आहे. मुसलमानांनी, इंग्रजांनी, ख्रिश्चनांनी आणि परवा परवा चिन्यांनी सदैव जोडे हाणावे, घरेदारे लुटावीत–धर्म वाढवावा– बायका-पोरांची इज्जत घ्यावी आणि आम्ही मानवतेच्या गप्पा मारून त्यांना क्षमा करावी–सांभाळून घ्यावे. त्यांच्यासाठी आमच्या पवित्र गोष्टींचा त्याग करावा. क्वचितच एखादा शिवाजी–एखादा प्रताप ...बाकी सारे सोकाजी आणि साळकाया. गेली हजार वर्षे चाललेल्या या मानहानीचा कडेलोट फाळणीच्या वेळी झाला. हजार वर्षांची पापे काही भूमी विकून, काही बायका आंदण देऊन–काही कच्च्याबच्च्यांच्या किंचाळ्या ऐकत आपण फेडू पाहिली. अशी पापे किंवा रोग संपवू म्हणून संपत नाहीत. मूळचा कणरूप असणारा रोग पुढे सारा देह नासवितो. धर्मत्याग म्हणजे राष्ट्रत्याग हे सिंधी लोकांना कळले. पूर्वपाकिस्तानला कळले–आसामात कळले. आता मेघालयात कळू लागले आहे–काश्मीरला उद्या कळेल–पण तरीही निधर्मीपणाचा डंका वाजवून परधर्मीयांना अभय आहेच आहे.

मुसलमानांचा प्रश्न पाकिस्तानपूर्वी जेवढा गंभीर होता त्याहून तो आज

विकट झाला आहे. कारण एक समर्थ राष्ट्र इथल्या मुसलमानांना धर्माचे आवाहन देते आहे. पैसा देते आहे. शस्त्रे देते आहे. शिवाय इथल्या मुसलमानांना कळून चुकले आहे की हिंदू ही जात भेकड आहे. तिचे पुढारी नादान, नालायक आहेत. त्यांना स्वार्थ कळत नाही. ते दंग्याला भितात. ते गुंडगिरीला भितात. त्यांनी तरी सभ्यपणाने कसे वागावे ? भारतीय नेतृत्व गुंडगिरीला नमलेले अवघ्या वीस वर्षांपूर्वी त्यांनी पाहिलेले आहे. मग अजूनही तो डाव खेळला तर फायदाच होईल. वरे, हिंदूंनी प्रतिकार केला तर जगभर बोंब मारता येईल. अर्थात हिंदूंनी प्रतिकार केला तर मुळी यशवंतराव–वसंतराव त्यांचा निकाल लावतील हा भाग सोडा. सत्ता महत्त्वाची. खुर्ची भाग्यवान. खुर्चीखाली रक्ताची राड असली तरी खुर्चीची मखमल उवदार. पाच कोट मते म्हणजे काय महाराजा. त्यासाठी थोडी शरम सोडली पाहिजे. त्यासाठी स्ववांधवांविरुद्ध असले काहीतरी खोटे बोलले पाहिजे. त्याला काय करणार. हिंदू काय ! त्यांना कुठे जाता येणार ? अवनीतलावरचे हे एकमेव हिंदूराष्ट्र. पुन्हा अशोक–बुद्धाचा वारसा. पुन्हा बापूजींची शिकवण. पंडितजींचे पंचशील. शास्त्रीजींचा ताश्कंद करार. जयचंदापासून नेहरूपर्यंत सर्वांची परंपरा एकच. आमच्या गरीब सहिष्णू धर्मावावत सर्वांचा राग. पण मूर्तिपूजकांना जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या यवनांचा या सर्वांना पुळका...

मग होणार गोंधळ–होणार अहमदावाद–होणार जळगाव–होणार भिवंडी ! पण यशवंतरावांचा मतदार संघ शावूत आहे. ते कशाला चिंता करतील. जातीय राजकारणावरून टीकाकारांना वदनाम करावे. जातीय ठरवावे–प्रतिगामी ठरवावे आणि देश विकीत आपण राज्य करावे हेच खरे. क्षत्रिय धर्म जाणणाऱ्या या महाराष्ट्रातल्या सर्व वहुजनसमाजाला भेकड वनवून पंढपणाचे धडे देण्याचे त्यांचे काम चालूच आहे. आमच्याच धर्मातल्या वेगवेगळ्या जातींना परस्परांविरुद्ध खेळविण्याचे राजकारण चालू आहे. मोठे संकट समोर आहे. ते सर्वच धर्मावर आहे. राष्ट्रावर आहे. त्यावेळेस त्यांच्याशी मुकावला करायला हवा. क्षुद्र जातीपाती–प्रांतीयता यांचा अडसर जर अखंड हिंदूसमाजात येत असेल तर खुशाल एखादी जात संपूर्ण नामशेप झाली तरी चालेल. पण आपल्या राष्ट्राची आपले नेते काय विल्हेवाट लावताहेत त्याकडे लक्ष दिले पाहिजे. पाकिस्ताननिर्मितीचे मुख्य शिल्पकार पटेल–नेहरू–गांधीनी मौनव्रत पत्करून त्या पापाला संमती दिली. आज त्याच पुढाऱ्यांची औलाद नवे पाकिस्तान निर्माण होईल अशी भूमिका पत्करीत आहे. सर्व समाजाने पक्षनिष्ठा, जातीनिष्ठा असल्या क्षुद्र निष्ठांपेक्षा राष्ट्रनिष्ठा मोठी मानून आता त्या दुष्टांशी मुकावला केला पाहिजे.

लक्षात ठेवा, जे दुसऱ्यांना जातीय, प्रतिगामी म्हणतात त्यांचे आसनच त्या आरोळ्यांवर अवलंबून असते. सत्य काही निराळेच असते. आणि सत्य हा लवाड

लोकांना सतत त्रास देणारा विषय आहे. पाकिस्ताननिर्मितीचे पाप संघ-जनसंघावर घालणारे वेडयाच्या इस्पितळात होते-अजूनही आहेतच.

पुढची वर्षे आता सदैव बेचैनीची जाणार आहेत. एक भिवंडी जळली. पण त्याने आमची मने अस्वस्थ झाली आहेत. मुसलमानांच्याविषयी ज्या शंका आमच्या मनात वावरतात त्या खऱ्या ठरू पहात आहेत. मात्र एवढे त्यांनी लक्षात ठेवावे की आता अशा दंगलीत नवी भूमी त्यांना मिळणार नाही. हिंदुस्थानची सत्ता व भूमी कावीज करणारेच आता एखादेवेळेस दग्ध होतील व 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायाने त्यांच्या पुरस्कर्त्यांनाही त्याच वाटेने जावे लागेल. विवेकी, संयमी हिंदु-समाजाने स्वत: होऊन कोणालाही कधीही छेडलेले नाही. अगदी सरकारी कागद-पत्रांवरून हे शाबीत करता येईल. पण सहनशीलतेला मर्यादा असतात. हेच खरे आणि आता ती सहनशीलता शिगेला पोचली आहे हेही विसरता नये.

भिवंडी तर जळून मेली. पुढचे सारे काही थांबायचे असेल तर शासनकर्त्यांनी स्वार्थ सोडून आता या प्रश्नावर खरे आणि टिकावू बोलणे केले पाहिजे. कळा गेलेले शब्द, अर्थ नसलेली वक्तव्ये आणि व्यवहारात न उतरता येणारा आदर्शवाद यांचा त्याग करून गेल्या पन्नास वर्षांतील मुसलमानांचे वर्तन, त्यांच्या निष्ठा, त्यांच्या चळवळी, त्यांचे इस्लामी जगाशी संबंध, त्या समाजाच्या ऐतिहासिक अहंता व आकांक्षा याचा नीट शोध घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांचा धर्मग्रंथ कुराण, मूर्तिपूजकांना किंवा बिगर इस्लामीयांना द्यावयाच्या वागवणुकी संबंधीचे त्यातील आदेश यांचाही विचार केला पाहिजे. आणि जर कुराणातून किंवा त्यावरच्या स्मृतिग्रंथातून धडधडीत अन्यायाच्या आज्ञा निघत असतील-आणि त्या निघतातही, तर मग घट्ट असा ऐतिहासिक निर्णय घेतला पाहिजे. मुसलमानी समाज हा धर्मनिष्ठ आहे-त्यांची कुराणावरील निष्ठा वादातीत आहे आणि धर्मग्रंथातच असहिष्णू आज्ञा असतील तर मग त्यानी त्याचे पालन केले यात त्या समाजाची कोणतीच चूक नाही. चूक आपली आहे. सर्व धर्म उदार आणि चांगले असतात असा भोंगळ मानवतावाद आपण गृहीत धरतो आहोत.

पण तेवढ्यासाठी आमच्या नेत्यांजवळ आत्मविश्वास आणि पुरुषार्थ हवा.
आणि तेवढीच काय ती आजच्या नेत्यांजवळ उणीव आहे

दिनांक २४ मे १९७०

● ● ●

मूर्तिपूजक विरुद्ध मूर्तिभंजक

या देशात हिंदुमुसलमानांचे दंगे ही काही फार अपवादात्मक बाब राहिलेली नाही. या दोन जमातींचे कधीच बनलेले नाही. आणि याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे या पवित्र पुराणभूमीची फाळणी. १९२० पासून १९७० या पन्नास वर्षात घडलेल्या राजनीतीचा मोठ्यात मोठा पराभव म्हणजे देशाचे विघटन. फाळणीची जबाबदारी प्रमुखत्वेकरून गांधीजी आणि नेहरू यांचीच आहे. अधूनमधून आपल्या मेंढरी बहुमतावर–अडाणी सख्यासोबत्यांच्या हुकमी मतावर लोकसभेतून हिंदूंचे रक्षण करू पाहणाऱ्या संघ–जनसंघ आदी संस्थांवरच फाळणीची जबाबदारी फेकण्यात येते. फाळणी होऊ नये म्हणून अट्टाहासाने भांडणाऱ्यांवरच फाळणीची जबाबदारी टाकून आपले नेभळेपण–आपले अपयश–आपला दूरदृष्टीचा अभाव–आपला गलथानपणा लपविण्याचा यत्न चालू आहे. पण ही गोष्ट आता लहान मुलांनाही कळून चुकलेली आहे की मुसलमानांना शिरजोर करण्याच्या कामी बाह्यतः उदार वाटणारे गांधी-नेहरूंचे धोरणच कारणीभूत झाले. फाळणीने हिंदुमुसलमान ऐक्य–कल्पनांना कायम तडा गेलेला आहे. आणि परत भारत एकसंघ होईपर्यंत हिंदुमुसलमान ऐक्य ही कल्पना कल्पांतापर्यंतही अशक्य आहे.

पाकिस्तान हा हिंदूंच्या मनाला सतत बसणारा चटका आहे, आणि म्हणून पाकिस्तान आणण्यास कारणीभूत होणारे. मग ते कोणीही असोत, हिंदू समाजाला, कधीही मित्र वाटणे शक्य नाही. ही गोष्ट खोटी नव्हे की भारतातील मुसलमान आणि पाकिस्तानातील मुसलमान एकाच देशाचे–एकाच संस्कृतीचे–एकाच परंपरेचे होत. त्यांना वेगळे करावयास भाग पाडणारे हिंदूंचे जसे शत्रू होत तसेच मुसलमानांचेही शत्रू होत. मुसलमानांच्या एकसंघतेला तडा लावण्यास भारतीय नेतृत्व कारणीभूत झाले आणि त्यांच्या श्रद्धा आणि निष्ठा विभागण्यासही ते कारणीभूत झाले. कालपरवापर्यंत आपली असणारी जमीन–तिथली मशिदी–मंदिरे आज परकी मानणे हे मनुष्यस्वभावास साजेसे नाही. केवळ दंगलीच्या भयाने आपण पाकिस्तान देऊन टाकले हे जर सत्य असेल तर आणखी दंगल करून मुसलमानधर्मियांनी स्वतःसाठी आणखी भूमी पैदा करणे यात तरी गैर काय आहे ! फाळणीनंतर आपले

नेते या भ्रमात राहिले की आता हा प्रश्न मिटला व उरले ते सर्व मुसलमान आता राष्ट्रभक्त असून ते हिंदूंशी प्रेमाने वागतील. या नेत्यांनी मुसलमानांचा फुटीर पणा कमी व्हावा म्हणून यत्नही केले नाहीत, हिंदु समाजाशी (या ठिकाणी हिंदु-धर्म अभिप्रेत नसून हिंदुस्थानच्या समाजाशी असे म्हणावयाचे आहे) एकरूप होण्या साठी मुसलमानांना आमिष दाखवण्याऐवजी मुसलमानांच्या धर्मांधतेचा फायदा ते उपटू लागले. हिंदु कोड असे निराळे कोड त्यांनी का करावे ? मुसलमानी जातीय संस्थांचे पुनरुज्जीवन होत असता त्यांनी गप्प का बसावे ? वास्तविक पाकिस्तान-निर्मितीनंतर काही वर्षे मुसलमानांनी आपल्या जातीय चळवळी आवरल्या होत्या. या चळवळीतूनच पाकिस्तान निर्माण झाले. रक्तपाताच्या भयानेच पुढारी शरण गेले आणि त्या रक्तांच्या चिळकाडयांची आठवण अजून हिंदूं विसरलेले नव्हते. कारण आपण पाकिस्तान निर्माण करण्यास साहाय्य केले याचा वचपा हिंदू समाज काढील ही त्यांना भीती होती. पण हळूहळू काँग्रेस नेत्यांच्या आश्रयाने पाकिस्ताननिर्मितीच्या पूर्वी होत्या त्या द्वेषमूलक व धर्मांध चळवळी त्यांनी पूर्ववत् चालू केल्या आहेत. हेही लक्षात ठेवावयास हवे की पाकिस्तान-निर्मितीनंतर हिंदुसंघटनेची चळवळ मंदावली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघावद्दलही तरुण हिंदू मनाचे आकर्षण ओसरले होते. पण जसजशा मुस्लीमांच्या आडदांड चळवळी वाढू लागल्या, मुस्लीम लीगचे पुनरुज्जीवन होऊ लागले तसतशा हिंदूंच्याही संघटना मजबूत होऊ लागल्या आहेत. हिंदूंची चळवळ कधीच आक्रमक नव्हती. आजही नाही. प्रतिकारार्थ उभारल्या जाणाऱ्या चळवळीचा जोर कशात असतो याचे ज्ञान आजच्या शासनाला नाही हे दुर्दैव आहे. आज जनसंघाला मिळणारे यश हे सरकारच्या मुस्लीमधार्जिणेपणामुळेच आहे. मुसलमानांच्या आणि कम्युनिस्टांच्या बळावर आपण हिंदुसमाजाला सदोदित ताब्यात ठेवू शकू असे आजच्या शासकांना वाटते. राष्ट्रीय चळवळी जसजशा खाल खालच्या जातीय स्तरात पोचतील तसतसा, केवळ सत्तेमुळे मिळणाऱ्या सवलतीसाठी अस्पृश्य किंवा दलित जातीनी दिलेला पुरस्कार आजचे शासक गमावू लागतील–नव्हे लागलेही आहेत. आणि या घटकेला जनसंघाने शासकांच्या मनात मोठाच गोंधळ उडवून दिला आहे.

आणि म्हणून जनसंघाला बरबाद करणे हे इंदिरा गांधी, यशवंतमियाँ चौहाण आणि लालपुंगव यांचे मुख्य सूत्र आहे. गांधी–नेहरूंच्या पूर्वलौकिकाचा वारसा, त्यावर अजूनही भरवसा ठेवणारे अडाणी मतदार, सत्तेमुळे आपल्याला लाभ उठविता येईल असे मानणारे काही हरिजन पुढारी, धर्मांध मुसलमानांच्या प्रशस्तीसाठी हिंदूंवर दुगाण्या झाडून मिळवलेली सवंग अविवेकी इस्लामी मते आणि चीन किंवा रशियाची मांडलिकी पत्करून इथे आणलेले सत्तेचे तणावे व पैसा ही आज इंदिराजींची मुख्य शस्त्रे होत. जनसंघाने ही सर्व शस्त्र बोथट करावयास आरंभ

केला आहे. हरिजनांना आवश्यक ती विकासाची संधी ग्रामीण, भूहीन, दरिद्री, भारतीय जनतेपर्यंत पोचविण्याची कोशीस, राष्ट्रहितदक्ष घट्ट भूमिका, राष्ट्रद्रोह्यांविरुद्ध आग्रही उपाययोजना, यांच्या वळावर जनसंघ हळूहळू पण ठामपणे भारतात सत्ताधारी होईल.

जनसंघावर सदैव चिखलफेक चालू असताना जनसंघाने आणखी एक आंदोलन हाती घ्यावे. ते म्हणजे कुराण निषेधाचे. कुराणाची शिकवण हीच मुळी या सर्व अशांततेचे बीज आहे. कुराण हा धर्मग्रंथ होऊ शकत नाही. निधर्मी राज्याची घोषणा करणाऱ्या आपल्या देशात दुसऱ्या धर्ममतांना नष्ट करू पाहणाऱ्या धर्मपुस्तकांना बंदी असायला हवी. शांती, समानता–भावना, सहिष्णुता वगैरे भले विचार इस्लामी जगात नांदू शकत नाहीत. कुराणाचा अर्थ समजावून घेऊन कुराणावर भारतीय न्यायालयाकरवी बंदी घालायची योजना आपण आखली पाहिजे.

प्रा. नरहर कुरुंदकर यांनी इस्लामच्या धर्मग्रंथाची या दृष्टीने चिरफाड केलेली आहे. स्वातंत्र्यवीर सावकरांनी आणि अ. ज. करंदीकरांनीही कुराणातील आज्ञांचे भयानकपण सांगितलेले आहे. पण हे दोघेही काँग्रेसीजनांच्या दृष्टीने प्रतिगामी पण गांधीवादी, नेहरूवादी आणि समाजवादी प्रा. कुरुंदकरसुद्धा कुराणाचा हा असा अर्थ विशद करू लागले आहेत, मग असा आक्रमक इस्लाम इथे नांदवून घेता येईल काय ?

आणि म्हणून सर्व कायदेपंडितांनी इस्लामी जगात प्रसिद्ध झालेल्या अधिकृत कुराणाचा व त्यावरील स्मृतिग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे. भारतीय घटनेत मान्य केलेले धार्मिक स्वातंत्र्य नाकारणारे या देशाचे शत्रू होत. इस्लाम आमचे धर्मस्वातंत्र्य नाकारतो. आणि त्या अभिप्रायाने इस्लाम हा हिंदु धर्माच्या अस्तित्वाचा शत्रू होय, हे विदारक सत्य निदान जनतेला उघड करून सांगणे भाग आहे. नेते हेतुपुरस्सर आमच्या या म्हणण्याचा विपर्यास करतील व आम्हाला जातीय ठरवतील. कारण त्यांचे स्थान अशा विपर्यासावर व बुद्धिभेदावर आधारलेले आहे.

आम्ही आमच्यापुरते आज असे ठरवीत आहोत की, कायद्याने–घटनेने–न्यायालयाने आम्हास दिलेले स्वतंत्र विचाराचे–मताचे–धर्मस्वातंत्र्याचे हक्क जो धर्म–जो धर्मग्रंथ नाकारतो त्याचे आपण अस्तित्वच नाकारावयाचे. औदर्य हे फक्त नाशाप्रत नेते आणि म्हणून आम्हाला काफर ठरवून, आम्हाला जगू न देणारा जो कोणता धर्म असेल तो आमचे दृष्टीने अधर्म होय. ख्रिश्चन लोकांनी जी येथे वाटवावाटवी केली–जुलूम जबरदस्ती केली त्यांना त्यांच्या धर्मग्रंथाचा आधार नाही. जे घडले ते केवळ धर्माच्या नावाखाली अधर्म करणाऱ्या अनुयायांकरवी. पण इस्लामचे तसे नाही. त्यांच्या सर्व आडदांड–असहिष्णु–प्रगतिशून्य अशा धोरणाला –कत्तलीना–वायकांची लूट करायला त्यांच्या धर्मग्रंथाचे साहाय्य आहे. आणि धर्मश्रद्धा किती खोल असतात हे सांगणेच नको.

भारतीय दंडविधानातील जातीय सलोख्यांच्या तरतुदी, भारतीय घटनेच्या धर्मस्वातंत्र्याच्या तरतुदी आणि भारतातील उदार लोकशाहीची परंपरा यांचा विचार करता 'कुराण' या दैवी ग्रंथावर मानवी कायद्याची अंमलबजावणी करावयास हवी असे आम्हाला वाटते. मान्यवर कायदेतज्ज्ञांनीहि ही कारवाई करून पहावी असे सुचविले आहे. या कामासाठी पुष्कळ खर्च येण्याची शक्यता आहे. ज्या कुणाला वरील शक्यतेची प्रचीती येईल व वरील विचारातील अचूकता पटेल त्यांनी आमच्याकडे पत्रव्यवहार करावा.

आमच्यापुरती कोणतीही चळवळ ही ॲकॅडमिक असणार. आम्ही कोणत्याच राजकीय पक्षाशी संबंधित नाही–असणारही नाही. निदर्शने, चळवळी हे आमचे मार्ग नव्हेत. देवडीवरच्या रखवालदाराप्रमाणे आम्ही या समाजावरील देवडीवर रखवालीचे काम इमानदारपणे करू. याच अभिप्रायाने हा एक तर्कसुसंगत शक्यतेच्या कोटीतला, कायद्याच्या चौकटीतला उपाय आहे. आणि–

म्हणून 'कुराण' बंदीच्या योजनेला आम्ही आज आरंभ करीत आहोत व योग्य त्या कोर्टात कुराणावर बंदी घालण्याचा अर्ज दाखल करणार आहोत.

दि. ७ जून १९७०

• • •

तो शिवाजी तुमचा नव्हे !

दिनांक अकरा जून १९७० रोजी सातारा येथील एका पांढऱ्या सभेत यशवंतराव चव्हाण म्हणाले, 'शिवाजी अफजुलखानाशी लढले तसेच चंद्रराव मोऱ्यांशी लढले... शिवाजी महाराजांचा पुष्कळ लोक गैरवापर करीत आहेत, हा शिवाजीचा अपमान आहे. महाराजांचा भगवा झेंडा आम्हाला पूजनीय आहे. काही जातीय पक्षांना तो ध्वज आपल्या स्वार्थासाठी वापरायचा आहे. तो ध्वज आम्हाला मान्य नाही. भगव्या झेंड्याचा अपमान भिवंडीत झाला तो आर. एस. एस. चा होता.'

शाबास यशवंतरावजी. आम्ही तुमच्याकडून अशाच भाषणाची अपेक्षा करीत होतो. दिल्लीत आपण जी घाण करता ती सातारा–कऱ्हाडच्या तुमच्या खास मतदारांना–विचाऱ्यांना कळत नाही. त्याला दिल्ली लांब पडते. तिथले राजकारण निराळे. तिथे इंदिराजीशी कसे जमवून घ्यायचे हा मुख्य प्रश्न. इथे आपला मतदार

राष्ट्रवादी कसा होणार नाही याविषयी घ्यावयाची जागरूकता, सर्कशीतले कसरत. पटूसुद्धा हार जातील अशी ही कसरत आपण करून राहिला आहात. पण दिल्लीत आपण जी घाण केलीत व महाराष्ट्राची जी अब्रू घालवली आहे तिची वार्ता आपल्या महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात पसरू लागली आहे. हळूहळू खेड्यातील समाज वाचू-लिहू लागला, त्याला आपले दिल्लीतले थेर समजू लागले. जनसंघवाले आता हळू-हळू समाजातल्या सर्व थरात शिरकू पाहत आहेत. ते तुमचे भांडे फोडणार. त्यामुळे तुम्हीही अस्वस्थ झाला आहात. सामान्य नागरिकांना भ्रमचित्त करू शकणारे फसवे, गोड बोलण्याचे कसब तुम्ही आत्मसात केलेत हे खरे, पण बोलणे आणि करणे यात फारच अंतर आहे. 'भिवंडीवर' जे आपण भाषण केलेत त्याने काँग्रेसचे आमदारही दुखावले आहेत. शरद पवार आणि विठ्ठलराव गाडगीळ यांनी आमदारांचा असंतोष तुमच्या कानावर घातला तेव्हा तुम्ही नुसते हसलात आणि त्यांना दिलेल्या अबोल आश्वासनांनुसार परवाच्या कऱ्हाडच्या साप्ताहिक भेटीत आपण एक नवेच अजा-गळ सत्य सांगितलेत.

तुमच्या वरील बोलण्यावरून मला एक गोष्ट आठवली. कऱ्हाडचे एक पाटील होते. तुमच्यासारखेच बेभरवशाचे. त्यांचे लग्न झाले एका दिल्लीच्या मुलीशी. ही मुलगी शिदळ निघाली. कारणे काहीही असोत. तेव्हा लोक विचारू लागले, की 'काय हो कऱ्हाडकर पाटील, तुमची बायको ही अशी कशी ?' त्यावर कऱ्हाडकर पाटील म्हणाले, 'छे ! छे ! ती मुळी माझी बायकोच नाही. ती दिल्लीच्या पाटलाची मुलगी आहे. शिदळ आहे ती दिल्लीची मुलगी—'

भिवंडीच्या शिवजयंतीच्या मिरवणुकीतला भगवा ध्वज शिवाजीचा नव्हता तर काय अफजुलखानाचा होता ? आणि शिवाजीचा भगवा ध्वज काय वारसा-हक्काने तुम्हाला मिळाला की काय ? शिवाजीचा भगवा ध्वज हे कशाचे प्रतीक आहे ? आधी शिवाजीने भगवा ध्वज का पत्करला ! शिवाजीचे तत्वज्ञान कोणते ? आपल्याला इतिहास माहीत नाही का आपण हेतुपुरस्सर अडाणीपणा करता हेच कळत नाही. महाराष्ट्रात जन्मलेल्या कोणाही माणसाला शिवचरित्राचे रहस्य माहीत आहे. शिवचरित्राचे रहस्य माहीत नव्हते ते पं. नेहरूंना—गांधीना मोरारजीभाई देसाई यांना म्हणून तर त्या शहाण्यानी शिवाजीला वेगवेगळी दूषणे दिली. ज्यावेळी 'शिवाजी'ची उपेक्षा होत होती तेव्हा चव्हाणमिया आपण—आपले राजकीय बापजादे आणि भाईबंद त्या तिघांची हुजरेगिरी करीत होते. शिवाजी हा चुकलेला देशभक्त आहे असा उल्लेख केला गेला. तो विश्वासघातकी आहे. असे म्हणले गेले त्याचा तुम्ही कधी प्रतिकार केला काय ? कऱ्हाड—साताऱ्यात शिवाजी महाराजांची स्तुतिस्तोत्रे गावीत आणि दिल्लीत गेल्यावर अतिमानवतावादी पांघ-रूण घेऊन सोळभोक पुढाऱ्यांशी शय्यासोबत करावी हेच खरे.

शिवाजीचे राजकारण हे उघडउघड हिंदुत्वाचे राजकारण आहे. मोगल अमलाखाली हिंदुत्वाचे शिरकाण होत होते–मूर्ती भंगत होत्या–देवळे उध्वस्त होत होती–वायावापडचांच्या नव्हे तर चांगल्या सरदार–दरकाऱ्यांच्या मुलीवाळी मुसलमान आपल्या अंगाखाली ओढत होते–एरवी उपासमार कोणाचीच नव्हती–पोटापाण्यासाठी कोणी अडून वसले नव्हते. आपल्या वापाप्रमाणेच शिवाजीनेही स्वराज्याऐवजी मोगली अम्मलदारी पत्करली असती तर वैयक्तिकरीत्या तो सुखी झाला असता. 'धर्मावरच्या संकटाखेरीज अन्य कोणतेही संकट शिवाजीसमोर नव्हते. त्याला स्वराज्य हवे तरी कशाकरता होते ?

या प्रश्नाचे उत्तर आपल्याला परवडणारे नाही. कोणाही मराठी माणसाला हे उत्तर ज्ञात आहे. पण दुर्दैवाने महाराष्ट्रद्रोही आणि हिंदुत्वद्रोही अशा आपल्याला ते ज्ञात नाही. स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही हेच खरे. मातलेल्या म्लेंच्छांना थोपवण्यासाठी, गाई मारणाऱ्यांचे हात कलम करण्यासाठी, या भूमीच्या मालकाची कुचेष्टा थांववण्यासाठी, वलदंड धर्मियांना नेस्तनावूत करण्यासाठीच शिवाजीने एकाकी लढा दिला. शिवाजीला केवळ पराक्रम दाखविण्यासाठी राज्य नको होते. त्याच्या मनात हिंदू अपयशाची चीड जागी झाली. तो चक्क हिंदुहित जपणारा राज्यसंस्थापक होय आणि हे उद्दिष्ट दाखविण्यासाठी त्याने भगव्या ध्वजाची स्थापना केली.

भगवा ध्वज हे हिंदू धर्माचे प्रतीक आहे. अगदी महाभारतकालापासून भगवा ध्वज अस्तित्वात आहे. भगव्या रंगात विरक्ती आहे तसेच अरीचे रक्तही आहे. शत्रूच्या रक्ताने माखलेला ध्वज सप्त सरितातून धुतला की जो रंग त्यावर टिकतो तोच भगवा रंग होय. हिंदू धर्म आक्रमक नसला तरी त्यावर आघात अनेक झाले. शत्रूचे रक्त त्याला अनेकदा सांडावे लागले. आणि म्हणून 'जित' अशा शत्रूच्या रक्ताने रंजित झालेल्या या ध्वजाला टोकेही असतात. एक धार असते. ही धार वाऱ्याने फडफडत असते. शत्रूच्या शोधात असते. शत्रूच्या रक्तानेच ती तृप्त होते.

म्हणूनच शिवरायांनी भगव्या ध्वजाला राष्ट्रध्वज केले. ती एक धर्मध्वजाही होती. ज्याला शिवाजीवर प्रेम करायचेय–त्याला त्याच्या त्या ध्वजाचे रहस्य समजावून घेतले पाहिजे. युद्धाचा तिरस्कार करून युद्धे मिटत नाहीत. ती मिटतात केवळ तलवारीनेच. आणि म्हणूनच भवानी मातेने तिच्या कर्तवगारपुत्राला तलवार दिली. मात्र तिच्या तीनशे वर्षानंतर जन्म घेतलेल्या प्रतिशिवाजीला ढाल दिली. कारण त्याला युद्ध करायचेच नव्हते. त्याला रणभूमीवरून सदैव पळावयाचे होते. त्याला गनिमापासून रक्षण हवे होते. त्याला तलवारीपेक्षा ढाल सोयीस्कर होती.

शिवजयंतीचा उत्सव जरी टिळकांनी चालू केला असला तरी शिवभक्तीची या भूमीला सवय आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, शिवरामपंत

परांजपे, अच्युतराव कोल्हटकर व अखेरी सावरकर या सर्वांनी राष्ट्रवादाच्या पुनरुस्थानासाठी शिवाजीचीच कास धरली. शिवाजी हा एक अद्‌भुत मंत्र आहे. पण त्या मंत्रात त्याच्या भगव्या ध्वजाला–भवानी तलवारीला, गनिमी काव्याला आणि हिंदवी स्वराज्याला कसे विसरून चालेल.

आजच्या हरामखोर प्रतिशिवाजीना शिवाजीचा धर्म नको आहे. त्यांना त्या अद्‌भुत मंत्राची शक्ती तेवढी हवी–लोकांच्या टाळ्या हव्यात–अंगावर रोमांच उठवणारी 'हरहर महादेव' ही आरोळी हवी–शिवाजीचा वारसा हवा, पण शिवाजीच्या या कमअस्सल औरसांना शिवाजी लाभणार कसा. स्वधर्म–स्वभूमी आणि स्वराज्य याचे सेवेकरी हेच खरे शिवाजीचे अनुयायी आणि म्हणूनच या प्रति. शिवाजीचा ध्वज भगवा नाही–असणारही नाही. ते दुसऱ्या शरणार्थी ध्वजाचे पूजक–ते दुसऱ्या शरणार्थी तत्वज्ञानाचे पुजारी. त्यांचे शिवाजीशी जमणार कसे.

शिवाजीचा भगवा ध्वज आज शासकांच्या हातात नाही हे देशांचे दुर्दैव आहे. पुराणपरंपरा असणारा हा भाग्यशाली हिंदुस्थानचा (भारताचा नव्हे) ध्वज दिल्लीच्या निःसंतान–लाचार–षंढ शासनाने संन्याशाची छाटी करून टाकला आहे. आणि म्हणूनच भगवा ध्वज क्षणभर तेजोहीन झालेला दिसतो. सावरकरांचा पराभव जसा प्रतिगामी सावरकरवाद्यांनी केला तसा भूमीशी वेइमान झालेले हे हरामखोर प्रतिशिवाजी खऱ्या शिवाजीला मोडून खाणार. आपल्याला हवा तसे वाकवायला शिवाजीमहाराज म्हणजे काही महात्मा गांधी नाहीत का नेहरू नाहीत आणि ते सुद्धा वाकवायला जिनाच हवेत. ते काम चव्हाणांचे नोहे. शिवाजी ही महाराष्ट्राची एकमेव शक्ती आहे आणि तीच शक्ती साऱ्या भारतभर न्यावयाच्या ऐवजी ती आम्ही खच्ची करीत आहोत. अहमदावादला जे घडले याचे कारण सुरत आहे हे विसरू नका. आणि भगव्या ध्वजाचा अर्थ महाराष्ट्रावाहेर पोहोचू लागल्याची निशाणी आहे.

भिवंडीचा ध्वज हाच. पराक्रमी महाराष्ट्राचा ध्वज होय. मोडीत चाललेले षंढ नेतृत्व कितीही ओरडले तरी तोच ध्वज जिकणार आहे. अवघ्या वीसपंचवीस वर्षात पन्नास वर्षांची घाण धुऊन काढण्याचे कार्य आज जनसंघाने चालवले आहे. यशवंतरावांचे पितर स्वर्गातून आले तरी आता जनसंघ मरत नाही. संघावर बंदी पडत नाही. यशवंतराव म्हणजे काही वल्लभभाई पटेल नव्हत. आणि वलभभाईंनी संघाचा नाश होऊ दिला नाही कारण संघवाल्यांची देशभक्ती त्यांना ज्ञात होती. चिनी युद्धानंतर हतवुद्ध झालेल्या नेहरूंनी संघाचे घेऊ केलेले सहाय्य चव्हाण विसरलेले दिसतात.

चव्हाणांचे वूड आता हललेले आहे. पंतप्रधानकी सोडा पण प्रधानकीही टिकवणे त्यांना जड जाते आहे. खूपच आक्रस्ताळे बोलले म्हणजे आपले अस्तित्व

जाणवते म्हणून न शोभेल असे अतिरेकी बोलणे त्यानी सुरू केले आहे. भिवंडीच्या दंगलीवावत त्यांना हिंदुस्थान तर राहोच पण महाराष्ट्रही क्षमा करणार नाही– करता कामा नये. जनमताच्या वळावर नेहरूंच्या हातून संयुक्त महाराष्ट्र हिसकावून घेणारा महाराष्ट्र, महाराष्ट्रद्वेषाला विसर पाडून शिवाजीवद्दलची अज्ञानमूलक विधाने मागे घेऊन प्रतापगडावर त्यांना खेचून आणणारा महाराष्ट्र, चव्हाणांनाही आज ना उद्या धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.

'भगव्या ध्वजाचा' अपमान करणारा या घडीला चव्हाणापेक्षा दुसरा कोणीही काफर हिंदुस्थानात नाही.

दि. २८ जून १९७०

● ● ●

खुदा हाफिझ् पाणिनी, खुदा हाफिझ्

संस्कृत ही देवभाषा असे म्हणतात. ती नेमकी कधी निर्माण झाली तेही ज्ञात नाही. येवढी कठीण भाषा निर्माण करणारे जे कोण 'हरीचे लाल' असतील त्यांना आमचे अक्षरशः दंडवत. आणि जी भाषा शिकता शिकता अनेक पोरे टेकीला आली, त्या भाषेचे व्याकरण निर्माण करणारा तो महामुनी पाणिनी–वैय्याकरणी पाणिनी–आम्हास नेहमीच भयदायक वाटे. गणित निर्माण करणारा भास्कराचार्य आणि शक्लृपच् मुचि रिच आदी नेहमीच घोटाळ्यात टाकणाऱ्या कारिका व त्या निर्माण करणारी संस्कृत भाषा व तिचा व्याकरणकार पाणिनी हे बालपणी माझे मोठ्यातले मोठे शत्रू होते.

पण मोठेपणी मात्र या दोनही श्रेष्ठ पुरुषांना नीट समजून न घेतल्याबद्दल मला नेहमीच वाईट वाटले आहे. ज्ञानांच्या त्या आदि देवता आपल्याला सहज प्रसन्न करून घेता आल्या असत्या असे राहून राहून वाटत राहते आणि खंत वाटते. नि त्यातही जगाला अजूनही बुचकळ्यात टाकणारी या भूमीची जी संस्कृती तिच्यातली ही ज्ञानाची सदावर्ते मला सदैव बंद राहिली ही मला लज्जेची बाब वाटते.

त्या कालात अनेक क्षेत्रात भारताने वैज्ञानिक आघाडी मिळवली होती आणि आशियात आर्य धर्माची ध्वजा फडकावली होती. साहित्य, भाषा, गणित, ज्योतिष-

विद्या, वैद्यक, नृत्य, धनुर्विद्या अशा अनेक क्षेत्रात भारतीय भूमीत फार प्रचंड अशी संशोधने झाली आणि जगाच्या इतिहासात त्या बहुतेकाची सन्मानाने नोंद झाली आहे. भारतीय संस्कृती ग्रीक संस्कृतीपेक्षा आधुनिक असे म्हणणाऱ्या संशोधकांचेही इथल्या प्रगतीबद्दल, संशोधनाबद्दल मुळीच दुमत नाही.

जेव्हा ख्रिश्चन वा इस्लाम धर्म निर्माण झालेले नव्हते, जेव्हा अर्धनग्न स्थितीत युरोप आणि मध्य आशिया येथे पशुतुल्य मानवसमूह आयुष्य गुदरत होते, तेव्हा सिंधू-गंगा-रावी आदी नद्यांच्या खोऱ्यात भरभराटीस आलेली राजकुळे साम्राज्ये निर्माण करीत होती, वास्तुशिल्पे उभी करीत होती, उत्तमोत्तम साहित्य निर्माण करीत होती आणि निर्भय-न्यायबद्ध-पुरोगामी समाजात वावरत होती. समाजाचे नियमन करणारी मनुस्मृती-सृष्टीचे आदितत्त्व उलगडणारी उपनिषदे स्त्रियांच्या विभ्रमाचे-कटाक्षाचे, शरीर-सौष्ठवाचे अर्थ विशद करणारी कामशास्त्रे व कोकशास्त्रे आणि मनुष्यांच्या मर्यादित शक्तीना अमर्याद करणारी योगशास्त्रे येथे निर्माण होत होती. मुसलमानांनी येथे संस्कृती आणली असा पुष्कळ भोंगळ माणसांचा गैरसमज आहे. पण मुसलमानांनी येथे जंगलीपणा-क्रौर्य-असहिष्णुता-अमानवी वासनापूर्ती या गोष्टी आणल्या त्याप्रमाणे काही नव्या गोष्टी आणल्या असतीलही. पण भारतातली उत्तमोत्तम ग्रंथालये-पाठशाळा-वेदशाळा-संगीतशाळा देवालये-शिल्पगृहे यांचा चक्काचूर करून आपली संस्कृती नेमकी काय आहे याची त्यांनी याद अनंतकाळ ठेवली आहे. मुसलमानांच्या प्रचंड अत्याचारातूनही अनेक देवदेवते-ग्रंथसंग्रह-शिल्प भग्नावस्थेत का होईना शिल्लक आहेत हे आमचे भाग्य. ज्यांना मुसलमानांचे घण फोडू शकले नाही अशी भारतीय संस्कृती शिल्लक राहिली ती सूज्ञ अशा पंडितांमुळे.

आज मुद्रणकला ज्ञात झाली त्यामुळे अनंत ठिकाणी ज्ञानसंग्रह करून ठेवणे शक्य झाले. पण केवळ हस्तलिखितांची जपणूक करणे मुसलमानी आक्रमणाचे वेळी शक्य होण्यासारखे नव्हते. अत्यंत क्रूर-असहिष्णू-जंगली-बुभुक्षित अशा त्या अरबी टोळीवाल्यांनी कितीतरी मौल्यवान पुस्तके जाळून टाकली. पण कंठस्थ करून ठेवलेली भारतीय विद्वत्ता त्यांना नष्ट करता आली नाही. पाणिनीने सूक्तबद्ध केलेली अष्टाध्यायी त्याच्या शिष्यांनी परंपरेने पाठ करून आपल्यापर्यंत पोहोचवली आहे. आणि जगापुढे भारताची मान उंच ठेवली आहे. एवढे जुने आणि एवढे परिपूर्ण व्याकरणशास्त्र जगात कोठेही नाही, हे आपणास भूषणास्पद आहे.

पण काय उपयोग ! आता पाणिनी आपला कुठे आहे. पाणिनी हा एके काळी भारतीय होता. बिचाऱ्याची मुळीच इच्छा नसताना त्याचे भारतीयत्व हिरावून घेण्यात आले आले आहे. आपल्या नादान-मूर्ख-उतावळचा जननायकानी पाणिनीला विकले-मनूला विकले-वेदविद्येला विकले-आपल्या वेदभूमीला विकले

–आपल्या आईला विकले–सोन्याची सिंहासने विकत घेणाऱ्या या भेकड आणि लाचार नेतृत्वाने सुवर्णभूमीची विक्री केली. आपली कुलभूषणा सिंधू नदी विकली, तरुण रसरशीत अशा लक्षावधी तरुण स्त्रिया मुसलमानांच्या जनान्यात लोटल्या.

होय, पाणिनी आता पाकिस्तानी झाला आहे. आजवरची त्याची मूर्ती एखाद्या ऋषीप्रमाणे होती. पण उद्या तो एखाद्या मुल्ला–मौलवीप्रमाणे दिसू लागेल. कारण लाहोरनिवासी पाणिनी हा पाकिस्तानचा पहिला व्याकरणकार ठरला. पुरुषपूरचा रहिवासी मनू कदाचित् उद्याचा पाकिस्तानचा पहिला स्मृतिकार ठरेल. आपल्या संस्कृतीची मूळ भूमी बळकावून बसलेल्या यवनसंस्कृतीने केवळ भूमीच गिळंकृत केलेली नाही तर आपली सर्व मानचिन्हे बळकावली आहेत. आर्यांचे खरेखुरे आर्यावर्त आता आर्यांचे राहिले नाही, ते यवनांचे झाले आहे.

पाकिस्तानातील एका व्याकरणकाराने 'पहिला व्याकरणकार' म्हणून पाणिनीला आपले पुस्तक अर्पण केले आहे. करो विचारा. आमचे भोंगळ राज्यकर्ते जिथे स्वतःच्या बायका–पोरांची अब्रू विचारात घेत नाहीत, तेथे पाणिनीचे काय? आमच्या राज्यकर्त्यांना या संबंधात काही पुसले तर पिवळ्या, काळ्या, कुवट कागदावर उत्तर येईल, 'हू इज् धिस पाणिनी? त्याचे उत्पन्न काय? त्याला जर मानधन–पदवी–पेन्शन हवे असेल तर त्याने अर्ज करावा. सरकार त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करील.'

विचारा पाणिनी, आम्ही तरी काय करणार? पुन्हा पेशावर–लाहोर–तक्षशीला वगैरे जिंकून घेण्याची भाषा काढणे या देशात गुन्हा मानले जाते. आमचे जे भाईबंद चुकीने, जबरदस्तीने, लालचीने हिंदू संस्कार विसरले, चुकीच्या दैवतांची उपासना करू लागले, त्यांना परत पूर्वस्थळी आणणे या देशात जातीय ठरते–प्रतिगामी ठरते. आमच्या संस्कृतीचा संहार करणाऱ्या व अजूनही करू पाहणाऱ्या पुंड माणसांचा बंदोबस्त करणे हे तर या देशात महाभयंकर मानले जाते.

एकंदर हिंदूंचेच दिवस बरे नाहीत. मग पाणिनी, तुझ्यासाठी आम्ही काय करणार! मौलाना पाणिनी, आता जगातले विद्वान तुझ्यासाठी काय करतात ते पहा. आम्ही तर नकामा आहोत. आम्ही संस्कृत भाषा ही प्रतिगामी आणि मेलेली भाषा मानतो. शिकायला अवघड असलेली ही भाषा आम्ही बामणांची मानतो. जणुकाही हा हिंदूधर्म एकट्या बामणांची मिरासदारी आहे. कुणीतरी केलेल्या अपराधाची शिक्षा संस्कृत भाषेला, चतुर्वेदांना, मनू, पाणिनी, कणाद, कपिल, वात्स्यायन, पातंजली यांना भोगावी लागते आहे. जगाने डोक्यावर घेतलेले हे संपन्न विज्ञान आम्ही चुकीच्या द्वेषापोटी मातीमोल करतो आहोत. या बामणांच्या व्याकरणकर्त्या, तुला या देशात विचारतो कोण?

म्हणून म्हणतो गुडबाय पाणिनी–

खुदा हाफिझ्

दिनांक ६ सप्टेंबर १९७०

● ● ●

येथून हिंदूंचे राज्य सुरू होते

मोठी माणसे मृत झाली की त्यांच्या आठवणी चिरंतन राहाव्यात यासाठी स्मारकांची धांदल सुरू होते. स्मारक ही मरणाऱ्यांच्या सोयीसाठी नसून करणाऱ्यांच्या सोयीनुसार घडत असल्यामुळे मृताचे व्यक्तिमत्व, तत्त्वज्ञान व आकांक्षा यांचा संबंध स्मारकाशी क्वचितच असतो. त्यांचे पुतळे, त्यांच्या नांवाच्या बागा, वास्तू, जलाशय किंवा राजपथ आपण निर्माण करतो. पण ही सारी दगडमातीची स्मारके मातीतून निर्माण झालेली आणि मातीत मिळणारी असतात. ती काही काळ उंच मानेने उभी राहतात आणि ज्यांच्या नावाने ती उभी केली जातात, त्यांच्या तत्त्वज्ञानाचे दिवस फिरले की उद्ध्वस्तही होतात.

तरीही स्मारके निर्माण होत आहेत आणि निर्माण होत राहतीलही. स्मारके उभे करणारे लोक विशिष्ट वर्गाचे असतात. सत्ताधारी, श्रीमंत, गट करून राहणारे, हे आपल्या सर्व शक्ती पणाला लावतात. आणि प्रतिपक्षीयांच्या डोळ्यात सदैव खुपेल व त्यांना खिजवील असे दगडधोंड्यांचे स्मारक उभे करतात. आणि आपल्या नायकाच्या नावाचा डिंडिम वाजवीत असतात. या नावाचा लौकिक पाच-पन्नास वर्षेही राहणार नसतो हे त्यांना ठाऊक असते.

युगकर्ते पुरुष या दगडा-मातीच्या स्मारकापासून निराळे असे नाव आपल्या कृतीने मागे ठेवतात. शिवाजीसारख्या पुरुषाचे नाव मागे राहिले आहे ते दक्षिणपथातील हिंदूंच्या रूपाने. शिवाजी न होता, तर दक्षिण भारतातील सारे हिंदू परमेश्वराऐवजी अल्लाच्या नावाने पुकारा करीत, वेरूप मिनारांच्या भकास पांढऱ्याफटक इमारतीत उरलेल्या परधर्मीयांचा निःपात करण्याची योजना करीत बसले असते.

स्मारके उद्ध्वस्त होतातच. शिवाय आजचे देशभक्त हे उद्याचे देशद्रोही ठरण्याचीही शक्यता असते. आजचे महात्मे उद्याचे क्षुद्र पापात्मे ठरून त्यांची छी–थू होणार असते. जबरदस्तीने लादल्या गेलेल्या, भुलावणीने मोठेपण मिळविलेल्या किंवा द्रव्याने विकत घेतलेल्या मोठेपणाच्या जागा काळपुरुष पचू देत नाही. हिटलर, मुसोलिनी तर बिचारे पराभूतच झाले, पण स्टॅलिनचे काय झाले ? रशियाचा आजचा

लौकिक आणि गेल्या युद्धातील अतुलनीय यश ज्याच्या मजबूत हाताने रशियाला मिळाले तो स्टॅलिन मेला मात्र, त्याच्या स्मारकाची काय दुर्दशा झाली पहा! आमच्या देशातील गेल्या पाच-पन्नास वर्षांतील देशभक्तांची देशप्रीतिसुद्धा संशयास्पद आहे. काळपुरुष जेव्हा ज्याच्या त्याच्या कर्तृत्वाचे मोजमाप ज्याच्या त्याच्या पदरात टाकील तेव्हा हे सर्व नेते हास्यविषय होतील. ज्यांना स्वातंत्र्याची किंमत कळली नाही, ज्यांना देशरक्षणाची महती समजली नाही व ज्यांनी आपल्या देशाचे मानबिंदू, आपल्या सीमा, आपल्या देशाच्या प्रतिष्ठा यापेक्षा स्वतःची प्रतिष्ठा मोठी मानली त्यांना आज ना उद्या शासन होईलच होईल. ज्या सिंधु आणि गंगा नद्यांचा वारसा आम्ही सांगतो, त्या नद्यातील पवित्र पाणी आमच्या आया-बहिणींच्या रक्ताने आणि अश्रूने अपवित्र झाले व ते, भ्याडपणाने आणि षंढपणाने बलदंडापुढे मान तुकविली त्या नेत्यांमुळे झाले त्यांना मुळीच शिक्षा होऊ नये म्हणता की काय? एका माणसाच्या सहेतुक वा अहेतुक खुनासाठी कायदा फाशीची शिक्षा सांगतो, निदान त्याचे आयुष्य बरबाद करतो आणि ज्यांच्या माथ्यावर एक नव्हे शेकडो खुनांचा, बलात्कारांचा, वित्तहानीचा बोजा आहे त्यांची मात्र स्मारके उभी करू दिली जावीत? ज्यांना लोकांचा कायद्यावरचा विश्वास अबाधित राहायला हवा असेल त्यांनी जो न्याय सामान्य नागरिकाला लागू तोच न्याय नेत्यांना आणि त्यांच्या अनुयायांनाही लागू केला पाहिजे. आज ना उद्या हिशेब चुकता करावाच लागतो. वारसाहक्कानं ज्या देशात,पंतप्रधानपद मिळते त्याच देशात बापाच्या किंवा नेत्याच्या पापाचे शासन अपत्याने किंवा अनुयायाने भोगलेच पाहिजे. प्रश्न आहे तो हिशेबाची वेळ केव्हा येईल हा. पण ती वेळ फार दूर नाही. कारण इतिहासाने सांधा बदलला आहे हे, आता उघड दिसते आहे.

सावरकरांचे स्मारकच होऊ नये असं मला वाटतं याचं कारण त्यांचं खरं स्मारक आपण करू शकणार नाही हेच होय. गांधींचं नाव हे ज्यानी आपल्या व्यवसायाचं भांडवल केलं आहे, ते लोक आपल्या धंद्याच्या आड येणारं सावरकरांचं खरे स्मारक उभं राहू देणार नाहीत. शांतपणे विचार केला तर असं ध्यानात येईल की सावरकरांच्या समकालीनांपैकी कवित्व, व्यासंग, वक्तृत्व, द्रष्टेपण आणि युद्धनीती या दृष्टीने सावरकरांची बरोबरी करू शकेल असा एखादादुसरा नेताही नसेल.

सावरकरांच्या देशप्रीतीविषयी तर कोणाच्या मनात शंका नाही ना? मग त्या देशप्रीतीचा उमाळा हटवादानं आणि झुंडशाहीनं स्वतंत्र भारतातसुद्धा दाबून टाकण्याचा जो यत्न झाला त्याला आपण क्षमा कशी करणार? सावरकरांच्या पासंगालासुद्धा जी माणसं पोहोचली नाहीत, त्या माणसांनी या देशभक्ताची अखेर-पावेतो किती चेष्टा करावी याला खरोखरच सीमा नाही. सावरकर हे काही परमेश्वराचे प्रेषित नव्हते किंवा कोणताही परमेश्वरी वरदहस्त त्यांच्या डोक्यावर

नव्हता. स्वतःचे मोठेपण वाढविण्यासाठी त्यांनी आश्रम स्थापले नाहीत किंवा विक्षिप्त कपडे पेहेरले नाहीत. ते डोळस होते आणि इतिहासाचे अभ्यासू होते. महंमद घोरीने पृथ्वीराजाला जो धडा शिकविला, मलिक काफरने रामदेवरावाला जो धडा शिकवला, तो ते कधीही विसरू शकले नाहीत. यवन काय किंवा ख्रिश्चन काय हे या देशात उपरे आहेत, आक्रमक आहेत; आणि त्यांच्या निष्ठा, त्यांची दैवते, त्यांचे सगेसोयरे अखेर या देशाबाहेर आहेत याचाही विसर त्यांनी पडू दिला नाही. ते प्रतिगामी तर नव्हतेच पण जातीयवादी नव्हते. उलट गांधी-नेहरूंच्यापेक्षा ते पाखंडी होते. बुद्धिवादी होते, सामान्य जनांना न परवडतील एवढे समाजसुधारक होते. नेत्याला हव्या असणाऱ्या चतुरस्र व्यक्तिमत्वाचा तो एक लखलखता प्रकाश होता. प्रकाशात डोळे दिपले तरी अखेरी त्याची सवय करून घ्यावी लागते. कारण प्रकाशाबाहेर आपले भागत नाही. त्यांना जो हिंदुधर्म हवा होता त्यात नव्हते चातुर्वर्ण्य, नव्हते आहारविहारावरील निर्बंध. त्यांचा हिंदुधर्म हा राष्ट्रधर्म होता. अल्लाची उपासना करणारा व येशू ख्रिस्तापुढे मेणबत्त्या जाळणारा त्याच्या दृष्टीनं हिंदू होऊ शकत होता. कारण त्यांचं हिंदुत्व ग्रंथबद्ध नव्हतं, देवदैवतातही नव्हतं, तर आर्यावर्ताच्या पुनरुत्थानात होतं. सावरकरवाङ्मय वाचल्याशिवाय त्यांना जातीय आणि प्रतिगामी ठरविणाऱ्यांची केवळ कीव केली पाहिजे म्हणून परवा वैराळे-महाशय बोलले त्याबद्दल त्यांना केवळ क्षमा करणे भाग आहे. सावरकरांचं धर्म-विषयक औदार्य मुसलमानांचा वा ख्रिश्चनांचा द्वेष करायला शिकवीत नाही तर त्यांनाच देशभक्त करण्याचा महामंत्र देतं.

म्हणून सावरकरांचं स्मारक एवढ्यासाठीच आजच्या अनुदार वातावरणात होऊ नये असे वाटते. सावरकरांच्या तत्त्वज्ञानाबाहेर या देशाचं भागणार नाही हे तर खरंच, पण सावरकरांचे तर्ककठोर तरीही उदार हिंदुत्व राज्यकर्त्यांनी यापुढे समजावून घेणं अत्यंत आवश्यक आहे. या देशापुढील महान् समस्या सोडविण्याचं सामर्थ्य भोंगळ गांधीवादात निश्चितच नाही. या देशाच्या भाग्याचा रथ सत्याच्या आणि अहिंसेच्या चिखलात अडकून पडला आहे तो ओढून काढण्याचं सामर्थ्य ज्या शक्तीत आहे ती जेव्हा भारतीय शासनात अवलंबिली जाईल तेव्हाच सावरकरांचं खरं स्मारक होईल. संकोचलेल्या भारतीय सीमा, सामर्थ्याच्या जाणिवेनं पूर्वस्थितीला जातील किंवा कदाचित् विस्तारतीलही, जेव्हा आमची भाग्यविधाती सिंधु मुक्त होईल; पुण्यावतीचं आर्याचं प्रवेशद्वार जेव्हा परत भारतीय स्वामित्वाखाली येईल तेव्हा त्या प्रवेशद्वाराची आपण एक कमान उभारू. तिथं एखादा स्तंभ उभारू. तिथे एखादा शिलालेख चितारू. त्या कमानीखालून येणाऱ्या परकीयांच्या मनात पाप असेल तर तेथे खडया असलेल्या भारतीय नंग्या समशेरी ते पाप मुळापासून खेचून बाहेर ओढतील. ती कमान ओलांडताना कोणाही परकीयांच्या मनात भारतीय

सामर्थ्यावद्दल शंका असणार नाही. जे भारत लुटण्यासाठी येत असतील ते तेथूनच परततील. भारताबद्दल आणि भारतीय संस्कृतीबद्दल ममत्व असणारे ते आपले मित्र भारतीय स्वातंत्र्यापुढे आणि सामर्थ्यापुढे नम्र होतील. कारण तेथे एक पाटी दिमाखाने उभी असेल.

'येथून हिंदूंचे राज्य सुरू होते.'

यापेक्षा सावरकरांचे अधिक भव्य स्मारक होणे कसे शक्य आहे ?

दिनांक ९ जून १९६८ ● ● ●

आम्हाला हिंदू म्हणून जगू दिलेत तरच . . .

हिंदू–मुसलमान प्रश्नाचा विचार करताना मुसलमान धर्माची उत्पत्ती कशी झाली हे पहाणे क्रमप्राप्त आहे. महंमद पैगंबर इस्लाम धर्माचे संस्थापक परमेश्वराचे प्रेषित, त्यांची वचने त्याच्या मृत्यूनंतर दोन तीनशे वर्षांनी एकत्र करून जो ग्रंथ निर्माण झाला तोच कुराण हा ग्रंथ होय. इस्लामच्या सांगण्यानुसार महंमद हा अखेरचा प्रेषित होय. म्हणजे इस्लामच्या तत्त्वानुसार कुराणानंतर नवे काही ईश्वरी ज्ञान निर्माण होणे अशक्य आहे. कारण नवा प्रेषित होणारच नाही. इस्लाममध्ये धार्मिक बंडखोरांना 'सजाए मौत' दिली जाते.

कुराणामधे दिलेल्या माहितीनुसार ईश्वराची खरी आज्ञा ज्यू व ख्रिश्चन या धर्मातल्या प्रेषिताना समजली नाही आणि म्हणून इस्लामचे तत्त्वज्ञान हेच खरे अखेरचे ईश्वरी सत्य आहे. या दोन धर्मांतल्या लोकांना इस्लामी जगात रहाण्याचा हक्क इस्लामने दिला आहे–काही अटी घालून.

पण या दोन धर्मांव्यतिरिक्त जे कोणी असतील, त्या सर्व मूर्तिपूजकांना इस्लामी जगात केवळ जगण्याचासुद्धा अधिकार नाही. त्यांनी एकतर इस्लाम धर्म स्वीकारावा किंवा मरावे. त्या सर्व काफरांना सच्च्या मुसलमानाने नष्ट केले पाहिजे किंवा इस्लामची दीक्षा दिली पाहिजे. हे सर्व बिगर किताववाले (म्हणजे परमेश्वरी आज्ञांकित कुराणामध्ये न उल्लेख केलेले) लोक जितक्या प्रमाणात नष्ट करण्यात येतील, तितक्या प्रमाणात महंमदी तत्त्वज्ञानाचा जय होईल,

सद्धर्मप्रतिपालकाचा धर्म वाढेल व वेहस्तामध्ये चांगली जागा मिळेल ही स्वच्छ आणि नीट आज्ञा कुराणात दिली आहे.

आणि म्हणून एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात तलवार अशा प्रकारे 'इस्लाम' धर्म प्रसाराला वाहेर पडत असतो.

कुराणाचा व महंमदी आज्ञेचा नीट अभ्यास केल्यावर इस्लामी तत्त्वज्ञानानुसार या भूमीत रहाण्याचा हिंदूंना हक्क नाही हे लक्षात येईल.

हिंदु–मुसलमान ऐक्याच्या पायात हे दुर्दैवी सत्य आहे आणि या धर्मग्रंथाचा अभ्यास न करता गांधी–नेहरूंनी ऐक्याचे यत्न केले. सर्व धर्म चांगलेच असतात, उदार असतात हे इस्लामच्यावावतीत खरे नाही. खरा हिंदू कोणत्याही धर्ममताचा शत्रू नसतो. आणि त्याने कोणत्याही धर्ममताचा अपमान केलेला नाही. मानव हा अपूर्ण असून धर्म, धर्मसंस्थापक वा धर्मग्रंथ त्याच्या पूर्णत्वास मदत करतात, असे हिंदू धर्म मानतो. जेव्हा धर्मावर ग्लानी येते किंवा धर्मकल्पनात दुरुस्ती करण्याचा प्रसंग येतो, तेव्हा परमेश्वर पुनःपुन्हा या भूमीवर जन्म घेतो, असे हिंदू धर्म मानतो. म्हणूनच तो धर्म सहिष्णू आहे. बंडखोरीला तेथे वाव आहे. मतभेद असले तरी कुणाचाही आत्मा या धर्मात कुढत मरत नाही. हिंदू धर्माचे आजचे सबगोलंकारी स्वरूप हे अशा उदार व सहिष्णू कल्पनातून प्राप्त झालेले आहे. आजची विस्कळीत समाजरचना अनेक संस्कृती आम्ही आमच्या पोटात सामावून घेतल्या म्हणूनच घडली आहे. पण नेमके तेच विस्कळीत धर्मस्वातंत्र्य आज आमचा घात करीत आहे.

आमच्या धर्मावर या इस्लामने आक्रमण केले. आमच्या धर्मवांधवांपैकी कोट्यावधी धर्मवांधव वाटवले. आमच्या देशाची सर्वात भाग्यशाली भूमी गिळून टाकली. तरीसुद्धा हिरवा चाँद सर्वत्र दिमाखाने फडकतो. तरीसुद्धा मुसलमान बंधूंच्या भल्यासाठी 'मेलपुरम्' जिल्ह्याची निर्मिती होते. मुसलमान भाईंचे मन दुखावेल म्हणून आम्हाला प्रार्थना करण्याची, आरती करण्याची वा मिरवणुका काढण्याची वंदी होते. मुसलमान धर्मवेडया एकवट मतासाठी अजूनही लाचार, सत्तालोलूप नेते त्या आक्रमक धर्मापुढे गोंडा घोळतात. मुसलमान मते ही आज सत्तास्पर्धेत फार महत्त्वाची झाली आहेत. पण ही मदत घेणाऱ्या नेत्यांना त्या मताचे भय वाटत नाही. कारण त्यांनी कुराण वाचलेले नाही किंवा महंमदी धर्माचा अभ्यास केलेला नाही.

खरे तर आपण हे संकट ओळखलेलेच नाही. कुराणात इस्लामी धर्ममत आहे तेच जर कायम रहाणार असेल व ज्या धर्मात हिंदूंना जगण्याचासुद्धा अधिकार नाही, त्या धर्मावावत आम्ही तरी सहिष्णू कसे रहावयाचे ! तो धर्म शेजारी उभा कसा राहू द्यायचा ? जोपावेतो वदलत्या जीवनक्रमानुसार नव्या प्रश्नावर

नवा तोडगा काढणारा नव प्रेषित इस्लाम निर्माण करीत नाही, जोपर्यंत दीड हजार वर्षांपूर्वीच्या मध्ययगीन जगातल्या दुष्ट आणि घातकी आज्ञा देणारा धर्म बदलू इच्छित नाही, तोपर्यंत तो धर्म आमच्या उरावर आम्ही नाचू द्यावा की काय ? इस्लामी जगाची हिंदू जगाकडून अपेक्षा तरी काय आहे ? हिंदू नष्ट व्हावेत असेच महंमदाचे म्हणणे आहे की काय ? तर मग आम्हालाही मार्ग शोधला पाहिजे. एका एवढ्याशा धर्मपुस्तकाने सारे नवे–जुने प्रश्न सोडविणारी धर्मपद्धती संकुचित आणि कुचकामी नाही का ? हिंदुस्थानाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी इस्लामी धर्माज्ञा मोडून गोपा बंद करण्यात आला अन् बहुपत्नीत्व बंद करण्यात आले. पण हिंदुस्थानातले मुसलमान अल्लाचे खास लाडके पुत्र तर नव्हेत की त्यांना इस्लामची आज्ञा अखेरची, अपरिवर्तनीय वाटते. आमचे मागणे आम्हाला हिंदू म्हणून जगू द्या एवढेच आहे. पण हे उर्मट आणि अरेराव धर्मांध लोक आम्हाला साधा जगण्याचा हक्कसुद्धा नाकारतात !

आणि मग ते मुसलमान म्हणून हिंदुस्थानात त्यांचा जगण्याचा हक्क हिंदूंनी नाकारला तर ?

इस्लामी जगाने या प्रश्नाचा गंभीर विचार केला पाहिजे. हिंदु समाज यापुढे अन्याय सहन करील असे वाटत नाही. आणि इथे जर मुसलमानांना जगावयाचे असेल तर त्यांनी कुराणाचा नवा अर्थ सांगितला पाहिजे. मनुस्मृती जाळणाऱ्या बहुजन समाजाने एकदा कुराणाचासुद्धा अभ्यास करावा. मग त्यांच्या लक्षात येईल की, उच्चवर्णीय हिंदूंनी कनिष्ठ हिंदूंना जगण्याचा अधिकार तरी दिला होता. पण मुसलमान, हिंदूंचा हिंदू म्हणून जगण्याचा अधिकारच मान्य करीत नाहीत. हिंदू धर्मियातील उच्चवर्णीयाविरुद्ध जे आंदोलन चालू आहे त्यांचे मी स्वागतच करतो. पण उच्चवर्णीय हिंदूचा पराभव करण्यासाठी मुळात हिंदू जगले तरी पाहिजेत की नकोत ? हे परधर्माचे आक्रमण आपण आधी थोपवू या. आणि एकदा आपण सारेजण या भीतीतून मुक्त झालो की मग केलेल्या सर्व अपराधाची भरपाई आम्ही साऱ्या बहुजन समाजाला करून देऊ. हिंदुधर्मातली वर्णव्यवस्था मोडण्यासाठी जर कोणी हातोडा उचलला तर पहिला प्रहार ब्राह्मणांनी झेलला पाहिजे व तो आघात त्यांनी हसतमुखाने पचवलासुद्धा पाहिजे. पण त्या आधी हातात हात घेऊन समोरच्या भयाण संकटाला सामोरे जाऊ या.

दिनांक २४ ऑगस्ट १९६९

● ● ●

लांडग्यांना पिटाळण्याची वेळ आली.....

औरंगाबाद आणि नागपूर येथे जातीय दंगलीना आरंभ झाला हे वृत्त वाचताच क्षणभर मी चकित झालो.

एवढ्या अल्पसंख्येने असणारी ही जमात दंगल करण्यासाठी प्रवृत्त होते हे पाहून विचित्र वाटणे स्वाभाविक आहे.

पण यात खरे विचित्र काहीच नाही.

ज्या जमातीला एका धर्मांध राष्ट्राची फूस आहे आणि त्या धर्मांध राष्ट्रामागे साम्राज्यपिपासू सत्तांची शक्ती आहे, ज्या जमातीच्या मतांसाठी काँग्रेससारखा पक्ष हातात झोळी घेऊन उभा आहे, ज्या जमातीने अवघ्या वीस वर्षांपूर्वी धर्माधिष्ठित अशी राष्ट्रसत्ता केवळ धमकीने, गुंडगिरीने, दंग्याने बहुसंख्य लोकांकडून भूभाग हिसकावून उभी केली, त्या जमातीची मस्ती उतरावी तरी कशी ? आम्ही जेते आहोत ही घमेंडखोर भाषा त्यांनी न काढावी तर कोणी काढावी ? आम्ही इथल्या हिंदूना संस्कृती दिली असे निर्लज्जपणे म्हणणारे धर्मांध त्या जमातीत का न निर्माण व्हावे ?

गांधीयुगानंतर खरे म्हणजे मुसलमान सदैव जिंकत आले आहेत. आवळा देऊन ते कोहळा मिळवीत आले आहेत. प्रश्न एखाददुसऱ्या भल्या मुसलमानाचा नाही. प्रश्न जमात म्हणून मुसलमानांचा आहे, आणि ती जमात भारतद्रोही आहे. अजून दिल्ली काबीज करण्याची भाषा ती बोलते आहेच. पाकिस्तानच्या गर्जना ती तर सदैव करते आहे. इथल्या काफरांना 'मक्का मदिना दाखवून शुद्ध करण्याची' भाषा त्या जमातीचे उल्लू पुढारी निर्लज्जपणे, प्रगटपणे बोलताहेत.

आणि हे असे बोलले म्हणून त्यांचे वाकडे कोण करणार आहे ? कारण मुसलमानांसाठी कायदे निराळे, न्यायही निराळा. हिंदूनी मात्र लग्न एकच केले पाहिजे. कारण त्या हिंदू स्त्रियांवर अन्याय होतो. मुसलमानांवर अशा निर्बंधाची गरज नसावी. त्यांच्या बायकांवर अन्याय म्हणून होत नाही. तिकडे आयूबमियांनीसुद्धा द्विभार्याबंदीचा कायदा मुसलमानांवर जारी केला आणि आमचे षंढ सरकार मात्र मुसलमानांच्या पुढे लाळ घोटत आहे. त्यांची मने सांभाळते आहे. त्यांच्या धर्मात हात घालायला डरते आहे. मुसलमानांची मर्जी सांभाळण्यासाठी आपले

सरकार एवढे आतुर असते की त्या वेळेस सरकारी लालफीत सुद्धा आड येत नाही.

मुसलमान ही एक धर्मांध जात आहे. राष्ट्रापेक्षा त्यांचे धर्मावर प्रेम जास्त आहे. जेव्हा दाखले देतात तेव्हा ते मलाया–इंडोनेशिया आदी राष्ट्रातील मुसलमानांचे दिले जातात आणि हिंदी मुसलमानांची राष्ट्रनिष्ठा कदाचित सच्ची असू शकेल असे सांगितले जाते. पण ते साफ खोटे आहे. इथले मुसलमान खऱ्या अर्थाने देशप्रेमी असणारच नाहीत आणि पाकिस्ताननिर्मीतीनंतर तर असणार नाहीतच नाहीत. उघड उघड हिंदूंशी युद्ध करून त्यानी पाकिस्तान मिळवले आहे आणि ते पाकिस्तान नष्ट व्हावे असे त्यांना वाटेल कसे ? त्यांचे पुष्कळ नातेवाईक पाकिस्तानात आहेत. ते व त्यांच्या सर्व सग्यासोयऱ्यांनी इथल्या मुसलमानांना सदैव धर्माची आण घातल्यावर हिंदुस्थानवर त्यांची मोहबत राहणार कशी ? आजवरच्या इथल्या राष्ट्रीय चळवळीत मुसलमानांनी म्हणण्याजोगा त्याग तरी काय केला आहे ? त्यांच्यात किती क्रांतिकारक झाले ? किती लोकांनी छळ सोसला ? औपधाला दोनचार सापडतीलही. सर्वसामान्यतः मुसलमान नेहमीच देशद्रोही होते. इंग्रज राजवटीने आपल्या रक्षणासाठी खूप खूप आमिषे दाखवून पारशी, अँग्लो इंडियन, किरिस्ताव तसेच धर्मांध मुसलमान हाताशी धरले. महत्त्वाच्या जागी त्यांच्या नेमणुका केल्या. समाजात त्यांना मानाचे स्थान दिले. त्यांच्या स्थानाला अवास्तव महत्त्व प्राप्त करून दिले आणि ही सर्व मंडळी स्वातंत्र्याच्या चळवळीच्या वेळी आमच्या देशभक्तांवर गोळ्या घालण्यात, त्यांना 'निगर' म्हणण्यात अभिमान बाळगत होती.

त्यांचे नशीब थोर म्हणून आपला देश विक्रीला काढणारा काँग्रेस पक्ष त्या वेळी गांधी–नेहरूंच्या हाती होता. जगाचे कल्याण करण्याचा विडा उचलणाऱ्या बापूजींनी मुसलमानांना योग्य न्याय कशाला द्यावा ? मग सारे इस्लाम जग त्यांना महात्मा कसे म्हणाले असते ? मुसलमानांशी त्यांनी यत्ने प्रयत्ने जमवून घेतले, आणि इस्लामी राष्ट्राशी सलोख्याचे संबंध जोडले. महात्मापदाच्या एकेक पायऱ्या या अशा अराष्ट्रीय पापातून निर्माण झाल्या. जेव्हा उद्या राष्ट्रवाद नष्ट होऊन जग एका छत्राखाली येईल तेव्हा हवे तर गांधी–नेहरूंचाच आम्ही जयजयकार करू. पण आज राष्ट्रवादाशिवाय कोणत्याच राष्ट्राचे पाऊल पडत नाही. अशा वेळेला तो महागडा विश्ववाद आम्हाला मुळीच नको. आमचा देश, आमचा धर्म, आमची बरीवाईट संस्कृती आम्हाला हवी आहे. ज्यांनी आमच्या धर्मावर प्रहार केले ते भले कोणी असोत. आमचे शत्रूच होत–शत्रूच राहतील.

आम्ही संयमी आहोत–उदार आहोत. पण आमच्या औदर्यालाही मर्यादा आहेत. आमच्या धर्मावर गेली सहस्त्रवर्षे यवन संस्कृतीने फार मोठा हल्ला चढविला आणि आमच्या धर्माचा एक प्रचंड तुकडा अलग केला. आमचा धर्म तोडला–राष्ट्र

तोडले आणि उरला सुरला आमचा हा भूभागही गिळंकृत करायाचा त्यांचा यत्न चालू आहे.

कोण घरी अल्ला पूजतो–का शंकर पूजतो त्याशी आम्हाला कर्तव्य नाही. पण सार्वजनिक दृष्ट्या या देशाने निधर्मी किंवा धर्मातीत राहू नये. त्याने हिंदूच राहावे. या राष्ट्राने सर्वसमावेशक वैदिक धर्म स्वीकारावा. आपल्या धर्माची आपल्याला लाज का वाटावी ? अमेरिकन देशात धर्माला राजाश्रय आहे–इंग्लंडात आहे पाकिस्तानात आहे. मग हिंदुस्थानात काय मोठा असा जगावेगळा देश लागून गेला की त्याला आपल्या धर्माची शरम वाटावी ?

औरंगाबाद–नागपूरची ही दंगल शमेल असे मला वाटत नाही. शमली तरी ती धुमसत राहील. गेली वीस वर्षे दोन धर्मातील तेढ कोणत्याही प्रकारे कमी झाली नाही. आपला अमूल्य भूप्रदेश लुबाडूनही त्या असंस्कृत जमातीचे समाधान झालेले नाही. ते समाधान होणारही नाही. त्या जमातीची समजूत घालण्याइतपत आम्हाला सवडही नाही. झाले गेले ते विसरून आम्ही राहू म्हणाल तर इस्लामची संस्कृती 'काफरांना' सुखाने राहू देणार नाही. आपल्या भलाईपेक्षा किंवा बढाईपेक्षा ठोशास ठोशानेच हे काम सुकर होईल असे दिसते. मूर्खांना शब्दापेक्षा ठोशाचा अर्थ लवकर समजतो. आमच्या भलाईचा अर्थ दुबळेपणा होतो आहे हे आता उघड झाले आहे. निधर्मीपणाचा बुरखा आता आपल्या सरकाराने सोडून द्यावा आणि मुसलमानांना अखेरचा इशारा द्यावा.

एकप्रकारे या दंगली या देशाला कदाचित वरदान ठरतील–त्यामुळे राज्यकर्त्यांचे डोळे उघडतील–धोरणात बदल होतील. आमच्या हिंदुधर्मावरचे मळभ सरेल अजगरासारखा झोपलेला हा समाज एक हजार वर्षांच्या काळातून जागा होऊन पराक्रमी होईल. ज्या कोणा मूर्ख माणसाच्या डोक्यातून या दंगली निघाल्या असतील त्याने या देशातील बहुसंख्य जातीवर एकप्रकारे उपकारच केले की काय ते काळ ठरवील. अजून संधी गेलेली नाही. कृत अपराधाला क्षमा करण्याइतके अजून आम्ही क्षमाशील आहोत. पण वेळ जाण्यापूर्वी जागे होण्याची वेळ इस्लामची आहे. ज्यांना पाकिस्तानमध्ये जायचे असेल त्यांच्यासाठी दरवाजे मोकळे ठेवलेले आहेत. ज्यांचे इमान चांदमधे आहे त्यांनी हा भानुशाली देश सोडून खुशाल चालते व्हावे पण इथेच राहून इथल्या नागरिकांच्या जीविताला दुःख पोचविण्याचा त्यांचा मानस असेल तर मग त्यांनी ध्यानात ठेवावे की आर्यधर्माच्या पुनरुत्थानाची पहाट उजाडू लागली आहे आणि खैबरखिंडीतून ज्या जंगली लांडग्यांच्या टोळचा या आर्यावर्तात घुसल्या त्या लाडग्यांना परत तेथे पिटाळण्यासाठी हिंदूंचे खड्ग सज्ज होईल आणि मग गांधी–नेहरू सांप्रदायसुद्धा त्यांच्या मदतीला जाऊ शकणार नाही.

दिनांक ३० जून १९६८

● ● ●

- बरे झाले-बाईचे नाक कापले
- सरकारी नोकरांचा संप मोडला
- इकडे मुंबई जळते आहे आणि. . .
- सुभेदारीला सुरुंग लावा
- पानपतनंतरचा मराठ्यांचा पराक्रम
- मोहिते, कोठे मिळतो हो तो समाजवाद ?
- नमस्ते वसंतरावदादा पाटील-तुम्हीसुद्धा ?
- जयचंदी अवलाद अजून जिवंत आहे

बरे झाले.... बाईंचे नाक कापले !

मोठ्या नाकाची माणसे मला आवडतात. एक तर ती घ्राणेंद्रियाचा उपयोग करू शकतात आणि त्याहीपेक्षा आपल्याला न कळणाऱ्या गोष्टीत त्यांना नाक खुपसता येते. वायका उतावळचा असतात असे आपण म्हणत होतो, पण त्या किती उतावळचा असतात हे आपल्याला तितके ठाऊक नव्हते. घरच्या कारभारातला उतावळेपणा किंवा अंगचोरपणा घातक असतो. पण त्यांनी घात होतो तो एकाच्या कुटुंबस्वास्थ्याचा. बाई जेव्हा महत्पदाला पोचते आणि ती आपले अंगभूत दुर्गुण प्रकट करू लागते तेव्हा एखादे राष्ट्र धोक्यात येऊ शकते.

आपल्या देशाच्या राज्यपदी आज एक स्त्री आहे. स्त्री आहे म्हणून मात्र ती प्रमुखपदास अपात्र आहे असे नाही. आहे ती स्त्री मात्र वेडसर आहे. एका दुर्धर महत्त्वाकांक्षेने ती वेडी झालेली आहे. स्वतःचा गौरव, मोठेपणा, सत्तास्थान यांसाठी देशहित, समाजस्वास्थ्य, कायदा, सभ्यता या साऱ्यांचा तिने निर्लज्जपणे त्याग केलेला आहे. तिच्या ठायी जो उतावळेपणाचा अतिरेक आहे त्यापायी इंग्रजी राजवटीमुळे आपल्या देशाला लाभलेली शिस्तबद्ध व्यवस्थायंत्रणा धोक्यात आली आहे. या देशात बुवाबाजीला फार महत्व आहे. आणि जो चमत्कार करतो असे म्हणतो त्याला या देशात कोणतेही स्थान मिळू शकते. राजकारणातही पुष्कळ बुवा आजपावेतो होऊन गेले. एक वर्षात स्वराज्यापासून ते गरिबी हटावोपर्यंतचे सारे चमत्कार कृतीत कधीच आले नाहीत. येणारही नव्हते. पण आपल्याला परमेश्वर (व माणूस) दोन्हीही वश आहेत असे नारे द्यावयाचे आणि काही तरी अद्भुत किंवा विस्मयकारक गोष्टींचा बकवा करावयाचा अशी या देशात फार जुनी परंपरा आहे. संतमहंत किंवा बुवा-महात्मा या देशात काय कमी झाले ! मग दारिद्र्य का गेले नाही ? हिंसा का नाही गेली ? अस्पृश्यता का गेली नाही ? विषमता का नष्ट झाली नाही ? युद्धे का नाही टळली ? मनुष्याचे अपूरेपण विचारात न घेता अशक्य गोष्टी करण्याचे यत्न जेव्हा जेव्हा होतात तेव्हा त्यांचे

भवितव्य हे असे होते. चांगली स्वप्ने पाहणे हा गुन्हा नाही. चांगल्या गोष्टीची आकांक्षा करणे हीच माणसाची प्रगतीची दृष्टी आहे. पण त्या सर्व स्वप्नांच्या मागे काही शक्यतेचा विचार हवाच हवा. मनुष्याच्या मर्यादांचे ज्ञान हवे. माणसाचा देव करू पाहण्याचा यत्न करणाऱ्याने माणसाचे माणूसपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. महात्मा गांधींची सारी तत्वज्ञाने किती गोड आहेत. हिंसा कुणाला आवडते ! पण हिंसेवाचून पदोपदी भागत नाही. अहिंसेचे प्रवचन ऐकून घ्यावे आणि घरी येऊन कोंबडी खावी व शेजाऱ्याशी झगडा करावा. हृदयपरिवर्तने करून झगडे मिटवावेत असेही सर्वांना वाटते. पण इतक्या सहजासहजी माणसे हट्ट सोडत नाहीत. सांगायचा मुद्दा असा की ज्यावर प्रयोग करावयाचे ते उपकरण काय जातीचे आहे ते पहावयाचे विसरून कसे चालेल ? परिणामी क्षणभर यशस्वी झालेले तत्वज्ञान ती व्यक्ती दिसेनाशी झाली की लोक वासनात गुंडाळून टाकतात व पुन्हा मनःपूत वर्तनास आरंभ करतात. आपल्या संतांचे जे झाले ते गांधींचे झाले.

आणि म्हणूनच या सामाजिक जीवनात व्यवहार्य मानवी मनाचा अभ्यास अपरिहार्य आहे.

पण पुष्कळदा त्याचाही दुरुपयोग करता येतो. मनुष्याला सात्त्विकतेचा बुरखा आवडतो. विरक्तपणा आवडतो. बुवाबाजी आवडते. त्याचप्रमाणे क्रांतीसुद्धा आवडते. बदल–मग तो चांगला वा वाईट–आवडतो. जुन्याला मोडून काढणारे काहीतरी घडत असावे असे अडाणी जनतेला वाटत असते. माथे फिरवून टाकणारी किंवा द्वेष पिकवणारी तत्वज्ञाने निर्माण करता येतात व ज्याना प्रभावी वक्तृत्वात ती गुंफता येतात ते काही काळ पृथ्वी गाजवतात. हिटलर, मुसोलिनी तर सोडाच, पण आयूबखानाने तरी काय केले ! हेच अफाट वक्तृत्व–भरपूर द्वेष–काही काळ यश.

इंदिराजींनी स्त्रीस्वभावानुसार अशा बाबतीत नवे तंत्र वापरले. मोरारजींना प्रतिगामी ठरवण्यासाठी त्यांनी राष्ट्रीयीकरणाचा तोडगा काढला. अर्थखात्याशी संबंध हवा म्हणून बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची निवड झाली. त्यातही परकीय सरकारशी कटकटी नकोत म्हणून त्यांना वगळण्यात आले. आणि चिरटोळया बँकांच्या व्यवस्थापनाचे विनकिफायतशीर ओझे नको म्हणून त्यांना टाळण्यात आले. लोणी तेवढे हवे होते. लोण्याबरोबर ताक येणारच आणि बडगाही बसणारच.

राष्ट्रीयीकरण केलेल्या सर्व उद्योगधंद्यांचा पसारा सरकारला आवरता येत नाही. लाच खाण्याची शिकवण मंत्र्यांनीच शासनसंस्थेला बहाल केली आहे. यामुळे कित्येकदा चांगल्या हेतूंसाठी केलेल्या गोष्टीसुद्धा देशाला महाग पडल्या.

कोणतीही गोष्ट सरकारी झाली की जवाबदारीशिवाय भागीदारी मिळाली असा भारतीय जनतेचा गोड गैरसमज आहे. सरकारी कारखान्यात व ऑफिसात कामाची सक्ती नाही. काहीही केले तरी कामगारांना कामावरून काढून टाकता येत नाही. तत्परता, वेग आणि कुसर याची गरज नाही. कामाचे तास भरणे महत्त्वाचे. अशा आळशी, सुखवस्तू देशात राष्ट्रीयीकरण म्हणजे सर्वनाश. निदान स्वार्थासाठी का होईना खासगी भांडवलदार अधिक उत्पादन करतो–करवून घेतो. स्पर्धेत टिकण्यासाठी माल चांगला काढतो–विकण्यासाठी कुशल माणसे नेमतो.

पण आपल्याला कुणी तरी जमवलेली संपत्ती फुकट मिळतेय–नुकसान तर नाही ना–या भूमिकेव्यतिरिक्त कोणतीच भाषा जनतेला आज समजत नाही. म्हणून राष्ट्रीयीकरण. म्हणून तनखाबंदी.

लोकांना वाटते, अशा तऱ्हेने श्रीमंतांची संपत्ती सरकारने ताब्यात घेतली रे घेतली की आपल्याला रहायला घर, दोन्ही वेळेला भरपूर जेवण आणि अंगभर कपडा मिळेल. पुढारी लोक खोटे सांगतात. आहे ती सर्व संपत्ती एकत्र केली, सर्व धंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले, तरीही भारतीय दारिद्र्याचा प्रश्न संपणारा नाही. येथे हवे तेवढे उत्पादन होत नाही. संपत्तीच निर्माण होत नाही. कारण कोणालाही कष्ट नको आहेत. आठ तास इमानेइतबारे काम करणारे कामगारच इथे नाहीत. प्रामाणिक कारकून नाहीत. साहसी आणि धिटाईखोर योजक नाहीत. या देशाचे म्हणावे तेवढे यांत्रिकीकरण–औद्योगीकरण अद्याप झालेले नाही. त्यामुळे दारिद्र्यातून मुळीच सुटका नाही. 'एवढी प्रचंड लोकसंख्या, एवढी प्रचंड भूमी आणि निसर्गाचे वरदान असताना येथे संपत्तीचा पूर निर्माण करता येईल. पण हा पणच फार महत्त्वाचा आहे. 'आराम हराम है' या नेहरूंच्या आरोळीचे काय झाले. काळ्याबाजारवाल्यांना फासावर देऊ या आरोळीचे काय झाले. आरोळ्यातून आम्ही क्रांती करतो आहोत. या भूमीला हक्क हवेत पण कर्तव्ये नकोत. त्यांचे आरोळीने भागते. कारण दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा हे राष्ट्रीयीकरणाच्या मलमपट्टीने बरे होणारे रोगच नव्हेत.

राष्ट्रीयीकरणाच्या कल्पनेला कोणाचाच विरोध नाही. प्रगत देशात महत्त्वाची अर्थ–निर्माणकेंद्रे व व्यवसाय सामाजिक मालकीचे असावेत हे मान्य तत्त्व आहे. पण त्यासाठी किमान चारित्र्य, देशप्रीती नकोत? संपत्तीविषयी आणि ती मिळवण्यासाठी श्रमावर प्रीती हवी का नको? प्रचलित ध्वनिकांवर आक्रमण करताना आपण निर्माण केलेली घटना, न्यायसत्ता आणि दंडविधान याचाही अंदाज करावयास हवा की नाही? का उचलली जीभ लावली टाळ्याला? अशी अवाजवी बेकायदेशीर ढवळाढवळ हा गुन्हा आहे. इंदिराजींनी लोकांना भुलविण्यासाठी बँक राष्ट्रीयीकरणातून काय काय निर्माण करता येईल याविषयी संपूर्णतः खोट्या

कल्पना जनतेसमोर मांडल्या आहेत. सर्व बँकांजवळचा पैसा एका भाकरा-नानगल-सारख्या योजनेलाही पुरणार नाही. पण हा विचार करतो कोण ! त्यात आता राष्ट्रीयीकरणाचा कायदा निकालात निघाल्यामुळे भरपाई देऊन बँका ताब्यात घेतल्या तर बेडेपणाचे होईल. संस्थानिकांना भरपाई देऊन तनखे बंद करणे हे जसे आर्थिकदृष्ट्या नुकसानीचे आहे तसेच शेअर्सची आजची किंमत देऊन बँकांचे शेअर्स विकत घेणे हेही विनफायद्याचे नाही का ? वास्तविक, सरकारने सर्व बँकांचे राष्ट्रीयीकरण करून आणि राष्ट्रीयीकृत बँक भागधारकांना तडजोड करून भरपाई देणे हा व्यवहार्य मार्ग, पण राष्ट्रीयीकरणातली जादू कायम ठेवण्यासाठी आर्थिक-दृष्ट्या चुकीचा मार्ग पत्करून सरकार बाजारभावाने शेअर्स खरेदी करणार व त्या शेअर्सच्या बळावर बँका ताब्यात ठेवणार... या अजब तर्कशास्त्राला म्हणावे तरी काय ?

इंदिराजींचे फाजील वाढलेले गर्विष्ठ लांब नाक आता कापले जाऊन अंगा-वरोवर झाले हे ठीक झाले. लोकांना भुलवणारी खोटी जादू इ. कंगन फुटून गेली. लढा शब्दांनी जिंकता येत नाही तो कृतीने जिंकावा लागतो. रिक्षावाले, टॅक्सी-वाले, हमाल यांच्यासाठी राज्य जरूर चालवावे. पण त्यांच्या लहरीनुसार ते चालता नये. गरिबी हटवण्यासाठी दुसऱ्याची संपत्ती केवळ लुवाडून भागत नाही. स्वतः भरपूर संपत्ती निर्माण करण्यासाठी अंग झाडून मेहनत केली पाहिजे—करायला लावली पाहिजे. वेळप्रसंगी दंडा मारून. इंदिराजींजवळची जादू संपली. हा पुरो-गामित्वाचा बाण बूमरँग ठरला.

भारतीय न्यायालये अजून मान उंच ठेवून काम करीत आहेत यावद्दल धन्यवाद. ज्यांनी ज्यांनी या लढ्याला हातभार लावला त्यांना धन्यवाद. हिस्टे-रिया हा पुष्कळदा सणसणीत चपराकांनीसुद्धा ताळ्यावर येतो. तसा तो या वेळेला येईल अशी आशा आहे. आता तरी सभ्यता आणि विवेक यांचा अवलंब होईल अशी आशा धरावी का ? का न्यायालयांना न्यायदानाचा अधिकार नाही असे ठरवणारा फतवा सुलताना इंदिरा काढील ? इंदिराजींचे भाटचरण 'न्याया-लयाच्या निर्णयापेक्षा लोकनिर्णय श्रेष्ठ' असे भकत गावगन्ना भटकत आहेत.

कोणत्या जनतेने बँकांचे राष्ट्रीयीकरण करा म्हणून घोशा लावला होता—आणि तोही पोरकट उतावीळपणाने ? ... खैर. जाने दो. अखेर लोकांना काय कळते आहे. आरोळ्या विकणे हेच फायद्याचे.

दिनांक २२ फेब्रुवारी १९७०

● ● ●

[illegible] संग्रहालय, [illegible]
[illegible] ७६९२ [illegible]
[illegible] २४४८ [illegible]

सरकारी नोकरांचा संप मोडला

१९ सप्टेंबर. हिंदुस्थानातील नोकरशाहीने शासनाला दिलेल्या आव्हानाचा एक बाष्कळ प्रयत्न. अराजक, अशांतता आणि बेदिली वाढवणारा. कम्युनिस्टांना साहाय्य करणारा, पर्यायाने आधीच जराग्रस्त झालेल्या गजराजाला आणखी खिळखिळा करणारा. यापूर्वी दोनवेळा असाच यत्न याच नोकरशाहीने केला होता आणि तो फसला होता.

हे सरकार मतपेटीने सिद्ध झालेले आहे. आणि मतपेटीने हे उलथताही येते. किंवहुना उलथले जाते असाही अनुभव आलेला आहे. कामगारांचे प्रधान नेते आजही लोकप्रतिनिधी म्हणून सरकार चालविणाऱ्या लोकसभेत माशा मारीत बसलेले आहेत.

कामगारविषयक चळवळीत काँग्रेसपक्ष फार पूर्वीपासून आहे. काँग्रेस पक्षाच्या अधिपत्याखाली पुष्कळ कामगारसंघटना आहेत. काँग्रेसने खरे तर कामगारविषयक फाजील उदार कायदे करून अविकसित देशांच्या उत्पादनाचा वेग कमी केला आहे. कामगाराचे जीवन सुखाचे व्हावे, गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी अरुंद होत जावी हे कोणी नाकारीत नाही. पण सरकारी नोकरांना संपाचा हक्क आदा करणे हे स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखे आहे. तेही सरकारी नोकर महत्त्वाच्या आणि आणीबाणीच्या कार्यक्रमात काम करणारे. पोटापाण्याचा प्रश्न असणाऱ्या रेशनिंग खात्यातले–रेल्वेतले–पोस्टातले. सरकार चालविण्याची ही रीत नव्हे.

कामगारांचे हक्क कामगारविषयक कायद्यात नमूद केलेले आहेत पण ' कर्तव्याची भाषा त्यात कोठेही नाही. गैरहजेरीबद्दल वेतन कमी होत असेल पण अकस्मात एका महत्त्वाच्या कामगाराच्या गैरहजेरीमुळे चार कामगारांच्या उत्पादनावर परिणाम होतो व पर्यायाने देशाच्या भाग्याचा रथ हळू चालू लागतो. कामगाराने आळसाने गैरहजेरी करावी, म्हणजे उत्पादन घटवावे याला कायद्याची मान्यता आहे. कामाचा वेग कमी करावा, आळसाने उत्पादन घटवावे, कच्च्या मालाची खरावी करावी, कायद्याबाहेरच्या सवलती उपटाव्या, एकीकडे कायद्याची भाषा करावी आणि दुसरीकडे व्यवस्थापकाकडे दयेची भीक मागावी असे एकमार्गी चक्र चालू आहे.

मालक अन्यायी आहेत, ते पिळवणूक करतात, कायद्यातून पळवाटा काढतात, कामगाराला न्याय्य हक्क मिळू देत नाहीत हेही खरे आहे आणि त्याविरुद्ध इलाज योजले पाहिजेत हेही खरे आहे. पण त्याचबरोबर ज्या देशात समाजवाद येतो आहे, ज्या देशाची विकासाची प्राथमिक अवस्था अद्यापि संपलेली नाही, त्या देशात कामगारांना उत्पादन कटवण्याचा हक्क उरता कामा नये. त्यांना सर्व तऱ्हेने आपल्या दुःखाला वाचा फोडण्याचे हक्क उपलब्ध आहेत. कोर्टे आहेत, लोकसभा आहेत, शिष्टमंडळे आहेत, सुट्टीच्या वेळात मोर्चे आहेत. पण हे करत असताना त्यांनी आपले काम बंद करता कामा नये हे त्यांना शिकवणे आवश्यक आहे. कुणी पुढारी मेला की लगोलग कारखाने बंद होतात. कामगार जुगारी अड्ड्यावर जातात–दारू पितात–दंगे करतात–रस्त्यावर गप्पा मारीत बसतात. पुढाऱ्यावद्दल आदर दाखवण्याची ही रीत मोठी अजब म्हटली पाहिजे. पुढारी जर खरा देशभक्त असेल तर त्याच्या स्मृतीसाठी कामगारांनी सुट्टीतही थोडे काम करून त्याला आदरांजली वहावी. पण कारखाने बंद करून आणि 'दिवस' असा हातभट्टीत बुडवून काय होणार? एक पगारी सुट्टी एवढाच कामगाराचा त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन असतो.

कामगार–व्यवस्थापक–सरकार–नागरिक–दलाल या सर्वांच्यात आज एक विलक्षण प्रकारचा शत्रुभाव आहे. तो कम्युनिस्टांनी हेतुपुरस्सर जोपासला आहे. शासनावरचा अविश्वास, व्यापाऱ्यांविषयी घृणा आणि गुंडगिरीमुळे मिळणारे फायदे यावद्दलचा प्रचार असंस्कृत पण संघटित समाजात ते नेहमीच करत असतात. कोणत्याही संपात जी लुटालूट होते–जाळपोळ होते–सरकारी मालमत्तेची हानी होते, त्यातून काय निष्पन्न होते ? जणू काही सरकार म्हणजे कोणा बाहेरच्या व्यक्तीचे आहे, ही मालमत्ता दुसऱ्याची आहे आणि ती लुटून आपला फायदा होणार आहे. आपणच दिलेल्या करातून मोठ्या मुष्किलीने उभारलेल्या या वास्तू छिन्नविच्छिन्न करून आपण आपलेच पाय कापतो. परवाच्या विदर्भ बंदच्या संपात पोस्टे लुटली गेली, दिवे फोडले गेले–गाड्यांचे रूळ निकामी करण्यात आले. उद्या तुम्हालाच लागणाऱ्या गोष्टी तुम्ही आज नेस्तनाबूत केल्यात–एवढाच त्याचा अर्थ. तुमची मुलेबाळे विनदिव्याच्या अंधारातून जाताना ठेचकाळतील आणि खड्ड्यात पडून मरतील–खरे तर मरावीतही. तुम्ही रेल्वेरूळ उखडले, तुमच्या आजारी आईबापांना भेटायला तुम्हाला जायला मिळता कामा नये. राग कशाचा आणि कुणावर काढायचा हे जरी मूर्ख अनुयायांना माहीत नसले तरी नेत्यांना माहीत असायला हवे. अशा दंगेखोर कामगारांच्या नेत्यांना, जुलमी आणि पिळवणूक करणाऱ्या भांडवलदारांप्रमाणे, कर चुकवणाऱ्यांप्रमाणे, भेसळ करणाऱ्यांप्रमाणे उघडे करून फटके मारले पाहिजेत. नेतृत्वाचे हार हवेत तर जबाबदारीची फाशी पत्करली पाहिजे. या दरिद्री देशाला सामायिक संपत्तीची हानी परवडणार नाही.

काँग्रेस सरकार वाईट आहे–ते बदलले पाहिजे–तेथे कामगारहिताचे सरकार आले पाहिजे असे ज्यांना वाटते त्यांना ते तसे करण्याची या देशात मुभा आहे. परंतु हम करेसो कायदा या न्यायाने केवळ संघ करून दंगा करता येतो, भुकेची खोटी हाक देऊन पोटार्थी कामगारांची माथी फिरवता येतात म्हणून या शासनाने त्या गुंडगिरीपुढे नमता कामा नये–कोणत्याच शासनाने नमता नये. शासनात सुधारणा जरूर हव्या आहेत. हे शासनही स्वर्गातून आलेले नाही. इथल्याच मूर्ख लोकांच्या नोकरशाहीतून लोकांचा ते राज्यकारभार करते. तेव्हा त्यात उणीवा आहेतच. फार मोठ्या उणीवा. पण जे पक्ष आज आमचे शासन बदलण्यासाठी यत्न करताहेत ते कम्युनिष्टांची वाट मोकळी करून देत आहेत हे त्यांनी लक्षात ठेवावे. कम्युनिस्टांच्या राजवटीत संपाचा अधिकारच नसतो. एवढेच नव्हे तर दोनवेळ पोटभर जेवू घालता आले नाही तर जेवण देण्याऐवजी तेथले सरकार जेवणारी तोंडेच कमी करते. म्हणून या शासनातला बदल कम्युनिस्टांच्या सोयीचा होता नये, एवढी काळजी सर्व पक्षांनी घेतली पाहिजे.

पण काँग्रेस–ट्रेपाला आज उधाण आले आहे. इंदिरा गांधींचे वस्त्रहरण करण्यासाठी जे दुर्योधन आज मांडी उघडी करून दाखवीत आहेत त्यांनी लक्षात ठेवावे की ही मांडी केव्हातरी फोडली जाईल. यात पांडवाचा निर्वंश होईल पण कौरवसुद्धा नेस्तनाबूत होतील मात्र काँग्रेसचा नाश हे साध्य नव्हे. ते एका निकोप राष्ट्रवादी राष्ट्रनिर्मितीचे साधन आहे. काँग्रेसनाशाशिवाय ते कार्य होणार असेल तर त्याचाही विचार करावयास हरकत नाही. एकवेळ काँग्रेस राज्य चालेल–कम्युनिस्टांचे मात्र मुळीच चालणार नाही आणि तसे होत असेल तर काँग्रेसच्या पाठीशी उभे रहाण्यात आम्हाला खंत वाटणार नाही.

वास्तविक काँग्रेसच्या भोंगळ, पंढवादी, पिचपिच्या धोरणाचा आम्हाला राग आहे. पण तरीही आम्हाला हे माहीत आहे की त्या शासनाने आम्हाला 'बोलण्याचे' स्वातंत्र्य दिले आहे. इथे उद्या लाल सत्ता आली तर हे चिरमुडे वृत्तपत्रसुद्धा आम्ही चालवू शकणार नाही. आचारस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य अबाधित ठेवणारे सरकार जरी किडलेले असले तरी आम्हाला चालेल कारण ते बदलता येईल. पण कामगारांचा पुळका घेऊन येणारी हुकूमशाही लालसत्ता मात्र उलथून टाकणे शक्य होणार नाही.

यशवंतराव चव्हाणांनी जे खंबीर पाऊल उचलले आणि हा संप पार चिरडून टाकला त्यामुळे शासनालाही काही घट्ट निर्णय घेता येतात हे कळून चुकले. असा घट्ट निर्णय यशवंतराव घेऊ शकतात, हा शासनातला बदल मानावा काय ? याच प्रकाराने नेहरूमहाशयांच्या काळापासून भिजत पडलेले, लोंबकळणारे अनंत प्रश्न त्यांनी सोडवण्याचा यत्न करावा. प्रश्न उद्यावर ढकलण्यापेक्षा ते आजच सोडव-

ण्यात फायदा असतो. कारण अन्य पुढाऱ्यांना त्या प्रश्नाचा विचका करायला संधी मिळत नाही. राजकीय प्रश्नाचे उत्तर नेहमीच आज द्यावे लागते–वेळी किंमत देऊन-नही नेहरूंच्या रशियाप्रेमामुळे इथल्या लालभाईना सिंहासन दृष्टिपथात आल्यासारखे वाटत होते. कामगारविषयक न्याय्य भूमिका पत्करून सरकारने आणि भांडवलदारांनी कम्युनिस्ट चळवळीतली हवा काढून घेतली पाहिजे. त्याचवरोवर कडक उपाय योजून राष्ट्रघातक चळवळी, मोर्चे, घेराव यांचा बंदोवस्त केला पाहिजे. कामगारांना सवलती देताना त्यावद्दलचा पुरेपूर मोवदला मिळेल अशी व्यवस्था करणारी मजबूत शासनव्यवस्था निर्माण झाली तरच विकासाचा वेग वाढेल आणि आपली उद्दिष्टे सफल होतील.

सरकारी नोकर हा धडा लक्षात ठेवतील अशी मी आशा करतो. सरकारी नोकरसंघटनांनी आपण राष्ट्राला काय देतो याचा विचार करावा आणि मगच आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर यावे. कोणाही नागरिकाचा या संपाला पाठिंवा नाही याचे कारण सरकारी नोकरांची उदासीनता, काळकाढूपणा, लाचलुचपत आणि त्यापेक्षाही उर्मटपणा. आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळाले असून केवळ 'जी आर.' वर वोट ठेवून कामात निरनिराळ्या अडचणी उत्पन्न करून फायली पलीकडच्या टेवलावर सरकवणे हे यापुढे चालणार नाही.

सरकारी नोकरांच्या संपाच्या पराभवावद्दल शासनाचे मनःपूर्वक अभिनंदन. त्यामुळे तरी सरकारी नोकर अंतर्मुख होतील आणि स्वतंत्र राष्ट्रातील सेवकांची कर्तव्ये पार पाडतील.

आणि ज्यावेळेस हे नागरिकांच्या लक्षात येईल तेव्हा सरकारी नोकरांना असा संप करण्याची पाळी येणार नाही.

दिनांक २९ सप्टेंवर १९६८

• • •

इकडे मुंबई जळते आहे आणि ....

गेल्या आठवड्यात एका वाह्यात आणि वात्रट मुलाने कागदाच्या कपट्याचा ढीग पेटवावा इतक्या लीलया सारी मुंबानगरी पेटवून दिली. वघतावघता

अठ्ठावन्न निरपराध नागरिक त्या आगीत आणि दंगलीत प्राण गमावून बसले. वास्तविक अशी जाळपोळ आणि गुंडगिरी करण्याचा हक्क मुंबानगरीत तरी फक्त फर्नांडीस यांनी प्राप्त करून घेतला होता. कोणताही हट्ट पुरवून घेण्यासाठी मुंबईचा सारा व्यापार–उदीम बंद करून गुंडांना चरितार्थ पुरविणं हा त्यांचा नित्याचा धंदा बनला होता. आता बाळ ठाकरे याही बाबतीत त्यांच्यावर मात करणार असे दिसू लागले आहे. या देशाचा कारभार कोण करते याविषयी खरोखरच मनात शंका उत्पन्न होते. एवढं मोठं लष्कर, पोलिस दल, प्रतिबंधक कायदे हातात असताना यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक हे जर बाळ ठाकऱ्यांसारख्या एकांतिक, आडदांड आणि पुंड मुलाला आवरू शकत नसतील तर सारा मामला एकूण गंभीरच आहे असे मानले पाहिजे. जगाला राजकारण शिकविणारे आणि घटकोघटकी उपदेशाचे डोस जनतेला पाजणारे हे लोकनेते, आपल्या नेतृत्वाला कस्पटासमान मानणाऱ्या एका क:पदार्थ गुंडापुढे नम्र होतात हे पाहिले की, मान लाजेने खाली जाते.

हेच यशवंतराव एखाद्या गरीबगुरीब हिंदुमहासभावाद्याचा किती छळ करू शकतात हेही अनुभवाला आले आहे. पुण्याचे एवढेसे सत्यनारायण प्रकरण घ्या. त्याचा केवढा बाऊ यशवंतरावांनी केला ! जणू काही साऱ्या भारतालाच आग लागली होती. ज्या राजकारणाचा आपल्या पक्षाला उपयोग करून घेता येतो त्या त्या राजकारणासाठी त्यांनी आकांडतांडव केले आहे. एखाद्या फडतूस स्थानिक मतभेदात मध्यस्थी करण्यासाठी त्यांनी रात्रीच्या रात्री पुण्या-कऱ्हाडात जागविल्या आहेत. परंतु एका निरर्थक हट्टापायी भारताची औद्योगिक राजधानी मुंबानगरी तिकडे पेटलेली असताना हा भारताचा गृहमंत्री इचलकरंजीतल्या एका मामुली इमारतीचे उद्घाटन करीत होता. रोम जळत असताना फिडल् वाजविणारा नीरो इचलकरंजीत यशवंतरावातून साकारला होता. भारताच्या एकात्मतेचे धडे आणि औद्योगिक प्रगतीचे पवाडे वाजवणारे यशवंतराव चव्हाण, भारताचे सोळा टक्के उद्योगधंदे ज्या उद्योगनगरीत आहेत तिच्या सर्वनाशाबद्दल सुस्काराही काढीत नव्हते. त्यांच्या सावलीप्रमाणे मागेमागे हिंडणारे काही लाळघोटे मंत्री सर्कीट हाऊसमध्ये रंगढंग करण्यात मशगूल झाले होते.

वसंतराव नाईकांची परस्पर जी फटफजिती होत होती त्या फटफजितींचा आनंद हे मित्र एकमेकांच्या हातावर टाळ्या मारत व्यक्त करीत होते. आपल्या नेतृत्वाला सुरुंग लागत नसलेल्या गोष्टीबद्दल ही मंडळी किती बेदरकार होती हे पाहिलं की यांचा मोठेपणा किती नकली आहे याची खात्री पटते. मुंबईच्या जवळ शेपन्नास मैलांवर असूनही मुंबईच्या प्रलयात जाऊन उभं राहावं असं ह्या महाभागांना का वाटू नये ?

लोकनेते अशांनाच म्हणतात की, ज्यांचे धीरोदात्तपण आणि प्रसंगावधान ही संकटाच्या वेळी जागी होतात. एक तर हे सर्व नेते भुसा भरलेली बाहुली आहेत किंवा या दंगलीशी त्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष काही संबंध होता.

बाळ ठाकरे यांच्या चळवळीला उपरोक्त नेत्यांचा पाठिंबा होता असेच मला अलीकडच्या खास घटनांवरून वाटत आहे. कोणतेही वैचारिक सामर्थ्य नसतांना बाळ ठाकरे यांची झुंडगिरी का माजू शकली याचे एकच तर्कसुलभ कारण संभवते ते हे की, कोणत्या तरी अंतस्थ हेतूसाठी-कम्युनिस्टांचं शिरकाण करण्यासाठी असेल किंवा फर्नांडिसला शह देण्यासाठी असेल किंवा भ्रमचित्त झालेल्या बुद्धिवादी समाजाचा औटलेट म्हणून असेल, किंवा स. का. पाटील यांच्या तथाकथित मुंबईच्या राज्यपदाला शह म्हणून असेल-कारण कोणतेही असेल, परंतु बाळ ठाकरे यांचा जो माकडी खेळ गेले अनेक दिवस मुंबईत गरजतो आहे तो शासकीय साहाय्याशिवाय शक्य नाही. बाळ ठाकरेंना टेलिफोन कनेक्शन मिळाले नाही, तर टेलिफोन भवन जाळून टाकण्याशिवाय आपणास पर्याय नाही असे तत्त्व ते मानतात. माणसाच्या क्षुल्लक लहरीसाठी सहस्त्रावधि नागरिकांना जर शरण जावे लागत असेल तर लोकसभा, विधानसभा, मंत्रीगण, सर्वोच्च न्यायालय आणि बंदोबस्तयांवर खर्च केलेले कोटयवधि रुपये पाण्यावर फेकले असा त्याचा अर्थ होतो. विसाव्या शतकात-त्यातही सातव्या दशकात हा युक्तिवाद आपण मान्य करणार असू तर आफ्रिकेहूनही आपला समाज मागासला आहे हे कबूल करावे लागेल. बाळ ठाकरे यांना मुंबईबाहेर कवडीचीही किंमत नसल्याने कोणत्याही प्रश्नाचा निकाल मुंबईतच लावून घेण्याची ते खटपट करणार. प्रश्न सोडविण्याची जागा, पद्धत आणि वेळ यांचे नवेच आडाखे निर्माण होऊ पाहात आहेत. लढा वेळगावचा, निदर्शने मध्यवर्ती सरकारविरुद्ध आणि किंमत द्यायची ती मुंबईच्या नागरिकांनी. हा चावटपणा आहे तरी काय ? आजवर आंजारून-गोंजारून वाढविलेली ही विषवल्ली ताब्यात ठेवणे किंवा ताळ्यावर आणणे चव्हाणांना जमते किंवा काय हेच आता पाहावयाचे आहे.

बाळ ठाकरे मराठी माणसांच्या मुंबईतील अन्यायाविरुद्ध प्रथम उभे राहिले. त्यातही 'मार्मिक'चा सुशिक्षित वाचक ज्यांच्या स्पर्धेत नामोहरम झाला आहे, त्या दाक्षिणात्यांच्याविरुद्ध त्यांनी आरोळी दिली. कोणत्याही चळवळीला लागणारे गुंड झोपडपट्टीतून निर्माण होत असतात. तेव्हा तिथल्या महाराष्ट्रीय गुंडांना ज्या केरळीय गुंडांशी स्पर्धा करावी लागते त्या गुंडांविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. मानसिक प्रकृतीने मराठी माणूस कोणत्याही स्पर्धेत कधी टिकत नाही तसा मुंबईच्या स्पर्धामय जीवनात अयशस्वी होतो आहे. आणि त्या अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडण्यात त्यांना धन्यता वाटत आहे. प्रश्न आहे मराठी माणसाचे मान-

सिक व सामाजिक दोष घालवून त्याला स्पर्धामय जीवनात यशस्वी कसे करता येईल याचा. त्याऐवजी अन्य प्रांतियांच्या द्वेषावर त्याचा अहंकार जोपासून वाळ ठाकरे यानी त्या असंतुष्ट समाजाची मने आकृष्ट करून घेतली आहेत. स्वतःचा प्रांत सोडून जाण्याची धडाडी, स्वकीयांविषयी ममत्व व प्राण ओतून कष्ट करण्याची तयारी यामुळे दाक्षिणात्य हे मराठी माणसापेक्षा यशस्वी झाले. हे सर्व मराठी माणसाला करता येईल. मराठी माणूस स्वबांधवांचा द्वेष करतो व त्याला पाण्यात पाहतो आणि म्हणून कोणत्याही औद्योगिक क्षेत्रात प्रमुखपदी असणारा मराठी माणूस निःपक्षपातीपणाच्या चुकीच्या कल्पनांमुळे मराठी माणसाला कसलेही साहाय्य करीत नाही, उलट कोलदांडे घालतो.

पण तो महत्त्वाचा मुद्दा नाही. मराठी माणसाच्या काही न्याय्य आणि काही स्वाभिमानापोटी उत्पन्न झालेल्या मागण्यांचा विचार केवळ मराठी माणसांच्या मतावर निवडून आलेले नाईक मंत्रिमंडळ किंवा चव्हाणांसारखे महाराष्ट्राचे मध्यवर्ती सरकारातील प्रतिनिधी करू शकत नाहीत असा अनुभव आहे. याचा अर्थ, एक तर मराठी माणसांच्या त्या मागण्या त्यांना न्याय्य वाटत नसल्या पाहिजेत किंवा बहुप्रांतीय राजकारणाचा विचार करावयाचा असल्यामुळे महाराष्ट्रावर खास करून पक्षपाती वाटेल असे प्रेम त्यांना करता येत नसले पाहिजे. आणि तिसराही एक पर्याय संभवतो. तो हा की शिवाजी काळापासून ते लोकमान्य टिळकांपर्यंत सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय असे आक्रमण महाराष्ट्राने सातत्याने उर्वरित भारतावर केले आहे. या गोष्टीचा त्यांना विसर पडलेला नाही. ह्या आक्रमणात महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या सर्व प्रांतांना महाराष्ट्राने किती अवमानित तऱ्हेने वागविले याचाही इतिहास साक्ष देतो आहे.

गांधीचे तमोयुग सुरू झाले. आणि महाराष्ट्राच्या पराक्रमाला व अस्मितेला ओहोटी लागली. राजकीय व आर्थिक नेतृत्व, आणि त्याहीपेक्षा आक्रमक पवित्रा याकामी मराठी माणूस खुजा वाटला जाऊ लागला. मुंबईतील मराठी माणसांवरचा अन्याय हा असा केवळ तात्कालिक नोकरीपुरता मर्यादित नाही. गेल्या पन्नास वर्षांत शिवाजीपासून लोकमान्यांपर्यंत महाराष्ट्राने जे जे मिळविले आहे, ते ते आपण सर्व गांधी युगात घालविले आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात आपण माणसाची उंची वाढविण्याऐवजी उंच माणसाचीच उंची कमी केली आहे. परिणामी मराठी माणसाचे परप्रांतातील आजचे चित्र हे कीव येण्याइतके दुबळे झाले आहे. त्याच जोडीला राष्ट्रीय पातळीवर काम करण्यास उपयोगी अशी इंग्रजी भाषा आपण हट्टाने फेकून दिली आणि पर्यायी हिंदीचाही स्वीकार पोटतिडिकीने केला नाही. या घटकेला महाराष्ट्रात जी आर्थिक संपन्नता दिसते तीही फसवी आणि वरवरची आहे. कोणत्याही कारखानदारीसाठी लागणारा पैसा आणि व्यवसायावरच्या निष्ठा

यांच्या अभावामुळे गुणवत्ता आणि सचोटी असूनही किर्लोस्कर–ओगले अशी दहा –पाच नावं सोडली म्हणजे बाकी सारे उजाडच आहे.

जे सरकारला सहजगत्या करता येण्यासारखे असते आणि जे सरकार करू इच्छित नाही आणि शकत नाही, त्यावेळी पाळावयाची काही कर्तव्ये असतात. आपलेच काही बांधव अन्य प्रांतात अडकलेले आहेत हे ठाऊक असूनही त्यांच्या हिताला बाध येईल अशा चळवळी करण्यापूर्वी आपण विचार नको का करायला ? चळवळीचा सारा रोख अन्याय दूर करू शकणाऱ्या शासकाविरुद्ध नको का असायला ? कोणत्याही चळवळीची अखेर दंगल, जाळपोळ, लुटालूट यात होते हे भान तर कधीही सोडता कामा नये. लोकशाहीच्या या जमान्यात वृत्तपत्रे आणि मतपेटी यासारखी दुसरी साधने नाहीत ; किंवहुना यांव्यतिरिक्त सर्व साधने अराजकांचा किंवा कम्युनिस्टांचा मार्ग मोकळा करून देतात हेही विसरता कामा नये. वरं, मतपेटीच्या द्वारा शासक उधळता येतात व हवा तो बदल शासनाला घडवून आणता येतो, हाही अनुभव आला आहे. पण जनमत तयार करण्याऐवजी जर कोणी दादागिरीने आपले तेच खरे करू म्हणेल, तर त्याविरुद्ध आणखी एखादा दादा उभा राहील आणि मूळ प्रश्न बाजूला राहून त्या दोघातील लढाई रस्त्यावर येईल. अशा तऱ्हेने प्रश्न सोडविण्याची किंवा जनतेत घबराट उडवून दबाव आणण्याची रीत सुरू झाली म्हणजे सर्वांनी प्रयत्नपूर्वक उत्पन्न केलेली भारताची नवी रचना, भारताची घटना, संचारस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य हे सारे नष्ट व्हायला मुळीच वेळ लागणार नाही.

बाळ ठाकरे या दंगलीची तयारी बरेच दिवस करीत होते. किंवहुना, त्यांचा विश्वास हा दमदाटी, अरेरावी, शिवीगाळ यांच्यावर बराच दिसतो. आपल्याला कोणी जाब पुसणारे नाही या खात्रीने ते तारतम्य सोडून अनेकदा वाचाळपणा करतात. त्यांचा गेल्या वर्षी–दीड वर्षातील कृत्यांचा बरावाईट परिणाम म्हणजे परवा झालेली दंगल. परवाच्या दंगलीने उत्पन्न झालेले प्रश्न तसे हवेवर सोडून देता येण्यासारखे नाहीत. परवा झालेल्या अठ्ठावन्न माणसांच्या हत्येची जबाबदारी जशी बाळ ठाकरे यांच्यावर आहे तशीच ती त्यांना पोटाशी घेणाऱ्या महाराष्ट्राच्या शासनावरही आहे. खरे पाहता फार पूर्वीच बाळ ठाकरे यांच्याविरुद्ध सरकारने इलाज योजायला हवा होता. या कामी मुख्यमंत्री वसंतराव नाईकांनी ज्या कोणत्या अंतस्थ हेतूसाठी बाळ ठाकरे यांचेकडे दुर्लक्ष केले त्यातूनच परवाचा रक्तपात संभवला. नको त्यावेळी औदार्य दाखविणाऱ्या प्रजा समाजवादी पुढाऱ्यांच्या नादी लागून बाळ ठाकरे यांची सरकारने मुळीच गय करता कामा नये. आज त्यांना मोकळे सोडले तर याहूनही भयानक संहार करण्याचे सामर्थ्य या वेडसर माणसात आहे हे त्यांनी ध्यानी ठेवावे. त्याचवरोवर निर्णयाची टाळाटाळ करण्याची जी सवय नेहरू-

चाचांनी लावली आहे तीही सोडून द्यावी. आमच्या राष्ट्रापेक्षा बेळगाव–कारवार ही गावे खचितच मोठी नाहीत. परंतु कोणतीच निर्णायक भूमिका न घेतल्याने प्रत्येक प्रश्नाला फाटे फुटत असतात. म्हणून वेळच्या वेळीच आपल्या मतदारांच्या भावना लक्षात घेऊन पावले टाकणे आवश्यक असते. अशा तऱ्हेचे उद्रेक होऊ देण्याची परिस्थिती शासनाने टाळली पाहिजे. एवढ्याशा लहान प्रसंगाच्या निमित्ताने आपण किती द्वेषाचे पीक निर्माण केले याचाही हिशेब चोखपणे करावयास हवा. सर्व मराठी माणसांचे सुख एका दादरच्या अडाणी चित्रकाराकडे सोपवून वसंतराव नाईक आणि यशवंतराव चव्हाण जर निवांत राहणार असतील तर त्यांच्या खालील सत्तेची खुर्ची केव्हा निघून जाईल हेही त्यांना कळणार नाही.

दिनांक २३ फेब्रुवारी १९६९

● ● ●

सुभेदारीला सुरुंग लावा.....

वृक्ष आंब्याचा म्हणून लावावा आणि त्याला काटे फुटावे, दुर्गंधियुक्त फुले यावी असे भाषावार प्रांतरचनेचे झाले आहे. अधिक घट्टपणाने माणसे जवळ यावीत, ज्ञानाची कवाडे लवकरात लवकर आणि सोप्या मार्गाने उघडावीत, एका संस्कृतीची माणसे एकवट असावीत असा हेतू प्रांतपुनर्रचनेच्या मुळाशी होता. शिवाय इंग्रजांच्या सोयीनुसार झालेली प्रांतरचना मोडणे ही मागणी, एक मागणी म्हणूनही इंग्रजांना उपद्रवकारक ठरावी हाही हेतू होता. पण स्वातंत्र्योत्तर काळात मूळ मागणीची सर्व उद्दिष्टेच बदलली आहेत. स्थानिक अहंता, स्पर्धा, स्वार्थ ही कल्पनाच अखंड भारत या कल्पनेशी विसंगत ठरणार असे दिसू लागले. जाणत्या विचारवंतांनी भाषावार प्रांतरचनेला कसून विरोध केला. पण स्थानिक, खुज्या नेतृत्वाच्या माणसांनी भाषावार प्रांतरचनेतच आपले हित आहे हे मनोमन ओळखले आणि त्या मागणीचा पाठपुरावा केला. वास्तविक लष्करी सोयीनुसार, शासकीय सोयीनुसार, स्वयंपूर्णतेनुसार. नदीखोऱ्यांच्या विभागणीनुसार असे अनेक पर्यायी देशविभागणीचे मार्ग टाळून भाषावार विभागणी आपण केली आहे. महाराष्ट्र राज्यातील दोन टोकांचे अंतर सुमारे सातशे मैल असावे. तीच गोष्ट संयुक्त प्रांताची,

मध्यप्रदेशाची, मद्रासची असावी. आकार, स्वयंपूर्णता, विकास योजना या नात्यानेही ही भाषावार प्रांतयोजना अत्यंत घातक ठरली आहे.

दिवसेंदिवस राज्य सरकारचा कारभारही इतका महागडा आणि गुंतागुंतीचा होऊ लागला आहे की, राज्याचे २५ टक्के उत्पन्न केवळ शासकीय कारभारावर खर्ची होऊ लागले आहे. शिवाय महत्त्वाच्या सर्व योजनांवर मध्यवर्ती सरकारचा पैसा खर्ची पडतो. त्या पैशाचा विनियोग नीट होतो किंवा नाही हे पाहण्यासाठी मध्यवर्ती यंत्रणा ठेवावीच लागते. अंमलबजावणीची पुनरुक्ती एवढी होते आहे की शासकीय व्यवहार फारच बिनकिफायतशीर ठरेल की काय ही भीती उत्पन्न होते आहे.

भाषिक प्रांतांनी आपण काय मिळवले ? मिळविला असेल तर द्वेष. मिळवले असेल तर स्थानिक वेडावर मोठे होणारे नेते. मिळवले असेल तर भारतीय एकतेचे भंगलेले स्वप्न. आपण गेल्या पन्नास वर्षांत भारताच्या अखंडत्वाचा ध्यास धरला आणि ते ध्येय मिळवण्याच्या मागे लागलो. पण अखेरी आपणच त्या एकतेच्या चिंध्या केल्या. मद्रासी माणसाला भारतापेक्षा आपण निराळे आहो असे आज वाटते. तो संस्कृतचा द्वेष करतो. हिंदीचा द्वेष करतो. इतकेच नव्हे, ज्या इंग्रजांच्या जुलमी सत्तेविरुद्ध झगडून आपण स्वातंत्र्य मिळवले त्या इंग्रजांबद्दल त्याला ममत्व वाटते. इंग्रजी भाषा त्याला स्वभाषा वाटते. त्याने तामीळचा आग्रह धरला तरी तो अवाजवी असूनही एकवेळ क्षम्य आहे. पण इंग्रजी टिकविण्याचा त्याचा हट्ट केवळ स्वतःची सोय आणि गुलामीची सवय एवढाच आहे. मराठी माणसाला अन्य प्रांतियांनी महाराष्ट्रात येऊन अभ्युदय करू नये असे वाटते. छोट्या माशाला जशी मोठ्या माशाची भीती वाटते तशी अधिक प्रगत, अधिक सधन, अधिक उद्योगी भारतीयाचा आळशी, पराभूत मराठी माणसे द्वेष करतात. काश्मीरमध्ये भारतीयांना स्थायिक होता येत नाही, मिळकती करता येत नाहीत. या आणि अशाच प्रकारे या अखंड आणि विशाल भारतातील मुक्त संचाराचे, व्यवसायाचे स्वातंत्र्य हळूहळू घटत चालले आहे.

भाषावार प्रांतरचना केली नसती तर गेल्या दहापंधरा वर्षांत अधिक समर्थपणे हिंदी भाषा भारतात रुळली असती. पण आपण भाषा हेच व्यवच्छेदक लक्षण मानून माणसे एकत्र आणल्यावर त्याच भाषेचा वापर, आग्रह आणि परभाषाविषयी उदासीनता अपरिहार्यपणे आलीच. महाराष्ट्रातली हिंदी प्रसाराची चळवळ किती झपाट्याने ओसरली हे पाहिले म्हणजे आता हिंदी ही राष्ट्रभाषा होण्यात अधिकाधिक अडचण येत रहाणार हे लक्षात येते. इंग्रजी काढून टाकली पाहिजे असे म्हणणारे हटाववाले आणि इंग्रजीच हवी म्हणणारे लुंगीवाले यांच्या झगड्यात

या दोनही भाषा अस्तित्वात रहाणार आणि हिंदी मातृभाषा सोडून अहिंदी प्रांत आपोआप इंग्रजीमय होणार हे विदारक सत्य आता समोर आहे.

निदान भारतीय पातळीवर आणखी एखादी भाषा स्वार होत नाही एवढेच समाधान. पण यावावत तरी काही घट्ट शहाणपण हवे. मधूनमधून पोस्टाच्या व्यवहारात, रेल्वेच्या व्यवहारात प्रांतीय भाषा कशा येतात याचा मला प्रश्न पडतो. वास्तविक पहाता स्वातंत्र्य रुजेल तसतशी एकसंघ भारताची आपण जपणूक करायला हवी. त्याऐवजी आपण तो अधिक दुबळा, अधिक विसविशीत करीत सुटलो आहोत. भारतीय शासन आणि प्रांत यांचे नाते नेहमीच ज्येष्ठ–कनिष्ठ असे हवे. आधी भारतीय प्रश्नाची सोडवणूक मग प्रांतीय. आधी लगीन कोंडाण्याचे आणि मग रायवाचे. पण रायबाच्या लग्नाची एवढी उतावीळ झालेली आहे की कोंडाण्याचे काहीही होवो. स्थानिक वेडे वाढवून मिळवलेले नेतृत्व टिकवण्यासाठी भाषिक, प्रांतिक, विभागीय वाद वाढविणे हाच पुष्कळांचा उद्योग झाला आहे.

सीमा प्रश्न हा तर अत्यंत मूर्खपणाचा प्रश्न आहे. भाषावार प्रांतरचना हा अखेरचा शब्द नसल्यामुळे एवढ्यातेवढ्या कारणावरून अखेरचे लढे देणे हे कोणते शहाणपण आहे ? बेळगाव कर्नाटकात गेले– अगदी सुखाने गेले, तर मला वाटते आकाश कोसळत नव्हते. तिथल्या मराठी भाषिकांसाठी काही सवलती मिळवून हा प्रश्न सोडवला असता तर या दोन प्रांतातील जुना मित्रभाव तुटला नसता. गेल्या पाचशे वर्षांत महाराष्ट्र व कर्नाटक यांची अभिन्नता झाली होती. पेशव्यांनी जेवढे कर्नाटक लुटले तेवढे टिपूनेही लूटले नव्हते. आणि केवळ त्या सर्व लुटालुटीचा परतभेट म्हणून बेळगाव कर्नाटकाला खुशाल देऊन टाकावे असे मला वाटते. चाणक्य घराणे कर्नाटकाचेच म्हणतात. महाराष्ट्राचा विठोबा कर्नाटकचा. विजयानगरचा वंश महाराष्ट्रीय असण्याची शक्यता. महाराष्ट्रातला देशस्थ ब्राह्मण समाज हा मूळचा कर्नाटकातलाच आहे. अशा या दोन एकरूप भाषिकांचे, भाषावार प्रांतरचनेने किती वाटोळे केले याचा विचार करावयास हवा.

ही भावना प्रत्येकाची आहे. पंजाबी (गुरुमुखी) व हिंदी, हिंदी व बंगाली, तेलगू व हिंदी अशा दोन भाषांच्या सीमेजवळच्या भागात कधीही नव्हती ती अहंगडाची भावना उत्पन्न झाली आहे. ती वाढते आहे. वाढवली जाते आहे. राजकारण हा पोटापाण्याचा धंदा करणाऱ्या लोकांना द्वेषाचे नवे कुरण मिळाले आहे.

आणि म्हणून या प्रश्नाकडे पहाण्याचा दृष्टिकोण बदलला पाहिजे. भाषावार प्रांतरचना आता परत मोडून मध्यवर्ती प्रबळ सत्तेचे स्वप्न पहाणे मुष्किल झाले

आहे. जणू मोगल काळातील सुभेदारी आता आस्तित्वात आली आहे. या योगाने सर्वसंपन्न नवभारताचे स्वप्न अर्थात दूर जात आहे. निदान अस्ताव्यस्त प्रांत खंडित करून दुबळे करणे आवश्यक आहे. मात्र प्रांताची संख्या वाढवतानाच त्याच्या कारभारखर्चाला कात्री लावली पाहिजे. मंत्र्यांची संख्या निश्चित केली पाहिजे. राज्यपाल, राज्यसभा अशा शोभादायक गोष्टी काढून टाकल्या पाहिजेत. पोटनिवडणुकी रद्द करून अशा वेळेस विरोधी पक्षातील पराभूत नेत्यांना नॉमिनेट केले पाहिजे. फार तर त्यांना मताधिकार नसावा.

वास्तविक राज्य सरकारे नष्ट करून जिल्हा राज्ये निर्माण केली तर केवढी तरी काटकसर होईल. आणि त्या जिल्हा राज्यातील प्रतिनिधीतून एक याप्रमाणे पार्लमेंट तयार होईल. दरवर्षाने ते बदलू शकेल. कारण अप्रत्यक्ष निवडणुकीमुळे खर्च होणार नाही. संपूर्ण वेळ वर्षभर देणारा प्रतिनिधी लोकसभेत जाईल आणि लोकसभा रोज भरेल. आपला प्रतिनिधी काही टक्के बहुमताने परतही बोलावता येईल. त्यामुळे काहीतरी बोलण्याची, लिहिण्याची, अभ्यास करण्याची आवश्यकता लोकप्रतिनिधींना भासेल. जिल्हा पातळीवर कोणतीही भाषा असली, तरी मध्यवर्ती शासन एकाच व फारतर दोन भाषेत चालेल. म्हणजेच लोकप्रतिनिधी म्हणून पार्लमेंटमधे जाणाऱ्याला हिंदी किंवा इंग्रजी उत्तम लिहिता बोलता यावे लागेल. सर्व कायदे हिंदी-इंग्रजीत राहतील.

खरे तर जिल्हा राज्यामुळे निर्णयाची टाळाटाळ टळेल. सर्वच निर्णय जिल्हा पातळीवर घेतले जातील व अपील फक्त ट्रायब्यूनलपुढे असेल. मोठ्या धरणयोजना, पूल, इमारती, कारखाने यांचे नियोजन मध्यवर्ती यंत्रणा करील त्यामुळे निर्णयाची टाळाटाळ करणे थोडे कठीण होईल.

घूस बिळे करील म्हणून काही कोणी घर बांधत नाही असे नाही. मध्यवर्ती शासन दीर्घसूत्री आहे, लाचलुचपतीने पिडलेले आहे म्हणून काही ते अधिक समर्थ करण्याचे यत्न टाळता येणार नाहीत. उलट हा विघडलेला कारभार सुधारण्याचा यत्न करता येईल. खरे तर आजही तो सुधारावयास हवाच आहे.

प्रांतीयता, नेतृत्वाची रस्सीखेच, शासनाची द्विरुक्ती, पैशाचा अपव्यय या साऱ्या वेडांची जिल्हा राज्यांमुळे हकालपट्टी होईल. लोकशाहीने नेतृत्वाचे अवमूल्यन होते. या देशात ते झालेही आहे. दिवसेंदिवस ते वाढेल म्हणून ज्या शिडीवरून मध्यवर्ती नेतृत्व उभे राहील ती शिडी लवचिक आणि अरुंद केली पाहिजे.

एकसंध भारताच्या या रचनेत स्वायत्त प्रांत बसतच नाहीत. जेथे निवडणुका जातीय तत्त्वावर, धार्मिक भेदावर होतात तेथे मुळीच बसत नाहीत. कम्यु-

निझम, इस्लामी आक्रमण, मिशनऱ्यांच्या वाढत्या हालचाली आणि मध्यवर्ती सत्तेवरोवर भांडणे, दंगे करून किंवा निदर्शने करून अधिक लाभ उकळण्याची प्रांताची प्रवृत्ती पहाता दुबळी राज्ये आणि समर्थ मध्यवर्ती सत्ता एवढेच सत्य खाली उरते.

आणि म्हणून जिल्हा राज्याच्या रचनेचा विचार आपण गंभीरपणे करावयास हवा.

दिनांक १३ एप्रिल १९६९ ● ● ●

पानपतानंतरचा मराठ्यांचा पराभव . . . .

इंदिरा गांधी अखेर मंत्रिमंडळाच्या फेररचनेला लागल्या. सतत काहीतरी नवीन करणे त्यांना भागच आहे. मूलभूत तत्त्वज्ञान, राजकीय चारित्र्य, परंपरांचा आधार व राष्ट्रहितार्थ समर्पणाची भावना ही जेव्हा उणावतात तेव्हा उरतो केवळ स्वार्थ, केवळ सत्तेची पिसाट हाव, स्वतःची प्रतिमा उणावण्याचा केविलवाणा यत्न. आज इंदिराजी सर्व काही करून स्वतःचे अस्तित्व राखावयास सिद्ध झाल्या आहेत. जिला कामराजांनी चिंधीची वाहुली म्हटले ती वाहुली कुठल्या तरी पैशाचिक, अनामिक शक्तीने एकदम बेफाम झालेली आहे. विरोधकांचा फज्जा उडवीत असतानाही त्यांना सन्मानाने वागविण्याची पंडितजींची पद्धत, लोकशाहीत अत्यावश्यक असणाऱ्या व्यक्तिस्वातंत्र्य व वृत्तपत्रस्वातंत्र्य या दोनही स्वातंत्र्यावरील त्यांची अजोड श्रद्धा—आणि कल्पनावारूवर वसून काहीतरी खुळी का होईना पण स्वप्ने पाहण्याची त्यांची कविवृत्ती यांचा त्यांच्या कन्येत संपूर्णतया अभाव असावा हा अनुवंशशास्त्राचा संपूर्ण पराभवच आहे.

गेल्या वर्षी 'राष्ट्रीयीकरण' या एका अद्भुत मंत्राने पुष्कळ माणसे पागल करण्यात सुलताना इंदिराजी यशस्वी झाल्या. भल्याभल्यांची डोकी त्यामुळे फिरली. मुंवईत एकदम दोन हजार बुद्धिवादी—नव्हे बुद्धिमंत—एकदम इंदिराजींच्या कळपात सामील झाले. भडक उद्दीपन करणारी भाषणे, नवीन शोध लागल्याचा आविर्भाव आणि कालपर्यंत भीमकाय वाटणाऱ्या मोरारजी—कामराजांची वस्त्रहरणे यायोगे

इंदिराजी ही या राष्ट्राला मिळालेली देणगीच होय असे म्हणण्यापर्यंत पुष्कळ तल्लख समजले जाणारे शहाणे गेले होते. पण राष्ट्रीयीकरणात नव्हते शहाणपण, नव्हता विचार, नव्हता दलितांचा उद्धार, होते फक्त अविचारी हेकट साहस. आपले शत्रू प्रतिगामी ठरविण्यासाठी टाकलेला जुगार. आपल्या दुष्ट आणि तत्त्वशून्य अशा सत्तापिपासू वृत्तीवर ते एक औदार्याचे पांघरुण होते. 'समाजवादाकडे' वाटचाल करावयासाठी निघालेली इंदिराजींची गाडी पहिल्याच जंक्शनवर म्हणजे बँक राष्ट्रीयीकरणावर अडकली आहे.

बँकेच्या राष्ट्रीयीकरणामुळे काहीही फरक पडलेला नाही याचे मुख्य कारण राष्ट्रीकृत बँकासुद्धा तारणाशिवाय कर्ज देऊ शकल्या नाहीत. मग ते काम पूर्वीच्या बँका अधिक तत्परतेने–आणि पुरेशा करू शकत होत्याच. परवा झालेल्या चाचणीत असे आढळून आले आहे कीं मोठ्या शेतकऱ्यांना कर्ज मिळू शकले आणि अडीच एकरापेक्षा कमी धारणा असणारा खातेदार या बँकापासून वंचितच राहिला. शिवाय कामातील तत्परता गेली ती गेलीच.

परवाच्या इंदिराकाँग्रेसच्या अधिवेशनात इंदिराजींनी जे भाषण ठोकले तेच भाषण मोरारजींनी एक वर्षापूर्वी केले. आर्थिक बदल हे पूर्वयोजनेशिवाय सफल होऊ शकणार नाहीत व चांगले चालू असणारे व्यवसाय व उद्योग हे सरकारीकरणाने आर्थिक अस्वास्थ्य निर्माण करतील हे त्यांचे म्हणणे खरे ठरले. इंदिराजींचा सबूरीचा सल्ला हा व्यवहार्य खराच, पण हा व्यवहार मोरारजीभाईंनी केला तर प्रतिगामी आणि इंदिराजींनी केला म्हणजे पुरोगामी हे कोडं खरोखरीच अजब नाही काय? ज्या यंग टर्कच्या शाब्दिक धिटाईचे गेल्या वर्षी कौतुक झाले ते टर्क या वेळेला मात्र उपेक्षिले गेले. जनरल इन्शुअरन्सचे राष्ट्रीयीकरण किंवा संस्थानिकांची तनखेबंदी तर मोडीत गेली. झाले एवढे राष्ट्रीयीकरण पुरे झाले असे ठरवून शांत चित्ताने इंडि-काँग्रेसने 'गरीबी हटाव' योजनेला बासनात गुंडाळून ठेवले. गेल्या वर्षीची इंदिराजींची भाषणे आणि या वर्षीचे त्यांचे भाषण लोकांनी थोडे ताडून पहावे. एका पराभूत आणि अयशस्वी कार्यक्रमाने हतबल झालेली ही मोरारमर्दिनी तथाकथित पोकळ पुरोगामी धोरणाला सोडचिठ्ठी देऊन आली. मग नवे आवाहन. जातीयवाद. अर्थात दुसरे पक्ष जातीयवादी. स्वतःचा पक्ष सेक्युलर. जगजीवनरामाची हातमिळवणी काय, फकरुद्दिन मिया किंवा युनूसभाई यांच्याशी स्नेहसंबंध काय...जातीकडे पहावे लागतेच. वेगवेगळ्या प्रांतातून आलेले आमदार आपले मतदारसंघ जातीय तत्त्वावर शोधतात. आपले झकेरियासाहेब औरंगाबादेहून निवडून येतात. येऊ देत म्हणा. महाराष्ट्र काँग्रेसबद्दल तर बोलावयासच नको.

राष्ट्रीयीकरणातली जादू संपली तेव्हा जातीयवादी म्हणून शिवीगाळीला आरंभ झाला आहे. कम्युनिस्टांना आपले शत्रू कोण हे नेमके माहीत आहे आणि

म्हणून जनसंघ, आर. एस् एस्. या संघटित, घट्ट तत्वज्ञानानिष्ठित संघटनांच्या मागे लागणे त्यांना भाग आहे. आज तरी इंदिराजींचे मित्र कोण? तथाकथित समाजवादाचा झेंडा फडकविणारी फाजील टर्किश कार्टी, कामगारांची हुकूमशाही म्हणून अखेर रक्तरंजित राजवट आणू पाहणारे कम्युनिस्ट, सर्वथा प्रांतीय–जातीय अशी डी. एम. के. आणि पाचकोटी जातयंध–मुल्लामौलवींच्या तावडीत सापडलेले आणि इस्लामी जगाशी निष्ठा वाळगणारे म्लेंच्छ. मग बाईनी त्यांना दुखवून कसे चालणार. या सर्वांची ती रिंगमास्टर की हे सर्व तिचे दरवेशी हा प्रश्न विचारण्यात अर्थ नाही. मुसलमानांच्या स्वार्थासाठी जनसंघावर दुगाण्या झाडाव्या, डी. एम. के.–च्या अवास्तव मागण्या मान्य करून मद्रास राज्याला सवलती पुरवाव्यात, कम्युनिस्टांसाठी नक्षलवादी बदमाषांना संरक्षण द्यावे आणि टर्किश कारटचांना कधी गुरकावून, कधी समजूत घालून गप्प करावे...

पण राजकारणात चिरंजीव काही नाही. ज्यांच्या हाती स्थिर स्वरूपाची सत्ता ती सर्व मंडळी इंदिराजींना हतप्रभ करावयाची आहेत. यशवंतराव चौहाणांच्या राज्यात इंदिराजींची पोरेसोरे वड करण्याचा प्रयत्न करतात अन् आपटी खातात हे पाहून इदिराजी अर्थातच रुष्ट आहेत. शिवाय बंगलोर अधिवेशनाची आठवण अजून खुनशीपणाने त्या विसरल्या नाहीत. यशवंतरावजींची शक्ती क्षीण होत जावी यासाठी गेल्या अनेक दिवसात त्यांनी केलेल्या प्रयत्नाला त्यांनी चव्हाणाना गृहमंत्रीपदावरून हाकलून फळ आणले.

वास्तविक लोकसभेत इंदिराजींची बाजू बळकट करून, त्यांच्याशी आपल्या मेंढरी अनुयायांकडून सदैव इमान देववून, मुसलमानांच्या पुढे लांगूलचालन करण्याचे त्यांचे व्रत स्वतः आचरून त्यांनी आपले स्थान टिकवण्याचा यत्न करण्याची पराकाष्टा केली.

पण हाय यशवंतराव! वनवासात जाण्याची तयारी असल्याशिवाय रामराज्य मिळत नाही हेच खरे. भारतातील सर्वोच्च पद तर एकदा तुमच्याकडे चालून आले होते. पण तुमच्यात धाडस नव्हते–दूरदृष्टी नव्हती–हिशोब नव्हता. अशी संधी वारंवार येत नाही. नियतीने पुढे केलेला दैवाचा प्याला तुमच्या अंगचोरपणाने तुम्ही स्वीकारला नाही. सम्राट होण्यापेक्षा वजिरातीवर तुम्ही खूष राहिलात. लहरी राणी वजिरात देते तशी काढूनही घेऊ शकते.

महाराष्ट्राची उरलीसुरली शानही आज तुम्ही घालवलीत. एकदा मिळत होती ती संधी तुम्ही घालवलीत. ठीक आहे. कोणी त्याबद्दल तुम्हाला दोष देत नाही. तुमचा वकूबच नसेल पंतप्रधान व्हायचा त्याला तुम्ही तरी काय करणार अन् आम्ही तरी काय करणार? पण आज उच मानेने स्वाभिमान दाखवून वनवासासाठी तुम्ही परत महाराष्ट्रात येता तर गोदाकिनारीच्या रामचंद्रासारखे

तुमचे स्वागत झाले असते. पण त्या समर्पणाच्या भावनेचे महत्त्व तुम्ही ओळखले नाही. सत्तेच्या तुकड्यासाठी नामुष्की पत्करून तुम्ही दिल्लीला राहिलात–

दिल्लीला जाताना केलेली तुमच्या पुस्तकातली भाषणे जरा पुन्हा एकदा वाचून पहा... दिल्लीला आता तुमची गरज नाही... तुम्हाला दिल्लीची गरज आहे. आणि म्हणून महाराष्ट्राच्या या अपमानप्रसंगी तुमच्यासाठी–होय तुमच्यासाठीही... कीव वाटते... तुमची, आमची, इथल्या बुद्धिशून्य खासदारांची. सर्वांचीच.

महाराष्ट्राचा हा पानपतानंतरचा आणखी एक तेवढाच पराभव

दिनांक ५ जुलै १९७०

● ● ●

मोहिते, कोठे मिळतो हो तो समाजवाद ?

गेल्या पंचवीस वर्षात आपल्या देशात जी प्रगती झाली त्यात आपल्या भाषांचीही प्रगती झाली. त्यामुळे आपल्या देशी भाषातील शब्दांना नवे अर्थ आणि नवे ध्वनी प्राप्त झाले आहेत. धान्याची टंचाई झाली. पण शब्दांचे, घोषणांचे पीक अमाप आले. रिकाम्या पोटी आपल्या नेत्यांच्याविषयी उफाळून आलेला अभिमान केवढा तरी प्रचंड आवाज उठवू लागला आहे. या देशात लोकशाही, निधर्मी राज्य, समाजवाद, एकात्मता आणि दलितोद्धार वगैरे शब्दप्रयोग येवढ्या प्रमाणात उत्पन्न झाले की जगतील सर्व देशांना हे पदार्थ घाऊक विकण्याचे कंत्राट आपण आज घेऊ शकतो. त्यातही समाजवाद हा शब्द तर इतका वापरून झाला आहे की ते नाणे गुळगुळीत होऊन आता बद्द वाजू लागले आहे. पण करणार काय ? माणसाचे एकवेळ अन्नावाचून चालते,पण पाण्यावाचून त्याचे जीवन अशक्य होते तद्वत राजकारणात कृतीवाचून चालते, पण घोषणावाचून चालत नाही. आणि त्याही घोषणा पारदर्शक रंगीत साडीप्रमाणे असल्या म्हणजे लोक आत काय असेल ते निरखून पाहतात आणि देहभान हरपून बसतात. समाजवाद हीही अशीच एक रंगदार पारदर्शक साडी आहे आणि एका कुरूप, स्थूल, मरगळलेल्या बाईने ती पेहेरली आहे. त्यामुळे तिचे वय, रूप, सौंदर्य यावद्दल विपरीत कल्पना मनात बाळगून लोकांची नजर आतल्या उत्तमांगाकडे वळली आहे. आत सर्वच पक्षांचे, व्यक्तींचे, समूहांचे

नागडे, कुरूप, थुलथुलीत देह आहेत. त्यांना त्वचारोग झाले आहेत. गळवे झालेली आहेत. क्वचित कोड फुटले आहे. तर क्वचित लाल लाल रंगाने जखमा उघड्या पडलेल्या आहेत. आपले हे घाणेरडे रूप एका समाजवादी वस्त्राने झाकून मान वेळावीत सर्वच पक्ष येणारे जाणारे गिऱ्हाईक डोळे मारून गटवू पहात आहेत आणि गरजू गिऱ्हाईक वरच्या नखऱ्याने फसून या गावभवान्यांच्या तावडीत सापडून जन्माची दशा करून घेत आहे.

'समाजवाद' या शब्दावर समाजवादी-प्रजासमाजवादी पक्षाचा फारच मोठा हक्क आहे. कारण या पक्षांचे मूळ पुरुष कोणे एकेकाळी समाजवादाचा झेंडा घेऊन काँग्रेसवाहेर पडले होते. कम्युनिस्टांचे आजोळच, समाजवाद पिकला त्या गावात आहे तेव्हा त्यांचाही समाजवादावर तेवढाच हक्क. काँग्रेसची या दोन पक्षांनी तारांबळ उडवून दिली आणि आवडीच्या काँग्रेसपासून त्याही घरंदाज स्त्रीने नवा उठवळपणा सुरू केला. तेव्हापासून जो जो पक्ष निर्माण झाला त्याने 'समाजवादा'ची काचोळी घट्ट धरून ठेवली आहे.

पण या पक्षाची त्या तथाकथित 'समाजा'शी अजून गाठभेटच झालेली नाही. ज्याच्यासाठी संपत्तीचे समान वाटप करावयाचे त्याचा हातचा भिकेचा कटोरा अजून तसाच आहे.

मैलोगणती जमिनी बळकावणाऱ्या जमीनदाराच्या जमिनीवर अन्नावारी रावणारा भूमिहीन अजूनही दरिद्रीनारायणच आहे. मुजोर कामगारांनी आपले प्रश्न सोडवून घेतले. कारण त्यांना एकत्र आणल्याशिवाय मनुष्यशक्तीचे मानवोपयोगी वस्तूत रूपांतर करता येत नाही. आणि एकत्र येताच त्या झुंडशक्तीचे रहस्य त्यांना कळले. आपले म्हणणे वरोवर, मागण्या अपरिहार्य, म्हणजे अचूक असा दावा घेऊन जेव्हा एखादी झुंड निघते तेव्हा कायदा, सभ्यता, नागरिकनीती सारी वाद होतात. कामगारांचे अन्याय दूर झाले एवढेच नव्हे तर कामगार समाजावर अन्याय करू लागले. पण भारतीय जनता पांढरपेशाची जशी नाही तशीच कामगारांचीही बनलेली नाही. अजूनही भारत हे कृषिप्रधानच राष्ट्र आहे. दरिद्री राष्ट्र आहे. आणि त्या शेतकऱ्यापर्यंत आमचा समाजवाद पोचलाच नाही-पोचणार नाही.

ज्या ज्या व्यवसायात किफायत येते तेथे धनिक पाय पसरतात. धनिकांवरोवर शासकही हलक्या हाताने, वाममार्गाने त्या संपत्तीत भाग घेतात. ते कायद्याच्या कक्षेतच चोऱ्या करतात. जनतेची लूट केवळ दालमिया-विर्ला करीत नाहीत, तर नाईक, चव्हाण, देसाई, मोहितेही करतात. दालमियाला वेळप्रसंगी कोठडी तरी दाखवता येते. पण चव्हाण, नाईक आदी मंडळींना त्याची मुळीच डर नसते. कारण कोठडीचे तेच रखवालदार असतात. वखवखलेले, कायदा-शासन ताब्यात असणारे हे लांडगे जनतेच्या भल्यासाठी, समाजवादाच्या प्रचारासाठी सत्तेवर आल्याचा

बकवा करतात. अधूनमधून गांधी–नेहरूंचे नाव घेतात आणि घरोबा करतात किर्लोस्कर–बजाज–मोरारकाशी. पांढरे कपडे, काळी सडकी मने, हसतमुख चेहरे, रोगिष्ट शरीरे यांनी म्हणे हे जनतेसाठी समाजवाद प्रत्यक्षात आणणार आहेत.

गांधीजींचे तत्त्वज्ञान आणि आचरण एकरूप होते म्हणूनच गांधीवाद ही वस्तू वाटली नाही. ती नष्ट झाली, पण अशुद्ध झाली नाही. आजचा समाजवाद बाटलेला आहे. सडलेला आहे. बोलणाऱ्यालाही कळते आहे की आपण बोलतो आहोत हे खोटे आहे. असे आपण प्रत्यक्षात काही आणणार नाही. भुकी, जाग्या झालेल्या समाजाला भुलविण्यासाठी खोटी स्वप्ने सांगणारे हे शासक समाजवादाच्या नावाखाली किती काळ फसवणूक करू शकतील ? एकवेळ अशी येईल, गेल्या पंचवीस वर्षांतील चैनीचा, उधळपट्टीचा, स्वाभिमानशून्य लाचारीचा आणि पोट फुटेपर्यंत खाल्लेल्या संपत्तीचा हिशेब त्यांना रस्त्यात द्यावा लागेल. तेव्हा त्या पांढऱ्याशुभ्र टोप्या रक्ताने माखलेल्या असतील.

यशवंतराव मोहिते, नामदार नाईक यांनी परवा जमीन बळकाव मोहिमेविरुद्ध काढलेली पत्रके पाहिली अन् मनःपूर्वक हसू आले. दालमिया, बिर्ला आपल्या ऐश्वर्याला आणि संचित संपत्तीला जे समर्थन देतात ते तेच समर्थन यशवंतराव मोहिते यांनी दिले आहे. नाईक–मोहिते यांनी जशी कायद्यात राहून भूमी मिळवली तशीच कायद्यात राहूनच त्या सर्वांनी संपत्ती मिळवली. पण कायद्यापेक्षा 'नैतिकता' नेत्यांनी मनोमय मानली पाहिजे. 'लोकांनी भुकेल्यापोटी वेळप्रसंगी बाजार लुटले तरी चालतील' असे ज्या यशवंतराव मोहित्यांनी एकेकाळी सांगितले त्याच मोहित्यांनी आपल्या जमिनीच्या रक्षणार्थ कायद्याची वाट शोधावी याचे आश्चर्य वाटते.

श्रीमंती आणि गरिबी हा मनुष्यनिर्मित भेद आहे आणि तो माणसानेच निपटला पाहिजे. त्याची गती कासवाची असेल तर वंचित बंड करतील आणि हरिणाची असेल तर प्रवासापूर्वीच अडखळून श्रीमंत खाली कोसळतील म्हणून स्वखुषीनेच मानवतेच्या आवाहनाला सामोरे जाणे हे न्याय्य आहे. यशवंतराव मोहित्यांच्या शेताच्या रक्षणार्थ गावकरी उभे राहिले. त्यात त्यांची चतुराई आणि संघटनाचातुर्य जबर होते. पण अंतिम न्याय नव्हता. अजूनही नागरिकात विभूतिपूजा, इमानदारी आहे म्हणूनच ते घडू शकले.

यशवंतराव मोहिते, नाईक, चव्हाण हे गांधींना राष्ट्रपिता मानतात. आपल्या जवळची अधिक संपत्ती व भूमी गरजू नागरिकांसाठी मागणाऱ्या विनोबाजींचे देव्हारे याच मंडळींनी माजवले. रोज सकाळ–संध्याकाळ शाही पुरुखा झोडावा, एखाद्या प्रासादतुल्य गढीत झोपावे, पाच–पन्नास नोकरांचा ताफा ठेवावा, आतल्या बाजूने पैशाचे डिगारे जमवावेत, सर्व अनीतीची कृत्ये परक्यांच्या पैशावर करावीत

आणि भरल्यापोटी थोडावेळ गरिबांचे डोळे पुसावे व तुमच्यासाठीच आम्ही झटत आहोत असे स्वत: मुसमुसत सांगावे आणि पुन्हा एखाद्या गौरांगीच्या घरी रात्री मुक्कामाला जावे, हे जिणे आता फार काळ टिकण्याजोगे नाही. मंत्र्यांचे वर्तन आणि उक्ती यातली ही तफावत आता लोकांना असह्य होते आहे. प्रत्यक्ष खवळलेली जनता वेढून मुक्ती देईपर्यंत उन्मत्त राज्यकर्त्यांनी वाट पाहू नये. आपण पोलीस-पहाऱ्यात सुरक्षित आहोत हा भ्रमही सोडून द्यावा. पोलीस हीही माणसेच आहेत आणि तुमच्यासारख्या शेणगोळ्यासाठी आपला जीव गमवावा असे कोणतेच उदात्त जीवित तुम्ही जगत नाही वा पराक्रमही केलेला नाही.

तरीपण मोहिते महाशय, समाजवाद नेमका कुठे मिळतो तेवढे आम्हाला कृपया कळवा. आम्हीही थोडा 'मोहिते मेड' समाजवाद वापरून पाहू.

दिनांक ३० ऑगष्ट १९७०

● ● ●

नमस्ते, वसंतरावदादा पाटील—तुम्हीसुद्धा ?

शाब्बास वसंतराव शाब्बास. सांगलीच्या तुमच्या चौफेर 'सहजीवनानंतर' आता तुम्ही सचिवालयाच्या दिशेने पाऊल टाकू लागला आहात. मधली विश्रांती म्हणून महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्षपद भूषवावे लागते. किंवहुना पुढच्या हिताच्या दृष्टीने ही जागा तशी फार उपयोगी आहे हे तुम्हाला श्री. साहेबांनी पटवले म्हणून गावची पाटीलकी सोडून बारा गावची सूभेदारी तुम्ही पत्करली आहेत. या जागेवरचे मुख्य कार्य काय बरे असेल ? बारा गावचे गुंड ताब्यात ठेवायचे, त्यांच्यात भांडणे लावायची, मातलेल्यांना आवरायचे—वावरलेल्यांना सावरायचे आणि या झुंजीत श्री. साहेबांची मध्यस्थी कारणी आणून राज्य सुस्थितीत ठेवायचे. महाराष्ट्र स्वस्थ तर गृहमंत्रीपद घट्ट हे ओळखण्याचे चातुर्य श्री. साहेबापाशी आहे. आणि त्यांचा सदरा घरून राहिले की कळीकाळाची भीती नाही हेही तुम्ही ओळखले आहे.

पण महाशय, सांगलीला आज जे झगमगटाचे वैभव आले ते तुमच्यामुळे हे कबूल करावयास हवे. उसाशिवाय ऊस कारखाना हे तत्त्व तुम्हीच यशस्वी केलेत की नाहीत ? त्यामुळे असे म्हणतात की कोकणातही ऊस कारखाना निघणार आहे

आणि उसाच्या ट्रक्स गावोगावहून ऊस गोळा करून नेऊन तो कारखाना यशस्वी होऊ शकेल. शाब्बास वसंतराव, कापसाशिवाय कापडगिरण्या मुंबईत काढता आल्या तर पाच-दहा मैलात ऊस नसला तरी तुम्ही का डरावे? सूत-यंत्रामुळे आरंभ झालेल्या सांगली नगरीला साखरेची गोडी लागली आणि तुम्ही हा दगडधोंड्याचा दक्षिण देश गोडगोड करून सोडलात, ही थोरवी तर खरीच, पण या साखर साम्राज्यावर आता किती तरी गोष्टी करता येतात. काँग्रेस अधिवेशन भरवता येते किंवा त्यानिमित्त झालेल्या लक्षावधी रुपयांचा खर्च दानधर्म खाती मांडता येतो. एवढेच कशाला, दगडाला देव करता येतो किंवा देवाला नागवे करता येते. साखर साम्राज्यावर तर आज काँग्रेसचे राज्य चालू आहे. सहकाराच्या नावाखाली खेड्यातल्या अर्थवाहिन्या तुमच्यासारखे गावोगावचे दादा ताब्यात ठेवतात अन् शहरी विरोधकांना धिक्कारून काँग्रेसराज्य सुरक्षित ठेवतात हे अजून त्या जनसंघियांना कळलेले नाही. (अन् कम्युनिस्टांना कळून फायदा नाही. कारण या भूमीत श्रद्धा जशी फळ देते तसे फळ आरोळी देत नाहीं. अजून तरी पोटाच्या वर हृदय आहे आणि म्हणून भुकेपेक्षा भक्ती इथे फळते.) जनसंघीय हे उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, विहारसारखे इथे मातू नयेत म्हणून एक तर त्यांना जातीय म्हणावे लागते किंवा प्रतिगामी म्हणावे लागते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद जागा ठेवावा लागतो. पुष्कळ काही करावे लागते. जनसंघाने बहुजनसमाजापर्यंत पोचण्याचा यत्न केला, कोणा गायकवाड रुपवते यांच्याशी घरोबा केला की मामला कठीण आहे हे इथल्या दादा मंडळीनी ओळखले आहे. त्या लढाईला आजच तोंड फोडले पाहिजे म्हणून पुन्हा एकदा मारून गेलेल्या ब्राम्हण-ब्राम्हणेतर वादाचा ढोल वाजू लागला आहे.

होय-महाराष्ट्रापुरते जनसंघीय नेतृत्व बहुतांशी बामणी आहे. तसे ते नेहमीच होते. सर्वच पक्षांचे आरंभी हेच घडलेले आहे. चळवळी प्रथमतः प्रथमतः बौद्धिक स्तरावर उभ्या राहतात आणि कृतीसाठी त्याखाली बहुजनसमाजात उतरतात. बहुजनसमाजाचे नेतृत्व अपरिहार्य आहे याची जाणीव जनसंघाला नसेल असे मला वाटत नाही. पण महाराष्ट्रापुरते जनसंघाचे स्वरूप त्या पातळीपर्यंत पोचले नसावे. त्यापूर्वीच जनसंघाचा-हिंदुत्वनिष्ठ चळवळीचा बंदोबस्त करावा या दृष्टीने हल्ली यत्न चालू आहेत. उद्या पंजाब, बिहार, यू. पी. सारखी बिलामत नको.

पण ती लढाईसुद्धा आणीबाणीची करून उपयोगी नाही. कम्युनिस्टांना काटशह द्यावयास हे जनसंघीय फार चांगले असा आजवरचा अनुभव आहे. तेव्हा त्यांना धरावे पण जीवे मारू नये अशी या 'दादांनी' धोंगडे-देशमुख-मोहिते अशा गार-

यांना आज्ञा केली आहे. आणि म्हणून गोळवलकर गुरुजींच्या निषेधाला हवी तेवढी धार आलेली नाही.

पण निषेध तर केला पाहिजे व अध्यक्षीय खुर्ची अडवल्यावर तर रोजचे कर्मकांड आणि अग्निहोत्र फुलवलेच पाहिजे.

पण वसंतरावजी, तुम्ही गांधी-विनोबा वगैरे मंडळींचे काही साहित्य वाचले आहे की नाही ? वाकी त्यांची गरज काय तुम्हाला ? श्री. साहेब ते सगळे सांभाळतातच म्हणा. पण असली निषेधपत्रके काढण्यापूर्वी तसले काही वाचायची थोडी सवय ठेवावी. सगळेच काही श्री. साहेबांचेवर अवलंबून ठेवू नये. ही ईश्वरप्रणीत वर्णव्यवस्था–जातिव्यवस्था–गुणकर्म वगैरे सगळी लफडी गांधी–विनोबा मानीत असत. त्या सर्वांची आवश्यकता त्यांनाही मान्य आहे असे म्हणतात. गोळवलकरांचा निषेध केला तर मग त्या सर्वांचा निषेध केल्यासारखा होतो, तो तुम्हाला खपेल का ? वघा बुवा. अजून तुम्ही मंत्रीसुद्धा झाला नाही. तोवर तुमच्या पक्षाच्या पित्याची अशी वदनामी तुम्हाला करून कसे चालेल.

खरोखरीच जातीव्यवस्था–वगैरे तुम्ही मानत नसलात तर फार चांगले. कारण आम्ही मुळीच मानत नाही. आणि हिंदुसंघटनेच्या हिताच्या दृष्टीने तर मुळीच मानत नाही. पण ती न मानणारे खरे कोण कोण आहेत ठाऊक आहे का ? लोकहितवादी–आगरकर, फुले, सावरकर, आंबेडकर. पण यात दुर्दैवाने आजच्या काँग्रेसवाल्यांपैकी कोणी नाहीत. नसू देत. कोठे अडलेय तुमचे त्यात ? नावापुरता निषेध करून तुम्ही थांवणार म्हणता म्हणून ठीक, पण गोळवलकरांचा निषेध करता करतां सावरकरांच्या पुरोगामी विचारांचे गुणगान व्हायचे; ते तर तुम्हाला मुळीच नको. त्यापेक्षा एकाच आवाजात दोघांनाही प्रतिगामी, समाजद्रोही म्हणून टाकलेले वरे.

पण खरे तर तेही थोडे भानगडीचेच आहे. वसंतरावजी, आज मऱ्हाटी राजकारण कसे चालते ! जाती मानायच्या नाहीत असे ठरले म्हणजे महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ वरखास्तच करायला हवे. अहो, केवळ जातीच्या अभिमानामुळे तर यांपैकी कितीतरी मंडळी खुर्चीवर आहेत. असू देत विचारी. आम्हाला राग नाही, पण जातीपाती घालवून तुमचें कसे चालेल ? तुमच्या साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची निवड तुम्ही सर्वथा लायकीवर करता का हो ? एखादा पार्शी, एखादा मुसलमान माणूस नेमका उचलून मंत्री करता तो त्याच्या गुणाकडे पाहून का त्याच्या धर्माकडे पाहून ! एखाद्या नव्या भूविकास वँकेचे किंवा जिल्हा वोर्डाचे अध्यक्षपद समजा एखाद्या निरुपद्रवी वामणाकडे गेले तर तशी काय हरकत असावी ? फर्ग्युसन किंवा परशुरामभाऊ कॉलेजचे प्राचार्यपद एखाद्या अ–ब्राह्मणाकडे असावे

असे आम्हाला वाटते आहे व तसेच आम्हाला शाहू कॉलेजबद्दल वाटले तर चालेल का हो !

ब्राह्मण जात जर संघटित असती व त्यांची मते एखाद्या वामणाच्या हातात असती तर वामण मंत्रीसुद्धा झाला असता नाही का ? पण ही भटे भांडखोर, एकमेकाचा द्वेष करणारी. त्यांची मते फुटणार. मुसलमान, आदिवासी, ख्रिश्चन, पारशी यांच्याप्रमाणे यांना मंत्रिपदाची खिरापत वाटून फायदा काय ?

महाराष्ट्रातले राजकारण. जाती, वर्ण, धर्म यांचा विचार केल्याशिवाय क्षणभर पुढे जात नाही. वरे, बहुजन समाज म्हणजे फक्त मराठा समाज का हो वसंतरावजी ? माळी, परीट, न्हावी, लोहार, महार, मांग, शिंपी, कोळी ही सारी बहुजनसमाजातच मोडतात ना ! या सर्वांना न्याय्य हक्क मिळताहेत का ?

हे ठीक आहे. ब्राह्मणांना झोडयाला आज काही निमित्त लागत नाही. मेलेल्यावर कावळे टोची मारतात. जो समाज आज सर्व तऱ्हेने नाडला गेलेला आहे व ज्याचे अस्तित्व शंकास्पद आहे त्या चिमुकल्या-भयचकित समाजावर कोणीही लुंग्यासुंग्याने उठावे आणि तोंड टाकावे अशी स्थिती आहे.

ठीक आहे. पाणी नासले आहे पण शुद्धतेचा बकवा करण्यापूर्वी आपणही त्या पाण्यात विष्ठा कालवली हे तुमच्या ध्यानी आलेले नाही काय ?

जाऊ दे. जातीयता-धर्मांधता मोडली पाहिजे एवढे खरे. पण कोणी ! तुम्ही ?

चोराने न्यायासनावर बसावे असे तर होत नाही ?

दिनांक १६ फेब्रुवारी १९६९

● ● ●

जयचंदी अवलाद अजून जिवंत आहे !

भारताचा इतिहास चाळला की एक नव्हे अनेक 'जयचंद राठोड' आपल्याला भेटतात. तसा हा भारत संपन्न देश आहे. इथे जयचंद राठोडांची मुळीच कमतरता नाही. या भूमीत वाढलेले, इथल्या पाण्यावर पोसलेले, इथल्या धर्मानुसार एरवी वर्तन करणारे आणि इथल्या प्रजेचे अधिपती असे हे जयचंद राठोड आपल्या

व्यक्तिगत हितासाठी, आपल्या सिंहासनासाठी, आपल्या ऐहिक उत्कर्षासाठी बाबर, तुघलख, अबदाली, गझनी अशा परदेशीय, परप्रांतीय, परधर्मीय पुंडांना आमंत्रणे धाडून बोलावून घेतात, त्यांच्या बळावर व तलवारीवर, स्वकीय शत्रूंचे निर्दालन करतात व आपले सिंहासन बळकट करतात. स्वकीय शत्रूंचा नायनाट करण्यासाठी सर्वथा परकीय भाडोत्री मारेकरी बोलवताना या जयचंद राठोडांना कसलीही शरम वाटत नाही. त्यांचा देशाभिमान, धर्माभिमान, स्वाभिमान काहीच त्यांच्या आड येत नाही. जो आपला भाऊ, रक्तामासाने आपला, इमानानेसुद्धा या देशाचा, नात्याने या भूमीचा, त्याचा नायनाट करण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा एवढी जाज्वल्य असते की मग 'उद्या' काय होईल. हा विवेकही त्या जयचंदांना सुचत नाही. लाचार स्तुतिपाठक, खोटे मित्र, आणि भावडे सल्लागार यांचा प्रभाव वाढत जातो, आणि मग एका हत्यारी मारेकऱ्याला आवतण जाते.

भारताचे दुर्दैवही असे विचित्र आहे की, हे भाडोत्री मारेकरी केवळ अशा खुनासाठी पैसा घेऊन खूप नसतात. त्यांना मुळी ही भूमीच आवडते. प्रथम ते पाहुणे म्हणून येतात. आपले नियोजित काम करतात आणि परत जाण्याचा भापाच काढत नाहीत. सुंदर भूमी, अमाप संपत्ती, भरपूर खाद्यपेये, सुंदर नारी आणि भेकड दुबळे राज्यकर्ते यांचा संयोग पाहून त्याना येथेच मुक्काम करावासा वाटतो. त्यांचेही चूक नाही. उजाड, वाळवंटी प्रदेशातून आलेल्या पाहुण्यांना गंगाजमुनांची खोरी म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्गच वाटणार. त्यांच्या भूमीत तलवारीच्या धारेवर ज्यांना सदैव वावरावे लागते, त्यांना येथे अध्यात्मात गुंगलेल्या आणि अहिंसेचा घोष करणाऱ्या माणसांना पाहून मौज वाटते. क्षणभर भांबावले तरी मग त्यांच्या ध्यानात येते–हे दास व्हायला चांगले लोक आहेत. या धर्माभिमानी म्हणवणाऱ्यांना वाटवणे फार सोपे आहे. स्त्रियांना देवतास्वरूप मानणाऱ्या लोकांच्या स्त्रिया लुबाडणे फारच किफायतीचे आहे. फार अडाणी वा हट्टी स्त्रिया प्राण देतात, जोहार करतात खऱ्या; पण उर्वरित स्त्रिया नवा धर्म पत्करतात व त्याची वृद्धी करतात. त्या आपल्या अपत्यांना मूळचा हिंदूधर्म शिकवीत नाहीत, तर आपला नवा सद्धर्म शिकवितात. त्यांचेही वरोवर आहे. ज्या धर्माला या अवलांना संरक्षण देता आले नाही, त्या धर्माविषयी त्यांनी ममत्व का ठेवावे ?

ह्या जयचंदांनी आजवर हा देश भिकेला लावला. जंगली आणि अन्यायी इस्लामला आणि येशू-पूजकांना या देशात या जयचंदानी बोलावून घेतले. स्वधर्मियांचा उच्छेद केला आणि अखेरी ते स्वतःचे राज्य व स्वतःचा धर्म घालवून बसले. या भूमीचे ते मालक असून तेथे भिकारी झाले.

पण असे होऊनही ते जयचंद येथे हजर आहेत. इतिहासाने धडा शिकवला तरी तो आपण गिरवतो असे थोडेच आहे ? 'स्वधर्मे निधनं श्रेयः' हे जर गीतेत

सांगितले आहे, तर राठोडांनी आपला धर्म का सोडावा ! शिवाय जयचंदांना तत्त्वज्ञान देणारे त्या जयचंदाचे आचार्य हजर आहेत. महात्मा गांधी व नेहरू गेले म्हणून या जयचंदांची थोडी अडचण झाली खरी. तरीही जयप्रकाश आहेत, विनोबा म्हणून या जयचंदाना साहाय्यभूत होणारे अहिंसेचे पुजारी, अन्य धर्मियांवद्दल सहिष्णुता दाखवणारे आचार्य अजूनही मौजूद आहेत. माणूस हा देव होऊ शकेल या हट्टाने जी अनुमाने हे संत नेते योजतात, त्याने रोगी बरा कसचा होणार ! तो तर आता मरणोन्मुख झाला आहे. माणूस हा देव नाही, तसाच तो राक्षसही नाही. तो राक्षस होऊ पहातो, तेव्हा त्याला विरोध करायला हवा.

पण देवत्वाचे काय ? संयमाचे काय ? हृदयपरिवर्तनाचे काय ? अहिंसेचे काय ? मानवी मनोव्यापारात ह्या सर्व गोष्टीला मर्यादित अर्थ आहे संहार हा जेवढा भयानक, तेवढाच संयमही भयानक होऊ शकतो, हे आपण अनुभवले आहे. हिटलरने जेवढी माणसे मारली, तेवढीच माणसे गांधींनीही मारली. गांधींनी म्हणजे गांधींच्या फाजील औदार्याने, फाजील लांगूलचालनाने मारली. म्हणून सारेच राजकारण मानवी मनाच्या मर्यादा सांभाळून व्हावयास हवे की नाही ?

आणि म्हणूनच जयचंदांची औलाद आपण निर्वंश केली पाहिजे. स्वदेश, स्वधर्म, स्ववांधव वाईट असले व त्यांच्यात परस्परात वैर उद्भवले तरीही वाहेरच्यांना मदतीस घेऊन त्यांचा विनाश करणे अखेरी स्वनाशास कारणीभूत होते.

परवा इंदिरा गांधींनी मोरारजीभाईंची राजकीय हत्या केली तीही याच पद्धतीने.

इंदिराजी या अखेरी नेहरू–रक्ताच्या आहेत. म्हणजे नेहरूंचे पुष्कळ अवगुण त्यांच्यावर कृपा करून आहेत. पण नेहरूंचे भाग्य असे की त्या पलीकडे त्यांना एक स्वतंत्र स्थान होते. स्वतंत्र भारताचे ते एक प्रतीक होते. त्यांचे सामर्थ्यच मुळी 'भारतीय' स्वातंत्र्यात होते. त्यांच्या चुका जरी फार मोठ्या असल्या व त्यानी फार खोलवर अशा जखमा या देशाला केल्या असल्या, तरी ते देश विकून मोठे होणाऱ्या जयचंदी वृत्तीचे खचितच नव्हते. त्यांच्या सिंहासनाला त्यांच्या हयातीत कोणीही स्पर्श करू शकत नव्हते. पण इंदिरा–नेहरू राजवंशाची वारस. तिचे काय? तिला भारतीय स्वातंत्र्याचे काय ! तिला लोकशाहीच्या हितासाठी हौतात्म्य पत्करण्याचे कारण काय ! आपल्या अत्यंत निष्ठावंत, इमानदार मोरारजीसारख्या सचिवाची तिला काय मातबरी. मोरारजींची योग्यता ठरवण्याची सुलताना मलिकाची पात्रता तरी काय ! फक्त नेहरूंचे रक्त. फक्त वारसा. काँग्रेसनिष्ठा ही काय वारसाने मिळते ? काँग्रेसची प्रतिष्ठा ही काय चमत्काराने सिद्ध झाली ? स्वतःचा बळी गेला तरी जगवावी अशी तिच्या लेखी काँग्रेस काय मोठी लागून गेली आहे. स्वतःच्या आयुष्यात फाजील महत्वाकांक्षेने पेटलेली, हिस्टेरियाने ग्रास-

लेली ती एक भटकभवानी आहे. तिला दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बानर्जी, लोकमान्य टिळक, गांधी, पटेल, नेहरू यासारख्यांच्या रक्ताने सिद्ध झालेली काँग्रेस म्हणजे घरची इस्टेट वाटली. गुलजार प्रियकरासाठी उघळावी एवढी तिच्या लेखी या इस्टेटीची योग्यता. आज काँग्रेसला लोक विटले आहेत, ते काँग्रेस या संस्थेला नव्हे, तर काँग्रेसने गांधीयुगात पत्करलेल्या नपुंसक धोरणाला. स्वातंत्र्याच्या सर्व चळवळी ज्या संस्थेच्या हातून घडल्या, ती संस्था अशी वाऱ्यावर सोडण्याचा मलिका इंदिरेला काय अधिकार ? आपल्या हयातीत नेहरूंनी तिला सत्तेपासून दूर ठेवले ते तिच्या फाजील महत्वाकांक्षेचा अंदाज घेऊनच. पण नेहरूभक्तानी, नेहरू परवलीच्या शब्दासाठी वला आपल्या पदरात घेतली. कामराजासारख्या इमानदार काँग्रेसवाल्यानेही मोरारजीसारख्या तत्त्वनिष्ठ माणसाचा पाडाव करावयासाठी, हे नाजुक शस्त्र वापरले. पण आज तेच सर्वांच्या मानगुटीवर वसले आहे आणि देशावर 'हातोडा–कोयत्याची' सावट हळूहळू पक्की करते आहे.

इंदिराजींचे सारे पवित्रे काही एका गृहीत कृत्यावर आधारलेले आहेत. काँग्रेसनाश की स्वतःचे स्थान अशा निर्णायक क्षणी एक एस्. के. पाटील सोडून सर्व काँग्रेसवाले काँग्रेस संघटनेच्या स्थैर्यासाठी सर्वस्व सोडून देतील, पण काँग्रेस बुडू देणार नाहीत, हे इंदिराजीने ओळखले आहे. [मोरारजींनी परवा राजीनामा देताना सारी इभ्रत पणाला लावली असती, तर काँग्रेसची शकले उडतीही. पण कामराज-निजलिंगप्पा–देसाई–चव्हाण यांची काँग्रेसनिष्ठा मोठी आहे. काँग्रेस नसेल तर आपण कोणीच नाही, हे त्यानीं ओळखले आहे. थोडे शहाणपण त्यांच्याजवळ आहे. काँग्रेसची परंपरा व तिचा इतिहास त्याना ज्ञात आहे. आणि म्हणूनच इंदिराजींच्या वेताल आणि असभ्य वर्तणुकीकडे [काणाडोळा करून त्यानी पड खाल्ली. ते तशी पड खाणार, हे इंदिराजींने ओळखले होते. निर्लज्ज माणसाला पहिल्या फेरीत जय मिळतोच. आज आपल्या सहकाऱ्यांची पक्षनिष्ठा लक्षात घेऊन त्यांनी पहिला घाव घातला. हा घाव सर्वांपेक्षा चव्हाणांच्या मर्मी वसला आहे. चव्हाणांना मोरारजी-कामराज नकोच आहेत. कारण तशा अर्थाने ते इंदिरा गांधींपेक्षाही पुरोगामी आहेत. पण इंदिरा गांधींचे पुरोगामित्व म्हणजे पदर दुसऱ्याच्या हाती ठेवून पळण्यासारखे आहे. त्यांची पुढे जाण्याची उडी पदराच्या लांबीएवढी. तोंडदेखले उदार बोलणे किंवा डोळे दिपवणाऱ्या अफाट गोष्टी हे काही क्रांतितत्त्व नाहीं. क्रांतीमागे हवी जाज्ज्वल्य तत्त्वनिष्ठा आणि तिचा तर इंदिराजींशी कधीच संबंध नव्हता. 'बँक राष्ट्रीयीकरण' म्हणजे आपण फार पराक्रम केला असा जो बकवा इंदिरा गांधी व त्यांचे गुलजार तरुण नोकदार सहकारी कोंबडे (वाटल्यास टर्की म्हणा) करतात, त्यात कसला म्हणून अर्थ नाही. राष्ट्रीयीकरण करण्यास तत्त्वतः विरोध कोणाचाच नव्हता. अगदी मोरारजींचा नव्हता. मोरारजी हे भांडवल-

वाल्यांचे हस्तक आहेत, हे सडलेल्या करंजिया–अत्रे मेंदूचे अपत्य आहे. सर्व उद्योगांना वाऱ्यावर सोडायचे तर या देशाचा कारभार चालवणार कसा ? प्रामाणिक नोकरशाही, अनिवार वेजबाबदार कामगारवर्ग आणि सत्तालोलुप पुढारीवर्ग यामुळे सरकारी कामकाज दिवसेंदिवस महागडे आणि वेभरवशाचे होत आहे. राष्ट्रीयीकरण हवे तर अगोदर तत्त्वनिष्ठ राज्यकर्ते हवेत, राष्ट्रहिताची तळमळ असणारे श्रमप्रेमी कामगार व कामगार नेते हवेत आणि त्याहूनही हवा कार्यक्षम आणि प्रामाणिक नोकरवर्ग. पण या सर्वांचीच बोंब असताना राष्ट्रीयीकरणाच्या टेऱ्या वडवण्यात काय अर्थ आहे ! समाजातील महत्त्वाची सर्व संपत्तीकेंद्रे सरकारी असावीत, हे तत्त्व अगदी भांडवलशाही राष्ट्रानीही पत्करले आहे. पण अविकसित देशाला न झेपणारी कारखानदारी व उद्योग सरकारने चालवून राष्ट्राचे नुकसान करण्यात स्वारस्य काय ? टाळ्या मिळवण्यापेक्षा असल्या तकलादू पुरोगामी राष्ट्रीयीकरणाने अधिक काही साधत नाही. आहेत तेच सरकारी कारखाने सरकारला चालवता येत नाहीत. तेथे दरवर्षी अमाप नुकसानी येते आहे. असे असताना नव्या विलामती गळ्यात घेण्यापेक्षा सामाजिक नियंत्रणाने सरकारने केवळ नफ्यात हिश्शेदारी पत्करणे हेच फायद्याचे होते. पण समाजवादाची भांग पिणारे आणि कल्पनेच्या वारूवर बसून जगाची सफर करणारे हे पुरोगामी कोंवडे आणि कोंवड्या यांना मुळी राष्ट्रहिताची कदर आहेच कोठे ? बँकेतला सर्व पैसा सरकारला मिळाला, तरी तो वापरण्याची अक्कल जर या राज्यकर्त्यांजवळ असती तर देश असा कर्जबाजारी आणि भुकेकंगाल राहिलाच नसता. कुबेराला सुद्धा भिकारी करण्याची ताकद असणाऱ्या आताच्या सरकारने शांतपणानेच असले जीवघेणे प्रयोग केले पाहिजेत. राष्ट्रीयीकरण हवे, पण ते केव्हा कधी, याबाबत तारतम्य हवेच हवे.

पण वारा प्यालेल्या वासराचा उत्साह अंगी येऊन इंदिराजी आणि तरुण टर्क यानी बँकांचे राष्ट्रीयीकरण तर करून टाकले. मोरारजीला प्रतिगामी ठरवण्यासाठी राष्ट्रीयीकरणाचा वारू त्यांनी वेठीला धरला. वळी जाणाऱ्या कोकराचा आक्रोश ऐकू येऊ नये किंवा सती जाणाऱ्या स्त्रीच्या किंकाळ्या ऐकू येऊ नयेत म्हणून ताशेवाजंत्र्या लावाव्यात तसेच एका निष्ठावान प्रामाणिक जुन्या कार्यकर्त्याचा खून करताना राष्ट्रीयीकरणाचा ताशा वाजवण्यात आला आहे.

कितीतरी वर्षे, अगदी पंडितजी काळापासून मोरारजींचा फटकळपणा आणि निष्ठा या चटोर कारटयांना खुपत आलेली आहे. हा विकत घेण्यासारखा माणूस नव्हे, हे साऱ्यांनी ओळखले आहे. त्याचबरोबर हा असेपावेतो नागडे होऊन नाच करता येणार नाही, हे ओळखून मोरारजींचा राजकीय वध करण्याचा डाव आखण्यात आला होता.

मालवीय, पटनाईक, मोहन धारिया किंवा त्या सर्वांची मलिका सुलताना

इंदिरा यांपेक्षा मोरारजी सर्वच अर्थाने तत्त्वनिष्ठ आहेत. होय, ते कडवट धार्मिक आहेत. सुधारणा सांभाळून अंगिकाराव्यात असे त्यांना वाटते. व्यापारी व उद्योगपती यांच्यावद्दल सतत अप्रिय किंवा खुळचट विधाने करावयाची त्यांना सवय नाही. कांतीलाल प्रकरणात काही टक्के दोष त्यांच्या पदरात पडेलही. पण काँग्रेसमधला कोण हरीचा लाल तितका तरी स्वच्छ आहे. खुद्द इंदिराबाईंनी ज्या कोंवडचांच्या बळावर पहाट झाल्याची वांग दिली ते सर्व कोंबडे एकजात पापीच आहेत. अगदी मोहन धारिया हे तरी काय किंमतीचे तत्त्वनिष्ठ आहेत ? सत्तेसाठी आणि खासदारीसाठी ज्या माणसाने पक्षांतर केले त्याने काय म्हणून हे वेगडी पुरोगामित्व मिरवावे ?

पण माझी व्यथा निराळीच आहे. चव्हाणांच्यापायी मोरारजी वळी गेले तरी हा पोलादी छातीचा पोकळ सह्याद्रि खुर्चीला चिकटून आहे. अजून वेळ आली नाही, असे अन्य म्हाताऱ्या सिंडिकेटच्या सहकाऱ्यांप्रमाणे याही पोकळ सह्याद्रीला वाटते काय ? रा. स्व. संघवाले सांगत असत की, आपण एकजूट केली पाहिजे आणि वेळ आली म्हणजे ...आता ही वेळ कधीच आली नाही. खरे तर पराक्रमासाठी वेळ कधी तुमच्याकडे येत नाही. आपणच संधीला सामोरे जावयाचे असते. ज्या तऱ्हेने मोरारजींच्या पाठीत मलिका इंदिराने सुरा खुपसला, त्याविरुद्ध उभे रहाण्याची हिंमत अन्य कोणात नसली, तरी चव्हाणातही नसावी, हाय रे दुर्दैवा ! हा कसला सह्याद्रि ! वेळ येणार केव्हा आणि चव्हाणांचा पुरुषार्थ उभा होणार केव्हा ? लोकशाही हवी तर पक्षनिष्ठा हवी आणि पक्षाची इभ्रत विकू पहाणारी ही पोरकट पंतप्रधान आवरता येत नसेल, तर हे असले बेगडी पुरुषसिंह हवेत कशाला. सारी सभ्यता, विवेक आणि समंजसपणा पर्समध्ये गुंडाळून ठेवून बहकणाऱ्या वा चेकाळलेल्या राजकन्येला आवरता येत नसेल तर थूः तुमच्या साऱ्या कर्तबगारीवर.

आणि इंदिराजींनी स्वकीयांचा नायनाट करण्यासाठी कोसिजिनला जे खुणावले आहे त्यासाठी तरी सारी शक्ती आणि संघटना आमच्या नेत्यांनी खर्च करून या वेडावलेल्या राजकन्येला दिल्लीच्या तक्तावरून खेचून काढले पाहिजे. आम्ही काँग्रेसप्रेमी खचित नाही. काँग्रेसचा नाश झालेला आम्हाला जरूर हवा आहे पण काँग्रेसचा नाश म्हणजे कम्युनिस्टांना संधी असा जर पर्याय असेल, तर काँग्रेसच्या पाठी उभे रहाणे हेच राष्ट्रवाद्यांचे कर्तव्य होय. सोशालिस्टाप्रमाणे कोणत्याही साध्यसाधनानी काँग्रेसचा नाश करायला उद्युक्त होणे म्हणे ज्योती बसू–नंबुद्रीपाद याची हुकमत दिल्लीवर आणण्यासारखे आहे. स्वतःचा पक्ष, देशाचे स्वातंत्र्य, मानवी व्यक्तिस्वातंत्र्याचे आणि कम्युनिझमचे असलेले नाते हे सारे काही विसरून उडाणटप्पू आणि केवळ शब्दात पुरोगामी असणाऱ्या

तथाकथित यंग टर्क्सच्या नादाने इंदिराजी चेकाळल्या आहेत आणि त्यांची सारी मदार इथल्या कम्युनिस्ट भाईबंदावर आहे. ज्योतिबसू आणि नंबुद्रीपाद यांची उद्धट, अहंमन्य आणि देशघातक वक्तव्ये त्या खपवून घेत आहेत. तेही सारे सूचक आहे. भारतीय भूमीवरील सिंहासनाच्या प्राप्तीसाठी रूसमधून कुमक मागविणाऱ्या या अवलक्षणी बाईला म्हणावे काय ! जे मागे घडले, तेच इथे पुन्हा घडणार. कम्युनिस्टांना ज्या देशात खड्यासारखे फेकून देतात, तिथेच गेल्या दहा वर्षात दोन कम्युनिस्ट राज्ये निर्माण झाली आणि सुलताना इंदिरेच्या नव्या धोरणाने 'हातोडा–कोयता' आता अधिक आवाजही करू लागला आहे. इंदिराजींना जर हुसकून काढले नाही, तर भवितव्यता विकट आहे. संजीव रेड्डी जर निवडून आले, तर आपण रस्त्यावरच प्रश्न नेऊ, असे डांगे महाशय सांगतात. आणि नंबुद्रीपाद तर उघडउघड कबूल करतात की, घटना वगैरे आपण मानतच नाही. किंबहुना ती मोडणे हेच आपले पवित्र कर्तव्य आहे. झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी आदी राष्ट्रांवर कम्युनिस्ट रशियाने कसे पाशवी अत्याचार केले, हे समोर असताना कम्युनिझमला येथे निमंत्रणे देणारी सुलताना एकतर धडधडीत मूर्ख तरी असली पाहिजे किंवा फाजील महत्त्वाकांक्षेने वेडी झाली असली पाहिजे. आपला देश जसा अमेरिकन वर्चस्वापासूर दूर रहावा, असे आम्हाला वाटते, त्याहुनही अधिक तो रशियन अस्वलाच्या पंजापासून दूर रहावा, असे वाटते. जिथे जिथे अमेरिकेने हस्तक्षेप केला तेथे तेथे कम्युनिझम लवकर आला. म्हणूनच अमेरिकेच्या आर्थिक गुलामगिरीतून आपण लवकर सुटका करून घ्यायला हवी. इथे घरभेदे पुष्कळ आहेत आणि रशियन पैसा इथे नुसता कोसळतो आहे. अत्र्यांच्या साऱ्या समृद्धीतही डांग्यांचा पैसा गुंतला होता, हे आता उघड झाले आहे. अत्र्यांच्यासारख्या बलदंड माणसालासुद्धा कम्युनिस्ट विकत घेऊ शकले, हे पाहिल्यावर आपण कम्युनिस्टांपासून किती दक्ष असायला हवे, हे लक्षात यायला हरकत नाही. आणि म्हणून दिल्लीत परवा जो सत्तासंघर्ष घडला, त्याचे स्वरूप यानुसार पारखले पाहिजे. जयचंद राठोडाची अवलाद या देशात नांदते आहे. परकीय सामर्थ्याने स्वधर्म–स्वदेश–स्वातंत्र्य यांना खच्ची करीत ही अवलाद स्वतःचे सिंहासन सुरक्षित ठेवीत आहे. पण मागे जयचंदाचे काय झाले ! भारत नुकता कोठे एका साम्राज्यशाहीतून मुक्त झाला. त्याला पुन्हा दुसऱ्या साम्राज्यशाही खाली ढकलण्याचा हा डाव सर्वांनी एक होऊन हाणून पाडला पाहिजे.

दिनांक १० ऑगष्ट १९६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७६.१२ दि: ...
क्रमांक ...२४४८... नोंद दि: ...



REFBK-0018162